# महाराष्ट्रातील निवडक किल्ले-सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका
# (विशेष संदर्भ : पुणे व सातारा जिल्हा)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन प्रबंध


**संशोधक**

अविनाश बाबासाहेब पाटील

(कायम नोंदणी क्रमांक : ०२११२००६१३५)

**मार्गदर्शक**

डॉ. अमर पांडे


**नोव्हेंबर २०१८**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) या पदवीसाठी श्री. अविनाश बाबासाहेब पाटील यांनी ''महाराष्ट्रातील निवडक किल्ले सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका'' (विशेष संदर्भः पुणे व सातारा जिल्हा) या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु. जी. सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरुन सदर शोधप्रबंधाचे काम त्यांनी केलेले आहे.

ठिकाण : सांगली
दिनांक : नोव्हेंबर २०१८

**मार्गदर्शक**
डॉ. अमर पांडे

# मूल्यमापन प्रमाणपत्र

This is to Certify that the thesis entitled, ''**महाराष्ट्रातील निवडक किल्ले सद्यस्थिती, त्यांच्या संवधर्नामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका**'' (**विशेष संदर्भः पुणे व सातारा जिल्हा**) submitted by Shri. Avinash Babasaheb Patil to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the deg ree of Doctor of Philosophy (Ph.D.) is bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or part have not been submitted to any other institute or university for the award of any other degree or diploma.

Furthermore in accordance with the UGC rules 2009 that govern the Ph.D. student. The student has completed the due process that includes Interview.

Place: Sangli
Date: Nov- 2018

Signature of Research Guide

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, ''महाराष्ट्रातील निवडक किल्ले- सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका'' (विशेष संदर्भः पुणे व सातारा जिल्हा) हा शोधप्रबंध मी डॉ. अमर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच्.डी. पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : सांगली
दिनांक : नोव्हेंबर २०१८

**सादरकर्ता**

अविनाश बाबासाहेब पाटील

# मनोगत

महाराष्ट्रातील निवडक किल्ले- सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका'' (विशेष संदर्भः पुणे व सातारा जिल्हा) हा शोधप्रबंध पीएच्.डी. पदवीसाठी सादर करत आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालावधीत स्वराज्य स्थापना व संरक्षणामध्ये पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मध्ययुगात महत्त्वपूर्ण स्थान असणाऱ्या किल्ल्यांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी तसेच अशा किल्ल्यांच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासन व आपली समाज म्हणून जबाबदारी पार पाडण्यासाठी आपण  कशा प्रकारे प्रयत्नशील आहोत याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी हा अभ्यास विषय प्रबंध लेखनासाठी निवडलेला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी डॉ. अमर पांडे हे मला मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यांनी विषय निवडीपासून संपूर्ण प्रबंध पूर्ण होईपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. अत्यंत आपुलकीने, निरपेक्ष वृत्तीने आणि परखडपणे मार्गदर्शन केल्यामुळे हा शोधप्रबंध चिकाटीने पूर्ण करु शकलो. म्हणून त्यांचे आभार न मानता मी सदैव त्यांच्या ऋणात राहणे पसंत करेन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विभागाचे अधिष्ठाता डॉ बी. डी. कुलकर्णी यांनी संशोधन कार्यात मोलाचे मार्गदर्शन केले तसेच इतिहास विभागप्रमुख डॉ. सौ. नलिनी वाघमारे यांनी हा शोधप्रबंध लिहिण्यासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले त्याबद्दल मी दोघांचाही आभारी आहे.

माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर व डॉ. संध्या पंडीत यांनीही वेळोवेळी संशोधनासाठी मार्गदर्शन करुन प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठामधील सर्व कार्यालयीन सेवकांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्यामध्ये बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी येथील प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे यांनी वेळोवळी अमूल्य मार्गदर्शन केल्यामुळे व सातत्याने प्रेरणा दिल्यामुळे माझे संशोधन कार्य पूर्ण होऊ शकले त्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

संशोधनासाठी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, राज्य पुरातत्त्व विभाग कार्यालयाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, पुणे शासकीय अभिलेखागाराचे प्रमुख व त्यांचे सहकारी, कोल्हापूर पुराभिलेखागाराचे प्रमुख व त्यांचे सहकारी, राजस्थान राज्य अभिलेखागार, बिकानेरचे प्रमुख व त्यांचे सहकारी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग मुंबईचे प्रमुख व त्यांचे सहकारी, पुणे सबसर्कल कार्यालयाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, जुन्नर सबसर्कल कार्यालयाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, जुन्नर वनविभाग कार्यालयाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, जुन्नर सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, नारायणगाव वनविभागाचे प्रमुख व त्यांचे सहकारी, पुणे महानगरपालिका कार्यालयातील भवन रचना विभागाचे प्रमुख व त्यांचे सहकारी या सर्वांनी मला माझ्या संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारी महत्त्वपूर्ण कागदपत्रे व बहुमूल्य माहिती उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

माझ्या संशोधनासाठी डॉ. तेजस गर्गे, संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र राज्य तसेच श्री. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे आणि पुणे महानगरपालिकेच्या भवन रचना विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री. सुनिल मोहिते यांनी किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत महत्त्वपूर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन दिली व मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

मला संशोधनावेळी महाराष्ट्र राज्य किल्ले संवर्धन समितीचे सदस्य, मोडी कागदपत्राचे तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत अभंग व डेक्कन कॉलेज ॲन्ड पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च सेंटर, पुणे येथील प्रा. डॉ. सचिन जोशी तसेच प्रा. प्र. के. घाणेकर, कोल्हापूर येथील

श्री. भगवान चिले तसेच श्री. संदीप तापकीर यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले तसेच महत्त्वपूर्ण सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

प्रबंध लेखनासाठी साधनांची उपलब्धता करुन देताना टिळक महाराष्ट्र विद्यापीठ येथील ग्रंथालय, पुणे, डेक्कन कॉलेज ॲन्ड पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च सेंटर ग्रंथालय, पुणे, शिवाजी विद्यापीठ  ग्रंथालय, कोल्हापूर, भारत इतिहास संशोधक मंडळ ग्रंथालय पुणे, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली ग्रंथालय, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली ग्रंथालय, महात्मा गांधी ग्रंथालय, सांगली, शासकीय जिल्हा ग्रंथालय, सांगली इत्यादी ठिकाणचे ग्रंथपाल व तेथील सर्व सेवकांनी अर्थपूर्ण मदत केली त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

शोधप्रबंधासाठी मला लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे माजी चेअरमन श्री. सुरेश पाटील यांनी संशोधनासाठी प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. श्रीमती कस्तुरबाई  वालचंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. के एस. पाटील, माजी उपप्राचार्य श्री. बी. ए. पाटील, विद्यमान प्राचार्य डॉ. व्ही. बी. कोडग, उपप्राचार्य श्री. एन. डी. बिरनाळे, प्रा. एम. बी मोहिरे, प्रा. डॉ. गौतम ढाले, श्रीमती आक्काताई नाना नेजे हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, दत्तवाड चे मुख्याध्यापक श्री. एस. एम. तावदारे, पर्यवेक्षक श्री ए. जी. कोळी, ज्युनियर विभाग प्रमुख प्रा. एस. ए. पाटील तसेच श्री. श्रीधर आपटे, प्रा. संदीप भुयेकर या सर्वांनी मला माझ्या संशोधन कार्याची सातत्याने विचारपूस करुन प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी देताना माझे मित्र प्रा. महावीर पाटील, अक्षय पालखे, मयुरेश जाधव, सूरज यादव, दिपक पाटेकर, रवींद्र गायकवाड यांनी मोलाची साथ दिली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

अखेरीस मला सदैव उच्च शिक्षणासाठी व संशोधन कार्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणारे माझे आदरणीय वडील श्री. बाबासाहेब पाटील, माझी आई सौ. रतन पाटील यांचा मी सदैव ऋणी राहीन. त्यांच्या भक्कम पाठिंब्याशिवाय माझे संशोधन कार्य पूर्ण होऊ

शकले नसते. माझ्या सौभाग्यवती सौ. कविता, मुलगा चि. आरुष, बंधू डॉ. भरत, वहिनी डॉ. अश्विनी, बहिण प्रा. निलम पाटील यांचे सततचे प्रोत्साहन व बहुमोल सहकार्य मिळाल्यामुळे मी संशोधन पूर्ण करु शकलो त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रस्तुत प्रबंधाचे टंकलेखन जास्तीत जास्त अचूक व सुबक काम वेळेत करुन दिल्याबद्दल श्री. बाहुबली कांते व सौ. वंदना व सौ. तेजल शिंदे यांचा मी आभारी आहे.

सदरचा शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य व प्रेरणा मिळाले त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

**सादरकर्ता**

अविनाश बाबासाहेब पाटील

ठिकाण : सांगली

दिनांक : नोव्हेंबर २०१८

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १-४० |
| २. | पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास | ४१-११७ |
| ३. | सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास | ११८-१३६ |
| ४. | पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती | १३७-२०२ |
| ५. | दुर्गसंवर्धन : काळाची गरज | २०३-२७४ |
| ६. | किल्ले संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासन व समाजाची भूमिका | २७५-३४३ |
| ७. | उपसंहार | ३४४-३६० |
| * | निवडक संदर्भ-साहित्य-सूची | ३६१-३७२ |
| * | परिशिष्टे | ३७३-३९४ |

## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

महाराष्ट्र हे भारतीय संघराज्यातील २९ राज्यांपैकी एक प्रमुख पुरोगामी, प्रगत व समृध्द सांस्कृतिक वारसा लाभलेले राज्य आहे. क्षेत्रफळाबाबतीत मध्यप्रदेश व राजस्थान नंतर देशात महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र ाचे क्षेत्रफळ ३,०७,७६२ चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राचाअक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार अनुक्रमे १५°४८' उत्तर ते २२°०६' उत्तर व ७२°३६' पूर्व या दरम्यान आहे.[१] महाराष्ट्राचे सर्वात ठळक भूरचनात्मक वैशिष्ट्य पश्चिम भागात उत्तर दक्षिण जाणारी सह्याद्री पर्वताची रांग असून हा पश्चिम घाटाचाच भाग आहे. महाराष्ट्र ातील त्याची एकूण लांबी ६४० कि. मी. असून सर्वसाधारण समुद्रसपाटीपासून उंची ८०० ते १००० मीटर आहे.[२] सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरांनी आणि डोंगरांनी महाराष्ट्र ाचा इतिहास घडवला आहे. महाराष्ट्राच्या या भौगोलिक वैशिष्ट्यामुळे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर आणि त्याच्या पश्चिमेकडील उतारावरील भागात गिरीदुर्गांची संख्या जास्त आहे. सह्याद्री व त्याच्या वेगवेगळ्या डोंगररांगांच्या माथ्यावर ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरलेले शिवनेरी, राजगड, रायगड, प्रतापगड, सिंहगड, विशाळगड यासारखे अनेक डोंगरी किल्ले आहेत.[३] त्यामुळे महाराष्ट्राची भूराजनैतिक जडणघडण आणि किल्ले यांचा अतूट संबंध आहे. महाराष्ट्राच्या इतिहासावर आणि भूगोलावर किल्ल्यांमुळे दूरगामी परिणाम झाला आहे. महाराष्ट्रात किल्ल्यांची संख्या व विविधताही अतिशय लक्षणीय आहे. महाराष्ट्रातील अनेक पर्वतरांगामध्ये अनेक किल्ले इतिहासाचे साक्षीदार म्हणून उभे आहेत. मराठ्यांच्या दैदिप्यमान इतिहासामध्ये किल्ल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या अभेद्यपणाचा अत्यंत चातुर्याने पुरेपूर वापर करुन घेत आपल्या स्वराज्याची निर्मिती केली. या किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण करुन आपला राज्यविस्तार करीत मराठ्यांचे स्वतंत्र, सार्वभौम राज्य स्थापन केले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर या किल्ल्यांनीच मराठा राज्याचे रक्षण केले व मुघल सत्तेला शेवटपर्यंत झुंज देऊन मराठ्यांवर वर्चस्व प्रस्थापित होऊ दिले नाही.

**किल्ल्यांचा इतिहास**

आपल्या राज्याचे किंवा प्रदेशाचे शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी त्याचप्रमाणे सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तूस 'किल्ला' असे म्हणतात.[४] इंग्रजी भाषेमध्ये किल्ल्यासाठी ***Castle, Fort*** असे प्रतिशब्द आहेत.[५] इंग्रजीत ***Citadel, Berg*** याही संज्ञा किल्ल्यासाठी वापरल्या जातात. तर मराठीत दुर्ग, गिरीदुर्ग, व्दीपदुर्ग, जंजिरा, गढी, कोट, गड, बालेकिल्ला इत्यादी संज्ञांनी या वास्तूचे वेगवेगळे प्रकार दर्शविले जातात. राष्ट्राच्या, प्रदेशाच्या रक्षणासाठी पुरातन काळापासून किल्ले बांधण्याची कला अस्तित्वात होती. शत्रूंच्या गटांपासून स्वत:च्या लोकांच्या संरक्षणासाठी, दुसऱ्यांवर अधिकार गाजवण्यासाठी, वर्चस्व निर्माण करण्यासाठी, राज्यविस्तार करण्यासाठी, आक्रमक हल्ल्यांसाठी अशा किल्ल्यांची निर्मिती झाली. त्याचप्रमाणे शांततेच्या काळात स्थानिक बंदोबस्तासाठी आणि रहदारीच्या नियंत्रणासाठी किल्ले बांधण्याची प्रथा सुरु झाली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात निर्माण केलेले दुर्ग वा किल्ले सर्वार्थाने आगळे ठरले. कारण दिल्ली स्थित परकीय आक्रमक व जुलमी मुघल राजवट, दक्षिणेतील बहामनी राज्यविस्तार व परधर्मीय सत्ता महाराष्ट्राच्या काही भागावर हुकूमत गाजवित होत्या.[६] अशा आपत्तीचा काही तुटवडा नसलेल्या काळात म्हणजेच सतत युद्धाचाच प्रसंग असणाऱ्या काळात महाराजांना सह्याद्रीचा आश्रय घ्यावा लागे. प्रचंड मुघल सैन्याशी लढून आपले राज्य टिकवण्यासाठी गड, किल्ल्यांसारखे दुसरे अमोघ शस्त्र नव्हते. त्यासाठी शिवाजी महाराजांनी त्या त्या प्रदेशानुसार किल्ल्यांची बांधणी, दुरुस्ती, डागडुजी करण्यास प्रारंभ केला. नैसर्गिक अनुकुलतेचा खुबीने वापर करीत किल्ल्यांना अभेद्य बनवले. हे सर्व किल्ले संरक्षक किंवा लढाऊ सेनाच आहे असे म्हटले तर त्यावेळी वावगे नव्हते. ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग'' या एकाच वाक्यात मध्ययुगीन काळातील किल्ल्यांचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्यांनी '*आज्ञापत्रामध्ये*' स्पष्ट केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म किल्ल्यावर झाला, त्यांच्या राज्याभिषेकही किल्ल्यावरच

झाला आणि त्यांचा मृत्यूही किल्ल्यावरच झाला. शिवरायांनी बांधलेल्या किल्ल्यांची रचना व स्थापत्याचा अभ्यास केल्यास आश्चर्यचकित होण्याची वेळ येते, म्हणून शिवाजी महाराज म्हणजे किल्ले आणि किल्ले म्हणजे शिवाजी महाराज हे समीकरण या देशात रुढ झाले.[७] मराठा स्वातंत्र्ययुध्दाच्या नंतरच्या काळात अनेक राजकीय घडामोडी घडल्या. मराठ्यांच्या स्वराज्य निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या किल्ल्यांकडे तत्कालीन राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष होत गेले. पुढील काळात राजधान्या किल्ल्यांवरुन सपाटीवर आल्या. युध्दाच्या तंत्रात आणि शस्त्रांमध्ये आमूलाग्र बदल होत गेले. त्यामुळे किल्ल्यांचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत गेले. त्याचा वापर माफक कारणांसाठीच होऊ लागला.

पेशवे काळामध्ये किल्ल्यांकडे अतिशय दुर्लक्ष झाले. एकेकाळी स्वातंत्र्याची प्रतीके असणाऱ्या किल्ल्यांच्या बाबतीत अत्यंत उदासीनतेने पाहिले गेले. मराठा राज्य खालसा झाल्यानंतर अशा किल्ल्यांवर इंग्रजांची वक्रदृष्टी वळली. किल्ले ही मराठ्यांच्या स्वातंत्र्याची प्रतीके आहेत, स्फूर्तीस्थाने आहेत, मराठ्यांच्या अजिंक्यपणाचे मर्म आहे अशी जाणीव इंग्रजांमध्ये निर्माण झाली. भारतातील तरुण वर्ग जर अशा किल्ल्यांवर गेला तर तो इतिहासाने प्रेरित होईल, एकजूट निर्माण करेल आणि इंग्रज राजवटीवर त्वेषाने हल्ला करेल अशी भिती इंग्रजांना वाटू लागल्याने त्यांनी प्रत्येक किल्ल्याची जमेल तशी नासधूस करुन मराठ्यांचा जाज्वल्य इतिहासच नष्ट करण्याचा प्रयत्न केला. किल्ल्यांवर जाणाऱ्या वाटा, किल्ल्यांवरील बांधकामे, कार्यालये, निवासस्थाने, दारुगोळा, तटबंद्या, पाण्याच्या टाक्या अत्यंत निर्दयीपणे उध्वस्त करुन टाकल्या. ब्रिटिश साम्राज्याला कोणीही आव्हान देऊ नये अशी विचारसरणी त्यामागे होती. इंग्रजांच्या विध्वंसक, संकुचित प्रवृत्तीमुळे या दुर्गांची, किल्ल्यांची अतिशय दुर्दशा झाली. तेथील इमारती, वाडे, चौथरे, पाण्याच्या टाक्या या अत्यंत मरणासन्न अवस्थेत गेल्याने मराठ्यांचा इतिहासच विस्मरणात जाण्यास सुरुवात झाली.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकार पुरातत्त्व खात्यामार्फत किल्ल्यांची निगा व व्यवस्था राखण्याचे कार्य करीत आहे. वनखाते, पुरातत्त्वखाते,

सांस्कृतिक व पर्यटन खाते यांचे मार्फत या समृध्द वारशाला जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. परंतु हे प्रयत्न अपुरे पडताहेत. महाराष्ट्रातील काहीच किल्ल्यांचे व्यवस्थापन व देखभाल भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागामार्फत होत आहे. उरलेल्या बहुतांशी किल्ल्यांची अवस्था अतिशय दयनीय आहे. महाराष्ट्रराज्य सरकारच्या पुरातत्त्व खात्यामार्फतही काही किल्ल्यांची व्यवस्था पाहिली जात आहे. परंतु ते तोकडे प्रयत्न आहेत. किल्ल्यांकडे पाहिल्या जाणाऱ्या शासनाच्या उदासीन दृष्टीमुळे किल्ल्यांची स्थिती दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. नैसर्गिक घटकांमुळे जसे ऊन, वारा, पाऊस यामुळेही किल्ल्यांची दिवसेंदिवस पडझड होत आहे. त्याच्या मूळ सौंदर्याला धक्का पोहोचत आहे. किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांकडूनही अत्यंत बेफिकिरीने, अज्ञानाने या दैदिप्यमान वारशाला धक्का पोहोचवला जात आहे. तेथील बांधकामाची दिवसेंदिवस पडझड होत आहे. त्याचे मूळ सौंदर्य नष्ट होत चालले आहे. तेथील इतिहास पुसला जात आहे. म्हणून या समृध्द वारशाचे जतन, संवर्धन, संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्राचा वैभवशाली इतिहास जिवंत राखण्यासाठी किल्ले संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. हा वैभवशाली वारसा जपण्यासाठी सर्वच पातळ्यांवर व्यापक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये किल्ल्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. किल्ले म्हणजे स्वराज्याच्या किल्ल्याच होत्या. किल्ला हा त्यांच्या स्वराज्याचा आत्मा होता. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये किल्ले आजही दिमाखात आपले अस्तित्व टिकवून इतिहासाचे साक्षीदार म्हणून उभे आहेत. प्रत्येक किल्ल्याचा स्वतंत्र असा इतिहास आहे. प्रत्येक किल्ल्याचा व त्या परिसराचा स्वतंत्र स्थानिक इतिहास लिहिणे शक्य आहे. विविध अभिलेखागारांत विपुल प्रमाणात कागदपत्रे, साधने उपलब्ध आहेत.

प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे व सातारा जिल्ह्यातील एकूण ५३ किल्ल्यांपैकी निवडक १० किल्ल्यांच्या जतनासाठी, संवर्धनासाठी केंद्रीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग, पर्यटन विभाग यांच्याकडून कोणकोणते प्रयत्न झाले याचा

सखोल आढावा घेण्यात आला आहे. सदर संशोधनातून किल्ल्यांचा स्थानिक इतिहास, किल्ल्यांची सद्यस्थिती, किल्ल्यांचे ऐतिहासिकदृष्ट्या महत्व, त्याच्या संवर्धनाची गरज, शासकीय प्रयत्न, समाजाच्या सहभागातून किल्ले संवर्धन अशा विविध दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. आधुनिक काळामध्ये किल्ले या ऐतिहासिक वास्तूंना भेट देणाऱ्या पर्यटकांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. अभ्यास, सर्वेक्षण, पर्यटन, मनोरंजन, सुट्ट्यांचा आनंद अशा विविध कारणांमुळे किल्ल्यांवर पर्यटकांची वर्दळ लक्षणीय आहे. अशा निवडक किल्ल्यांची सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका या दृष्टीने सविस्तर अभ्यास प्रस्तुत संशोधनाद्वारे करण्यात आला आहे.

मानवाच्या काही मुलभूत संकल्पनांपैकी किल्ला अथवा दुर्ग ही एक संकल्पना आहे. माणूस प्रथम गुहेत वास्तव्य करू लागला. जंगली प्राण्यांपासून संरक्षण व्हावे म्हणून त्याने गुहेच्या तोंडाशी शिळा ठेवली. अग्नीचा शोध लागल्यावर तो सोबत पलिता बाळगू लागला. स्वत:च्या संरक्षणासाठी त्याने काही प्राण्यांना जवळ केले, आपलेसे केले. त्यापैकी कुत्रा हा महत्त्वाचा प्राणी होता. निवाऱ्यासाठी त्याने प्रथम झोपडी बांधली असावी. शेती व झोपडीच्या संरक्षणासाठी त्याने काटेरी कुंपण घातले. कालांतराने बांधकाम केले. नागरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आणखी गुणात्मक बदल घडून आले. लहान आकाराच्या खेड्यांच्या बरोबरीने, मध्यम शहरे आणि मोठी नगरे वसली. आता सुरक्षेचे कवच विस्तारले जाऊन तटबंदीचा जन्म झाला. उदा. प्राचीन भारतातील हरप्पा, मोहोंजोदारो, लोथल, कालिबंगन आणि धोलावीरा इत्यादी शहरांना तटबंदी होती.

''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय प्रजा भग्न होऊन देश उद्वस होतो... हे राज्य तरी तीर्थरुप थोरले कैलासवासी स्वामींनी गडांवरुनच निर्माण केले... गडकोटविरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्याणी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी... गडकोट म्हणजे

सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणरक्षक, यैसे चित्तास आणीन कोण्हाचे भरवशावर न जाता, आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधणे याचा हव्यास स्वतःच करावा.''[८] रामचंद्रपंत अमात्य यांच्या *'आज्ञापत्रा'*तील या विवेचनावरून आपणास भारतीय इतिहासातील किल्ल्यांचे महत्त्व लक्षात येते.

महाराष्ट्राची भूराजनैतिक जडणघडण आणि किल्ले यांचा अतूट संबंध आहे. महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलावर किल्ल्यांमुळे दूरगामी परिणाम झाला आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून संरक्षणासाठी किल्ले बांधण्याची कला अस्तित्वात होती. मध्ययुगामध्ये भारतावर वर्चस्व मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या इस्लामी राज्यकर्त्यांनाही किल्ल्यांचे महत्त्व माहीत होते.

प्राचीन काळापासून 'दुर्ग' या संकल्पनेचा एकच अर्थ घेतला गेला आहे. 'गमनायदुष्करः इति दुर्गः' किंवा 'दुःखेन गच्छत्यत्ररिपुः सः दुर्गः' अर्थ असा की, जिथे जाणे, ज्यावर चढून जाणे, ज्यात प्रवेश करणे कठीण अशी डोंगर-उंची म्हणजे दुर्ग किंवा जिथे शत्रूला राज्यद्रोही तसेच आतंकवाद्यांना प्रवेश करणे दुःष्कर असे सुरक्षित स्थान म्हणजे दुर्ग.[९]

'किला' हा मूळचा अरबी शब्द आहे. 'गड किंवा गढ' हा हिंदुस्थानी शब्द. 'दुर्ग' हा संस्कृत शब्द आहे. लहान आकाराच्या किल्ल्यांना कोट, गढी असे संबोधतात. बालेकिल्ला हा शब्द 'बाला' या मूळच्या फार्सी शब्दावरून आला आहे. बाला याचा अर्थ 'उंच जागी' असा होतो.[१०]

चार हजार वर्षापूर्वी इजिप्तमध्ये 'सेम्ना' नावाचा किल्ला बांधण्यात आला. इ.स.पू. पाचव्या शतकामध्ये ग्रीकांनी अथेन्स शहरामध्ये 'अक्रापॉलिस' नावाचा प्रसिद्ध किल्ला बांधला. रोमन काळात संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यास अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. प्राचीन काळापासून भारतीयांना किल्ले बांधण्याची कला अवगत होती. प्राचीन भारतीय वाङ्‌मयामध्ये विविध ठिकाणी किल्ल्यांचा उल्लेख आला आहे. *ऋग्वेदा*मध्ये किल्ल्याचा उल्लेख 'पूर' असा केला आहे. *ऐतरेय ब्राह्मण* ग्रंथामध्ये आसुरांपासून यज्ञांचे संरक्षण करण्यासाठी किल्ल्यांचा उपयोग होतो

असा उल्लेख आला आहे. *मत्स्यपुराणा*मध्ये किल्ल्याचे प्रकार सांगितले असून त्यापैकी डोंगरी किल्ला सर्वोत्तम आहे असे प्रतिपादन केले आहे.[११]

मोहेंजोदारो, हरप्पा आणि कालीबंगन या ठिकाणी केलेल्या उत्खननांमध्ये सापडलेल्या अवशेषांवरून हरप्पा शहरास भक्कम तटबंदी उभारून शहराच्या मध्यभागी बालेकिल्ला बांधला होता, असे स्पष्ट झाले आहे.[१२] मौर्यकाळामध्ये किल्ले व तटबंदी बांधण्याची कला बरीच प्रगत झाली. तटाची भिंत, बुरूज, कोट किल्ल्यांवरून शत्रूवर मारा करण्याच्या जागा, लपण्याच्या जागा आणि प्रवेशद्वारे, त्याचप्रमाणे खंदक, खंदकावरील पूल यांविषयी तपशीलवार माहिती कौटिल्याने *अर्थशास्त्र* नावाच्या आपल्या ग्रंथामध्ये दिलेली आढळते.[१३] किल्ल्याचे किंवा दुर्गाचे जलदुर्ग, गिरीदुर्ग, धन्वन म्हणजे ओसाड प्रदेशातील दुर्ग आणि वनदुर्ग असे चार प्रकार सांगून गिरीदुर्ग किंवा डोंगरी किल्ला हा सर्वश्रेष्ठ होय असा निर्वाळा कौटिल्याने दिलेला आहे.[१४]

गुप्त, वाकाटक व राष्ट्रकूट या राजवंशांच्या काळात किल्ल्यास विशेष महत्त्व आलेले नव्हते. तरीही या राजवटीत राजांनी आपल्या राज्यातील राजवाडे आणि शहरांभोवती तटबंदी बांधलेली आहे. सातवाहनकालीन नगरांना तटबंदी होती. प्राचीन तमीळ वाङ्मयामध्ये आणि शिलालेखांमधून मदुरा शहराच्या अभेद्य तटबंदीचा उल्लेख आला आहे. मुसलमानपूर्व काळात चालुक्य, शिलाहार आणि यादव या राजवटींमध्ये किल्ल्यांचे महत्त्व वाढू लागले. याच काळात महाराष्ट्रात दौलताबाद, त्रिंबक, साल्हेर, मुल्हेर, अंकाई, टंकाई, अंजनेरी, रांगणा, पन्हाळगड आणि विशाळगड इत्यादी किल्ले बांधले आहेत. या सर्व किल्ल्यांपैकी निजामशाहीची राजधानी असलेला दौलताबादचा डोंगरी किल्ला हा भारतातील अत्यंत बळकट किल्ल्यांमध्ये मोडत असे.[१५] *ज्ञानेश्वरी*च्या बाराव्या अध्यायात दौलताबादच्या देवगिरी किल्ल्याचा उल्लेख आला असून किल्ल्याचा कडा व आतील वळणे, भुयारी रस्ते इत्यादींचे वर्णन केले आहे.[१६]

इस्लामी राज्यकर्त्यांनी भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर त्यांनी मध्यपूर्वेतील किल्ले बांधणीतील प्रगत तंत्राचा वापर भारतात केला. इ.स. १३४७

मध्ये महाराष्ट्रात हसन गंगू बहमनीने बहमनी राज्याची स्थापना केली. बहमनी राज्यकर्त्यांनी युरोप आणि इराणमधील प्रगत झालेल्या दुर्गबांधणीच्या तंत्रज्ञानानुसार महाराष्ट्रात किल्ले बांधण्यास प्रारंभ केला. किल्ल्यास दुहेरी तट, अर्धवर्तुळाकार बुरूज, महाद्वार किंवा प्रवेशद्वाराजवळच संरक्षक जागा, एका मागोमाग एक असलेली परस्परांच्या टप्प्यामध्ये येणारी, मात्र एकमेकांना ९० अंशांमध्ये छेदणारी प्रवेशद्वारे, शत्रूवर मारा करण्यासाठीच्या जागा आणि जंग्या[१७] इत्यादींची निर्मिती ही बहमनी राजवटीतील किल्ल्यांच्या बांधकामाची वैशिष्ट्ये आहेत. बहमनी राजवटीच्या कालखंडात किल्ल्यांच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण झालेला बदल लक्षात घेणे आवश्यक आहे, तो म्हणजे आपल्या लष्करी हालचाली सुलभ व जलद होण्यासाठी बहमनी राजांनी मैदानी प्रदेशामध्ये मोक्याच्या ठिकाणी शहरे वसविली. उदा. बीदर, अहमदनगर इत्यादी. नवीन वसविलेल्या शहरांभोवती अभेद्य तटबंदी उभारली. त्याचप्रमाणे शहरांच्या जवळच भुईकोट किल्ल्यांची निर्मिती केली. उदा. अहमदनगरचा भुईकोट किल्ला.

**कौटिल्याचे अर्थशास्त्र आणि दुर्गविचार**

इतिहास अभ्यासकदेखील दुर्गसंकल्पनेचा उदय हा नागरीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग मानतात. भारतात दुसऱ्या नागरीकरणाच्या वेळी राजगृह, कौशांबी, कपिलवास्तू या नगरांना तटबंदी बांधली होती. कौटिल्याने राज्याच्या व्याख्येमध्ये दुर्ग संकल्पनेस मोठे महत्त्व दिले आहे. राज्याचा भूप्रदेश चार भागांमध्ये म्हणजेच जनपद, दुर्ग/नगर, वन आणि अरण्य असा विभागला आहे. दुर्गावर देखरेख करणारा समाहर्ता हा अधिकारी होता. राज्याच्या सीमांवर चारही बाजूंना दुर्ग असावेत असे प्रतिपादन त्याने 'अध्यक्ष-प्रचार' प्रकरणात केले आहे. किल्ल्यामध्ये राजाचे निवासस्थान मध्यभागी, अन्त:पूर, आचार्य-पुरोहित यांची घरे, त्याचबरोबर नगराची संरचना कशी असावी अशीही नोंद केली आहे.

प्राचीन पाश्चिमात्य आणि पौर्वात्य साहित्यामध्ये किल्ल्यांच्या विविध प्रकारांचे वर्णन केले आहे. वास्तुशास्त्राच्या प्राचीन आणि अभ्यासाच्या दृष्टीने किल्ल्यांचे तीन प्रकार महत्त्वाचे आहेत.

१. भुईकोट किल्ला : उदा. चाकणचा संग्रामदुर्ग व अहमदनगरचा भुईकोट किल्ला.

२. डोंगरी किंवा गिरीदुर्ग : उदा. जुन्नरचा शिवनेरी किल्ला.

३. जलदुर्ग किंवा सागरी किल्ला : उदा. जंजिरा व सिंधुदुर्ग.

मध्ययुगीन इस्लामी राज्यकर्त्यांनी आपल्या राज्यांच्या रक्षणासाठी सीमाभागात किल्ल्यांची साखळीच तयार केली. भारतात किल्ले बांधणीचे तंत्रज्ञान विकसित होत असताना मध्य आशियात युद्धांमध्ये बंदुकीच्या दारूचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला. प्रगत तोफांच्या साह्याने किल्ल्याच्या तटबंदीस खिंडार पाडणे शक्य झाले, म्हणून त्यावर उपाययोजना करण्यासाठी अनेक पाकळ्या असलेले बुरूज बांधण्याची पद्धती दुर्गबांधणीत अस्तित्वात आली. उदा. बहमनी राजवटीत बांधलेला गोवळकोंडा व नळदुर्ग येथील किल्ल्यांचे अनेक पाकळ्यांचे बुरूज याच प्रकारे बांधले आहेत. अशा प्रकारे भारतात प्राचीन काळापासून ते मध्यकाळापर्यंत किल्ला बांधण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले.

किल्ल्यांचे महत्त्व सांगताना रामचंद्रपंत अमात्य यांनी आपल्या *आज्ञापत्रा*मध्ये 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसता मोकळा देश'[१८] असे म्हटले आहे. अमात्यांच्या या एकाच वाक्यामधून किल्ल्याचे महत्त्व लक्षात येते. युद्धप्रसंगामध्ये किल्ला अत्यंत सुरक्षित ठिकाण होते. अनेक वेळा शेवटची लढाई बालेकिल्ल्याच्या आश्रयाने होत असे. बहुतांश राजांनी आपली राजधानीची ठिकाणे म्हणून दुर्गम किल्ल्यांची निवड केली होती. उदा. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी 'रायगड' हा किल्ला. कामंदकीय *नीतीशास्त्रा*मध्ये किल्ल्यास राज्यातील सर्वात सुरक्षित स्थळ मानले होते. किल्ल्यांचे महत्त्व सांगणारा संस्कृत श्लोक कामंदकीय *नीतीशास्त्रा*मध्ये आहे. तो पुढीलप्रमाणे -

'जलावृध्दान्यघनवद्युर्ग कालसहं महत्

दुर्गहीनोनरपतिवार्ता भावयवै सम' [१९]

(दुर्गविरहीत राज्य म्हणजे वाऱ्याच्या झोताबरोबर वाहून जाणाऱ्या ढगासारखेच आहे.)

शुक्राचार्यांनी *शुक्रनीतीसार* या ग्रंथात राज्याची जी सात अंगे सांगितली आहेत, त्यांमध्ये किल्ला हे राज्याचे महत्त्वाचे अंग आहे असे प्रतिपादन केले आहे.[२०] किल्ल्यातील एक सैनिक शंभर जणांशी आणि शंभर लढाऊ सैनिक दहा हजार जणांशी सहज लढू शकतील अशी किल्ल्याची ताकद व महत्त्व *मनुस्मृती* या ग्रंथात सांगितले आहे. सोमेश्वरलिखित *अभिलषतार्थ चिंतामणी* या ग्रंथामध्येही किल्ल्याचे महत्त्व आणि प्रकार यांबाबत माहिती दिलेली आहे.

किल्ल्यांच्या तीन प्रकारांपैकी गिरीदुर्ग किंवा डोंगरी किल्ला हा प्रकार मध्ययुगामध्ये विशेषत : मराठा कालखंडामध्ये राज्य संरक्षणासाठी महत्त्वाचा ठरला. मराठ्यांचे राज्य ज्या प्रदेशात स्थापन झाले आणि विस्तारले त्या प्रदेशाला मध्ययुगामध्ये 'दख्खन'(The Deccan)या नावाने ओळखले जात होते. साधारणपणे उत्तरेला तापी नदीपर्यंत आणि दक्षिणेला कोकण व कृष्णा नदीपर्यंत विस्तृत असलेला प्रदेश १५°-४४°, २१°-१०° उत्तर आणि ७३°-१५°, ७६°-१५° पूर्व हा प्रदेश मध्ययुगामध्ये दख्खन या नावाने ओळखला जात असे.[२१]

भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने दख्खनचा प्रदेश 'दख्खन पठार' (The Deccan Plateau) या नावाने ओळखला जातो. दख्खनचे पठार बेसाल्ट(Basalt) नावाच्या खडकापासून बनलेले आहे. बेसाल्ट म्हणजे काळा पाषाण किंवा दगड होय. या विशिष्ट प्रकारच्या खडकामुळे सह्याद्रीच्या पश्चिमेकडील पर्वतरांगांमध्ये सातमाळा, अजिंठा, बालाघाट आणि महादेव या श्रेणीतील डोंगरांमध्ये उत्तुंग कडे तयार झाल्याने डोंगरांवर सपाट भूभाग असलेल्या अनेक टेकड्या गिरीदुर्ग किंवा डोंगरी किल्ले बांधणीसाठी उपयुक्त ठरल्या. महाराष्ट्रामध्ये डोंगरी किल्ले जास्त असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे दख्खनच्या पठारावरील खडक साधारणपणे ६५० ते १५०० मीटर जाडीचा व काही ठिकाणी ३००० मीटर इतका जाड आहे.[२२] दगडाचा थर डोंगरी किल्ला बांधणीस उपयुक्त आहे.

**मौर्यकाळातील दुर्ग**

मौर्यकाळामध्ये त्यांच्या पाटणा राजधानीस ग्रीक प्रवाशी मॅगेस्थेनीसने भेट दिली असता तो लिहितो, 'ही नगरी १६ कि.मी. लांब आणि ३ कि.मी. रूंद असून

तिच्याभोवती १८५ मी.रूंद आणि १० मी. खोल खंदक होता. नगराभोवती उंच कोट असून त्याला ६४ दरवाजे आणि ५७० बुरूज होते.

पुणे येथील डेक्कन अभिमत विद्यापीठातर्फे ओडिशामधील भुवनेश्वरजवळील शिशुपालगड येथील उत्खनन केले तेथेही दुर्गाचे अवशेष सापडले आहेत. हे अवशेष इ.स.पू.२०० ते इ.स.१०० च्या दरम्यानचे आहेत. त्यावरून गढी हा प्रकार मागे पडून दुर्गनिर्मिती झाल्याचे दिसते.

## कुषाणकाळातील दुर्गबांधणी

दुर्गबांधणीच्या तंत्रामध्ये कुषाणकाळात काहीशी प्रगती दिसते. संरक्षणाच्या तटबंदीस आवश्यक तेवढे बुरूज, शत्रूंवर मारा करता यावा म्हणून तटबंदीस जंग्यांची रचना कुषाणकाळात झाली. *महाभारताच्या* शांतिपर्वामध्ये दुर्गरचना कशी असावी याविषयी भीष्म पितामह पुढीलप्रमाणे सांगतात. 'तटावरील पहारेकऱ्यांना बाहेरील शत्रूंच्या हालचाली दिसण्यासाठी तटभिंतीला भोके असावीत. प्रसंगपात त्यातून तीरांचा माराही करता यावा, तर खंदकात मगरी आणि मासे सोडावेत. (आपण किल्ल्यांभोवती खंदक आहे/असावा एवढेच म्हणतो.) त्यात अधून-मधून शूल उभारावेत, संकटकाळी बाहेर पडता येण्यासाठी सूक्ष्मद्वाराची, गुप्तद्वाराची योजना असावी एवढेच नव्हे तर त्यावर प्रतिहारांची नेमणूक केलेली असावी.' म्हणजे त्या काळापासून संरक्षणासाठीची दृष्टी ठेऊन दुर्गबांधणी झाल्याचे लक्षात येते.[२३]

## मराठी सत्ता आणि किल्ले

दुर्गबांधणीची परंपरा प्राचीन आहे. तसाच इतिहासही तेवढाच परंपरेने समृद्ध आहे. प्राचीन व मध्ययुगीन राजसत्तांनी किल्ल्याचा वापर केला. बांधणीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान वापरले तरी किल्ल्यांचा राज्यविस्तारासाठी महत्त्वपूर्ण वापर खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात झाला. त्यांचे आयुष्य आणि किल्ले यांचा अतूट संबंध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर, स्वराज्यस्थापना तोरणा किल्ल्यावर, राज्याभिषेक रायगडावर, आणि

महानिर्वाणही रायगडावरच, म्हणूनच किल्ल्यांच्या इतिहासाला खरा अर्थ दिला तो शिवाजी महाराजांनी.

छत्रपती शिवाजींनी रामचंद्रपंत आमात्यांकरवी आज्ञापत्र हा ग्रंथ तयार करून घेतला. त्यामध्ये किल्ल्याविषयी माहिती दिली आहे. शिवाजी महाराज आणि किल्ले यांच्या अतुट नात्यांविषयी जेम्स् डग्लस हा पाश्चात्य पंडित पुढीलप्रमाणे लिहितो-

*'Shivaji was a man of forts. Shivajis dwelling was among the rocks, and his strength lay in the everlasting hills. He was born in a fort, the forts made him what he become, and he made the forts what they were the terror of all India, The cradle of his nation, the basis of his conguests, the steps of his ambition, his homeand his joy, many of them he built, all of them he strengthened.'*[२४]

इ.स.१६६६ मध्ये शिवाजी महाराज आग्रा येथे औरंगजेबास भेटावयास गेले. औरंगजेबाच्या दरबारात कोणताही सरदार तोपर्यंत एवढ्या मोठ्या प्रमाणात औरंगजेबास स्वाभिमानाची चुणूक दाखवू शकला नव्हता. ती राजांनी दाखविली. ती देखील आग्रा शहराच्या किल्ल्यातच. स्वत:चा राज्याभिषेक करून कित्येक वर्षे लुप्त पावलेली राज्याभिषेकाची संकल्पना शिवाजींनी पुन्हा किल्ल्यातच (रायगडावर) सुरू करून एक नवा आदर्श घालून दिला.

शिवकाळात किल्ले व इमारतींवर खूप खर्च होतो याविषयी मोरोपंत पिंगळे व निराजीपंत मुजुमदार यांनी महाराजांना विनंती केली की, 'किल्ल्याचे इमारतीस पैका फार लागतो व लोकांचा खर्च फार वाढतो. यांकरिता विचार जे करणे असेल ती आज्ञा करावी. म्हणजे ठीक पडेल. हे ऐकून दौलत आहे. जे करवणे ते समजून करवित आहो. आपणास धर्मस्थापना करणे व राज्य संपादणे. सर्वास अन्न लावून शत्रू प्रवेश न होय ते किल्ल्यांमुळे होते.'

यावरून शिवाजी महाराज किल्ल्यांविषयी किती सूक्ष्म विचार करत होते याची कल्पना येते. संभाजीमहाराजांनी *बुधभूषण* नावाच्या संस्कृत ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी किल्ल्यांचे पुढील सहा प्रकार सांगितले आहेत.

१. धन्वीदुर्ग

२. महिदुर्ग

३. नरदुर्ग

४. वार्क्षदुर्ग

५. अंबदुर्ग

६. गिरीदुर्ग

संभाजी महाराजांच्या मते, 'दुर्ग हा तट आणि इमारती यांनी युक्त असावा... राजाने किल्ल्याच्या मध्यभागी सर्व साधनांनी युक्त असे निवासस्थान बांधावे. ज्यात गुप्त आयुधागार, स्वच्छ जलाशय असावेत. त्या दुर्गातील घरांच्या रांगा पंक्तीबद्ध अशा लांब असाव्यात. त्यापैकी एका घराच्या पंक्तीच्या टोकास मजबूत अशा चौथऱ्यावर चदेवाचे मंदिर असावे. दुसऱ्या रांगेच्या टोकाच्या चौथऱ्यावर राजाचे राहण्याचे स्थान असावे... अश्वशाला उत्तराभिमुख असावी. योद्धे, शिल्पशास्त्रज्ञ या सर्वांस राजाने दुर्गामध्ये घरे द्यावीत... काही काम नसलेल्यांची तेथे गर्दी करू नये... दुर्गास गुप्त दरवाजा ठेवावा, ज्याचा उपयोग करून सेवक आणि राजा शस्त्रांचा साठा करतील...'[२५]

यावरून संभाजी महाराज दुर्गविषयक किती सूक्ष्म विचार करत होते याची कल्पना येते. किल्ल्यांचा उपयोग प्रामुख्याने आपल्या राज्याचे संरक्षण आणि प्रतिकार करण्यासाठी केला जात होता. स्वत:चे राज्य विस्तारण्यासाठी किल्ल्यांचा उपयोग तसेच परकीय वा अन्य सत्तेचे आक्रमण झाल्यास बचावासाठीही किल्ल्यांचा वापर महत्त्वपूर्ण ठरत असे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये डोंगरी किल्ले आणि किल्ल्यांमध्ये कोरलेल्या लेण्यांना इतिहासाचे साधन आणि पर्यटनाच्या दृष्टीने विलक्षण महत्त्व प्राप्त झाले आहे. कोरीव लेण्यांच्या कोरीव व ताशीव कामाच्या प्रगत वास्तुशास्त्रामुळे तासून गुळगुळीत केलेले कडे उभारणे, भुयारी मार्ग खोदणे, किल्ल्यांवर पाणी साठविण्यासाठी टाके तयार करणे, आवश्यक रसदेचा साठा करण्यासाठी खडकात कोठारे तयार करणे इत्यादी सुविधा डोंगरी किल्ले बांधताना तत्कालीन राज्यकर्त्यांनी तयार केल्या. महाराष्ट्रातील डोंगरी किल्ल्यांच्या संख्येचा

विचार केला असता सुमारे ४० ते ४५% डोंगरी किल्ले हे ७३° व ७४° रेखांश आणि २०° ते १७° अक्षांशाच्या चौकटीमध्ये आहेत.[२६]

महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील महत्त्वाचे डोंगरी किल्ले म्हणून पुढील किल्ल्यांचा उल्लेख करता येईल - अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड, जुन्नर तालुक्यातील नारायणगड, जीवधन, शिवनेरी, हडसर, चावंड, पुणे शहराजवळचा सिंहगड, प्रबळगड, वडगाव मावळ मधील राजमाची, लोहगड, तुंग, तिकोना, पुरंदर तालुक्यातील किल्ले पुरंदर, भोर तालुक्यातील राजगड, महाड तालुक्यातील रायगड, सातारा जिल्ह्यातील प्रतापगड आणि कोल्हापूरजवळचा पन्हाळा इत्यादी डोंगरी किल्ले आहेत. किल्ल्यांच्या या यादीमधील शिवनेरी, नारायणगड, जीवधन, हडसर, चावंड आणि हरिश्चंद्रगड हे सहा डोंगरी किल्ले जुन्नर परिसरामध्ये आहेत.

विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय (१४७४-१५२९) यांच्या आश्रयाखाली लोल्ला लक्ष्मीधर यांनी लिहिलेल्या *'देवविलास'* या ग्रंथामध्ये डोंगरी किल्ला कसा असावा याविषयीचे निकष दिले आहेत. डोंगरी किल्ल्यांना चहुबाजूंनी वर चढण्यास कठीण असा नैसर्गिक भाग हवा असतो. सह्याद्रीच्या पर्वतरांगामुळे शिवनेरीला अशी नैसर्गिक रचना लाभली आहे. महाराष्ट्रातून सह्याद्रीची ६४० कि. मी. लांबीची डोंगररांग गेली असल्याने डोंगरी किल्ल्यांची संख्या जास्त आहे.[२७] त्याचप्रमाणे किल्ल्यांना नैसर्गिक संरचना लाभली आहे.

महाराष्ट्रामध्ये साधारणपणे साडेपाचशेच्या आसपास किल्ले आहेत. ज्येष्ठ किल्ले अभ्यासक गो. नी. दांडेकर म्हणतात, 'जनमाणसांमध्ये एका ग्रहाची पाळेमुळे अगदी घट्ट रूतून बसली आहेत' तो असा, की या महाराष्ट्र देशी जितके म्हणून दुर्ग आहेत ते सर्वच्या सर्व शिवछत्रपतींनी रचले आहेत. कोण्याही कड्यापर्वतामधील गुहा किंवा लेणे हे जसे पांडव लेणे किंवा कुठेही धरित्रीच्या उदरातून वर उसळलेला झरा ही जशी सीतेची न्हाणी, तसाच काहीसा हा ग्रह आहे...[२८]

**दुर्गसाहित्याचा आढावा**[२१]

सातवाहन काळापासून महाराष्ट्रामध्ये दुर्गसंस्कृती रुजू लागली. महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोल या दोन्ही विषयांच्या अभ्यास-संशोधनामध्ये दुर्गांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इ.स. १८६० मध्ये ब्रिटिशांनी *'GovernmentList of Civil Forts'*या ग्रंथामध्ये तत्कालीन भारतातील ४८५ किल्ल्यांची माहिती दिली आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये महाराष्ट्रातील २८९ लहान-मोठ्या किल्ल्यांची माहिती आहे. सिडने टॉय यांनी किल्ल्यांच्या इतिहासाची *'A History ofFortification'*व *'The Fortified city of India'* अशी दोन पुस्तके लिहिली असून त्यात महाराष्ट्रातील शिवकालीन किल्ल्यांची माहिती व नकाशे दिले आहेत. ब्रिटिश अधिकारी किल्ल्यांच्या इतिहासाविषयी लिहित होते त्याचवेळी मराठी इतिहास लेखकांनीही त्या विषयावर लिखाणास सुरूवात केली. चिंतामण गंगाधर गोगटे यांनी *'महाराष्ट्र देशातील किल्ले'* हे पुस्तक १९०५ व १९०७ मध्ये अनुक्रमे दोन भागात लिहिले. बहुधा मराठी भाषेतील महाराष्ट्रातील किल्ल्यांविषयीचे हे पहिले पुस्तक असावे. शिवराम महादेव परांजपे यांचे *'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास'* (१९३४), य. न. केळकर यांचे *'चित्रमय शिवाजी'* (१९३५), गणेश हरी खरे यांचे *'स्वराज्यातील तीन दुर्ग'* स. आ. जोगळेकर यांचे *'सह्याद्री'* (१९५२), पंडित महादेव शास्त्री यांचे 'महाराष्ट्रातील धारातीर्थे' (१९७५), इत्यादी ग्रंथांमधून महाराष्ट्रातील किल्ल्यांची माहिती मिळते.

महाराष्ट्रामध्ये दुर्ग अभ्यासाची आवड निर्माण करण्यामध्ये गो. नी. दांडेकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची नावे अग्रक्रमाने घेतली पाहिजेत. गो. नी. दांडेकर यांनी *'दुर्गदर्शन, दुर्गभ्रमणगाथा, शिवतीर्थ राजगड'* ही पुस्तके लिहिली. डॉ. वीणा देव यांचे *'गोनीदांची दुर्गचित्रे'* हे पुस्तक दुर्ग अभ्यासासाठी उपयुक्त आहे. ज्येष्ठ चित्रकार दीनानाथ दलाल यांनी दुर्गांची काढलेली चित्रे अभ्यासकांमध्ये आवड निर्माण करणारी आहेत. शं. रा. देवळे यांचे *'महाराष्ट्रातील किल्ले'* (१९८१), शिवव्याख्याते निनाद बेडेकर यांचे *'दुर्गकथा'*, गजानन खोले यांचे *'शिवरायांच्या दुर्गांची दुर्दशा'*, द. न. पासलकर यांचे *'शिवकालीन*

*किल्ल्यांची व्यवस्था'*, प्र. के. घाणेकर यांचे *'साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची'*, *'अथातो दुर्गजिज्ञासा' 'जलदुर्गांच्या सहवासात'* ही पुस्तके अभ्यासपूर्ण मांडणीची आहेत. आनंद पाळंदे यांचे *'डोंगरयात्रा'*, पांडुरंग पाटणकर यांचे *'साद चाकोरीबाहेरील किल्ल्यांची'*, सुरेश परांजपे यांचे *'चला सहलीला'*, प्रमोद मांडे यांचे *'गडकिल्ले महाराष्ट्राचे'*, भगवान चिले यांचे *'दुर्गसंपदा महाराष्ट्राची'*, *'गडकोट'*, *'वेध जलदुर्गांचा'*, *'दुर्गवैभव कोल्हापूर जिल्ह्याचे'*, *'दुर्गांच्या देशा'*, *'अपरिचित गडकोट'* या पुस्तकांनी किल्लेअभ्यास व संशोधनाला नवी दिशा दिली आहे. महेश तेंडुलकर यांचे 'सिंहगड', सचिन जोशी यांचे *'रत्नागिरी जिल्ह्याची दुर्गजिज्ञासा'*, *'रायगड जिल्ह्याचे दुर्गवैभव'*, अमित बोराले यांचे *'दुर्गभ्रमंती नाशिकची'*, संदिप तापकीर यांचे *'महाराजांच्या जहागिरीतून'* ही पुस्तके आवर्जून वाचण्यासारखी आहेत. मिलिंद गुणाजीकृत *'माझी मुलूखगिरी'*, *'गूढ-रम्य महाराष्ट्र'* ही दोन्ही पुस्तके संशोधनपद्धतीनुसार नसली तरी अभ्यासासाठी व किल्ल्याची प्राथमिक माहिती मिळण्यासाठी उपयुक्त आहेत.

काही लेखकांनी इंग्रजीतूनही किल्ल्यांविषयी लेखन केले आहे. त्यात प्रामुख्याने जे. एन. कमलापूर यांचे *'The Deccan Forts'* (१९६०), भगवान चिले यांचे *'Famous Forts in Maharashtra'*, रमेश देसाई यांचे*'Shivaji the Last Great FortArchitect'*, अमृत वर्मा यांचे *'Fort of India'*, डॉ. के. एस. गुप्ता (संपा.) *'Forts of India'*, हरीश कपाडियाकृत *'Trake the Sahyadri'*, संजय अमृतकर यांचे *'Nashik Expans'*ही इंग्रजी पुस्तके आवर्जून वाचण्यासारखी आहेत.

ऐतिहासिक संशोधनपद्धतीनुसार मांडणी केलेले किल्ल्यांच्या इतिहासाविषयीचे पुस्तक म्हणजे शांताराम विष्णू आवळसकर यांनी लिहिलेले *'रायगडची जीवनगाथा'* हे होय. या पुस्तकात रायगडच्या निर्मितीपासून ते आधुनिक काळापर्यंतचा रायगडचा समग्र इतिहास त्यांनी मांडला आहे. रायगडाविषयीची माहिती देणारे गोविंद गोपाळ टिपणीस महाडकर यांचे *'रायगडची माहिती'*, गोविंदराव बाबाजी जोशीकृत *'रायगड किल्ल्याचे वर्णन'* ही पुस्तके रायगडविषयी माहिती देतात. ज्येष्ठ इतिहासकार गणेश हरी खरे यांचे *'दुर्ग'* व

*'कोंढाणा उर्फ सिंहगड'* ही दोन्ही पुस्तके इतिहास अभ्यासकांसाठी पर्वणीच आहेत. डॉ. प्र. न. देशपांडे यांनी किल्ल्याचा विषय घेऊन पुणे विद्यापीठामध्ये पीएच्. डी. पदवी मिळविली आहे. डॉ. मिलिंद पराडकर यांनी 'शिवछत्रपतींच्या दोन राजधान्या' असा अभ्यासविषय संशोधनासाठी घेऊन त्याविषयीची सविस्तर मांडणी केली. त्यासाठी त्यांना 'पीएच्.डी.' पदवी मिळाली आहे.

ठाणे येथील दुर्गप्रेमी-अभ्यासक सदाशिव टेटविलकर यांनी महाराष्ट्रातील गडकोटांवर प्रदीर्घ लेखन केले आहे. त्यांनी *'गडकिल्ल्यांच्या जावे गावा'*, *'दुर्गयात्री'*, *'दुर्गसंपदा ठाण्याची'*, *'ठाणे किल्ला'* ही किल्ल्यांच्या इतिहासाची पुस्तके लिहिली आहेत. भा.वि.कुलकर्णी हे पुरातत्त्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयामध्ये तंत्रसहाय्यक म्हणून काम करतात. त्यांनी *'मुंबई परिसरातील अर्थात एकेकाळच्या फिरंगणातील किल्ले'* हे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी चार भागांमध्ये परिसरातील किल्ल्यांचा ५०० पृष्ठांमध्ये आढावा घेतला आहे. [३०]

**दुर्गविज्ञानाचा अभ्यास**

किल्ला तथा दुर्गांच्या अनुषंगाने झालेले लिखाण हे प्रामुख्याने किल्ल्यांच्या इतिहासाविषयी झालेले आहे. किल्ल्यांशी संबंधित घटना आणि लढायांचा वृत्तांत, त्याचप्रमाणे कोणत्या सत्तेने किल्ला ताब्यात ठेवण्यासाठी कसे व कोणते प्रयत्न केले, किल्ल्यांवरील राजसत्तांच्या अंमलाचा इतिहास मांडला गेला आहे. ज्या वैशिष्ट्यांचा म्हणजेच दुर्ग-विज्ञानाचा अभ्यास काही निवडक किल्ल्यांच्या बाबत झाला आहे त्यापैकी विशेष व्यक्तिमत्त्व म्हणजे वनस्पतीशास्त्राचे तज्ज्ञ प्राध्यापक डॉ.प्र.के.घाणेकर हे होय. डॉ.घाणेकर यांनी *दुर्गविज्ञान* असे शीर्षक असलेले दर्जेदार पुस्तक लिहिले आहे. डेक्कन अभिमत विद्यापीठातील सचिन जोशी व दुर्ग अभ्यासक डॉ.मिलिंद पराडकर यांनीही दुर्गस्थापत्याविषयीची मांडणी केली आहे. डॉ.रा.श्री.मोरवंचीकर यांनी दौलताबाद किल्ल्याविषयी वैज्ञानिक निकषांवर आधारित लेखन केले आहे.

**दुर्गसाहित्य संमेलन आणि दुर्गअभ्यासाचा प्रसार**

किल्ल्यांना भेटी देणे, त्यांचा अभ्यास करणे ही अभ्यास-संशोधनाची परंपरा मोठी आहे. मात्र २००९ सालापासून दुर्गप्रेमी साहित्य संमेलन भरत आहे. त्याकामी अनेकांचा मोठा वाटा आहे. आतापर्यंत लोक इतिहासप्रेमाने, शिवकाळातील किल्ल्यांच्या कथांनी भारावून जाऊन किल्ल्यांवर जात. त्याशिवाय गिर्यारोहण-भटकंतीच्या ओढीने इतिहास, भूगोल, पर्यावरणाच्या अभ्यासासाठी, वनस्पतींच्या अभ्यासासाठी, (उदा.प्र.के.घाणेकर हे मूळात वनस्पतीशास्त्रज्ञ, ते वनस्पतींचा अभ्यास आणि किल्ले पाहणीचा छंद घेऊन किल्ल्यावर गेले. आज त्यांनी संशोधनाच्या क्षेत्रात वनस्पतीशास्त्राप्रमाणेच किल्ले अभ्यासक्षेत्रात मूलभूत संशोधन केले आहे.) तर काही रविवारी व्यायामासाठी किल्ल्यावर जाणारी मंडळी आहेत. हे उदाहरण केवळ नाममात्र म्हणून देत आहे. अशा विविध किल्ल्यांना भेटी देणारी मंडळी आहेत. उदा. श्री. जयप्रकाश सुराणा, व्यवसायाने बांधकाम व्यावसायिक. ते मात्र मागील अनेक वर्षांपासून दर रविवारी सकाळी नियमितपणे सिंहगडाची वाट चालत जाणारे सिंहगडाचे वारकरी आहेत.

दुर्गसंमेलनामध्ये दुर्गप्रेमींचे एकत्रीकरण, तज्ज्ञ अभ्यासकांची व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, स्लाईड शो, माहितीपट, साहित्य अभिवाचन, प्रकाशन, प्रश्नमंजूषा, खुली चर्चा आणि प्रत्यक्ष दुर्गदर्शन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. या संस्थेचे पाचवे दुर्ग साहित्यसंमेलन २०१५ मध्ये सिंहगड किल्ल्यावर भरले होते. त्याप्रसंगी त्यांनी सिंहगड विशेषांक काढला आहे. तो उत्तम दर्जाचा असून तज्ज्ञ अभ्यासकांचे लेख त्यात समाविष्ट आहेत.

दुर्गसाहित्य संमेलनामुळे किल्ल्यांच्या अभ्यासाला गती मिळाली आहे. दुर्ग आणि स्थापत्य, दुर्ग आणि शिल्पकला, दुर्ग आणि लेणी, दुर्ग आणि अर्थ व्यापार, दुर्ग आणि भूगर्भशास्त्र, दुर्ग आणि प्रकाशचित्रण, दुर्गांवरील जलसंधारण, दुर्गांवरील वनस्पती, दुर्ग आणि पक्षीवैभव, दुर्ग आणि संरक्षणव्यवस्था असे नवनवे अभ्यासाचे, संशोधनाचे विषय दुर्गसंमेलनातील विचार मंथनातून पुढे आले आहेत.

**विषय निवड**

महाराष्ट्रामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत किल्ल्यांची संख्या, विविधता, त्यांचे प्रकार लक्षणीय प्रमाणात आढळतात. प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत किल्ले बांधणी तंत्रामध्ये सातत्याने बदल होत गेलेला दिसतो. मध्ययुगीन काळामध्ये युद्ध पद्धती व युद्धतंत्रे यामध्ये बदल झाला. त्यामुळे किल्ल्यांचे महत्त्व वाढले. किल्ले हे राजसत्ता, सामर्थ्य व स्थापत्यांचे प्रतीक बनले. सह्याद्रीमध्ये उभ्या असलेल्या शेकडो गिरीदुर्गांनी स्वराज्याच्या अंतर्गत प्रदेशाचे रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून पेशवे काळाच्या उत्तरार्धापर्यंत किल्ल्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. किल्ले म्हणजे स्वराज्याचा प्राणच होता. पेशवे काळात किल्ल्यांकडे दुर्लक्ष झाले. इंग्रजांनी आपला साम्राज्यविस्तार करीत असताना किल्ल्यांकडे आपला शत्रू म्हणूनच पाहिले. मराठ्यांच्या राज्याचे खरे सामर्थ्य या किल्ल्यांमध्ये होते हे ओळखून त्यांनी पेशवे दुसरा बाजीरावाचा पराभव केल्यानंतर मराठ्यांच्या सामर्थ्याचे खच्चीकरण करण्यासाठी जाणीवपूर्वक सुरुंग लावून, तोफा डागून अनेक किल्ले नामशेष केले. ब्रिटिश राजवटीत हे सर्व किल्ले दुर्लक्षिले गेले, विस्मरणात गेले. त्यांची प्रचंड पडझड झाली. किल्ल्यांना अवकळा प्राप्त झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व किल्ल्यांची जबाबदारी सरकारकडे गेली. काही किल्ले केंद्रीय पुरातत्त्व विभागामार्फत, काही राज्य पुरातत्त्व विभागामार्फत निगराणीखाली आहेत.

पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती, किल्ल्यांच्या संवर्धनासाठी केंद्रीय व राज्य पुरातत्त्व विभागामार्फत होणारे प्रयत्न यावर अजून संशोधन झालेले नाही. किल्ले ही इतिहास अभ्यासाची साधनेच आहेत. आपल्या ऐतिहासिक वास्तूंची सद्यस्थिती, त्याच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका याचा अभ्यास करण्यास वाव आहे. त्यावर प्रकाश टाकण्यासाठी संशोधकाने हा अभ्यास विषय निवडलेला आहे.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन, जतन करणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. आपल्या महाराष्ट्राच्या अत्यंत धगधगत्या, अभिमानास्पद,

गौरवास्पद, पिढ्यानपिढ्यांनी गर्वाने छाती फुगवून सांगावे असा इतिहास ज्या ठिकाणी घडला, त्याचे साक्षीदार असणाऱ्या या जागा आहेत. त्यांचे आपण सर्वांनीच जतन, संरक्षण व संवर्धन केले तर पुढील आणखी काही पिढ्यांना गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार पाहता येतील. आपल्याच पूर्वजांनी अतोनात कष्ट घेऊन ही ठिकाणं उभारली आणि आपल्या जीवाची पर्वा न करता त्याच रक्षण केलं. ही महाराष्ट्राची धारातीर्थे आहेत. अशा अत्यंत वैभवशाली वारशांना काही नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांमुळे जो धक्का पोहोचतो आहे, त्याची सध्याची परिस्थिती कशी आहे व अशा समृध्द ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासन, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग कोणकोणत्या तरतुदींव्दारे प्रयत्नशील आहे याचा सखोल आढावा घेण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

पुणे जिल्ह्यातील २९ व सातारा जिल्ह्यातील २४ अशा एकूण ५३ किल्ल्यांपैकी पुणे जिल्ह्यातील निवडक ०७ किल्ले व सातारा जिल्ह्यातील निवडक ०३ किल्ले असे एकूण १० निवडक किल्ले संशोधनासाठी निवडलेले आहेत. या १० निवडक किल्ल्यांवर प्रत्यक्ष भेटीव्दारे, सर्वेक्षणाव्दारे, निरिक्षणाव्दारे, फोटोग्राफीव्दारे अभ्यास करुन किल्ल्यांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला आहे. या किल्ल्यांवरील प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा सखोल अभ्यास करण्यासाठी सदर संशोधन विषयाची निवड केली आहे. आजपर्यंत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, महाराष्ट्र शासन राज्य पुरातत्त्व विभाग, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून झालेल्या संवर्धनासाठीच्या व जतनाच्या प्रयत्नांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे. आपला समृध्द ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी यापुढील काळामध्ये संवर्धनासाठीच्या उपाययोजनांचा सर्वांगीण दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी संशोधकाने सदर विषयाची निवड केली आहे.

समाजामध्ये असलेली किल्ल्यांबाबतची व त्याच्या इतिहासाची जाणीव, किल्ल्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, काही विकृत प्रवृत्तींद्वारे किल्ल्यांची होणारी पडझड, नासधूस, ऐतिहासिक वास्तू जपण्याविषयीची कमालीची बेफिकिरी, सार्वजनिक ठिकाणी गलिच्छपणा करण्याची विध्वंसक व संकुचित वृत्ती व हे सर्व

टाळण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये जागृती करण्यासाठीची आवश्यकता, किल्ल्यांच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी शासकीय पातळीवरुन, संस्थात्मक पातळीवरुन, वैयक्तिक पातळीवरुन कोणकोणते प्रयत्न सुरु आहेत त्याचप्रमाणेकिल्ल्यांची सद्यस्थिती व त्याच्या संवर्धनासाठीची आवश्यकता आणि प्रयत्न याबाबत प्रसारमाध्यमांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी सदर अभ्यास विषयाची निवड केली आहे.

ऐतिहासिक वारसा असणारे हे किल्ले, वास्तू आपल्या भविष्यकालीन पिढ्यांसाठी जतन करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण जो समाज इतिहास विसरतो, तो चांगले भविष्य घडवू शकत नाही.[३१] या उक्तीतच त्याचे सार दडलेले आहे. आपल्या समृध्द वारशाच्या संवर्धनासाठीच्या व्यापक उपाययोजनांचा सर्वांगीण दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी संशोधकाने या विषयाची निवड केली आहे.

**विषयासंदर्भातच्या साहित्याचे परिशीलन**

'महाराष्ट्रातील निवडक किल्ले-सद्यस्थिती, त्याच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका (विशेष संदर्भः पुणे व सातारा जिल्हा)' या विषयाचा आढावा तसेच विषय निवडीची उद्दिष्ट्ये स्पष्ट केल्यावर अशा स्वरुपाचा निवड केलेल्या किल्ल्यांसंदर्भात झालेला अभ्यास आणि संशोधनाचा गोषवारा देणे अधिक योग्य होईल. तो गोषवारा पुढीलप्रमाणे-

१. डॉ. प्र. न. देशपांडे यांनी ***'मराठेकालीन किल्ले'*** या विषयावर पुणे येथील पुणे (विद्यमान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) विद्यापीठामध्ये पीएच्.डी. चे संशोधन करुन प्रबंध सादर केला आहे. त्यांनी हा प्रबंध विद्यापीठास १९७१ मध्ये सादर केला असून त्यानंतर आता विविध शासकीय ध्येयधोरणांमध्ये बदल झाला आहे. या प्रबंधामध्ये त्यांनी रायगड या किल्ल्याची निवड केली होती. परिणामी पुणे व सातारा जिल्ह्यातील निवडलेल्या कोणत्याच किल्ल्यांचा त्यांच्या संशोधनामध्ये समावेश नाही.[३२]

२. डॉ. विलास सोमा गोर्डे यांनी ***'चाकणचा स्थानिक इतिहास (प्राचीन ते अर्वाचीन)'*** या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठात पीएच्. डी. चे संशोधन करुन प्रबंध सादर केला आहे. चाकण परिसराच्या इतिहासाची सखोल माहिती देणारे **'चाकणचा इतिहास'** हे संदर्भपुस्तकही लिहिले आहे. त्यांनी प्रबंधामधील 'संग्रामदुर्ग' या एकमेव किल्ल्याच्या इतिहासाचा भव्य पट मांडला आहे. मात्र विविध शासकीय योजनांची त्यांनी सविस्तर माहिती दिली नाही.[३३]

३. श्रीकांत नारायण तापकीर यांनी ***'महाराष्ट्रातील गड-कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन'***, या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठास पीएच्. डी. चे संशोधन सादर करुन प्रबंध सादर केला आहे. त्याविषयी त्यांनी '**पुणे जिल्ह्यातील किल्ले**'असे पुस्तकही लिहिले आहे. मात्र या पुस्तक व प्रबंधामधून किल्ले कसे पहावे याविषयी संक्षिप्त व ट्रेकिंगच्या माध्यमातून किल्ला कसा पहावा याविषयीची माहिती दिली आहे. मात्र शासकीय दुर्गसंवर्धन योजनेविषयी त्यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही.[३४]

४. श्री. विलास चंद्रकांत कांबळे यांनी ***'सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व (१६८९-१७०७)'***, या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे एम. फिल. (इतिहास) पदवीचे संशोधन सादर केले आहे. त्यांच्या संशोधनाचा कालखंड फक्त अठरा वर्षांचा असून त्यात राजकीय विषयांवर प्रामुख्याने भर दिला आहे.[३५]

५. पी. आर. पाटील यांनी ***'शिवकालीन पुणे जिल्ह्यातील किल्ले'***, या विषयावर पुणे विद्यापीठामध्ये (विद्यमान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) एम. फिल. (इतिहास) पदवीचे संशोधन करुन ते विद्यापीठास सादर केले आहे. त्यात त्यांनी प्रामुख्याने किल्ल्यांच्या प्रकारांविषयी व संक्षिप्त इतिहासाची मांडणी केली आहे. किल्ल्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास देखील मांडला आहे.[३६]

६. श्री. संजय हणमंत भोसले यांनी ***'सातारा जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास (१६००-१९००)'*** या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे एम. फिल. (इतिहास) पदवीसाठी संशोधन करुन प्रबंध सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक व भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे ही स्थळे आपण जपली पाहिजेत या मुद्यांवर त्यांनी भर दिला आहे.[३७]

७. लहू गायकवाड यांनी '***शिवनेरीची जीवनगाथा***'हे शिवनेरी किल्ल्यांविषयीचे पहिलं संदर्भ पुस्तक लिहिले आहे. शिवनेरी किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान आहे. त्यांनी प्राचीन ते अर्वाचीन कालापर्यंतच्या समग्र इतिहासाचा भव्य कालपट या ग्रंथामध्ये मांडला आहे.[३८]

**प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा**

प्रस्तृत प्रबंधाची विभागणी सात प्रकरणांमध्ये केली आहे. पहिले प्रकरण प्रास्ताविक स्वरुपाचे आहे. या प्रकरणात किल्ल्यांचा इतिहास, विषयाची स्थलकाल मर्यादा, प्रबंधाची संक्षिप्त रुपरेषा, संशोधनाची साधने, संशोधन पद्धती व किल्ल्याचा इतिहास तसेच संशोधनाची गृहितके, आणि विषयाची निवड करण्यामागील उद्दिष्ट्ये इत्यादी मुद्यांविषयीची मांडणी पहिल्या प्रकरणात केली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड, विसापूर, चाकण, सिंहगड, राजगड, पुरंदर किल्ल्यांच्या इतिहासाचा कालपट सविस्तरपणे मांडला आहे. प्रबंधाचे तिसरे प्रकरण सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास असे असून त्यात प्रतापगड, अजिंक्यतारा, सज्जनगड इत्यादी तीन किल्ल्यांच्या इतिहासाचा कालपट साधार मांडला आहे.

प्रबंधाचे चौथे प्रकरण 'पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती' या शीर्षकाचे आहे. निवडलेल्या दहा किल्ल्यांची आता काय अवस्था आहे. शासन, स्वयंसेवी संस्था व किल्ले संवर्धन समिती, वनविभाग या शासकीय, निमशासकीय

संस्थांमार्फत किल्ल्यांचे कसे पुनरुज्जीवन केले जाते याविषयीची माहिती या प्रकरणात दिली आहे.

प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये 'दुर्ग संवर्धनः काळाची गरज' कशी आहे याविषयीची सविस्तर माहिती दिली आहे. किल्ल्यांची दुरावस्था का होते? त्यासाठी नैसर्गिक व मानवी कोणते घटक कारणीभूत आहेत, किल्ले संवर्धनाची संकल्पना कशी वाढीस लागली, त्यासाठी कोणकोणते उपक्रम आणि योजना राबविण्यात येत आहेत, किल्ले जतन करताना ते त्यांच्या मूळ ऐतिहासिक स्वरुपामध्ये कसे आणता येतील यासाठी वापरण्यात येत असलेले तंत्रज्ञान इत्यादी घटकांची सविस्तर माहिती दिली आहे.

परदेशांमध्ये ऐतिहासिक वास्तूंची जपणूक करण्याविषयीची जाणिव किती सखोल आहे, तेथील सामान्य नागरिक देखील किती व कसा जागरुक, संवेदनशील आहे तसेच शासकीय विभागही ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी कसे काम करतो याविषयीची मांडणी या प्रकरणात दिली आहे.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने निवड केलेल्या दहा किल्ल्यांची जपणूक करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा वनविभाग, सार्वजनिक बांधकाम खाते, पर्यटन व सांस्कृतिक विभाग आणि केंद्रीय पुरातत्त्व विभाग यांनी संयुक्तपणे दिलेल्या योगदानाची चर्चा या प्रकरणात केली आहे.

प्रकरण सहावे 'किल्ले संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका' या शीर्षकाचे आहे. या प्रकरणात १९६० पासून २०१० पर्यंतच्या कालावधीत किल्ल्यांविषयीच्या शासकीय धोरणांचा आढावा घेतला आहे. केंद्र व राज्य पुरातत्त्व विभाग, पर्यटन व सांस्कृतिक विभाग, तसेच वनविभाग, संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत केलेल्या उपाययोजनांचीसविस्तर माहिती दिली आहे.

किल्ले संवर्धन समितीने केलेल्या किल्ल्यांसंदर्भातच्या शिफारशी, विविध कायदेशीर तरतुदी, विविध कायदेशीर तरतुदी, समाजाची भूमिका, विविध स्वयंसेवी संस्थामार्फत, दुर्गभ्रमण संस्था, संघटनांमार्फत किल्ल्यांची केली जाणारी जपणूक, शाळा, महाविद्यालये यांनी किल्ले दत्तक घेऊन केलेले काम, प्रसार

माध्यमांची भूमिका आणि किल्ले संवर्धनाबाबत अभ्यासकांचे, प्राध्यापकांचे उत्तरदायित्त्व याविषयीची सविस्तर मांडणी केली आहे.

सातवे प्रकरण समारोपाचे आहे. प्रकरणाचे शीर्षक 'उपसंहार' असे आहे. त्यामध्ये प्रबंधातील मांडणीचे सिंहावलोकन करुन संशोधनाची गृहितके, उद्दिष्टये साध्य झाली आहेत त्याविषयीचे निष्कर्ष मांडून किल्ले संवर्धन प्रभावीपणे होण्यासाठी शिफारशी सुचविल्या आहेत.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनासाठी विविध प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे. प्राथमिक साधनांमध्ये शाहू महाराज, सर्व पेशव्यांची रोजनिशी, वाड डायरी, संशोधनासाठी निवडलेले कागद, चिटणिसी कागदपत्रे, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे अहवाल, किल्ल्यांच्या जीर्णोद्धारासाठी शासकीय अध्यादेश, वनविभागाचे अहवाल, महाराष्ट्र राज्य किल्ले संवर्धन समितीच्या कार्यालयामधून उपलब्ध झालेल्या धारिका, इनाम कमिशनची अप्रकाशित कागदपत्रे, पुणे महानगरपालिकेकडून प्राप्त झालेली माहिती, राजस्थान राज्य शासकीय अभिलेखागार, बिकानेर यांच्याकडून मिळालेली कागदपत्रे इत्यादी साधनांचा समावेश आहे.

दुय्यम साधनांमध्ये प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशा विविध संदर्भ ग्रंथाचा समावेश आहे. प्रबंधासाठी उपयोगात आणलेल्या सर्व प्राथमिक सर्व प्राथमिक व दुय्यम साधनांची सूची प्रबंधाच्या शेवटी दिली आहे.

**विषयाची स्थलकालमर्यादा**

'महाराष्ट्रातील निवडक किल्ले- सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका (विशेष संदर्भ- पुणे व सातारा जिल्हा)' असे प्रबंधाचे शीर्षक आहे. शीर्षकामध्ये कालखंड नमूद केला नसला तरी नेमकेपणाने लिखाणाची मांडणी करण्यासाठी इ.स. १६०० पासून ते २०१० पर्यंतच्या इतिहासाचा कालपट संशोधकीय पद्धतीने मांडला आहे.

प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. पुणे व सातारा जिल्ह्यांमधील किल्ल्यांपैकी निवडक दहा किल्ल्यांची निवड अभ्यासासाठी केली आहे. कारण या निवडक दहा किल्ल्यांना पर्यटनदृष्ट्या महत्त्व आहे. निवड केलेल्या किल्ल्यांच्या संवर्धनाकडे विविध शासकीय विभागांनी विशेषत्वाने लक्ष दिले आहे. प्रस्तृत विषयाच्या संशोधनासाठी पुणे व सातारा जिल्हा हे भौगोलिक क्षेत्र निवडले असून ते फक्त दहा किल्ल्यांपर्यंतच मर्यादित आहे. तसेच प्रबंधामध्ये या किल्ल्यांचा संक्षिप्त इतिहास दिला असून प्रामुख्याने शासकीय उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न प्रबंधामध्ये केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

सदर संशोधनामध्ये महाराष्ट्रातील पुणे व सातारा जिल्ह्यातील निवडक १० किल्ल्यांच्या सद्यस्थितीवर व संवर्धनात्मक दृष्टिकोनावर भर देण्यात आला आहे. वैभवशाली परंपरा व समृद्ध वारसा असणाऱ्या किल्ल्यांबाबतीत महाराष्ट्र शासनाची व संपूर्ण समाजाची सकारात्मक व नकारात्मक भूमिका तपासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सदर संशोधनाची उद्दिष्ट्ये आपणास खालीलप्रमाणे मांडता येतात.

१) पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्हयातील १) शिवनेरी २) लोहगड ३) विसापूर ४) चाकण ५) सिंहगड ६) राजगड ७) पुरंदर व सातारा जिल्ह्यातील १) प्रतापगड २) अजिंक्यतारा ३) सज्जनगड अशा एकूण १० किल्ल्यांचा इतिहास व त्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) किल्ल्यांच्या दुरावस्थेला कारणीभूत ठरणाऱ्या नैसर्गिक,मानवनिर्मित घटकांचा अभ्यास करणे.

३) मराठ्यांच्या दैदिप्यमान कामगिरीमध्ये किल्ल्यांची भूमिका अभ्यासणे.

४) पुरातत्त्व खाते, पर्यटन व सांस्कृतिक खाते व वन खाते यांच्या किल्ल्यांबाबतच्या संयुक्त धोरणांचा अभ्यास करणे व समृध्द ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाबाबत समाजाची भूमिका अभ्यासणे.

५)	किल्ल्यांच्या दुरावस्थेबाबत आणि संवर्धनात्मक उपायांबाबत प्रसार माध्यमांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

६)	किल्ले संवर्धन, जतन व संरक्षणामध्ये विविध स्वयंसेवी संस्था, विविध मंडळे, बिगर शासकीय संस्था, वैयक्तिक प्रयत्न इत्यादींचा सहभाग व त्यांची भूमिका अभ्यासणे.

७)	वैभवशाली किल्ल्यांचा वर्तमान पिढीसाठी व भविष्यकालीन पिढ्यांसाठी असणारा प्रेरक व शाश्वत असा ऐतिहासिक वारसा सर्वांगीण दृष्टिकोनातून अभ्यासणे.

**संशोधनाचे महत्त्व**

महाराष्ट्रात सातवाहनकालीन राजांपासून मराठ्यांपर्यंत किल्ल्यांची उभारणी झाली. महाराष्ट्रातील किल्ले वैविध्यपूर्ण आहेत. महाराष्ट्रातील या किल्ल्यांना खऱ्या अर्थाने वैभव व अनन्यसाधारण महत्त्व शिवाजी महाराजांच्या काळात मिळाले. या किल्ल्यांच्या अभेद्यपणाव्दारे छत्रपती शिवाजी महाराजांनी बलाढ्य अशा मोगलांना, आदिलशहाला, पोर्तुगीजांना, इंग्रजांना नामोहरम केले. कालांतराने युध्द तंत्रात आमुलाग्र बदल झाल्याने लष्करी दृष्टीने किल्ल्यांचे महत्त्व कमी झाले. आज या किल्ल्यांना ३५० पेक्षा जास्त वर्षे होऊन गेली आहेत. एवढ्या प्रदीर्घ काळानंतरही स्वातंत्र्याची प्रतीके असणारे हे किल्ले उन्हात, वाऱ्यात, पावसात गौरवशाली मराठा कारकिर्दीच्या पाऊलखुणा घेऊन उभ्या आहेत.

मागील ५० वर्षांमध्ये सामाजिक क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल होत चालले आहेत. मानवी लोकसंख्या प्रचंड गतीने वाढत आहे. जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले आहेत. सर्वसामान्य जनतेच्या हातात मोठ्या प्रमाणावर पैसा खेळू लागला आहे. पर्यटन क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल होत जाऊन पर्यटन हे एक अत्यंत व्यापक, प्रचंड आर्थिक उलाढाल असलेले, प्रचंड मनुष्यबळ आवश्यक असलेले क्षेत्र बनले आहे. त्यामुळे ऐतिहासिक स्मारके, स्थळे,किल्ले, समाधी, वस्तुसंग्रहालये ही आघाडीची पर्यटन स्थळे बनली आहेत. याठिकाणी हजारो पर्यटक दरवर्षी भेट देतात. विशेषत: सुटीच्या दिवशी पर्यटकांची वर्दळ लक्षणीय असते. त्यामध्ये

काहीजण अभ्यास व पर्यटन या हेतूने येतात. तर काहीजण केवळ हुल्लडबाजी, दंगामस्ती, नशाबाजी करण्यासाठी येतात. अशा पर्यटकांव्दारे किल्ल्यांना मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचते आहे. किल्ल्यांच्या तटबंदीच्या बांधणीस वापरलेले दगड उचकटून खाली ढकलून देणे, तेथील बांधकामास धक्का पोचवणे, किल्ल्यांच्या विविध इमारतीच्या, बांधकामाच्या भिंतीवर, अवशेषांवर खडू, कोळसा, विविध रंगात आपली नावे घाणेरड्या अक्षरात लिहून विद्रुपीकरण करणे, किल्ल्यांना पिकनिक स्पॉट समजून प्लॅस्टिक पिशव्या, कचरा, बाटल्या तेथेच टाकून ऐतिहासिक स्थळांचे सौंदर्य बिघडवणे असा थिल्लरपणा करु लागल्याने समृध्द वारसा असणाऱ्या किल्ल्यांना विद्रुप स्वरुप येत चालले आहे. तसेच अशा किल्ल्यांची नैसर्गिक घटकांमुळे सुद्धा मोठ्या प्रमाणावर पडझड होत आहे. ऊन, वारा, पाऊस, वनस्पतींचे आक्रमण यांमुळे किल्ल्यांना प्रतिकूल परिस्थितीशी तोंड द्यावे लागत आहे.

आपल्या जाज्वल्य, प्रेरक, इतिहासाचे मानदंड असणाऱ्या, गतवैभवाचे जिवंत साक्षीदार असणाऱ्या या वैभवाचे जतन, संरक्षण, संवर्धन करणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. शासकीय पातळीवरुन काही निवडक किल्ल्यांच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी प्रयत्न होत आहेत. त्याबरोबरच समाजानेही आपल्या समृध्द ऐतिहासिक वारशांचा संवर्धनात्मक दृष्टीने सकारात्मक विचार करुन त्या दिशेने पावले उचलायला हवीत, त्यासाठी आपले योगदान द्यायला हवे. आपल्या ऐतिहासिक वारशांच्या जतनासाठी व्यापक प्रयत्न करायला हवेत. पाश्चात्य देशांमध्ये, ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व जतन अत्यंत नियोजनबद्धपणे, दीर्घकालीन दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून, प्रचंड आर्थिक तरतूद करुन व त्याचवेळी समाजालाही त्यामध्ये सहभागी करुन घेऊन केले जाते. पाश्चात्य जनतेला आपल्या इतिहासाचा सार्थ अभिमान आहे, गर्व आहे. इतिहासाप्रती व ऐतिहासिक स्थळांप्रती आत्यंतिक प्रेम व निष्ठा आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये सांस्कृतिक संवर्धनात्मक दृष्टिकोन विकसित झाला आहे. ऐतिहासिक वारशांच्या

संवर्धनाबाबत जनजागृती व्यापक प्रमाणावर झाल्याने परदेशातील ऐतिहासिक स्थळे जगभर प्रसिध्द झाली आहेत व दिवसेंदिवस अलोट गर्दी खेचत आहेत.

महाराष्ट्र शासनाचे पर्यटन व सांस्कृतिक खाते, पुरातत्त्व खाते इत्यादी मार्फत किल्ल्यांची निगा खूपच बेफिकिरीने, निष्काळजीपणे घेतली जात आहे. इतिहासाचे साक्षीदार असणाऱ्या किल्ल्यांच्या शाश्वत संवर्धनासाठी भरीव आर्थिक तरतूद, व्यापक नियोजन, सातत्यपूर्ण संवर्धनासाठीचे प्रयत्न, किल्ल्यांच्या परिसरात पर्यटन विषयक प्रभावी धोरणांची अंमलबजावणी इ. बाबत शासकीय यंत्रणा अत्यंत उदासीन राहत असल्याने हे समृध्द दुर्गवैभव दिवसेंदिवस खराब होत चालले आहे. त्याची पडझड होत चालली आहे. आपला महाराष्ट्राचा इतिहास ज्या किल्ल्यांवर घडला ती ठिकाणे आज जर आपण जपली नाहीत तर येत्या काही वर्षातच त्यांना अतिशय वाईट अवकळा प्राप्त होईल.

अशा विविध कारणांमुळे महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाचे संवर्धन, जतन, संरक्षण करणे अत्यंत गरजेचे बनले आहे. आपल्या भविष्यकालीन पिढ्यांना महाराष्ट्राच्या या दैदिप्यमान ऐतिहासिक वारशांचा ठेवा सुपूर्द करण्यासाठी, त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्याच पूर्वजांच्या कार्यकर्तृत्वानं विस्मित, आश्चर्यचकित व्हावं असा आपल्या महाराष्ट्राच्या भूमीचा पराक्रम आहे. या इतिहासाला जागृत ठेवणे हे आपणा सर्वांचेच कार्य आहे. कोणत्याही देशाच्या सांस्कृतिक वारशाच्या संवर्धनासाठी, जतनासाठी तेथील जनतेनेच आत्मियतेने सहभाग घेऊन व्यापक प्रयत्न केले तरच हा वारसा पुढील पिढ्यांना पाहता येतो. त्यामुळे किल्ले संवर्धन हा विषय गरजपूर्ण, गरजाधारित व अत्यावश्यक असा निश्चितपणे बनला आहे. वर्तमानकाळामध्ये या किल्ल्यांचे जतन, संवर्धन आपणांकडून झाले नाही तर भावी पिढ्यांना आपल्या गौरवशाली, वैभवशाली, समृध्द इतिहासाला कायमचेच मुकावे लागेल.

महाराष्ट्राची वेगळी ओळख असणाऱ्या या किल्ल्यांच्या संवर्धनामध्ये शासनाची, समाजाची, स्वयंसेवी संस्थांची व नागरिकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. सर्वच घटकांनी आपले योगदान दिले तर किल्ले संवर्धन संकल्पना

अतिशय यशस्वी होऊ शकते. या सर्वांच्या भूमिकेचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा हेतू आहे. किल्ले संवर्धनामध्ये प्रसार माध्यमांची म्हणजेच वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके, रेडिओ, टी.व्ही., सोशल मिडिया उदा. फेसबुक, व्हाटसअप, ट्विटर यांचीही भूमिका खूपच महत्त्वाची आहे. या सर्व घटकांचा सहभाग व भूमिका काय असू शकते याचा सर्वांगीण अभ्यास करणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

**संशोधनाची गृहितके**

कोणत्याही संशोधनाचे कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी संशोधनामध्ये विधान मांडावे लागते. या विधानांच्या आधारे संशोधनाचे अनुमान काढता येते. सदर संशोधनामध्ये खालीलप्रमाणे गृहितके मांडण्यात आली आहेत.

१) महाराष्ट्रामध्ये किल्ल्यांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची विविधता वैशिष्ट्यपूर्ण आहे.

२) महाराष्ट्रातील काही किल्ले भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारित आहेत, काही किल्ले राज्य पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित आहेत, तर उर्वरित बहुतांशी किल्ले असंरक्षित आहेत.या किल्ल्यांकडे महाराष्ट्र शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. ऊन, वारा, पाऊस, वनस्पती इत्यादी नैसर्गिक घटकांमुळे किल्ल्यांची पडझड मोठ्या प्रमाणात होत आहे.

३) किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांकडून किल्ल्यांच्या बांधकामाला, मूळ सौंदर्याला मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचत आहे. किल्ल्यांच्या बांधकामाचे विद्रुपीकरण केले जात आहे.

४) समाजाकडून किल्ले जतन, संरक्षण व संवर्धन हा विषय अत्यंत उदासीनतेने पाहिला जातो आहे. समाजाला आपल्या वैभवशाली परंपरांचा व इतिहासाचा विसर पडत चालला आहे.

५) सांस्कृतिक ठेवा वाचवण्यासाठी वर्तमानकालीन पिढीसाठी व भविष्यकालीन पिढीसाठी या ऐतिहासिक किल्ल्यांचे संवर्धन करणे अत्यंत

आवश्यक आहे. महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्था, गिरीभ्रमण मंडळे, बिगर शासकीय संस्था यांचेकडून आपल्या गौरवशाली वारशांच्या संवर्धनासाठी, संरक्षणासाठी, जनतेच्या प्रबोधनासाठी व्यापक प्रयत्न सुरु आहेत.

६) जनतेची, लोकप्रतिनिधींची, शासकीय, प्रशासकीय यंत्रणेची इच्छा व पारदर्शक कार्यतत्परता आणि समाजाचे परिश्रम व इतिहासाप्रती निष्ठा याव्दारे आपले दुर्गवैभव जगासमोर येणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती**

जीवन जगत असताना व्यक्तीची माहितीचा शोध घेण्यासाठी, जिज्ञासेने नवीन ज्ञान संपादन करण्यासाठी सातत्याने धडपड सुरु असते. ही माणसाची मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेद्रियांचा उपयोग करीत असतो. सभोवतालच्या जीवनाचे अवलोकन करुन त्यातून विविध प्रकारचे अनुभव घेतो. ज्ञान प्राप्त करणे व प्राप्त ज्ञानाचा व्यवस्थित संग्रह करणे हे व्यक्ती व समाजसंस्थांचे कार्य आहे. त्यासाठी सातत्याने संशोधन गरजेचे ठरते. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्वे परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास होय. इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पद्धती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. आपण कोणती पद्धती वापरायची हे संशोधनासाठी निवडलेल्या विषयावर अवलंबून असते. तसेच कोणत्या प्रकारची माहिती आपल्याला गोळा करावयाची आहे त्यावरही आधारित असते. इतिहास संशोधनामध्ये संदर्भ साधने व मजकूर गोळा करण्यासाठी विविध पद्धतींचा वापर केला जातो.''महाराष्ट्रातील निवडक किल्ले-सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका'' (विशेष संदर्भ - पुणे व सातारा जिल्हा) या संशोधन कार्यासाठी जास्तीत जास्त वास्तवपूर्ण निष्कर्ष काढता यावेत यासाठी प्रामुख्याने ऐतिहासिक पद्धत, सर्वेक्षण पद्धत, मुलाखत पद्धत व क्षेत्रभेट या शास्त्रीय पद्धतींचा वापर केलेला आहे. पुणे व सातारा जिल्ह्यातील

निवडक १० किल्ल्यांची सद्यपरिस्थिती, त्याच्या संवर्धनासाठीचे शासकीय पातळीवरुन होणारे प्रयत्न, संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग या प्रमुख दृष्टिकोनातून सदर संशोधन चिकित्सकपणे वस्तुस्थितीवर आधारित असे करण्यात आले आहे.

**सर्वेक्षण पद्धत**

सर्वेक्षण हा एक विशेष प्रचलित शब्द आहे. हा एक सामूहिक प्रयत्न असतो. ज्याव्दारे सामाजिक घटना, व्यवहार, सामाजिक तथ्यांचा शोध घेतला जातो. सामान्यत: सर्वेक्षणाचा अर्थ वर पाहणे हा आहे म्हणजेच घटनेच्या विषयाबाबत बघून माहिती प्राप्त करणे हा आहे. 'सर्वेक्षण' शब्द इंग्रजीच्या 'Survey' या शब्दाचे मराठी रुपांतर होय. हा शब्द 'Sur+vey' या दोन शब्दांनी मिळून बनला आहे. 'Sur' हा शब्द 'Sor' पासून आणि 'vey' शब्द 'veeir' पासून निर्माण झाला आहे. 'sor' चा अर्थ 'over' आणि 'veeir' चा अर्थ 'to look' हा आहे. अशा प्रकारे 'survey' चा संपूर्ण अर्थ 'वरुन बघणे' किंवा 'बाह्य रुपातून पाहणे' हा आहे.[३९]

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने पुणे जिल्हयातील १) शिवनेरी २) लोहगड ३) विसापूर ४) चाकण ५) सिंहगड ६) राजगड ७) पुरंदर व सातारा जिल्ह्यातील १) प्रतापगड २) अजिंक्यतारा ३) सज्जनगड या १० ऐतिहासिक किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील ऐतिहासिक वास्तूंचे निरीक्षण केले आहे. या १० किल्ल्यांवरील महादरवाजे, बुरुज, तटबंदी, पाण्याच्या टाक्या, पाण्याचे तलाव, किल्यावरील विविध देवदेवतांची मंदिरे, हमामखाना (स्नानगृह), सदर, अंबरखाना, धान्याचे कोठार, माची, दारु कोठार, कचेरीच्या जागा वा अवशेष, घाणी व जाते, प्रवेशव्दाराच्या कमानी, समाध्या, किल्ल्यावरील सुव्यवस्थित असणाऱ्या इमारती, पुतळे, नगारखाना, इमारतीचे अवशेष, तटबंदीवरील, कमानीवरील, बुरुजावर उगवलेली झाडेझुडपे, ढासळणाऱ्या तटबंदी, किल्ला परिसरात गवताचे साम्राज्य, पर्यटकांनी आपल्या ठेवलेल्या खाणाखुणा, कचरा, प्लॅस्टिक पिशव्या, बाटल्या, काचा इ. गोष्टींचे निरीक्षण करुन त्यांच्या लगेचच नोंदी केल्या आहेत.

**ऐतिहासिक पध्दत**

इतिहास म्हणजे भूतकाळाचे यथार्थ ज्ञान. इतिहास लेखक गतकालीन घटनांचा मागोवा घेत असतात. भूतकालीन घटनांचे वर्णन, विश्लेषण आणि पृथक्करण करण्याकरिता शास्त्रीय पद्धतीने उपयोग करणे म्हणजे ऐतिहासिक संशोधन होय.[४०]

ऐतिहासिक संशोधनाच्या सुरुवातीला समस्येची निवड करुन त्याबाबत योग्य माहिती मिळवून आपल्या संशोधनाची दिशा स्पष्ट होते. संशोधनात संबंधित विषयाशी निगडीत साधने वापरावी लागतात. ती दोन प्रकारची असून प्राथमिक साधने व दुय्यम साधने होत. घटनेला साक्षी असलेल्या व्यक्तींनी लिहून ठेवलेल्या किंवा निर्माण केलेल्या तत्सम समकालीन साधनांना प्राथमिक साधने म्हणतात.[४१] तर घटनेला साक्षी नसलेल्या व्यक्तींनी प्रत्यक्ष घटनेत सहभागी व साक्षी असलेल्या व्यक्तीकडून ऐकीव माहितीच्या आधारे अहवाल किंवा लिखाण तयार करणे म्हणजे दुय्यम साधन होय.

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रामुख्याने प्राथमिक साधनांचा वापर केला आहे. या साधनांचा उपयोग संशोधन विश्वासार्ह व्हावे यासाठी केला आहे. उपलब्ध साधनांमध्ये महाराष्ट्र शासनाचे ऐतिहासिक स्थळे व स्मारके याबाबत असणारे निर्णय, पुरातत्त्व खात्याचे निर्णय, नियमावली, पर्यटन व सांस्कृतिक विभाग, वनविभाग यांचे निर्णय, पुरातत्त्व विभाग अधिनियम, महाराष्ट्र राज्य किल्ले संवर्धन समितीचे अहवाल, बैठकांचे वृत्तांत इत्यादी साधनांचा वापर केलेला आहे. उपलब्ध कागदपत्रांचा अभ्यास करताना कोणताही पूर्वग्रहदूषितपणा न ठेवता तटस्थपणे विषयाची मांडणी संशोधकाने केलेली आहे.

दुय्यम साधनांमध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, दैनिके, साप्ताहिके, मासिके, वार्षिक अंक, विविध अप्रकाशित संशोधनपर प्रबंध यांचा वापर केलेला आहे.

**मुलाखत पद्धत**

पुणे जिल्ह्यातील ०७ व सातारा जिल्ह्यातील ०३ किल्ले, त्यांची सद्यस्थिती व त्याच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका यावर संशोधन करीत असताना प्रामुख्याने केंद्रीयपुरातत्त्व विभागाचे अधिकारी, राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक विभागाचे अधिकारी, वन विभागाचे अधिकारी, महाराष्ट्र राज्य किल्ले संवर्धन समितीचे सदस्य, किल्ल्यांचे अभ्यासक इत्यादीच्या मुलाखती घेऊन त्या त्या विभागाचा किल्ल्यांप्रती असणारा दृष्टिकोण व त्यांची भूमिका यांचा चिकित्सकपणे अभ्यास करण्यात आला आहे.

**क्षेत्रभेट पध्दत**

प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकाने पुणे जिल्ह्यातील सात किल्ले व सातारा जिल्ह्यातील तीन किल्ले या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत. किल्ल्यांवरील ऐतिहासिक स्थळांची सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी काळजीपूर्वक निरीक्षणे केली आहेत.किल्ल्यांवरील महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूंची छायाचित्रे घेतली आहेत. किल्ल्यांवरील विविध भागांची होणारी पडझड, नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या विविध वास्तू, किल्ला परिसरात निर्माण झालेला कचरा, पर्यटकांच्याकडून होणारी नासधूस त्याचप्रमाणे पुरातत्त्व विभाग, राज्यशासनाचे विविध विभाग यांच्याव्दारे होणारे संवर्धनाचे प्रयत्न या सर्वांची छायाचित्रे घेऊन सदर संशोधन अधिक वास्तवपणे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुणे व सातारा जिल्ह्यातील ठराविक किल्ल्यांची निवड केली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ३५० पेक्षा जास्त किल्ले आढळतात. या सर्वच किल्ल्यांचा प्रत्यक्ष भेटीव्दारे, निरीक्षणाव्दारे, सर्वेक्षणाद्वारे, अभ्यास करणे अशक्य आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील पुणे व सातारा या दोन जिल्ह्यांची निवडसंशोधकाने केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची पायाभरणी, विस्तार व विकास याच दोन जिल्ह्यांमध्ये झाला. या दोन जिल्ह्यांच्या नैसर्गिक व भौगोलिक अनुकूलतेचा व दुर्गमतेचा

पुरेपूर उपयोग करुन घेऊन शिवाजी महाराजांनी किल्ले जिंकून, डागडुजी करुन, नव्याने निर्माण करुन आपले राज्य वाढवले. त्यामुळे सदर संशोधनासाठी पुणे व सातारा हे दोन जिल्हे निवडले आहेत.

पुणे जिल्ह्यातील निवडक ०७ व सातारा जिल्ह्यातील निवडक ०३ किल्ल्यांची निवड संशोधकाने केली आहे. पुणे जिल्ह्यातील १) शिवनेरी २) लोहगड ३) विसापूर ४) चाकण ५) सिंहगड ६) राजगड ७) पुरंदर आणि सातारा जिल्ह्यातील १) प्रतापगड २) अजिंक्यतारा ३) सज्जनगड अशा एकूण दहा किल्ल्यांची निवड केली आहे.

ज्या किल्ल्यांवर पर्यटन सुरु आहे, ज्या किल्ल्यांच्या संवर्धनाकडे महाराष्ट्र शासनाने विशेष लक्ष दिले आहे व ज्या किल्ल्यांवर विविध स्वयंसेवी संस्था, बिगर शासकीय संस्था संवर्धनासाठी प्रयत्नशील आहेत असे पुणे जिल्ह्यातील सात किल्ले व सातारा जिल्ह्यातील तीन किल्ले मुद्दामहून अभ्यासासाठी निवडले आहेत. या किल्ल्यांची सद्यस्थिती, त्याच्या संवर्धनासाठी होणारे प्रयत्न व त्यामध्ये शासनाची व समाजाची भूमिका अशा दृष्टिकोनातून सदर संशोधन करण्यात आले आहे.

**प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण**

कोणत्याही समाजाचा किंवा प्रदेशाचा इतिहास भविष्यकाळात महत्त्वाचा अभ्यास विषय ठरत असतो. इतिहास हा जरी भूतकाळ असला तरी त्याचे महत्त्व दुर्लक्षून चालत नाही. इतिहास भविष्य व वर्तमान घडविण्यास मदत करीत असतो. तसेच इतिहासाच्या अभ्यासातून घडलेल्या चुका टाळण्यास मदत होते. गतकाळच्या समाजाविषयी, जीवनपध्दतीविषयी माहिती तर मिळतेच, शिवाय गौरवपूर्ण इतिहासाचे आकलन झाल्याने समाजाला अभिमान वाटतो, अस्मिता जागृत होते. भव्य दिव्य इतिहासाच्या बळावर वर्तमान व भविष्यकाळ ही उज्वल करण्याची प्रेरणा निर्माण होते. त्यातूनच समाजाची प्रगती होते. मध्ययुगीन काळामध्ये निर्माण झालेले किल्ले त्या त्या काळाच्या सामाजिक, राजकीय, लष्करी, सांस्कृतिक परिस्थितीची अबोलपणे साक्ष देत असणाऱ्या ऐतिहासिक वास्तू आहेत. प्रस्तुत संशोधनामधून निवडक अशा दहा किल्ल्यांवर प्रत्यक्ष भेटी देऊन,

तेथील वास्तूवैभव सध्या कोणत्या परिस्थितीत आहे ? किल्ल्यांवर असणाऱ्या इतर महत्त्वाच्या वास्तू व बांधकामे यांची अवस्था काय आहे? किल्ल्यांवर जाणारे मार्ग कसे आहेत? किल्ल्यांना कोणकोणत्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो आहे? कोणकोणत्या मानवनिर्मित आपत्तींमुळे किल्ल्यांचे सौंदर्य नष्ट होत आहे?पर्यटकांचा आत्यंतिक बेफिकिरीपणा, निष्काळजीपणा, इतिहासाबद्दलचा उदासीन दृष्टिकोन किल्ल्यांना कशा प्रकारे हानीकारक ठरतो आहे? या सर्व प्रश्नांचा प्रत्यक्ष भेटीमधून, निरीक्षणामधून, टिपणे घेण्यामधून, छायाचित्रे काढण्यामधून सविस्तर उहापोह करुन संशोधन, अधिकाधिक वास्तवावर आधारित, वस्तुनिष्ठपणे सत्य मांडून, विविध उपायांच्या आत्यंतिक गरजांचे महत्त्व अधोरेखित करुन, गरजाधिष्ठित व उपयोजनात्मक दृष्टिकोनातून करण्यात आले आहे हे या संशोधनाचे वेगळेपण आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्य पुरातत्त्व विभाग, पर्यटन व सांस्कृतिक विभाग, वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग या चारही खात्यांमध्ये समन्वय राखून किल्ल्यांच्या जतनासाठी, संवर्धनासाठी प्रयत्न सुरु केले आहेत ही अतिशय स्तुत्य बाब आहे. महाराष्ट्र शासनाने किल्ल्यांच्या संवर्धनासाठी गड किल्ले संवर्धन समिती नेमली आहे. या समितीचे विभागवार काम सुरु आहे. सदर किल्ल्यांच्या वैभवाचे महत्त्व शासनाला पटले आहे व त्यावर प्रत्यक्ष कार्यवाही, अंमलबजावणी सुरु झाली आहे. निधीची उपलब्धता होत आहे. या सर्व प्रक्रियांचा सविस्तर अभ्यास करुन संशोधकाने शासकीय पातळीवरुन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी होणाऱ्या प्रत्यक्ष, वास्तव प्रयत्नांचा आढावा घेतला आहे. आपल्या समृध्द वारशाचे जतन करण्याबाबतच्या शासकीय धोरणांचा लेखाजोखा सदर संशोधनात मांडला आहे. हे प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण आहे.

किल्ले संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. किल्ले संवर्धन ही एक खूप मोठी संकल्पना आहे. त्यामध्ये समाजामधील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. आपण फक्त शासनाकडूनच किल्ले संवर्धन व्हावे ही अपेक्षा बाळगतो, परंतु ती अपेक्षा अवास्तव आहे. किल्ल्यांची संख्या पाहता हे केवळ

अशक्य वाटते. त्यामुळे किल्ले संवर्धन या संकल्पनेत शासन, प्रसारमाध्यमे, स्वयंसेवी संस्था, बिगर शासकीय संस्था, मंडळे, शाळा, महाविद्यालये, विविध औद्योगिक कंपन्या इत्यादींचा समन्वयात्मक सहभाग घेऊन किल्ले जतन, संरक्षण व संवर्धन करणे शक्य आहे. या सर्व बाबींचा संशोधकाने सखोल अभ्यास करुन समाजाच्या सहभागाची, योगदानाची मांडणी प्रस्तुत संशोधनात केली आहे. समाजाचाच सहभाग नोंदवून, समाजालाच विविध माध्यमांतून रोजगार निर्मिती, पूरक उद्योगधंदे, पर्यटकीय दृष्टीने फायदेशीर व्यवसाय निर्मिती होऊ शकते. त्यातून खेडी आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, दुर्ग किंवा किल्ले सामाजिक समृध्दी आणतील तेव्हा त्यांच्या संरक्षणासाठी आपोआप प्रयत्न केले जातील याचा सविस्तर उहापोह संशोधकाने केला आहे. हे प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण आहे.

किल्ल्यांवरील टाक्यांमधील पाण्याचा सभोवतालच्या खेड्यांना होणारा उपयोग, किल्ला परिसरातील दुर्मिळ अशा वनस्पतींचे, जंगलांचे संवर्धन, किल्ल्यांचा पर्यटनदृष्टिकोनातून विकास, रोजगार निर्मिती, व्यवसाय व उद्योगधंद्याची सुसंधी, किल्ले संवर्धनासाठी रेडिओ, दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रे, नियतकालिके, व्हाटसअप, फेसबुक, व्टिटर यासारख्या सोशल मिडीयाचा प्रभावी वापर, किल्ले संवर्धनासाठी जाणीवपूर्वक दस्तऐवजीकरण, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन किल्ल्यांचे नकाशे, रेखाटने बनवणे, शास्त्रीय पध्दतीने किल्ल्यांचे सुशोभिकरण, तज्ज्ञांच्या सल्ल्यांवरुन वास्तूंची दुरुस्ती, किल्ले संरक्षण, जतन, संवर्धन, संकल्पना यशस्वी होण्यासाठी सर्वसामान्य जनतेमध्ये व्यापक प्रबोधन अशा विविध संकल्पना संशोधकाने मांडून आपल्या संशोधनाचे वेगळेपण सिद्ध केले आहे. इतिहास विषयाचे स्वरुप बदलत आहे. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक इतिहासाच्या अभ्यासाबरोबरच आपल्या ऐतिहासिक वास्तू, स्थळे, स्मारके यांचे जतन व संरक्षण करणे ही सुध्दा काळाची गरज बनली आहे. त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. त्यामुळे सध्याच्या तरुण पिढीला अशा उपयोजनात्मक दृष्टिकोनातून इतिहास विषयाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. ही उपयोजित इतिहासाची संकल्पना संशोधकाने प्रस्तुत संशोधनात मांडली आहे व चर्चा केली आहे. या

चर्चेनंतर प्रबंधाच्या यापुढील प्रकरणामध्ये आपण निवड केलेल्या किल्ल्यांचा संक्षिप्त इतिहास अभ्यासणार आहोत.

## संदर्भ व तळटिपा

१. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १२**, मुंबई, १९७६, पृ. १४६९.
२. अ. रा. कुलकर्णी, ग.ह. खरे, (संपा.), **मराठ्यांचा इतिहास खंड पहिला**, पुणे, २००६, पृ. २०.
३. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १८**, मुंबई, १९७६, पृ. ४२.
४. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा), **मराठी विश्वकोश खंड ३**, मुंबई, १९७६, पृ. ९५९.
५. N.G. Kalekar, (Ed.), **Molesworth's Marathi English Dictionary**, Pune, 1975, P. 168.
६. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **पूर्वोक्त**, पृ. ९५९.
७. प्र. के. घाणेकर, **शिवरायांचे दुर्गविज्ञान**, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९, पृ. ११
८. अ. रा. कुलकर्णी (संपा.), **रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र मोडी-मराठी-इंग्रजी**, पुणे, २००७, पृ. १७५.
९. विजय देव, मोहन शेटे, '**दुर्गमेव जयते**', (समाविष्ट दुर्गप्रेमी स्मरणिका), तृतीय दुर्ग साहित्य संमेलन, विजयदुर्ग, जानेवारी २०१३, प्रस्तावना पृ. १.
१०. फिरोज रानडे, **इमारत**, मुंबई, २००९, पृ. ११.
११. प्र. न. जोशी (संपा.), **मत्स्यपुराण**, पुणे, १९८४, पृ. २८३.
१२. दा. ध. कोसंबी, **प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता**, (हिंदी अनु. गुणाकार मुले), नवी दिल्ली, २००२, पृ. ४४.
१३. ब. रा. हिवरगावकर, (प्रस्तावना दुर्गा भागवत), **कौटिल्याचे अर्थशास्त्र**, पुणे, १९८१, पृ. १७२-१७४.
१४. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), **मराठ्यांचा इतिहास**, खंड १, पुणे, १९८४, पृ. १३८.
१५. ग. भा. मेहेंदळे , **श्री राजा शिवछत्रपती, खंड १**, भाग १, पुणे, १९९६, पृ.५१७.

१६. ज्ञानेश्वरीतील बाराव्या अध्यायातील देवगिरी किल्ल्याविषयीचा उल्लेख पुढीलप्रमाणे- **'मग कुंडलिनीचा टेंभा। अंधारी करूनि उभा।**
**चोजविलीया प्रभा। निवथावेरी।।'**

१७. ग.भा. मेहेंदळे, **पूर्वोक्त**, पृ. ४२५. (किल्ल्यातील सैनिकांना शत्रूवर गोळीबार करण्यास आडोसा मिळावा म्हणून किल्ल्याच्या तटाच्या माथ्यावर बाहेरील बाजूस कठडा बांधीत. त्यामधून गोळीबार करण्यासाठी फटी ठेवत. त्यांना 'जंग्या' म्हणत.).

१८. अ. रा. कुलकर्णी (संपा.), **पूर्वोक्त**, पृ. १७५.

१९. सुधाकर देशपांडे, **प्राचीन भारतीय राजनीती**, पुणे, १९८७, पृ. ११५.

२०. कृ. ना. चिटणीस, **मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था**, **खंड १**, पुणे, १९८५, पृ. २१.

२१. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), **पूर्वोक्त,** पृ. ३२०.

२२. शां. भा. देव, **महाराष्ट्राचा इतिहास-प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड १, भाग १,** मुंबई, २००२, पृ. ४.

२३. रा. शं. वाळिंबे, **महाभारत** (मराठी अनु.), खंड ७, शांतिपर्व, पूर्वार्ध, पुणे, १९८५, पृ.१८७.

२४. विजय देव, गिरिजा देशमुख-बेल्हेकर (संपा.), **दुर्गप्रेमी**, पाचवे दुर्ग साहित्य संमेलन, सिंहगड, २०१५.

२५. नभा काकडे, **बुधभूषण एक चिकित्सा**, औरंगाबाद, २०१२, पृ.७२.

२६. प्र.के.घाणेकर, **अथातो दुर्ग जिज्ञासा**, पुणे, १९८१, पृ.१४.

२७. ह. धि. सांकलिया, म. श्री. माटे (संपा.), **महाराष्ट्रातील पुरातत्त्व**, मुंबई, ऑक्टोबर, १९७६, पृ. ५०.

२८. गो.नी. दांडेकर, **दुर्गपुत्र शिवाजी** (समाविष्ट : जयसिंगराव पवार (संपा.), छत्रपती **शिवाजीमहाराज स्मृतीग्रंथ**, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे २०११, पृ. १२८.

२९. अभिजित बेल्हेकर, **दुर्गगाथा**, (समाविष्ट : दुर्गप्रेमी स्मरणिका), तृतीय दुर्ग साहित्य संमेलन, विजयदुर्ग, जानेवारी २०१३, पृ. ७-१३.

३०. भा.वि.कुलकर्णी, **मुंबई परिसरातील अर्थात एकेकाळच्या फिरंगणातील किल्ले**, मुंबई, २००८.

३१. पद्‌माकर प्रभुणे, **पर्यावरण आणि संस्कृती**, त्रैमासिक, मैत्रीच्या पलिकडे, पुणे, २००५, पृ.५० वर उद्‌धृत.

३२. प्र. न. देशपांडे, **मराठाकालीन किल्ले**, पीएच्. डी. इतिहास, पदवीसाठी पुणे विद्यापीठ पुणे विद्यापीठास सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, पुणे, १९७१.

३३. विलास गोर्डे, **चाकणचा स्थानिक इतिहास**, (प्राचीन ते अर्वाचीन), पीएच्. डी. इतिहास पदवीसाठी महाराष्ट्र विद्यापीठास सादर केलेला प्रबंध, पुणे, २०११.

३४. श्रीकांत तापकीर, **महाराष्ट्रातील गडकोट दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन**, पीएच्. डी. इतिहास, पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना सादर केलेला प्रबंध, पुणे, २०१२.

३५. विलास कांबळे, **सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्ययुद्धातील ऐतिहासिक महत्त्व** (१६८९-१७०७) एम. फिल. (इतिहास) पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, यांना सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, पुणे, २००८.

३६. पी. आर. पाटील, **शिवकालीन पुणे जिल्ह्यातील किल्ले,** एम. फिल. (इतिहास), पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, पुणे १९९२.

३७. संजय भोसले, **सातारा जिल्ह्यातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास**,(१६००-१९००), एम. फिल. पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, पुणे २००८.

३८. लहू गायकवाड, **शिवनेरीची जीवनगाथा**, नारायणगाव, २१०५.

३९. प्रदिप आगलावे, **सामाजिक संशोधन पद्धती**, नागपूर, २००७, पृ. ५०.

४०. सुमन ओक, **शैक्षणिक तंत्र व विज्ञान**, पुणे, १९९१, पृ. ९१.

४१. वि. रा. भिंताडे, **संशोधन पद्धती**, पुणे, १९९२, पृ. १०९.

## प्रकरण दुसरे

# पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास

प्राचीन काळापासून दुर्ग अथवा किल्ला ही संकल्पना भारतामध्ये अस्तित्वात होती. परकीय आक्रमकांपासून संरक्षण करण्यासाठी, शांततेच्या काळात स्थानिक बंदोबस्तासाठी, रहदारीच्या नियंत्रणासाठी आक्रमणाच्या काळात चढाईच्या सोयीसाठी, राजघराण्यातील व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी, जनतेसाठी लागणाऱ्या अन्नधान्याची व विविध शस्त्रांची जपणूक करण्यासाठी, राज्यकारभाराचे ठिकाण वा राजधानीचे केंद्र इ. विविध कारणांसाठी किल्ले उभारण्याची प्रथा सुरु झाली. प्राचीन काळापासून माणूस आणि युध्द यांच्यातील परस्पर संबंध अगदी घनिष्ठ असलेला दिसून येतो. संपूर्ण मानवी इतिहासामध्ये युध्दे, लढाया, चकमकी या कधी नव्हत्या असा कालखंड नव्हता. या संघर्षाच्या धामधुमीत किल्ल्यांचे महत्त्व अबाधित होते. अगदी प्राचीन काळापासून संरक्षणाचे एक प्रभावी साधन म्हणून सर्व जगभर किल्ल्यांचा वापर केलेला दिसून येतो.परकीय आक्रमणापासून संरक्षण करणाऱ्या किल्ल्यांचा फार पूर्वीपासून मानवाला आधार वाटत होता. वेगवेगळ्या प्रांतात किल्ले बांधण्याची पध्दती वेगवेगळी असलेली दिसून येते. मानवी समाजाची प्रगती जसजशी होत गेलेली दिसते तसतसे किल्ल्यांच्या बांधणीतही प्रगती आणि विविधता असल्याचे आढळून येते.

महाराष्ट्रातल्या किल्ल्यांसारखी विविधता आणि विपुलता व त्याचे प्रकार जगात अन्यत्र कोठेही आढळत नाहीत. महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची विविधता वैशिष्ट्यपूर्ण असलेली दिसून येते. महाराष्ट्रात सातवाहन राजांच्या काळापासून वा त्याही पूर्वीपासून किल्ले बांधणी झाली आहे. किल्ले म्हणजे स्वराज्याच्या राजधान्या, आपल्या सत्तेचे वर्चस्व दाखवण्याची ठिकाणे तसेच किल्ले जिंकून घेऊन राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षी धोरणाचे प्रतीकच होते. किल्ले बांधणी, त्याचे प्रशासन, डागडुजी, त्यावरुन घडणाऱ्या राजकीय घडामोडी, लढाया, युध्दे, आक्रमणे, संरक्षक पवित्रा अशा विविधांगी दृष्टिकोनातून महाराष्ट्रातल्या प्रत्येक किल्ल्याने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रत्येक प्रांतामधल्या प्रत्येक किल्ल्याला

स्वतंत्र, जाज्वल्य, प्रेरणादायी, रोमांचक इतिहास आहे. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून अगदी पेशवे कालखंडाच्या उत्तरार्धापर्यंत किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. प्रत्येक राज्यकर्त्याने किल्ल्यांची निगराणी, जपणूक अत्यंत काळजीपूर्वक केल्याचे दिसून येते. प्रत्येक किल्ल्याचे स्थानवैशिष्ट्य, राजकीय महत्त्व, शस्त्रास्त्रे, दारुगोळा व राज्यविस्तारामधील स्थान या दृष्टीने किल्ले जिंकून घेणे हे प्रत्येक राज्यकर्त्याने आपले प्रथम कर्तव्य मानले. त्याचप्रमाणे शत्रूपासून किल्ल्याचे हरएक प्रकारे संरक्षण करुन किल्ला जिंकू न देणे हे सुध्दा प्रथम कर्तव्यच मानले गेले. राज्यविस्तारात किल्ले काबीज करण्यात अतिशय महत्त्वाचे स्थान होते कारण किल्ला ताब्यात आला की आपोआप त्याच्या आजूबाजूचा प्रदेश ताब्यात येतो या मार्मिक हेतूने किल्ले जिंकणे हे आद्यकर्तव्य मानले गेले.

प्रस्तुत प्रकरणामध्ये किल्ल्यांची गरज व महत्त्व सांगून पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड, विसापूर, चाकण, सिंहगड, राजगड, पुरंदर अशा एकूण सात किल्ल्यांचा इतिहास साधार मांडला आहे.

**किल्ल्यांची गरज व महत्त्व**

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागातून सह्याद्रीच्या निरनिराळ्या रांगा चोहीकडे पसरलेल्या असल्यामुळे महाराष्ट्राची भूमी ही किल्ल्यांच्या उत्पत्तीला नैसर्गिक रितीने फार अनुकूल आहे व या कारणांमुळे महाराष्ट्रामध्ये किल्ल्यांची जितकी संख्या आहे तितकी ती इतर ठिकाणी क्वचितच असेल. मराठ्यांचे राज्य ज्या प्रदेशात स्थापन झाले आणि विस्तारले त्या प्रदेशाला मध्ययुगामध्ये 'दख्खन' या नावाने ओळखले जात होते. साधारणपणे उत्तरेला तापी नदीपर्यंत आणि दक्षिणेला कोकण व कृष्णा नदीपर्यंत विस्तृत असलेला प्रदेश १५° - ४४°, २१° - १०° उत्तर आणि ७३°-१५°, ७६°-१५° पूर्व हा प्रदेश मध्ययुगामध्ये दख्खन या नावाने ओळखला जात असे. भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने दख्खनचा प्रदेश 'दख्खन पठार' (***The Deccan Plateau***) या नावाने ओळखला जातो. दख्खनचे पठार बेसाल्ट ***(Basalt)*** नावाच्या खडकापासून बनलेले आहे. बेसाल्ट म्हणजे काळा पाषाण किंवा दगड होय. या विशिष्ट प्रकारच्या खडकामुळे सह्याद्रीच्या पश्चिमेकडील पर्वतरांगांमध्ये सातमाळा, अजिंठा, बालाघाट

आणि महादेव या श्रेणीतील डोंगरामध्ये उत्तुंग कडे तयार झाल्याने डोंगरावर सपाट भूभाग असलेल्या अनेक टेकड्या गिरीदुर्ग किंवा डोंगरी किल्ले बांधणीसाठी उपयुक्त ठरल्या. महाराष्ट्रामध्ये डोंगरी किल्ले जास्त असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे दख्खनच्या पठारावरील खडक साधारणपणे ६५० ते १५०० मीटर जाडीचा व काही ठिकाणी ३००० मीटर इतका जाड आहे.[१] हा बेसाल्ट दगडाचा थर डोंगरी किल्ला बांधणीस उपयुक्त आहे. ह्या सह्याद्री पर्वताच्या शिवाय महाराष्ट्राच्या रचनेमध्ये आणखी एक विशेष आहे तो असा की सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेला थोडक्याच अंतरावर समुद्राचा किनारा आहे व सह्याद्री पर्वतामधून निघालेल्या अनेक नद्यांच्या प्रमाणे त्याच पर्वताच्या उदरामधून जन्म पावलेले अनेक डोंगरही थेट समुद्र किनाऱ्याला जाऊन मिळालेले आहेत. हे डोंगर जेथे समुद्राला जाऊन मिळालेले आहेत तेथे बहुतेक ठिकाणी निरनिराळ्या खाड्यांच्या तोंडाशी किल्ले बांधलेले असल्याचे आढळून येते. या दृष्टीने मुंबईपासून गोव्यापर्यंत समुद्रकिनाऱ्याचे आपण निरीक्षण केले तर किनाऱ्याच्या काठच्या डोंगरावरुन आणि क्वचित ठिकाणी समुद्रामध्येही अनेक किल्ले असल्याचे आपल्याला दिसून येते. खांदेरी, उंदेरी, अलिबागचा किल्ला, रेवदंड्याच्या खाडी जवळचा टेकडीवरील किल्ला, जंजिऱ्याचा किल्ला, बाणकोट, मंडणगड, अंजनवेल, जयगड, रत्नागिरी, देवगड, सुवर्णदुर्ग इत्यादी समुद्रकाठचे किल्ले सुप्रसिध्द आहेत. हे किल्ले महाराष्ट्राचे समुद्राच्या बाजूकडून संरक्षण व्हावे म्हणून योजण्यात आले आहेत. त्यांच्याशिवाय सह्याद्रीच्या डोक्यावर विराजमान असलेले प्रतापगड, सज्जनगड, सिंहगड, तोरणा, राजगड, रायगड, लोहगड, विसापूर, तुंग, राजमाची, पुरंदर, हरिश्चंद्रगड, नारायणगड, शिवनेरी, हडसर, चावंड, प्रबळगड, तिकोना, पन्हाळा इत्यादी व असे अनेक किल्ले साऱ्या महाराष्ट्रभर दिसून येतात. अशा किल्ल्यांकडून महाराष्ट्राच्या अंत:प्रदेशाचे संरक्षण केले जावे अशी ते किल्ले बांधणाऱ्यांची अपेक्षा असली पाहिजे असे दिसते.

संपूर्ण महाराष्ट्रभर हे जे अनेक किल्ले पसरलेले दिसतात ते किल्ले शिवाजी महाराजांनी बांधले अशी महाराष्ट्रामध्ये सामान्य समजूत आहे. पण ती बरोबर नाही. यांच्यापैकी बहुतेक किल्ले फार पुरातन काळामध्ये बांधले गेलेले असले पाहिजेत

असे त्यांच्या अंत: प्रमाणावरुन दिसून येते. किल्ल्याला संस्कृतमध्ये दुर्ग असा प्रतिशब्द आहे, हे सर्वांना माहीतच आहे त्यावरुन असे एक स्वाभाविक अनुमान कोणाच्याही मनामध्ये उत्पन्न होते की, या सह्याद्री पर्वतावरील ही अनेक दुर्गम स्थळे सृष्टीदेवतेने जेव्हा निर्माण केलेली असतील, तेव्हापासून प्रथमत: दुर्गाची कल्पना आणि मागाहून काही काळाने दुर्गांची प्रत्यक्ष रचना त्या त्या ठिकाणी अस्तित्वात आली असली पाहिजे. ज्यांचे इतिहास हल्ली लुप्त झालेले आहेत, अशी कितीतरी राज्ये आपल्या या महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत होऊन गेलेली असली पाहिजेत.[२] आणि राज्ये म्हटली म्हणजे त्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्याबरोबर किल्ल्यांची कल्पना आलीच. खुद्द वेदांमध्येही किल्ल्यांच्या कल्पनांचे उल्लेख आढळतात. परंतु त्यांच्या नंतरच्या रामायण, महाभारत इ. ग्रंथांमधून तर त्यांची आवश्यकता आणि त्यांची वर्णने सविस्तर रितीने दिलेली आहेत. त्याचप्रमाणे कौटिल्याचे अर्थशास्त्र, कामंदकनिती, शुक्रनिती वगेरे सारख्या राजकारणाविषयक प्राचीन ग्रंथांमध्येही किल्ल्यांच्या महत्त्वाची वर्णने आपल्याला वाचावयाला मिळतात. या सगळ्या पुराव्यावरुन पाहता, हे किल्ले किती जुने असले पाहिजेत याची कल्पना येते. कित्येक किल्ल्यांवरुन जुन्या छिन्नविछिन्न झालेल्या देवतांच्या मूर्ती किंवा पूर्वीच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या नक्षीचे नमुने अद्यापही कोठेकोठे पहावयास मिळतात. त्यावरुनही या किल्ल्यांचा प्राचीनपणा प्रस्थापित होतो. बौध्दांच्या वेळच्या मूर्ती किंवा त्यांचे अवशेष काही ठिकाणी सापडतात त्यावरुन ते किल्ले बौध्दांच्या वेळचे असले पाहिजेत हे उघड होते. तसेच पुष्कळ किल्ले पूर्वी महाराष्ट्रात होऊन गेलेल्या कलचूरी, आंध्रभृत्य, शिलाहार, यादव वगैरे घराण्यातील हिंदू राजांनीही बांधलेले असले पाहिजेत. त्यानंतर जेव्हा दक्षिणेत मुसलमानांच्या स्वाऱ्या हाऊ लागल्या, तेव्हा यापैकी काही किल्ले त्यांच्या ताब्यात गेल्यामुळे तेथे मुसलमानांच्या मशिदींचे आणि त्यांच्या शिल्पकामाच्या पध्दतींचे कित्येक अवशेष आजही पाहायला मिळत आहेत. अशा रितीने फार प्राचीन काळापासून चालत आलेले हे किल्ले जेव्हा शिवाजी महाराजांच्या हाती येऊ लागले तेव्हा त्यांनी त्यांची डागडुजी केली व त्यांनी आपल्या गरजेप्रमाणे काही नवीनही रचना केल्या. पूर्वीच्या काळी या किल्ल्यांचा कोणी कसा उपयोग केला आणि

त्यांच्यापासून कोणी किती फायदा करुन घेतला हे समजण्याला प्राचीन इतिहासाचे आज आपल्यापाशी काही साधन नाही, परंतु शिवाजी महाराजांनी मात्र या किल्ल्यांपासून पूर्ण फायदा करुन घेतला. हे महाराष्ट्राचा इतिहास आज आपल्याला प्रत्यक्ष सांगू शकत आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या वेळेपासून या किल्ल्यांचे महत्त्व पेशवाईच्या अखेरपर्यंत पूर्णपणे कायम टिकले होते.

महाराष्ट्राच्या इतिहासात किल्ल्यांचे स्थान युध्दात महत्त्वपूर्ण होते. त्याचप्रकारे स्थानिक शांतता टिकविण्यासाठीही किल्ले आवश्यक असल्याचे आढळून येते. स्थानिक बंडखोरी किंवा परकीय आक्रमण आल्यानंतर मुलखात शांतता प्रस्थापित करण्यासाठी किल्ले आवश्यक गोष्ट होती. स्थानिक राजसत्ता शेती, पशुपालन, व्यापार यासारख्या गोष्टींमधून महसूल वसुली करत असत. यासारख्या गोष्टींना राज्यात बळ धरण्यासाठी शांतता ही महत्त्वपूर्ण बाब होती. शांततेविना व्यापार व शेती होणे कठीण होते. त्यासाठी राज्यात किल्ल्यांचा उपयोग शांतता प्रस्थापित करण्यासाठी केला गेला असल्याचे दिसून येते. मध्ययुगात मुघलांच्या प्रभावाखाली संपूर्ण भारत असताना शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली व धामधुमीच्या काळात अनेक किल्ले हस्तगत केले तसेच काही नव्याने बांधून काढले. या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीला रयतेस शांतता व सुबत्ता देणे हा उद्देश होता. त्यामुळे मध्ययुगात किल्ल्यांच्या आधारेच युद्धे लढली जात होती तसेच किल्ल्यांच्या आधारे मुलखावर शांतता प्रस्थापित करण्याचे काम योग्यरित्या होत होते असे सांगता येते.

मध्ययुगीन कालखंडात अशी पध्दत होती की जहागीर म्हणून एखादा प्रदेश जहागीरदारास दिला असेल व त्या प्रदेशात किल्ले असतील तर त्या किल्ल्यांवर मुसलमान सत्ताधीशांची सत्ता असे. शिवाजी महाराजांनी ही पध्दत धुडकावून लावून आपल्या जहागिरीतील सिंहगड, पुरंदर सारखे किल्ले इ. स. १६४६ पर्यंत जिंकले व आपले सार्वभौमत्व सिध्द केले.[३] शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या पायाभरणीपासून आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत किल्ल्यांबाबतीत अत्यंत जागरुक राहून किल्ल्यांना आपल्या स्वराज्याचा प्राणवायू मानले[४] किल्ल्यांच्या

सामर्थ्यावर त्यांचा आत्यंतिक विश्वास होता. प्रचंड मुघल सत्तेची यत्किंचितही भिती न बाळगता किल्ल्यांबाबतीत ''सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रू उरावर आहे, तो आला तरी, नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत''[५] असा आत्मविश्वास बाळगला. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्वस्त होतो. देश उध्वस्त झाल्यावरी राज्य ऐसे कोणास म्हणावे.'[६] रामचंद्रपंत अमात्यांनी आपल्या आज्ञापत्रात अशा प्रकारे दुर्गांचे महत्त्व विशद केले आहे. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचा स्वराज्यवृध्दीसाठी आणि प्रसंगी रक्षणासाठीही जितक्या मुत्सद्दी धोरणाने उपयोग केल्याचे इतिहास सांगतो तितका त्यांच्या शत्रूंना करुन घेता आला नाही. किल्ल्यांच्या साखळ्या तयार करुन मराठ्यांचा राज्यविस्तार आणि संरक्षण या दोन्ही बाबींकडे शिवरायांनी पूरेपूर लक्ष दिले. मराठ्यांच्या सत्तेवर आलेली संकटे किल्ल्यांमुळेच टाळता आली. रियासतकार सरदेसाई म्हणतात की, ''प्रत्येक किल्ला हा शिवाजीच्या राज्यमालिकेतील एक घटक अवयव होय. या बहुमोल दुर्गमालिकेने शिवाजीने आपले राज्य बंदिस्त केले. शिवाजी महाराजांची बहुतेक अचाट कृत्ये या किल्ल्यांच्या योगाने तडीस गेली. नाना ठिकाणची लूट सुरक्षितपणे किल्ल्यावर आणून ठेवता आली. सुरत व खानदेश येथील लूट रायगडी आणताना बागलाण व नाशिक या प्रांतातील किल्ल्यांचा त्यांना खूप उपयोग झाला. शिवाजी महाराजांनी मिळवलेला बहुतेक पैसा किल्ल्यांची बांधणी करुन ते सुरक्षित ठेवण्यातच खर्च झाला. सिंधुदुर्गावर त्यांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. आणीबाणीचे अनेक प्रसंग आले असता त्यातून निभावून जाण्यास हेच किल्ले त्यास उपयोगी पडले. कित्येक किल्ले स्वसंरक्षणाच्या सोयीचे, तर कित्येक अचानक शत्रूवर छापा घालून त्यांचा पाडाव करणे सोयीचे असे असून त्यांच्याच योगाने मराठ्यांच्या तत्कालीन पराक्रमास एक प्रकारे विलक्षण रसाळता उत्पन्न झाली.''[७] 'थोरले महाराज यांनी हे राज्य गडावरुन निर्माण केले' आणि 'गड होते म्हणून राज्य मात्र अवशिष्ट राहिले'[८] या दोन विधानांत शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांच्या कामगिरीचे महत्त्व समजते. महाराष्ट्रातील डोंगर, दऱ्या, कडेकपारी अशा नैसर्गिक संरक्षणसज्ज अशा

भूमीमध्ये मोक्याच्या ठिकाणी किल्ले उभारुन ती सशस्त्र सेनेप्रमाणेच होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अशा किल्ल्यांच्या सहाय्याने सुरक्षित युध्द लढण्यास एवढी अनुकूल भूमी जगाच्या पाठीवर शोधून सापडणार नाही. म्हणूनच मराठे आपल्या मुलाखत अभेद्यच [९] राहतील असे इंग्रज अधिकारी विल्यम हेन्री टोन याला वाटत असे. 'या दुष्ट (मराठा) जमातीचे निवासस्थान म्हणजे किल्ले! ते जिंकून घ्यावे आणि या कुटिल जमातीची पाळेमुळे खणून काढावी.'[१०] अशा शब्दात औरंगजेबाने किल्ल्यांविषयी संतप्त उद्‌गार काढून ते काबीज करण्यासाठी स्वत: दक्षिणेत आला. सह्याद्रीमधील किल्ले हे स्वराज्याचे खरे राखणदार आहेत. याबद्दल शिवाजी महाराजांना आत्मविश्वास होता. ते मुघल अधिकाऱ्यांना खरमरीत शब्दात याची जाणीव करुन देतात. ते म्हणतात, 'आमच्या या कठीण प्रदेशात कल्पनेचा घोडा सुध्दा नाचवणे कठीण आहे. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. नदी नाले उतरुन जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले माझे तयार आहेत. त्यापैकी काही समुद्रकिनाऱ्यालगत आहेत.[११] महाराष्ट्रात महत्त्वाच्या ठिकाणी अनेक डोंगरी किल्ले होतेच तरीसुध्दा शिवाजी महाराजांनी नवे किल्ले उभारले. कोकण किनारपट्टी सुरक्षित करण्यासाठी आरमारी सामर्थ्य वाढवण्यासाठी जलदुर्ग उभारणीकडे त्यांनी अधिक लक्ष दिले. डोंगरी किल्ल्याबाबत तर शिवकालात स्वतंत्र शास्त्रच निर्माण झाले. स्वराज्याच्या संरक्षणामुळे किल्ल्यांचे महत्त्व सांगताना डॉ. एस. एन. सेन म्हणतात, ***"The defensive value of these forts had been amply demonstrated during Aurangzib's invasion, each fort cost the mughal Emperor an enormous loss of men, money & time."***[१२] शिवाजी महाराजांनी अनेक छोटे किल्ले बांधले. त्यावर पाणी सुध्दा नसे. अशा किल्ल्यांचा उपयोग शत्रू पाठीवर आला किंवा शत्रूने अचानक हल्ला केला तर पटकन या किल्ल्यांवर आश्रय घेण्यासाठी होत असे. शत्रू एकदम तटास भिडत नाही. शत्रू चालून येत आहे हे बघून किल्ल्यावरचे लोक सावध होऊन वरुन दगड लोटतील. त्यामुळे शत्रू बिथरेल. आपल्या लोकांना वेळ, इतर सामग्री मिळेल. जवळपासच्या किल्ले, कोट, सुभे ठाण्यांवरुन मदत मिळेल. किल्ल्याला अपाय होणार नाही अशा विचाराने लहान मोठे किल्ले उभारले.[१३]

महाराष्ट्रातील बलाढ्य किल्ले जिंकून घेण्याचा आटोकाट प्रयत्न मुघल सम्राट औरंगजेबाने केला. परंतु या प्रयत्नात भरपूर वेळ, प्रचंड द्रव्यहानी, मनुष्यहानी झाली. मराठी राज्य पादाक्रांत करण्यात त्याला यश प्राप्त झाले नाही. त्यातच त्याचा १७०७ साली मृत्यू झाला. औरंगजेबानंतर गादीवर आलेल्या वारसांनी मराठा राज्य व किल्ले काबीज करण्याचे धोरण साडून दिले. त्यानंतर ब्रिटिशांनी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रास्त्रांचा वापर करीत मराठ्यांकडून किल्ले हस्तगत करण्यास सुरुवात केली. पेशवे कालखंडामध्ये किल्ल्यांकडे दुर्लक्ष होत गेले. मराठ्यांनी बदलत्या युध्दतंत्रानुसार आधुनिक शस्त्रांच्या वापराला प्राधान्य दिले नाही. इंग्रजांनी लांब पल्ल्याच्या प्रभावी तोफांचा जोरदार मारा करुन मराठ्यांच्या स्वातंत्र्याची प्रतीके असणाऱ्या प्रमुख किल्ल्यांची तटबंदी उध्वस्त करुन, पाण्याच्या टाक्या सुरुंग लावून, वाटा फोडून किल्ले नामशेष केले.

सारांश साधनांची कमतरता असतांनाही स्वत:च्या राज्याच्या संरक्षणासाठी जिवाची पर्वा न करता लढणारे योध्दे बलाढ्य किल्ल्यांच्या आश्रयानेच लढत होते. किल्ल्यांचे महत्त्व प्राचीन काळापासून मध्ययुगाच्या अखेरपर्यंत अबाधित होते. ते एकोणिसाव्या शतकात संपुष्टात आलेले दिसून येते. ब्रिटिश राज्यसत्तेच्या अंमलामध्ये युध्दजन्य परिस्थिती संपुष्टात आल्यावर किल्ल्यांवर राहून किल्ले लढविण्याचे कारण उरले नाही व त्यानंतर महाराष्ट्रातील गिरीदुर्ग, जलदुर्ग व भुईकोट किल्ले अशा सर्वच किल्ल्यांचे महत्त्व संपुष्टात आलेले आढळून येते.

**पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास**

महाराष्ट्राला प्राचीन व समृध्द असा गौरवशाली इतिहास लाभला आहे. 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' असे या महाराष्ट्र भूमीचे वर्णन कवी गोविंदाग्रज यांनी केले आहे. त्यामध्ये सह्याद्रीचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहावा असा गौरवशाली आहे. घनदाट जंगले, उंचच उंच कडे, खोल दऱ्या, त्यातून वाहणारे नद्या-नाले, ओढे, जंगलातील हिंस्त्र प्राणी अशा भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण सह्याद्रीच्या डोंगररांगांत आपल्या इतिहासाची स्मारके आजही दिमाखात उभी आहेत. सह्याद्रीच्या खोऱ्यातील अभेद्य, बेलाग दुर्ग या महाराष्ट्रभूमीचा, मराठी माणसाचा

आणि मनाचा मानबिंदू आहे. शेकडो वर्षांपासूनचा इतिहास, भूगोल, सभ्यता, संस्कृती या सर्वांचे प्रतिबिंब आपणास किल्ल्यांमध्ये पडताळता येते. 'संपूर्ण राज्यांचे सार ते दुर्ग' या एकाच वाक्यात सुमारे तीनशे वर्षांपूर्वी रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रामध्ये किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व विशद केले आहे. शिवाजी महाराजांचा कालखंड म्हणजे गडकोटांच्या इतिहासातील सुवर्णपानच आहे. स्वराज्य, स्वातंत्र्य, सार्वभौमत्व यांच्या प्रेरणा किल्ल्यांच्या साहाय्याने साकार झाल्या. स्वराज्यातील किल्ल्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत मुस्लिम आक्रमणाला यशस्वीपणे तोंड देऊन राज्य अपराजित ठेवले. महाराष्ट्रातील एकेक किल्ला म्हणजे महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य इतिहासाचे प्रेरणादायी स्मारकच आहे. सुमारे ३५० पेक्षा जास्त किल्ले आज महाराष्ट्रात आपल्या अस्तित्वाची साक्ष देत मानाने उभे आहेत. तत्कालीन काळात किल्ल्यांचे महत्त्व प्रामुख्याने सामाजिक व राजकीय स्वरुपाचे होते. हे महत्त्व काळानुसार बदलत गेले आहे. आज एकविसाव्या शतकात युध्दशास्त्रात शस्त्रास्त्रांची विलक्षण वेगाने क्रांती झाल्याने रणभूमीचे स्वरुप जमीन व पाणी यापुरते मर्यादित राहिले नाही. हवाई दलातील लढाऊ विमानांनी आपल्या पोटात अतिसंहारक, बॉम्ब घेऊन हवेत झेप घेतली असल्याने किल्ल्यांचे सामरिक महत्त्व शून्य झाले आहे. संपूर्ण युध्दशास्त्राचे स्वरुप, व्याख्याच बदलून गेल्या आहेत. त्यामुळे किल्ल्यांना आधुनिक जगात पूर्वी सारखे स्थान राहिलेले नाही. हे जरी खरे असले तरी किल्ल्यांचे अबाधित महत्त्व, त्यांचे स्थान, त्यांचा इतिहास हा आपला वैभवशाली वारसा आहे. महाराष्ट्राचा इतिहास हा किल्ल्यांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. किल्ल्यांचा इतिहास हा संपूर्ण मराठी स्वराज्याचा इतिहास आहे. किल्ले ताब्यात घेणे, डागडुजी करणे, किल्ले प्रशासन सक्षम ठेवणे, किल्ला जिंकू न देणे यासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले. अशा किल्ल्यांचा प्रेरणादायी इतिहास हा नेहमीच भविष्यकालीन पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. गडकोट हा आपल्याला लाभलेला अमूल्य ऐतिहासिक ठेवा आहे. असे गडकोट जरी अवशेषांच्या रुपात असले तरी ते आपले प्रेरणास्त्रोत आहेत.

संशोधकाने पुणे जिल्ह्यातील एकूण २९ किल्ल्यांपैकी सात किल्ले अभ्यासासाठी निवडले आहेत ते पुढीलप्रमाणे १) शिवनेरी २) लोहगड ३) विसापूर ४) चाकण ५) सिंहगड ६) राजगड ७) पुरंदर. प्रस्तुत प्रकरणात या निवडलेल्या किल्ल्यांचा इतिहास मांडण्यात आला आहे.

**शिवनेरी**

शिवनेरी किल्ला सातवाहनांनी बांधला. प्राचीन काळी या प्रदेशात शक लोक राज्य करीत होते. त्यांच्या नहपान राजांची जुन्नर ही राजधानी होती. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात हे शक उज्जयनीस होते. तेथून ते या प्रदेशात आले. त्यांनी अनेक धर्मशाळा व घाट बांधले. परंतु ते परकीय होते. पुढे गौतमीपुत्र सातकर्णी याने क्षत्रपांचा नाश केला. या किल्ल्यावर प्राचीन काळात सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव या घराण्यांची सत्ता होती.[१४]

इ. स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्रावर स्वारी करुन देवगिरीच्या यादवांचा पराभव केला. पराभवानंतर यादवांनी दिल्लीच्या खिलजी घराण्याचे मांडलिकत्व स्वीकारले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये ही घटना अत्यंत महत्त्वपूर्ण समजली जाते. खिलजी घराण्यानंतर महाराष्टावर काही काळ दिल्लीच्या तुघलक घराण्याची सत्ता होती. मुहम्मद तुघलकच्या राजवटीमध्ये त्याने काही काळासाठी आपली राजधानी दिल्लीवरुन दौलताबादला आणली होती. मात्र राजधानी स्थलांतरणाचा हा प्रयोग पूर्णपणे अयशस्वी झाला. कारण दिल्लीहून दौलताबादला आलेल्या सरदारांनी राज्यात ठिकठिकाणी बंडाळी सुरु केली. म्हणून मुहम्मद तुघलकाने पुन्हा आपली राजधानी दिल्लीस परत नेली. दौलताबादहून पुन्हा दिल्लीला राजधानी हलवल्यानंतर सुलतानाची दक्षिणेवरील पकड सैल पडू लागली. अशातच विजयनगर सारखे स्वतंत्र हिंदू राज्य उभे राहिले. या सर्व पार्श्वभूमीवर दक्षिणेत सुभेदार, सरदारांची बंडखोरी व महत्त्वाकांक्षा वाढू लागली. परिणामी इ. स. १३४७ साली हसन गंगू याने बहामनी राज्याची स्थापना केली. त्याने गुलबर्गा ही आपली राजधानी बनवली. १३४७ ते १५२६ या काळात बहामनी राज्यावर १८ सुलतानांनी राज्य केले.

अशा प्रकारे बहामनी राज्याच्या स्थापनेपासून जुन्नरचा परिसर बहामनी राज्यामध्ये समाविष्ट होता. विजयनगर-बहामनी या दोन सत्तांच्या संघर्षामध्ये बहामनी साम्राज्याचे विभाजन होऊन निर्माण झालेल्या पाच शाह्यांपैकी निजामशाहीमध्ये जुन्नर शिवनेरी परिसराचा समावेश होता. जुन्नर ही निजामशाहीची पहिली राजधानी होती.

राज्य स्थापन झाल्यावर अल्लाउद्दीन बहमनशहा या पहिल्या सुलतानाने साम्राज्य विस्ताराचे धोरण आखून बराच प्रदेश ताब्यात आणला. प्रशासनाची घडी उत्तम प्रकारे बसवली. बहामनी राज्याच्या इतिहासात इ. स. १४६१ ते १४८२ या काळात मुख्य प्रधान महमूद गवाण याने आपल्या अंगभूत कौशल्याव्दारे बहामनी राज्याचे वैभव व दरारा वाढवला. त्याने कर्नाटकात हुबळी, बेळगाव, बागलकोट हे प्रदेश जिंकले. कोकण व गोवा प्रदेश बहामनी साम्राज्यात विलीन केले. त्याने अत्यंत कार्यक्षम प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्याच्या वाढत जाणाऱ्या प्रभावामुळे दख्खनी विरोधकांनी त्याच्या विरोधात सुलतानाचे कान फुंकले. सुलतानाने त्यावर त्वरित आततायी निर्णय देत त्याला मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली. यानंतर बहामनी साम्राज्याचे विभाजन होऊन त्यातून पाच स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.

बहामनी राजवटीत अल्लाउद्दीन हसनशहाने बहामनी साम्राज्याच्या प्रशासनाच्या सोयीसाठी साम्राज्याचे चार विभाग केले होते. अल्लाउद्दीन हसन बहामनशहाचा पुतण्या मुहम्मद बीन आदिलशहाकडे जुन्नर परिसराचा कारभार होता. बहामनी सुलतान शम्सुद्दीन मुहमदाच्या काळात जुन्नरवर मलिक अहमदचा ताबा असून त्याने शिवनेरीवर आपले लष्करी ठाणे उभारले होते.[१५] मलिक अहमदने जुन्नर परिसरामध्ये शांतता प्रस्थापित केली म्हणून बहमनी सुलतानाने त्यास मानाचा पोषाख व निजाम-उल-मुल्क ही पदवी देऊन जुन्नर प्रांताच्या मुख्याधिकारीपदी नियुक्ती केली. जुन्नरला आल्यावर त्याने शिवनेरी किल्ल्यावर मशीद उभारली. शिवनेरी किल्ल्यावरील ही मशीद ‘कमानीची मशीद’ या नावाने ओळखली जाते. शिवनेरीच्या तटाची दुरुस्ती करुन बुरुज बांधले. शिवनेरी किल्ला आपल्या वास्तव्यासाठी तयार करुन स्वत: किल्ल्यातच वास्तव्यास राहिला. मलिक अहमदचे

वडील मलिक हसन हे बाटलेले मुस्लिम असून विजयनगर विरुध्दच्या एका मोहिमेत अहमदशहा बहमनीस जाऊन मिळाले होते.[१६] दि. ५ एप्रिल १४८१ रोजी मुहम्मद गवानचा कोंडवली गावी खून झाल्याने बहामनी राज्याची सर्व सूत्रे मलिक हसनच्या हाती आली. मलिक हसनला बहामनी दरबारात मोठा विरोध होता. बहमनी सम्राट दिलपसन्दखानाने १४८६ मध्ये मलिक हसनचा खून केला. त्यामुळे मलिक हसनचा मुलगा मलिक अहमदने बहमनी राज्याचे राजकीय वर्चस्व झुगारुन दिले. दिलपसन्दखानापासून सुरक्षित राहण्यासाठी तो जुन्नर, शिवनेरी, लोहगड, तुंग व तिकोना या डोंगरी किल्ल्यांच्या आश्रयाने राहू लागला. शिवनेरीवरील वास्तव्यात मलिक अहमदने आपले नाव बदलून 'निजामुल्मुल्क बहरी' असे नवीन नाव धारण केले. आपल्या वडिलांच्या मारेकऱ्यांविरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारले. इ. स. १४८६ मध्ये मलिक अहमदने शिवनेरीच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्या विश्वासू कोतवालावर सोपवून कामानिमित्त बिदरला गेला होता. ही संधी साधून निजामशहाने जुन्नरवर हल्ला केला. शिवनेरीच्या कोतवालाने त्याचा कडवा प्रतिकार केला. त्यामुळे जुन्नर व शिवनेरी किल्ला जिंकण्याचा निजामशहाचा मनोदय सफल झाला नाही. १४९४ मध्ये मलिक अहमदने आपले लष्करी ठाणे जुन्नरवरुन अहमदनगरला हलविले.

इ. स. १५६४ मध्ये निजामशाहीमध्ये दख्खनी मुसलमान आणि इराणमधून आलेले मुसलमान यांच्यातील संघर्ष उफाळून आला. जुन्नर व चाकण परिसरात दख्खनी मुसलमानांची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात आली.[१७] इ. स. १५६५ मध्ये मुर्तजा निजामशहा अहमदनगरच्या निजामशाहीचा प्रमुख बनला. त्याची आई खुनजाँ व मुर्तजा निजामशहा यांच्यामध्ये मतभेद होते. मुर्तजाने अधिकाऱ्यांच्या मदतीने आपल्या आईच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यासाठी आपली आई व लहान भाऊ बुऱ्हाण यांना १५६९ मध्ये शिवनेरी किल्ल्यावर कैदेत टाकले.

इ. स. १५७० मध्ये निजामशहा जुन्नर आणि शिवनेरी किल्ल्यास भेट देण्यास निघाला. निजामशहाच्या भेटीची पूर्वतयारी करण्यासाठी सलाबतखानास पाठविले होते. निजामशहाने जुन्नरच्या पूर्वेस १८ किमी अंतरावर नारायणगाव येथे मुक्काम

केला. त्यावेळी वाघोजी नाईकवडी हा शिवनेरी किल्ल्याचा अधिकारी होता. सलाबतखान आणि वाघोजी नाईकवडी यांचे संबंध चांगले नव्हते. निजामशहा जुन्नरला येताच सलाबतखानाने वाघोजी विरुद्ध तक्रार केली. मात्र वाघोजीवर कारवाई करण्याऐवजी सलाबतखानास शिक्षा करुन परिंड्याच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. त्याचप्रमाणे निजामशाहीचा मुख्य प्रधान खानखानान यास पदावरुन दूर करुन शिवनेरीच्या पश्चिमेकडील चावंड किल्ल्यावर कैदेत टाकले. त्याचवेळी चावंडचा किल्लेदार शाह हैदर यास निजामशाहीच्या मुख्य प्रधानपदी नियुक्त केले. चावंडच्या किल्ल्यात कैदेत असलेल्या खानखानानचा जास्तीत जास्त छळ करण्याची सूचना शाहहैदरने चावंडच्या कैदखान्याचा प्रमुख बिसतखान यास केली. मुर्तजा निजामशहाची कारकिर्द फारशी प्रभावी नव्हती. त्याच्या कारकिर्दीमध्ये निजामशाहीत सर्वत्र अस्थिर वातावरण होते. मुर्तजा निजामशाहीच्या कारकिर्दीच्या अखेरीस मिर्झाखान नावाच्या सरदाराने गुप्तपणे कारवाई करुन निजामशहास १४ जून १५८८ रोजी ठार मारले.[१८] त्याच्या निधनानंतर मिरान हुसेन हा निजामशहा झाला. मात्र तो फार छंदी होता. राज्यकारभारात लक्ष देत नसे. त्याने मिर्झाखानास ठार मारण्याची योजना आखली. १६ मार्च १५८९ रोजी त्याची ही योजना उघडकीस येऊन मिर्झाखानाने परदेशी मुसलमान व पठाणांच्या मदतीने मिरान हुसेनला १८ मार्च १५८९ रोजी कैद करुन ठार मारले. १ एप्रिल १५८९ रोजी शहा इस्माईल हा निजामशहा बनला. ही बाब मिरान हुसेनचा विश्वासू सरदार जमालखानास सहन झाली नाही. त्याने मिर्झाखानच्या गटातील सरदारांची सर्रास कत्तल केली. मिर्झाखान आपला जीव वाचविण्यासाठी जुन्नरच्या शिवनेरी किल्ल्यात आला.[१९] मात्र पाठलाग करत जमालखानही शिवनेरीस पोहोचला. त्याने मिर्झाखानास पकडून त्याची धिंड काढून त्यास ठार मारले. जमालखान आता स्वत: निजामशाहीचा मुख्य प्रधान बनला. यावेळी इस्माईल निजामशहाचे वडील बुऱ्हाणखान निजामशहा हा जुन्नर मध्ये कैदेत होता. त्याने फकीराचा वेश घेऊन जुन्नरमधून आपली सुटका करुन घेऊन तो अकबर बादशहाच्या आश्रयास गेला. पुढे त्याचा मुलगा निजामशहा झाल्यावरच तो अहमदनगरला गेला. निजामशाहीतील सरदारांचा बंदोबस्त करुन

बुऱ्हाणखान ७ मे १५९१ साली निजामशहा झाला. पुढे १५९५ च्या मार्च महिन्यात तो निधन पावला.

इ.स.१५९५ मध्ये इब्राहिम निजामशहा गादीवर आला. त्याने राज्यकारभारात मदत करण्यासाठी मिआन मंजू व एखलासखान या दोघांची नेमणूक केली. दोघांनीही निजामशाही दरबारामध्ये आपापले वजन वाढविले. याचकाळात निजामशाही विरुध्द आदिलशाही व मोगलांनी आक्रमक पवित्रा घेतला. या तिघांच्या संघर्षात इब्राहिम निजामशहा लढाईत मारला गेला. निजामशाहीत आता अस्थिरतेचे पर्व सुरु झाले. निजामशाहीचा सरदार नेहंगखान सिद्दी व चाँदबिबी यांच्यात मतभेद झाले म्हणून नेहंगखान सिद्दी जुन्नरला येऊन राहिला.

निजामशाहीच्या अस्थिरतेच्या कालावधीत निजामशाहीमध्ये मुस्लिम सरदारांप्रमाणेच मराठी सरदारांचा एक गट होता. त्यात प्रामुख्याने लखुजी राजे, मालोजी राजे व विठोजी भोसले यांचा समावेश होता. ही सर्व मंडळी बुऱ्हाण निजामशहाची समर्थक होती. मालोजीराजे यांचे निजामशाही दरबारात चांगलेच प्रस्थ होते. मालोजीराजांच्या निधनानंतर त्यांच्याकडील प्रदेश निजामशहाने शाहजीराजांना दिला.[२०]

इ. स. १५९५ मध्ये बुऱ्हाणखान निजामशहा दुसरा (१५९१-१५९५) याने छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले यांना पुणे, सुपे, चाकण आणि शिवनेरी इत्यादी ठिकाणची जहागिरी देऊन 'राजे' हा किताब दिला. मालोजींच्या निधनानंतर निजामशहाने मालोजींची सर्व जहागिरी शाहजीराजे व शरिफजी या दोघांना दिली. या विषयीचा उल्लेख कागदपत्रामध्ये पुढीलप्रमाणे आला आहे.

''पातशहा यांनी वस्त्र, अलंकार, भूषणे देऊन बहुतप्रकारे समाधान राजे याचे करुन वजीरास व वकीलास आज्ञा केली की, यांचे वडिलार्जित दौलत आपले जमेस आहे ती या उभयता राजे भोसले यांचे स्वाधीन करुन द्यावीत. अशी आज्ञा होताच तत्क्षणी मागील कागदपत्र पाहून उभयता बंधूचे नावे (शाहजी व शरिफजी यांचे नावे) प्रथम पंधरा पंधराशे स्वाराच्या सरदाऱ्या व मनसब द्यावी आणि तैनातीबद्दल जुन्नर,

परगणा त्यातच शिवनेरी किल्ला सुध्दा पातशहा यांनी सनदापत्रे करुन दिला आणि सिरपाव देऊन निरोप देते जाहले.''[२१]

निजामशाहीमध्ये शाहजी राजांप्रमाणेच मलिक अंबर हा देखील कर्तृत्ववान सरदार होता. निजामशाहीचा मुख्य प्रधान मलिक अंबर आणि शाहजी राजे यांनी १६२४ च्या भातवडीच्या लढाईत आदिलशाहीचा पराभव केला. यानंतर मलिक अंबर आणि शाहजी राजे यांचे संबंध बिघडले. शाहजींनी कधी आदिलशाही, कधी निजामशाही तर प्रसंगी मोगलांकडे अशा प्रकारे नोकरी केली. मात्र पुणे परिसरावरील आपला अंमल कायम ठेवला. मलिक अंबर १६२६ च्या मे महिन्यामध्ये निधन पावला. निजामशाहीतील आपला प्रतिस्पर्धी निधन पावल्याने शाहजी राजे पुन्हा निजामशाहीच्या नोकरीत आले. शाहजी राजे जुन्नरला आल्यावर आपला मोठा मुलगा 'संभाजी' आणि शिवनेरीचा किल्लेदार 'विश्वासराव उर्फ विश्वासराज' यांची कन्या जयंती यांचा विवाह समारंभ त्यांनी शिवनेरी किल्ल्यावर केला.[२२]

२५ जुलै १६२९ रोजी शाहजीराजांचे सासरे लुखजी जाधवांचा दौलताबाद येथे निजामशहाच्या दरबारात खून झाला. त्यावेळी शाहजीराजे परांडा किल्ल्याजवळ होते. सासऱ्यांच्या खुनाची बातमी समजताच शाहजींनी निजामशाहीतील नोकरीचा त्याग केला आणि प्रथम चाकण व सुपे परगण्यामध्ये व त्यांनतर शिवनेरी किल्ल्यावर वास्तव्य केले.[२३] मलिक अंबरच्या निधनानंतर त्याचा मुलगा फतेहखान निजामशाहीचा मुख्य प्रधान बनला. फतेहखानास निजामशाही दरबारात हमीदखान नावाच्या सरदाराचा विरोध होता. हमीदखानाने चिथावणी दिल्याने निजामशहाने फतेहखानास शिवनेरी किल्ल्यात कैदेत टाकले. फतेहखानाने किल्ल्यातील नाईकवडींना फसविले व तो अहमदनगरला पळून गेला.

इ. स. १६२९ मध्ये शाहजीराजे विजापूरच्या आदिलशाहीच्या नोकरीत गेले. तेव्हा जिजाबाई गरोदर होत्या. शाहजीराजांनी जिजाबाईंना शिवनेरी किल्ल्यावर आपले व्याही विश्वासराव यांच्याकडे सुरक्षित ठेवले. त्यांची काळजी घेण्यासाठी विश्वासू सहाय्यक सोनोपंत आणि कृष्णाजी हणमंते या दोघांनाही शिवनेरी किल्ल्यावर ठेवले होते.[२४] १९ फेब्रुवारी १६३० रोजी (शक १५५१, फाल्गुन वद्य

तृतीया) शिवाजी महाराजांचा जन्म झाला. शिवनेरी किल्ल्यावरील देवीचे नाव शिवाई आहे. या देवीच्या नावावरुन शिवाजी असे नाव ठेवले असावे.[२५] इ. स. १६३० ते १६३६ या कालावधीत जिजाबाई व शिवाजी महाराज जुन्नरला शिवनेरीवर काही काळ वास्तव्यास होते. शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर शाहजींनी निजामशाहीचे पुनरुज्जीवन करण्यास प्रारंभ केला. निजामशाही वंशातील मुर्तजा नावाच्या एका मुलास गादीवर बसविण्यासाठी योजना आखली. मुर्तजा निजामशहा जुन्नरच्या पश्चिमेकडील नाणेघाटाजवळील जीवधन किल्ल्यात कैदेत होता. शाहजींनी त्याची सुटका करुन त्यास निजामशाहीच्या तख्तावर बसवले. शाहजींनी जुन्नर परिसरातून निजामशाहीचा कारभार चालू ठेवला. त्यावेळी जुन्नर, शिवनेरी परिसर आर्थिकदृष्ट्या संपन्न होता. शिवनेरी किल्ल्याचे वार्षिक महसुली उत्पन्न ३ लाख रुपये होते. अशी नोंद ९ एप्रिल १६३४ रोजी तत्कालीन पोर्तुगीज व्हाइसरॉय द लिन्ज्ञारिस याने केली आहे.[२६] याचवेळी शाहजीराजांच्या वाढत्या हालचाली लक्षात घेऊन शाहजहानने त्यांची निजामशाही संपुष्टात आणण्यासाठी दक्षिणेत स्वारी केली.

शाहजहानसमवेत शायिस्ताखान, अलिवर्दीखान व खानजमानखान हे मोगल सरदार होते. शायिस्ताखानाने शाहजीराजांची कोंडी करण्याचे ठरविले. शाहजहानने जुन्नर सरकार उध्वस्त करण्याची जबाबदारी शायिस्ताखानावर सोपविली. ८ मार्च १६३६ रोजी शायिस्ताखान अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर येथे पोहोचला. त्याने खान-इ-खानानच्या पथकाचा प्रमुख बाकिर यास जुन्नर सरकार जिंकण्यासाठी पाठविले. त्यावेळी शाहजीराजे चांभार गोंद्याच्या (श्रीगोंदा) परिसरात होते. शिवनेरी किल्ला शाहजीराजांच्या ताब्यात आणि जुन्नर मोगलांकडे होते. संगमनेरहून शायिस्ताखान अहमदनगरकडे गेला. त्याचवेळी शाहजीपुत्र संभाजी यांनी श्रीगोंद्याहून शिवनेरीकडे येऊन मोगलांच्या प्रतिकाराची तयारी केली. जुन्नर शहरामध्ये मोगलांची फार कमी फौज होती. संभाजीच्या आगमनाची बातमी समजताच शायिस्ताखानाने सय्यद अली अकबर बुखारी याच्याबरोबर ५०० सैनिक देऊन त्यास जुन्नरला पाठविले. त्यांनी जुन्नर शहराच्या संरक्षणाची जय्यत तयारी केली. शाहजीपुत्र संभाजीच्या अधिपत्याखाली मराठ्यांनी आता नव्या उमेदीने जुन्नरला वेढा दिला.

जुन्नर मधील मोगल सैनिकांची रसद बंद झाल्याने त्यांचे हाल होऊ लागले. ही बातमी समजताच शायिस्ताखानाने आणखी कुमक पाठवून मराठ्यांना आजच्या आंबेगाव तालुक्यातील भीमानदीपर्यंत मागे हटविले. शायिस्ताखान स्वतः जुन्नर मध्ये मुक्कामी राहिला. मात्र त्यास शिवनेरी किल्ला जिंकता आला नाही. म्हणून त्याने बाकीर यास जुन्नर शहराच्या संरक्षणासाठी नेमले. जुन्नर शहराचा ताबा मोगलांकडे आणि शिवनेरी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात अशी परिस्थिती निर्माण झाली. असे शाहजहानने १४ मे १६३६ रोजी आदिलशहास पाठविलेल्या पत्रावरुन समजते.[२७]

शिवनेरी किल्ला आपल्या ताब्यात घेण्यासाठी शाहजहानने खानजमानखानास पाठविले. त्याच्या मदतीसाठी जगतसिंह, कारतलबखान, बहादुरखान इत्यादी सरदारांची नियुक्ती केली. विजापूरच्या आदिलशाहीने खानजमानखानास सहाय्य करावे म्हणून शाहजहानने आदिलशहावर दबाव आणला. १९ जून १६३६ रोजी खानजमानखानाच्या पथकातील बहादूरखानावर शिवनेरी जिंकण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. आदिलशाही सरदार रणदौलाखान बहादूरखानाच्या मदतीस आला. शाहजीराजांनी रणदौलाखान व बहादूरखान यांना जुन्नर पासून दूर माहुली किल्ल्याकडे नेले. त्यामुळे जुन्नरवरील मोगलांच्या आक्रमणाची तीव्रता कमी झाली. खानजमानखान आणि रणदौलाखान या दोघांनी माहुली किल्ल्यास वेढा दिला. या प्रसंगी शाहजी राजांनी निरुपाय होऊन मोगलांशी व आदिलशहाशी १६३६ च्या मे महिन्यामध्ये माहुलीचा तह केला. मोगलांचा वाढता दबाव आदिलशहाने शाहजीविरुध्द मोगलांना केलेली मदत इत्यादी कारणांमुळे शाहजींनी मुर्तजा निजामशहास रणदौलाखानाच्या हवाली केले. त्याचवेळी जुन्नर व परिसरातील सर्व किल्ले मोगलांच्या ताब्यात दिले. अशा प्रकारे जुन्नरवर मोगलांची राजवट सुरु झाली. मोगलांनी जुन्नर ताब्यात घेताच स्थानिक जनता व मोगल सरदार यांच्यात संघर्ष सुरु झाला. जुन्नरमधील व जुन्नरच्या पश्चिम भागातील कोळी समाजाने मोगलांविरुध्द बंड केले. मोगलांनी आपले सैन्य पाठवून सर्व कोळ्यांना पकडून शिवनेरीवर कैदेत टाकले. त्यातील काहींना ठार मारले. बऱ्याच कोळ्यांना शिवनेरीवर ज्याठिकाणी ठार मारले, त्यास 'कोळी चबुतरा' असे म्हणतात.[२८]

छत्रपती शिवाजी महाराजांनी ३० एप्रिल १६५७ रोजी जुन्नरवर स्वारी केली.[२९] त्यावेळी मोगल सैन्य आदिलशाहीविरुध्दच्या स्वारीत गुंतले असल्याने जुन्नरमधील त्यांचे सैन्यबळ कमी होते.[३०] शिवाजी महाराजांना या आक्रमणामधून ३ लाख सोन्याच्या मोहरा, २०० घोडे व इतर मौल्यवान वस्तू मिळाल्या. इ. स. १६७८ मध्ये मराठ्यांनी शिवनेरी किल्ला जिंकण्यासाठी जुन्नरवर स्वारी केली. जुन्नर शहरास वेढा देऊन रात्रीच्या वेळी मराठ्यांनी शिवनेरीवर हल्ला केला. मराठी सैनिकांमधील ३०० सैनिक दोरीच्या शिड्या आणि फासे यांच्या साहाय्याने किल्ल्याची भिंत ओलांडून आत शिरले. शिवनेरीचा तत्कालीन मोगल किल्लेदार अब्दुल अजिजखान हा अतिशय कुशल अधिकारी होता. त्याने तटावरुन किल्ल्यात आतमध्ये उतरलेल्या मराठी सैनिकांची कत्तल केली. त्याने मराठ्यांना निरोप पाठवला की, ''जोपर्यंत मी किल्लेदार आहे, तोपर्यंत किल्ला जिंकणे शक्य नाही.''[३१] अशाप्रकारे छत्रपती महाराजांना अनुक्रमे १६५० व १६७८ या दोन्हीवेळी शिवनेरी किल्ला जिंकण्यात अपयश आले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात शिवनेरी किल्ला मोगलांच्या ताब्यात होता. शिवनेरी किल्ला अभेद्य ठेवण्यासाठी वारंवार किल्ल्याच्या किल्लेदाराची बदली होत असे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर सैनिकांचा बंदोबस्त कायम असे. शिवनेरी किल्ल्याबरोबर जुन्नर परिसरातील सर्वच किल्ल्यांवर सैनिक, तोफा, धान्य, दारुगोळा मुबलक प्रमाणावर ठेवला जात होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या काळातही शिवनेरी अभेद्य राहिला. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबांचे अहमदनगर येथे निधन झाले. त्यांच्या वारसांमध्ये सत्तेसाठी यादवी सुरु झाली. इ.स. १७०८ मध्ये झुल्फिकारखान मोगलांचा दक्षिणेतील सरदार होता. वऱ्हाड, हैद्राबाद, बिदर, विजापूर व औरंगाबाद या सहा सुभ्यांवरचा कारभार झुल्फिकारखान पाहात असे.[३२] झुल्फिकारखान दिल्ली दरबारात वजीर झाल्यावर त्याचे दक्षिणेत दुर्लक्ष झाले. त्याचा फायदा घेऊन मराठे मोगलांच्या प्रदेशात वारंवार आक्रमणे करीत. झुल्फिकारखानाचा मदतनीस दाऊद खानाने मराठ्यांना मोगली प्रदेशात आक्रमण न करण्याच्या बदल्यात चौथाई व सरदेशमुखी देण्याचे मान्य केले. चौथाई व

सरदेशमुखीच्या सनदेमुळे मराठ्यांना जुन्नर प्रांतामधील जुन्नर, खेड, नारायणगाव व इतर सात गावांचे हक्क मिळाले.[३३] यावरुन शिवनेरीचे मोगलांच्या दृष्टीने किती व्यापक महत्व होते ही बाब लक्षात येते.

पेशवा बाळाजी विश्वनाथाच्या कारकिर्दीत शिवनेरीवर मराठ्यांचा अंमल नव्हता. इ. स. १७२० मध्ये निजामाने पुणे व जुन्नर परिसरावर स्वारी केली. जुन्नर परिसरातील जुन्नर, नारायणगाव, नारायणगड, ओतूर, अवसरी, मंचर, कळंब व उदापूर या गावांना निजामाच्या स्वाऱ्यांची झळ बसली. या ठाण्यांची पुन्हा उभारणी करण्याचे काम पहिल्या बाजीरावाने कृष्णराव नावाच्या मराठी सरदारावर सोपविले.[३४] जुन्नर परिसर पुण्यास जवळ असल्याने जुन्नर व शिवनेरीवरुन पुण्यावर आक्रमण करणे सोपे जाईल ही बाब ओळखून नानासाहेब पेशव्यांनी इ. स. १७५७ मध्ये जुन्नर परगणा आणि शिवनेरी किल्ला काबीज केला. उधो विरेश्वर (वीरेश्वर) चितळे या सरदाराने शिवनेरी किल्ला घेण्यात मोठी कामगिरी बजावली.

जुन्नर परिसरातील सर्व किल्ले आणि प्रदेशामधून गोळा केलेला महसूल शिवनेरी किल्ल्यावर साठविला जात असे. इ.स. १७६४ मध्ये माधवराव पेशव्याने पुण्याचे पोलिसखाते स्वतंत्र केले. स्वतंत्र पोलिस विभागावर कोतवालाची नेमणूक केली. कोतवालाकडे फौजदारी व दिवाणी असे दोन्ही अधिकार दिले. पुणे शहराच्या पोलिस खात्याप्रमाणेच राज्यातील लहान मोठ्या शहरांमध्येही कोतवालांची नियुक्ती केली. जुन्नरची पहिली कोतवाली 'रामचंद्र शिवाजी' यास देण्यात आली.[३५] त्यासाठी वर्षाकाठी रामचंद्र शिवाजीस ३०० रुपये पगार ठरवून दिला होता. या रामचंद्र शिवाजीने शिवनेरी किल्ल्यातील कोळ्यांना कामावरुन कमी केले. हे कोळी किल्ल्याच्या बंदोबस्ताचे काम पाहात असत. आपल्या हक्कांवर गदा आली म्हणून कोळ्यांनी बंड केले. माधवरावाने कोळ्यांचे बंड मोडून काढण्याची जबाबदारी रामचंद्र नारायण यांच्यावर सोपविली होती. त्यास ते अवघड गेले. म्हणून त्याने १५ सप्टेंबर १७६४ रोजी राघोबादादास सदर बंड मोडण्यासाठी विलंब व बंड मोडणे अवघड जात असल्याबद्दलची माहिती मिळविली.[३६] माधवरावाने जुन्नरमधील हे बंड मिटविले. शिवनेरी वरील कोळ्यांचे बंड मिटले मात्र किल्ल्याच्या संरक्षण यंत्रणेतील पारंपरिक

लोकांना डावलून चालणार नाही याचा धडा तत्कालीन राज्यकर्त्यांना मिळाला ही बाब त्यातून दिसून येते.

शिवनेरी किल्ल्याचा कैदखाना प्रसिध्द होता. राज्यात गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना शिवनेरीवरील कैदेत ठेवले जाई. तेथे त्यांची व्यवस्था काळजीपूर्वक केली जात असे. तेथील कैदखाना भक्कम असल्याने कैद्यांना तेथून पळून जाणे अवघड होते. पेशवा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवा यांनी कान्होजी आग्रे यांचे आरमार बुडविले ही बाब मराठ्यांच्या इतिहासात सर्वश्रुत आहे. पेशवे व आंग्रे यांच्यामध्ये झालेल्या विजयदुर्गच्या युध्दात पराभूत होऊन तुळाजी आंग्रे पेशव्यांच्या स्वाधीन झाला. त्यावेळी तुळाजीसमवेत त्याच्या बायका व मुले होती. तुळाजी आंग्रे यास १७५६ पासून १७८६ पर्यंत विविध किल्ल्यांवरील कैदेत ठेवले. त्यापैकी तुळाजीस १७६४ मध्ये शिवनेरी किल्ल्यावर कैदेत ठेवले. तुळाजीस शिवनेरी किल्ल्यावर कैदेत ठेवण्यासाठी नानासाहेबाने शिवनेरीचा फौजदार 'रामचंद्र नारायण' यास लेखी सूचना दिली होती.[३७]

इ.स. १७९५ मध्ये सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर परशुरामभाऊ पटवर्धन यांनी जुन्नरहून दुसऱ्या बाजीरावांना आणून त्यांना पेशवेपद दिले.[३८] इ. स. १८०० पासून मराठी सत्तेला उतरली कळा लागली. ज्या मराठी सरदारांनी पेशव्यांची साथ दिली होती, त्यातील बहुतांश सरदार उत्तरार्धात पेशव्यांच्या विरुध्द गेले. जुन्नर परिसरातील जिवाजी यशवंत हा त्यापैकी एक होता. जिवाजीचा बंदोबस्त करुन शिवनेरी व परिसरातील इतर किल्ल्यांची संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यात आली. परशराम खंडेराव यांच्याकडे शिवनेरीच्या पश्चिमेकडील हडसर किल्ल्याच्या संरक्षणाची व चावंड किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी मोरो बहिरव आणि शिवनेरीच्या संरक्षणाची जबाबदारी रामचंद्र नारायण यांच्याकडे सोपविली. या सर्वांनी जिवाजी यशवंताचा बंदोबस्त करावा असा आदेश दुसऱ्या बाजीरावाने दिला. जिवाजी यशवंत व इतर मराठी बंडखोर सरदारांना शिवनेरी किल्ला व परिसरातील लोकांनी मदत केली होती. त्या सर्वांची वतने जप्त केली. शिवनेरी व इतर किल्ल्यांना बंडखोर सरदारांपासून उपद्रव होऊ नये म्हणून शिवनेरीच्या जवळचे माळशेज आणि

नाणेघाटातील पायवाटा बंद करण्यात आल्या. जुन्नर परिसरातील सर्व किल्ल्यांवरील साधनसामुग्री असलेल्या कोठ्यांची मोजदाद करुन संकटकाळी आवश्यक त्या वस्तूंचा साठा करुन ठेवला.

इ.स. १८११ मध्ये माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन पुण्यात रेसिडेंट म्हणून आला. इ.स. १८१२ पासून दुसरा बाजीराव व इंग्रज यांच्यातील परस्पर संबंध बिघडू लागले. कारण पेशव्यांची सत्ता खच्ची करुन मराठी मुलुख जिंकणे ही मोठी कामगिरी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनवर सोपवली होती. त्याची गुप्तहेर यंत्रणा अतिशय शिस्तबद्ध व मराठी सत्तेच्या मानाने अद्ययावत होती. दुसऱ्या बाजीरावाच्या प्रत्येक हालचालीवर इंग्रजांचे बारकाईने लक्ष होते. इ.स. १८१७ पासून इंग्रजी फौजा बाजीरावाच्या पाठलागावर होत्या. इंग्रजी फौजेचा मारा चुकवित दुसरा बाजीराव शिवनेरी किल्ल्याच्या आश्रयास आला. शिवनेरीहून खेड व पुणे मार्गे तो साताऱ्याकडे गेला. तिसऱ्या इंग्रज मराठा युध्दात इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव केला. दि. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने पुणे शहराचा ताबा घेतला. शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजावरील मराठी राज्याचा झेंडा, पुण्याचा रेसिडेंट माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या आदेशावरुन इंग्रजी अंमलदार रॉबिन्सन याने खाली उतरविला आणि त्या जागी इंग्रजांचे युनियन जॅक निशाण फकडविले.[३९] पुणे या पेशवाईच्या केंद्राचा ताबा इंग्रजांकडे गेला. मराठेशाही संपुष्टात आली. इंग्रजांनी पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशावर कमिशनर म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनची नेमणूक केली. त्याच्याकडे ५०,००० चौरस मैलांचा आणि ४०,००,००० लोकसंख्येचा प्रदेश देण्यात आला. पुणे व जुन्नर हा प्रदेश त्यांच्याकडेच होता.[४०] या पदावर त्याची १ जानेवारी १८१८ रोजी नेमणूक झाली. त्याने ताबडतोब मराठी राज्यातील विशेषत: पुणे परिसरातील पेशव्यांचे किल्ले ताब्यात घेण्यात सुरुवात केली. कारण मराठी राज्य ज्या किल्ल्यांच्या आधाराने उभे राहिले ते किल्ले पाडले तरच मराठी राज्य पूर्णपणे नष्ट होईल याची त्याला खात्री होती त्याने प्रथम सर्व किल्ले ताब्यात घेऊन त्यांची तोडफोड करुन येथे पुन्हा मराठा सैन्य एकत्रित होऊ शकणार नाही, अशी व्यवस्था केली. मराठी राज्याची निर्मिती किल्ल्यांच्या आधारे झाली. या किल्ल्यांच्या

आधारावरच मराठी सत्तेचा उत्कर्ष झाला, मराठी राज्याचा विस्तार झाला. मराठी सत्तेच्या यशाचे मर्म इंग्रजांनी अचूकपणे ओळखून अशा किल्ल्यांना नेस्तनाबूत केल्याशिवाय ब्रिटिश सत्ता आपले पाय रावू शकणार नाही हे जाणून त्यांनी किल्ले उध्वस्त करण्याचा उद्योग सुरु केला. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात इंग्रजांचे हे प्रयत्न यशस्वी झाले.

जुन्नर परिसरातील शिवनेरी, हरिश्चंद्रगड, चावंड, हडसर, जीवधन, कुंजरगड व नारायणगड हे सात किल्ले ब्रिटिशांनी कसे पाडून टाकले याविषयीची अप्रकाशित कागदपत्रे भारत इतिहास संशोधन मंडळामध्ये उपलब्ध आहेत. के. जे. सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव येथील डॉ. चंद्रकांत अभंग यांनी याविषयीचा लेख अप्रकाशित कागदपत्रांच्या सहाय्याने २०१२ च्या जूनमध्ये नवभारत या अंकात लिहिला आहे.[४१] इंग्रजांनी जुन्नर परिसरातील किल्ले पाडण्यासाठी विष्णुसाहेब नावाच्या इंजिनियरची नेमणूक केली. अशाप्रकारे इंग्रजांनी जुन्नर परिसरातील किल्ले पाडून टाकले. मराठी राज्याचा मुख्य आधारच नष्ट केला. मराठ्यांनी किल्ल्यांच्या आश्रयानेच प्रचंड प्रमाणावर युध्दसाहित्य व सैनिक घेऊन आलेल्या औरंगजेबाला २७ वर्षे यशस्वी लढा देऊन मराठी राज्य टिकविले. परंतु औरंगजेबाला मात्र हताशपणे महाराष्ट्रातच अहमदनगर येथे मृत्यू स्वीकारावा लागला. अशी परिस्थिती आपल्यावर येऊ नये या दृष्टिकोनातून ब्रिटिशांनी १८१८ नंतर त्वरित किल्ले पाडले म्हणून आज किल्ल्यांवर वास्तू न दिसता त्यांचे फक्त अवशेष दिसतात.

डॉ. चंद्रकांत अभंग यांनी सर्वप्रथम प्रकाशित केलेल्या या कागदपत्रांमुळे जुन्नर परिसरातील किल्ल्यांच्या इतिहास मजकुरात नव्याने भर पडली आहे. याचे श्रेय डॉ. चंद्रकांत अभंग यांना दिले पाहिजे.[४२] ही सर्व कागदपत्रे प्रबंधाच्या शेवटी परिशिष्ट दोनमध्ये जोडली आहेत.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी मेजर एल्ड्रिज याच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी या किल्ल्यावर २४ एप्रिल १८१८ रोजी हल्ला चढवला व शिवनेरी किल्ला ताब्यात घेतला. अशा प्रकारे शिवनेरी किल्ला व जुन्नर परिसर इंग्रजांच्या ताब्यात गेला व जुन्नरवर इंग्रजी सत्तेचा अंमल सुरु झाला.[४३] इ. स. १८४१ ते १८४८ या काळात

वनाधिकारी डॉ. गिब्सनने चार चिनी कैद्यांकडून गडावर वृक्षारोपण व सुशोभिकरण केले. या काळात मध्य सह्याद्री रेल्वे माळशेज घाटातून गेली असती तर शिवनेरीवर आरोग्यधाम उभारणीची त्याची कल्पना होती.[४४] शिवनेरीच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने वर्ष २००४-२००६ मध्ये शिवनेरी किल्ला पर्यटन क्षेत्र घोषित करुन रु. २१३.०३ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.[४५] शिवनेरी किल्ला सध्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारित आहे. महाराष्ट्र राज्यातील समृध्द वारसा जपण्यासाठी राज्यातील ३७१ संरक्षित स्मारकांचे जतन व दुरुस्ती कामाकरिता वाढीव प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. किल्ले मालिका योजनेतील लोहगड, राजमाची व शिवनेरी या राष्ट्रीय संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्ती करिता भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांना निधी उपलब्ध झाला आहे.[४६] सन २०१५-१६ या वर्षासाठी शिवनेरी किल्ला परिसर विकास कामांसाठी ५.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.[४७]

**लोहगड**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यामध्ये लोहगड हा गिरीदुर्ग आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १०४० मी. आहे. पवनमावळ व नाणेमावळ यांच्या बेचक्यात लोहगड व विसापूर ही दुर्गजोडी वसलेली आहे. कोकण व देश यांच्यामधील घाटवाटांवर नजर ठेवण्यासाठी या दोन दुर्गांची निर्मिती करण्यात आली.[४८] मावळ परिसरावर राज्य करणाऱ्या कोणत्याही राज्यकर्त्यांना हे दोन्ही किल्ले खूप महत्त्वाचे होते कारण बोरघाटामधून जाणाऱ्या व्यापारी मार्गावर नजर व नियंत्रण ठेवणे या किल्ल्यांव्दारे शक्य होते.[४९] लोहगड किल्ला प्राचीन तसेच मध्ययुगीन इतिहासाचा साक्षीदार असून प्राचीन कालखंडातील सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव अशा सर्व राजवंशांपासून मध्ययुगापर्यंत अनेक राजवंशांची सत्ता लोहगडावर होती असे आढळून येते. मध्ययुगात लोहगड किल्ल्याचे महत्त्व तत्कालीन अनेक किल्ल्यांमधील राजधानीच्या किल्ल्यासारखे असल्याचे आढळून येते. प्र. के. घाणेकर यांनी 'बुलंद बेलाग नि बळकट किल्ले लोहगड हा शिवछत्रपतींनी निर्मिलेल्या स्वराज्याचा एक पोलादी आधारस्तंभ होता'[५०] असे लोहगड किल्ल्याचे वर्णन केले

आहे. लोहगड किल्ला मध्ययुगातील 'पवन, आंदर, नाणे' या तिन्ही मावळांतील सर्वात महत्त्वपूर्ण किल्ला मानला गेल्याचे आढळून येते. किल्ल्याचे नाव 'लोह' धातूशी जोडले गेले. लोह हा सर्वात कठीण धातू असल्याने लोहगड किल्ल्याची अभेद्यता दर्शविण्यासाठी 'लोह' हे विशेषण जोडले गेले असून त्याचे लोहगड असे नामकरण झाले असल्याची शक्यता आहे.

लोहगड किल्ल्याच्या जवळच असलेल्या हीनयान बौद्धांच्या भाजे व बेडसे लेण्यांवरुन हा किल्ला फार प्राचीन काळातील असल्याचे स्पष्ट होते. या किल्ल्यावर सातवाहन, राष्ट्रकूट व चालुक्य इ. राजवटी होत्या असे तेथील अवशेषांवरुन दिसून येते. परंतु लोहगड किल्ल्याचा सलग इतिहास सापडत नाही.

मध्ययुगीन काळात निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमदने सन १४९१ मध्ये लोहगड ताब्यात घेतला. १६३६ पर्यंत पवन मावळचा मुलूख निजामशहाच्या ताब्यात होता. हा किल्ला निजामशाहीत महत्त्वाचा होता. हुसेन निजामशहाचा वकील व पेशवा मौलाना इनायतुल्लाह, मूर्तजा निजामशहा (पहिला) चा धाकटा भाऊ शहाजादा बुरहान, बुरहान निजामशहाचा मुलगा इस्माईल, इस्माईलचा भाऊ इब्राहिम, चंगीजखान, तुफालखान, तुफालखानचा मुलगा समशेर उलमुल्क, तुफालखानाची इतर मुले, एलिचपूरच्या इमादशाही घराण्यातील काही मंडळींना वेगवेगळ्या काळात लोहगडावर कैदेत ठेवण्यात आले होते. यावरुन लोहगडाचा वापर राजकैदी ठेवण्यासाठी होत होता असे म्हणता येते. त्यातील तुफालखान लोहगडावरच मरण पावला. कैदेतल्या शहाजादा बुरहानशहाने किल्लेदार जुजारखानाच्या मदतीने बंड केले. मात्र मुर्तजा निजामशहाने हे बंड यशस्वीपणे मोडून काढले. त्यामुळे निजामशाहीत राज्यक्रांती झाली नाही. या बुरहान निजामशहाच्या मृत्यूनंतर लोहगडावर कैदेत असलेला इब्राहिम पुढे निजामशहा म्हणून सत्तेवर आला.[५१] निजामशाहीच्या ऱ्हासानंतर लोहगड किल्ला आदिलशाहीच्या अंमलाखाली आला. त्यानंतर १६३६ ते १६४७ पर्यंत लोहगड किल्ला आदिलशहाच्या ताब्यात होता. पुढे लवकरच शिवाजी महाराजांनी लोहगड किल्ला इसवी सन १६४८ मध्य जिंकून तो स्वराज्यात आणला.[५२] शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर

महाराष्ट्रातील किल्ले ताब्यात घेण्यास सुरुवात केली. त्यांनी १६५७-५८ मध्ये उत्तर कोकणात मोहिम काढली. त्यामध्ये त्यांनी निजामशाहीच्या अंमलाखालचे माहुली व लोहगड किल्ले ताब्यात घेऊन त्यांची डागडुजी करुन त्यामध्ये रसदेचा व जीवनावश्यक साधनसामुग्रीचा साठा करुन ते युध्दसंपन्न बनवले.[५३]

६ ते ९ जानेवारी १६६४ रोजी शिवाजी महाराजांनी मुघलांच्या ताब्यातील सुरत या श्रीमंत व धनसंपन्न शहराची लूट केली. त्या लुटीतील धनसंपत्ती नेताजी पालकरच्या अधिपत्याखाली लोहगड किल्ल्यावर आणून ठेवली.[५४] इ. स. १६६५ च्या एप्रिल महिन्यात मिर्झा राजा जयसिंग व दिलेरखान यांनी स्वराज्यातील पुरंदर व वज्रगड या किल्यांना वेढा घातला होता. त्यावेळी त्यांनी जाळपोळ करण्यासाठी दाऊदखान, कुतुबुद्दीन खान, राज रायसिंह व मिर्झाचा नोकर अचलसिंह या अधिकाऱ्यांना पाठवून लोहगड, ईसागड, तुंग, तिकोणा या दुर्गांच्या पायथ्याशी असणारी गावे जाळून लुटून फस्त करावयास सांगितले व तसे करुन हे सर्व अधिकारी लष्करी तळावर परतले, असा उल्लेख आलमगीरनाम्यात आलेला आहे.[५५]

पुरंदरला वेढा घातलेला असताना मिर्झाराजे जयसिंगाने दाऊदखान, राजा रायसिंह, कुतुबुद्दीन खान, अचलसिंह यांना ३००० घोडदळासह लोहगडाच्या नाकेबंदीसाठी पाठविले. त्यावेळी लोहगडावर मराठ्यांकडे ५०० घोडदळ व १००० पायदळ होते. या दोन्ही सैन्याचा निकराचा सामना ५ मे १६६५ रोजी लोहगडाच्या पायथ्याशी झाला. त्यात मराठ्यांना हार पत्करावी लागली. त्यानंतर मुघल सैनिकांनी किल्ल्याच्या पायथ्याची गावे जाळून बेचिराख केली.[५६]

इ.स. १६६५ मध्ये शिवाजी महाराज आणि मिर्झाराजा जयसिंग यांच्यामध्ये पुरंदरचा तह झाला. त्या तहानुसार शिवाजी महाराजांना स्वराज्यातील ४० किल्ल्यांपैकी २३ किल्ले मुघलांना द्यावे लागले. त्यामध्ये लोहगड किल्ल्याचा समावेश होता. ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी मालुसरे याने सिंहगड किल्ला जिंकून घेतला. त्यात तानाजी मालुसरे धारातीर्थी पडला. त्यानंतर शिवाजी महाराजांनी मुघलांबरोबर केलेला तह मोडला आणि पुरंदरच्या तहानुसार मुघलांना दिलेले २३ किल्ले जिंकून घेण्याची मोहिम हाती घेतली. त्यानुसार मावळ तालुक्यातील मुघलांना दिलेले

लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना हे चारही किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकून पुन्हा स्वराज्याला जोडले. लोहगड किल्ला १६७० मध्ये मराठ्यांनी माळा व शिड्या लावून पुन्हा स्वराज्यात आणला.[५७]

शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या काळात लोहगड किल्ल्याचे फारसे उल्लेख येत नाहीत. परंतु आसपासचा प्रदेश समकाळात मराठ्यांकडे असल्याने लोहगड मराठ्यांकडे असण्याचा संभव आहे. संभाजी महाराजांच्या अटकेनंतर व बलिदानानंतर स्वत: औरंगजेब बादशहाने व मुघलांच्या सर्वच फौजेने मराठ्यांचे किल्ले घेण्याची मोठी मोहिम आरंभली. जेधे शकावलीमध्ये ''ये वर्षी कुल गड मोगले घेतले असा उल्लेख येतो.[५८]

स्वराज्यातील किल्ल्यांची दुरुस्ती करुन किल्ल्यांची दुर्गमता, अभेद्यता वाढवण्यासाठी इ.स. १६७१-७२ मध्ये शिवाजी महाराजांनी गडांच्या डागडुजीचे एक अंदाजपत्रक तयार करवून घेतले. यात लोहगडासाठी ५००० होनांची तरतूद केली [५९] व लोहगड किल्ल्यास अधिक दुर्गम बनवले गेल्याचे आढळते.

लोहगड किल्ला शिवाजी महाराज हयात असेपर्यंत स्वराज्यामध्ये होता. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांनी स्वराज्याची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन मुघलांच्या बादशहास व त्याच्या प्रचंड सैन्यास अत्यंत आत्मविश्वासाने तोंड देण्यास सुरुवात केली. खुद्द औरंगजेब बादशहा मराठा साम्राज्य काबीज करण्यासाठी दक्षिणेत पूर्ण शक्तीनिशी आला होता. त्याने एकाच वेळी अनेक आघाड्यांवर मोहिम उघडून आक्रमणे सुरु केली होती. अशा अटीतटीच्या वेळी लोहगडाचा कारभार मोरोपंत पिंगळे घराण्याकडे होता. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये प्रत्येक किल्ल्यावर किती सैन्य आहे याची यादी तयार केली होती. या यादीनुसार लोहगडावर बारा हजार घोडदळ तैनात होते. यावरुन लोहगडाचे संरक्षण दृष्ट्या मराठी राज्यात महत्त्वाचे स्थान होते असे म्हणता येते.

इ.स. १६८२ च्या डिसेंबर महिन्यामध्ये जुन्नरच्या शिवनेरी किल्ल्याचा किल्लेदार शहाबुद्दीन खान चाकणमध्ये भेटीस आला. कारण चाकणचा किल्लेदार जानबाजखान आजारी होता. मराठ्यांनी चाकण परिसरात मोगलांशी संघर्ष

चालविला होता. मराठ्यांची फौज लोहगडाच्या बाजूस मुक्कामी होती. म्हणून शहाबुद्दीनने लोहगडावर आक्रमण केले. त्या ठिकाणी मोठी चकमक झाली. त्या चकमकीमध्ये साठ मराठ्यांची कत्तल झाली. मराठ्यांनी लोहगडावरुन विसापूरच्या किल्ल्याकडे माघार घेतली.

मार्च १६८९ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांना विश्वासघाताने पकडण्यात आले. औरंगजेब बादशहाच्या आदेशाने संभाजी राजांना वढू-तुळापूरच्या छावणीत ठार मारण्यात आले. त्यानंतरच्या मराठा स्वातंत्र्ययुध्दाच्या कालावधीत औरंगजेबाने मराठ्यांच्या ताब्यातील किल्ले जिंकून घेण्याचा सपाटाच लावला. त्यामध्ये राजगड, तोरणा, पुरंदर, सिंहगड, रोहिडा या किल्ल्यांबरोबर लोहगडचाही समावेश होता. शहाजादा आझम व गाजिउद्दीन फिरोजजंग यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे बहुतांशी किल्ले मोगलांनी ताब्यात घेतले. पुढची पंधरा वर्षे लोहगड किल्ला मोगलांच्याच ताब्यात राहिला. मोगलांनी मराठ्यांचे अनेक महत्त्वाचे किल्ले जिंकून ताब्यात घेतल्यामुळे मराठ्यांना देशावर लष्करी हालचाली करण्यात मर्यादा पडू लागल्या. त्यामुळे मोगलांच्या ताब्यातील किल्ले परत मिळवणे गरजेचे बनले. त्यामुळे मराठ्यांनी लोहगड किल्ला ताब्यात घेण्याचा साहसी प्रयत्न केला. ७ ऑगस्ट १६९९ रोजी मराठ्यांनी पावसाळ्याच्या एका रात्री लोहगड जिंकण्यासाठी ३०० सैनिकांसह लोहगडाच्या तटास माळा लावून किल्यात रातोरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र किल्ल्यावरील तोफखान्याची माणसे सावध झाली. त्यांनी मराठ्यांनी लावलेल्या माळा कापून टाकल्या. किल्लेदार अटलसिंहाच्या जागरुकतेमुळे मराठ्यांना किल्ला जिंकता आला नाही. लोहगडाच्या भौगोलिक वैशिष्ट्यामुळे त्याला लष्करीदृष्ट्या महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. औरंगजेब बादशहा आपल्या सैन्यासह वाकिनखेड्याच्या दिशेने जात असल्याची बातमी मराठ्यांना समजली. त्यांनी या संधीचा अचूक फायदा घेऊन लोहगड हस्तगत करण्याची योजना आखली. त्यानुसार १६ ते १८ डिसेंबर १७०४ च्या दरम्यान लोहगडाला वेढा घालून चारही बाजूंनी माळा लावून सैन्य गडात उतरविले. त्यावेळी झालेल्या चकमकीत किल्लेदार सेनापतचा पराभव करुन त्याला कैद केले व किल्ला जिंकून घेतला.[६०]

इ.स. १७०७ साली मोगल बादशहा औरंगजेब याचा मृत्यू अहमदनगर येथे झाला. त्याचा मृत्यूनंतर मोगलांच्या ताब्यातील बहुतांश किल्ले मराठ्यांनी परत मिळवले. लोहगड किल्ल्याचा ताबा महाराणी ताराबाईंशी एकनिष्ठ असणाऱ्या कान्होजी आंग्रे यांच्याकडे १७१३ साली आला.[६१] कान्होजी आंग्रेने आपल्या पराक्रमाच्या जोरावर कोकणातील व देशावरील अनेक किल्ले ताब्यात घेऊन आपले स्थान महत्त्वाचे बनवले होते. हा कान्होजी महाराणी ताराबाईंशी एकनिष्ठ असल्याने छत्रपती शाहूंच्या विरोधात होता. छत्रपती शाहू महाराजांनी त्याचा बिमोड करण्यासाठी निळो बल्लाळ, पेशवे बहिरोपंत पिंगळे यांना सुसज्ज सैन्यासह रवाना केले. परंतु कान्होजी आंग्रे याने त्यांचा सपशेल पराभव करुन बहिरोपंत पेशवे यांना कैद केले. व त्यांना लोहगडाच्या कैदेत ठेवले.[६२] पेशव्यासारखी महत्त्वाची व्यक्ती कैदेत गेल्यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांना फौजेसह लोहगडाकडे पाठविले. कान्होजी आंग्रेसारखी महत्त्वाची व पराक्रमी व्यक्ती आपल्या स्वराज्याला उपयुक्त ठरेल या हेतूने कान्होजीची समजूत काढण्यासाठी व आपल्या पक्षात आणण्यासाठी बाळाजी विश्वनाथची छत्रपती शाहूंनी लोहगडाकडे रवानगी केली. बाळाजी विश्वनाथ व कान्होजी आंग्रे यांचा ब्रम्हेंद्रस्वामींवरील भक्तीमुळे एकमेकांशी परिचय व घरोबा होता. बाळाजी विश्वनाथने कान्होजीला पत्र पाठविले व भेट घ्यायला गेला. भेटीमध्ये दोघांत चर्चा झाली. त्यांच्यामध्ये २८ फेब्रुवारी १७१४ रोजी तह झाला. त्या तहानुसार बाळाजीने सरखेल पद कान्होजी आंग्रेकडे कायम राहील असे आश्वासन छत्रपती शाहू महाराजांच्या वतीने दिले. त्याबद्दल्यात राजमाची हा डोंगरी किल्ला स्वत:कडे ठेवून लोहगड, घनगड, तुंग, तिकोना या किल्ल्यांच्या चिठ्ठ्या देऊन कान्होजीने हे किल्ले छत्रपती शाहूंना दिले. या वेळी बाळाजी विश्वनाथने आपली मुत्सद्देगिरी पणाला लावून बहिरोपंत पेशवे यांची सुटका लोहगडावरुन केली. यात महादजीपंत चासकर जोशी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. हा तह झाल्याबरोबर लोहगडासारखा महत्त्वाचा किल्ला छत्रपती शाहूंच्या राज्यात समाविष्ट झाला. बाळाजी विश्वनाथने लोहगडाची सबनिशी बाळाजी उर्फ रामचंद्रपंत भानू (नाना फडणिसांचे आजोबा) यांना दिली.

इ.स. १७५१ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी महाराणी ताराबाईंच्या पक्षातील दमाजी गायकवाड, त्यांची मुले व पुतणे यांना लोहगडावर कैदेत ठेवले होते. इ.स. १७६३ मध्ये निजामाने पुण्यावर स्वारी केली. तेव्हा नाना फडणिसांनी पुण्याजवळच्या लोहगडाचा आश्रय घेतला. त्यांनी त्यावेळी हजारो पुणेकरांना लोहगडावर आश्रय देऊन त्यांच्या प्राणांचे व संपत्तीचे रक्षण केले.[६३]

इ.स. १७७० साली नाना फडणिस यांच्या आदेशानुसार जावजी बोंबले या कोळ्याने लोहगड किल्ला ताब्यात घेतला. या जावजी बोंबलेबद्दल इंग्रजांनी लिहून ठेवले आहे की, ***"This man who was a famous outlaw had some capital rocket men and advancing one of them to a favourable position pointed out to him the direction he was to fire. One of the rockets fell among some powder close to door of the magazine and caused such an explosion that the garrison were forced to Surrender.***[६४] तेव्हापासून लोहगड पेशवाईच्या अखेरच्या काळापर्यंत नाना फडणिसांच्या ताब्यात होता.

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात नाना फडणिस पेशव्यांचे दिवाण असताना लोहगडाचा कारभार पाहण्यासाठी धोडोपंत निजसुरेंना नेमले व स्वत:ची सर्व संपत्ती लोहगडावर नेऊन ठेवली. इ. स. १८०० साली नाना फडणिसांचा मृत्यू झाला. त्यांनतर त्यांची नववी पत्नी जिऊबाई लोहगडावर मुक्कामाला गेली. दुसरा बाजीराव व धोंडोपंत यांच्यातील वादामध्ये जनरल वेलस्ली याने मध्यस्थी केली. धोंडोपंतांनी पेशव्यांशी इमानाने वागावे व पेशव्यांनी लोहगडाचा ताबा धोंडोपंताकडेच ठेवावा असा करार झाला. त्यानुसार इ. स. १८०३ पर्यंत किल्ला धोंडोपंताकडेच होता.[६५] त्यानंतर जनरल वेलस्लीने धोडोपंताकडून हा किल्ला जिंकून दुसऱ्या बाजीरावाकडे दिला.

लोहगड किल्ल्याचे अस्तित्व विसापूर किल्ल्यावर अवलंबून व विसापूर किल्ल्याचे अस्तित्व लोहगड किल्ल्यावर अवलंबून असे कायमचे समीकरण असल्याचे आढळून येते. दोन्ही पैकी एखादा किल्ला शत्रूसैन्याच्या हाती पडला तर दुसरा किल्ला सांभाळणे अशक्य बाब होती. म्हणून इंग्रजांनी कर्नल प्रॉथरच्या

नेतृत्वाखाली मोठे सैन्य देऊन त्यांना लोहगडाकडे पाठवले. दि. ४ मार्च १८१८ रोजी इंग्रजांचे सैन्य लोहगडाजवळ येऊन पोहोचले परंतु त्या सैन्याने थेट लोहगडावर आक्रमण न करता त्याच्यापेक्षा उंचीने व आकाराने मोठ्या असलेल्या विसापूरच्या किल्ल्याचा ताबा घेतला. विसापूरसारख्या भव्य, मोठा किल्ला इंग्रजांनी ताब्यात घेतलेले पाहून दुसऱ्याच दिवशी लोहगडावर असणारे सर्व मराठी सैन्य किल्ला सोडून पळून गेले. त्यामुळे अगदी विनासायास लोहगड किल्ला इंग्रजांना मिळाला. पुढे १८४५ पर्यंत ब्रिटिशांच्या सैन्याची एक तुकडी लोहगड किल्ल्यावर तैनात होती.[६६] परंतु कालांतराने ती काढून घेण्यात आली. विसापूरच्या किल्ल्यावरुन लोहगड किल्ल्यावर ताबा ठेवता येईल म्हणून इंग्रजांनी लोहगडाचे चार दरवाजे आणि इतर वास्तू व तटबंदी यांना धक्का पोचवला नाही. इ. स. १८६२ साली प्रसिध्द झालेल्या एका अहवालात लोहगडाचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आढळते. ''लोहगड किल्ला हा एक अत्यंत मजबूत किल्ला असून त्याच्या भिंती व प्रवेशव्दारांच्या किरकोळ दुरुस्तीची आणि पुरेशा पाण्याच्या उपलब्धतेची आवश्यकता आहे. मग हा किल्ला पाचशे माणसांना रोखून धरु शकतो.'[६७]

अशा प्रकारे मध्ययुगीन काळातील लोहगड किल्ल्याचे स्थान व महत्त्व यांमुळे हा किल्ला हस्तगत करण्यासाठी नेहमीच राज्यकर्त्यांमध्ये संघर्ष झालेला दिसून येतो. मध्ययुगीन काळात मावळ तालुक्यात मुबलक पाणी, धान्य व पशुधनामुळे शेती व व्यापार यांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. तसेच देशावर जाणारे घाट येथूनच असल्याने जकातीचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर मिळत होते. त्यामुळे किल्ला आपल्याच ताब्यात रहावा यासाठी सातत्याने राज्यकर्त्यांमध्ये प्रयत्न झालेले दिसून येतात. लोहगड किल्ल्याचा ताबा सध्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडे असून त्याची निगराणी राखण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

**विसापूर**

विसापूर किल्ल्यास स्वतंत्र असा इतिहास फार कमी आहे. लोहगड आणि विसापूर या दुर्गांच्या जोडीचे अस्तित्व एकमेकांवर अवलंबून असल्याचे दिसून येते. या दोन दुर्गांमध्ये लोहगड हा मुख्य दुर्ग आणि त्याला बळकट व संरक्षित

करण्यासाठी शेजारचा विसापूर दुर्ग अशी साधारणपणे परिस्थिती दिसून येते. कारण विसापूर दुर्ग हा लोहगडापेक्षा आकाराने भव्य आणि उंचीनेही अधिक आहे.

विसापूर किल्ल्याच्या इतिहासाची सुरुवात प्राचीन काळापासून होते. प्राचीन कालखंडात लोहगड व विसापूर यांच्या पर्वतास 'मारकूट पर्वत' असे संबोधले जात असल्याचे बेडसे येथील लेण्यातील 'मारकूट पर्वतावरील गोभूती' या विशेषणावरुन दिसून येते. भाजे लेणी मावळ तालुक्यातील प्रथम कोरल्या गेलेल्या लेणी आहेत.[६८] भाजे लेणी विसापूर किल्ल्याच्या पर्वतात एका मोठ्या कातळकड्यात कोरलेली आढळते. महाराष्ट्राच्या इतिहासात सातवाहन घराण्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. सातवाहन घराण्यातील राजांनी उदारपणे कलेला आश्रय देऊन अनेक लेणी, पोढी, विहिर, स्तूप, चैत्यगृहे यांची निर्मिती केली. त्यामध्ये मावळ तालुक्यातील बेडसे लेणी व भाजे लेणी सुप्रसिध्द आहेत. भाजे व बेडसे लेणी तसेच लोहगड व विसापूर हे किल्ले एकाच पर्वतावर आहेत. या परिसरातील विहार व लेणी यावरुन प्राचीन काळी या परिसरात बौध्द भिक्षूंचा वावर होता असे म्हणता येते. त्यामुळे विसापूर किल्ला हा प्राचीन काळातील असावा असे म्हणता येते. परंतु विसापूरचा किल्ला नेमका केव्हा व कोणी बांधला हे सबळ पुराव्याच्या अभावी आज आपणांस समजू शकत नाही. किल्ल्यावरील पहिल्या प्रवेशव्दाराच्या काहीच अंतरावर हनुमानाची मूर्ती कोरलेली असून मोठ्या आकारात दोन 'गणेश व कमळ कोठारे' आहेत. या कोठारांच्या समोर कातळात पाच टाक्यांचा समूह आहे. यातील चार टाक्यांवर ब्राह्मी लिपीत शिलालेख कोरलेला आहे तर एकावर धम्मचक्र आणि त्रिरत्न कोरलेले आहे. हा सातवाहनकालीन अव्दितीय पुरावा विसापूर किल्ल्यावर आढळतो. हे सर्व शिलालेख इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील आहेत. संपूर्ण विसापूरावर पाण्याच्या टाक्यांवर एकूण सहा शिलालेख आहेत. त्यातील एका लेखात 'सातवाहन राजा वासिष्ठीपुत्र पुळुमावी याच्या कारकिर्दीतील पंचविसाव्या वर्षी' असा उल्लेख आहे. या सर्व लेखांत पुळुमावीच्या महारथी विण्हुदत्तचा उल्लेख असून एका लेखात मुगुदपालित या लेखकाचाही उल्लेख सापडतो.[६९]

विसापूर किल्ल्यावरील पोढीवर 'धर्मचक्र व त्रिरत्न' ही वैशिष्टयपूर्ण चिन्हे आहेत. हीनयान पंथामध्ये भगवान बुध्दांची मूर्ती चित्रित न करता धर्मचक्राचा उपयोग करीत असत. गौतम बुध्द, बौध्द धर्म, संघ यांचे द्योतक असलेले त्रिरत्न या टाक्यांवर असल्यामुळे विसापूर किल्ल्याचा इतिहास इसवी सन पूर्वकाळापर्यंत मागे जात असल्याचे दिसून येते.[७०]

मध्ययुगीन कालखंडात विसापूर किल्ल्याचा उपयोग त्याच्या भव्यतेमुळे मोठ्या प्रमाणात शिबंदी राहील अशा पध्दतीने केला गेल्याचे दिसून येते. विसापूर किल्ल्याला बऱ्याचदा ईसापूर, ईसागड, संबळगड या नावनेही ओळखले गेल्याचे दिसते. लोहगड किल्ल्याप्रमाणे विसापूर किल्ला कोणी व केव्हा बांधला याबद्दल काहीच माहिती उपलब्ध नाही. परंतु ***Gazetteer of the Bombay Presidency vol. XVII Part III, Poona***[७१] मध्ये व *मराठी विश्वकोश* खंड १६ मध्ये आलेल्या माहितीनुसार हा किल्ला बाळाजी विश्वनाथ भट पेशवे यांनी बांधला [७२] असा उल्लेख आला आहे. परंतु हे दोन्ही उल्लेख चुकीचे आहेत. कारण विसापूर किल्ल्याचा उल्लेख १६६५ साली '*आलमगीरनाम्यात*' आलेला आहे. मिर्झाराजा जयसिंह हा पुरंदर-वज्रगडास वेढा टाकून बसलेला असताना त्याने आपल्या अधिकाऱ्यांस लोहगड, विसापूर (ईसागड), तुंग, तिकोना या किल्ल्यांच्या पायथ्याशी असलेल्या गावांना जाळून लुटून फस्त करायला सांगितले आणि त्याच्या अधिकाऱ्यांनी हे काम चोख बजावले. या जाळपोळीच्या मोहिमेत दाऊदखान, कुतुबुद्दीनखान व राजा राजसिंह व राजा रायसिंहाचा नोकर अचलसिंह हे होते. या मोहिमेनंतर हे सर्व अधिकारी लष्करी तळावर परतले असा ईसागडचा पहिला उल्लेख आलमगीरनाम्यात येतो, यातच जेव्हा पुरंदर गडाचा ताबा मुघल सैन्याने घेतला, त्याच दिवशी शिवाजी महाराजांनी लोहगड, ईसागड, तपकी, तिकोना, रोहिडा असे आणखी पाच किल्ले मुघलांच्या हाती दिले.[७३] असाही उल्लेख येतो. तसेच शिवाजी महाराजांचा मिर्झाराजा जयसिंहाच्या सोबत झालेल्या पुरंदर तहात १४ जून १६६५ रोजी जे तेवीस किल्ले मुघलांना द्यावे लागले त्यास ईसागडचे नाव आले आहे. यावरुन हा किल्ला इ.स. १६६५ पूर्वी नक्की अस्तित्वात होता असे ठामपणे सांगता येते.

विसापूर किल्ल्याचे नाव लिखित स्वरुपात सर्वप्रथम १६६५ साली येत असल्याने बऱ्याच इतिहास संशोधकांनी हा किल्ला शिवाजी महाराजांनी बांधला आहे असे मत मांडले आहे. परंतु याला निश्चित असा ठोस सबळ पुरावा नाही. विसापूर किल्ल्याचा उल्लेख बहमनी राजवटीच्या काळात आलेला नाही. निजामशाहीच्या काळात कोणत्याच ऐतिहासिक साधनामधून या किल्ल्याचा उल्लेख येत नाही. त्यामुळे काही संशोधकांच्या मते या किल्ल्याची निर्मिती शिवाजी महाराजांनी केली असे आहे.[७४] परंतु ही शक्यता फार कमी वाटते कारण विसापूर किल्ल्याचा भव्य विस्तीर्ण परिसर, मोठी तटबंदी, ८३ पाण्याच्या टाक्या बांधून काढणे व त्यासाठी एवढा वेळ एखाद्या किल्ल्याच्या बांधणीसाठी व्यतित करणे शक्य नव्हते. शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत प्रतापगड, रायगड, राजगड, सिंधुदुर्ग, खांदेरी यासारखे निवडक किल्ले बांधून काढले आणि बहुतांशी इतर सर्व किल्ले जिंकून घेणे व त्याची डागडुजी करणे याला शिवाजी महाराजांनी प्राधान्य दिले व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे विसापूर किल्ल्याची निर्मिती बहमनी साम्राज्याच्या काळात किंवा विजापूरच्या आदिलशहाच्या काळात झाली असण्याची शक्यता आहे. हा किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकून स्वराज्यात आणला असावा असे म्हणता येते.

मिर्झाराजा जयसिंहाशी झालेल्या पुरंदरच्या तहानुसार शिवाजी महाराजांनी १६६५ मध्ये जे २३ किल्ले दिले, त्यात ईसागड या नावाने विसापूर किल्ला होता. पुढे १६७० मध्ये त्यांनी हा तह मोडून जे किल्ले पुन्हा जिंकून घेतले त्यात विसापूर किल्ल्याचे नांव आढळून येत नाही. तसेच इ. स. १६७०-७१ मध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्यामधील किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी किंवा नवीन वास्तू उभारण्यासाठी जे अंदाजपत्रक तयार केले त्यातही विसापूर किल्ल्याचा उल्लेख दिसून येत नाही. लोहगड किल्ल्यापेक्षा पाच पटीने मोठे क्षेत्रफळ व विस्तीर्ण माथा व लोहगड किल्ल्यापेक्षा पाण्याची व्यवस्था अधिक मोठ्या प्रमाणात असतानाही लोहगड किल्ल्याएवढे राजकीय महत्त्व विसापूर किल्ल्यास प्राप्त झालेले दिसून येत नाही.

शिवाजी महाराज ह्यात असेपर्यंत विसापूर किल्ला स्वराज्यामध्ये समाविष्ट असावा अशी शक्यता गृहीत धरावी लागते. कारण १६६५ नंतर विसापूरचा उल्लेख कोणत्याही कागदपत्रांत आढळत नाही. तसेच पुढे संभाजी महाराजांच्या काळातही ईसागड किंवा विसापूरचा किल्ला अशी नोंद कोठेही आढळून येत नाही. इ.स. १६८९ मध्ये संभाजी महाराजांच्या झालेल्या निधनानंतर राजाराम महाराजांना जवळजवळ सात वर्षे तामिळनाडूमधील जिंजी किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला. त्यादरम्यान मुघलांनी मराठ्यांचे किल्ले ताब्यात घेण्यास जोरदार प्रारंभ केला. अल्पावधीत मराठ्यांचे बहुतांशी किल्ले मुघलांनी आपल्या ताब्यात घेतले. जेधे शकावलीत 'हे वर्षी कुल गड मोगले घेतले'[७५] अशी नोंद आली आहे. या मोहिमेत मुघलांनी मराठ्यांच्या राजगड, रायगड, प्रतापगड, तोरणा, सिंहगड, पुरंदर, लोहगड अशा महत्त्वाच्या किल्ल्यांचा कब्जा घेतला. त्या मोहिमेत लोहगडजवळचा विसापूर किल्ला मुघलांनी घेतला असण्याची शक्यता आहे. परंतु तसा सबळ पुरावा मिळालेला नाही. पुन्हा विसापूर किल्ला स्वराज्यात कधी व कोणी आणला हे पुराव्याअभावी सांगता येत नाही.

औरंगजेब बादशहा हयात असेपर्यंत मराठ्यांचे स्वराज्यातील किल्ले मुघलांनी घेतल्याचे दिसते. इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. १७०९ मध्ये विसापूरचा किल्ला बेवसाऊ बनल्याचा उल्लेख मिळतो. परंतु लवकरच तो वसाऊ बनलेला असावा कारण 'पूर्वी लोहगड, राजमाची, दोन किल्ले याचा मसाला रयतेस होता. त्याखाली रयत आजुदा असता हल्ली विसापूर जहाला वसला. त्याने तो त्राहे म्हणविले, येसा प्रजेवर ईश्वरशोभ... विसापूरकर वाडेने जातात. त्या पादिलशी नाहक इजत (हुज्जत) घालतात.'[७६] असा उल्लेख त्याच वर्षीच्या दुसऱ्या एका पत्रात आढळतो.

संभाजी राजेंचे पुत्र छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यात मावळ तालुक्यातील विसापूर किल्ला होता. छत्रपती शाहू महाराज व कान्होजी आंग्रे यांच्यामध्ये २८ फेब्रुवारी १७१४ रोजी एक तह झाला. त्या तहानुसार विसापूर किल्ल्याचा ताबा छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे आला. त्यानंतर तो पेशव्यांकडे गेला असण्याची शक्यता आहे. पुढे बारभाईंनी राघोबादादाला पेशवेपद मिळवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या सखाराम हरी गुप्ते यांना घनगडावर कैदेत ठेवले.

त्यावेळी घनगडाच्या माजी कारखानीसाने म्हणजे रामचंद्र गोविंद याने सखारामला कैदेतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यात तो अयशस्वी झाला. बारभाईंनी त्याला पकडून विसापूर किल्ल्यावर कैदेत ठेवले. तुळाजी आंग्रेचा मुलगा काही दिवस विसापूर किल्ल्यावर कैदेत होता. परंतु तो पळून जाण्यास यशस्वी झाला. तुळाजी आंग्रे देखील काही काळ विसापूर किल्ल्यावर कैदेत होते.[७७]

इ.स. १७५३-५४ मध्ये सरदार दुर्गाजी विसापूर किल्ल्याचा हवालदार असताना एक पत्र सापडते त्यात ''येवजी लोहट हवालदार किल्ले विसापूर किल्ल्यावर दुखणेयाची साथी येऊन शेसव्वाशे माणूस दुखणाईत पडले. पंचवीस माणूस मेले. उपाय केला, पण गुण येत नाही. सर्वांचे मते अद्भुत शांत करावे.''[७८] असा उल्लेख आढळतो. यावरुन किल्ल्यातील सैनिकांच्या जिविताचे रक्षण करण्यासाठी महत्व दिले जात होते असे दिसते. त्यामागे जरी अंधश्रध्दा असली तरी मनुष्यहानी होऊ नये अशी भूमिका असल्याचे आढळते.

इंग्रज आणि दुसरा बाजीराव पेशवा यांच्यात वाद सुरु झाला. त्यानंतर १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठ्यांचे किल्ले वेगाने हस्तगत करण्याची मोहिम आखली. १० मे १८१८ रोजी रायगड किल्ल्याचा ताबा कर्नल प्रॉथरने घेतला. त्याचबरोबर इतरही बहुतांशी महत्त्वाच्या किल्ल्यांवर इंग्रजांनी ताबा मिळवला. दुसऱ्या बाजीरावाशी बेबनाव झाल्याने इंग्रजांनी कर्नल प्रॉथरच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य देऊन त्याला लोहगड किल्ला ताब्यात घेण्यासाठी पाठवले. त्या मोहिमेत ३८० युरोपियन सैनिक व ८०० एतद्देशीय सैनिक होते. कर्नल प्रॉथर व त्याच्यासोबत रवाना केलेल्या सैन्याचा तपशील माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने दि. ७ मार्च १८१८ रोजी गर्व्हनर जनरलला लिहिलेल्या पत्रात नमूद केला आहे. तो पुढीलप्रमाणे ***"Prother's force consists of seven mortars and four heavy guns, 370 men of Hon. Mountstuart Elphinston's 88$^{th}$ foot; the first battalion of the 5$^{th}$ and the 1$^{st}$ battalion of the 9$^{th}$ regiments of Native Infantry; detachments of the second battalions of the 6$^{th}$ and 1$^{st}$ regiment of Native infantry; and two companies of Auxiliary Brigades."*** [७९]

लोहगड किल्ला अतिशय मजबूत व अभेद्य आहे असे इंग्रजांना समजले होते व त्यासाठीच त्यांनी अशा प्रकारे मोठे सैन्यबळ तैनात केले होते. त्यानुसार कर्नल प्रॉथरने प्रत्यक्ष लोहगड किल्ल्यावर आक्रमण न करता थेट विसापूर किल्ला ४ मार्च १८१८ रोजी हस्तगत केला व त्यानंतर लोहगड किल्ला जिंकला. विसापूर किल्ला जिंकल्यानंतर त्वरित कर्नल प्रॉथरने कोकण व दक्षिण असे दोन्ही दरवाजे पाडून टाकले व विसापूर किल्ल्याचे लष्करी सामर्थ्य संपुष्टात आणले. हे दोन्ही दरवाजे उध्वस्त करण्यासाठी कर्नल प्रॉथरने लांब पल्ल्याचा मारा करणाऱ्या तोफा वापरल्या व त्याव्दारेच गडावरील महत्वाच्या इमारती व कोकण आणि दक्षिण दरवाजे उध्वस्त केले. तेव्हापासून विसापूर किल्ला उजाड झाला. इ.स. १८६२ मध्ये विसापूर वर काही धनगरांच्या खोपट्या असल्याचा उल्लेख मिळतो.[८०] विसापूर किल्ला सध्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारीत आहे.

**चाकणचा संग्रामदुर्ग**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील महत्वाचे शहर म्हणून चाकण शहर ओळखले जाते. चाकण शहर पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र. ५० वर पुण्याच्या उत्तरेस ४० किमी अंतरावर वसलेले आहे. चाकणच्या किल्ल्यास संग्रामदुर्ग या नावानेही ओळखले जाते. चाकण शहराच्या नावावरुन किल्ल्याचे नावही चाकण असेच आहे. चाकणचा संग्रामदुर्ग हा किल्ला किल्ल्यांच्या प्रकारामधील भुईकोट किल्ला किंवा स्थलदुर्ग या प्रकारात मोडतो.

महाराष्ट्राचे आद्यसम्राट म्हणून सातवाहन राजांना ओळखले जाते. सातवाहन घराण्याच्या कारकिर्दीत महाराष्ट्रास राजकीय स्थैर्य प्राप्त झाले. सातवाहन काळातील विविध साधनांमध्ये पुणे, चाकण व जुन्नर प्रदेशाची सविस्तर वर्णने आली आहेत. सातवाहन राजांनी बौध्द धर्माला उदारपणे राजाश्रय दिला. बौध्द धर्म प्रचार व प्रसार करण्यास मोठी आर्थिक मदत केली. बौध्द भिक्षूंना वास्तव्यासाठी गावापासून दूर मात्र रस्त्याच्या जवळ लेणी खोदण्यास प्रोत्साहन दिले. सातवाहन घराण्यातील राजांच्या प्रोत्साहनामुळे जुन्नर, भीमाशंकर, चाकण व देहू या परिसरात मोठ्या प्रमाणात लेणी खोदल्या गेल्या. सातवाहन राजवटीमध्ये प्रशासकीय दृष्टीने अनेक

विभागीय देश निर्माण करण्यात आले होते. त्यामध्ये सर्वात मोठा विभागीय देश म्हणून मौरिंज देश व पूणक देश होते. त्यापैकी पूणक देशामध्ये चाकणचा समावेश होता.[८१] ज्ञानेश्वरी या ग्रंथात चाकणचा उल्लेख चाकण चौऱ्याऐंशी असा करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या आईचे वडिल सिद्धेश्वरपंत कुलकर्णी यांच्याकडे चाकण व परिसरातील चोवीस गावांचे कुलकर्णी पद होते.[८२] संत ज्ञानेश्वर महाराजांची संजीवन समाधी चाकणपासून जवळच आळंदी येथे आहे. अशा प्रकारे प्राचीन काळी चाकण या प्रदेशाचा उल्लेख विविध साधनांमध्ये आलेला दिसतो. चाकणला समृध्द असा ऐतिहासिक वारसा लाभला आहे असे म्हणता येते.

चाकणचा किल्ला कोणी बांधला यासंबंधी ग्रँट डफने मांडणी केलेली आहे तो लिहितो, अल्लाउद्दीन खिलजी दक्षिणेत येण्यापूर्वी सुमारे १०० वर्षे अगोदर बुशदीद हबशी नावाच्या माणसाने संग्रामदुर्ग हा किल्ला बांधला आहे असे हिंदूंचे म्हणणे आहे.[८३] इ.स. १२९५ मध्ये संग्रामदुर्ग भोवताली ३० फूट खोलीचा खंदक खोदला गेला व त्यात पाणी सोडण्यात आले. अशी नोंद दार्शनिकेमध्ये आहे.[८४] पुढे १५ व्या शतकामध्ये मलीक-उल-तुजार याच्या कारकिर्दीत किल्ल्याची डागडुजी करण्यात आली. दुसरा बहमनी राजा अल्लाउद्दीन याच्या करकिर्दीत (१४३४-१४५७) संग्रामदुर्गला मोठी तटबंदी बांधली गेली. बुशदीद हबशी स्वत:ला पाळेगार म्हणवून घेत असे. मात्र हा बुशदीद हबशी बाराव्या शतकामध्ये चाकणला कसा गेला याविषयी ग्रँट डफला काही माहिती नाही.[८५]

आपणास महाराष्ट्राच्या विशेषत: दक्षिणेच्या मराठ्यांच्या पूर्वीचा इतिहास ज्ञात नसल्याची कबुली डफने स्वत: दिली आहे. या देशाच्या मराठे पूर्व काळाच्या इतिहासाचे ज्ञान नसल्याने याबाबत आपणास काहीच माहिती नाही. तेव्हा तूच याबाबत विद्वानांशी चर्चा करुन माहिती कळव असे पत्र गँट डफने पॉटिंजर या अहमदनगरच्या कलेक्टरला लिहिले होते.[८६]

चाकणच्या किल्ल्याचा पाया कसा घातला व किल्ला कसा बांधला याविषयीची माहिती *शिवकालीन पत्र सार संग्रहाच्या* तिसऱ्या खंडाच्या लेखांक क्रमांक २३४२ मध्ये सविस्तर आली आहे.

ती पुढीलप्रमाणे :- सं. १५१७ विक्रम २३४२ श. १८३२ अश्विन शु. ५ इ. १४६० सप्टेंबर १९. चाकणेस दुर्गाचा पाया उभारिला. जव्हारीसी फर्मात्ती केली. दर गावासी गाडा येक व वेठे दोन, येकु वेटा दुर्गाच्या पायात वालीत येकु गाड्यासंगाते सोडीत; याबद्दल विलाइती गयाल आली. पद्मावती, गीरमटेक, गीरमालवड पाटील मोकादम गीरमा कान पाटील, पुणे देश आपुली मोकदमाई, परुसी माजुमियाच्या हवाली मोकदमी केली. गिरम्याचे हासीचा वोवासीचा कोणी उभा राहील. थलपत्र दावील त्यास आरधी मोकादमी देईन राजान मीयाचे हासीच वौसीचा अर्धी खाईल.[८७]

*शिवकालीन-पत्र-सार-संग्रह* या लेखांकावरुन प्रस्तुत किल्ल्याचा पाया हा १९ सप्टेंबर १४६० रोजी घातला गेला. ग्रॅंट डफच्या मते अल्लाउद्दीन खिलजीच्या अगोदर १०० वर्षे म्हणजेच इ.स. १२९३-१२९४ मध्ये बुशदीद हबशी दक्षिणेत आला. या दोन्ही तारखांमध्ये मोठी तफावत आहे. याठिकाणी डफच्या नोंदीपेक्षा *शिवकालीन-पत्र-सार संग्रहा*तील लेखांक विश्वासार्ह असल्याने तो ग्राह्य धरण्यास हरकत नाही.

चाकण बहमनी राजवटीपासून महत्त्वपूर्ण लष्करी ठाणे होते. झियाउद्दीन हा चाकणच्या लष्करी ठाण्याचा प्रमुख होता. बहमनी राज्याचा मुख्य प्रधान मुहम्मद गवाण हा देखील काही काळचाकणच्या किल्ल्याचा किल्लेदार होता.[८८] बहमनी साम्राज्याचे विघटन होऊन पाच शाह्या निर्माण झाल्या. या पाच शाह्यांपैकी निजामशाहीच्या राजवटीमध्ये चाकणला मोठा लष्करी तळ उभारला गेला होता. चाकणहून पुणे जवळ, तर कोकणात व मुंबईकडे उतरण्यासाठीचे चाकण हे मुक्कामाचे स्थळ होते. तसेच पुणे-नाशिक मार्गावरील चाकण हे इतिहास काळात मोठे व्यापारी केंद्र असल्यामुळे साहजिकच संग्रामदुर्गास संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्व होते.

दुसरा बहामनी सुलतान अल्लाउद्दीनचा सरदार मलिक-उत-तुजार याने हा किल्ला जिंकून इ.स. १४३५ ते १४५७ या काळात येथेच आपले मुख्य ठाणे ठेवले. इ.स. १४८६ मध्ये चाकणचा अधिकारी झैनुद्दीन याने बंड केले असता मलिक अहमद चाकणचा किल्ला जिंकण्यासाठी आला होता. अहमदनगरचा दहावा बादशहा बहादूरशहा याने इ.स. १५९५ मध्ये हा किल्ला मालोजीराजांना दिला. इ.स. १६३६

मध्ये शहाजीराजांनी या किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळे यांना किल्लेदार म्हणून नेमले.[८९]

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यावर किल्ले आपल्या ताब्यात घेण्यास सुरुवात केली. इ.स. १६४७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी फिरंगोजी यांना आपल्या बाजूस वळवून किल्ला ताब्यात घेतला. त्यावेळी त्यांनाच संग्रामदुर्गची किल्लेदारी दिली.

चाकणजवळच्या भीमा व घोडनदी या दोन नदयांपलीकडे जवळच मुघल राज्याची सीमा होती. चाकणच्या पूर्वेस फारसा डोंगरी प्रदेश नसल्यामुळे संग्रामदुर्ग मराठ्यांच्या ताब्यामधून सहज व लवकर जिंकून घेतल्यास अहमदनगरशी आपले दळणवळण सहज सुलभ होईल असा अंदाज मुघल सरदार शायिस्ताखानाने बांधला होता. चाकणच्या पश्चिमेकडील बोरघाटाची खिंड चाकणपासून केवळ ३१ मैल लांब असून चाकण ताब्यात आल्यास अहमदनगरहून कोकणात उतरण्याचा अतिशय जवळचा मार्ग उपलब्ध होणार होता.

या सर्व बाबी लक्षात घेऊन शायिस्ताखानाने १६६० मध्ये चाकण जिंकून घेण्यासाठी स्वारी केली. त्यावेळी संग्रामदुर्गचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा हाच होता. स्वत: शायिस्ताखान, शम्सुद्दीन, खुदावंतखान, उझबेगखान, राव भावसिंह इत्यादी मातब्बर सरदारांसह २१००० फौजेसह संग्रामदुर्ग जिंकण्यासाठी आला. शायिस्ताखानाने पुण्यात आल्यावर लाल महालात मुक्काम ठोकला. पुणे व आसपासच्या प्रदेशात खानाच्या सैनिकांनी वाटेल तसा धुमाकूळ घातला. चाकणचा प्रदेश उजाड केला. दि. १९ जून १६६० रोजी शायिस्ताखान चाकणला पोहोचला. आपण चाकणचा किल्ला अगदी सहजरित्या जिंकून घेऊ असा त्याला विश्वास होता. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन गड झुंजवा, नाईलाज झाला तरच किल्ला मुघलांना देण्यास छत्रपती शिवाजी महाराजांनी चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याला सुचविले होते. यावेळी शिवाजी महाराज सिद्दी जौहरच्या पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले असल्याने चाकणला मदत करणे शक्य नव्हते. नेताजी पालकरांवर मदतीची जबाबदारी सोपवली होती. मात्र ती त्यास पूर्ण करता आली नाही. फिरंगोजीसोबत

किल्ल्यांवर अवघे ४०० मराठे होते. त्यांनी गडाच्या प्रत्येक बुरूजावरुन तोफा डागल्यामुळे शायिस्ताखानाच्या फौजेला मागे सरकावे लागले आणि २१ जून १६६० रोजी किल्ल्याला वेढा घालावा लागला.

त्यावेळी पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे मोगलांचा दारुगोळा ओला होऊन निरुपयोगी ठरत होता. आतून मराठे मात्र कडक मारा करीत होते. दिंडी दरवाजाने तुकडी तुकडीने बाहेर येऊन मोगली छावणीवर तुटुन पडत होते.

शायिस्तानाखानाने कोणत्याही परिस्थितीत किल्ला जिंकून ताब्यात घ्यायचाच या हेतूने गडाची नाकेबंदी केली. उत्तरेला स्वत:सह गिरिधर कुंवर, वीरमदेव, हशबखान, त्रिंबकजी भोसले, दावजी भोसले, पूर्वेला मुख्य प्रवेशव्दाराकडे शम्सुद्दीनखान, मीर अब्दुल सय्यद हसन, उझबकखान, सुलतान अली अरब व अलायार बुखारी दक्षिणेला राव भावसिंह, सर्फराजखान, जौहारखान आणि पश्चिमेला राजा रायसिंग व सीसोदियहचे सैन्य अशा प्रकारची व्यूहरचना करून आक्रमकपणे किल्ला लढवण्यास सुरुवात केली.

शायिस्ताखानाने २१००० फौजेसह भर पावसाळ्यात तब्बल ५६ दिवस किल्ल्याला वेढा टाकून किल्ला ताब्यात घेण्यासाठी प्रयत्नाची आत्यंतिक पराकाष्ठा केली. किल्ल्यातील ४०० मराठे सैनिकांनी कडवा प्रतिकार करीत शाहिस्ताखानाला नामोहरम केले. त्यामुळे किल्ला ताब्यात येईनासा झाला. शेवटी त्याने गुप्त बैठक बोलावून आपल्या छावणीपासून किल्ल्याच्या ईशान्येकडील बुरुजापर्यंत भुयार खोदून ते दारुगोळ्याने उडवून द्यायचा बेत आखला. त्यानुसार बुरुजाखाली खंदक खोदून १४ ऑगस्ट १६६० रोजी दुपारी ३ वाजता सुरुंग लावून तटास भगदाड पाडले. त्यात अनेक मराठे मरण पावले. त्यांचा दारुगोळा नष्ट झाला. ढासळलेल्या तटबंदीतून मुघल सैनिकांनी गडावर हल्ला चढवला. यात अनेक मराठी सैनिक कामी आले. मोगलांचे २६८ सैनिक मारले गेले. तर ६०० सैनिक जखमी झाले. शेवटी १५ ऑगस्ट १६६० रोजी राजा भावसिंहाच्या मध्यस्थीने फिरंगोजींनी निरुपायाने संग्रामदुर्ग मोगलांच्या ताब्यात दिला व ते शिवाजी महाराजांना भेटण्यासाठी राजगडाकडे निघून गेले. शिवाजी महाराजांनी त्यांच्या अव्दितीय पराक्रमाचे

मनापासून कौतुक करीत आदिलशाहीच्या सरहद्दीवरील भूपाळगडाची किल्लेदारी सोपविली.[१०]

शायिस्ताखानाने हा किल्ला ताब्यात घेतला व औरंगजेबाला बातमी कळविली. औरंगजेबाने याचे नामकरण इस्लामाबाद असे केले. आपल्या विजयाचा फारशी शिलालेख शायिस्ताखानाने येथे लिहून ठेवला आहे. या युध्दाचा महत्वाचा परिणाम म्हणजे इतका छोटा गड घेण्यास ५६ दिवस लागले तर बाकीचे डोंगरी अभेद्य व दुर्गम किल्ले घेण्यास किती दिवस लागतील या विचाराने शायिस्ताखानाने छत्रपती शिवरायांचे डोंगरी किल्ले घेण्याचा प्रयत्न केला नाही. शायिस्ताखानाने उझबेगखानाला चाकणच्या व्यवस्थेसाठी नेमले. अशा प्रकारे चाकणचा किल्ला व परिसरावर मुघलांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. शायिस्ताखानाचा हा आनंद फार काळ टिकला नाही कारण मराठ्यांनी इ.स. १६६९-१६७० मध्ये चाकणचा किल्ला व परिसर पुन्हा मुघलांकडून जिंकून घेतला.[११]

इ. स. १६७१ मध्ये दख्खनचा मोगल सुभेदार दिलेरखानाने पुन्हा चाकणवर स्वारी केली. १६७१ च्या डिसेंबर महिन्यात त्याने चाकण जिंकले. ही हकीकत शिवाजी महाराजांना रायगडावर असताना समजली. दि. १३ जानेवारी १६७२ रोजी महाराज महाडला आले. दिलेरखानाचा पराभव करण्यासाठी विविध किल्ल्यांवरील सैन्य एकत्र करुन चाकणमधील दिलेरखानाच्या तळावर मराठ्यांनी हल्ला केला. चाकण किल्ला ताब्यात घेतला. महत्त्वाच्या अनेक कैद्यांना संग्रामदुर्गावरुन रायगडावर पाठविले. त्यामधील आजारी व जखमी कैद्यांची त्यांनी सन्मानपूर्वक सेवा करविली. ज्या मुघल सैनिकांनी व कैद्यांनी महाराजांकडे नोकरी करण्याची इच्छा प्रदर्शित केली, त्यांना आपल्याकडे नोकरी दिली. बाकीच्या कैद्यांना सोडून देण्यात आले. दिलेरखानाचा हा पराभव म्हणजे औरंगजेबाचा पराभव होता. कारण दिलेरखान मुघलांचा दक्षिणेतील सुभेदार होता.[१२]

इ.स. १६८० मध्ये शिवाजी महाराजांचे निधन झाले. यानंतर संपूर्ण मराठ्यांचे राज्य जिंकून घेण्यासाठी औरंगजेबांने स्वराज्यावरच मोहिम काढली. तो स्वत: दक्षिणेत प्रचंड फौजेसह उतरला. मुघलांच्या आक्रमणास मराठ्यांनी जोरदार प्रतिकार

केला. त्यावेळी चाकण मुघलांच्या ताब्यात होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांच्या वतीने हैद्राबादच्या निजामाने हा किल्ला स्वत:च्या ताब्यात घेतला. इ.स. १७५५ मध्ये निजामाला पराभूत करुन मराठ्यांनी गड जिंकून घेतला. पेशवे काळात किल्ल्याचा वापर कैदखाना म्हणून केला जात होता.

२५ फेब्रुवारी १८१८ रोजी ले. कर्नल डिकनने ह किल्ला जिंकला. त्यासाठी तो शिरुरवरुन आला होता. त्याच्या मदतीला पुण्याहून इंग्रजांची पलटण व इतर युध्द सामग्री पोहोच झाली. सकाळी १२ पाऊंडी पोलादी व पितळी तोफा माऱ्याच्या जागी ठेवून किल्ल्यावर ब्रिटिशांनी हल्ला चढविला. दुपारी दक्षिणेकडून गोरी पलटण व १७ व्या मद्रास नेटिव्हच्या दुसऱ्या बटालियनने हल्ला केला; तर उत्तरेकडून निजामाची फौज व कॅप्टन डेव्हिसने आक्रमण केले. तेव्हा शेवटी किल्ल्यातील मराठ्यांनी शरणागती पत्करली. या युध्दात ४-५ गोरे अधिकारी मारले गेले.[१३]

तिसऱ्या इंग्रज-मराठा युध्दात मराठे पराभूत झाले आणि मराठी सत्ता संपुष्टात आली. इंग्रजांनी पेशव्यांकडून जो प्रदेश जिंकला त्या प्रदेशाचा माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन गव्हर्नर होता. तो डेक्कन कमिशनरपदी असताना २७ जुलै १८१८ रोजी चाकणला आला. चाकणमध्ये त्याने इंग्रज सैनिकांची ठाणी वसविली. मात्र इंग्रज ठाण्यांनी चाकणमधील गावांना त्रास देऊ नये याविषयी काळजी घ्यावी याची जबाबदारी पूर्णपणे रॉबिन्सनकडे सोपविली.[१४] अशा प्रकारे चाकणवर इंग्रजी अंमल सुरु झाला.

आज सद्यस्थितीला संग्रामदुर्ग अत्यंत दारुण अवस्थेत उभा आहे. किल्ल्याची प्रचंड पडझड झाली आहे. किल्ल्याची तटबंदी व बुरुजांचे दगड, विटा, माती येथील लोक नेऊन घरांचे बांधकाम करीत आहेत. चाकण ग्रामपंचायतीने किल्ल्याच्या मधोमध सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता केला आहे. किल्ल्याच्या बहुतांशी भागाचा वापर स्थानिक लोकांकडून प्रातर्विधीसाठी केला जातो आहे. गडावर वीर फिरंगोजी नरसाळा प्रतिष्ठान नावाचा फलक आहे. त्यावर किल्ल्याचा इतिहास लिहिला आहे. सध्या हा किल्ला अतिशय उध्वस्त झाला असून पुरातत्त्व खात्याने या किल्ल्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**सिंहगड**

सिंहगड हा किल्ला प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. 'सिंहगड' उर्फ 'कोंढाणा' हा किल्ला पुणे शहरापासून नैऋत्येस २० किमी अंतरावर आहे. समुद्रसपाटीपासून या किल्याची उंची १४४० मी. आहे.[९५] हा गड सह्याद्रीच्या पूर्व अंगावर पसरलेल्या भुलेश्वराच्या डोंगर रांगेवर वसला आहे. कोंढाण्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १ किमी व रुंदी ६७० मी. च्या आसपास आहे. सिंहगड हे नांव आधुनिक आहे. वास्तविक सिंहगडास मोडी कागदपत्रांमध्ये कोंढाणा असे नाव आहे. मात्र बोलीभाषेत कोंढाणा शब्दाचा उच्चार कोंडाणा असा केला जातो. या किल्ल्यास कोंढाणा हे नाव का पडले याविषयी ज्येष्ठ इतिहास संशोधक ग. ह. खरे यांनी पुढील शक्यता वर्तवली आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी आग्नेय दिशेस सुमारे चार मैल अंतरावर कोंढाणपूर नावाचे गाव आहे. या किल्ल्यासाठीची बाजारपेठ कोंडाणपूर या गावी असावी म्हणून कोंडाणपूर या ग्रामनामावरुन किल्यास कोंडाणे हे नाव मिळाले असावे.[९६] इ.स. च्या तिसऱ्या शतकात कौंडिण्य ऋषी सिंहगडावर तपश्चर्या करीत होते. त्यांचा आश्रम व गुरुकुलही तेथे होता. त्यांच्या नावावरुन गडाचे नांव कोंडा(ढा)णा झाले असावे. गडावरचे कोंढाणेश्वराचे मंदिर आणि पायथ्याचे कोंढाणपूर गाव हे त्याचेच प्रतीक आहेत.[९७]

महाराष्ट्रात ढोबळमानाने यादव काळापासून किल्ल्यांचा वापर संरक्षणदृष्ट्या केला जाऊ लागला. यादवांनी आपल्या पूर्वीच्या महाराष्ट्रातील राजवटीचा म्हणजेच शिलाहार घराण्याचा शेवट केला. शिलाहार राजवटीच्या प्रशासनामध्ये सर्वात मोठा घटक देश होता. पुणे व आसपासच्या प्रदेशाचा उल्लेख पूणकदेश असा सापडतो. कदाचित पुणकदेशामध्ये कोंढाण्याचा समावेश असावा.

यादवांच्या उत्तर काळातच दिल्लीचा तत्कालीन सुलतान मुहम्मद तुघलकाने इ. स. १३२८ मध्ये दक्षिणेवर स्वारी केली. त्यावेळी तो पुणे परिसरामध्ये आला होता. याविषयीचे पुरावे उपलब्ध आहेत. इ.स. १३५० मध्ये इसामी नावाच्या मुस्लिम कवीने फुतुहूस्सलातीन किंवा शाहनामा इ हिंद या फार्सी काव्याची रचना केली. या काव्यामध्ये कोंढाणा किल्ल्याचा उल्लेख आला आहे. त्याचा वृत्तांत पुढीलप्रमाणे -

सुलतान मुहम्मद तुघलकाने पुणे परिसरावर स्वारी केली. त्यावेळी कोंढाणा किल्ल्यास त्याने वेढा दिला. इसामीने या घटनेस कुंधीयाना किल्ल्यास वेढा घातला असे म्हटले आहे. मुहम्मद तुघलकाच्या स्वारीच्या वेळी कोंढाणा किल्ल्याचा किल्लेदार नागनायक हा कोळी सरदार होता. त्याने तुघलकाच्या मोठ्या सैन्याविरुध्द चिकाटीने लढा दिला. संपूर्ण किल्ल्याला तुघलकाच्या सैन्याने वेढा घातल्याने किल्ल्याची रसद बंद झाली. तरी पुढील आठ महिन्यापर्यंत रसद उपलब्ध असेपर्यंत नागनायकाने माघार घेतली नाही. अखेरीस नाईजास्तव त्याला माघार घ्यावी लागली. आणि त्याने किल्ला तुघलकाकडे सोपविला. यानंतर गडावर मुसलमान सत्तेचे वर्चस्व राहिले.

इ.स. १४८२-८३ मध्ये मलिक अहमद निजामशहाने तुंग, तिकोना या किल्ल्याबरोबरच कोंढाणाही जिंकल्याचा उल्लेख सापडतो. बुरहान निजामशहाच्या ताब्यात इ.स. १५५३ मध्ये जे ५८ किल्ले होते त्यात कोंढाणाही होता. त्याने नसीरुमुल्क या बंडखोराला किल्ल्यावर कैदेत टाकले होते. इ. स. १५६९-७० मध्ये किश्वरखानाने मुर्तुजा निजामशहाविरुध्द कोंधाना जिंकल्याचा उल्लेख आहे, पण तो संशयास्पद वाटतो. कारण कोंढाणा हा धारुरजवळचा किल्ला नाही.[१८]

इ.स. १६०० च्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे यांना निजामशहाकडून भीमा व नीरा नद्यांमधील भूप्रदेश जहागीर म्हणून मिळाला. या जहागिरीतील किल्ल्यांवर मात्र निजामशाही दरबाराने नियुक्त केलेला अधिकारी किल्लेदार म्हणून कार्यरत होता. १६२६ पूर्वी कोंढाण्यावर शहाजींची सत्ता होती. आदिलशाही व निजामशाही एक होऊन त्यांच्याकडून कोंढाणा काढून घ्यावा असा विचार करत होत्या. कोंढाण्याचा किल्लेदार सिद्दी अंबर यास हाताशी धरुन आदिलशहाने कोंढाणा ताब्यात घेतला. त्यावेळी ५० ते ६० हजार होन खजिना आदिलशहास तयारच मिळाला.

शहाजीराजे माहुलीच्या तहात अडकले असतानाच आदिलशहाने कोंढाण्यास हा वेढा घातला होता. आदिलशहा सरदार खजिना घेऊन गडावरुन बाहेर पडत असतानाच निजामशाही सरदार मुधाजी मायदे याने तो खजिना डोणज्याच्या

खिडीमध्ये लुटला. त्यामुळे निजामशाहीस मोठाच आर्थिक लाभ झाला. १६३० ते १६३६ हा कालखंड राजकीय दृष्ट्या शहाजी महाराजांना अस्थिरतेचा होता. आपले कुटुंब त्यांनी काही काळ सिंहगडावर ठेवले होते. कारण १६३६ मध्ये त्यांचे कुटुंब सिंहगडावर वास्तव्यास होते असा उल्लेख *पुणे गॅझेटियर*मध्ये आहे.

इ.स. १६४४-४५ मध्ये आदिलशाही इतराजीमुळे शहाजीच्या जहागिरीवर स्वारी करण्यात आली. तिचा हेतू दादोजी कोंडदेवास नामोहरम करणे हा होता. दादोजी कोंढाण्याचा मुद्दाम नेमलेला सुभेदार असला तरी किल्ला आदिलशाही हवालदाराच्या ताब्यात होता. दादोजी जिवंत असेपर्यंत शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेण्यासाठी विशेष खटपट केली नाही. परंतु इ.स. १६४७ मध्ये दादोजी कोंडदेव यांचा मृत्यू झाला. त्यांनतर विजापूर दरबाराने शिरवळच्या मिया रहीम ठाणेदाराला कोंढाणा किल्यावर नेमले. सिद्दी अंबर वाहब हा कोंढाण्याचा किल्लेदार होता. हा रहीम त्रासदायक ठरणार हे शिवाजी महाराजांनी ओळखले आणि कोंढाण्याच्या दक्षिणेकडील खेड-शिवापूरच्या आसपासच्या भागातील बापूजी मुदगल देशपांडे याला कोंढाणा कब्जात घ्यायला सांगितले. त्याने गडकऱ्यांशी कारस्थान करुन, त्याला फितवून, आपली माणसे गडावर घेऊन कोंढाणा स्वाधीन करुन घेतला.[९९]

इ.स. १६४८ मध्ये शहाजीवर विजापूरच्या मुहम्मद आदिलशहाची पुन्हा इतराजी होऊन त्यास कैद करण्यात आले. नंतर तिकडे बंगलूर येथे असलेला महाराजांचा थोरला भाऊ संभाजी यावर आणि इकडे शिवाजी महाराजांच्या ताब्यात असलेल्या पुरंदर- सिंहगडाच्या भागावर विजापूरच्या स्वाऱ्या झाल्या. शहाजींची सुटका होण्यासारखी नव्हती. त्यांच्या सुटकेसाठी शिवाजींचा भाऊ संभाजीने बंगलूर व शिवाजींनी सिंहगड ही ठिकाणे सोडून दिली व शहाजींची सुटका केली. पुरंदर मात्र महाराजांकडे कायम राहिला. यावेळी सिंहगड ताब्यात घेण्यासाठी विजापूराहून बहुधा दिवाण मिया रहीम मुहम्मद हा आला होता. त्याप्रमाणे त्याच्या ताब्यात सिंहगड, शिरवळ परगणा व बारा मावळे गेली असे दिसते.[१००]

इ.स. १६५६ मध्ये मुहम्मद आदिलशहा अर्धांगासारख्या तीव्र व चेंगट दुखण्याने आजारी पडला तेव्हा दरबारात हिंदूविरोधी व हिंदूपक्षपाती असे दोन गट पडले. या परिस्थितीचा फायदा घेऊन महाराजांनी कित्येक गड कोणत्या ना कोणत्या उपायाने आपल्या ताब्यात आणले व त्यांना नवीन नावे दिली. तेव्हाच कोंढाणाही हस्तगत करुन त्याला सिंहगड हे नाव दिले असावे.

तानाजी प्रसंग घडण्यापूर्वीच कोंढाण्यास सिंहगड हे नाव दिले असल्याचा कागदोपत्री उल्लेख असून, ही माहिती *'गड आला पण सिंह गेला'* ही कै. ह. ना. आपटे यांची लोकप्रिय कादंबरी प्रकाशित होण्यापूर्वी सर्वांना परिचित होती. ती कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर मात्र अलीकडे समाजातील सर्वसामान्य लोकांची अशी समजूत झाली आहे की, तानाजीच्या प्रसंगानंतर या किल्ल्यास सिंहगड हे नाव दिले गेले.

५ एप्रिल १६६३ रोजी पुण्यातील लाल महाल या ठिकाणी तळ ठोकून राहिलेल्या शायिस्ताखानावर शिवाजी महाराजांनी अत्यंत चपळाईने छापा टाकून त्याची दुर्दशा करुन पळता भुई थोडी केली. हा छापा घातल्यानंतर त्वरित शिवाजी महाराज, मोरोपंत, नेताजी इत्यादींनी सिंहगडाकडे प्रस्थान केले.

नोव्हेंबर १६६३ मध्ये महाराजा जसवंतसिंह राठोडने सिंहगडास वेढा घातला. हा वेढा सहा सात महिने चालला होता. १४ एप्रिल १६६४ रोजी जसवंतसिंहावर मराठ्यांनी गनिमी काव्याव्दारे हल्ला केल्यामुळे २० मे रोजी त्याने तोफा गडाखाली उतरवल्या आणि २८ मे रोजी गडाचा वेढा उठवला. त्यानंतर दोनच दिवसांनी महाराज गडावर आले.

जसवंतसिंह येथून निघून गेल्यावर मिर्झाराजा जयसिंग स्वराज्यावर फौजेसह चालून आला. त्याने कोंढाण्यावर आपली सेना रवाना केली. त्याने आपला सरदार दाऊदखानास शिवापूराहून कोंढाण्याच्या एका बाजूस पाठविले. दाऊदखानाने १ मे १६६५ रोजी शिवापूरकडील बाजू उध्वस्त केली. त्यानंतर पुरंदरचा तह झाला. या तहानुसार कोंढाण्यासह एकूण २३ किल्ले मोगलांच्या ताब्यात देण्यात आले. तहामधील अटींनुसार किल्ला ताब्यात घेण्यासाठी जयसिंगाने आपला मुलगा

किरतसिंह याला महाराजांबरोबर कोंढाण्यावर पाठविले. त्याने तो किल्ला प्रथम स्वत:च्या ताब्यात घ्यायचा आणि नंतर त्यासाठी नेमलेला किल्लेदार शाहिदखान याच्या ताब्यात द्यावयाचा असे ठरले होते. त्याप्रमाणे हा किल्ला १४ जून १६६५ रोजी किरतसिंहाच्या ताब्यात आल्यावर २१ सप्टेंबर १६६५ रोजी जयसिंग तेथे स्वत: गेला. एक रात्र तेथे मुक्काम करुन तेथील सर्व व्यवस्था पाहून आवश्यक त्या सूचना देऊन दुसऱ्या दिवशी परत आला. पुढची पाच वर्षे किल्ला मोगलांच्याच ताब्यात होता.[१०१]

सन १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी मोगलांविरुध्द युध्द आघाडी उभारली. महाराजांनी पुरंदरचा तह मोडून महाराष्ट्रातील एक एक किल्ला मोगलांच्या कचाट्यातून सोडविण्यास प्रारंभ केला. त्यासाठी त्यांनी पहिला गड म्हणून सिंहगडाची निवड केली. हा किल्ला महत्त्वाचा असल्यामुळे याची व्यवस्था उदेभान राठोड या किल्लेदाराच्या अधिपत्याखाली उत्तम ठेवली होती. किल्ल्यात जेथे उभ्या कड्यांचा नैसर्गिक तट नव्हता तेथे भक्कम तट बांधून गड सर्व बाजूंनी अगम्य केला होता. दोन्ही दरवाजांवर पहारे असल्यामुळे तेथे शत्रूसैन्यास प्रवेश मिळणे शक्यच नव्हते. असा किल्ला घेण्यासाठी शूर व पराक्रमी व्यक्तींचीच गरज होती. त्यासाठी शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसरे याची निवड केली.

दि. ४ फेब्रुवारी १६७० च्या रात्री केवळ पाचशे मावळे सोबत घेऊन तानाजी सिंहगडाच्या डोणागिरीच्या कड्याखालील दाट जंगलात आले. पाचशेपैकी तीनशे मावळे सूर्याजी या तानाजीच्या बंधूबरोबर कल्याण दरवाज्याबाहेर दडून बसले. डोणगिरीचा दुर्गम कडा वानराप्रमाणे चढून जाऊन काही मावळ्यांनी गडाचा माथा गाठला आणि मागोमाग वरुन सोडलेल्या दोरांच्या माळावरुन किंवा शिड्यांवरुन तानाजी सर्व मावळे घेऊन कसलीही चाहूल लागू न देता गडावरुन चढले असे वर्णन आहे. दोन्हीपैकी कोणताही मार्ग अवलंबलेला असला तरी गड चढणे ही केवळ पहिली पायरी होती. पुढची प्रत्यक्ष लढाईची पायरी हीच निर्णायक ठरणारी होती. गडावर तानाजी व मावळे चढून आल्यावर लगेचच मोगली सैन्याला त्यांची चाहूल लागली. आरडाओरडा होताच कोंढाण्याचा किल्लेदार उदेभान व त्याचे पंधराशे सैनिक मशाली, चंद्रज्योती पेटवून हत्यारांनी सज्ज होऊन तानाजीवर चालून आले. दोनशे

मावळ्यांनिशी तानाजी विलक्षण त्वेषाने मोगली सैन्यावर तुटून पडले. त्यातच काही मावळे कल्याण दरवाजा आतून उघडून सूर्याजीबरोबरच्या मावळ्यांनाही गडावर घेतले. पहिल्या सपाट्यात मावळ्यांनी चारशे-पाचशे शत्रूसैनिकांना ठार केले. यावेळी झालेल्या घनघोर युध्दात सुभेदार तानाजी मालुसरे व किल्लेदार उदेभान राठोड हे दोघेही मृत्यू पावले. कल्याण दरवाजातून आलेल्या सूर्याजींनी तानाजी पडले हे कळूनसुध्दा माघार न घेता निर्वाणीचा हल्ला करुन मोगली सैन्याला पराभूत केले. पंधराशे पैकी बाराशे मोगली सैनिक कापले गेले आणि गड स्वराज्यात आला.[१०२] राजगडावर असलेल्या महाराजांना गड ताब्यात आलेला कळावा म्हणून ठरलेल्या इशाऱ्याप्रमाणे गवताची गंजी पेटवून ही बातमी तात्काळ कळवली गेली. महाराजांना तानाजीच्या वीरमरणाची वार्ता समजल्यावर आत्यंतिक दु:खाने महाराज उद्गारले 'एक गड घेतला परंतू एक गड गेला.'[१०३] तानाजी मालुसरेंच्या महापराक्रमाने त्यांचे नाव स्वराज्याच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर झाले.

११ मार्च १६८९ रोजी छत्रपती संभाजी राजांचा अत्यंत क्रूरपणे वध करण्यात आला. त्यांच्या वधानंतर औरंगजेबाने अत्यंत आक्रमकपणे एका पाठोपाठ एक स्वराज्यातील किल्ले घेण्यास प्रारंभ केला. मोगलांच्या क्रूर कृत्याला प्रत्युत्तर म्हणून सेनापती संताजी घोरपडे ह्यांचे दोन भाऊ व विठोजी चव्हाण यांनी मोगलांची छावणी वढू कोरेगाव या ठिकाणी असताना १२ जुलै १६८९ रोजी रात्रीच्या वेळी औरंगजेब बादशहाच्या शाही तंबूवर छापा घालून तंबू भुईसपाट करुन तंबूच्या तणावा तोडल्या व वरचे सोन्याचे कळस कापून नेले. त्यानंतर संताजी मोगलांच्या छावणीतून निसटून ते सिंहगडावर आले. त्यावेळी सरसेनापती प्रतापराव गुजर यांचा मुलगा सिधोजी हा किल्ल्याचा किल्लेदार होता. त्याने त्या सर्वांची चांगली काळजी घेतली होती.

छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर औरंगजेबाने अनेक किल्ले ताब्यात घेतले. त्यात सिंहगड किल्ल्याचाही सामवेश होता. रामचंद्रपंत अमात्यांनी ३ जुलै १६९० रोजी कान्होजी झुंजारराव मरळ देशमुखांना पत्र पाठवून सिंहगड, राजगड हे किल्ले हस्तगत करण्यात सांगितले. इ.स. १६९२ मध्ये शंकराजी नारायण याने हा

किल्ला हस्तगत करण्यासाठी सैन्य पाठविले. त्यांनी तटास शिड्या लावून किल्ला घेण्याचा प्रयत्न केला, पण शत्रू खबरदार असल्यामुळे किल्ला ताब्यात घेण्यात अपयश आले. सिंहगड, लोहगड सारखे महत्त्वाचे किल्ले औरंगजेबाच्या ताब्यात राहिल्याने मराठ्यांना देशावर हालचाली करण्यास मर्यादा येऊ लागल्या. त्यामुळे येनकेन प्रकारे सिंहगड हस्तगत करणे आवश्यक होते. त्यानुसार १६९३ मध्ये मराठ्यांकडील पायदळाचा पंचहजारी सरदार नावजी बलकवडे व दुसरा एक पंचहजारी सरदार विठोजी कारके या दोघांनी सिंहगडाचा घेरा तपासून सर्वेक्षण केले. त्यांनी तानाजी मालुसरे प्रमाणे अचाट पराक्रम करण्याचे ठरवून ३० जून १६९३ रोजी माळ लावली व शिड्यांवरुन रात्री सैन्यासह वर चढून गेले. तेथील पहारे मारुन १ जुलै १६९३ रोजी किल्ला हस्तगत केला.[१०४] तेव्हा अगोदर कबूल केल्याप्रमाणे नावजीस एक गाव इनाम मिळाला.

जिंजीहून निसटून महाराष्ट्रात आलेल्या छत्रपती राजाराम यांचे वास्तव्य सिंहगडावर होते. तेथे त्यांची प्रकृती खालावली. त्यांना नवज्वर व रक्ताच्या उलट्या झाल्या. सततची दगदग व धावपळ यामुळे ३ मार्च १७०० रोजी त्यांचा सिंहगडावर मृत्यू झाला.[१०५]

२७ डिसेंबर १७०२ रोजी औरंगजेबाने पुन्हा सिंहगडास वेढा घातला. तो सुमारे तीन साडेतीन महिने चालला. यावेळी गडावर त्र्यंबक शिवदेव मुतालीक व शिधोजी जाधव हवालदार हे प्रमुख होते. त्यांनी वर्धइ, खंडई व गर्णइ या आपल्या हाताखालच्या बेरडांसह किल्ला सतत भांडता ठेवला. हा किल्ला औरंगजेबाने ५०,००० रुपयांच्या बदल्यात गोमाजी विश्वनाथ पुरंदरे यांच्या मार्फत १४ एप्रिल १७०३ रोजी ताब्यात घेतला व त्याने सिंहगडाचे नाव बदलून बक्षिंदाबाद हे फारशी नाव ठेवले.[१०६] ०४ एप्रिल १७०५ रोजी पंताजी शिवदेवांच्या नेतृत्वाखाली त्र्यंबक शिवदेव व रामजी फाटक यांनी किल्लेदार देवीसिंहला कैद करुन सिंहगड किल्ल्यावर ताबा मिळवला तेव्हा औरंगजेबाने झुल्फिकारखान यास किल्ला घेण्यास पाठवले. त्याने किल्ल्याला वेढा दिला. शेवटी मराठ्यांनी मोठी रक्कम घेऊन हा किल्ला औरंगजेब बादशहाला

देऊन टाकला. पुढे औरंगजेब बादशहाचा १७०७ साली मृत्यू झाल्यानंतर हा किल्ला मराठ्यांनी आपल्या ताब्यात घेतला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांच्या कैदेत असणारे छत्रपती संभाजीपुत्र छत्रपती शाहू महाराज यांची सुटका झाली. त्यावेळी सचिव शंकराजी नारायण त्यांच्या पक्षात आले. इ.स. १७५० पर्यंत काही विशिष्ट अटींवर त्यांच्या ताब्यातील प्रदेश व सिंहगडासारखे किल्ले त्यांच्याकडे आणि नंतर त्याच्या वंशजांकडे ताब्यात राहिले. महाराणी ताराबाई छत्रपती राजाराम महाराजांच्या समाधीदर्शनाच्या निमित्ताने सिंहगडावर जात असत. पण याचा उपद्रव आपणास होईल म्हणून बाळाजी बाजीराव याने तुंग व तिकोना किल्ल्याच्या मोबदल्यात चिमाजी नारायण सचिव यांच्याकडून हा किल्ला घेतला.[१०७] इ. स. १७५१ च्या मध्यात महाराणी ताराबाई व पेशवे यांच्यात बोलणी होऊन सिंहगड पेशव्यांकडेच राहिला. या किल्ल्याच्या कल्याणद्वाराच्या गणेशपट्टीच्या माथ्यावर बाळाजी बाजीरावाने 'श्री शालिवाहन शके १६७२ कारकिर्द श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडित प्रधान' हा दोन ओळींचा लेख कोरवून घेतला.[१०८]

नोव्हेंबर १७६१ मध्ये निजामाने पेशव्यांच्या पुण्यावर आक्रमण केले. त्यावेळी पेशव्यांनी आपल्या महत्त्वाच्या चीजवस्तू आणि पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती सिंहगडावर हलविल्या. नोव्हेंबर १७६२ मध्ये घोडनदी येथे माधवराव पेशवे व त्यांचे काका रघुनाथराव यांच्यातील लढाईत माधवरावांचा पराभव झाला. तेव्हा रघुनाथरावांनी सखारामबापू बोकील यांना ९ लक्षांच्या जहागिरीसह सिंहगड किल्ला दिला. ऑगस्ट १७६३ मध्ये राक्षसभुवनच्या लढाईत पेशव्यांनी निजामाचा पराभव करण्यापूर्वी निजाम पुणे-सिंहगडापर्यंत जाळपोळ करीत पोचला होता. तेव्हा गोपिकाबाई तिचा मुलगा नारायणराव, इतर मंडळी, काही पोथ्या, कागदपत्रे, संपत्ती, पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती यांच्यासह सिंहगडावर गेली होती. त्यावेळी नारायणरावांचे गंगाबाईंशी लग्नही सिंहगडावर झाले. याप्रसंगी निजामाने पुण्यात प्रचंड जाळपोळ केली. पर्वतीवर राहिलेल्या मूर्त्या फोडल्या, सिंहगडाची माची, पोथ्या, कागदपत्रे लुटली आणि कित्येक स्त्रियांची बेअब्रू केली. याप्रसंगी त्याला पाच कोटी रुपयांची संपत्ती प्राप्त झाली.[१०९]

११ सप्टेंबर १७७१ रोजी विजयादशमीच्या दिवशी सिंहगडावर वीज पडली तेव्हा दारुखान्यात स्फोट होऊन दारुखाना जमीनदोस्त झाला. बऱ्याच वास्तू, इमारती, तटबंदी यांचे नुकसान झाले. काहींची दुरुस्ती झाली, काही नवीन बांधण्यात आल्या.

इ. स. १८१७ मध्ये झालेल्या खडकीच्या लढाईतील पराभवानंतर श्रीमंत लोक सिंहगडावर पळाले. मौल्यवान वस्तू, दागिने, जडजवाहिरे, पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती यावेळीही सिंहगडावर हलविण्यात आल्या. लुटालुटीच्या भितीने अनेक श्रीमंतांनी आपली संपत्ती सिंहगडावर नेऊन ठेवली. सिंहगड लढवण्याचा प्रसंग येईल हे गृहित धरुन दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी तरतूद केली होती. त्यामुळे सिंहगडाविषयी सर्वांनाच भरवसा वाटत होता. खडकी येरवड्याच्या लढाईनंतर १६ नोव्हेंबर १८१७ रोजी गणपतराव पानसेंनी १० तोफा सिंहगडावर नेल्या. तेव्हा ब्रिगेडियर जनरल स्मिथ याच्या हाताखालच्या एका तुकडीने कॅप्टन टर्नरच्या अधिपत्याखाली सिंहगडावर जाऊन चौदा तोफा हिसकावून घेतल्या. या चकमकीत त्याची ३०० माणसे मरण पावली. मिळालेली लूट घेऊन २१ नोव्हेंबरला ती सैन्याची तुकडी पुण्याकडे परतली.[११०]

आष्टीच्या लढाईत दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचा पूर्ण पराभव झाला. तेव्हा जनरल स्मिथच्या हुकुमानुसार जनरल प्रिटझलरने सिंहगड हस्तगत करण्यासाठी किल्ल्याच्या उत्तर पूर्व व दक्षिण या तीन बाजूंना निरनिराळ्या ठिकाणी तोफांचे मोर्चे लावले. १ मार्च १८१८ पर्यंत ३६७८ तोफगोळे टाकल्यानंतर गडावरच्या ७०० गोसावी व ४०० अरबांनी शरणागती पत्करली. २ मार्चला आपली हत्यारे व संपत्ती घेऊन ते निघून गेले. तेव्हा गडावरील ६७ तोफा व भरपूर दारुगोळा इंग्रजांना प्राप्त झाला. किमान पन्नास लक्ष रुपयांची लूट मिळाली. तसेच पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती व पाच लाख रुपयांची गणेशमूर्ती देखील इंग्रजांना मिळाली.[१११] किल्ला ताब्यात घेण्यासाठी इंग्रजांनी तोफगोळ्यांचा प्रचंड मारा केला. किल्ल्याची अभेद्य तटबंदी तोडून टाकली. मराठ्यांचा स्फूर्तीदायी इतिहास नष्ट करण्यासाठी इंग्रजांनी गडावरील पाडता येण्यासारख्या बहुतांशी इमारती पाडून उध्वस्त केल्या. किल्ल्यावर जाण्याचे मार्ग सुरुंग लावून उडवून दिले आणि गड ओसाड बनला आणि गडावरील इमारती हळूहळू

पडून नामशेष झाल्या. इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दानंतर इतर अनेक गडांप्रमाणे येथील तटबंदीही इंग्रजांनी जागोजाग पाडून टाकली.[११२]

पुढे इ. स. १८८९ मध्ये लोकमान्य टिळक सिंहगडावर गेले असता तेथील सृष्टीसौंदर्य, हवापाणी, ऐतिहासिक पार्श्वभूमी व पुण्याशी जवळीक या गोष्टी त्यांना आवडल्या. त्यामुळे त्यांनी रामलाल नंदराम नाईक यांच्याकडून जागा खरेदी केली. लोकमान्य टिळकांवरील प्रेमाखातर एका संस्थानिकाने सिंहगडावर त्यांना प्रशस्त बंगला बांधून दिला. मे जून १९०८ मध्ये त्यांनी '*आर्क्टिक होम इन वेदाज*' या संशोधनात्मक ग्रंथाचे लिखाण केले. सन १९१५ मध्ये '*गीतारहस्य*' या प्रख्यात पुस्तकाची मुद्रणप्रत याच ठिकाणी तयार झाली.[११३] याच साली लोकमान्य टिळक व महात्मा गांधीजींची भेट सिंहगडावरील टिळक बंगल्यात झाली.

भारत सरकारच्या टपाल आणि तार खात्याने शुक्रवार दि. ३ ऑगस्ट १९८४ रोजी एक रुपया पन्नास पैशांचे सिंहगड किल्ल्याचे तिकिट प्रसारित केले. हा प्रकाशनाचा कार्यक्रम सिंहगडाच्या वाहनतळावर विधानसभेचे सभापती जयंतराव टिळक यांच्या हस्ते, केंद्रीय दळणवळण राज्यमंत्री विठ्ठलराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या तिकिटावर सिंहगडाचा पहिला डोणजे दरवाजा दाखविण्यात आला आहे.[११४]

आजघडीला सिंहगड किल्ल्याचा ताबा महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाकडे आहे. पुरातत्त्व खात्याने किल्ल्यावरील विविध वास्तूंच्या डागडुजीसाठी व सुशोभिकरणासाठी निधीची तरतूद केली आहे. सिंहगड किल्ला सध्या एक 'पिकनिक स्पॉट' बनला आहे. किल्यावर अनेक ठिकाणी मद्याच्या पार्ट्या होताना दिसतात. गडावर जाताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना झुणका भाकर स्टॉल्स, कोल्ड्रिंक्स स्टॉल, आईस्क्रीम स्टॉल्स यांचे अतिक्रमण झालेले दिसते. आज किल्ल्याचा वापर हा केवळ मौजमजा, धांगडधिंगा घालण्यासाठी व मनोरंजन करण्यासाठीच केला जात आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे. किल्ला पाहायला आल्यावर किल्ल्याचा इतिहास विसरुन चालणार नाही, तो आपणास जपावाच लागेल, ते आपले आद्य कर्तव्य आहे. सिंहगड किल्ल्याच्या इतिहासाचा शोध घेत असताना शासकीय अभिलेखागार पुणे येथे ३६

अप्रकाशित मोडी कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. सर्व शासकीय विहित प्रक्रिया करुनच शासकीय परवानगीने ही कागदपत्रे प्राप्त केली आहेत. प्रबंधाच्या शेवटी परिशिष्ट क्रमांक एकमध्ये जोडली आहेत.

**राजगड**

पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यामध्ये राजगड किल्ला वसला आहे. राजगड किल्ला पुण्याच्या नैऋत्येस ४८ किमी अंतरावर व भोरच्या वायव्येला २४ किमी अंतरावर नीरा-वेळवंडी-कानंदी आणि गुंजवणी नद्यांच्या खोऱ्यातील गिरीदुर्ग असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५७५ फूट आहे. राजगड हा गुंजण मावळ प्रदेशाचे रक्षण करणारा उत्तुंग, अभेद्य व भव्य किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये अतिशय महत्त्वाचा होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन राजगडास प्रथम राजधानी बनवली. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांमध्ये, घनदाट जंगलांमध्ये आणि दुर्गम व अवघड अशा वाटांमध्ये राजगडाचे स्थान अतिशय सुरक्षित असल्याकारणानेच शिवाजी महाराजांनी राजगडास राजकीय हालचालींचे केंद्र बनविले. मुस्लिम सत्ताधीशांपासून दूरवर असणारा सर्व किल्ल्यांपेक्षा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण, अभेद्य असा हा राजगड किल्ला आहे. म्हणूनच या किल्ल्यास प्र. के. घाणेकर यांनी 'किल्ल्यांचा किल्ला' असे म्हटले आहे.[११५]

राजगड हा किल्ला गुंजन मावळातील मुरुम खोऱ्यात वसला आहे. या किल्ल्यास मुरुंबदेव किंवा मुरुमदेव या नावानेही ओळखतात. हा किल्ला अभेद्य व दुर्गम असून त्याचा बालेकिल्लाही तोरण्याच्या मानाने आकाराने मोठा होता. शिवाय राजगडाकडे कोणत्याही बाजूने येताना एखादी टेकडी किंवा नदी ओलांडावीच लागते. एवढी सुरक्षितता असल्यानेच शिवाजी महाराजांनी त्याची राजधानी म्हणून निवड केली.[११६]

इतिहासातून अस्पष्ट येणाऱ्या उल्लेखांवरुन सातवाहनपूर्व म्हणजेच साधारण २००० वर्षांपूर्वीपासूनचा हा डोंगर आहे. ब्रह्मर्षी ऋषींचे येथे असणारे वास्तव्य व याच ब्रम्हर्षी ऋषींच्या नावावरुन येथे स्थापन झालेले श्री ब्रह्मर्षी देवस्थान यावरुन हा डोंगर फार प्राचीन कालखंडातील असावा असे वाटते. राजगड किल्ल्याचा प्राचीन

इतिहास अधिकृतपणे कोणत्याही साधनांत सापडत नाही. परंतु या डोंगरावर काही प्राचीन काळातील खोदलेल्या गुहा आहेत. अशा गुहांची निर्मिती ध्यानधारणा, साधना, चिंतन, मनन यासाठी तत्कालीन साधक व भिक्षुक यांचेकडून झाले असण्याची शक्यता आहे. यावरुन हा किल्ला फार पुरातन असावा असे म्हणता येते.

राजगडाचे पूर्वीच नाव 'मुरुमदेव' किंवा 'मुरुंबदेव' असे होते. याच नावाने हा किल्ला शिवपूर्वकाळात ओळखला जात असे. अर्थात त्यावेळी गडाचे स्वरुप फार काही भव्य दिव्य असे नव्हते. इ. स. १४९० च्या सुमारास अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक अहमद बहिरी याने आपले आसन स्थिर झाल्यावर शिवनेरी, चावंड, लोहगड, तुंग, तिकोना, कोंढाणा, पुरंदर, भोरप हे किल्ले ताब्यात घेतले व त्यानंतर मुरुंबदेव हा किल्लाही आपल्या वर्चस्वाखाली आणला. त्याच्या केवळ धाकाने मुरुमदेव किल्ल्याचे गडकरी बिनशर्त शरण आल्यामुळे अहमद बहिरीला किल्ला ताब्यात घेण्यासाठी विशेष कष्ट पडले नाहीत. *'बुऱ्हान इ मासिर'* या फारसी साधनग्रंथातून अशी माहिती मिळते की, अहमद बहिरी याने मुरुमदेव किल्ला जिंकून घेतल्यावर तेथील मूर्त्यांचा व मंदिरांचा विनाश केला. मंदिरांच्या जागी मशिदी उभारल्या. किल्ल्यांवर नवे हवालदार व इतर अधिकारी नेमले.[११७]

मुरुमदेव किल्ल्यावर निजामशाहीची सत्ता स्थापन झाल्यावर पुढची १२५ वर्षे हा किल्ला निजामशाहीतच राहिला. या काळात किल्ला ताब्यात घेण्यासाठी कोणीही हल्ला केला नाही. मुरुमदेव किल्ल्याची व्यवस्था निजामशहाच्या वतीने हैबतराव शिळीमकर व त्याचे वडील रुद्राजी नाईक यांच्या मार्फत पाहिली जात होती. इ.स. १६२५ च्या सुमारास मुरुमदेव किल्ला निजामशाहीकडून आदिशाहीकडे आला. आदिलशहा सरदार हैबतखान याने मुरुमदेव किल्ल्याला वेढा घातला, तेव्हा मलिक अंबरच्या आदेशानुसार बाजी हैबतरावाने मुरुंबदेव किल्ल्याचा ताबा आदिलशाही सरदार हैबतखानाकडे दिला.[११८]

इ. स. १६३० मध्ये आदिलशाहीकडून हा किल्ला परत निजामशाहीच्या वर्चस्वाखाली आला. मुरुमदेव किल्ल्याची जबाबदारी शहाजीराजांचा अधिकारी सौनजी याच्याकडे असताना विजापूरच्या आदिलशाही सैन्यातील एका सरदाराने

किल्ल्यावर हल्ला केला. त्यावेळी झालेल्या चकमकीत सोनजी जखमी झाला. त्या चकमकीत त्याचा मुलगा व इतर अनेक लोक मारले गेले. त्यावेळी त्यांच्या मदतीसाठी बाळाजी नाईक शिलिमकर आपल्या तुकडीसह मुरुमदेव किल्ल्याच्या रक्षणासाठी गेला. त्यावेळी झालेल्या झटापटीत बाळाजी नाईक सुध्दा जखमी झाला. परंतु किल्ल्याचे रक्षण करण्यात त्याला यश आले. आदिलशाही सरदाराने माघार घेतली. बाळाजींच्या या कामगिरीची दखल शहाजी राजांनी घेऊन त्याला मानाची वस्त्रे देऊन सन्मान केला.

शिवाजी महाराजांनी मुरुमदेवाचा किल्ला कधी ताब्यात घेतला याचा लिखित पुरावा आज उपलब्ध नाही. त्यामुळे किल्ला ताब्यात कधी आला हे सांगणे अनिश्चितच आहे. शिवचरित्र साहित्याच्या दहाव्या खंडामध्ये प्रसिध्द झालेल्या एका पत्रात 'शिवाजीने शहामृग नावाचा पर्वत ताब्यात घेऊन त्यावर इमारत बांधली. त्या पर्वताला राजगड हे नाव ठेवले' असा उल्लेख आला आहे. सभासद बखरीमध्ये पुढील उल्लेख आढळतो. 'मुरबाद म्हणोन डोंगर होता त्यात वसविले. त्याचे नाव राजगड म्हणोन ठेविले. त्या गडाच्या चार माच्या वसविल्या.' राजवाडे खंड १५ मध्ये १६४५ सालच्या एका पत्रात राजगडाचा उल्लेख मुरुंबदेव असा केला असल्याचे आढळते. परंतु हे पत्र विश्वासार्ह नसल्याचे मत इतिहास अभ्यासकांनी मांडले आहे. १६६० सालच्या विजापूरकर दुसऱ्या आदिलशहाने काढलेल्या एका फर्मानामध्ये विठोजी हैबतराव याला मुरुमदेवचा देसाई म्हणून संबोधले आहे.[११९] विश्वासार्ह कागदपत्रांचा विचार केला असता इसवी सन १६४७ पूर्वी शिवाजी महाराजांनी कोणताच किल्ला घेतला नसावा असे वाटते.

दादोजी कोंडदेव यांचा मृत्यू मार्च १६४७ साली झाल्यानंतर शहाजीराजांच्या जहागिरीची पूर्ण जबाबदारी शिवाजी महाराजांवर आली. याच वर्षापासून त्यांनी किल्ले ताब्यात घेऊन राजकीय हालचालींना सुरुवात केली. १६४७ च्या सुमारास शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ल्यासोबत राजगड हा किल्ला ताब्यात घेतला. हा किल्ला बांधण्याचे काम महाराजांनी मोठ्या झपाट्याने सुरु केले. मुरंबदेवाच्या डोंगरावर असलेल्या तीन सोंडांवर तटबंदी बांधून तीन स्वतंत्र माच्या उभ्या केल्या. या तीन

माच्यांना सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती ही नांवे दिली. अत्यंत दुर्गम व अभेद्य अशा राजगडाचे बांधकाम अनेक वर्षे चालले. शिवाजी महाराजांनी मुरुमदेवला राजगड हे नाव देण्यामागे हा किल्ला राजधानीचे ठिकाण आहे हे दर्शविण्यासाठीच राजगड असे नांव ठेवले.[१२०] शिवाजी महाराजांनी आपल्या आयुष्यातला बराच काळ म्हणजे सुमारे २० ते २२ वर्षे राजगड येथे राजधानी स्थापन करुन तेथे व्यतीत केल्यामुळे अनेक कौटुंबिक घटना राजगडावरच घडल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे राजारामचा जन्म राजगड किल्ल्यावर झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाची सुरुवात सन १६४८-४९ मध्ये याच किल्ल्यावर झाली होती. इ. स. १६६० मध्ये सिद्दी जोहरने पन्हाळ्याला वेढा घातला तेव्हा जिजाबाई राजगडावरच होत्या. त्यांनी पन्हाळ्याचा वेढा मोडून काढण्यासाठी नेताजी पालकर व सिद्दी हिलाल यांना पाठविले होते. इ. स. १६६० मध्ये औरंगजेब बादशहाच्या आदेशानुसार शायिस्ताखानाने स्वराज्यावर आक्रमण केले. शायिस्ताखानाच्या फौजेने राजगडाच्या जवळपासची काही खेडी जाळली परंतु प्रत्यक्ष राजगड जिंकण्याचा प्रयत्नदेखील केली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी ५ एप्रिल १६६३ च्या मध्यरात्री शायिस्ताखानावर छापा घालून राजगडावर परतले. सन १६६५ मध्ये मिर्झाराजा जयसिंह याने स्वराज्यावर आक्रमण केले. त्याने दाऊदखान व रायसिंग या दोन सरदारांना या परिसरातील किल्ले जिंकण्यासाठी पाठविले. ३० एप्रिल १६६५ रोजी मोगल सैन्याने रामसिंह व अचलसिंह यांच्या नेतृत्वाखाली राजगडावर विलक्षण मारा केला. त्यामुळे मोगल सैनिकांनी माघार घेतली. १३ जून १६६५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज व मिर्झाराजा जयसिंह यांच्यात पुरंदरचा तह झाला. त्या तहानुसार २३ किल्ले मुघलांना देण्याचे शिवाजी महाराजांनी मान्य केले व स्वत:कडे १२ किल्ले ठेवले. त्यामध्ये राजगड, तोरणा, लिंगाणा आणि रायगड या चार किल्ल्यांचा समावेश होता.[१२१]

शिवाजी महाराजांनी अत्यंत चातुर्याने व शिताफीने आग्र्याच्या नजरकैदेतून सुटका करुन घेतली. तेथून ते निवडक सहकाऱ्यांसह १२ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडावर सुखरुप पोचले. त्यांच्यानंतर काही दिवसांनी २० नोव्हेंबर १६६६ रोजी

संभाजी व त्यांच्या सोबतचे लोक राजगडावर पोहोचले. २४ फेब्रुवारी १६७० रोजी राजगड किल्ल्यावर राजारामचा जन्म झाला. मुघलांच्या ताब्यातील सिंहगड किल्ला ताब्यात घेण्यासाठी शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसरे याला राजगडावरुनच १६७० मध्ये पाठविले. ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजीने आपल्या प्राणांची आहुती देऊन सिंहगडाचा ताबा घेतला. ही बातमी शिवाजी महाराजांना राजगडावर कळवण्यात आली.[१२२] इसवी सन १६७१-७२ मध्ये शिवाजी महाराजांनी काळाची गरज ओळखून राजधानीचे ठिकाण राजगडावरुन रायगड या ठिकाणी हलवण्याचा निर्णय घेतला. तरीसुध्दा राजगडाच्या नव्या बांधकामाकडे किंवा दुरुस्तीकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. इ. स. १६७१ मधील एका पत्रातील उल्लेखाप्रमाणे राजगडावरील बांधकामासाठी शिवाजी महाराजांनी दहा हजार होन मंजूर केले अशी माहिती मिळते.[१२३] १६८० साली शिवाजी महाराजांचे निधन झाले. स्वराज्याची धुरा संभाजी महाराजांकडे आली. सन १६८१ मध्ये स्वत: औरंगजेब आपल्या प्रचंड फौजफाट्यासह मराठी साम्राज्य गिळंकृत करण्यासाठी दक्षिणेत चालून आला. १६८१ पासून १६८९ पर्यंत संभाजी राजांनी मुघलांच्या आक्रमणाला अत्यंत आत्मविश्वासाने यशस्वीपणे तोंड दिले. संभाजी महाराजांच्या काळात मुघलांना राजगड ताब्यात घेणे जमले नाही. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांना पकडण्यात आले. त्यांना वढू कोरेगाव येथे ठार मारण्यात आले.

संभाजी राजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब बादशहाने मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यासाठी मोहिमच उघडली. त्यामध्ये त्याने अनेक गड जिंकून आपल्या वर्चस्वाखाली आणले. जून १६८९ मध्ये किशोरसिंह हाडा या मुघल सरदाराने राजगड जिंकून आपल्या ताब्यात घेतला. त्यावेळी औरंगजेबाने अबुलखैरखान याला राजगडाचा अधिकारी म्हणून नियुक्त केले. परंतु पुढे मराठ्यांनी लगेचच राजगड किल्ला जिंकून घेतला.

छत्रपती संभाजी महाराजानंतर राजाराम मराठी राज्याचा सूत्रधार बनला. त्याच्या काळात राजगड हेच मुघलांविरुध्द लढा देण्याचे केंद्र बनले होते. जिंजीहून राजाराम महाराज परत येईपर्यंत राजगड किल्ल्याचा ताबा मराठ्यांकडेच होता. सन

१७०० मध्ये राजाराम महाराजांचा मृत्यू सिंहगडावर झाला. इ. स. १७०१ ते १७०३ या काळात राजगड मुघलांच्या ताब्यात होता. त्यानंतर काही काळ तो परत मराठ्यांच्या ताब्यात होता.

११ नोव्हेंबर १७०३ रोजी स्वत: औरंगजेब जातीनिशी राजगड किल्ला जिंकून घेण्यासाठी पुण्याहून निघाला. औरंगजेबाचा हा प्रवास अतिशय कष्टप्रद झाला. राजगडाच्या अलीकडे चार कोस घाटातला रस्ता अतिशय दुर्गम असल्याने औरंगजेबाने एक महिना आधी काही हजार गवंडी, बेलदार, कामदार यांना रस्ता नीट करण्यासाठी पाठविले होते. परंतु अद्याप रस्ता नीट तयार झाला नव्हता. मजल दर मजल करीत औरंगजेब २ डिसेंबर १७०३ रोजी राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी पोचला. त्याने किल्ला ताब्यात घेण्याचे ठरवून किल्ल्यास मोर्चे लावले. किल्ल्याचे बुरुज तीस गज उंच होते. त्यामुळे त्याच उंचीचे दमदमे तयार करुन त्यावर तोफा चढविल्या व बुरुजांवर तोफांचा भडिमार सुरु केला. तरबियतखान आणि हमीबुद्दीनखान याने पद्मावतीच्या बाजूने मोर्चे लावले पुढे दोन महिने झाले तरी किल्ला काही हातात येत नव्हता. शेवटी ४ फेब्रुवारी १७०४ रोजी किल्ल्यावर तोफगोळ्यांचा भडिमार केला व किल्ल्याची तटबंदी उध्वस्त केली. घनघोर लढाईनंतर औरंगजेबाने राजगड किल्ला जिंकून घेतला. या वेळी झालेल्या घमासान लढाईत गडाचे रक्षण करताना मराठ्यांचे संताजी शिलीमकर व शिदोजी थोपटे हे सुवेळा माची जवळ तोफेचा गोळा लागून ठार झाले. औरंगजेब बादशहाने राजगडाचे नाव बदलून 'नबीशाहगड' असे ठेवले.[१२४] त्याने या किल्ल्यावर प्रथम इरादतखानाला किल्लेदार म्हणून नेमले व नंतर मन्सूरखानाकडे किल्लेदारी सोपवली.

इ.स. १७०७ मध्ये गुणाजी सावंत यांनी पंताजी शिवदेव बरोबर राजगडावर स्वारी करुन किल्ला जिंकून घेतला. इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर मराठा मुघल संघर्ष संपला. मुघलांच्या कैदेतून छत्रपती शाहूंची सुटका झाल्यानंतर ताराबाईंशी त्यांचा संघर्ष झाला. त्यामध्ये त्याने बहुतांशी किल्ले ताब्यात घेतले. त्यामध्ये राजगड किल्ल्याचाही समावेश होता. इ.स. १७०८ मध्ये

छत्रपती शाहूने जंजिऱ्याची मोहिम हाती घेतली. त्यावेळी राजगडावरील सचिवांकडे जंजिऱ्याच्या सिद्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी २००० फौज ठेवली होती.[१२५]

छत्रपती शाहूने सुवेळा माचीस ३०० रुपये व संजीवनी माचीस १०० रुपये अशी आर्थिक तरतूद करुन किल्ल्याची व्यवस्था चांगली ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मुघल मराठा संघर्ष संपुष्टात आल्यावर दक्षिणेकडील राजकारणात मोठे बदल घडून आले. पेशवे काळात मराठ्यांचा राज्यविस्तार मोठ्या प्रमाणात उत्तरेकडे झाला. पेशवे काळात युध्दभूमीचे ठिकाण डोंगर दऱ्यांवरुन सपाट प्रदेशावर आले. या काळात गिरीदुर्गांचे महत्त्व झपाट्याने कमी होऊ लागले. पेशवेकाळात या किल्ल्याकडे इतर किल्ल्यांप्रमाणे दुर्लक्ष झाले. तरीही प्रत्येक किल्ल्यावर ठराविक शिबंदी ठेवली जात असे. विशेष मोहिमेच्या वेळी किल्ल्यावरील शिबंदीला मदतीसाठी बोलावले जात असे.

पेशवे काळात राजगड किल्ल्याचा ताबा भोर संस्थानाच्या सचिवांकडे होता. त्या काळात मराठा राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. त्यामुळे किल्ल्यावरील अधिकाऱ्यांचे पगार नियमित होत नव्हते. सन १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठी राज्य नष्ट केले. त्यानंतर देखील राजगड सचिवांच्या ताब्यात होता. इ. स. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भोर संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले. त्याचबरोबर राजगडावरील संस्थानिकांचा हक्क संपुष्टात आला आणि किल्ल्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले.

पुणे जिल्ह्यातील राजगडाचे राष्ट्रीय स्मारकामध्ये रुपांतर करण्याबद्दल जनतेकडून वारंवार केल्या जाणाऱ्या सूचनांमुळे १९७५ साली राजगड किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून जाहीर केला गेला. सद्यस्थितीमध्ये राजगड किल्ल्याचा ताबा महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाकडे आहे. राजगड किल्ल्यावर अनेक ठिकाणी पुरातत्त्व विभागाने लक्ष देऊन वास्तूंची डागडुजी, जीर्णोध्दार करण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु शासनाचे हे प्रयत्न फारच अपुरे आहेत. राजगडासारख्या ऐतिहासिक दृष्ट्या समृध्द अशा वारशाकडे अत्यंत गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

किल्ल्यावर पर्यटकांव्दारे मोठ्या प्रमाणात धुडगूस घातला जातो आहे. पार्ट्या सर्रासपणे केल्या जातात. सर्वत्र प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या पिशव्या यांचे साम्राज्य आढळते. अतिशय बेफिकीरीने पर्यटक अशा ठिकाणी वागत असल्याने किल्ल्याचे विद्रुपीकरण झालेले दिसते. रायगड किल्ल्याप्रमाणे राजगड किल्ल्यासही भरघोस निधीची उपलब्धता करुन देऊन समृध्द ऐतिहासिक वारसा जपण्याची काळाची गरज आहे.

## पुरंदर

पुरंदर किल्ला पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात आहे. किल्ल्यांच्या प्रकारांपैकी त्याचा समावेश गिरिदुर्ग प्रकारामध्ये होतो. सह्याद्री पर्वताच्या भुलेश्वर उपरांगेमध्ये पुरंदर समुद्रसपाटीपासून १३९० मी. उंचीवर आहे. पुणे शहरापासून तो सर्वसाधारणपणे ३५ कि.मी. अंतरावर आहे. इ.स.१६४६ मध्ये शिवाजीमहाराजांनी पुरंदर किल्ल्यावरील बेरड जमातीच्या लोकांचे मन वळवले. स्वराज्याची प्रेरणा त्यांना समजावून दिली. पुरंदर स्वराज्यात समाविष्ट केला. इ.स.१६४९ च्या जानेवारी ते मार्च महिन्यादरम्यान शिवाजीमहाराजांनी आदिलशाही फौजांचा पुरंदर किल्ला परिसरात पराभव केला. स्वराज्यकार्याच्या प्रारंभी तोरणा, पुरंदर, सिंहगड, राजगड हे चार किल्ले मावळ प्रांताचे जणू रखवालदारच असल्याने शिवाजींनी ते प्रथम आपल्या ताब्यात आणले. पुरंदर किल्ला ताब्यात घेताना महाराजांनी निळो निळकंठराव नाईकवाडी यास पायात बेड्या घालून कैद केले हाते. त्यांच्या तीन भावांनाही कैदेत टाकले. त्यांनी स्वराज्याप्रती एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतल्यावरच त्यांना सोडण्यात आले. औरंगजेबाने शिवाजीमहाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी मिर्झा जयसिंहास पाठविले. या वेळी पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी यांनी दिलेला लढा मराठ्यांच्या इतिहासात सर्वत्र पसिद्ध आहे. त्यामुळे याठिकाणी त्याविषयी अधिक माहिती न देता अप्रकाशित साधनांच्या आधारे पुरंदर किल्ल्याचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

शिवाजी महाराजांनी पुरंदरचा तह नाईलाजाने स्विकारला. जयसिंहाने मात्र महाराजांकडून पुरंदरच्या वेढ्याचा खर्च रुपये तीस हजार व दारुगोळा यांची भरपाई करुन घेतली.[१२६] दि.१४ मे १६५७ रोजी संभाजी महाराजांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म झाला. संभाजी महाराजांचा औरंगजेबाने खून केला. त्यानंतर स्वतंत्रपणे जाहीरनामा काढून स्वराज्यातील किल्ले काबीज करण्याचा आदेश दिला. शाहू महाराज मुघलांच्या ताब्यातून सुटून आल्यावर त्यांनी स्वराज्य स्थिर करण्यात लक्ष दिले. बाळाजी विश्वनाथाने शाहूंचे आसन स्थिर केले.[१२७] बाळाजी विश्वनाथाच्या काळात पुरंदर किल्ल्याच्या तटांवर महार जातीच्या लोकांची नेमणूक केलेली होती. त्यांना नोकरीमधील कर्तव्यांबरोबरच असणाऱ्या हक्काच्या सोयीसुविधाही मिळत नव्हत्या. त्यासाठी त्यांनी चिमाजी अप्पाकडे तक्रार केली. चिमाजीआप्पाने त्यांचा प्रश्न सोडविला. इ.स.१७२० मध्ये पहिल्या बाजीरावाने पुरंदर किल्ल्याचा बंदोबस्त व्यवस्थित करावा, त्याचप्रमाणे किल्ल्यावरील ऐवज व्यवस्थित टिकवावा अशा सूचना चिमाजी आप्पास केलेल्या दिसतात. इ.स.१७४० मध्ये पहिल्या बाजीरावाचा मृत्यू झाला. नानासाहेब उर्फ बाळाजी बाजीरावाने हरोजी यास पुरंदर किल्ल्याची हवालदारी कायमस्वरुपी दिली.[१२८] दि.३० जानेवारी १७५६ रोजी खंडोजी माणकर याने जावजी बाबागवळी यास पाठविलेल्या पत्रानुसार रुद्राजी धुळप यास पुरंदर किल्ल्यावर आणण्यात आले. त्यासाठी त्याने पालखीची मागणी केलेली होती.[१२९] आप्पाजीराव पाटकर यांनी लिहिलेल्या एका पत्रातील नोंदीप्रमाणे पुरंदर किल्ल्यावरुन दादोजीपंतांनी जो पट पाठविला त्याची पोच मोरोपंतांकडे पाठविली.[१३०] नानासाहेबांच्या कारकिर्दीमध्ये सदाशिवभाऊकडे मराठी राज्याचा आर्थिक कारभार होता. सदाशिवभाऊने प्रत्येक किल्ल्याची संरक्षणव्यवस्था भक्कम केली. पुरंदर व वज्रगड किल्ल्यावर संरक्षणासाठी माणसांची कमतरता होती. सदाशिवभाऊने या ठिकाणी प्रथम कामगारांची भरती केली. त्यांच्या आर्थिक व्यवहाराच्या बाबी पूर्ण करुन घेतल्या.[१३१] बाळाजी बाजीराव पेशव्याने पुरंदरचा तत्कालीन किल्लेदार

श्रीपतीराव बापूजी यास सांगून त्याच्याकडून पुरंदर किल्ल्याची दुरुस्ती, पुरंदरजवळील वज्रगड किल्ल्याचीही दुरुस्ती केली.[१३२] राघोबादादाने पुरंदरच्या वेढ्याच्या कामी बंदोबस्तासाठी राजाराम गोविंद याची नेमणूक केली.[१३३] इ.स.१७६४ मध्ये पुरंदरवर संरक्षणाच्या कामासाठी कोकणामधून काही लोकांना बोलाविले होते. त्यांच्या दैनंदिन कामाचा मोबदला देण्यात यावा असे आदेश राघोबादादाने नाना फडणीसास दि. २६ सप्टेंबर १७६४ रोजी दिले.[१३४] पुरंदर किल्ल्यावर शत्रुपासून संरक्षण करण्यासाठी दारुगोळा पाठविण्यात यावा अशी मागणी पुरंदरचा अधिकारी राजाराम गोविंद याने नाना फडणीसाकडे केली. त्यानुसार तो पाठविण्यात आला.[१३५] पुरंदर किल्ल्यावर जुन्या लोकांनी दंगा करुन घेतला त्यास राजश्री धोंडो मल्हार पुरंधरे यांजकडील कारकून किल्ल्यावर चढला आहे. किल्ल्याचे राजकारणात मशारनिल्हे आहेत. सबब यांचा सरंजाम सरकारांत जप्त करुन जप्तीची कमावीस राजाराम गोविंद यांस सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अंमल सुरळीत देणे म्हणोन मोकदम पुरंदर किल्ला यास सनद दिली.[१३६]

तुळाजी आंग्रेला मदत करणाऱ्या रामाजी शामराज शिणेकर यास कैद करून पायामध्ये बेड्या घालून पुरंदर किल्ल्यावर कैदेत ठेवण्यास पाठविले. त्यास कैदेत असताना जेवणासाठी ज्वारीचे एक शेर पीठ व पावशेर डाळ दररोज देत जाणे, जेवणाच्या वेळी त्याची बेडी काढून घ्यावी. जेवणानंतर मात्र पुन्हा बेडी घालावी असा आदेश माधवरावाने दिला.[१३७] १७६५ मध्ये पुरंदरचा कारभार राघोबादादाकडे असावा. कारण किल्ल्यावर साहित्य भरुन ठेवणे त्याचप्रमाणे किल्ल्याच्या मोर्चावरील लोकांसाठी रोजमुऱ्याची मागणी राघोबाने नाना फडणीसाकडे केली. ती त्वरीत पूर्ण करण्याचा आग्रह धरलेला दिसतो.[१३८] पुरंदर किल्ल्यावर दुसरा सरनोबत नेमण्यात यावा असा ठराव राघोबादादाने आपल्या मनात आणला होता.[१३९] पेशवाईत पुरंदर किल्ल्यावर तुरुंग बनविला गेला. माधवराव पेशव्याच्या काळात रामाजी शामराज हा पुरंदरवर शिक्षा भोगत होता. त्यास पोटाला शिधा व वापरण्यास कपडे देत जावे

असा आदेश माधवरावाने तत्कालीन किल्लेदार रामचंद्र त्रिंबक यास दिला.[१४०] बाबुराव कृष्ण या सरदाराने भिकाजी केशव याची पुरंदरहून माणसे आणून त्यांची नियुक्ती जुन्नर तालुक्यातील जिवधन किल्ल्यावर नियुक्ती केली.[१४१] बाळाजी कृष्ण बेडेकर याणे तुळाजी आंगरे यांचा लेक विसापूर किल्ल्यामधून पळविला व स्वत:ही पळ काढला, म्हणून बेडेकरांच्या माणसांना पुरंदर किल्ल्यावर अटकेत ठेवले. ती पुरंदर किल्ल्यावर सुरक्षित वाटत नाही म्हणून त्यांना पुणे शहरातील तुरुंगात ठेवण्यासाठी पाठवावीत असा आदेश दिला.[१४२]

| | |
|---|---|
| मशारनिल्हेच्या बायका दोघी व कुणबीन एक | वज्रगडावरील भास्कर त्रिंबक लवाट्या |
| असामी ३ | १ |

एकुण चार असामी यांजबरोबर प्यादे देऊन सरकारांत रुजू करणे, म्हणोन नारोआप्पाजी यास सनद.[१४३] तुळाजी आंग्रे यास पुरंदर किल्ल्यावर कैदेत ठेवण्यात आले होते.[१४४]

जगन्नाथ बैरागी, वास्तव्य मठ मौजे गंगापूर, परगणे नाशिक, यांणी हुजुर किल्ले पुरंदर येथील मुक्कामी येऊन विदित केले की, आपण मौजे मजकुरी मठ बांधोन स्वामीस, व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून आहे, त्यास मठांत अतीत अभ्यागत येऊन, अन्नविण विन्मुख होऊन जातात, याकरितां कृपाळू होऊन गांवगन्ना बीतपशील [१४५]

४ परगणे नाशिक
१ कसबे मजकूर
१ मौजे पाथरडी
१ मौजे गंगापूर
१ मौजे ओढे
४

२ परगणे दिंडोरी

१ मौजे जानोरी

१ मौजे जिरनारे

२

१ मौजे वोझर परगणे चांदवड

७

एकुण देहे सात येथे बाजार आहेत. तेथे बाजारचे दिवशी रस्तयांत नवी दुकाने मांडून बसतील त्यास दाण्याचे दुकानास गल्ला एकमूठ व वाणी व चाटी व साळी व सराफ उदमी यांचे दुकानास शिवराई रुके ३ याप्रमाणे नूतन धर्मार्थ करुन दिल्ह्याने याने अतीत अभ्यागत विन्मुख जाणार नाहीत म्हणोन, याजवरुन बनास आणितां, मौजे मजकुरीं, बैरागी मठ बांधून जातात, त्यास अन्न दिले याणें श्रेयस्कर जाणोन, कसबे नाशिक सुद्धा नेहेसात येथील बाजारचे दिवशी रस्तेयांत नवीन दुकान मांडून बसतील त्यांस दाण्याचे दुकानास गला एक मूत्त व वाणी, व चाटी, व साळी, व सराफ, वगैर उदमी यांचे दुकानास शिवराई रुके ३ प्रमाणे नूतन धर्मार्थ सरकार जमाबंदी शिवाय करार करुन दिल्हे असे तरी वाणी व चाटी, व साळी, व सराफ वगैर उदमी यांस ताकीद करुन सदरहूप्रमाणे बैरागी याजकडे चालवणे, प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे, या पत्राची प्रति लिहून घेऊन हेअसल पत्र याजवळ भोगवटियास परतोन देणे म्हणोन, परगणे नाशिक, दिंडोरी, व चांदवङ, सरकार संगमनेर यांस,

१ मोकदम

१ कमाविसदार, वर्तमान व भावी यांस.[१४६]

पुरंदर किल्ल्यावर कोळ्यांनी उठाव केला, या गडबडीमुळे आपणास विलंब झाला आहे असे एका निनावी मोडी पत्रामध्ये उल्लेख आला आहे.[१४७] पुरंदर किल्ल्यावर दादो शंकर भागवत यास अटकेत ठेवले होते, त्याची सुटका करावी अशी विनंती

रामचंद्र महादेव परांजे यांनी पेशवयास केली.[१४८] नारायणराव पेशव्याची बायको गंगाबाईची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी गंगाबाई व पार्वतीबाई या दोघींना पुरंदर किल्ल्यावर पाठविले. ही कामगिरी धोंडो महादेव व सखाराम बापू बोकील या दोघांनी फत्ते कली.[१४९] नारो आनंदराव याने अप्पा पायगुडे यास पुरंदरवर नोकरीसाठी आणले. पुरंदर किल्लयाजवळील घोड्यांच्या पागांची व्यवस्था करण्यासाठी कृष्णराव बल्लाळची नेमणूक करण्यात आली.[१५०]

पुरंदर किल्ल्याचे वार्षिक हिशोबाची कागदपत्रे दरबारात सादर करण्यात आली. या हिशोबामध्ये प्रामुख्याने किल्ल्यावरील कारकून व शिलेदारांच्या रोजच्या पगाराचा व खर्चाचा हिशोब त्याचप्रमाणे मुदाबखरखान्यातील हिशोब व पेशव्याच्या पुरंदर भेटीचा तपशील, शिंदे होळकरांनी किल्ल्यास भेट दिली असता झालेल्या सर्वखर्चाचा तपशील सादर करण्यात आला.[१५१] नाना फडणीसाने पुरंदर किल्लयावरील व किल्ल्याच्या परिसरातील रोख कर वसुल करण्याचे ठरविले असता त्यास कोळ्यांकडून अटकाव करण्यात आला.[१५२] पुरंदर किल्ल्यावरील येसाजी आणि विसाजीपंत यांच्यामध्ये मतभेद झाले, ही वार्ता रामाजी महादेव याने किल्ल्यावरून नाना फडणीसास कळविली.[१५३]

पुरंदर किल्ल्याचा वार्षिक हिशोब सादर करण्यात आला. त्यानुसार पुरंदर किल्ल्यावरील वार्षिक शिलकेचे निवेदन सादर करण्यात यावे अशी आज्ञा पेशव्याने नारो अप्पाजीस केली.[१५४] १७७५ मध्ये पुरंदर किल्ल्यावर गोविंद जगन्नाथ या सरदाराकडील लोकांची नेमणूक करण्यात आली.[१५५] दि.११ डिसेंबर १७७५ रोजी सवाई माधवरावाचा मुक्काम पुरंदर किल्ल्यावर होता. त्यांची व्यवस्था करण्याची जबाबदारी हरिपंत फडके यांच्यावर होती. पेशव्यांना भेटण्यास इंग्रज वकील पुरंदरवर आला होता अशी नोंद नारो भुसकुटे यांनी हरिपंत फडकेंना लिहिलेल्या एका पत्रात आली आहेत.[१५६] इ.स.१७७५ मध्ये पुरंदर किल्ल्यात काम करणाऱ्या कुणबींना लुगडी वाटली. त्या कापडाची यादी व शिलेदारांची यादी पेशवे दप्तरामध्ये उपलब्ध आहे.[१५७]

पुरंदर किल्लयावर पेशव्यांच्या शस्त्रसाठ्याचे भांडार होते. त्यामधून आपणास शस्त्रसाठा पाठवून द्यावा अशी विनंती जनार्दन अप्पाजी करताना दिसतो. पुरंदर किल्ल्यावर व परिसरात गवत जास्त प्रमाणात उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी हत्ती पाळले जात. त्यापैकी मनमोहन नावाचा हत्ती प्रसिद्ध होता. शाही स्वारीसाठी तो वारंवार वापरला जात असे.[१५८] इ.स.१७७७ मध्ये पुरंदर किल्लयावर किती व कोणत्या वस्तू खरेदी करावयाच्या आहेत त्याचा ताळेबंद काढण्यात येत असे. तसा तो प्रत्येक किल्ल्याचा ताळेबंद काढून दरबारात सादर करणे आवश्यक होते.[१५९] पुरंदर किल्ल्यावर दि.११ ऑक्टोंबर १७७७ रोजी परकीय वकील भेटीस आले असता त्यांना कापड भेट देण्यात आले.[१६०]

अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले घनगड यांस सनद की, सखाराम हरी हे किल्ले पुरंदरवर अटकेस होते, ते हल्ली येथुन तुम्हांकडे बेडीसुद्धा पाठविले आहेत, तरी किल्ले मजकुरी बेडीसुद्धा पक्क्या बंदोबस्ताने अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणे देत जाणे, याची बेडी तुम्ही आपले दृष्टीने रोजचे रोज पाहत जाणे, याचे चौकीस लोक ठेवाल ते एका दोन रोजी हेरफेर करुन दुसरे लोक चौकीस नेमीत जाणे, आणि याची रखवाली बहुत खबरदारीने करणे, त्याचबरोबर रखवालीस स्वार दिमंत सदाशिव धोंडदेव व गाडदी दिल्हे आहेत, हे किल्ले मजकुरी पोहोचऊन हुजुर येतील म्हणोन.[१६१]

या वर्षीच्या पुण्यातील वार्षिक रमणा कार्यक्रमासाठी पुरंदर किल्लयावरील पुढील ब्राम्हणांना दक्षिणा देण्यात आली.[१६२]

६६७/-

१० बाळंभट किरकिरे

८ भोविंदभट किरकिरे

१० पुरुषोत्तम भट, पुराणीक

६ बाळंभट मराठ

६० प्रत असामी १२ दर ५ प्रमाणे

१२८ प्रत असामी ३२ दर ४ प्रमाणे

२३१ प्रत असामी ७७ दर ३ प्रमाणे

२०६ प्रत असामी १०३ दर २ प्रमाणे

८ प्रत असामी ८ दर १ प्रमाणे

६६७/- २३६/-

पुरंदर किल्ल्यावर दारुगोळ्याचे भांडार होते स्वारीच्या वेळी किल्ल्याहून जामदारखान्यातील मालाची लष्करामध्ये रवानगी करण्यात येत असे.[१६३]

१२ मे १७८१ या दिवशी पेशव्यांचा मुक्काम पुरंदर किल्ल्यावर होता. पेशव्यांस जेजुरीस देवदर्शनास जायचे असल्याने त्यांना दक्षिणा व भेटवस्तू देण्यात आल्या.[१६४] इ.स.१७८४ मध्ये पेशवे आणि इंग्रज यांच्यामध्ये तह झाला. मराठ्यांतर्फे महादजीने तह केला. हा तह पुरंदर किल्ल्यावर झाला.[१६५] इपटेन किल्ले पुरंदरास येऊन सनसीत सबैनांत सरकारसी तह करुन तहनामा जहाला, त्यातील कलम की, परस्वरे मराठ्यांसी व इंग्रजांशी करार जाला की, अगर जहाज, गुराब वगैरबाबत इंग्रजीया जहाज, सौदागरी, जी इंग्रजांच्या पन्हाईत असतील ते जहाज व गुराब वगैर मराठ्यांच्या तालुकियांत कोण्याहि किनाऱ्यावर फुटेल तरी, हरएकविषयी कुमक व मदत जहाजाचा माल व सरंजाम्याच्या निगेबानीसाठी मराठ्यांकडून अथवा त्या स्थलाचे राहणारांकडून जे जरूर पडेल ते करावे, व मालाची निगेबानी करुन जहाजाचे धन्यास सांगावे, चो पैका पावता करील, अंग्रेजांची कंपनी कौल करार करीत आहे, सदरीलप्रमाणे जहाज वगैर सदरील लिहिल्याप्रमाणे कुमक व मदत अंमलात आणतील.[१६६]

पुरंदरचा किल्लेदार रामचंद्र नारायण यांच्याकडून पुण्यातील वार्षिक रमणा कार्यक्रमासाठी शंभर सैनिकांना बोलावण्यात आले. पुण्यातील बंदोबस्तासाठी या सैनिकांची आवश्यकता होती, म्हणून रामचंद्र नारायण यांनी २०० सैनिक पाठविले.

दरबारामार्फत त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली.[१६७] कर्नाटक स्वारीमध्ये मदत करण्यासाठी पुरंदरचा किल्लेदार रामचंद्र नारायण यांच्याकडून १०० सैनिकांची तुकडी मदतीस बोलावली.[१६८] तालुके व किल्लेहाय येथील कोठ्यांच्या शिलका व गल्ला व वजन व जंगी सामान वगैरे सुद्धा इस्तकाबील सन खमस तिसेन तागाईत गुदस्त सन आबी मयातैन अखेर पावेतो मामलेदार सालोसाल नेमणूक अन्वये कसकसे राखीत आले त्याचे झाडे तपसीलवार समजले पाहितेज. याजकरिता सनद सादर केली असे. तरी सनद दाखल होताच सदरहू प्रमाणे झाडे तपसीलवार तयार करून जलद हुजूर पाठवून देणे. लिहिल्याप्रमाणे लौकर झाडे न आल्यास कार्यास येणार नाही. म्हणोन तालुके व किल्लेनिहाय येथील कारखानीस वगैरे यांस सनदा.

पुरंदर किल्ल्यांच्या झाडाचा (देहझाडा) हिशोब पाठवावा म्हणून मल्हार सदाशिव यास पत्र पाठविले. वज्रगडचा हिशोब द्यावा म्हणून सदाशिव माधवराव यास पत्रे पाठविली.[१६९] पेशवे दरबारातील श्रावण महिन्यामधील होणाऱ्या रमणा समारंभाच्या बंदोबस्तास पुण्यामध्ये पुरंदर किल्ल्यावरुन २०० लोक बोलाविले. त्यावेळी पुरंदरचा कारभार विठोजी गायकवाड याच्याकडे होता.[१७०] पुरंदरच्या मुक्कामात इंग्रजांचा व सरकारचा तह झाला. त्यातील कलमे, ग्वालेरचे मुक्कामी महादजी शिंदे यांचे विद्यमाने इंग्रजांचा व सरकारचा तह झाला, त्यातील कलमे, गोविंदराव गायकवाड, मानसिंगराव गायकवाड, फत्तेसिंगराव गायकवाड यांच्यासंबंधी कलमे व भडोच महालासंबंधीच्या तहाच्या वाटाघाटी यांच्या याद्या.[१७१]

दि.२ सप्टेंबर १८१७ रोजी मेजर किलीन आणि रसूल यांनी पुरंदर किल्ल्यास भेट दिली. त्यांच्या समवेत बाळाजीपंत नातू, महंमद हमीन मुनशी व फोर्ड इत्यादी मंडळी होती. त्यादिवशी एल्फिन्स्टन पुरंदर किल्ल्यावर होता.[१७२] पुरंदर आणि वज्रगड किल्यावर चाकरीस असलेल्या लोकांची जप्ती करण्यात आली. जप्त करण्यास आलेल्या कारकूनास सहकार्य करावे असा आदेश दुसऱ्या बाजीरावाने पुरंदरचा किल्ल्यावरील अधिकारी चिमणाजी पंडीत यास दिला.[१७३] पुरंदरच्या पायथ्याशी

महाकाली नावाची मोठी तोफ होती. ती इंग्रजांना हवी असल्याने ती नेण्यासाठी इंग्रज पलटणी पुरंदरकडे आल्या.[१७४] पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी बेरडांची वस्ती होती. इंग्रजांनी त्यांच्या हक्कांवर गदा आणताच त्यांनी इंग्रजांविरुद्ध दंगा केला. पुरंदरच्या इतिहासात हा दंगा बेरडांचा दंगा म्हणून प्रसिद्ध आहे.[१७५] १८२० च्या नोव्हेंबर महिन्यात पुरंदरच्या पायथ्याशी बेरडांनी केलेला दंगा मिटवावा अशी सुचना मोडी कागदपत्रांमध्ये नमूद आहे.[१७६] पुरंदर किल्ल्याचा मोकासा चिमणाजी साने व वासुदेव साने यांना दिला होता. [१७७] ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर पुढे हा मोकासा आपणाकडे चालू ठेवावा अशी विनंती अर्ज या दोघांनी इंग्रज अधिकाऱ्यांकडे दिला.[१७८] पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांच्या संक्षिप्त इतिहासाची मांडणी केल्यानंतर यापुढील प्रकरणात आपण सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास पाहणार आहोत.

## संदर्भ व तळटिपा

१. शां. भा. देव, महाराष्ट्राचा इतिहास, **प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड १, भाग १**, मुंबई, २००२, पृ. ४.
२. ग. ह. खरे, **दुर्ग**, सह्याद्री विहार मंडळ, मुंबई, १९८०, पृ. १३.
३. अ. रा. कुलकर्णी, **शिवकालीन महाराष्ट्र**, पुणे, १९९३, पृ. ९५.
४. दीपक देशपांडे, **स्वराज्यातील किल्ले**, (समाविष्ट-माध्यम-मासिक) अंक-१, सप्टेंबर १९९५, पृ. ५६.
५. पां. रा. नंदुरबारकर, (संपा.), **श्रीशिवदिग्विजय (श्री शिवाजी महाराजांची बखर)**, बडोदे, १८७५, पृ. १९०.
६. अ. रा. कुलकर्णी (संपा.), **रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र**, पुणे, २००४, पृ. १७५.
७. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत खंड १**, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९९९, पृ. १०९.
८. श्रीधर रंगनाथ कुळकर्णी, **शिवकालीन राजनीती आणि रणनीती**, मुंबई, १९९४, पृ. ६०.

९. एस. एन. सेन, **मराठ्यांची लष्करी व्यवस्था**, (अनु. डॉ. सदाशिव शिवदे), पुणे, २०११, पृ. ७९.

१०. पद्मश्री बाळासाहेब पाटील, **रणरागिणी ताराराणी चरित्र ग्रंथ**, कोल्हापूर, मार्च १९८१, पृ. ४९.

११. न. चि. केळकर व द. वि. आपटे (संपा.), **शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड १**, पुणे, १९३०, ले. ९८२.

१२. S. N. Sen, **Military System of Marathas**, Calcutta, 1925. P. 95

१३. र. वि. हेरवाडकर (संपा.), **मल्हार रामराव चिटणीस विरचित श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र**, , पुणे, व्दितीय आवृत्ती, २०००, पृ. २०६-२१३.

१४. प्र. के. घाणेकर, **साद सह्याद्रीचीः भटकंती किल्ल्यांची**, पुणे, १९९५, पृ. २५५.

१५. भ. ग. कुंटे, **अहमदनगरची निजामशाही**, मुंबई, १९६२, पृ. ५.

१६. ग. ह. खरे, (संपा.), **ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ३**, पुणे १९७३, पृ. १२५.

१७. Woolsley and Haig (Ed.), **Cambridge History of India, Vol. III**, Delhi, 1958, (Reprint), P. 433.

१८. वा. सी. बेंद्रे, **मालोजीराजे आणि शहाजी महाराज**, कोल्हापूर, २०१३, व्दितीय आवृत्ती, पृ. १०७.

१९. **कित्ता**, पृ. १०८.

२०. ग. भा. मेहेंदळे, **श्री राजा शिवछत्रपती**, पुणे, १९९८, पृ. ४६३.

२१. वा. सी. बेंद्रे, **पूर्वोक्त**, पृ. १२७-१२८.

२२. सदाशिव दिवेकर (संपा.), **कवींन्द्र परमानन्दकृत शिवभारत** (संस्कृत मूळ व मराठी भाषांतर), पुणे, १९९८, दुसरी आवृत्ती, पृ. ६५-६७.

२३. द. वि. आपटे, **शहाजी व निजामशाही, शिवचरित्र निबंधावली**, पुणे, १९२९, पृ. ४६-४७.

२४. खं. आ. गायकवाड (संपा.), **करवीर सरदारांच्या कैफियती**, कोल्हापूर, १९७१, पृ. २७४.

२५. दि. वि. काळे, **छत्रपती शिवाजी महाराज**, पुणे, १९६२, पृ. २२-२५.

२६. ग. भा. मेहेंदळे, **पूर्वोक्त**, खंड १, भाग १, पृ. ५३५.

२७. **कित्ता**, पृ. ५६०.

२८. सुरेश जाधव, **जुन्नर-शिवनेरी परिसर**, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ. १०.

२९. गो. स. सरदेसाई, **पूर्वोक्त**, पृ. १३३-१३५.

३०. ग. भा. मेहेंदळे, **पूर्वोक्त,** पृ. ८२१.

३१. ग. ह. खरे (संपा.), **ऐतिहासिक फार्सी साहित्य (औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार) खंड ६**, पुणे, १९७३, ले. २९३, पृ. १६८-१६९.

३२. वि. गो. खोबरेकर, **महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग २**, (१७०७-१८१८), मुंबई, १९८८, पृ. ३५.

३३. वा. सी. बेंद्रे (संपा), **महाराष्ट्र इतिहासाची साधने, खंड २**, मुंबई, १९६६, पृ. ५५८-५६०.

३४. वि. का. राजवाडे (संपा.), **मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २**, (संपादन व पुनर्मुद्रण प्र. न. देशपांडे), धुळे, १९१८, पृ. १४३.

३५. वा. कृ. भावे, **पेशवेकालीन महाराष्ट्र**, पुणे, १९५६, पृ. ४१०.

३६. ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी (संपा.), **मराठ्यांचा इतिहास, खंड ३**, पुणे, १९८६, पृ. ३२.

३७. गणेश चिमणाजी वाड (संपा.), **नानासाहेब पेशवा रोजनिशी**, पुणे, १९०८, पृ. ७०.

३८. संदीप तापकीर, **महाराजांच्या जहागिरीतून पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले**, पुणे, २०१२, पृ. १९.

३९. कुमार केतकर, **कथा स्वातंत्र्याची**, पुणे, १९८५, पृ. १.

४०. अ. रा. कुलकर्णी, **कंपनी सरकार**, पुणे, २०००, पृ. ७६.

४१. चंद्रकांत अभंग, **जुन्नर परिसरातील किल्ले पाडण्यासंबंधीची ईस्ट इंडिया कंपनीची अप्रकाशित कागदपत्रे**, नवभारत, जून २०१२, पृ. २९-३५.

४२. **कित्ता**, पृ. २९-३५.

४३. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), **पूर्वोक्त**, पृ. २२३.

४४. संदीप तापकीर, पूर्वोक्त, पृ. १९.

४५. महाराष्ट्र शासन, गृहविभाग (पर्यटन) शासन निर्णय विभाग, गृहविभाग क्रमांक एमटीसी/ २००३/९/ प्र. क्र. ४८३/पर्यटन दि. ०७ फेब्रुवारी २००४.

४६. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, ऑगस्ट २०१४, पृ. ५८.

४७. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक विकाक - २०१५/१२/प्र.क्र. ६७१/पर्यटन, दि. २२ डिसेंबर, २०१५.

४८. भगवान चिले, गडकोट, कोल्हापूर, चौथी आवृत्ती, २००८, पृ. ४२.

४९. http://www.maharashtratourism.gov.in/treasures/fort/lohgad/visapur.

५०. प्र. के. घाणेकर, **गड आणि कोट**, तृतीय आवृत्ती, पुणे, २०१४, पृ. ५७.

५१. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. १८५.

५२. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १५**, मुंबई, १९७७, पृ. ८३७.

५३. दत्ताजी नलावडे, **छत्रपती शिवरायांचे वैभवशाली किल्ले**, पुणे, २०१४, पृ. ४८.

५४. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), पूर्वोक्त, पृ. ८३७.

५५. महेश तेंडुलकर, **लोहगड-विसापूर-तुंग-तिकोना**, पुणे-२०१०, पृ. ४४.

५६. **कित्ता**, पृ. ४४.

५७. न. चि. केळकर व द. वि. आपटे (संपा.), **शिवकालीन पत्रसार संग्रह भाग-१**, पृ. ३६६.

५८. अ. रा. कुलकर्णी, **जेधे शकावली**, पुणे, २००७, पृ. १३३.

५९. न. चि. केळकर व द. वि. आपटे (संपा.), **शिवकालीन पत्रसार संग्रह खंड-२**, २००९, पृ. ४१३.

६०. महेश तेंडुलकर, **पूर्वोक्त,** पृ. ३४.

६१. Gazetteers of Bombay presidency – Poona District Gazetteer, Vol. XVII, Part – III, P-4.

६२. तापकीर संदीप, **पूर्वोक्त**, पृ. १८६-१८७.

६३. तेंडुलकर महेश, **पूर्वोक्त**, पृ. ३६.

६४. Gazetteers of Bombay presidency, Op. Cit, P.4.

६५. द. ग. देशपांडे, **महाराष्ट्रातील किल्ले**, पुणे, २०११, पृ. २७, २८.

६६. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १५**, मुंबई, १९७७, पृ. ८३७.

६७. **Gazetteers of Bombay presidency**, Op. Cit, P.4.

६८. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, २००९, पृ. ७.

६९. प्रमोद बोराडे, **मावळची राजधानी**, **दुर्ग विसापूर**, पुणे, २०१३, पृ, ५५-५६.

७०. R. C. Tripathi, **Indian Archeology 1984-85 A Review**, Delhi, 1987, P.134.

७१. **Gazetteers of Bombay presidency**, Op. Cit, P.5.

७२. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश, खंड १६**, मुंबई १९९९, पृ. ९५५.

७३. तेंडूलकर महेश, पूर्वोक्त, पृ. ४४.

७४. महेश तेंडुलकर व संदीप तापकीर यांनी आपल्या पुस्तकामध्ये शिवाजी महाराजांनी विसापूर किल्ला बांधला असे विधान केले आहे.

७५. अ. रा. कुलकर्णी, पूर्वोक्त, पृ. १३३.

७६. तापकीर संदीप तापकीर, पूर्वोक्त, पृ. १९५.

७७. कित्ता, पृ. १९५-१९६.

७८. प्रमोद बोराडे , पूर्वोक्त, पृ. ६३-६४.

७९. **Gazetteers of Bombay presidency**, Op. Cit, P.5.

८०. ibid, P-5.

८१. वा. वि. मिराशी, **शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, खंड १**, नागपूर, १९७४, पृ. ६१.

८२. हे. वि. सरदेसाई, **संत संकिर्तन**, पुणे, १९९६, पृ. २१.

८३. अ. रा. कुलकर्णी, **जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ : मराठ्यांचा इतिहासकार व प्रशासक**, पुणे, १९७१, पृ. १९४.

८४. निनाद बेडेकर, **दुर्गकथा**, पुणे, १९९५, पृ. ९३-९४.

८५. अ. रा. कुलकर्णी, **पूर्वोक्त**, पृ. १९४.

८६. **कित्ता**, पृ. १९४.

८७. शं. ना. जोशी,(संपा.), **शिवकालीन पत्र-सार-संग्रह, खंड ३**, पुणे, १९३७, पृ. १.

८८. भ. ग. कुंटे, **पूर्वोक्त**, पृ. ५.

८९. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. १५०.

९०. प्र. के घाणेकर, **दुर्गांच्या देशात**, पुणे, २००१ पृ. ७.

९१. भगवान चिले, **दुर्गसंपदा महाराष्ट्राची**, कोल्हापूर, २०१३ , पृ. ५९.

९२. शांताराम आवळसकर, **रायगडाची जीवनगाथा**, मुंबई, २००५, पृ. २७.

९३. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. १५२.

९४. मुं. बा. शहा (संपा.), **इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड ११**, धुळे, १९९८, पृ. ५१.

९५. प्रमोद मांडे, **गड किल्ले महाराष्ट्राचे**, पुणे, २०१०, पृ. २६६.

९६. ग. ह. खरे, **सिंहगड**, पुणे, १९६९, पृ. १.

९७. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. १००.

९८. **कित्ता**, पृ. १००.

९९. ल. श्री. वाकणकर (संपा.), **महाराष्ट्र इतिहास आणि संस्कृती पर्यालोचन,** पुणे, १९९५, पृ. १२८.

१००. ग. ह. खरे, **पूर्वोक्त**, पृ. ९.

१०१. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. १०१.

१०२. प्रविण भोसले, **सिंहगड व पुरंदर**, सांगली, २०१०, पृ. ८.

१०३. भगवान चिले, **पूर्वोक्त**, पृ. ३५.

१०४. प्र. के. घाणेकर, **पूर्वोक्त**, पृ. ६१.

१०५. अधिक माहितीसाठी पहा :-

जयसिंगराव पवार, **शिवपुत्र छत्रपती राजाराम महाराज**, कोल्हापूर, २०१८.

१०६. ग. ह. खरे, **पूर्वोक्त**, पृ. २१.

१०७. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १९**, मुंबई. पृ. ७४९.

१०८. **कित्ता**, पृ. ७४९.

१०९. ग. ह. खरे, **पूर्वोक्त**, पृ.२५.

११०. **कित्ता**, पृ. २८.

१११. सतीश अक्कलकोट, **पूर्वोक्त**, पृ. ४३६.

११२. ग. ह. खरे, **पूर्वोक्त**, पृ. ३०.

११३. द. ग. देशपांडे, **पूर्वोक्त**, पृ. १९६.

११४. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. १०७.

११५. प्र. के. घाणेकर, **साद सह्याद्रीची**, **भटकंती किल्ल्यांची**, पुणे, १९९५, पृ. १७५.

११६. प्र. न. देशपांडे, **राजगड दर्शन**, मुंबई, १९८१, पृ. १.

११७. ग. ह. खरे, **स्वराज्यातील तीन दुर्ग**, पुणे,१९६७, पृ. २०.

११८. प्र. के. घाणेकर, **गडांचा गड राजगड**, पुणे, व्दितीय आवृत्ती, २०११, पृ. २२.

११९. प्र. न. देशपांडे, **पूर्वोक्त**, पृ. ५-७.

१२०. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १४**, मुंबई, पृ. ६९६.

१२१. संदीप तापकीर, **पूर्वोक्त**, पृ. ८९.

१२२. प्र. न. देशपांडे, **पूर्वोक्त,** पृ. ९.

१२३. प्र. के. घाणेकर, **पूर्वोक्त**, पृ. ३१,

१२४. आर. डी. गायकवाड व इतर, **शिवाजी महाराजांचे सहा किल्ले**, सातारा, २००९, पृ. १३०.

१२५. गो.स.सरदेसाई**, मराठी रियासत**, खंड १, मुंबई, १९९८, पृ. २३२.

१२६. महेन्द्र खडगावत**, पुरन्धर की संधि,** बिकानेर, २०१६, पृ. २.

१२७. **सं. नि. का**., द. ३, पु. २, प. १४६५.

१२८. **सं. नि. का.,** द. २, पु. ३, प. ११३६.

१२९. **सं. नि. का**., द. ४, पु. १, प. १८५१.

१३०. का. ना. साने, (संपा.), **बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी**, मुंबई, १९११, पृ. १८८.

१३१. **सं. नि. का**., द. ६, पु. १, प. ३१००.

१३२. **सं. नि. का**., द. १९, पु. ७, प. १११६०.

१३३. **सं. नि. का**., द. ८, पु. ६, प. ४६८६.

१३४. **सं. नि. का**., द. ६, पु. ३, प. ३४४०.

१३५. **सं. नि. का**., द. १२, पु. ६, प. ६७९२.

१३६. **सं. नि. का.,** द. ११, पु. ८, प. ६०३५.

१३७. **सं. नि. का**., द. १५, पु. ३, प. ८५१२

१३८. बापु जोशी (संपा.), **सातारकर राजे व पेशवे यांच्या रोजनिशीतील निवडक उतारे, भाग ७, माधवराव पेशवा,** भाग २, मुंबई, १९११, पृ. १८९.

१३९. का. ना. साने (संपा.), **थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, मुंबई, १९११, पृ.३६०.

१४०. बापु जोशी (संपा.), **सातारकर राजे व पेशवे यांच्या रोजनिशीतील निवडक उतारे, भाग ७, माधवराव बल्लाळ,** मुंबई, १९११, पृ. २३९.

१४१. **सं. नि. का.**, द. १२, पु. ४, प. ६५८९.

१४२. **सं. नि. का.**, द. १०, पु. १, प. ५३५६.

१४३. **सं. नि. का.**, द. २१, पु. १, प. १२६२५.

१४४. **सं. नि. का.**, द. १८, पु. ३, प. ९५७६.

१४५. का. ना. साने (संपा.), **थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, मुंबई, १९११, पृ. १२१.

१४६. **सं. नि. का.**, द. ६, पु. १, प. ३१०५.

१४७. गणेश वाड (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९११, पृ. १८३.

१४८. **सं. नि. का.,** द. १२, पु. १, प. ६१४१.

१४९. **सं. नि. का.**, द. १९, पु. ५, प. १०८९९.

१५०. **सं. नि. का.,** द. १८, पु. ३, प. ९५२२.

१५१. **सं. नि. का.**, द. १८, पु. ४, प. ९६७३.

१५२. **सं. नि. का.**, द. १८, पु. ३, प. ९४४०.

१५३. **सं. नि. का.,** द. ११, पु. ७, प. ५९६३.

१५४. **सं. नि. का.,** द. १४, पु. ४, प. ७८७१.

१५५. **सं. नि. का.**, द. १४, पु. १ प. ७५४९.

१५६. **सं. नि. का.**, द. १८, पु. ६, प. १०३१२.

१५७. **सं. नि. का.**, द. २२, पु. २, प. १३३०८.

१५८. **सं. नि. का.**, द. १८, पु. ६, प. १०२८४ व १०२८५.

१५९. काशिनाथ मराठे (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९०८, पृ.९४.

१६०. **सं. नि. का.,** द. २०, पु. १, प. ११६८०.

१६१. **सं. नि. का.**, द. १९, पु. ७, प. ११०२१.

१६२. **सं. नि. का.**, द. १९, पु. ९, प. ११२७५ ते ११२८१.

१६३. **सं. नि. का.**, द. १८, पु. ६, प. १०२३३.

१६४. काशिनाथ मराठे (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९०८, पृ. ५९.

१६५. गणेश चिमणाजी वाड (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनीशी** ३, पुणे, १९११, पृ. १४३.

१६६. गणेश वाड (संपा.), **स. मा. पे. रो.**, पुणे, १९११, पृ. १९६.

१६७. **सं. नि. का.**, द. १९, पु. १०, प. ११२९०.

१६८. **सं. नि.का.**, द.१८, पु.७, प.१०५१६.

१६९. काशिनाथ मराठे (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे, १९०८, पृ.६५-६६.

१७०. गणेश वाड (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी,** पुणे, १९११, पृ. २०१.

१७१. काशिनाथ मराठे (संपा.), **सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी**, पुणे १९०८, पृ. २४.

१७२. बापू जोशी (संपा.), **दुसरा बाजीराव रोजनिशी**, पुणे, १९०८, पृ. १९१-१९५.

१७३. **कित्ता**, पृ. २३७-२३८.

१७४. **सं. नि. का.**, द. ५५, पु. २, प. २४४८९.

१७५. **सं. नि. का.**, द. ३४, पु. १, प. १८६७५.

१७६. **सं. नि. का.**, द. २९, पु. २, प. १६०८८.

१७७. **सं. नि. का.,** द. २६, पु. ६, प. १६४४४.

१७८. **सं. नि. का.**, द. ३९, पु. ५, प. ४६.

## प्रकरण तिसरे

# सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास

महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये प्राचीन काळापासून गड व किल्ल्यांनी अत्यंत कळीची भूमिका बजावली आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव आणि मराठा कालखंडातही किल्ल्यांना राज्यव्यवस्थेत लष्करीदृष्ट्या, संरक्षणदृष्ट्या व आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. महाराष्ट्राच्या विस्तीर्ण अशा भूमीवर गडकिल्ल्यांमुळेच इतिहास घडला. महाराष्ट्राच्या विशाल प्रदेशावर प्राचीन काळापासून ज्या ज्या राजवटी राज्य करुन गेल्या त्या त्या राजवटींच्या इतिहासाचे हे गड किल्ले मूक साक्षीदारच आहेत. सह्याद्रीच्या पर्वतरांगांवर पसरलेल्या अनेक किल्ल्यांनी भौगोलिक व सामाजिक महत्व अधोरेखित केले. आजही आपणांस सह्याद्रीमधील विविध किल्ल्यांवर तत्कालीन राजवटीच्या खुणा, भव्य प्रवेशव्दारे, देवालये, पाण्याच्या टाक्या, तळी, माच्या, तटबंदी, इमारतींचे भग्नावशेष, मंदिरे यामधून आपला प्रेरणादायी इतिहास समजतो. आजही हे गडकिल्ले आपले प्रेरणास्त्रोत आहेत. आपल्या जाज्वल्य इतिहासाचे प्रतीक म्हणून सह्याद्रीतील किल्ले अमूल्य ऐतिहासिक वारसा आहेत.

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सातारा जिल्ह्यातील एकूण २४ किल्ल्यांपैकी तीन किल्ल्यांची निवड केली आहे. अजिंक्यतारा, प्रतापगड आणि सज्जनगड अशा तीन किल्ल्यांचा इतिहास प्रस्तुत ठिकाणी मांडण्यात आला आहे.

### अजिंक्यतारा

सातारा शहरास लागून असलेला अजिंक्यतारा किल्ला हा इतिहास प्रसिद्ध आहे. अजिंक्यतारा हा किल्ला साताराचा किल्ला या नावानेही ओळखला जातो. सातारा शहरामध्ये कुठेही उभे राहिले असता हा किल्ला नजरेस पडतो. प्रतापगडापासून फुटणाऱ्या बामणोली डोंगररांगेवर अजिंक्यतारा किल्ला वसलेला आहे. किल्ल्यांच्या प्रकारापैकी गिरीदुर्ग प्रकारात हा किल्ला मोडतो. अजिंक्यताऱ्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १०६७ मी. असून किल्ल्याची लांबी पूर्व पश्चिम अंदाजे ३३०० फूट आहे व दक्षिणोत्तर रुंदी १८०० फूट आहे.

सातारा या संज्ञेचे अनेक अर्थ आणि व्युत्पत्ती सांगितले गेल्याचे दिसून येते. सात दरा, महादरा, सप्त तारा या शब्दांपासून सातारा शब्दाची उत्पत्ती झाल्याचे सांगतात. पूर्वी सातारा या नावाने प्रचलित असलेल्या अजिंक्यतारा किल्ल्यावरील सप्तऋषींच्या देवालयामुळे या किल्ल्यास सातारा नाव पडले असावे. सातारा याचा अर्थ ईशान्य दिशा असाही होतो. हा किल्ला पन्हाळा राजधानी असलेल्या शिलाहार राजा दुसरा भोज याने बांधला असावा असा समज आहे. म्हणून पन्हाळ्याच्या ईशान्येस असल्याने सातारा असाही अर्थ निघतो. किल्ल्यास असलेल्या सतरा दरवाजांवरुन सतराचा अपभ्रंश होऊन सातारा शब्द रुढ झाला असावा अशीही शक्यता वाटते. परंतु येथील भूमीची विशेषत: त्यापैकी एकाही व्युत्पत्तीने स्पष्ट होत नाही. कन्नडमधील सात म्हणे विपुल व सातार म्हणजे विस्तार यावरुन विस्तार करणारा सातारा असाही अर्थ निघतो.[१]

साताऱ्याच्या दक्षिणेस साते नामक गाव असून गावाजवळच्या दऱ्यास सात दरा म्हणतात. त्यावरुन सातारा नाव पडले असावे. सातदऱ्यानंतर महादऱ्याजवळ लोकांनी वस्ती केली त्या भागासही सातारा नाव पडले. 'सितारा' या फारशी शब्दापासून सातारा शब्द आला असावा असाही एक समज आहे. परंतु हे सत्य नसल्याचे वि. का. राजवाडे यांनी व्युत्पत्तीकोशात म्हटले आहे. अजिंक्यताऱ्याचे जुने नांव सप्तर्षींचा किल्ला असे होते.[२] पन्हाळगडावर राज्य करणाऱ्या शिलाहार राजांपैकी दुसरा भोज (इ.स. ११७८-११९३) याने पंधरा किल्ले बांधले असून त्यात सातारा किल्ल्याची नोंद आढळते. परंतु हे पंधरा किल्ले कोणते हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि बावडा, भुदरगड, पन्हाळा, सातारा व विशाळगड हे त्यापैकी होत.[३] यावरुन सातारा हे शहराचे नांव नसून किल्ल्यावरुन त्याच्या नजीकच्या वसाहतीस पडलेले नांव आहे.

सातारा किल्ल्यास मंगळाई, सप्तर्षी, सतारे, उकाबैन, इसमत, आरा, शाहगड व अजीमतारा अशी नावे आहेत. यापैकी पहिली तीन नावे प्राचीन असून उकाबैन नाव बहमनी राज्यातील व त्यानंतरच्या आदिलशाहीतील आहे. इसमतारा नाव अहमदनगर बादशहा हुसेन निजामशहा याची मुलगी व विजापूरचा बादशहा

अली आदिलशहा याची राणी चांदबिबी हिला तिचा वजीर किशवर खान याने इ.स. १५८२ मध्ये सातारा किल्ल्यात कैद करुन ठेवले होते त्यावेळी मिळाले. अजीमतारा नाव इ.स.१७०० मध्ये औरंगजेबाने हा किल्ला घेतला त्यावेळी त्याचा मुलगा अजीमशहा याच्या नावावरुन दिले आहे.[४]

तारा म्हणजे किल्ला, साताऱ्याभोवती सात किल्ले आहेत म्हणून साततारे, सात्तारे असा शब्द तयार झाला. किल्ल्यावर सप्तऋषींचे देऊळ होते. हे सप्तऋषी म्हणजे आकाशातील सात तारे होत. त्यावरुन साततारे, सात्तारे, सातारा असा शब्द बनला.[५]

अजिंक्यतारा हा इतिहासप्रसिद्ध डोंगरी किल्ला आहे. हा ज्या भूभागावर आहे तो भू-भाग इ.स.पूर्वी २०० वर्षे बौध्दांच्या अंमलाखाली होता. याच्यानंतर इ.स.पूर्वी ९० ते ३०० पर्यंत आंध्रभत्य राजांच्याकडे होता. या नंतरच्या काळात हा प्रदेश कोणत्या राजवंशाकडे होता हे साधने उपलब्ध नसल्याने निश्चित सांगता येत नाही. काही ताम्रपटावरुन इ.स. १२०० पर्यंत या प्रदेशावर चालुक्य व राष्ट्रकूट यांचा अंमल होता असे दिसते.[६] अजिंक्यतारा किल्ल्यावर कोठेही शिलालेख वगैरे अद्याप सापडलेले नाहीत. या किल्ल्याचा उल्लेख निरनिराळ्या प्रसंगाने ऐतिहासिक पुस्तकातून आलेला सापडतो. या उल्लेखात हा किल्ला कोल्हापूरचा शिलाहार वंशीय राजा दुसरा भोज, या राजाने बांधला असा मजकूर आढळतो. त्याची राजधानी पन्हाळा होती. या राजाने अनेक किल्ले बांधले असून सातारा हा किल्ला त्याने इ.स. ११९० मध्ये बांधला.[७]

साताऱ्याचा प्रथम लिखित उल्लेख चौथा बहमनी राजा मुहम्मदशहा (इ.स. १३५८-१३६५) च्या काळातील असून त्याने हा किल्ला दुरुस्त केला असावा. बहमनी नंतरच्या काळात या किल्ल्यावर अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. इ.स. १५७९ मध्ये विजापूर सरदार किशवर खानाने विजापूरची राणी चांदबिबीवर आरोप ठेवून तिला सातारा किल्ल्यावर कैद करुन ठेवले.[८] परंतु त्याच वर्षी किशवरखानाचा पाडाव झाल्याने चांदबिबीची सुटका झाली. सन १५९२ मध्ये विजापूरचा वकील दिलावरखान याला सातारा किल्ल्यावर बंदी म्हणून पाठविण्यात

आले होते. काही कालावधीतच तो तेथे मरण पावला.[९] विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात असलेला हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ जुलै १६७३ रोजी आपल्या ताब्यात घेतला.[१०] कर्नाटक मोहिमेच्या आधी शिवाजी महाराज डिसेंबर १६७५ व जानेवारी १६७६ मध्ये आजारी पडले असताना त्यांचा मुक्काम सातारा किल्ल्यावर होता. या किल्ल्यावरुन त्यांनी देशसेवा, अनुष्ठाने व दानधर्म केला.[११] साताऱ्याच्या किल्ल्यास राजारामाने मराठ्यांच्या राजधानीचा मान दिला. साताऱ्याचा किल्ला (अजिंक्यतारा) हे मराठ्यांच्या राजधानीचे चौथे ठिकाण बनले. यापूर्वीच्या राजगड, रायगड, जिंजी अशा तीन राजधान्या होत्या. राजारामने जून १६९८ मध्ये विशाळगड किल्ल्यावरुन राजधानी येथे आणली.[१२] औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेत त्याने हा किल्ला मुघल साम्राज्यास जोडला. दि. ८ डिसेंबर १६९९ ते २१ एप्रिल १७०० या काळात औरंगजेबाने किल्ल्यास वेढा घालून तो काबीज केला.[१३] त्यावेळी गडाच्या किल्लेदारपदी प्रयागजी प्रभू होते. १३ एप्रिल १७०० च्या पहाटे मोगलांनी सुरुंग लावण्यासाठी दोन भुयारे खणली आणि बत्ती देताच क्षणभरातच मंगळाईचा बुरुज आकाशात भिरकावला गेला. डोगंराचा कडा एकदम आकाशात उडून बुरुजावर पडला व मराठ्यांचे शेकडो लोक प्राणास मुकले. किल्लेदार प्रयागजी प्रभू देखील या स्फोटात सापडले परंतु काहीही इजा न होता ते वाचले. तेवढ्यात दुसऱ्या सुरुंगाचा स्फोट झाला. मोठा तट पुढे घुसू पाहणाऱ्या मोगल सैनिकांच्या तुकडीवर ढासळला त्यात दोन हजार मोगल सैनिक मारले गेले. औरंगजेब बादशहाने स्वत: सर्व फौजेच्या पुढे येऊन सैन्यास धीर दिला व पुन्हा त्वेषाने लढण्यास उद्युक्त केले. त्यानंतर मात्र मराठ्यांचा टिकाव फार दिवस लागणे शक्य नव्हते. किल्ल्यातील सर्व दाणागोटा व दारूगोळा संपुष्टात आला होता. तसेच कित्येक लोक जखमी झाले होते. शेवटी परशुराम त्र्यंबकने आपण होऊन किल्ला स्वाधीन करतो असे शहाजादा आझम मार्फत औरंगजेबास कळविले. औरंगजेबाने ते तत्काळ मान्य केले. २१ एप्रिल १७०० रोजी किल्ल्यावर मोगलांचे निशाण फडकले. यावेळी औरंगजेबाने किल्ल्याचे नाव 'अजमतारा' असे ठेवले.[१४]

इ.स. १७०६ मध्ये सातारचा किल्ला मराठा प्रतिनिधी परशुराम त्र्यंबकने पुन्हा काबीज केला.[१५] त्यावेळी महाराणी ताराबाईची सत्ता होती. ८ मे १७०७ रोजी संभाजीपुत्र शाहूंची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली. तो ऑक्टोंबर १७०७ मध्ये शिरवळहून सातारा जिल्ह्यातील चंदनवंदन या किल्ल्यावर आला. तेथून त्याने सातारा किल्ला आपल्या ताब्यात द्यावा असे प्रतिनिधींना सांगितले. त्यावेळी महाराणी ताराबाई प्रतिनिधीकडे किल्ल्याची जबाबदारी सोपवून पन्हाळ्याकडे निघून गेल्या. त्यावेळी सातारा किल्ल्याचा किल्लेदार वाईचा शेखमिरा होता. तो किल्ला शाहू महाराजांना देण्यास तयार नव्हता म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी त्याच्या मुलास वाईहून पकडून आणून तोफेच्या तोंडी देण्याची धमकी दिली. तेव्हा शेख मिराने प्रतिनिधीस किल्ला शाहूच्या स्वाधीन करण्याचा सल्ला दिला. यावेळी प्रतिनिधीने तो सल्ला न मानल्यामुळे शेख मिराने प्रतिनिधीस पकडून किल्ला शाहूच्या स्वाधीन केला.[१६]

अशा प्रकारे सातारा राजधानी ताब्यात घेऊन शाहू मराठी साम्राज्याचा अधिपती बनला व लगेच शुभमुहूर्त पाहून १२ जानेवारी १७०८ रोजी त्याने आपला राज्याभिषेक समारंभ पार पाडला. छत्रपती शाहू महाराजांनी सातारा शहर वसविले. नानासाहेब पेशवा इ.स. १७४९ मध्ये साताऱ्यास आले होते. त्यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी नानासाहेबांच्या विरोधकांचे ऐकून त्यांचे प्रधानपद दूर केले. परंतु नानासाहेबांची स्वामीनिष्ठा पाहून ते पद पुन्हा दिले.[१७]

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात श्रीपतराव प्रतिनिधींचा मृत्यू २१ नोव्हेंबर १७४६ रोजी सातारा किल्ल्यावर झाला. छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा येथील रंगमहालात झाला. ४ जानेवारी १७५० रोजी सातारा गादीवर रामराजा आला. परंतु त्याने सर्व राज्यकारभार पेशव्यांच्या हाती दिल्याने ही गोष्ट महाराणी ताराबाईस आवडली नाही. तेव्हा महाराणी ताराबाईने २४ नोव्हेंबर १७५० रोजी रामराजास अजिंक्यतारा किल्ल्यावर बोलावून कैद केले. या किल्ल्यावर तो बारा वर्षे कैदेत होता. महाराणी ताराबाईच्या संमतीने रामराजाकडून २० जुलै १७६१ रोजी माधवराव पेशव्यास पेशवाईची वस्त्रे मिळाली. याचवेळी आबा

पुरंदरे यास मुतालकीची व सखाराम बापू यास दिवाणगिरीची वस्त्रे देण्यात आली. सातारा येथे १० डिसेंबर १७६१ रोजी महाराणी ताराबाईचे निधन झाले. पुढे पेशवा माधवराव याच्या मृत्यूनंतर १३ डिसेंबर १७७२ रोजी रामराजाने नारायणरावास पेशवाईची वस्त्रे बहाल केली. यावेळी रिवाजानुसार अष्टप्रधान मंडळाचीही वस्त्रे देण्यात आली.[१८]

छत्रपती रामराजाचा मृत्यू ९ डिसेंबर १७७७ रोजी साताऱ्यात झाला. सातारच्या गादीवर त्याचा दत्तकपुत्र धाकटे शाहूराजे यांना ११ डिसेंबर १७७८ रोजी बसविण्यात आले. नारायणराव पेशव्याच्या मृत्यूनंतर सवाई माधवराव याला पेशवाईची वस्त्रे देण्यात आली. छत्रपती दुसऱ्या शाहूच्या मृत्यूनंतर १६ मे १८०८ रोजी गादीवर छत्रपती प्रतापसिंह महाराज बसले.[१९] अजिंक्यतारा किल्ला कोणत्याही परिस्थितीत ताब्यात घ्यायचा या हेतूने जनरल स्मिथ व जनरल प्रिझलर या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी आपल्या सुसज्ज फौजा साताऱ्याजवळील कोरेगाव येथे आणल्या. तिथून त्यांनी कूच करुन साताऱ्यापासून सुमारे दीड कोसांवर असलेल्या सातारा किल्ल्यास वेढा दिला आणि त्यावर तोफांचा मारा सुरु केला. त्यावेळी किल्ल्यातील सैनिकांकडे इंग्रजांविरुध्द लढण्यासाठी युध्दसामुग्री भरपूर होती. परंतु त्यांच्यात एकवाक्यता व नियोजनाचा अभाव होता. दि. १० फेब्रुवारी १८१८ रोजी सातारा किल्ल्यावर इंग्रजांच्या तोफा धडधडू लागल्या आणि त्याचदिवशी प्रतिकाराअभावी किल्ला इंग्रजांच्या हाती सहज आला. दि. ११ फेब्रुवारी १८१८ रोजी इंग्रजांचे निशाण किल्ल्यावर चढले.[२०] एल्फिन्स्टनने दरबार भरवून प्रतापसिंह महाराजांच्या छत्रपती पदाचा जाहीरनामा काढून त्याच्या मदतीस ग्रँण्ट डफची रेसिडेंट म्हणून नेमणूक केली. २५ सप्टेंबर १८१८ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज व इंग्रज यांच्यात झालेल्या तहानुसार २३ लाख रुपयांचा महसूल असलेला साताऱ्याचा मुलुख प्रतापसिंह महाराजांकडे ठेवून त्याला ब्रिटिशांनी कडक नियमांमध्ये जखडून ठेवले. सुमारे ६४ लाख रुपयांचा पेशव्यांचा व २५ लाख रुपयांचा जहागिरदारांचा प्रदेश ब्रिटिशांनी बळकावून घेतला.

सन १८३१ नंतर प्रतापसिंह महाराज व ब्रिटिश यांच्यात खटके उडू लागले. त्यावेळी मुंबईचा गव्हर्नर रॉबर्ट ग्रॅण्ट व सातारा रेसिडेंट कर्नल ओव्हेन्स यांचे मतभेद प्रतापसिंह महाराजांशी होऊ लागल्याने संबंध बिघडले. या दोघांनी प्रतापसिंह महाराजांच्या ब्रिटिश निष्ठेबाबत संशय व्यक्त करुन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. त्यांना ४ सप्टेंबर १८३९ रोजी पदच्युत केले गेले व त्यांच्या जागी त्यांचे बंधू अप्पासाहेब यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी इंग्रजांनी अप्पासाहेब महाराजांच्याबरोबर तह करुन छत्रपतींचे सर्व अधिकार काढून घेतले व त्यांना सातारा गादीवर बसवले. परंतु त्यांना पुत्र नसल्याने त्यांनी भाऊसाहेब शेडगांवकर यास दत्तक घेतले. ब्रिटिशांनी आपला एकछत्री अंमल भारतभर निर्माण करताना १६ मे १८४९ रोजी हे दत्तकविधान नामंजूर करुन वारसाअभावी राज्य खालसा केले.[२१] अशा प्रकारे छत्रपतींच्या राज्याची इतिश्री झाली.

अजिंक्यतारा किल्ल्याच्या उतारावरच सातारा शहर वसले आहे. अजिंक्यतारा किल्ला असंरक्षित किल्ला असून राज्य वा केंद्रीय पुरातत्त्व खात्याव्दारे या किल्ल्याची देखभाल केली जात नाही. परंतु वनविभागाने किल्ल्याकडे लक्ष देऊन एक स्मृतीवन निर्माण केले आहे. किल्ल्यावर सर्वत्र मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले आहे. रोपांची वाढ चांगली होऊन ती जगण्यासाठी संरक्षक कठडे बसविले आहेत. सध्या अजिंक्यतारा किल्ल्यावर आपणास वाड्याचे उध्वस्त अवशेष दिसतात. सध्या किल्ल्यावर पोलिस दूरवहन मनोरा व त्यासंबंधित वेगवेगळ्या इमारती बांधल्या गेल्या आहेत. या संपूर्ण परिसराला दगडी कुंपणाची भिंत घालून लोखंडी दरवाजा लावण्यात आला आहे. त्या ठिकाणी सदैव पोलिसांचा पहारा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले अजिंक्यताऱ्याला शिवकालीन वैभव पुन्हा प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**प्रतापगड**

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैऋत्येस सुमारे १३ कि.मी. वर प्रतापगड किल्ला वसला आहे. महाबळेश्वर डोंगर रांगेत आंबेनळी घाट व पार घाटामध्ये हा किल्ला आहे. किल्ले प्रकारांत गिरीदुर्ग प्रकारचा हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १०८१ मी. असून दोन्ही बाजूस २०० ते २५० मी. खोल दरी आहे.[२२] किल्ल्याचा पश्चिम व उत्तर भाग हा अत्यंत निमुळता आणि अजिंक्य आहे. पूर्व व दक्षिण भाग प्रचंड खडकांच्या कडेकपाऱ्यांनी व विस्तृत ढिगाऱ्यांनी व्याप्त आहे. या बाजूच्या टेकड्या अत्यंत निमुळत्या असून घनदाट अरण्यांनी व्यापल्या आहेत.[२३] हा किल्ला बांधण्यापूर्वी भोरप्या डोंगर नावाने ओळखला जात होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर इ.स. १६५६ साली भोरप्या डोंगरावर प्रतापगड किल्ला बांधला. वाई, सातारा व महाड या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा किल्ला बांधला गेला.[२४]

इसवी सनाच्या ५ ते ७ व्या शतकामध्ये जावळी भागावर राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. राष्ट्रकूट घराण्यातील एक राजा अविधेय याच्या ताम्रपटात जाऊली किंवा जावळीचा उल्लेख आहे. यादव कालखंडात (११ वे व १२ वे शतक) कोकणच्या मौर्यांचे वंशज मोरे यांच्या ताब्यात जावळी भाग होता. यादव साम्राज्याचा शेवट झाल्यानंतर शिर्के घराण्याने मोऱ्यांकडून जावळी जिंकून घेतली.[२५] शिर्के घराण्यातील तीन चार पिढ्यांपर्यंत त्यांची जावळी भागावर सत्ता होती. विजयनगर साम्राज्याचा सम्राट हरिहर राजाच्या कारकिर्दीत (सन १३५९-१४०४) विजयनगरच्या सैन्याने प्रतापगिरी किल्ला काबीज करुन कोकण प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केली असा उल्लेख मिळतो. हा प्रतापगिरी म्हणजे महाबळेश्वर जवळचा प्रतापगड असावा, असे मत काही संशोधकांनी व्यक्त केले आहे, परंतु प्रतापगिरी म्हणजे प्रतापगड नव्हे.[२६]

बहमनी काळात जावळी प्रदेशावर शिर्के घराण्याची सत्ता होती. बहामनी सेनापती मुहम्मद गवाण याने सन १४६९-७० मध्ये कोकण मोहिमेत शिर्केकडून

रायरी इत्यादी बराच मुलुख घेतला असला तरी जावळीच्या मोठ्या प्रदेशावर शिर्क्यांचे प्रभुत्व कायम होते. त्यांनी बहामनीचे वर्चस्व मान्य केल्यामुळे बहामनी सत्ताधीशांनी तो प्रदेश शिर्केंच्या ताब्यात ठेवला असल्याची शक्यता आहे.[२७] शिर्केनी बहिरवगड हे आपले मुख्य ठाणे केले.

बहामनी साम्राज्याचे विघटन झाल्यानंतर विजापूरला आदिलशाही स्थापन झाली. विजापूरचा आदिलशहा युसूफ आदिलखान याने जावळी हा प्रांत मोरे घराण्याकडे देऊन त्यांना चंद्रराव हा वंशपरंपरागत किताब दिला. त्यानंतर सुमारे सात पिढ्यांपर्यंत मोरे घराणे जावळीचे राजे म्हणून कारभार पाहात होते.

सतराव्या शतकाच्या मध्यात शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेला सुरुवात केली. जावळी प्रदेशाचे मोरे घराणे स्वत:ला स्वतंत्र राजे समजत असत. ते आजूबाजूच्या देशमुखांवर वर्चस्व गाजवत होते. मोरे घराण्यातील यशवंतराव मोरे व हणमंतराव मोरे यांनी आदिलशहाच्या बाजूने राहात शिवाजी महाराजांना उपद्रव देण्यास सुरुवात केली. शिवाजी महाराजांनी जावळी प्रांताचे महत्त्व ओळखले होते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत जावळी ताब्यात घेणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी सुरुवातीला सामोपचाराने यशवंतराव मोरेशी बोलणी करुन पाहिली. परंतु त्याला सकारात्मक प्रतिसाद न येता प्रतिकाराची भाषा आली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी इ.स. १६५६ मध्ये त्यांचा लढाईत पराभव करुन जावळी प्रांतावर कब्जा केला.[२८] जावळी प्रांत ताब्यात आल्यावर भोरप्या डोंगर आणि त्याचे भौगोलिक व लष्करी महत्त्व ओळखून शिवाजी महाराजांनी त्या ठिकाणी किल्ला बांधण्याचे आदेश दिले. शिवाजी महाराजांच्या आज्ञेने मोरोपंत पिंगळे यांनी ४ सप्टेंबर १६५६ रोजी किल्ला बांधून पूर्ण केला.[२९] त्या ठिकाणी पूर्वी असणारी जुनी गढी तशीच ठेवून तिचा बालेकिल्ला केला व त्याची दुरुस्ती करुन घेतली. मुख्य किल्ल्याचे बांधकाम नव्याने करण्यात आले आणि गडाचे पहिले किल्लेदार म्हणून गुणोजी गोविंद यांना नेमले.[३०]

महाराणी सईबाई आजारी असताना जुलै १६५९ मध्ये प्रतापगडावर मुक्कामी होत्या. जेधे शकावलीनुसार छत्रपती शिवाजी महाराज त्यावेळी ११ जुलै १६५९ रोजी

जावळीत आले होते. सईबाईचा आजार वाढल्याने महाराज प्रतापगडावर आले व ५ सप्टेंबर १६५९ रोजी सईबाईंचे निधन झाल्यावर अंत्यसमयी येथे होते.[३१]

शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी विजापूरच्या आदिलशाही दरबारात खलबते सुरु झाली. विजापूर दरबाराने अफजलखान या पराक्रमी सरदारास बारा हजार फौजेनिशी शिवाजी महाराजांना नेस्तनाबूत करण्यासाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. अफजलखानाने अत्यंत आत्मविश्वासाने ही कामगिरी स्वीकारली. अली आदिलशहा (दुसरा) याचा दरबारी तवारिखकार सय्यद नुरुल्ला आपल्या *तारीख-इ-अली आदिलशाही* मध्ये लिहितो, 'सुलतानाने अफजलखानास सांगितले की, शिवाजीला निपटून काढले पाहिजे. तो शरण येण्याचे ढोंग करील, पण त्याच्यावर विश्वास ठेवू नकोस. मृत्यूचा अग्नी त्याच्या जीवनाच्या शेतावर पडला पाहिजे.'[३२]

अफजलखान विजापूरहून स्वराज्याकडे चालून येत असताना वाटेतील अनेक हिंदू देवस्थानांना उपद्रव दिला. आपल्या फौजेसह खान वाई या ठिकाणी आला. शिवाजी महाराजांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रतापगड किल्ल्यावर वास्तव्य केले. दोन्ही बाजूच्या वकीलांमार्फत निरोप पाठवून खान व शिवाजी यांची भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी ठरली. दि. १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी उभारलेल्या शामियान्यामध्ये खान व शिवाजी यांची भेट झाली. भेटीवेळी खानाने महाराजांना ठार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी महाराजांनी शिताफीने खानावर वार करुन त्याला ठार मारले. प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवाजी महाराजांनी त्याची कबर बांधली.[३३] खानाच्या मृत्यूनंतर झालेल्या प्रतापगडाच्या लढाईत मराठ्यांनी विजय मिळवला. त्यावेळी मराठ्यांना भरपूर युध्द साहित्य, जडजवाहिरे इत्यादी ऐवज मिळाला.

शिवाजी महाराजांचे किल्ल्यांच्या बांधकामासाठी व दुरुस्तीसाठी केलेले १६७१-७२ चे एक अंदाजपत्रक उपलब्ध असून त्यानुसार प्रतापगडावर १०,००० होन खर्च करण्याचे उद्दिष्ट ठरले होते.[३४] तुळजाभवानीच्या कृपेमुळे खानाचा वध करण्यात महाराजांना यश मिळाल्याने प्रतापगडावर भवानीदेवीची स्थापना इ.स.

१६६१ मध्ये करण्यात आली. २५ सप्टेंबर १६७४ रोजी किल्ल्यावर वीज पडून देवीच्या देवळाची पडझड झाली व काही हत्ती, घोडे मरण पावले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकप्रसंगी राजांनी १९ मे १६७४ रोजी भवानी देवीच्या दर्शनासाठी प्रतापगडावर येऊन तीन मण वजनाचे सुवर्णछत्र भवानी देवीस अर्पण केले.[३५]

शिवाजी महाराजांचा मृत्यू १६८० साली रायगडावर झाला. त्यावेळी संभाजीराजे पन्हाळ्यावर कैदेत होते. शिवाजी महाराजांच्या मृत्यूची बातमी समजताच त्यांनी पन्हाळा किल्ल्यातून आपली सुटका करुन घेतली व रायगडावर येत असताना वाटेत प्रतापगड किल्ल्यावर जाऊन भवानीदेवीची पूजा केली व दि. १४ जून १६८० रोजी ते रायगडावर पोहोचले.[३६] संभाजी महाराजांच्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत प्रतापगड स्वराज्यामध्येच राहिला. इ. स. १६८९ मध्ये त्यांचा वध झाला. त्यावेळी मोगलांनी रायगड किल्ल्यास वेढा घातला. तेव्हा येसूबाईने हुशारीने छत्रपती राजारामास रायगडावरुन प्रतापगडावर पाठविले.[३७] परंतु मोगल सैन्य त्याच्या पाठोपाठ चालून आले त्यामुळे छत्रपती राजारामास प्रतापगड सोडून पन्हाळ्यास निघून जावे लागले. मोगल सैन्याने यावेळी प्रतापगड आपल्या ताब्यात घेतला. परंतु पुढच्या वर्षी रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण यांनी राजगड, तोरणा, रोहिडासह प्रतापगडही मोगलांकडून जिंकून घेतला.

इ.स. १६९९ मध्ये छत्रपती राजाराम जिंजीहून परत महाराष्ट्रात आला. त्यानंतर तो ताराबाईसह उत्तर कोकणवर स्वारी करुन परत येताना प्रतापगडावर थांबला होता. त्यावेळी त्याने भवानी देवीची पूजा केली होती. इ.स. १७०२ मध्ये औरंगजेबाने पन्हाळा काबीज करुन विशाळगडाची मोहिम हाती घेतल्यामुळे ताराबाई विशाळगडावरुन प्रतापगडावर आल्या.[३८]

नाना फडणीस व महादजी शिंदे यांनी फितुरीच्या आरोपावरुन सखाराम बापू बोकील याला कैद करुन सिंहगड किल्ल्यावर ठेवले. परंतु दोनच महिन्यांनी म्हणजे मे च्या सुरुवातीला त्याला प्रतापगडावर पाठविले. प्रतापगडावर इ.स. १७७९ मध्ये सखाराम बापूस दोन वर्षे कैदेत ठेवले होते. पुढे ज्या वेळी नाना

फडणीसाविरुध्द दौलतराव शिंदे व त्यांचा विश्वासू मंत्री बाळोबा कुंजीर हे चालून आले, त्यावेळी नाना फडणीस यांनी इ.स. १७९६ मध्ये काही दिवस प्रतापगड किल्ल्याचा आश्रय घेतला होता.[३९] दुसऱ्या बाजीरावाने २५ जून १८०० रोजी नारोपंत चक्रदेव, बजाबा शिराळेकर व राघोपंत गोडबोले या भवानीदेवीच्या भक्तांना प्रतापगडावर कैद करुन ठेवले होते. नंतर त्यांची रवानगी दुसऱ्या गडावर करण्यात आली.

पेशवाईच्या अखेरीस इंग्रजांनी प्रतापगडाच्या किल्लेदाराशी गुप्तपणे बोलणी करुन इ. स. १८१८ मध्ये किल्ला रक्त न सांडता ताब्यात घेतला. पुढे इंग्रजांनी सातारा काबीज केल्यावर प्रतापसिंह याला गादीवर बसवले. त्यावेळी प्रतापगड व त्यावरील भवानीदेवी मंदिर प्रतापसिंहाच्या राज्यात नव्हते म्हणून प्रतापसिंहाने मागणी केल्यावर इ.स. १८२३ मध्ये इंग्रजांनी हा किल्ला त्याला दिला.[४०] प्रतापसिंहाने नवीन रेसिडेंट कॅ. ब्रिग्जच्या मागणीनुसार स्वत:च्या राज्यातील महाबळेश्वर पर्यंत रस्ता बनवला. तेव्हापासून आजतागायत हा किल्ला सातारच्या छत्रपतींच्या ताब्यात आहे. इ.स. १६५९ पासून १८१८ पर्यंतच्या प्रदीर्घ अशा कालखंडात १६८९ मधील काही महिन्यांचा कालावधी सोडला तर प्रतापगड कधीही शत्रूला मिळाला नाही.[४१]

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रतापगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा ५ मीटर उंचीचा भव्य अश्वारुढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण नोव्हेंबर १९५७ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले.[४२] सध्या प्रतापगड किल्ल्याची मालकी छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार उदयनराजे भोसले यांच्याकडे आहे. गडावर आजही मराठा सैनिकांच्या वारसांची घरे वसली आहेत.[४३] प्रतापगडाचे वैशिष्ट्य म्हणजे शिवकालीन रितीप्रमाणे आजही महादरवाजा सूर्यास्तानंतर बंद ठेवला जातो व सूर्योदयापूर्वी उघडला जातो. प्रतापगड किल्ला राज्य पुरातत्त्व विभाग व केंद्रीय पुरातत्त्व विभाग यांच्या अख्यत्यारित येत नाही. त्यामुळे गडाचे संवर्धन कार्य त्यांच्याकडून होत नाही. परंतु प्रतापगड परिसर वनविभागाच्या अखत्यारित येत असल्याने किल्ल्यावर

वनविभागाने पर्यटकांसाठी सूचना फलक, कचरा कुंड्या यांच्या सोयी केल्या आहेत.

**सज्जनगड**

सातारा शहरापासून पश्चिमेला १० किमी अंतरावर परळी गावाजवळ सज्जनगड किल्ला वसला आहे. सज्जनगड किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ९०० मीटर असून पायथ्यापासूनची उंची ३०० मीटर आहे. किल्ल्यांच्या प्रकारामधील गिरीदुर्ग प्रकारामध्ये सज्जनगड किल्ला मोडतो. यास परळीचा किल्ला असेही संबोधले जाते. सज्जनगड किल्ल्यास समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्यामुळे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या किल्ल्याचे जुने नाव आश्वालयन गड होते. या किल्ल्यावर आश्वालयन ऋषींचे वास्तव्य होते. म्हणून हे नाव त्या ऋषींच्या नावावरुन पडले होते.[४४] समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्यामुळे परळी ऐवजी सज्जनगड हे नाव रुढ झाले.

इसवी सनाच्या दहाव्या-अकराव्या शतकामध्ये शिलाहार घराण्यातील राजांनी सातारच्या अजिंक्यतारा किल्ल्याबरोबर सज्जनगड किल्ल्याची उभारणी केली. शंखाकृती माथा असणाऱ्या या किल्ल्याच्या पायथ्याशी परळी हे गाव वसले आहे. त्यामुळे या किल्ल्यास परळीचा किल्ला किंवा परळीगड असेही म्हटले जात होते. परळीच्या किल्ल्याचा सर्वप्रथम उल्लेख चवथा बहमनी राजा महमदशहा (१३५८-१३७५) याच्या कारकिर्दीत आढळतो. सत्तेची शकले झाल्यानंतर विजापूरच्या आदिलशाहीच्या ताब्यात हा गड आला. त्यांनी या गडाचे नाव 'नवरसतारा' असे ठेवले.

इब्राहिम आदिलशहाने गडाचे नाव 'नवरसतारा' ठेवण्यामागील कारण सांगताना साकी मुस्तैदखान लिहितो की, 'तो प्रत्येक नवीन गोष्टीला नवरस हे नाव देत असे. उदाहरणार्थ नवरसनाम, नवरसपूर गाव आणि नवरस नाणे. त्यास अनुसरुन किल्ल्याचे नाव नवरसतारा ठेवण्यात आले.'[४५]

सन १६६२ च्या दरम्यान हा किल्ला आदिलशहाच्या ताब्यात होता. त्यावेळी किल्लेदार म्हणून फाझलखान होता. फाझलखान हा अफझलखानाचा मुलगा होता.

एप्रिल १६७३ मध्ये शिवाजी महाराजांनी परळीचा किल्ला विजापूरकरांकडून जिंकून घेतला.[४६] वाकेनिसी टिपणीतील नोंदीनुसार समर्थ रामदास सर्वप्रथम इ.स. १६५० साली गडावर आले. त्याचवेळी अंगापूरच्या डोहात सापडलेली अंगाई देवीची मूर्ती समर्थांनी सज्जनगडावर स्थापन केली. त्यावेळी समर्थांचे जास्त वास्तव्य सज्जनगडाच्या पायथ्याशी असलेल्या परळी गावाच्या बाहेर उर्वशी नदीच्या तीरावर होत असे. त्यावेळी परळी गावात समर्थांनी स्थापन केलेला मारुती आजही दिमाखात उभा आहे. 'बाग प्रकरण' हे समर्थांचे काव्य या परळी खोऱ्यातच त्यांनी लिहिलेले आहे. परळी गावात राहून दासबोध ग्रंथ लिहावा असा समर्थांचा मानस होता. परंतु इ.स. १६५९ साली चंद्रराव मोरे आणि अफजलखान वध या महत्त्वाच्या घटनांवेळी समर्थ रामदास शिवाजी महाराजांना मदत करण्यासाठी आठ वर्षे शिवथर घळीत राहिले. तिथेच त्यांनी दासबोध ग्रंथ लिहिला. इ. स. १६७२ ते १६७६ या काळातही समर्थ रामदासांचे वास्तव्य शिवथर घळीत होते.[४७]

इ.स. १६७४ साली शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर दक्षिण दिग्विजयाला जाताना १६७६ साली शिवरायांनी शिवथर घळीत समर्थांची भेट घेतली व समर्थांनी उतारवयात प्रवासाची फार दगदग न करता सज्जनगडावर राहून विश्रांती घ्यावी अशी विनंती केली. त्यावेळचे सज्जनगडचे किल्लेदार जिजोजी काटकर यांना १६७६ साली पत्र पाठवून समर्थांची सज्जनगडावर उत्तम व्यवस्था ठेवण्याची आज्ञा शिवरायांनी केल्याची अस्सल नोंद आजही उपलब्ध आहे. समर्थ रामदास १६५० सालापासून सज्जनगडावर येऊन जाऊन होते. परळी खोऱ्यावर त्यांचे प्रेम होते. पाडळी, चाफळ, वासोटा, महाबळेश्वर, माहुली ही समर्थांची लाडकी ठिकाणे सज्जनगडापासून फार दूर नव्हती. म्हणून समर्थ रामदासांनी शिवाजी महाराजांची विनंती मान्य केली आणि १६७६ साली सज्जनगडावर कायमचे वास्तव्यासाठी आले.[४८] हत्तीवरुन समर्थ रामदासांची भव्य मिरवणूक काढून ग्रामस्थांनी त्यांना वाजत गाजत गडावर आणले. स्वत: कल्याण स्वामींनी माहुताची भूमिका पार पाडली. समर्थांबरोबर आलेले संतसज्जन आणि शिष्य परिवाराचे वास्तव्य गडावरील ओवऱ्यातच झाले. पुढे दोन हजार सुवर्ण होन खर्चून

शिवरायांनी समर्थांच्या वास्तव्यासाठी एक मठ बांधून घेतला [४९] ते निवासस्थान आजही सज्जनगडावर पहावयास मिळते. इ.स. १६७६ पासून १६८२ सालापर्यंत समर्थ रामदासांचे वास्तव्य सज्जनगडावर होते. रामदास स्वामींच्या वास्तव्यामुळे गडाचे महत्त्व वाढले. सज्जनगड रामदासी संप्रदायाचे तीर्थक्षेत्र बनला.

संभाजीराजांच्या वर्तनामध्ये सुधारणा व्हावी या हेतूने इ.स. १६७८ मध्ये शिवाजी महाराजांनी त्यांना समर्थांच्या सान्निध्यात ठेवले होते. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी येसूबाई व मुलगी भवानीही होती. येथे महिनाभर राहिल्यावर ते सहकुटुंब पळून जाऊन दिलेरखानास मिळाले होते.[५०] ३१ डिसेंबर १६७९ ते ४ फेब्रुवारी १६८० पर्यंत शिवाजी महाराज सज्जनगडावर मुक्कामी होते.[५१] ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाले. शिवरायांच्या निधनामुळे समर्थ रामदास व्यथित झाले. त्यांनी अन्नपाण्याचा त्याग केला. केवळ फळे व दूध यावर ते पुढील पावणेदोन वर्षे होते. २२ जानेवारी १६८२ रोजी समर्थांचे सज्जनगडावर निधन झाले. समर्थांनी आपल्या पश्चात सर्व अधिकार दिवाकर गोसावी यांच्याकडे दिले होते. तरी गडाची व्यवस्था भानजी व रामजी गोसावी यांच्याकडे सोपवली होती. पुढे यांच्यात वाद सुरु झाला. त्यामध्ये संभाजी महाराजांनी जातीने लक्ष घालून तो वाद सोडवण्यासाठी आज्ञा केली.[५२]

इ. स. १६८९ साली छत्रपती संभाजीराजांचा वध झाल्यानंतर औरंगजेब बादशहाने संपूर्ण महाराष्ट्र पादाक्रांत करण्यास सुरुवात केली. २१ एप्रिल १७०० रोजी साताऱ्याचा किल्ला औरंगजेबाने जिंकून घेतला. सातारच्या किल्ल्यास अजिमतारा असे नाव दिले. सातारच्या किल्ल्याला मुघल सैन्याचा वेढा असताना सुध्दा परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीने सज्जनगडावरुन धान्य व दारुगोळा पाठवून सातारच्या किल्लेदारास मदत केली. त्यामुळे औरंगजेबाने फत्तेउल्लाखानास परळीचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी पाठविले. ३० एप्रिल १७०० रोजी स्वत: औरंगजेब सुमारे एक लाख फौज घेऊन सज्जनगडाच्या पायथ्याशी पोहोचला. रुहुल्लाखान बक्षी याच्या नेतृत्वाखाली सज्जनगडास वेढा पडला. किल्ला ताब्यात घेण्यासाठी मुघल सैनिकांनी किल्ल्याच्या दरवाजाजवळील खडकाचा ताबा घेतला त्यावेळी

मराठ्यांची आणि मुघल सैनिकांची चकमक झाली. मराठ्यांना त्यात यश मिळाले नाही. मुघलांच्या प्रचंड सैन्याचा आणि बादशहाच्या उपस्थितीचा अंदाज घेऊन दोन महिन्यांच्या चिवट प्रतिकारानंतर परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीने ९ जून १७०० रोजी हा किल्ला औरंगजेब बादशहाच्या स्वाधीन केला.[५३] गड सोडताना परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी आणि उध्दव गोसावी यांनी गडावरील पूजनीय मूर्ती हलवून वासोटा किल्ल्यावर सुरक्षित ठेवल्या. सज्जनगड किल्ला बादशहाच्या ताब्यात देण्यापूर्वी समर्थ रामदास स्वामींची समाधी असलेला भुयारी मार्ग भिंतीने चिणून बंद केला होता. सज्जनगड किल्ल्यास बादशहाने नवरसतारा असे नाव दिले.[५४]

इ.स. १७०४ च्या सुमारास मराठ्यांनी हा किल्ला जिंकून ताब्यात घेतला. परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीने वासोट्यावर नेऊन ठेवलेल्या देवमूर्ती पुन्हा गडावर आणून त्याची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर श्रीराममंदिराची उभारणी करण्यात आली. पुढील चाळीस वर्षे सज्जनगड आणि चाफळ येथील देवस्थानांची चोख व्यवस्था अक्काबाई यांनी मोठ्या हिंमतीने सांभाळली. त्या थकल्यानंतर सन १७१० साली समर्थांचे ज्येष्ठ बंधू गंगाधर यांचा नातू गंगाधरस्वामी यांच्या हाती सज्जनगडचा सर्व कारभार अक्काबाईंनी सोपवला. याचवेळी शाहू महाराज गडावर आले व त्यांनी देवस्थानाची व्यवस्था लावली. पूर्वी चाफळचे राममंदिर होते त्याला श्रींचे संस्थान म्हणत असत. शाहू महाराजांनी हे नाव बदलून रामदास स्वामी संस्थान, चाफळ असे ठेवले.[५५] सन १८१८ साली सज्जनगड किल्ल्याचा ताबा इंग्रजांनी घेतला. सन १८५७ मध्ये रंगो बापू इंग्रजांविरुध्द बंड करण्याच्या हेतूने या किल्ल्यावरुन सूत्रे हलवली होती परंतु त्याची ही योजना यशस्वी झाली नाही.[५६]

समर्थांच्या वंशातील स्वामी घराण्याकडे चाफळ आणि सज्जनगड येथील कारभार पुढील २७० वर्षे होता. इ.स. १९७२ साली चाफळसाठी श्रीराम देवस्थान एक स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्यात आला. आजघडीला सज्जनगडचा सर्व कारभार श्री रामदास स्वामी संस्थान सांभाळत आहे.[५७] सध्या सज्जनगडावरील श्रीराम मंदिरात नित्य पूजा, अर्चा, करुणाष्टके व दासबोध पारायण इत्यादी कार्यक्रम होत असतात. येथे श्री समर्थ सेवा मंडळाने भक्तांसाठी निवासाच्या उत्तम सोयी केल्या

आहेत. गडावर दरवर्षी माघ वद्य प्रतिप्रदा ते नवमी हा दासनवमीचा मोठा उत्सव साजरा होतो. दासनवमी व शिवरात्रीच्या दिवशी मोठी यात्रा भरते. सज्जनगड किल्ला केंद्रीय पुरातत्त्व विभाग व राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या अखत्यारित येत नाही. तरीही श्री रामदास स्वामी संस्थान किल्ल्याची देखभाल चांगल्या प्रकारे करीत आहे. सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचा संक्षिप्त मात्र साधार असा इतिहासाचा भव्य कालपट आपल्या समोर मांडल्यानंतर यापुढील प्रकरणात आपण पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती कशी आहे या विषयाची चर्चा पुढील प्रकरणात करणार आहोत.

## संदर्भ व तळटिपा

१. अरुणचंद्र पाठक (संपा.), **सातारा जिल्हा गॅझेटियर**, १९९९, पृ. ८९४.

२. संभाजीराव पाटणे, 'अजिंक्यताऱ्यावरुन' अजिंक्य, **६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन स्मरणिका**, सातारा, १९९३, पृ. ५१.

३. वा. वि. जोशी, सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, **भारतीय इतिहास आणि संस्कृती**, त्रैमासिक, एप्रिल १९७३, पृ. २८.

४. कित्ता, पृ. ३८.

५. गो. रा. माटे., **असा घडला सातारा जिल्हा**, सातारा, १९८८, पृ. ४.

६. **सातारा शहर नगरपालिका शतसांवत्सरीक महोत्सवी अंक**, सातारा, १९५४, पृ. २.

७. कित्ता, पृ. ३.

८. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, **सातारा जिल्हा**, १९९९, पृ. ८९५.

९. कित्ता, पृ. ९०३.

१०. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत खंड १**, मुंबई, १८९८,पृ. ८९५.

११. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, **सातारा जिल्हा**, १९९९, पृ. ८९८.

१२. A. R. Kulkarni, **The Marathas, History of Medival Deccan**, Vol. I, 1973.

१३. गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत खंड १**, मुंबई, १८९८, पृ.१५९.

१४. **कित्ता**, पृ. २६५-२६९.

१५. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, **सातारा जिल्हा**, १९९९, पृ. ५७५.

१६. गो. स. सरदेसाई, पूर्वोक्त, खंड ३, पृ. ४९-५०.

१७. कित्ता, पृ. ११६.

१८. गो. स. सरदेसाई, पूर्वोक्त, खंड ५, पृ. २९८-२९९.

१९. गो. स. सरदेसाई, पूर्वोक्त, खंड ८, पृ. ५३९.

२०. महेश तेंडुलकर, **लोहगड, विसापूर, तुंग, तिकोना**, पुणे, पृ. ९६-९७.

२१. गो. स. सरदेसाई, पूर्वोक्त, खंड ८, पृ. ५६६.

२२. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १०**, पृ. २७८.

२३. **मुंबई प्रांत गॅझेटियर, खंड १९**, पृ. ५४५.

२४. रमेश देसाई, **शिवाजी किल्ल्यांचा शेवटचा रचनाकार**, १९९३, पृ. १२१.

२५. सतीश अक्कलकोट, पूर्वोक्त, पृ. ४३१.

२६. सतीश अक्कलकोट, **प्रतापगड व मकरंदगड**, सांगली, २०१३, पृ. १२.

२७. **कित्ता**, पृ. १३.

२८. अरुणचंद्र पाठक (संपा), पूर्वोक्त, पृ. ८१२.

२९. **सातारा जिल्हा गॅझेटियर**, १९९३, पृ. ८७५.

३०. सतीश अक्कलकोट, पूर्वोक्त पृ. १५.

३१. श्री. वि. गोखले, अफजलखान वध, कार्यकारण मीमांसा, **भारतीय इतिहास आणि संस्कृती,** त्रैमासिक, जुलै १९६४, पृ. ९२-९३.

**३२.** पु. म. जोशी, **शिवाजी महाराज आणि विजापूरची आदिलशाही, मराठ्यांचा इतिहास खंड १, २००६, पृ. १५५.**

३३. दत्ताजी नलावडे, पूर्वोक्त, पृ. १९.

३४. वि. का. राजवाडे, **मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८, लेख २२**, पृ. १७-१९.

३५. प्र. न. देशपांडे, **राजगड दर्शन**, पृ. ९.

३६. कमल गोखले, **'छत्रपती संभाजी', मराठ्यांचा इतिहास**, पृ. ३८१.

३७. **रायगड जिल्हा गॅझेटियर**, १९९३, पृ. ८४७.

३८. ज. भा. पवार, **महाराणी ताराबाई**, पृ. १५३.

३९. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश, खंड १०**, पृ. २७८.

४०. प्रबोधनकार ठाकरे, **प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी**, मुंबई, १९६९, पृ. ९१-९२.

४१. भगवान चिले, **गडकोट**, पृ. २१.

४२. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **पूर्वोक्त**, पृ. २७९.

४३. http://www.maharashtratourism.gov.in/treasures/fort/pratapgad

४४. शं. रा. देवळे, **महाराष्ट्रातील किल्ले**, १९८१, पृ. १५६.

४५. प्र. के. घाणेकर, **समर्थांचा सज्जनगड**, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८१, पृ. २.

४६. सतीश अक्कलकोट, पूर्वोक्त, पृ. ४५५.

४७. पु. म. जोशी, **'शिवाजी महाराज आणि विजापूरची आदिलशाही'**, मराठ्यांचा इतिहास, खंड १, १९८४, पृ. १६६.

४८. सुनिल चिंचोलकर, **सज्जनगडचा इतिहास**, श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड, सातारा, २०१४, पृ. ७.

४९. **कित्ता**, पृ. ७.

५०. प्र. के. **घाणेकर**, पूर्वोक्त, पृ. ३.

५१. गो. त्र्यं. कुलकर्णी, **'शिवाजी महाराज आणि मुघल सत्ता', मराठ्यांचा इतिहास, खंड १**, १९८४, पृ. २०९.

५२. गो. स. सरदेसाई, **पूर्वोक्त**, खंड १, पृ. ३४०.

५३. http://www.marathimati.net/sajjangad.fort

५४. गो. स. सरदेसाई, **पूर्वोक्त,** खंड २, १९८९, पृ. २६७.

५५. प्र. के. घाणेकर, **पूर्वोक्त**, पृ. २०.

५६. सुनिल चिंचोलकर, **पूर्वोक्त**, पृ. २२.

५७. जयसिंगराव पवार, 'महाराणी ताराबाई स्वातंत्र्य संग्राम', **मराठ्यांचा इतिहास, खंड १**, १९८४, पृ. ४४४.

# प्रकरण चौथे

# पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती

## किल्ल्यांची सद्यस्थिती

ऐतिहासिक महत्त्व असलेले वैविध्यपूर्ण किल्ले हे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहे. या किल्ल्यांमुळे महाराष्ट्राची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच अभेद्य, दुर्गम अशा किल्ल्यांच्या आधारे हिंदवी स्वराज्य उभे केले. मराठा स्वातंत्र्ययुध्द कालखंडात किल्ल्यांनी खूप महत्त्वाची भूमिका बजावली. पेशवे काळामध्ये किल्ल्यांचे राजकीय व सामरिकदृष्ट्या असणारे महत्त्व कमी कमी होत गेले. पेशवे कालखंडात स्वराज्याची राजधानी डोंगरी किल्ल्यांवरुन पठारी प्रदेशात आली. त्यामुळे आपोआपच किल्ल्यांकडे दुर्लक्ष होऊ लागले. पेशवे काळात किल्ले हे कैदी ठेवण्याचे ठिकाण म्हणून ओळखले जाऊ लागले.

इ.स. १८१८ साली मराठी राज्य संपुष्टात आल्यावर ब्रिटिशांनी किल्ल्यांना आपले शत्रूच मानले. मराठ्यांच्या अस्मितेचे प्रतीक, स्वराज्याची बलस्थाने, जिद्दीने व त्वेषाने लढण्यास प्रेरणा देणारे असे किल्ले ब्रिटिशांनी उद्ध्वस्त केले. परिणामी महाराष्ट्रातील किल्ल्यांची प्रचंड दुर्दशा झाली.महाराष्ट्रात किल्ल्यांचे व्यवस्थापन, देखभाल आणि डागडुजी केंद्रीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग यांचे मार्फत केली जाते. मुळातच महाराष्ट्रात किल्ल्यांची संख्या प्रचंड असल्याने पुरातत्त्व विभागाला एवढ्या सर्व किल्ल्यांचे युध्दपातळीवर संवर्धन करणे केवळ अशक्य गोष्ट आहे. विद्यमान परिस्थितीत किल्ल्यांच्या परिसरात भूछत्राप्रमाणे उगवणारी हॉटेल्स, बेशिस्त पर्यटक, रेस्टॉरंटस् किल्ल्यांचे ऐतिहासिक मूल्य कमी करतात. अशा हॉटेल्समध्ये पर्यटकांना चंगळ करण्याची नामी संधीच मिळते आणि त्याचा परिणाम तेथील वातावरणावरही होऊन इतर पर्यटकांनाही त्याची भुरळ पडते व ही निश्चितच भूषणावह गोष्ट नाही.

प्रस्तुत प्रकरणामधून संशोधकाने पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड, विसापूर, चाकण, सिंहगड, राजगड व पुरंदर आणि सातारा जिल्ह्यातील अजिंक्यतारा, प्रतापगड व सज्जनगड अशा दहा किल्ल्यांची सद्यस्थिती मांडली आहे. संशोधकाने किल्ल्यांना

प्रत्यक्ष भेटी दिल्या असून प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे वर्णन केले आहे. किल्ल्यांना भेडसावणाऱ्या नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींची नोंद केली आहे. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य पुरातत्त्व विभाग आणि केंद्रीय पुरातत्त्व विभाग यांच्या योगदानाचा तसेच अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या असून प्राप्त माहितीचा समावेश प्रकरणामध्ये केलेला आहे.

**पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती**

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या पुणे जहागिरीत स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली, त्या पुणे जिल्ह्यात २९ किल्ले आहेत. त्यातील आठ दहा किल्ले वगळता सर्व दुर्लक्षित आहेत. पुणे जिल्हातील सात किल्ल्यांचा साधर कालपट मांडला आहे.

**शिवनेरी**

जुन्नरपासून १ किमी अंतरावर असलेल्या शिवनेरी किल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ १४१.२४ हेक्टर आहे. हे संपूर्ण क्षेत्र जुन्नर वनविभागाच्या ताब्यात आहे. उपरोक्त एकूण क्षेत्रफळापैकी गट नं. ५१४ पैकी ३.६४ हेक्टर क्षेत्र जुन्नर वनविभागाने भारतीय पुरातत्त्व विभागाला दिलेले आहे. म्हणजेच एकूण क्षेत्रफळाच्या ९७.५०% क्षेत्र वनविभागाकडे आणि फक्त २.५०% क्षेत्र भारतीय पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात आहे.[१] शिवनेरी किल्ल्यावर डांबरी रस्त्याने किल्ल्याच्या महादरवाजाच्या प्रवेशद्वारापर्यंत जाता येते. येथून पुढे सातवाहन कालीन खोदीव बांधीव पायऱ्यांचा राजमार्ग सुरु होतो. हा मार्ग सोपा व सरळ आहे.

या मार्गाने आल्यावर गडाचा पहिला महादरवाजा लागतो. हा मार्ग शासनाने वनीकरण करुन सुशोभित केल्याचे तसेच पुरातत्त्व विभागाने शिवनेरी किल्ल्याची अलीकडेच डागडुजी करुन जीर्णोध्दार केल्याचे दिसून येते. गडाच्या सुरुवातीला महाराष्ट्र शासन घोड प्रकल्प वनविभाग, जुन्नर यांच्या वनसंवर्धन व वन विकासाकरिता संयुक्त वनव्यवस्थापन समिती कुसूर[२] यांचेमार्फत पर्यटकांना, किल्ल्याचे सौंदर्य अबाधित रहावे आणि किल्ल्यावर गेल्यावर तेथील पावित्र्य नष्ट होऊ नये यासाठीचा, सूचनाफलक लावण्यात आला आहे. पुरातत्त्व विभागाने १९५६ च्या २४ व्या प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियमान्वये

राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून शिवनेरी किल्ल्यास संरक्षित स्मारक असा दर्जा दिल्याचा फलक लावला आहे.[३] पुरातत्त्व विभागामार्फत शिवनेरी किल्ल्याचा स्थळ नकाशा[४] लावण्यात आला आहे. या स्थळ नकाशाव्दारे आपणांस एका दृष्टिक्षेपात संपूर्ण शिवनेरी किल्ला व त्यावरील विविध वास्तू दिसतात. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने पर्यटकांसाठी महत्त्वाच्या सूचनांचा फलक [५] इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत लावला असून पर्यटकांनी किल्ल्याचे महत्त्व अबाधित ठेवावे असा संदेश दिला आहे. पुढे जाताना संयुक्त वनव्यवस्थापन समिती कुसूर व घोडप्रकल्प वनविभाग जुन्नर यांचा स्वराज्याचा साक्षीदार असलेल्या शिवनेरी किल्ल्याची पूर्वीची स्थिती आणि आताची स्थिती दर्शवणारा फलक [६] लावण्यात आला आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने किल्ल्यावर जाणाऱ्या दगडी पायऱ्यांची वाट अत्यंत सुबक रितीने बांधून काढली आहे. किल्ल्यावर जाणाऱ्या मार्गावर कमालीची स्वच्छता जाणवते.[७] वाहन लावल्यानंतर साधारण ६०-६५ पायऱ्या चढून गेल्यानंतर किल्ल्याचा पहिला महादरवाजा येतो. पूर्वाभिमुख असणाऱ्या या महादरवाजाच्या वर दोन नक्षीदार कमानी आहेत. या मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूंना दगडी बांधकामातील सुस्थितीत असणारे बुरुज आहेत. दरवाजाच्या आतील बाजूस लाकडी दारे उभी करण्यासाठी गोलाकार दगडी मळसूत्रे आहेत. दरवाजामागचा लाकडी अडसर म्हणजे आर्गळ तटात सरकवण्यासाठी तयार केलेली छिद्रे दिसतात. आतल्या दोन्ही बाजूस देवड्या आहेत. डाव्या बाजूस असणाऱ्या तटातील पायऱ्यांवरुन दरवाजाच्या छतावर जाता येते. या महादरवाजाची डागडुजी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून झाली असल्यामुळे तो सुस्थितीत आहे.[८] मुख्य दरवाजाचा लाकडी दरवाजा खिळेयुक्त असून तो सुस्थितीत आहे.

मुख्य दरवाजा ओलांडून पुढे गेल्यानंतर डाव्या बाजूच्या तटबंदी मध्ये एक बुरुज आहे. त्याला 'मातंग बुरुज' किंवा 'मांग बुरुज' असे म्हणतात. या बुरूजास मांग बुरूज असे नांव पडण्याचे कारण त्या बुरूजावर पहारा देण्यासाठी 'मांग' समाजातील शिपाई असावेत. त्यावरुन मांग बुरुज हे नाव रूढ झाले असावे.[९] या बुरूजाला जागोजागी जंग्या दिसतात. अशा जंग्यांव्दारे बंदूक, भाला यांच्या साह्याने

प्रवेशमार्गावर मारा करता येत असे. घोडप्रकल्प वनविभाग जुन्नर यांच्यामार्फत पर्यटकांसाठी 'प्लॅस्टिकचा वापर टाळा, पर्यावरण राखा' असा स्वच्छतेचा संदेश देणारा फलक लावण्यात आला आहे. आजकालच्या हौशी पर्यटकांव्दारे जो प्रचंड प्लॅस्टिकचा वापर निष्काळजीपणे होतो आहे त्यासाठी हा फलक निश्चितच प्रबोधनासाठी उपयोगी आहे.

मातंग बुरुजाच्या पुढे गेल्यानंतर गणेश दरवाजा आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी पूर्वी याच दरवाजातून परवानगी घ्यावी लागत असे, म्हणूनच याला परवानगी दरवाजा असेही म्हटले जात होते. परवानगी दरवाजास कमानी असून कमानीच्या दोन्ही बाजूस दोन शिल्पे कोरलेली आहेत. उजव्या बाजूच्या शिल्पामध्ये वाघाच्या पाठीमागच्या दोन्ही पायांखाली दोन हत्ती व उजव्या पायाखाली गण्डभेरुण्डास पकडले आहेत. दोन तोंडे व एक शरीर असणाऱ्या गरुडासारख्या शक्तिमान काल्पनिक पक्ष्यास गण्डभेरुण्ड असे म्हणतात. हा व्दितोंडी गण्डभेरुण्ड पक्षी कर्नाटकातील विजयनगरच्या सम्राटाचे मानचिन्ह होता.[१०] या परवानगी दरवाजाच्या भिंतीवर मिनाराच्या आकाराचे दोन छोटे मनोरे दगडी बांधकामात उभारलेले आहेत. दरवाजाच्या आत लाकडी ओंडक्यात कोरलेली गोलाकार मळसूत्रे व दरवाजामागे आर्गळ सरकवण्यासाठी छिद्रेआहेत. तटामध्ये जागोजागी जंग्या दिसून येतात. गणेश दरवाजातून पुढे गेल्यानंतर एक दरवाजा लागतो. या दरवाजाच्या डाव्या बाजूला दगडामध्ये उजवा पाय वर उचललेल्या वाघाचे शिल्प कोरलेले दिसते. या दरवाजाची कमान नष्ट झाली असून उजवी बाजू पूर्णपणे नष्ट झाली आहे. या दरवाजाच्या थोडेच पुढे डाव्या बाजूस ३ फूट व्यासाचे दगडी जाते आहे. किल्ल्याच्या बांधकामासाठी शिसे व चुना यांचा वापर केला जात असून ते मळण्यासाठी या जात्याचा वापर केला जात होता. सध्या या ठिकाणी डिझेल इंजिनावर चालणारा एक चुन्याचा घाणा आहे. दरवाजाच्या देवड्यांमध्ये चुन्याची पोती झाकून ठेवलेली दिसतात.

यानंतर पुढचा दरवाजा पिराचा दरवाजा या नावाने ओळखला जातो. हा दरवाजा इतर दरवाजांपेक्षा भव्य आणि भक्कम बांधणीचा दिसतो. हा पिराचा दरवाजा

पूर्वाभिमुख आहे. दरवाजाच्या दोन्ही बाजूंच्या देवळ्यांची कमान नक्षीदार आहे. आतील लाकडी दरवाजा आकर्षक असून लाकडी अडसर लावण्यासाठी मोठी छिद्रे आहेत. पिराचा दरवाजा पालखी दरवाजा या नावानेही ओळखला जातो. पिराचा दरवाजा ओलांडून पुढे जात असताना डाव्या बाजूच्या मोकळ्या जागेत कारंजे, फुलझाडे लावण्यात आली आहेत. या ठिकाणी सुंदर लॉन्स विकसित करण्यात आले आहेत. वनविभागाचा पालखी दरवाजा बाग क्र. १ हा फलक त्या ठिकाणी लक्ष वेधून घेतो. पर्यटकांना बसण्यासाठी उत्तम बैठक व्यवस्था केली आहे. मोठ्या व डेरेदार वृक्षांभोवती कट्टे उभारण्यात आले आहेत. पर्यटकांसाठी स्वच्छता राखण्यासंदर्भात सविस्तर सूचना फलक लावण्यात आला आहे. ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्याचे पावित्र्य राखले जावे यासाठी वनविभाग प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.[११]

उजवीकडील बांधीव व खोदीव पायऱ्यांचा वर जाणारा मार्ग अत्यंत सुबक आहे. या मार्गावर स्वच्छता उत्तम प्रकारे राखली असल्याचे दिसून येते.या मार्गाने पुढे गेल्यावर हत्तीदरवाजालागतो. दरवाजावर मोठे अणुकुचीदार लोखंडी खिळे ठोकलेले आहेत. या दरवाजाची उंची १३ फूट, रुंदी ६.५ फूट व जाडी १.५ फूट आहेत.[१२] दरवाजाचे वैशिष्ट्य म्हणजे दरवाजा जवळ येईपर्यंत तो दिसत नाही कारण दरवाजाच्या समोर त्याच्यापेक्षा उंच मोठी भिंत बांधली आहे. दरवाजाचे बांधकाम पूर्ण दगडी आहे. बांधणी भक्कम आहे. प्रवेशद्वाराच्या आतील भिंतीमध्ये पहारेकऱ्यांना बसण्यासाठी दोन स्वतंत्र खोल्या आहेत.

हत्ती दरवाजा जवळील संरक्षक भिंतीचे काही दगड सुटले असून त्याचा राडारोडा तसाच पडला आहे. त्यामुळे भिंतीला मोठे भगदाड पडले आहे. वेळेत उपाययोजना जर केली नाही तर भिंतीचा बराचसा भाग जमीनदोस्त होण्याची शक्यता आहे. या घटनेकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. संबंधित विभागाने त्वरित या भिंतीची दुरुस्ती करुन पुढील होणारी हानी टाळावी अशी नागरिकांची व शिवप्रेमींची अपेक्षा आहे.[१३] हत्ती दरवाजातून शिवजन्मस्थानाकडे जाताना उजव्या व डाव्या बाजूस आपणांस अस्वच्छ पाण्याची टाकी दिसून येतात. पूर्वी या टाक्यातील पाणी पिण्यासाठी वापरले जात होते. आता या टाक्या अस्वच्छ असून त्यात खूप

शेवाळ दिसून येते. त्याचा वापर बंद झाल्याने शेवाळ मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते. हत्ती दरवाजातून पुढे गेल्यानंतर उजवी वाट शिवाई देवी मंदिराकडे जाते. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचा 'शिवाई देवी मंदिराकडे जाण्याचा रस्ता' हा फलक लावण्यात आला आहे. डाव्या दिशेला महाराष्ट्र शासन वनविभागाचा शिवजन्मस्थानाकडे जाणारा दिशादर्शक फलक लावण्यात आलेला आहे.

शिवाईदेवी मंदिराकडे जात असताना डावीकडे पाण्याची मोठी टाकी आहेत. त्यात प्रचंड प्रमाणात शेवाळ दिसून येते. शिवाई देवी दरवाजा पूर्णपणे दगडी बांधणीचा आहे. दरवाजावर कलाकुसर, नक्षीकाम दिसून येते. त्याच्या दोन्ही बाजूंना अष्टकोनी बांधणीचे बुरुज आहेत. दरवाजाबाहेर पहारेकऱ्यांसाठी ओटे आहेत.

शिवाई देवी जुन्नर परिसरातील आदिवासी, ठाकर, कोळी समाजाची कुलदेवता आहे. देवीचे मंदिर एका कड्याजवळ डोंगरात कोरलेल्या बौध्द लेण्यात आहे. ते दोन भागात आहे. गाभारा व सभामंडप असे त्याचे दोन भाग आहेत. मंदिराचा गाभारा प्राचीन आहे तर सभामंडप  पेशवेकालीन, लाकडी खांबाचा आहे. शिवाई देवीच्या प्राचीन गाभाऱ्यात दोन मूर्ती आहेत. मूर्ती पूर्णाकृती असलेल्या चार हातांच्या देवीच्या उजव्या हातात गदा व तलवार आहे. डाव्या हाताने देवीने एका राक्षसाचे केस आणि दुसऱ्या डाव्या हाताने तलवार असणारा राक्षसाचा उजवा हात पकडला आहे. गदाधारी उजवा हात देवीने दुसऱ्या राक्षसावर प्रहार करण्यासाठी उगारला आहे. या राक्षसावर देवीचे वाहन असणाऱ्या सिंहाने हल्ला चढविलेला आहे. राक्षसाचे वाहन असणाऱ्या रेड्याला देवीने पायाने चिरडले आहेत.[१४] या मूर्तीच्या शेजारीच शेंदूर लावलेली देवाची खरी जुनी मूर्ती आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. किल्ल्यावरील शिवाई देवीच्या नावावरुन शिवरायांना शिवाजी हे नाव ठेवले अशी कथा जुन्नर परिसरात प्रचलित आहे. शिवाई देवीची मंदिरात रोज पूजाअर्चा होते. महाराष्ट्र शासनाकडून शिवाई मंदिरास मोठी मदत मिळत आहे.[१५] प्राचीन अशा शिवाई देवी मंदिराला अतिवृष्टीमुळे गळती लागली आहे. मंदिराच्या छपरातून पाणी झिरपत आहे.

मध्यंतरी मंदिराच्या विश्वस्तांनी छपराचे वॉटर प्रुफिंग करुन घेतले. त्यामुळे पाणी झिरपण्याचे प्रमाण ९० टक्के कमी झाले आहे.[१६]

शिवाई देवी मंदिराकडे जाऊन परत पाचव्या मेणा दरवाजापर्यंत येऊन डावीकडच्या पायऱ्यांच्या वाटेने गेल्यानंतर सहावा फाटक दरवाजा आहे. या दरवाजाच्या उजवीकडे तटातून वर गेल्यानंतर सातवा आणि शेवटचा दरवाजा कुलुप दरवाजा आहे. दरवाजा सुरु होण्यापूर्वी डावीकडे उंच तटभिंत आणि उजवीकडे बुरूज आहेत. या दरवाजावरही हत्ती व परवानगी दरवाजाप्रमाणे दगडात शिल्पे कोरलेली दिसून येतात. दगडांत वाघांची शिल्पे कोरलेली आहेत. कुलुप दरवाजाच्या बुरूजावर आणि कमानीच्या वरच्या बाजूस झाडे झुडुपे उगवली आहेत. तटबंदीवर वा बुरूजांवर झाडे झुडपे उगवणे हे त्या वास्तूसाठी निश्चितच धोकादायक आहे.

कुलुप दरवाजा ओलांडून पुढे गेल्यानंतर उजव्या बाजूच्या डोंगराच्या कपारीमध्ये पाण्याच्या टाक्या खोदलेल्या आहेत. त्यांना पाणपोढ्या असेही म्हणतात. या टाक्यांपैकी दोन टाक्यांना गंगा टाके व यमुना टाके अशी नावे आहेत. ही दोन्ही टाकी एकमेकांना लागूनच आहेत. वरच्या बाजूस दगडी छत असल्याने या टाक्यांत सूर्यप्रकाश पोहोचत नाही. त्यामुळे या टाक्यांतील पाणी पिण्यास योग्य राहिले आहे. यमुना टाके गंगा टाक्यापेक्षा आकाराने लहान असल्याचे दिसून येते.[१७]

कुलुप दरवाजा ओलांडून पुढे जात असताना वन विभागाने अतिशय सुंदर बाग विकसित केली आहे. बागेमध्ये सर्वत्र हिरव्यागार गवताचे लॉन्स चांगल्या प्रकारे राखल्याचे दिसून येते. बागेतील बहुतांशी मोठ्या वृक्षांवर झाडांची नावे असलेला फलक लावण्यात आले आहे. शोभेच्या झाडांना सुव्यवस्थितपणे आकार दिलेला दिसून येते. संपूर्ण किल्ल्यावर एकूण तीन बागा विकसित करण्यात आल्या आहेत. सर्वत्र कचरा कुंड्याची सोय केली गेली आहे. प्लॅस्टिकचा वापर कमीत कमी व्हावा यासाठी प्रबोधनात्मक फलक पर्यटकांसाठी लावला गेल्याचे दिसते. संपूर्ण बागेचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे केले आहे. मात्र काही ठिकाणी पर्यटकांव्दारे प्लॅस्टिकच्या पिशव्या, प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या टाकले असल्याचे आढळून

आले आहे.[१८] पर्यटकांनी आपल्याच समृध्द अशा ऐतिहासिक वारशाची जपणूक जबाबदारीने करणे आवश्यक आहे.

**शिवनेरी किल्ल्यावरील वास्तू**

१) **शिवकुंज :** शिवकुंज नावाची देखणी व आकर्षक इमारत महाराष्ट्र शासनाने बांधली आहे. या वास्तूत श्री छत्रपती बालराजे शिवाजी महाराज व राजमाता जिजाई या दोघांच्या पंचधातूंच्या शिल्पमूर्ती बसविण्यात आल्या आहेत. या शिवस्मारकाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते २७ एप्रिल १९६० रोजी झाले.[१९] राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी राजे यांचे हे पुतळे अद्वितीय असेच आहेत. शिवकुंजच्या व एकूणच शिवनेरीच्या सौंदर्यात हे पुतळे भर घालतात. या पुतळ्यांच्या पाठीमागील भिंतीवर छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचे सुंदर तैलचित्र रंगविले आहे. तसेच या वास्तूच्या उद्‌घाटनाचा शिलालेख कोरण्यात आला आहे. या पुतळ्यांना लोखंडी जाळीदार दरवाजामध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे. ही देखणी वास्तू घडीव दगडी चौथऱ्यावर उभी असून त्याचे स्तंभ दगडी आहेत.

२) **कमानी मशीद :** शिवकुंज वास्तूच्या समोर उजवीकडे कमानी मशीद आहे. पूर्वी या मशिदीच्या दोन्ही बाजूंना मनोरे होते. या दोन्ही मनोऱ्यांवर आधारित मध्यवर्ती कमान होती. वादळी वारा व मुसळधार पावसामुळे बुधवार दि. ११ ऑगस्ट २००४ रोजी कमानी मशिदीचा उत्तर बाजूचा मनोरा व त्यावर आधारलेली कमान पडली.[२०] सध्या या कमानी मशीदीचा जीर्णोध्दार करण्यात आला असून संपूर्ण दगडी असणाऱ्या या वास्तूच्या उत्तर आणि दक्षिण बाजूंना उंच मनोरे बांधण्यात आले आहेत व त्या दोन्ही मनोऱ्यांच्या मध्ये विशाल कमान उभी करण्यात आली आहे. सध्या ही वास्तू सुस्थितीत असल्याचे दिसून येते.

कमानी मशिदीच्या पुढे खालच्या बाजूस बौध्द पाणपोढी व न्हाणपोढी आहेत. शिवनेरी किल्ल्यावरील ही सर्वात मोठी पोढी आहे. पाणपोढीचा निम्मा

भाग उघडा असल्याने तिचे रुपांतर न्हाणपोढीमध्ये झाले आहे. शिवनेरी किल्ल्यावरील शिबंदीस आवश्यक तो पाणीपुरवठा याच पाणपोठीमधून केला जात होता. या ठिकाणी असणाऱ्या पाणपोढीस कमानी टाके असे नाव आहे. बहुधा येथील पाण्याचा वापर होत असावा कारण येथील टाकीतून लोखंडी पाईप वरच्या दिशेने गेलेली दिसून येते.

३) **सरकारवाड्याचे अवशेष :** शिवकुंजाच्या समोर उत्तरेला काही इमारतींचे अवशेष दिसतात. या इमारतीला सरकारवाडा म्हटले जात होते. या सरकार वाड्यातील हमामखाना व भूमिगत सांडपाण्याची व्यवस्था वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथील छोटी खोली म्हणजे हमामखाना होय. सरकारवाड्यातील लोकांचे हे स्नानगृह होते.

४) **शिवजन्मस्थान :** सरकारवाड्याच्या समोरच उत्तरेकडे दगडी दुमजली इमारत असून याच वास्तूमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. शिवजन्मस्थानास भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने संरक्षित स्मारक म्हणून दर्जा दिला आहे.[२१] इमारतीचा छोटा दरवाजा पश्चिमाभिमुख आहे. खालच्या मजल्यावरील छोट्याशा खोलीस खिडक्या नाहीत. या खोलीशेजारच्या अरुंद जिन्याने १४ पायऱ्या चढून पहिल्या मजल्यावरील दिवाणखान्यात जाता येते. दिवाणखान्याच्या दोन भिंतीत दोन देवळ्या आहेत. दिवाणखान्याच्या पूर्वेस पाच खिडक्या आहेत. इ.स. १९२५ मध्ये करवीर छत्रपती राजाराम महाराज आणि मुंबई प्रांतांचे शिक्षणमंत्री भास्करराव जाधव यांच्या विशेष प्रयत्नांनी या शिवजन्मस्थानाचा जीर्णोध्दार करण्यात आला. आता ही वास्तू अत्यंत सुस्थितीत असल्याचे दिसून येते.

५) **बदामी तलाव :** शिवजन्मस्थानाच्या उत्तरेस बदामी आकाराचा प्रशस्त बांधीव तलाव आहे, त्याला बदामी तलाव म्हणतात. बदामी तलावाच्या मध्यभागी एक मोठ्या आकाराचा दगडी खांब आहे. या खांबाचा उपयोग दर्शकपट्टी प्रमाणे करुन पाण्याची पातळी पाहिली जात असे. हा तलाव पूर्व पश्चिम ११५ फूट रुंद तर दक्षिणोत्तर १२० फूट लांब आहे. तलावाची खोली १२ फूट आहे.

तलावाच्या उत्तर भिंतीत दोन कमानी दिसून येतात. संपूर्ण तलावाची भिंत दगडी आहे. सध्या या तलावाचा फारसा वापर होत नाही असे दिसून येते.

६) **कडेलोट टोक :** शिवजन्मस्थानाच्या उत्तरेकडे गडाच्या उत्तर बाजूला एक दरवाजा आहे. हा उत्तरेचा कडा सरळ कापीव निमूळता व खूप खोल असल्याने कडेलोट म्हणून ओळखला जात होता. स्वराज्यात बंड किंवा फितुरी केलेल्यांना येथून कडेलोटाची शिक्षा देण्यात येत असे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने या इमारतीचा आता जीर्णोध्दार केला आहे. सुबक दगडी बांधकामातील ही वास्तू पर्यटकांचे आकर्षणस्थान बनली आहे.

७) **पोखरणी :** शिव जन्मस्थळासमोर पूर्व पश्चिम ४० फूट लांब व दक्षिणोत्तर ५९ फूट रुंद असणारी पोखरणी किंवा पुष्करणी वैशिष्टयपूर्ण आहे. या पुष्करणीचा तळ चौरसाकृती असून चारही बाजू १३.९ फूट रुंद आहेत. ही पुष्करणी अत्यंत सुबक अशा पध्दतीने दगडांत बांधली गेली असून ती आकर्षक दिसते. पुष्करणी हा भाग अत्यंत स्वच्छ ठेवण्यात आल्याचे दिसून येते.

८) **घुमट :** शिवकुंजमागे असणाऱ्या पायवाटेने शिवनेरी किल्ल्याच्या माथ्यावर एक घुमट आहे. शिवनेरीचा किल्लेदार दौलतखानाच्या आईची कबर या घुमटामध्ये आहे. सदर घुमटाचे बांधकाम दगडामध्ये केले आहे. या घुमटास चारही बाजुंनी प्रवेशद्वारे आहेत.

९) **इदगाह :** किल्ल्याच्या माथ्यावर असणाऱ्या घुमटाजवळच इदगाह ही वास्तू आहे. ईद सणाच्या दिवशी सामूहिकपणे किल्ल्यावर नमाज पढण्याची ही जागा होय. इदगाहच्या भिंतीच्या दोन्ही कडेला मनोरे व मध्यस्थानी सात पायऱ्यांचे आसन आहे. सध्या घुमट व इदगाह सुस्थितीत असल्याचे दिसून येते.

१०) **कोळी चबुतरा / कोळी चौथरा :** इदगाह टाक्याच्या जवळ चारही बाजूंनी पायऱ्या असणारा वर्तुळाकार चौथरा आहे. पूर्वी ही गडाची सदर होती. इ.स. १६५० मध्ये मोगलांनी आपल्या विरुध्द बंड करणाऱ्या कोळ्यांची येथे मुंडकी

उडवली म्हणून याला कोळी चौथरा किंवा कोळी चबुतरा म्हणतात. दगड व सिमेंटचा वापर करुन हा कोळी चबुतरा बांधला असून तो सुस्थितीत आहे.

११) **अंबरखाना :** शिवनेरीकिल्ल्यावर सातव्या म्हणजेच कुलुप दरवाजानंतर डावीकडील बाजूस अंबरखान्याची प्रचंड मोठी इमारत उभी आहे. निजामशाही काळात मलिक अहमदच्या काळात अंबरखाना व तटबंदीचे काम पूर्ण झाले. अंबरखान्याची इमारत भारतीय पुरातत्त्व विभागाने नूतनीकरण करुन सुस्थितीत ठेवल्याचे दिसून येते. अंबरखान्याची इमारत साधी असून कोठेही नक्षीकाम वा कलाकुसर आढळून येत नाही. यावास्तूचा वापर धान्यकोठार म्हणून केला गेला. भारतीय पुरातत्त्व विभागाने पश्चिमेकडील ढासळलेली तटबंदी पुन्हा बांधली आहे. अंबरखान्याच्या सभोवताली साग वृक्षाची लागवड केल्याची दिसून येते.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणून शिवनेरी किल्ल्यास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे शिवनेरी किल्ल्याचा सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन जुन्नर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार वल्लभ बेनके यांनी किल्ले शिवनेरी विकास कार्यक्रम हाती घेतला. तसेच महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार यांनी शिवनेरी किल्ला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केला आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाने शिवनेरी किल्ल्यास संरक्षित वास्तू म्हणून जाहीर केले आहे.

वनविभागातर्फे किल्ल्यावर वृक्षारोपण, समतल चर खोदणे, समतल दगडी बांध बांधणे,पर्यटकांसाठी निवास व पाणी पुरवठ्याची सोय करणे, बागा विकसित करणे, किल्ल्यावर पाणी नेण्यासाठी सौर विद्युत पंप बसवणे, वनौषधी लागवड करणे अशी अनेक कामे करण्यात आली आहेत.[२२] वनविभागाच्या वतीने शिवनेरी किल्ल्यास ७.२ किमी ची संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. संरक्षक भिंतीस जाळी बसविण्याचेही काम पूर्ण झाले आहे. शिवनेरी किल्ल्यावर पाचव्या बागेच्या विकासाचे काम प्रस्तावित आहे. पर्यटकांना माहिती देण्यासाठी गार्डची सोय करण्यात आली आहे.[२३]

शिवनेरी किल्ल्याचे हे रुप पालटत असताना मूळ ऐतिहासिक गाभ्यास कोठेही धक्का पोचू दिला गेला नाही. पूर्वी दगड, गोटे, अवशेष यांच्या सोबतीने जाणारी पायवाट आता मऊशार हिरवळीचा गालिचा, आकर्षक वनोद्यान, फुलांचे ताटवे, आधारासाठी लोखंडी रेलिंग याद्वारे शिवनेरीचा कायापालट झाल्याचे दिसून येते. शिवनेरी किल्ल्यावरील अशा विकासकामांमुळे पर्यटकांची संख्या लक्षणीयरित्या वाढली आहे. जुन्नर परिसराच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा खूपच चांगला परिणाम झाला आहे.

शिवनेरी किल्ल्यावर भारतीय पुरातत्त्व विभागाने २.५० कोटी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने २ कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागाने २ कोटी, वनविभागाने २ कोटी, जुन्नर नगरपरिषद पाणीपुरवठा विभाग व महाराष्ट्र राज्य वीज महावितरण कंपनीने १.५० कोटी रु. खर्च करुन शिवनेरी किल्ल्याचा विकास करण्यासाठी आपले भरीव योगदान दिले आहे.[२४] त्यामुळे दीर्घकालीन इतिहासाची साक्ष असणारा शिवनेरी किल्ला आज एक उत्कृष्ट पर्यटनस्थळ म्हणून विकसित झाला आहे.

**लोहगड**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात पुणे-मुंबई लोहमार्गाच्या आणि पुणे-मुंबई एक्सप्रेस वे च्या अगदी जवळच वसलेल्या मळवली गावाजवळ लोहगड किल्ला आहे. मळवली स्टेशनवर उतरुन पुणे-मुंबई एक्सप्रेस वे वरील उड्डाणपूल पार करुन चार किमी चालत गेल्यावर लोहगड किल्ला लागतो. किल्ल्याकडे जाणाऱ्या मार्गावर भाजे गाव आहे. भाजे गावातून आपणास डाव्या बाजूच्या पायथ्याच्या वाटेने गेल्यावर भाजे लेणी पाहता येतात. हीनयान बौध्दांची इसवी सन पूर्वीच्या दुसऱ्या शतकातली लेणी अतिशय सुंदर आहेत. भाजे लेण्यांचा संपूर्ण परिसर भारतीयपुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या ताब्यात असून लेणीपरिसर अत्यंत स्वच्छ ठेवल्याचे दिसून येते. वर जाणारी पायऱ्यांची वाट दगडी बांधकामात सुबक रितीने बांधलेली आहे. सर्वत्र पर्यटकांसाठी सूचना फलक लावलेले आहेत. भाजे लेण्यांची माहिती दर्शविणारा

शिलालेख मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत लावलेला दिसतो. संपूर्ण लेणी परिसरात सुरक्षारक्षक तैनात केल्याचे दिसून येते.[२५]

लोहगड किल्ल्याकडे जाणाऱ्या प्रशस्त डांबरी रस्त्याने तासभर चालत गेल्यावर लोहगड आणि विसापूर या दोन किल्ल्यांमध्ये गायमुख खिंड आहे. पक्क्या डांबरी रस्त्याने वर लोहगडवाडी पर्यंत वाहने जाऊ शकतात. गायमुख खिंडीची दिशा पकडून टेकड्यांमागून टेकड्या ओलांडत जात असताना वाटेत सर्वत्र प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा खच पडलेला दिसून येतो. झाडाझुडपात, जमिनीवर प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, शीतपेयाच्या बाटल्या, प्लॅस्टिकचे कॅरीबॅग्ज, खाद्यपदार्थांची फेकून दिलेली वेष्टणे सर्वत्र सर्रास आढळतात. संपूर्ण टेकड्यांवर हे प्लॅस्टिकचे साम्राज्य निर्माण होण्यास पर्यटकच जबाबदार आहेत. काही ठिकाणी बियरच्या बाटल्या फेकलेल्या आढळून आल्या.[२६]

भाजे लोहगड या डांबरी रस्त्यांचे काम वडगाव मावळ विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. संजय (बाळा) भेगडे यांच्या विशेष प्रयत्नातून करण्यात आले आहे. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग पुणे यांच्यामार्फत हा परिसर पर्यटनाच्या 'क' वर्गात घोषित झाला असून रस्त्याच्या कामासाठी २५.०० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[२७]

गायमुख खिंडीतून लोहगडाकडे जाणाऱ्या वाटेवर सिंहगड इंजिनियरिंग कॉलेज, पंढरपूर संस्थेमार्फत गडाचे पावित्र्य राखण्यासंदर्भात व किल्ल्यावर गैरकृत्य न करण्यासंदर्भात फलक लावण्यात आला आहे.[२८] थोडे पुढे गेल्यावर श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ संचलित लोहगड विसापूर विकास मंच या संस्थेने किल्ल्याचा इतिहास व त्यावरील वैशिष्ट्ये सांगणारा फलक लावण्यात आला आहे.[२९]

गायमुख खिंडीतून लोहगडाच्या दिशेने जात असताना वाटेत उजव्या बाजूला हत्ती, घोडे, उंटइत्यादी प्राण्यांची एकूण ९ शिल्पे दगडात कोरलेली दिसून येतात. ही नऊ शिल्पे एका चौथऱ्यावर ठेवली आहेत. या सर्व नऊ शिल्पांना चुन्याचा पांढरा रंग लावण्यात आला आहे. त्यामुळे त्या शिल्पांवरील कोरीव नक्षीकाम ओळखता येत नाही.[३०] या ठिकाणास 'कापला' असे संबोधले जाते. या कापला स्थानाच्या थोडे पुढे

गेल्यावर मारुतीची मूर्ती दिसून येते. लोहगडाच्या पायथ्याशी दुचाकी व चारचाकी वाहने लावण्यासाठी प्रशस्त वाहनतळ तयार करण्यात आला आहे. वाहनतळाच्या जागेवर पेव्हींग ब्लॉक बसविलेले दिसून येतात. सुट्टीच्या दिवशी या किल्ल्यावर पर्यटकांची वर्दळ लक्षणीय असते.

वाहनतळास लागूनच उजवीकडे किल्ल्यावर जाणारा दगडी पायऱ्यांचा मार्ग आहे. पायऱ्यांचा मार्ग सुस्थितीत असून दोन्ही बाजूचे दगडी कठडे पुरातत्त्व विभागाकडून दुरुस्त करण्यात आले आहेत. पायऱ्यांच्या मार्गावर स्वच्छता चांगली ठेवल्याचे दिसून येते. किल्ल्यावर जाणाऱ्या पायऱ्यांच्या सुरुवातीलाच लोहगड किल्ल्याचा इतिहास सांगणारा फलक राजे शिवछत्रपती मंचने लावला आहे.[३१] त्याच्या जवळच पर्यटकांसाठीच्या सूचनांचा फलक लावलेला दिसून येतो. पुढे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई व्दारा लोहगड किल्ल्याचा स्थलदर्शक नकाशा लावण्यात आला आहे. एका दृष्टिक्षेपात किल्ल्यावरील सर्व स्थळांची माहिती या नकाशाव्दारे आपणास कळू शकते. लोहगडकिल्ला पाहण्याची वेळ सकाळी ७.०० पासून संध्याकाळी ५.३० पर्यंत आहे.[३२] पायऱ्यांच्या प्रशस्त व स्वच्छ मार्गाने वर जात असताना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने लावलेला पर्यटकांसाठीच्या सूचनांचा फलक दिसतो.[३३]

किल्ल्यावर चढायला सुरु केल्यानंतर पंचवीस मिनिटात किल्ल्याचा पहिला 'गणेश दरवाजा' हा पूर्वाभिमुख आहे. दरवाजाच्या दोन्ही बाजूस गणेश मूर्ती कोरलेल्या दिसून येतात. दरवाजाची दगडी कमान नक्षीदार आहे. कमानीच्या वरील बाजूस दगडात कोरलेली नक्षीदार शिल्पे दिसून येतात. दरवाजाच्या दोन्ही बाजूंस भक्कम बुरुज आहेत. बुरुजांवर उगवलेली झाडे झुडपे काढून स्वच्छता ठेवल्याचे दिसते. हा दरवाजा आणि बुरुज सुस्थितीत असल्याचे दिसून येते. दरवाजाच्या आत लाकडी दरवाजा असून त्याला लोखंडी अणुकुचीदार खिळे बसवलेले आहेत. हा लाकडी दरवाजा भक्कम असून तो सुस्थितीत आहे. गणेश दरवाजाच्या आत कोरीव शिलालेख आहे. तो शिलालेख खालीलप्रमाणे आहे.

*श्री गणेशाय नम: गणेश दरवाजा बांधला बा*
*ळाजी जनार्दन फडणीस वीद्यमान धों*
*डो बल्लाळ नीजसुरे प्रारंभ शके १७१२*
*साधारण नाम संवत्सरे अस्वीन शु*
*ध ९ नवमी रवीवार समाप्त शके*
*१७१६ आनंदनाम संवत्स*
*रे ज्येष्ठ सुध त्रयोदसी बु*
*ध वार कता (र्त) व्य जयाजी*
*धनराम गव (वं) डी त्रिव (त्रिंब)*
*कजी सुतार* [३४]

या शिलालेखातील मजकुराचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. पेशव्यांचे कारभारी बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस यांच्या आज्ञेवरुन त्यांच्या हाताखाली असलेल्या धोंडो बल्लाळ निजसुरे याने गणेश दरवाजा बांधला. दरवाजाच्या बांधकामाला शके १७१२ अश्विन शुध्द ९ रविवार (दि. १ नोव्हेंबर १७९०) रोजी सुरुवात झाली आणि ते बांधकाम शके १७१६ ज्येष्ठ शुध्द १३ बुधवार (दि. ११ जून १७९४) रोजी पूर्ण झाले. गणेश दरवाजाचे बांधकाम जयाजी धनराम नावाच्या गवंड्याने व त्र्यंबक सुताराने केले.[३५]

गणेश दरवाजाच्या पुढे दगडी चौथऱ्यावर एकूण सहा लहान तोफा ठेवलेल्या दिसून येतात. तेथून पुढे आल्यावर नारायण दरवाजा लागतो. हा दरवाजाही सुस्थितीत आहे. नक्षीदार कमानीमुळे दरवाजा उठावदार दिसतो. दरवाजाच्या दोन्ही बाजूस छोटे बुरुज आहेत. येथील बांधकाम पूर्ण दगडी असून मजबूत व भक्कम आहे. नारायण दरवाजाच्या कमानीच्या वरची बाजू पुरातत्त्व विभागाने बांधून काढल्याने दरवाजा सुस्थितीत दिसून येतो. नारायण दरवाजातून आत आल्यावर धान्य साठवण्यासाठी तयार केलेली दोन भुयारे लागतात. या दोन धान्य कोठारांपैकी एकात नाचणी आणि दुसऱ्यात भात साठवून ठेवला जात असे. सध्या या धान्य कोठारांत पाणी साठल्याचे दिसून येते.[३६]

यानंतर गडाचा तिसरा व सर्वात प्राचीन असलेला हनुमान दरवाजा आहे. या दरवाजाची बांधणी वेगळ्या प्रकारची आहे. तसेच ती जुनीही आहे. हा दरवाजा बहामनी किंवा निजामशाहीच्या काळातला असावा असे दरवाजाच्या रचनेवरुन वाटते. दरवाजाच्या दोन्ही बाजूंवर हनुमानाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. डाव्या बाजूच्या मूर्तीच्या पायाखाली पनवती राक्षसीण आहे, तर उजवीकडील मूर्तीत हनुमानाने रामासमोर छाती फाडून दाखविलेली आहे. या दरवाजास तीन नक्षीदार कमानी दगडात कोरलेल्या आहेत. कमानीच्या वरील बाजूस दगडी भिंतीत झाडाच्या आकाराची शिल्पे कोरली आहेत. दरवाजाच्या दोन्ही बाजूस भव्य आणि भक्कम असे दोन बुरुज आहेत. बुरुजाला जंग्या असलेल्या दिसून येतात. हा दरवाजा आणि दोन्ही बुरुज सुस्थितीत आहेत. दरवाजासमोरचा भाग मोठा प्रशस्त आहे. दरवाजाची लाकडी दारे मजबूत व सुस्थितीत आहेत. दोन्ही बाजूच्या लाकडी दरवाजांना अणुकुचीदार लोखंडी खिळे बसवलेले आहेत.

महादरवाजातून आत गेल्यावर डाव्या बाजूस चुन्याने भरलेल्या गोण्या ठेवलेल्या दिसून येतात. याठिकाणी प्रशस्त अशी सदरेसारखी जागा आहे. परंतु कोणतीही वास्तू त्यावर नाही. सध्या फक्त दगडी चौथरा दिसतो. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने १९५८ च्या २४ व्या प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियमान्वये हे प्राचीन स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्याचा फलक लावला आहे.[३७] महादरवाजाच्या वरच्या बाजूस ध्वजस्तंभ उभारलेला आहे. त्याठिकाणी भगवा ध्वज फडकताना दिसतो.

महादरवाजातून आत आल्यावर गडावर प्रवेश झाल्यावर डाव्या हाताला दोन थडगी असलेली मशीदीसारखी इमारत उभी आहे. या वास्तूला दर्गा असे नाव आहे. दर्ग्याच्या आत दोन कबरी दिसतात. महादरवाजाच्या आणि दर्ग्याच्या परिसरात भारतीय पुरातत्त्व विभागाकडून सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहेत. दर्ग्याच्या वर घुमटासारखी रचना आहे. ही वास्तू व परिसर सुस्थितीत आहे.

महादेव मंदिराच्या मागील बाजूस एक मोठा बांधीव तलाव आहे. त्याला 'त्र्यंबक तलाव' असे नाव आहे. या तलावाची रचना अष्टकोनी आकाराची आहे.

म्हणून त्याला अष्टकोनी तलाव असेही म्हटले जाते. तलावात सध्या भरपूर पाणी आहे. बांधकाम पूर्णपणे दगडी असून ते सुस्थितीत असल्याचे दिसते. या तलावाचे पाणी सध्या वापरात नाही. या तलावापासून पुढे उत्तर दिशेने जात असताना वाटेत दोन पाण्याची टाकी आहेत. दगडामध्ये खोदलेल्या या पाण्याच्या टाक्या आकाराने बऱ्यापैकी मोठ्या आहेत. सध्या त्यात पाणी आहे. येथून पश्चिमेकडे जवळपास पंधराशे मीटर लांब आणि तीस मीटर रुंद अशी डोंगराची सोंड आहे. त्याला विंचू काटा किंव विंचूकडा असे म्हटले जाते. विंचवाच्या नांगीसारखी चिंचोळी रचना असल्याने त्याला विंचू काटा असे नाव पडले असावे.

विंचूकाटा माचीच्या दक्षिण पूर्व दिशेला एक भव्य आकाराचे पूर्णपणे दगडी बांधकाम असलेले पाण्याचे मोठे तळे असूनत्याला सोळा कोनी तलाव असे नांव आहे. या तळ्यात उतरण्यासाठी सुबक रितीने कोरलेल्या पायऱ्या आहेत. तळ्यामध्ये सध्या तळाशी थोडे पाणी आहे. हे तळे सुस्थितीत आहे. जुन्या काळी तळ्यातून पाणी काढण्यासाठी असणारी मोटेची दगडी रचना दिसते. त्याचा आता वापर होत नसल्याने त्यावर झाडेझुडपे उगवली आहेत.

तळ्याच्या पुढे एक बंदिस्त दर्गा असून त्याचे नाव हाजी हजरत उमर शहावली बाबा (रहे) असे आहे. या नावाचा फलक आतल्या आवारात लावलेला आहे. या दर्ग्यात दोन कबरी आहेत. मुस्लीम लोकांमध्ये हे ठिकाण 'मळवली पीर' म्हणून प्रसिद्ध आहे. दर्ग्याच्या पुढे लक्ष्मी कोठी नावाची गुहेसारखी रचना दिसते. पूर्वी या लक्ष्मी कोठीत लोमेश ऋषी तपश्चर्या करीत असत असे सांगितले जाते. या कोठीचा विस्तार भरपूर मोठा आहे. कोठीच्या बाहेरच्या बाजूस एक मोडलेली तोफ ठेवलेली दिसते. लक्ष्मी कोठीच्या बाजूस भुयारासारखी एक रचना आहे. आतील बाजूंनी अनेक दगडी खांब असलेल्या टाक्याच्या उजव्या बाजूला एक कोठी आहे तिला खजिनदाराची कोठी असे नाव आहे. पुढे घोड्याची पागा नावाची एका टेकडीच्या आत गुहेसारखी रचना आहे. बाहेरची भिंतीसारखी रचना दगडात बांधलेली आहे.

घोड्याची पागा वास्तूच्या बाजूला जुन्या काळच्या इमारतींचे उध्वस्त झालेले अनेक अवशेष दिसून येतात. सध्या त्या ठिकाणी फक्त दगडी चौथरेच तेवढे शिल्लक

आहेत. पूर्वी या ठिकाणी प्रशस्त खोल्या असाव्यात असे आपणास अंदाजे सांगता येते. त्यातील एका ठिकाणी दगडात कोरलेली शौचकूपासारखी रचना लक्ष वेधून घेते. पाणी बाहेर जाण्यासाठी त्याची रचना कोरीव सुबक असल्याचे दिसते. या अवशेषांजवळच पाण्याची दोन तीन टाकी आहेत. त्यात सध्या शेवाळलेले पाणी दिसून येते. जवळच एक दगडी जाते पडलेले दिसते. ह्या परिसरात सध्या गवत उगवलेले आहे. काही ठिकाणी कचरा गोळा करुन जाळून टाकल्याचे दिसते. किल्ल्यावरुन खाली येत असताना पायऱ्यांच्या डाव्या बाजूस डोंगराच्या कातळात गुहा खोदलेल्या दिसतात. त्यासाठी थोडे चढून वर जावे लागते. वरच्या बाजूच्या गुहा आकाराने लहान आहेत. खालच्या बाजूच्या जमिनीलगतच्या गुहा आकाराने प्रशस्त असलेल्या दिसून येतात. आतमध्ये प्लॅस्टिकच्या पिशव्या, प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या पडलेल्या दिसतात. गुहेच्या बाहेरील बाजूस मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, प्लॅस्टिक कॅरीबॅग्ज, खाद्यपदार्थांची वेष्टणे यांचे साम्राज्य दिसून येते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साठला असून कित्येक दिवस तो उचलला नसल्याचे जाणवते.[३८]

केंद्रीय पुरातत्त्व विभाग मुंबई सर्कल मार्फत लोहगड किल्ले संवर्धनासाठी २०१२-१३ साली ६६०४० रु., २०१३-१४ साली ४,३९,८४५ रु., २०१४-१५ साली ३,१४,७६४ रु. व २०१५-१६ साली ३० नोव्हेंबर २०१५ पर्यंत २,१३,८९४ रु. खर्च करण्यात आला आहे.[३९] लोहगड किल्ला केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित असून पुणे सब सर्कल कार्यालयामार्फत त्यावर काम चालू आहे. संपूर्ण लोहगड किल्ल्यावर प्रारंभापासून महादरवाजापर्यंत दगडी फरसबंदी पायऱ्यांचा मार्ग केंद्रीय पुरातत्त्व खात्यामार्फत बांधून काढण्यात आला आहे. किल्ल्याची तटबंदी ज्या ठिकाणी ढासळली होती ती बांधून सुस्थितीत ठेवण्यात आली आहे. विंचूकाटा माचीवर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी लोखंडी पाईप रेलिंग बसवण्यात आले आहेत. किल्ल्यावर सर्वत्र स्थानदर्शक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. गडावरील चार दरवाजांपैकी दोन दरवाजांचे काम पूर्ण झाले आहे. दर्ग्याच्या वरील बाजूस असणाऱ्या राजसदरेचे भिंतीचे काम बांधून पूर्ण झाले आहे. किल्ल्यावर

पर्यटकांच्या सुरक्षेसाठी व किल्ल्याचे विद्रुपीकरण होऊ नये यासाठी सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. किल्ल्याच्या संवर्धनासाठी आजपर्यंत साधारण दीड कोटी रुपयांच्या आसपास खर्च करण्यात आला आहे.[४०]

तळेगाव दाभाडे येथील राजे शिवछत्रपती मंच या संस्थेव्दारे लोहगडावर संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. या संस्थेने लोहगड किल्ला दत्तक घेतला आहे. गडावरील भग्नावस्थेत असणाऱ्या शिवमंदिराचा मंचातर्फे जीर्णोध्दार करण्यात आला आहे. मंचातर्फे महाशिवरात्र यात्रा गडावर चालू करण्यात आली. या मंचातर्फे गडावर साफसफाई करण्यात येते.[४१]

**विसापूर**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील एक महत्त्वाचा किल्ला म्हणून विसापूरची ओळख आहे. पुण्यावरुन मुंबईला जाताना रेल्वेमार्ग व एक्सप्रेसवे च्या डाव्या हाताला लोहगड आणि विसापूर हे दोन किल्ले एकमेकांस खेटूनच उभे आहेत. मळवली गावातून गायखिंडीत आल्यावर डाव्या बाजूला जाणारा रस्ता विसापूर किल्ल्याकडे जातो. विसापूर किल्ल्याकडे जाणारा रस्ता आता बराच रुंद करण्यात आला आहे. परंतु सध्यातरी हा रस्ता कच्चाच आहे. पूर्वेकडची मजबूत व लांब तटबंदी अजूनही सुस्थितीत असल्याचे दिसते. कच्चा रस्ता चालत पुढे आल्यावर एका ठिकाणी दाट झाडीमध्ये रस्त्याचा शेवट होतो. तेथून डोंगरावर जाण्यासाठी पायवाट आहे. वर जाण्यापूर्वी तेथे असलेल्या झोपडी मध्ये पर्यटकांची नोंद घेतली जाते.

झाडीझुडपांतून नागमोडी वाटेने वर जात असताना जागोजागी पायवाट रुंद केलेली दिसून येते. वरच्या दिशेवरुन घरंगळत खाली आलेल्या मोठमोठ्या दगडांचा वापर पायऱ्यांसाठी केलेला दिसून येतो. जागोजागी मोठी वाढलेली झाडे कापून पायवाट प्रशस्त करण्यात आली आहे. साधारण वीस मिनीटे वर चढत गेल्यावर आपणास डोंगराच्या डाव्या बाजूस कातळात कोरलेले एक पाण्याचे टाके आहे. परंतु ते वापरात नाही. टाक्याच्या वरच्या बाजूस कातळात चौकोनी आकाराचे कोरीव काम केलेले दिसते. त्यावर ब्राह्मी लिपीमध्ये दोन ओळीत मजकूर कोरलेला आहे.

या शिलालेखाच्या मजकूरावर सध्या शेंदूर फासण्यात आला आहे. हा शिलालेख बहुतांशी नष्ट झाला आहे.[४२]

अतिशय रुंद परंतु मोठमोठ्या खडकांच्या खड्या चढणीवरुन किल्ल्याच्या दिशेने वर जावे लागते. हे मोठमोठे दगड पावसाच्या पाण्याने ओघळून खाली आले आहेत. वरच्या दिशेने जात असताना उजव्या बाजूची भव्य दगडी तटबंदी दिसते. काही ठिकाणी तटबंदी सलग आणि सुस्थितीत असल्याचे दिसून येते तर काही ठिकाणी तटबंदीस भगदाड पडलेले दिसते. बुरुजांमध्ये मोठ्या वनस्पती उगवलेल्या दिसतात. त्यामुळे बुरुजांची आणि तटबंदीची पडझड होत आहे. खडी चढण चढून वर गेल्यावर गडावर प्रवेश होतो.

गडावर आल्यावर या ठिकाणी दगडी चौथरे दिसतात. बहुधा या चौथऱ्यांवर पूर्वीच्या काळी इमारती असाव्यात असे वाटते. आजूबाजूला सर्वत्र घडीव दगड पडलेले दिसतात. या ठिकाणच्या वास्तू भग्न झाल्याने आता फक्त अवशेष दिसून येतात. उजवीकडील बाजूस उंच टेकडीसारखी रचना दिसते. त्याच्या उजव्या बाजूस मजबूत तटबंदी आहे. सरळ तटबंदीस लागून असलेल्या वाटेने चालत गेल्यावर मोठ्या बुरुजावर एक ध्वजस्तंभ उभारण्यात आला आहे. तेथे भगवा ध्वज फडकताना दिसतो. तटबंदीमध्ये काही ठिकाणी झाडे झुडपे उगवल्याने त्याची पडझड झालेली दिसून येते.[४३]

दक्षिण प्रवेशद्वाराजवळच्या दगडी चौथऱ्याच्या अवशेषांच्या बाजूला दगडात कोरलेली एक खोली दिसून येते. त्याला महिरपी आकाराची कमान कोरण्यात आली आहे. खोलीची उंची कमी असून आतमध्ये कचरा पडलेला दिसतो. ही खोली एखाद्या ऋषींची ध्यानाची गुंफा असावी असे वाटते. पुढे पश्चिमेकडे जाताना आपणास भव्य तटबंदी दिसते. तटबंदीवर विपुल प्रमाणात झाडे उगवली आहेत. एका ठिकाणी पडक्या बुरुजांचे अवशेष दिसतात. येथून एक मोठे पाण्याचे टाके दगडात खोदलेले दिसून येते. सध्या त्यात शेवाळयुक्त पाणी दिसून येते. पुढे जाताना उजव्या बाजूच्या उतारावर दुसरे एक पाण्याचे टाके आहे. त्यात पाणी स्वच्छ आहे. एकास

एक लागून अशी अनेक पाण्याची टाकी खोदलेली दिसतात. बहुतांशी टाक्यांमध्ये पाणी उपलब्ध आहे.[४४]

तटबंदी जवळच्या जात्याच्या उजवीकडे एक सलग, भक्कम व अखंड अशी तटबंदी आहे. ही तटबंदी अत्यंत सुस्थितीत असून त्याची बांधणी वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसते. साधारण अर्धा ते पाऊण कि.मी. लांब असणाऱ्या या तटबंदीला जागोजागी बुरुज आहेत. या पश्चिमेच्या तटबंदीवरुन एक बैलगाडी जाईल इतकी रुंद जागा आहे. कोणत्याही ठिकाणी अजिबात पडझड न झालेली एवढी लांबलचक तटबंदी महाराष्ट्रातील मोजक्याच किल्ल्यांवर पहायला मिळते.[४५] तटबंदीच्या एका बुरुजाखाली खोली तयार केलेली दिसते. तटबंदीमध्ये दोन ठिकाणी शौचकूप पाहायला मिळते.

टाक्यापासून पुढे उत्तर दिशेस तोंड असणारी एक भग्न वास्तू आहे. तिला 'कचेरी' असे नाव आहे. कचेरीची इमारत दगडी पायावर उभी आहे. कचेरीच्या वास्तूची प्रचंड पडझड झाली असून केवळ दगडी भिंतीच तेवढ्या शिल्लक आहेत.

कचेरीच्या पुढे दारुगोळा कोठाराची एक चौकोनी आकाराची इमारत आहे. दारुगोळा कोठारास इजा पोहोचू नये यासाठी बाहेरच्या बाजूस भिंत बांधलेली आहे. ही इमारत तटबंदीपासून, बुरुजांपासून बरीच आत बांधली गेली आहे. इमारतीच्या आत दगडी फरशा घातलेल्या आहेत. लाकडांचे वासे अडकवण्यासाठी भिंतीमध्ये ठराविक अंतरावर जागोजागी खाची तयार केलेल्या दिसतात. दारुगोळा कोठारावर छत नसल्याने त्याची बरीच पडझड झाली आहे. बाहेरची भिंतही बरीच मोडकळीस आल्याचे दिसून येते.

दारुगोळा कोठाराच्या पुढे पाण्याची तीन टाकी आहेत. सध्या त्यात पाणी आहे. पुढे तटबंदीच्या एका बुरुजावर तोफ फिरवण्यासाठी असणारी गोलाकार दगडी खाच आहे. गोलाकार खाचेच्या मध्यभागी एक मोडक्या अवस्थेतील तोफ आहे. त्याच्या बाजूलाच एक मोठी सुस्थितीत असणारी तोफ आहे. तोफेची लांबी अंदाजे ८-९ फूट आहे. तोफेवर A1780N410.P2543 अशी इंग्रजी अक्षरे व अंक उमटवलेले दिसतात. तोफेच्या बुरुजाच्या बाजूस एक ध्वजस्तंभ उभारलेला आहे.

बुरुजाच्या भिंतीमध्ये एक व्याघ्रमुखासारखी रचना दगडात कोरलेली आहे. ही रचना सुस्थितीत आहे. या बुरुजाखाली चोर दरवाजा आहे. संरक्षणासाठी या चोर दरवाजाला बाहेरुन चिलखती कोट बांधला आहे. बुरुजावरुन तटबंदीवर चढून पुढे जाताना झुडपामध्ये एक तोफ ठेवलेली दिसते. या तोफेच्या समोरील बाजूस पडझड झालेल्या पडक्या वाड्याचे अवशेष दिसतात. सध्या तेथे दगडी चौथरा तेवढाच शिल्लक आहे. झाडाझुडपांचे साम्राज्य तेथे असल्याचे दिसते.

दक्षिणेकडील घनदाट झाडीच्या उताराला महादेव मंदिर आहे. मंदिराच्या पिछाडीस चौकोनी आकाराचे बांधीव पाण्याचे टाके आहे. टाक्यातील पाण्यापर्यंत जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. सध्याया टाकीत भरपूर पाणी आहे. टाकीचा परिसर स्वच्छ ठेवलेला दिसून येतो. महादेव मंदीर एका दगडी चौथऱ्यावर बांधले आहे. नुकताच या मंदिराचा भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाव्दारे जीर्णोध्दार करण्यात आला आहे. महादेव मंदिराचे सुशोभिकरण करण्यात आले असून संपूर्ण परिसर स्वच्छ, नीटनेटका राखला असल्याचे दिसून येते.[४६]

पाटण बाजूने गडावरुन खाली उतरण्याच्या रस्त्याने जात असताना डोंगराच्या कातळात खोदलेली तीन पाण्याची टाकी दिसून येतात. सध्या त्यामध्ये पाणी आहे. थोडेसे खाली उतरुन गेल्यावर उजव्या हातास चार-पाच टाक्यांचा समूह आहे. या प्रत्येक टाक्यावर ब्राह्मी लिपीत कोरलेला शिलालेख आहे. या शिलालेखांचे वाचन डॉ. शोभना गोखले यांनी केले आहे. ज्या व्यक्तींनी दाने दिली, त्यांची नावे या टाक्यांवर कोरलेली आहेत. टाक्यांमध्ये सध्या पाणी आहे.[४७] गडाच्या खाली जाण्याच्या मार्गावर हनुमानाची कातळात कोरलेली रेखीव मूर्ती दिसते. या हनुमानाच्या मूर्तीची उंची अंदाजे ५.६ फूट व रुंदी ५ फूट आहे. मूर्ती अत्यंत आकर्षक व वैशिष्ट्यपूर्ण दिसते.

जवळच दगडी प्रवेशद्वाराने बंदिस्त या दोन कोठ्या म्हणजे इतिहासकाळातील धान्य कोठारे असून बाहेरील बाजूस प्रशस्त जागा आहे. कोठारांच्या आतल्या भागात कातळाची भिंत असल्याने अंधार आहे त्यामुळे बॅटरीचा वापर करुन आत जावे लागते. दोनपैकी एका कोठीच्या प्रवेशद्वारावर कमळ व दुसऱ्या कोठीवर गणपतीची

मूर्ती कोरली आहे.[४८] खाली उतारावरच एका दरवाजाचे अवशेष दिसून येतात. इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी महाद्वार नष्ट केले.

विसापूर किल्ला सध्या केंद्रीय पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारीत आहे. सध्या पुरातत्त्व विभागाने अत्यंत मोडकळीस आलेल्या महादेव मंदिराचा जीर्णोध्दार केला आहे. महादेव मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी पुरातत्त्व विभागाने २३ लाख रु. खर्च केले आहेत. किल्ल्यावर संवर्धनाची कामे करण्यासाठी भरघोस निधीची आवश्यकता आहे. परंतु सरकारकडून पुरेसा निधी मिळत नाही.[४९]

**चाकण**

पुणे-नाशिक महामार्गावर पुण्यापासून फक्त २५ किमी अंतरावर चाकण हे गाव वसलेले आहे. चाकणच्या बसस्थानकावर उतरुन चाकणच्या बाजारपेठेतून मुख्य रस्त्याने पुढे गेल्यावर उजव्या हाताला चक्रेश्वर महादेव देवालय या भव्य कमानीतून संग्रामदुर्ग उर्फ चाकणच्या किल्ल्यात पोहोचता येते. चाकण गावच्या पूर्वेला चौकोनी आकाराचा हा भुईकोट किल्ला वसला आहे.

चाकणचा भुईकोट किल्ला इतिहास काळात नऊ बुरुज, पन्नास फूट उंचीची व दहा फूट रुंदीची भव्य तटबंदी, सभोवार पाण्याने भरलेला खंदक व बालेकिल्ला अशा अवशेषांनी संपन्न होता असेच अतिशय खेदाने व दुर्दैवाने म्हणावे लागते. कारण आजघडीला चाकण किल्ल्याची अवस्था अत्यंत भीषण असल्याची दिसून येते. संपूर्ण चाकणवासीयांना इतिहासाचे विस्मरण झाल्यामुळे किल्ल्याची सद्यस्थिती फारच वाईट व ती बदलता न येण्यासारखी बनली आहे असे म्हणावे लागते.

चाकण ग्रामपंचायतीने किल्ल्याचा तट पाडून चक्क गडाच्या मध्यभागातून पक्का डांबरी रस्ता तयार केला आहे. हा रस्ता काही ठिकाणी सिमेंट कॉंक्रिटने बनविला असल्याचे दिसून येते.[५०] त्यामुळे अगोदर पडझड झालेल्या किल्ल्याचे सरळसरळ दोन भाग पडलेले दिसतात. गावातील नागरिकांनी तटबंदी, बुरुज व जुने अवशेष, दगड, विटा राजरोसपणे उचलून नेऊन स्वत:ची घरे बांधली आहेत. चाकण गावातील लोक संग्रामदुर्ग किल्ल्याचा उपयोग प्रातर्विधीसाठी करत आहेत.[५१]त्यामुळे

चाकणच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीला आधुनिक समाजाने हरताळच फासून किल्ल्याचे महत्त्व आणि मूल्यच नष्ट केले आहे असे दुर्दैवाने म्हणावे लागते.

चाकणच्या किल्ल्यात डांबरी रस्त्याने प्रवेश केल्यानंतर उजव्या पायवाटेने गेल्यावर तटाशेजारी चांगल्या अवस्थेतील मशीद आहे. तिची इमारत सर्वात चांगल्या अवस्थेत आहे असे दिसून येते. ही मशीद पिर जहाँबाज खान अहले सुन्नत वल जमात चाकण (किल्ला) या संस्थेची आहे. मशिदीच्या भिंतीवर उर्दू भाषेत वचने कोरलेली दिसून येतात. मशिदीची इमारत पक्क्या विटांनी बनली असून छतावर पत्र्यांचा शेड उभारण्यात आला आहे. मशिदीच्या जवळच श्री दामोदर विष्णू मंदिर बांधण्यात आले आहे. मंदिराची व्यवस्था नीटनेटकी आहे. मंदिरात वायुवीजनासाठी जाळीदार खिडक्या बसवलेल्या दिसतात.

शेजारीच चक्रधर शिला आहे. या शिलेला शेंदूर फासलेला असून त्यावर एक दगडी घुमटी बांधली आहे. मंदिराच्या भिंतीतच दोन छोट्या तोफा एका ठिकाणी स्थिर करुन ठेवलेल्या आहेत. त्याच्या शेजारी वीरगळ आहे.[५२] मंदिर व मशिदीच्या समोर भव्य पटांगण आहे. या पटांगणामध्ये मोठ्या आकाराची तोफ ठेवली आहे. तटबंदीच्या भिंतीवर मोठ्या वृक्षांचे साम्राज्य दिसते. तटबंदीस काही ठिकाणी भगदाड पडले आहे.[५३]

डांबरी रस्त्याच्या डावीकडील तटबंदीच्या बुरुजावर शासनाने झेंडा फडकवण्यासाठी ध्वजस्तंभ उभारला आहे. या ठिकाणी डाव्या बाजूस एक दरवाजा आहे. यातून पुढे जाणाऱ्या चमत्कारिक वाटेवर रणमंडळ नावाची एक वैशिष्ट्यपूर्ण आणि अनोखी व्यवस्था आहे. या गडाच्या पूर्व दरवाजासमोर आतल्या बाजूने भिंत घातलेली असून या भिंतीमुळे नवखा मनुष्य भिंत व तट यामधील जागेवरुन उजव्या बाजूकडे सरकत राहतो, पण ही वाट पुढे बंद केलेली असल्यामुळे त्याला किल्ल्यात प्रवेश करता येत नाही. अशा या रणमंडळात फसलेल्या व्यक्तीस गडाच्या तटावर बसलेले सैनिक बंदुकीच्या गोळीने किंवा बाणाने अचूक टिपत असत.

किल्ल्याच्या सभोवताली असणारे खंदक पूर्णपणे बुजत चाललेले आहेत. अशा खंदकात सर्वत्र वनस्पतींचे आणि घाणीचे साम्राज्य आहे. त्यात प्रचंड कचरा साठलेला

दिसतो.[५४] किल्ल्याच्या बाजूस किल्ले संग्रामदुर्ग ऐतिहासिक महत्त्व असा एक मोठा फलक किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठान, चाकण यांच्यामार्फत लावलेला आहे. सदर फलकावर चाकणचा संक्षिप्त इतिहास, किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याचे अतुलनीय कार्य याचे वर्णन केले आहे. हा किल्ला स्वच्छ ठेवावा असाही संदेश त्यावर लिहिण्यात आला आहे.[५५]

सदर फलकाजवळच महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई विभागाचा 'संग्रामदुर्ग या असंरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्तीचे काम' याबाबत फलक [५६] लावण्यात आलेला आहे. सदर किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीसाठी एक कोटी रुपये अंदाजपत्रकीय रक्कम दाखविण्यात आली आहे. या निधीची उपलब्धता 'मागणी क्रमांक झेड डी २:२२५ कला व संस्कृती (००) १०३ पुरातत्त्वशास्त्र (०१) (०६) राज्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे किल्ले व धार्मिक स्थळे याची देखभाल व संरक्षण (२२०५, १३०५) २७ लहान बांधकामे' यानुसार करण्यात आली आहे. सदर कामाचा कालावधी ९ महिने इतका आहे. या कामाचे वास्तुविशारद वैशाली लाटकर असून ठेकेदार मेसर्स अरुण के लांजेवार, कॅम्प ऑफिस नगरपालिका हे आहेत.

या अंदाजपत्रकानुसार चाकणच्या भुईकोट किल्ल्याची सुमारे एक कोटी रुपये खर्च करुन नव्याने बांधलेली भिंत अतिवृष्टीने ढासळली आहे. दगडाच्या तोडी वापरुन भिंतीची काही ठिकाणी दुरुस्ती करण्यात आली होती. अवघ्या तीन चार वर्षापूर्वीच झालेल्या नवीन बांधकामाचा काही भाग दि. १५ जुलै २०१७ रोजी कोसळला. सुदैवाने जिवित हानी झाली नाही. या घटनेची पाहणी आमदार सुरेश गोरे यांनी स्वत: करुन पुरातत्त्व खात्याचे वरिष्ठ अधिकारी विलास वाहणे यांना याबाबत माहिती कळवून पुन्हा लवकरात लवकर डागडुजी करावी व ठेकेदारावर कडक कारवाई करावी अशा सूचना दिल्या.[५७]

चाकणचा किल्ला केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग तसेच राज्य पुरातत्त्व विभाग या दोघांच्याही अखत्यारीत येत नाही. हा किल्ला असंरक्षित किल्ला आहे.[५८] या किल्ल्याच्या पडझडीकडे, अतिक्रमणाकडे, विध्वंसाकडे कोणाचेही लक्ष नसल्याचे

दिसून येते. चाकणचा किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित होण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे.[५९] सदर प्रस्तावास राज्य शासनाकडून मान्यता मिळेपर्यंत चाकण किल्ला अजूनच भग्नावस्थेत जाईल अशी भिती आहे. ब्रिटिश काळापर्यंत चाकणच्या व स्वराज्याच्या राजकीय जीवनात या किल्ल्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन व जतन होणे गरजेचे आहे.

**सिंहगड**

महाराष्ट्राच्या इतिहासात सिंहगड किल्ल्यास मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. पुण्यापासून नैऋत्येस सुमारे २४ किमी अंतरावर हा किल्ला आहे.किल्ल्यावर वाहनतळ विकसित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत २०११-१२ साली सिंहगड किल्ल्यावर वाहनतळ बांधण्यासाठी १.१० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती.[६०] वाहनतळावर सौर उर्जेवर चालणारे पथदिवे बसविण्यात आले आहेत. सिंहगडासारख्या ऐतिहासिक वास्तूचे जतन व संरक्षण करण्यासाठी वनविभाग प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे कचरा कुंड्यांचीही सोय जागोजागी केलेली दिसून येते. किल्ल्याच्या ऐतिहासिक मूल्यांना बाधा पोहोचू नये यासाठी वन अधिकारी, कर्मचारी, पोलिस व वनसंरक्षण समितीचे सुरक्षारक्षक प्रयत्नशील आहेत. गडावरील टाकी व त्याठिकाणचे पाणी दूषित करू नये यासाठी सूचना फलक लावलेले दिसतात. वनविभागाने सिंहगड किल्ला संरक्षित क्षेत्र म्हणून जाहीर केले असून किल्ल्यावर कसल्याही प्रकारचे गैरवर्तन,प्लॅस्टिकचा वापर, धूम्रपान, मद्यपान, भिंतीवर, वृक्षांवर नावे लिहिणे अशी गैरकृत्ये होऊ नयेत यासाठी गंभीर सूचनांचे फलक लावण्यात आले आहेत.[६१]

सिंहगडावर पर्यटकांची वर्दळ अतिशय लक्षणीय दिसून येते. पुण्यापासून अगदी जवळचे आणि अर्धा पाऊण तासात पोचता येण्यासारखे एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून सिंहगड लोकप्रिय झाला आहे. एक दिवसाच्या पिकनिकसाठी लोक सिंहगडास प्राधान्य देतात. त्यामुळे सिंहगडावर पर्यटकांची सतत वर्दळ दिसून येते.[६२]

वाहनतळापासून पुढे चालत गेल्यानंतर एक दरवाजा लागतो. याला पुणे दरवाजा क्रमांक एक या नावाने ओळखले जाते. दरवाजाचा आकार जरी लहान असला तरी त्याचे दोन्ही बुरुज भव्य आहेत. दोन्ही बुरुजांच्या मध्ये पाच कमानीसारख्या रचनांचे बांधकाम दगडात केलेले दिसून येते. उजव्या बाजूला संरक्षक रेलिंग बसवले आहे. बुरूजावर झाडे झुडपे उगवलेली दिसून येतात. बुरुज व दरवाजा सुस्थितीत असल्याचे दिसून येते. दरवाजाच्या आतील बाजूस असणाऱ्या कमानीमध्ये नरवीर तानाजी मालुसरे यांनी ४ फेब्रुवारी १६७० रोजी प्राणार्पण करुन गड जिंकला, स्वातंत्र्ययोध्दा नावजी लखमाजी बलकवडे यांनी १ जुलै १६९३ रोजी गड जिंकला आणि छत्रपती राजाराम महाराज यांनी या किल्ल्यावर ३ मार्च १७०० रोजी देह ठेवला अशा आशयाचा मजकूर कोरलेला शिलालेख दिसतो.[६३] उजव्या बाजूने कमानीवरुन पायऱ्या चढून जाऊन दरवाजाच्या छतावर जाता येते.

पुढे महाराष्ट्र शासन वनविभाग, पुणे यांचेमार्फत सिंहगड स्थानदर्शक नकाशा लावण्यात आला आहे. हा नकाशा संपूर्ण सिंहगडावरील विविध स्थळांचे अचूक दर्शन घडवतो.[६४] पुणे दरवाजा क्रमांक दोन हा क्रमांक एक दरवाजापेक्षा भव्य, उंच आणि प्रशस्त आहे. या दोन क्रमांकाच्या दरवाजाच्या बुरुजांची डागडुजी करण्यात आली असल्याचे दिसून येते. दोन्ही बाजूचे बुरुज भव्य आहेत. त्यांची उंची लक्षणीय आहे. बुरुज सुस्थितीत असल्याचे दिसून येते. बुरुजांवरुन दरवाजाच्या छतावर जाता येते. बुरुजांची दुरुस्ती दगड व सिमेंटव्दारे केल्याचे दिसून येते. पुणे दरवाजा क्रमांक तीनची रचना एक व दोन क्रमांकाच्या दरवाजांपेक्षा वेगळी दिसते. ह्या दरवाजाला दगडी चौकोनी चौकटआहे. दोन्ही बुरुज भव्य आहेत. त्यांची उंची लक्षणीय आहे. दोन्ही बुरुजांच्या वरचा भाग पुरातत्त्व खात्यामार्फत दुरुस्त करण्यात आला आहे. हे बांधकाम दगड व सिमेंटचा वापर करुन केल्याचे दिसते. दोन्ही बुरुजांवर कपारीत झाडे उगवल्याचे दिसून येते.[६५] या बुरुजाकडे वन विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. कारण वनस्पतींची वाढ खूपच झाल्याचे दिसून येते. बुरुजाला काही ठिकाणी भगदाड पडल्याचे दिसते. दरवाजातून आत गेल्यावर उजव्या आणि डाव्या बाजूस खोलीवजा जागा आहे. परंतु त्यास छत नाही. हा तिसरा दरवाजा सर्वात प्राचीन

असून त्यावरील गणेश पट्टीवरच्या बांधणीत कमळ कोरलेली आहेत. हा तिसरा दरवाजा सातवाहन कालीन आहे. देवगिरीच्या यादवांच्या ताब्यात हा गड होता. येथून उत्तरेकडील सर्व प्रदेशावर यादवांचे साम्राज्य पसरले होते.[६६] या दरवाजाकडे जात असताना मागे एका कड्यात वरच्या बाजूस आणखी एक दरवाजा दिसतो. तो डोणजे दरवाजा या नावाने ओळखला जातो. या दरवाज्याखालील सपाटीवरुन डोंगराच्या कपारीतून गडाखालच्या डोणजे गावाकडे रस्ता जातो.

पुणे दरवाजा क्रमांक तीन मधून आत सरळ गेल्यावर आपण एका दहा-बारा मीटर उंचीच्या कड्याखाली येतो. ह्या कड्यास खांद कडा असे म्हणतात. ह्या कड्यावरुन पूर्वेकडील पुणे-पुरंदर पर्यंतचा परिसर दिसतो. ह्या खांद कड्यावरुन आपण मागे वळून येताना एक पाण्याचे कुंडअसून त्यास सुरुंगाचे पाणी म्हणतात. आत स्वच्छ पाणी आहे. भुयारात पाणी असल्याने त्याला सुरुंगाचे पाणी असे संबोधले जाते.सध्या हे पाणी वापरले जात नाही.

डोणजे दरवाजातून आत जाताना उजव्या बाजूस एका मोठ्या खोलीएवढे आवार आहे. त्याला घोड्याची पागा असे म्हणतात. त्यात २५-३० घोडे राहू शकतील एवढी मोठी जागा आहे. आतल्या बाजूस पाण्याची टाकी व हौद आहे. टाकीतील पाणी साचलेले आहे. ते शेवाळयुक्त असल्याचे दिसून येते. त्यामध्ये खूपच कचरा पडलेला आहे. आत प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या पडलेल्या दिसून येतात. परिणामी तिथे दुर्गंधी जाणवते. सध्या ही टाकी वापरात नाही. हा भाग एखाद्या लेण्यासारखा दिसतो.[६७] एकेकाळी या गडावर बौध्द भिक्षुंचे वस्तीस्थान असण्याची शक्यता आहे.

दरवाजातून आत गेल्यावर एक भक्कम दगडी इमारत लक्ष वेधून घेते. याला तोफखाना असे नाव देण्यात आले आहे. त्यास दारुखान्याची इमारत किंवा दारुचे कोठार असेही म्हटले जात होते. आज्ञापत्रातील वर्णनाला अनुसरुन सिंहगडाच्या कमी वहिवाटीच्या मागील जागी डोणजे दरवाजाजवळील सपाटीवर सहसा खालून किंवा वरुन दिसणार नाही, वस्तीपासून दूर अशी ही जागा दारु कोठार म्हणून अस्तित्वात होती. इमारतीच्या आत डागडुजी केल्याचे दिसून येते. ते काम सिमेंट व वाळूचा वापर करुन झाले आहे. इमारतीच्या काही ठिकाणी भिंतींना भेगा पडलेल्या

दिसतात. आतल्या बाजूस कचरा साठल्याचे दिसते. इमारतीच्या बाहेरच्या बाजूस दगडाच्या राशी आहेत.[६८]

दारुकोठाराच्या पुढे शिवसृष्टी नावाची एक इमारतआहे. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील रोमहर्षक प्रसंगांना ताम्रपटांतून चितारलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वरील एक उत्तम असे प्रदर्शन सिंहगडावरील अमूल्य ठेवा आहे असे म्हणावे लागते. शिवसृष्टी पाहण्यासाठी पर्यटकांना तीस रुपये प्रवेश मूल्य ठेवण्यात आले आहे वाटेवरजागोजागी सौर उर्जेवर चालणारे पथदिवे बसवलेले दिसतात. हे पथदिवे जिल्हा परिषद सदस्य मा. श्री. दशरथ काळभोर यांनी सन २०१३-१४ च्या वित्त आयोग निधीतून बसवून दिले आहेत.[६९]

सिंहगडावर लोकमान्य टिळकांचा बंगला आहे. बंगल्याच्या एका कोपऱ्यात त्यांचा अर्धपुतळा बसविण्यात आला आहे. लोकमान्य टिळकांना सिंहगडाचे हवेशीर, प्रसन्न वातावरण, ऐतिहासिक पार्श्वभूमी फार आवडत असे. इ.स. १८९० साली रामलाल नंदराम नाईक यांच्याकडून लोकमान्य टिळकांनी हे घर खरेदी केले.[७०] हे निवासस्थान एक मजली असून त्याच्या छतावर पत्रे बसवलेले दिसून येतात.

लोकमान्य टिळक बंगल्याच्या उत्तरेस छत्रपती राजाराम महाराजांची समाधी आहे. ही समाधी उंच जोत्यावर पूर्वाभिमुखी आहे. समाधीच्या खोलीला घुमटी आहे. आत जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. घुमटीच्या आत पोकळ वृंदावन आहे. आतल्या खोलीत एका देवळीत एक देवी, दोन बाण आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या पादुका आहेत. आत खोलीमध्ये दोन दगडी शिल्पे दिसून येतात. छत्रपती राजाराम महाराजांच्या समाधीच्या शेजारी पाण्याची टाकी आहेत. दक्षिणेस राजाराम टाके आहे. सिंहगडावरील सध्या असलेल्या सर्व अवशेषांमध्ये छत्रपती राजाराम महाराजांची समाधी उत्तम स्थितीत आहे.[७१] समाधीच्या पश्चिमेस कलावंतीणी बुरुज आहे. बुरुजाची पडझड झाली आहे. बुरुजाच्या दोन बाजूस लोखंडी पाईपचे रेलिंग संरक्षणासाठी बसवण्यात आले आहेत. सध्याही जागा पर्यटकांसाठीफोटोग्राफीचा स्पॉट म्हणून लोकप्रिय झालेली दिसते. बुरुजावर बसण्यासाठी दगडी कट्ट्यासारखी रचना आहे.

कलावंतीणी बुरुजाच्या पूर्वेला एक दगडी इमारत असून त्याला वस्तुसंग्रहालय असे नाव आहे. ही इमारत सुस्थितीत असल्याचे दिसून येते. सध्या तेथे आत काही दाखवण्यासारखे नाही. कदाचित भविष्यात या ठिकाणी वस्तुसंग्रहालय उभे करण्याचे नियोजन असण्याची शक्यता आहे. वस्तुसंग्रहालयाच्या जवळ एक भव्य, प्रशस्त, अतिशय देखणा व आकर्षक असा खुला रंगमंच उभारण्यात आला आहे. सिंहगडावर एवढ्या मोठ्या क्षमतेचे खुले रंगमंच हा खरोखर एक अभिमानास्पद आणि कौतुकास्पद असा उपक्रम आहे. याची आसन क्षमता साधारण एक हजार पेक्षा अधिक आहे. भविष्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी या खुल्या रंगमंचावर प्रेक्षकांना मिळणार यात काही शंका नाही.[७२]

कल्याण दरवाजा हा गडाचा पूर्वी राजमार्ग असल्याने त्याचे दोन दरवाजे भक्कम बांधणीमुळे आपले लक्ष वेधून घेतात. वरच्या दरवाजाच्या आतील बाजूला पहारेकऱ्यांच्या खोल्या आहेत. बाहेरच्या बाजूला उत्तरेच्या बुरुजात माहुतासह हत्तीच्या पुढच्या भागाचे शिल्प आहे. गणेशपट्टीच्या वर दक्षिण बाजूस गण्डभेरुण्डाचे शिल्प कोरलेले दिसून येते. या दरवाजाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी येथेच बसून रविंद्रनाथ टागोरांनी बंगालीत रचलेल्या शिवकाव्याच्या स्मृती जागविल्या होत्या.[७३] खालच्या दरवाजाखाली मारुतीचे मंदिर आहे. हे दोन्ही दरवाजे आज बरेचसे सुस्थितीत आहेत. परंतु दरवाजाच्या दोन्ही बुरुजांवर वनस्पती उगवलेल्या दिसतात. कल्याण दरवाजा हा आतल्या बाजूस असल्याने पुणे दरवाजाप्रमाणे याची निगा राखली नसल्याचे दिसून येते.[७४]

कल्याण दरवाजातून नैऋत्येच्या बुरुजाकडे जाताना उंचवट्यावर उदेभान राठोड या राजपुताचे स्मारकचिन्ह म्हणून एक चौकोनी दगड आहे. हा दगडी चौथरा चौकोनी आकाराचा असून तो जमिनीलगतच आहे. उदेभान राठोड यांचे मृत्यूस्थळ असा फलक महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत लावण्यात आला आहे.[७५] झुंझार बुरुजावरुन मागे येऊन पश्चिमेकडे डोणगिरीचा कडा आहे. त्याला तानाजीचा कडा असेही म्हणतात. येथूनच तानाजी आपल्या निवडक सहकाऱ्यांसह गडावर आला

व त्याने सिंहगड जिंकून घेतला. आज या कड्यावर जो बांधीव तट आहे तो तानाजीच्या प्रसंगानंतर शिवरायांनी परत कोणी वर चढून येऊ नये म्हणून बांधलेला आहे.

सिंहगडावर जागोजागी पाण्याच्या टाक्या आढळून येतात. डोणगिरीच्या कड्याच्या पुढे आल्यावर देवटाके ही पाण्याची टाकी आहे. एक पत्र्याचे छप्पर असलेली खोली म्हणजे देवटाके होय. आजही या देवटाके मधील पाणी पिण्यासाठी वापरले जाते. या टाक्यातील पाण्याची चव मधुर असल्याचे जाणवते. पाण्यात कचरा वगैरे पडू नये म्हणून त्याची पुरेशी काळजी घेण्यात आली आहे.[७६] त्याच्या जवळच हत्ती टाके आहे. हा पाण्याचा मोठा तलाव आहे. या पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जात नाही. इतर कामासाठी पाणी वापरले जाते. येथून जवळच समर्थ स्थापित मारुती मंदिर आहे. या छोटेखानी मंदिरात मारुतीचीमूर्ती आहे.[७७]

पुढे अमृतेश्वर मंदिराची कमान असून त्याची डागडुजी करण्यात आली आहे. काही ठिकाणी दगड ढासळले आहेत. आतल्या बाजूस अमृतेश्वर महादेव मंदिर आहे. मंदिरात गाभाऱ्यामध्ये भैरव व त्याची शक्ती भैरवी अशा दोन मूर्ती उभ्या आहेत. भैरवाच्या चार हातात अनुक्रमे जंबिया, डमरु, त्रिशूळ व मुंडके आहे. मुंडक्यातून गळणारे रक्त पिण्यासाठी जवळच कुत्रा तोंड वर करुन दोन पायावर उभा आहे. भैरवीच्या हातात भाला, डमरु, त्रिशूळ व परळ आहे. मंदिरात स्वच्छता चांगली राखल्याचे दिसून येते. मंदिरात नियमितपणे पूजा अर्चा होते. १७ व्या शतकातले हे मंदिर पूर्वी मोठे असावे, हे तेथे पडलेल्या अवशेषांवरुन ध्यानात येते.[७८]

अमृतेश्वर मंदिराच्या उजव्या बाजूला नरवीर तानाजी मालुसरे समाधी आहे. समाधीकडे जाताना श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे फलक दिसतात. या भागात दगडांच्या राशी पडलेल्या दिसून येतात. चुन्याच्या एक घाणा बसविण्यात आला आहे. त्याच्या जवळच अनेक चुन्याची पिंपे ठेवलेली दिसतात. सध्या या समाधीचे सुशोभिकरणाचे काम युध्दपातळीवर चालू आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे स्वराज्य निष्ठा शिल्प व परिसर विकासाचा भूमिपूजन समारंभ मा. खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते शुक्रवार दि. ०५ जून २०१५ रोजी संपन्न

झाल्याचा फलक लावण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी मा. ना. प्रकाश जावडेकर, केंद्रीय पर्यावरण व वने, संसदीय कामकाज मंत्री, मा. ना.गिरीश बापट, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण व औषध प्रशासन व संसदीय कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना.दिलीप कांबळे सामाजिक न्याय राज्यमंत्री, मा. ना. विजय शिवतारे, जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमास पुणे महापालिका आयुक्त कुणाल कुमार व पुणे महानगरपालिका महापौर मा. दत्तात्रय धनकवडे उपस्थित होते.[७९]

पुणे महानगरपालिकेतर्फे सिंहगड किल्ल्यावर नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ ठिकाणी स्वराज्य शिल्प उभारणे, पुतळ्यावर ब्रांझमधील मेघडंबरी करणे, त्यांच्या जीवन चरित्रावर आधारित ब्रांझमधील म्युरल्स पट, नेवासा दगडांमध्ये सीमाभिंतीचे बांधकाम करणे, फरसबंदी करणे, लॅन्डस्केपिंग वर्क करणे ही कामे करावयाची आहेत. या प्रकल्पासाठी कामाचे आर्किटेक्ट सल्लागार यांनी रक्कम रु. ३.९९ कोटी रकमेचे पूर्वगणपत्रक केले असून आतापर्यंत जागेवर सुमारे ७०% सिव्हिल वर्क व सुमारे ७०% म्युरल्स व मेघडंबरीचे काम झाले आहे. सिव्हिल कामासाठी आतापर्यंत एकूण रक्कम रु.१,५४,४०,०००/- खर्च झाला असून म्युरल्सचे कामासाठी एकूण रक्कमरु. २६,३०,०००/- खर्च झाला आहे.[८०]

दरवर्षी माघ वद्य नवमीस सिंहगडावर तानाजी मालुसरे यांची पुण्यतिथी साजरी होते. सध्या तानाजींचे स्मारक छोटेखानी असून मेघडंबरीच्या आत तानाजींचा अर्धपुतळा बसवण्यात आला आहे. समाधी परिसर चांगल्याप्रकारे स्वच्छ ठेवला गेल्याचे दिसून येते. समाधीजवळ एक मावळा तैनात करण्यात आला आहे. समाधीच्या उजव्या बाजूस एक दगडात कोरलेले शिल्प आहे. डाव्याबाजूस पाठीमागे सुध्दा एक दगडी शिल्प कोरलेले दिसून येते. सध्या तानाजी मालुसरे यांच्या समाधीचे काम प्रगती पथावर आहे. नजीकच्या काळात मालुसरे समाधी सिंहगडावरील प्रमुख आकर्षण केंद्र असेल अशी खात्री वाटते.

समाधीच्या उजवीकडे एका उंचवट्यावर कोंढाणेश्वर मंदिर असून ते पूर्वाभिमुख आहे. बांधकाम पूर्णपणे दगडी आहे. मंदिर छोटेसेच आहे. मंदिराच्या

बाहेर दगडात कोरलेले नंदीचे शिल्प आहे. गाभाऱ्याच्या दरवाजाच्या चारही बाजूंना असणारी नक्षी व मनुष्यकृती यादवकालीन आहेत. गाभाऱ्यात महादेवाची पिंड उत्तराभिमुखी आहे. सिंहगडावर वनविभागाचे एक विश्रामगृह उभारण्यात आले आहे. विश्रामगृह एकमजली असून बांधकाम पूर्णपणे दगडी आहे. आवारामध्ये वृक्षारोपण केल्याचे दिसते.

संपूर्ण सिंहगड किल्ल्यावर पर्यटकांना प्रत्येक स्थळावर जाण्यासाठी असणाऱ्या मार्गावर दगडी रुंद रस्ता तयार करण्यात आला आहे. पर्यटकांसाठी विविध स्थळांच्या माहितीचे फलक जागोजागी लावण्यात आले आहेत. पर्यटकांनी किल्ल्यावर स्वच्छता राखावी यासाठी सूचना फलक लावले गेल्याचे दिसून येतात. सिंहगडावरील सर्वच मंदिरांत कमालीची स्वच्छता जाणवते. सर्वत्र कचरा कुंड्यांची सोय पुणे महानगरपालिकेने व वनविभागाने केल्याचे दिसून येते. गडावर जागोजागी मोठे वाढलेले गवत कापून स्वच्छता राखल्याचे दिसून येते. संपूर्ण गडावर विपुल वृक्षसंपदा दिसून येते. वनविभागाने वृक्षारोपणासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसते. अशा वृक्षांवर विविध पक्ष्यांचे वास्तव्य दिसून येते.

पर्यटकांसाठी ऐतिहासिक स्थळदर्शन व एकदिवसीय सहली यासाठी एक उत्कृष्ट स्थळ म्हणून सिंहगडाचा लौकिक वाढतो आहे. लहान मुलांना इतिहासाची आवड निर्माण करण्यासाठी सिंहगडमहत्त्वाचा किल्ला आहे. गडावर आपटे बंगला याठिकाणी पर्यटकांना राहण्याची सोय आहे. त्यासाठी पूर्वपरवानगी घ्यावी लागते. गडावर काही ठिकाणी स्थानिक लोक, कारागीर यांची निवासस्थाने दिसून येतात.[८१]

तानाजी मालुसरे, उदेभान राठोड, लोकमान्य टिळक यांच्यामुळे गडाचे ऐतिहासिक मूल्य वृद्धिंगत होत आहे. महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत हा किल्ला येतो. सिंहगडावर पुरातत्त्व विभागाव्दारे आजपर्यंत पाण्याच्या टाक्यांमधील गाळ काढून टाक्या स्वच्छ करणे, विविध दरवाजांची डागडुजी व दुरुस्ती करणे, पुणे दरवाजापासून भिंत दुरुस्त करणे, दारु कोठार, टेहळणी बुरुज यांची उत्खननाव्दारे दुरुस्ती करणे, पडझड झालेल्या ठिकाणी दरजा भरणे अशी अनेक कामे करण्यात आली आहेत.[८२] पुरातत्त्व विभागाने २०१६-१७ साली सिंहगड

किल्ल्यासाठी रु. ५० लाखांची एकूण तरतूद केली होती. ऑक्टोबर २०१६ अखेर विविध कामांवर १२,३३,६१८ रु. खर्च करण्यात आले आहेत. सन २०१६-१७ मधील उर्वरित खर्च ३७,६६,३८२ रु. झाला आहे. पुढील पाच महिन्यांसाठी अपेक्षित खर्च एक कोटी रुपये इतका आहे.[८३]

सिंहगड किल्ला पुणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर आहे. तरी पुणे महानगरपालिकेने राज्य पुरातत्त्व विभाग आणि वन विभाग यांच्या विशेष परवानग्या घेतल्या असून सिंहगडावर विकासकामे सुरु केली आहेत. त्यासाठी जवळपास ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेने प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८९ नुसार महानगरपालिकेच्या मुख्य सभेची मान्यता घेऊन सिंहगडाच्या संवर्धनाचे कार्य सुरु केले आहे.[८४]

**राजगड**

सह्याद्रीतील प्रत्येक किल्ला आपले स्वत:चे वेगळेपण बाळगून आहे. राजगड किल्ल्याची अद्भूत वास्तुरचना, दुर्गशास्त्रातील प्रगत स्थापत्याचा आदर्श नमुनाच आहे. गुंजण मावळ भागाचे संरक्षण करण्यासाठी अतिशय मोक्याच्या ठिकाणी शिवाजी महाराजांनी राजगड हा अप्रतिम किल्ला बांधला. राजगड ही स्वराज्याची पहिली राजधानी वीस बावीस वर्षे होती. राजगड किल्ला अत्यंत अभेद्य, दुर्गम, सुरक्षित, आकाराने प्रचंड मोठा, उंचीने उत्तुंग असा असून स्वराज्यातील आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील अनेक चढ उतारांना साक्षीदार असणारा किल्ला आहे.

राजगडाचा विस्तार मध्यभागी बालेकिल्ला व भोवताली तीन माच्या असा एखाद्या सिलींग फॅन सारखा आहे. याठिकाणी राज्य पुरातत्त्व विभागाकडून राजगडाच्या डागडुजीचे काम चालू असल्याचे दिसून येते. येथून काही अंतरावर प्लॅस्टिकच्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या पिशव्या, मद्याच्या बाटल्या, सिगारेटस् यांचा वापर केल्याने किल्ल्याचे सौंदर्य नष्ट होण्यासंदर्भातील एक फलक पर्यटकांसाठी लावलेला दिसतो. [८५]

किल्ल्याची चढण झाडीमधून सुरु होते. वळणावळणाच्या नागमोडी रस्त्यावरुन पाली दरवाजाकडे जाण्यासाठी प्रशस्त रस्ता या डोंगरामध्ये तयार केलेला आहे. पाली दरवाजाला दोन प्रवेशद्वारे आहेत.

पहिले प्रवेशद्वार हे भरपूर उंचीचे आणि रुंदीचे असून ते भव्य व भक्कम बांधणीचे आहे. दरवाजाच्या आत येताना उजव्या बाजूस लोखंडी रेलिंग संरक्षणासाठी बसविण्यात आले आहे. पहिल्या प्रवेशद्वारास दोन्ही बाजूस बुलंद बुरुज बांधलेले असून त्यांच्याद्वारे दरवाजाचे संरक्षण झाले आहे. दरवाजाच्या आतीलडाव्या बाजूस दगड आणि सिमेंट व वाळू यांच्या वापराव्दारे बांधकाम करुन भिंतीची डागडुजी केल्याचे दिसून येते. भिंतीला जागोजागी जंग्या दिसतात. आत जात असताना डाव्या बाजूची तटबंदी काही ठिकाणी ढासळली असल्याचे दिसून येते.[८६]

पहिले प्रवेशद्वार ओलांडून सुमारे २०० मीटर अंतरावर दुसरे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वाराकडे जाण्यासाठी मोठमोठ्या दगडी पायऱ्यांवरुन जावे लागते. पायऱ्यांच्या उजव्या आणि डाव्या बाजूंच्या भिंतींची सिमेंट व वाळू वापरुन दुरुस्ती केल्याचे दिसते. दुसऱ्या प्रवेशद्वाराला टोकदार कमान असून प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस भक्कम बुरुज आहेत. दोन्ही बुरुजांवर वनस्पती उगवलेल्या दिसून येतात. बुरुजांचे काही ठिकाणी दगड निखळलेले आहेत.प्रवेशद्वाराची कमान नक्षीदार व सुबक आहे. दोन्ही बुरुजांच्या वरील बाजूस शत्रूवर मारा करण्यासाठी छिद्रे ठेवलेली आहेत. या दरवाजाचे लष्करी स्थापत्याच्या दृष्टीने एक वैशिष्ट्य म्हणजे दरवाजावर आणि बुरुजावर जे परकोट बांधलेले आहेत, त्या परकोटांना गोल आकाराचे झरोके ठेवलेले दिसून येतात.[८७] या गोल झरोक्यांचा उपयोग तोफा डागण्यासाठी केला जात असे. प्रवेशद्वाराच्या मध्यभागी एक चौकोनी खिडकी ठेवलेली असून त्याचा वापर पहारा करण्यासाठी होत असे. दुसऱ्या दरवाजाच्या कमानीवर राजमुकुटाच्या आकाराची आकृती कोरलेली आहे. याचा अर्थ आपण स्वतंत्र राजे आहोत ते स्पष्ट करण्यासाठी शिवाजी महाराजांनी अशा प्रकारची आकृती कोरुन घेतली असावी.[८८] दुसऱ्या दरवाजाच्या बाहेर पडल्यावर उजव्या बाजूस व्दाररक्षकाची खोली आहे. या ठिकाणाहून दरवाजातून आत येणाऱ्या शत्रूवर नजर ठेवता येत असे. तर डाव्या बाजूला

असणाऱ्या द्वाररक्षकाच्या खोलीतून किल्ल्यामध्ये जाणाऱ्या रस्त्यावर नियंत्रण ठेवता येत असे. सध्या या खोल्यांमध्ये पन्हाळी पत्रे ठेवल्याचे दिसून येते. या खोल्यांच्या भिंतींवर बाहेरीलबाजूस वनस्पती उगवल्याचे दिसते.

किल्ल्याच्या मुख्य व सतत वापरात असणाऱ्या दरवाजास 'पाली दरवाजा' असे नाव आहे. पाली दरवाजातून आत गेल्यानंतर डाव्या बाजूस एक पायवाट जाते. त्याच्या उजवीकडील उंच भिंतीची डागडुजीचे राज्य पुरातत्त्व विभागामार्फत गडदुरुस्तीचे काम सुरु आहे.[८९] रोप वे च्या मागील बाजूस एक पाण्याचा पंचकोनी आकाराचा तलाव दिसून येतो. त्यात सध्या पाणी भरपूर आहे. त्याला घोडेतळे या नावाने ओळखले जाते.

**पदमावती माची**

राजगडावर पदमावती माची एवढी विस्तृत सपाट जागा इतर कुठेही दिसून येत नाही. त्यामुळे पद्मावती माचीला वैशिष्ट्यपूर्ण स्थान होते, कारण गडावरील मुख्य वस्ती पदमावती माचीवरच होती. हे केवळ लष्करी ठिकाण नसून प्रत्यक्ष राजाच्या निवासाचे ठिकाणही होते. त्यामुळे येथे विविध इमारतींच्या अवशेषांची संख्या जास्त दिसून येते.

पद्मावती माचीवर राजसदरेचा चौथरा आहे. राजगडावर एकूण चार सदर होत्या. त्यौपकी मुख्य सदर पद्‌मावती माचीवर होती. पूर्वी येथूनच राज्यकारभार व न्यायनिवाडे केले जात होते. १९४८-४९ सालापर्यंत इथली सदरेची वास्तू शाबूत होती. भोरकर पंतसचिवांनी त्या जागी गाद्या, लोड, तक्के मांडून शिवरायांचे स्मरण जागृत ठेवले होते. परंतु संस्थाने विलीन झाल्यावर किल्ल्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले. १९५६ साली झालेल्या वादळात ही सदर साफ भुईसपाट झाली. *'स्वराज्यातील तीन दुर्ग'* या पुस्तकात प्रा. ग. ह. खरे यांनी पृष्ठ १७ वर सदरेची माहिती दिली आहे. पूर्वी सदरेत ओटीच्या कडेस मधल्या खणात एक जुना गालिचा अंथरुन त्यावर लोड ठेवला जात असे. याच पुस्तकात सदरेची दोन प्रकाशचित्रेही दिलेली आहेत.[९०] खरेतर त्याचवेळी या सदरेची काळजी घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या पुस्तकात त्यांनी सुरुदार नक्षीचे खांब, भिंती, कोनाडे असलेल्या या सदरेचे दुर्मिळ

छायाचित्र प्रसिद्ध केले होते. पुढे १९६० च्या दशकात ज्येष्ठ दुर्ग अभ्यासक आणि साहित्यिक गो. नी. दांडेकर यांनी राजगडाच्या काढलेल्या छायाचित्रांत या सदरेच्या जागी सुरुदार नक्षीचा केवळ एक खांब उभा असलेला दिसत आहे. दहा-वीस वर्षास सारी इमारत नष्ट झाली. गोनीदांच्याच छायाचित्र संग्रहात या सदरेपुढे एक बांधीव ओटाही दिसत आहे. पण पुढील दहा-वीस वर्षात हा खांब आणि ओटाही गायब झाला. यानंतर पुढील अनेक वर्षे या सदरेच्या जोत्याचे तळखडे दिसत होते. पण आता गेल्या पाच-दहा वर्षात जीर्णोध्दाराच्या नावाखाली या सदरेचे हे सारे ऐतिहासिक दृश्यच पार पुसून टाकले आहे.[११] राजसदरेच्या जागी राज्य पुरातत्त्व खात्याने २००२-०३ मध्ये उत्खनन केले असता दगडी पायऱ्यांचा जिना असलेले ३ मीटर उंचीचे व ४ मीटर लांबीरुंदीचे एक तळघर सापडले.[१२]

सध्या राजगडाच्या सदरेचे जीर्णोध्दाराचे काम राज्य पुरातत्त्व विभागामार्फत सुरु आहे. साधारण सहा-सात फूट उंच अशा दगडी चौथऱ्यावर सदरेची वास्तू उभी आहे. सदरेच्या वास्तूला सागवानी लाकडाची भक्कम चौकट बसवण्यात आली आहे. चारही बाजूंनी दगड व सिमेंट वाळू वापरुन बांधकाम सुरु आहे. बाहेरच्या बाजूस दगडांच्या राशी दिसून येतात. आतमध्ये छताचे काम अर्धवट राहिलेले दिसते. उभे स्तंभ म्हणून चौकोनी लाकडांचा वापर केलेला आहे. सध्या सदर या वास्तूला अजून छत तयार झालेले नाही. काम बरेचसे अपूर्ण असल्याचे दिसते.[१३] सदर वास्तूसाठी राज्य पुरातत्त्व विभागाने सन २०१६-१७ मध्ये ६२,१४,६०० रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे.[१४] सदरेचे स्तंभाचे व छताचे लाकडी काम पूर्ण करणे, याठिकाणी लोकांना राहण्यासाठी जागानिर्माण करणे, सदरेच्या पुढच्या भागात आधार भिंत उभी करणे अशी कामे राज्य पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येणार आहेत.[१५]

सदरेजवळ डावीकडे प्रचंड मोठा लांब रुंद असलेल्या दगडी चौथऱ्यावरछत्रपती शिवाजी महाराजांचा राजवाडा होता. ‘अंबरखाना’ हा फलक जीर्ण इमारतीजवळ लावण्यात आला आहे. अंबरखान्याच्या अवशेषांच्या परिसरात गवताचे साम्राज्य आहे. राजवाडा आणि सदर यांच्या मध्ये घोड्याची पागा या वास्तूचे अवशेष दिसून येतात. [१६]

अंबरखान्याच्या बाजूच्या वाटेने थोडे खाली उतरुन आल्यावर समोर दोन पत्र्याच्या छपराच्या इमारती आहेत. त्यातील एक पत्र्याची शेडपुरातत्त्व खात्याची असून गडावर काम करणारे कामगार तेथे राहतात. या शेडच्या बाहेर उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळामार्फत १०.५८ लाख रुपयांची अंदाजपत्रकीय तरतूद केल्याचा फलक लावण्यात आला आहे. ही रक्कम जननीमाता मंदिर, बालेकिल्ला, प्रवेशद्वार पायऱ्या, जिजामाता राजवाडा इ. वास्तूंच्या जतन व दुरुस्तीच्या कामासाठी वापरण्यासाठी तरतूद केली आहे. सदर काम राज्य पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येणार आहे.[९७] गडावर पद्मावती देवीचे मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमुखी आहे. पहिल्या व दुसऱ्या शतकात ब्रम्हऋषी येथे बालेकिल्लयातील गुहेत तपस्या करत असताना त्यांची पत्नी पद्मावती उत्तरेकडील पठारावर ज्या पर्णकुटीत वास्तव्य करत असे, त्याच जागी हे पद्मावती मंदीर आहे. तिच्या नावावरुन या माचीस पदमावती असे नाव पडले. पद्मावती मंदिराच्या गाभाऱ्यातील मूर्ती भोर संस्थानच्या पंत सचिवांनी बसविली आहे.[९८] मंदिरात दोन मूर्ती आहेत. नवरात्र ते दसरा या कालावधीत तेथे उत्सव साजरा केला जातो.

दीपमाळेजवळ सई बाईंची समाधी असून जवळच रामेश्वर मंदिर आहे. मंदिराबाहेर नंदीचे दगडी शिल्प दिसते. मंदिराच्या पाठीमागे खूप मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा कचरा पडलेला दिसून येतो. पेपर, दारुच्या बाटल्या, प्लॅस्टिक कॅरी बॅग्ज, काचेचे ग्लास, प्लॅस्टिकचे ग्लास, थर्माकोलचे प्लेटस, कागदी ताटे, पाण्याच्या प्लॅस्टिक बाटल्या यांचा खच पडलेला दिसतो.[९९] गडावर दारु नेण्यास व पिण्यास मनाई करण्याचे अनेक प्रयत्न होत असतात. तरी देखील अगदी बिनधास्तपणे अनेकजण येऊन दारूच्या पार्ट्या करत असल्याचे गडावरील कामगार सांगतात.[१००]

पद्मावती मंदिराच्या बाजूस पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन मार्फत महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र स्थाने व अवशेष अधिनियम १९६० नुसार राजगड किल्ला 'राज्य संरक्षित स्मारक' म्हणून घोषित करण्यात आलेला फलक लावण्यात आला आहे.[१०१]

### बालेकिल्ला

सदरेच्या मागे असणाऱ्या डोलकाठीच्या बाजूने बालेकिल्ल्यावर जाण्यासाठी मार्ग आहे. डोलकाठीच्या वरच्या भागात एका अवघड कड्यातून वर गेल्यावर थोडी सपाटी आहे. त्याच्या खाली कातळात खोदलेली चौकोनी प्रवेशद्वार असलेली एक गुहा आहे. गुहा आकाराने लहान आहे. आत मशाल लावण्याची जागा आहे. प्रवेशद्वाराशी 'बालेकिल्ला महादरवाजा' हा फलक लावण्यात आला आहे. दरवाजावर भरपूर नक्षीकाम असल्यामुळे महादरवाजा आकर्षक दिसतो. महादरवाजा पूर्वाभिमुख आहे. या प्रवेशद्वाराला पूर्वी लाकडी दरवाजा होता, त्याच्या खुणा दिसून येतात. आतील बाजूस अडसर घालण्यासाठी जागा आहे. या प्रवेशद्वाराची उंची साधारण २०-२५ फूट आहे.

महादरवाजाच्या आत डाव्या बाजूस जननीदेवीचे मंदिर आहे. मंदिराच्या छपरावरचे पत्रे गंजलेले दिसतात. त्याला भोके पडली आहेत. इथून पुढे गेल्यावर अर्धचंद्राकृती तलाव असून त्याला चंद्रतळे असे नाव आहे. या तळ्यात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. तळ्याच्या मागील बाजूस चौकोनी आकारातील ब्रह्मेश्वर मंदिर आहे. मंदिरात शिवलिंग व तांब्याचा नाग आहे. या मंदिराच्या मागे पाण्याने भरलेले टाके आहे. तेथील गुहेस ब्रह्मर्षींची गुहा म्हटले जाते. येथून पुढे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना इमारतींचे अवशेष, जोती दिसतात. त्या सर्व भग्नावस्थेत असलेल्या दिसून येतात. जवळच दारु कोठाराच्या इमारतीचे भग्नावशेष दिसून येतात.[१०२]

चंद्रकोर तळ्याच्या पश्चिमेकडील सपाटीवर उजव्या बाजूस दगडी चौथरा असून या चौथऱ्यावर पूर्वी एखादी इमारत असावी असे वाटते. या भग्नवास्तूला 'राजवाडयाचे अवशेष' म्हणतात. बालेकिल्ल्याच्या एका बुरुजावर ध्वजस्तंभ उभारण्यात आला असून तेथे भगवा ध्वज फडकताना दिसतो. मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिकचा कचरा पडलेला आहे.

### सुवेळा माची

राजगडाच्या आग्नेय दिशेला सुवेळा माची आहे. डोंगराची निमुळती सोंड पूर्व दिशेने गेली असल्याने तिला सुवेळा माची असे नांव पडले असावे. जवळपास अडीच

किलोमीटर लांबीची सुवेळा माची चिंचोळी असल्याचे दिसून येते. माचीच्या सुरुवातीला एक छोटी टेकडीवजा जागा असून तिला 'डुबा' किंवा 'बुधला' म्हणतात. या भागात दाटझाडी झुडपे आहेत. त्या झुडपांतील मूर्ती उघड्यावरच आहेत.[१०३] तेथे हनुमान मंदिर असा फलक लावण्यात आला आहे.

येथून पुढे सुवेळा माचीची मुख्य तटबंदी सुरु होते. हा भाग चिलखती पद्धतीने बांधलेला दिसून येतो. येथील तटबंदी दोन टप्प्यात असून प्रत्येक टप्प्याच्या शेवटी बुरुजाबाहेर पुन्हा भक्कम बुरुज आहेत. पहिल्या टप्प्याचा बुरुज अतिशय भक्कम व बुलंद असा आहे. त्याच्या भक्कम पायऱ्या अत्यंत सुस्थितीत असलेल्या दिसून येतात. त्याला चिलखती बुरुज असे नाव आहे. दुसऱ्या टप्प्यात गेल्यावर तटबंदीच्या दोन्ही बाजूस आतील अंगास भुयारी चिलखती परकोटाची रचना केलेली आहे. या दुसऱ्या टप्प्याकडे जाताना एक उंच खडक असून त्या खडकात सुमारे तीन मीटर व्यासाचे आरपार छिद्र आहे. लांबून जेव्हा हा डोंगराचा भाग दिसतो तेव्हा ते छिद्र एखाद्या वाघाच्या डोळ्यासारखे दिसते. तेथेच गणेश मंदिराचे भग्न अवशेष दिसतात. त्यात शिवलिंग, नंदी, गणपती यक्षाप्रमाणे स्त्री व पुरुष मूर्ती या प्रकारची शिल्पे आहेत.[१०४]

**संजीवनी माची**

संजीवनी माची राजगडाच्या पश्चिमेस असून एक ते सव्वा किलोमीटर लांबीची ही डोंगराची सोंड कल्पकतेने बांधली असल्याचे दिसते. ही माची तीन टप्प्यांत विभागली असून माचीच्या प्रत्येक टप्प्याच्या शेवटी पश्चिमेकडील टोकास भक्कम चिलखती बुरुज बांधण्यात आलेले आहेत. ते एकमेकांच्या टप्प्यात येणारे आहेत. पहिल्या टप्प्याच्या पठारावर काही घरांचे अवशेष आणि इतर इमारतींचे अवशेषही दिसून येतात. या संपूर्ण माचीवर १९ बुरुज आहेत. त्यातील ९ बुरुज कोट-परकोट या पद्धतीचे चिलखती बुरुज आहेत. संजीवनी माचीची तटबंदी आजही सुस्थितीत व भक्कम असल्याचे दिसून येते.

संजीवनी माचीवरचा शेवटचा बुरुज भव्य आकाराचा आहे. भुयारी जिने, तिहेरी तटबंदी आणि चिलखती बुरुज हे संजीवनी माचीचे वैशिष्ट्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गबांधणीचा हा अद्भुत नमुना मानला जातो. संजीवनी

माचीवर पाणीपुरवठ्यासाठी अनेक टाक्या खोदलेल्या दिसतात. सध्या या टाक्यांमध्ये पावसाचे पाणी साठलेले दिसून येते.[१०५]

गेल्या काही वर्षात राजगड किल्ल्यावर पर्यटकांचा प्रचंड वावर वाढला आहे. विशेषत: सुट्ट्यांमध्ये शनिवारी-रविवारी सतत वर्दळ दिसते. पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे किल्ल्यावरील पाण्याचे स्त्रोत खराब होत गेले आहेत. पाण्याच्या टाक्यांमध्ये कचरा साठला आहे. पाण्याच्या टाक्यांत दारुच्या रिकाम्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या, प्रचंड गाळ साठत असल्याने हे पाण्याचे स्त्रोत निरुपयोगी ठरले आहेत. परिणामी पर्यटकांना बाटलीबंद पाणी वापरण्याशिवाय पर्याय नाही. हे बाटलीबंद पाणी पायथ्याच्या गावातील लोकांकडून विकत घेतले जातात.[१०६] वाटेत हे पाणी पिऊन संपले की मोकळ्या बाटल्या बिनधास्तपणे भिरकावून दिले जातात. बऱ्याच ठिकाणी अशा बाटल्यांचा, प्लॅस्टिक पिशव्यांचा खच पडलेला दिसतो. संपूर्ण गडावर कुठेही कचरा कुंड्याची सोय केलेली दिसत नाही.[१०७]

किल्ल्यावर राज्य पुरातत्त्व विभागामार्फत संवर्धनाचे काम सुरु आहे. किमान वीस-पंचवीस कामगार गडावर मुक्कामी असतात. तेथील कामगार, पर्यटक मोकळ्या जागेवरच प्रातर्विधीसाठी जातात कारण स्वच्छतागृहासारख्या मूलभूत सोयी नाहीत. म्हणून हागणदारी मुक्त की हागणदारी युक्त असा प्रश्न पडतो. [१०८]

## पुरंदर

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यामध्ये पुरंदर हा किल्ला असून सासवडपासून सुमारे २० किमी अंतरावर आहे. गडावर जाण्यासाठी पक्का डांबरी रस्ता असल्याने वाहन थेट किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचते. तसेच नारायण पेठ या पायथ्याच्या गावातून पायवाटेनेही किल्ल्यावर जाता येते.

पुरंदर किल्ला सध्या भारतीय सेनेच्या ताब्यात आहे. भारतीय सेनेचा आर्मी ट्रेनिंग कॅम्प पुरंदर किल्ल्यावर आहे. या विभागाची परवानगी प्रवेशद्वारावर घेतल्याशिवाय आपणास किल्ला पाहता येत नाही. किल्ल्यावर मुक्कामास शक्यतो परवानगी मिळत नाही. सध्या या आर्मी ट्रेनिंग कॅम्प मार्फत गडावर विविध बांधकामे सुरु असल्याने खडी, वाळू, विटा, सिमेंट, पाणी यांची सतत वाहतूक सुरु आहे.

प्रवेशव्दाराशी आल्यावर कॅम्पच्या कार्यालयातील रजिस्टर मध्ये नाव नोंदवावे लागते.[१०९] नाव नोंद करुन पुढे आल्यावर जागोजागी भारतीय सेनेचे जवान तैनात असलेले दिसून येतात. गडावरील मकर तलावाच्या पुढील बाजूस श्री दत्त मंदिर बांधण्यात आले आहे. मंदिर छोटेसेच आहे. नुकतेच त्याचे काम पूर्ण झाले आहे. त्याला चारही बाजूंनी कंपाऊंड आहे. मंदिरात चौथऱ्यावर दत्तमूर्ती आहे.

मंदिराच्या पुढे इ.स. १९७० साली बसवण्यात आलेला मुरारबाजी देशपांडे यांचा दोन तलवारी हातात घेतलेला आवेशपूर्ण आणि स्फूर्तीदायी असा पूर्णाकृती पुतळा आहे. हा पुतळा भारतीय सेनेचे अधिकारी लेफ्टनंट कर्नल वाय. के. सावंत आणि एन.सी.सी. ॲकॅडमीचे सर्व सन्माननीय अधिकारी यांचेमार्फत बसवण्यात आला आहे. मुरारबाजी देशपांडे यांचा पुतळा बसविण्यासाठी पुरंदर तालुक्यातील व इतर भागातील अनेक जणांनी उदार हस्ते देणगी दिली आहे. त्यातून हा पुतळा उभा करण्याचे काम पूर्ण झाले आहे.[११०]पुतळ्याच्या बाजूस हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान, येरवडा, पुणे यांचेमार्फत मुरारबाजी देशपांडे यांच्या कामगिरीचे वर्णन करणारा फलक लावण्यात आला आहे.[१११] पुतळ्याच्या मागील बाजूस वीर मुरारबाजी देशपांडे यांचे समाधी मंदिर आहे. हे पूर्णपणे दगडी व चौकोनी आकाराचे बांधकाम आहे. त्याच्या आत भिंतीवर तलवारी हातात घेतलेल्या दोन वीरगळ आहेत. बहुतेक त्या बाजीपासलकर व मुरारबाजी देशपांडे यांच्या असाव्यात. कारण नावाचा उल्लेख कोठेही आढळून येत नाही.

या पुतळ्यापासून पुढे डाव्या बाजूस बिन्नी दरवाजा आहे. हा दरवाजा पूर्णपणे दगडात बांधून काढलेला आहे. त्याला मोठी कमान आहे. दरवाजाच्या वर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. हा दरवाजा अतिशय मजबूत असून तो सुस्थितीत आहे. दरवाजाच्या भिंतीवर काही ठिकाणी वनस्पती उगवल्याचे दिसून येते. दरवाजातून आत गेल्यावर डाव्या बाजूस देवडी आहे. दरवाजाच्या बाहेर उजव्या हाताला एक छोटेसे देऊळ आहे. त्यात एक हनुमान मूर्ती असून त्याला शेंदूर लावला आहे. दरवाजाच्या गणेशपट्टीवर कुंभमालिका खोदली आहे. दरवाजाशेजारी एक भव्य बुरुज आहे.[११२]

या बिन्नी दरवाजापुढे एक चर्च आहे. चर्चचे बांधकाम पूर्ण दगडी असून चर्चची बांधणी मजबूत आहे. चर्चच्या आत प्रशस्त जागा असून तेथे येशू ख्रिस्ताच्या प्रतिमा दिसून येतात. राजा विल्यम चौथ्याचा मुलगा लॉर्ड फ्रेडरिक फिझकलरेनचा मृत्यू इ.स. १८५६ मध्ये झाला. त्याच्या स्मरणार्थ गडावर हे चर्च उभारले गेले.[११३] चर्चच्या दगडी भिंतीवर झाडे उगवल्याचे दिसून येते.

मंदिराच्या पुढे चार-पाच पत्र्याचे उध्वस्त झालेले शेड दिसतात. इंग्रज काळात सैनिकांसाठी, अधिकाऱ्यांसाठी या ठिकाणी निवासाची व्यवस्था होती. सध्या त्याची पडझड झाली आहे. भिंतीवर खडू व कोळशाने पर्यटकांनी नावे लिहिल्याचे दिसते.[११४] कॅन्टीन जवळच एक दगडी चौकोनी विहीर असून ती सुस्थितीत आहे. पुढे घडीव दगडी बांधणीचे पुरंदरेश्वराचे मंदिर आहे. ते सध्या भग्नावस्थेत आहे. त्याच्या डागडुजीचे काम सध्या सुरु आहे. मंदिराचा प्रदक्षिणा मार्ग प्रशस्त आहे.

माचीच्या पूर्वेला पेशव्यांच्या वाड्याचे भग्न अवशेष आहेत. समोर छोटीशी सपाट केलेली टेकडी चढून वर गेल्यावर दगडी चबुतऱ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा बसवण्यात आला आहे. हा अर्धपुतळा पुणे जिल्हापरिषदेने उभारला आहे. या अर्धपुतळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री श्री. डी. एस. देसाई यांनी केले.[११५] या पुतळ्याच्या मागे दगडाने बांधून काढलेली तटबंदी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या बाजूस भारतीय सेनादलाच्या अधिकाऱ्यांची निवासस्थाने व कार्यालये बांधण्यात आली आहे. या परिसरात सर्वत्र सेनादलामार्फत बांधकामे सुरु असलेली दिसून येतात.[११६]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर छत्रपती संभाजी जन्मस्थानाची वास्तू आहे. ही वास्तू बरीच मोठी आहे. आत छत्रपती संभाजी महाराजांची मोठी डिजिटल फ्लेक्स प्रतिमा दिसते. त्यासमोरच संभाजी महाराजांचा अर्धपुतळा बसवण्यात आला आहे. एक दगडी चबुतऱ्यावर हा अर्धपुतळा बसवण्यात आला असून त्याला लागून छत्रपती संभाजी महाराजांचा एक फोटो प्रतापगड उत्सव समितीने लावला आहे. या जन्मस्थानाच्या ठिकाणी सर्वत्र संभाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगाचे वर्णन करणारे फलक हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान पुणे,

यांचेमार्फत लावलेले दिसून येतात. ही वास्तू नीटनेटकी, सुस्थितीत राखण्यात आली आहे. पुरंदरेश्वर मंदिराच्या मागील पायवाटेने बालेकिल्ल्यावर जाता येते. बालेकिल्ल्यावर जाण्यापूर्वी पर्यटकांना सक्तीने मोबाईल व कॅमेरा आर्मी शेडमध्ये असणाऱ्या जवानाकडे जमा करावा लागतो. बालेकिल्ल्यावर जाण्यासाठी आर्मीकडून दोन्ही बाजूंनी लोखंडी अँगल व जाळीचे कंपाऊंड बसवण्यात आले आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी ही जाळी बसवण्यात आली आहे. बालेकिल्ल्यावर जाणारी ही वाट अरुंद आहे.

सर दरवाजातून आत गेल्यावर दोन तटांमध्ये असणाऱ्या चिंचोळ्या रस्त्याने पुढे गेल्यावर खांदकडा हा भव्य बुरुज लागतो. या बुरुजावर निशाण लावण्याची जागा आहे. म्हणून त्याला 'निशाण' किंवा 'बावटा' बुरुज म्हणतात. बावटा बुरुजापासून उजवीकडे शेंदरी बुरुज आहे. सात अर्धवर्तुळांनी तयार झालेल्या या बुरुजाची तीन चार अर्धवर्तुळे आजही दिसून येतात. या बुरुजाच्या खाली तीन भुयारे आहेत. शेंदरी बुरुजाच्या पुढे चवदार पाण्याचा साखरी तलाव दिसतो. येथे दगडी भिंत आहे. याच्यापुढे माधवराव पेशव्यांनी बांधलेले धान्य कोठार आहे. पुढे पश्चिमेकडील हत्तीच्या मस्तकासारख्या आकाराचा तिहेरी हत्ती बुरुज आहे.

राजगादीच्या पश्चिमेस असणाऱ्या केदार मंदिराच्या टेकडीवर जाण्यासाठी सुमारे ७० बांधीव पायऱ्यांचा मार्ग आहे. केदार टेकडी हा किल्ल्याचा सर्वात उंचावरील भाग आहे. टेकडीवर जाताना दोन्ही बाजूंना संरक्षक भिंती आहेत. येथील अतिशय छोट्या पठारावर केदारेश्वराचे पुर्वाभिमूख मंदिर आहे. मंदिरासमोर नंदी व मेघडंबरी आहे. गाभारा आणि सभामंडप अशी या मंदिराची रचना आहे. गाभाऱ्यात केदारेश्वराचे शिवलिंग असून मागील बाजूस सुबक इंद्रमुर्ती आहे. या किल्ल्याचे पुरंदर हे नाव इंद्राचेच एक नाव आहे. या केदारेश्वरपासून केदारगंगा ही नदी उगम पावते. ती पुढे सासवडमध्ये सिद्धेश्वर मंदिराजवळ कऱ्हा नदीला मिळते.

गडावर लहान मोठी अशी पन्नासच्या आसपास पाण्याची टाकी दिसून येतात. त्यापैकी ३०-३५ बऱ्यापैकी अवस्थेत आहेत. तेथील टाक्यांना खांदकडा टाके, खांबटाके, बोरसुसर टाके, म्हसोबा टाके, धोबी तलाव अशी नांवे आहेत.[११७]

गडावरच्या माचीवरील राजाळ तलाव, पद्मावती तलाव किंवा मकर तलाव आता नीट बांधून काढले गेल्याने तेथील लोकांना पाण्याचा तुटवडा भासत नाही. किल्ल्यावर काही ठिकाणी पर्यटकांकडून प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग्ज, बाटल्या, पिशव्या, प्लॅस्टिकची ताटे निष्काळजीपणे टाकल्याचे दिसून येते.[११८] या किल्ल्यावर पर्यटकांची वर्दळ लक्षणीय दिसून येते. पर्यटकांसाठी सूचनांचा फलक कुठेही दिसत नाही.

सध्या हा किल्ला भारतीय सेनेच्या ताब्यात आहे. त्यांच्याकडून गड संवर्धनाचे कोणतेही प्रयत्न होताना दिसून येत नाही. गडाचा वापर केवळ सेनादलाच्या तळ विकासासाठी केला जात आहे. त्यामुळे ऐतिहासिक वारसा असणाऱ्या या किल्ल्यावरील अनेक बुरुज दिवसेंदिवस जीर्ण होऊन ढासळत चालले आहेत. अशा बुरुजांवर, तटबंदीवर, दरवाजांवर वनस्पतींचे साम्राज्य वाढत आहे. परिणामी त्यांचे आयुष्य कमी होत आहे. हा किल्ला केंद्रीय पुरातत्त्व विभाग आणि राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या अखत्यारीत येत नाही. त्यामुळे या गडाचा ऐतिहासिक वारसा नष्ट होण्याची भिती आहे. या ठिकाणी सेनादलाचा ताबा असल्याने खाजगी संस्थांना संवर्धनाचे कोणतेही काम करु दिले जात नाही. महाराष्ट्र राज्याकडूनही पुरंदर किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केला नाही. त्यामुळे येथे संवर्धनाच्या दृष्टीने उदासीनता दिसून येते. सेनादल केवळ ट्रेनिंग कॅम्प या हेतूनेच गडावर नवनवीन बांधकामे करीत आहेत. त्यामुळे येथे सिमेंटचे जंगल उभे राहात आहे असे म्हणावे लागते.

**सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती**

सातारा जिल्ह्यात एकूण २४ किल्ले आढळून येतात. या २४ किल्ल्यांपैकी संशोधकाने प्रतापगड, अजिंक्यतारा, सज्जनगड अशा तीन किल्ल्यांची निवड करुन किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत.

**प्रतापगड**

प्रतापगड हा सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा किल्ला आहे. महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणापासून प्रतापगड सुमारे २१ किमी अंतरावर आहे. हा किल्ला सह्याद्रीच्या मुख्य पर्वतरांगातील घनदाट अरण्याने वेढलेला आहे. या किल्ल्यास

चारही बाजूंनी खोल दऱ्यांनी आणि गर्द वनराईचे संरक्षण लाभले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांकडून अफजलखान वधाचा पराक्रम प्रतापगडाच्या पायथ्याशी झाल्याने किल्ले प्रतापगडास ऐतिहासिकदृष्ट्या मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्रतापगडावर जाण्यासाठी पक्का डांबरी रस्ता तयार झाला आहे. वाहनतळावरुन गडाच्या दक्षिणेच्या टेहळणी बुरुजाखालून असणाऱ्या पायवाटेने प्रवेश करताना डाव्या बाजूस एक शिवकालीन गुहा असून ही गुहा उंचीने कमी आहे. पण आतमध्ये पन्नास माणसे बसतील इतकी जागा आहे.[११९] गुहेच्या बाजूस प्रतापगड उत्सव समिती, महाराष्ट्र या संस्थेने छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा असलेला व कवीन्द्र परमानंदकृत शिवभारत मधील शिवरायांनी अफजलखानास ठार मारल्याच्या मजकूराच्या ओळींचा एक मोठा बॅनर लावला आहे.[१२०]

पायऱ्या चढून वर गेल्यावर तटबंदीत लपवलेला पश्चिमाभिमुख असणारा हा महादरवाजा बुलंद, भव्य चिरेबंदी काळ्या दगडांच्या बांधणीचा असून अत्यंत आकर्षक असा आहे. प्रवेशद्वाराची रचना गोमुखी पध्दतीची आहे. महादरवाजातून किल्ल्यातप्रवेश झाल्यानंतर उजव्या बाजूला चिलखती बांधणीचा टेहळणी बुरुज आहे. प्रतापगडाची ही माची तट बुरुजांनी बंदिस्त आहे. चिलखती बुरुजाकडे जाताना डावीकडे तटामध्ये व बुरुजात शौचकुप व चुना मळण्याचे जाते आहे. डाव्या बाजूच्या तटाशेजारी प्लॅस्टिकचा मोठा कचऱ्याचा ढीग पडलेला दिसून येतो. प्लॅस्टिकच्या पिशव्या, वेष्टणे, बाटल्या कचरा पर्यटकांव्दारे टाकला गेल्याचे दिसते.[१२१]

टेहळणी बुरुजाच्या टोकावर प्रशस्त जागा आहे. एका दगडी चौथऱ्यावर मनोरा बसवण्यात आला आहे. महाबळेश्वर व प्रतापगड परिसरात पावसाळ्याच्या दिवसात धुवांधार पाऊस सतत पडत असतो. या संततधार पावसामुळे प्रतापगड किल्ल्याच्या मुख्य ध्वज बुरुजाखालील दरड काही प्रमाणात कोसळली. त्यामुळे मोठमोठे दगड, माती खाली आले. तटबंदी व बुरुजाखालील दरड कोसळण्याच्या घटना अनेक वेळा घडल्या आहेत. २०१६ मध्ये देखील मुसळधार पावसामुळे प्रतापगडाच्या तटबंदीखालच्या भागातील दरड किल्ल्याकडे जाणाऱ्या मुख्य प्रवेशद्वाराच्या रस्त्यावर कोसळल्याने दोन्ही बाजूचा संपर्क काही तासांसाठी तुटला

होता. अनेक पर्यटकांना चार तासांहून अधिक काळ गडावर थांबावे लागले होते. स्थानिक ग्रामस्थ, युवक व प्रशासनाच्या काही तासांच्या प्रयत्नाने रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. पावसाळ्यामध्ये घाट रस्त्यावर अनेकदा असे प्रसंग घडत असतात.[१२२] टेहळणी बुरुजाच्या खाली दगडांच्या मोठ्या राशी दिसतात. तटबंदीच्या डागडुजीच्या कामासाठी हे दगड आणले असण्याची शक्यता आहे.

टेहळणी बुरुजाच्या उत्तरेला किल्ल्यात वर जाण्यासाठीच्या पायऱ्या काही वर्षापूर्वी बांधलेल्या आहेत. या पायऱ्यांवरुन भवानी मंदिराकडे जाताना उजव्या हातास तटामध्ये चोर दरवाजा आहे. या दरवाजाच्या बाजूस हनुमानाची कोरलेली मूर्ती पाहण्यासारखी आहे. मंदिराकडे जात असताना वाटेत उजव्या बाजूस एक पाण्याचे तळे असून त्यात भरपूर पाणी आहे. पुढे जात असताना पायऱ्यांवरील लाल रंगाचे टाइल्स किंवा फरशा बऱ्याच ठिकाणी फुटलेल्या दिसतात. बऱ्याच ठिकाणी त्याच्या खालचा सिमेंटचा थरही निघून गेलेले दिसतो.[१२३] इथून पुढे एका लहानदरवाजातून आत प्रवेश केल्यावर भवानी माता मंदिराच्या आवारात प्रवेश होतो.

**श्री भवानी माता मंदिर**

मंदिरात भवानी मातेची विविध अलंकरांनी सालंकृत अशी प्रसन्न व सुंदर मूर्ती आहे. या ठिकाणी एक तलवार आहे. मंदिरासमोर दोन दीपमाळा आहेत. मंदिराच्या पश्चिमेस नगारखान्याची इमारत आहे. मंदिराच्या आवारातच पाच लहान तोफा आहे.[१२४] श्री भवानी माता मंदिराचे आवार भरपूर प्रशस्त असून मंदिर परिसरात उत्तम स्वच्छता राखल्याचे दिसून येते. नवरात्र उत्सव गडावर मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. दसऱ्याला येथे आपट्याचे पूजन सदरेवर करतात. नंतर पालखीत तलवार ठेवून मिरवणूक काढतात. ही मिरवणूक भवानी मंदिरापासून निघते. आणि अफजलखानाच्या कबरीजवळ असलेल्या पालखीच्या माळापर्यंत नेऊन आणली जाते.[१२५]

**बालेकिल्ला**

मंदिराच्या आवारातून बाहेर पडत असताना डावीकडील बाजूने बालेकिल्ल्याच्या दिशेने जाताना उजव्या हाताला समर्थांनी स्थापना केलेल्या

हनुमानाची मूर्ती मंदिरात दिसते. हे मंदिर दक्षिणाभिमुखी आहे. या मंदिराचे नाव वीराचा मारुतीचे मंदिर असे आहे. पुढे दोन भव्य बुरुजांच्या कवेत बालेकिल्ल्याचा दरवाजा बांधलेला आहे. या बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार छोटेखानी आहे. दरवाजाच्या बाजूस शरभाची शिल्पे कोरलेली दिसून येतात. सध्या बालेकिल्ल्याच्या भव्य बुरुजांना खूपच मोठ्या झाडांचा आणि मुळ्यांचा विळखा पडलेला आहे. बुरुजाच्या अस्तित्वावर हे वृक्ष घाव घालण्याच्या तयारीत आहेत.[१२६] या वृक्षाच्या मुळ्या व संपूर्ण वृक्ष तोडण्याची नितांत आवश्यकता आहे.

बालेकिल्ल्यामध्ये प्रवेश झाल्यानंतर समोर सदरेचा घडीव चौथरा आहे. याठिकाणी पूर्वी राजसदर होती. छत्रपती शिवाजी महाराज या राजसदरेवरुन कारभार पाहात असत. न्यायनिवाडा करत असत. सध्या या ठिकाणी दगडांचा मोठा ढीग दिसतो. तेथील काम अर्धवट असल्याचे दिसून येते. सदरेच्या समोरच श्री स्वयंभू केदारेश्वर मंदिर आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात भव्य शिवलिंग आहे. केदारेश्वर मंदिराच्या मागील बाजूस राजमाता जिजाऊंच्या वाड्याचे अवशेष दिसून येतात. मंदिरामागे वेताळेश्वराचे छोटे मंदिर आहे. त्याच्या मागे केदार बुरुज आहे. या बुरुजाच्या जवळच एक चोरवाट आहे. त्या पुढे कडेलोट बुरुज आहे.

बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ असणारा पुतळा अतिशय भव्य आणि लक्ष वेधून घेणारा आहे. उंचचौकोनी दगडी चौथऱ्यावर हा पुतळा बसवण्यात आला आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा व सभोवतालचा बांधीव चबुतरा हा सातारा जिल्हा परिषद सातारा यांचे ताब्यात असून त्याची दुरुस्ती व देखभाल सातारा जिल्हापरिषद,सातारा यांचेमार्फत केली जाते.[१२७] पुतळ्याभोवतीचा संपूर्ण परिसर अत्यंत चांगल्या प्रकारे राखल्या गेलेल्या बागबगिचांनी नटलेला आहे. त्यामुळे पुतळ्याचा परिसर खुलून दिसतो. या पुतळ्याचे अनावरण भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी करण्यात आले.[१२८] पुतळा परिसरात एक चांगल्या अवस्थेतील तोफ दगडी चौथऱ्यावर बसवण्यात आली आहे. संपूर्ण परिसर अत्यंत स्वच्छ व सुंदर राखण्यात आल्याचे दिसून येते.

पुतळा परिसरात वनविभाग सातारा व वन परिक्षेत्र महाबळेश्वर आणि संयुक्त वनव्यवस्थापन समिती, किल्ले प्रतापगड यांच्या सूचनांचा फलक[१२९] लावण्यात आला आहे. त्याव्दारे गडाचे पावित्र्य राखले जावे, स्वच्छता राखली जावी, मद्यपान, गैरवर्तन करु नये, परिसराचे विद्रुपीकरण करु नये, कचराकुंडीचा वापर करावा अशा सूचना पर्यटकांसाठी देण्यात आल्या आहेत. पुतळ्याच्या मागील बाजूस लोखंडी फोल्डिंग शिडी आहे. पुतळ्याची स्वच्छता करण्यासाठी ही शिडी कायमस्वरुपी बसवण्यात आली आहे. सातारा जिल्हा परिषदेमार्फत या फोल्डिंग शिडीची उभारणी करण्यासाठी २०१६ साली ३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[१३०]

प्रतापगडावर पर्यटकांना राहण्याची व जेवणाची सोय आहे. प्रतापगडाची बहुतांशी तटबंदी चांगल्या अवस्थेत असल्याचे दिसून येते. गडावर पर्यटकांची वर्दळ नेहमीच लक्षणीय असल्याचे दिसून येते. एक ऐतिहासिक वारसा लाभलेला किल्ला म्हणून प्रतापगडास पर्यटकांची प्रथम पसंती असल्याचे दिसते. त्यामुळे या गडावर विपुल प्रमाणात रोजगार निर्मिती झाल्याचे आढळून येते. विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, हॉटेल्स, पुस्तकांची दुकाने, खेळण्यांची दुकाने, फेरीवाले, पर्यटक मार्गदर्शक, वाहतूकदार, फोटोग्राफर यांना मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाल्याचे दिसून येते.[१३१]

प्रतापगड किल्ला केंद्रीय पुरातत्त्व विभाग आणि राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या अखत्यारीत येत नाही. त्यामुळे हा किल्ला असंरक्षित आहे.[१३२] दोन्ही विभागांमार्फत गडावर कोणतेही संवर्धनाचे, जतनाचे काम केले जात नाही. या किल्ल्याची खाजगी मालकी असून किल्ल्याचे संपूर्ण व्यवस्थापन छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट वंशज असलेल्या सातारचे खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांचे मार्फत पाहिले जाते.

किल्ल्याच्या पायथ्याशी मोठा वाहनतळ विकसित करण्यात आला आहे. संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून प्रवेश शुल्क आकारले जाते. त्या शुल्काचा विनियोग सूचना फलक, प्लॅस्टिक निर्मूलन, वृक्षारोपण, गड सुशोभिकरण, सौर दिवे, झाडे संरक्षण, गॅस वाटप, रस्त्याच्या कडेला मुरुम टाकणे, झाडांवर रंग पट्टे ओढणे, विसाव्यासाठी सिमेंट बेंच बसवणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे,

वणव्यापासून रक्षण, डॅम बांधणे, तारेचे कंपाऊंड बांधणे इ. विविध कामांसाठी केला जातो. ही कामे शासन निर्णय क्र. एफडीएम २०११/प्र. क्र. १००/फ - पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ५ ऑक्टोंबर २०११ नुसार करण्यात येत आहेत.

प्रतापगडाच्या माचीच्या बुरुजाखाली असणाऱ्या गाडी थांब्याच्या अलीकडे अफजलखान व त्याचा सहकारी सय्यद बंडा यांच्या कबरी आहेत. हैद्राबादच्या निजामाने सन १८९५ मध्ये एक लाख रुपये खर्च करुन येथे दर्गा बांधला. सद्यस्थितीत हा दर्गा व कबर पाहण्यास शासनाची परवानगी नाही.[१३३] तेथे सतत पोलिसांचा खडा पहारा असल्याचे दिसून येते. प्रतापगडावर मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांना एका ऐतिहासिक वास्तूचे दर्शन घडवण्याबरोबरच इतर आवश्यक त्या सोयी व शिवकालीन इतिहासाची माहिती रंजकपणे दर्शविण्यासाठी व शिवकालीन वास्तूंची वैशिष्ट्ये, महत्त्व व त्या जपण्याची गरज लक्षात आणून देण्यासाठी विविध इमारती बांधण्याची गरज जाणवते. या इमारतींमध्ये प्रामुख्याने वस्तुसंग्रहालय, वाचनालय, छायाचित्रप्रदर्शन, विविध कार्यक्रमांसाठी सभागृह, पर्यटन निवास, पुरेशी स्वच्छतागृहे,महत्त्वाच्या स्थानांवर पर्यटक पॉईंटस् इ. चा समावेश आहे.

**अजिंक्यतारा**

सातारा जिल्ह्यातील अजिंक्यतारा महत्त्वाचा ऐतिहासिक किल्ला म्हणून ओळखला जातो. सातारा शहरालगतच्या सह्याद्रीच्या डोंगर रांगात हा किल्ला वसलेला आहे. सातारा शहरातून किल्ल्याच्या उत्तरेकडील मुख्य प्रवेशद्वारापर्यंत पक्का डांबरी रस्ता तयार करण्यात आला आहे. किल्ल्याचा महादरवाजा उत्तराभिमुखी आहे. हा दरवाजा एकात एक अशा पाच कमानींनी बनलेला असून दरवाजावर देवदेवतांच्या प्रतिमा व व्दारशिल्प कोरण्यात आले आहे. या मूर्ती कमानीच्या जमिनीकडच्या डाव्या बाजूवर साधारण मध्यभागी मानवरुपी गरुड तर उजव्या बाजूवर शक्ती देवता असलेल्या श्री हनुमानाची प्रतिमा कोरलेली दिसते. या दोन्ही प्रतिमांना शेंदूर लावल्याचे दिसून येते. कमानीत काही ठराविक अंतरावर वर्तुळाकार पुष्पाकृती कोरल्या आहेत. एकूणच हा महादरवाजा रेखीव, भक्कम, मजबूत आणि दिसायला आकर्षक आहे.[१३४]

महादरवाजाच्या उजव्या आणि डाव्या बाजूस पहारेकऱ्यांसाठीच्या देवड्या आहेत. देवड्या प्रशस्त असून डाव्या बाजूच्या देवडीमध्ये अजिंक्यतारा किल्ल्याचा इतिहास संक्षिप्तपणे सांगणारा फलक लावलेला आहे. या देवडीमध्ये दारुची एक रिकामी बाटली पडलेली आढळून आली.[१३५] पर्यटकांकडून अशा प्रकारचे गैरकृत्य निश्चितच किल्ल्याच्या ऐतिहासिक दृष्टिकोनातून भूषणावह नाही. डाव्या बाजूच्या भिंतींवर मोठमोठे वृक्ष उगवलेले दिसून येतात. त्यांची जाडजूडमुळे भिंतींना धोका निर्माण करीत आहेत. काही ठिकाणी अशा वृक्षांमुळे व त्यांच्या विस्तारलेल्या मुळ्यांव्दारे भिंतींना भेगा पडलेल्या दिसून येतात.[१३६] या वृक्षांची व मुळ्यांची वाढ अशीच होत राहिली तर ती भिंत पडण्यास वेळ लागणार नाही.

किल्ल्याच्या आतील भागात प्रशस्त पठारी प्रदेशावर एक श्री उत्तराभिमुखी हनुमान मंदिर आहे. मंदिराची इमारत सुस्थितीत आहे. मंदिराच्या आवारात स्वच्छता असल्याचे दिसून येते. सामाजिक वनीकरण विभागाचा एक फलकही तेथे लावण्यात आला आहे. हनुमान मंदिराच्या अगदी समोरच महादेवाचे छोटेसे मंदिर आहे. त्याला चारही बाजूंनी कंपाऊंड आहे. आत शिवलिंग आहे. मंदिराचा आवार स्वच्छ दिसतो.[१३७]

किल्ल्यावरच्या या भागात सिमेंट कॉँक्रिटचा उत्तम रस्ता तयार करण्यात आला आहे. हनुमान मंदिरासमोर प्रसार भारती या केंद्र शासनाच्या स्वायत्त संस्थेचे दूरदर्शन सहक्षेपण केंद्र व त्याचा मनोरा आहे. त्याच्या बाजूस भारत संचार निगम लिमिटेड या कंपनीचे दोन मोबाईल टॉवर उभे आहेत. प्रसार भारतीच्या प्रवेशद्वाराच्या आत प्रवेश दिला जात नाही. तेथे फोटो काढण्यास परवानगी नाही. या आवारात कार्यालय, निवासी संकुल अशा वेगवेगळ्या इमारती बांधल्या आहेत. या सर्व परिसराला दगडी कुंपण भिंत घालून लोखंडी दरवाजा लावण्यात आला आहे. प्रवेशद्वाराशी एक सुरक्षारक्षक कायम तैनात आहे. आतल्या भागात पोलिस दूरवहन मनोरा आहे.[१३८]

मुख्य रस्ता सोडून डाव्या बाजूच्या पायवाटेने पुढे गेल्यावर महाराणी ताराबाईंच्या राजवाड्याचे भग्न अवशेष असलेल्या इमारती दिसून येतात. 'ऐतिहासिक

वाडा' असा फलक या ठिकाणी लावण्यात आला आहे. सध्या या ऐतिहासिक वास्तूची प्रचंड पडझड झाली असून केवळ भग्नावशेष शिल्लक आहेत. भिंतीवर झाडे उगवलेली आहेत, अतिवृष्टीमुळे भिंतीवर शेवाळ साठलेले आहे, भिंती काही ठिकाणी जमीनदोस्त झाल्या आहेत.[१३९] ही इमारत दोन मजली होती. या वाड्यात महाराणी ताराबाई यांचे वास्तव्य होते.

तटावरुन गडाच्या एका कोपऱ्यात असलेल्या मंगळाई देवी मंदिराकडे जाणाऱ्या पायवाटेच्या बाजूला कंपाऊंडची गरज आहे. तटावर अजिंक्यतारा असा पत्र्याचा मोठ्या अक्षरात तयार करण्यात आलेला नामफलक लावण्यात आला आहे. हा फलक सातारा शहरातून ठळकपणे दिसतो. या फलकाची उभारणी १९ फेब्रुवारी २००८ मध्ये कै. रा. ना. उर्फ बन्याबापू गोडबोले (भाऊकाका) यांच्या स्मरणार्थ, गोडबोले कुटुंबियांनी केली आहे.[१४०] तटावरुन सरळ पुढे गेल्यावर मंगळाई बुरुज लागतो. या बुरुजावर एक ध्वजस्तंभ असून येथील तटाजवळच सातारा कुलस्वामी देवी श्री मंगळाई देवीचे मंदिर आहे.

श्री मंगळाई देवीच्या मंदिरावरुन पूर्वेकडे तटबंदीस लागून एक प्रशस्त दारुकोठाराची वास्तू आहे. ही वास्तू पूर्ण दगडी आहे. मनुष्यवस्तीपासून दूर व तटबंदीच्या जवळ अशी ही वास्तू दारुकोठार म्हणून पूर्वी वापरात असावी. दारु कोठाराची इमारत सुस्थितीत असल्याचे दिसून येते. गडाच्या दक्षिणेकडे दोन छोटे तलाव आहेत. तटबंदीच्या बाजूने वनविभागाकडून वृक्षारोपण करण्यात आले आहे. तेथे सलग अशी बांबूची रोपे लावलेली दिसतात. या रोपांना ठिबक सिंचनव्दारे पाणी देण्याची सोय केलेली दिसून येते.[१४१]

गडाच्या तटावरुन पुढे जात असताना उजव्या बाजूस एक मोठा तलाव आहे. त्याच्या बाजूला अजून तीन छोटे तलाव आहेत. सध्या त्यात पाणी आहे. तलावाच्या काठावर सप्तर्षी मंदिर आहे. हे मंदिर पूर्णपणे दगडी बांधकामाचे असून त्याला रंगरंगोटी केल्याचे दिसून येते. मंदिराच्या बाहेर नंदीचे शिल्प आहे. नंदीच्या समोर पादुका दिसतात. मंदिराचे प्रवेशद्वार छोटेखानी असून त्याच्या डाव्या व उजव्या बाजूस देवळी आहेत. मंदिरात शिवलिंग स्थापन केले आहे. विठ्ठल, मारुती, गणपती यांच्या

दगडी मूर्त्या आत ठेवण्यात आल्या आहेत. मंदिराचा परिसर स्वच्छ आहे. मंदिराच्या आजूबाजूला फुलझाडांची लागवड करण्यात आली आहे.[१४२]

मंगळाई देवी मंदिराच्या पाठीमागील बाजूस अज्ञात व्यक्तीने वणवा लावल्याने आगीत डोंगरावरील गवत आणि वनसंपदा जळून खाक झाली. डोंगरावर सकाळी व संध्याकाळी फिरायला येणाऱ्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. या झाडांना वणव्याचा फटका बसला आहे.[१४३] सामाजिक कार्यकर्ते चैतन्य कदम, पालिकेच्या वृक्षसंवर्धन समितीचे सदस्य संतोष शिंदे यांनी वनविभागाला ही माहिती कळवून त्वरित वनरक्षक, वनकर्मचारी व वन्यप्रेमींनी अग्नीशमन दलास पाचारण केले. त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या आगीने दुर्मिळ वनसंपदा, सरपटणारे प्राणी, पक्ष्यांची घरटी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.[१४४] अशा प्रकारच्या घटना किल्ल्याच्या परिसरात घडल्याने तेथील जैविक विविधतेचे कायमचे नुकसान होते. त्यासाठी समाजातील लोकांनी पुढाकार घेऊन अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी प्रयत्न करायला हवेत.

अजिंक्यतारा किल्ल्यावर दोन तलावांची डागडुजी करण्यात आली आहे. त्यामध्ये भरपूर पाणीसाठा झाला आहे. या तलावातील पाणी शुध्द रहावे यासाठी किल्ल्यावर फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी माशांची पिल्ले सोडली होती. त्यामुळे तलावातील पाणी नैसर्गिकपणे शुध्द होत होते. मात्र काही समाजकंटक मासेमारी करुन तलाव परिसरातच पार्ट्या करीत आहे.[१४५] अशा प्रकारच्या घटना निश्चितच निषेधार्ह आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, सातारा तर्फे या सर्व्हे नं. ५०/अ१ गटामध्ये स्मृति उद्यान साकारले आहे. या उद्यानाचे क्षेत्र २० हेक्टर इतके आहे. संपूर्ण उद्यानात विविध जातीच्या वृक्षांची लागवड केलेली दिसून येते. अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशीच सातारा शहर वसले आहे. किल्ल्याचा शांत, रमणीय, निसर्गरम्य प्रदूषणविरहित परिसर असल्यामुळे सकाळ-संध्याकाळ किल्ल्यावर फिरायला येणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय आहे.

अजिंक्यतारा किल्ला केंद्रीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या अखत्यारीत येत नाही. त्यामुळे हा असंरक्षित किल्ला आहे.[१४६] शासनाच्या या दोन्ही विभागामार्फत गडावर संवर्धनाचे कसलेही काम केले जात नाही. किल्ल्यावर जे काही वृक्षारोपण होते ते वनविभाग आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत केले जाते. गडावरील विविध मंदिरांमधील पूजा,डागडुजी स्थानिक बिगर शासकीय संस्थांव्दारे, मंडळांव्दारे केली जाते. स्वराज्याची राजधानी म्हणून मानाचे स्थान मिळवलेल्या अजिंक्यतारा किल्ल्यावरचा महाराणी ताराबाई यांचा वाडा, धान्य कोठार, अंधार कोठडी इ. वास्तू जीर्णोध्दाराच्या प्रतीक्षेत आहेत.

**सज्जनगड**

सातारा शहरापासून १० किमी अंतरावर सज्जनगड किल्ला आहे. गडापर्यंत पक्का डांबरी रस्ता तयार करण्यात आला आहे. गडाच्या पायथ्याशी वाहनतळ आहे. वाहन तळाची जमीन, मौजे कारी गट नं. १२६१, क्षेत्र २ हेक्टर १६ आर श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड यांच्या मालकीची आहे.[१४७] गडाच्या खाली दोन किलोमीटर वर असणाऱ्या फाट्यापासून पर्यटकांना गडावर घेऊन येण्यासाठी श्री रामदास स्वामी संस्थानच्या अनेक वाहनांची मोफत सोय करण्यात आली आहे.

श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेमार्फत सांप्रदायिक उपासना, पूजा अर्चा, अन्नदान, जीर्णोध्दाराची कामे, प्रकाशन विभाग, भाविकांची उतरण्याची सोय, समर्थ विचारांचा प्रचार व प्रसार असे विविध उपक्रम चालविले जात असल्याचा उल्लेख आहे.[१४८] शहापूर मारुती, मसूर मारुती, चाफळदास मारुती, चाफळ प्रताप मारुती, शिंगणवाडी खडीचा मारुती, उंब्रज मारुती, माजगाव मारुती, बहे बोरगाव मारुती, मनपाडळे मारुती, पारगांव मारुती, शिराळे मारुती अशी या अकरा मारुतीची नावे आहेत.[१४९]

गडावर जात असताना उजव्या बाजूस संरक्षक रेलिंग बसवलेले आहेत. प्रवेशद्वाराचे बांधकाम पूर्ण दगडी आहे. मध्यभागी महिरपी कमान असून उजव्या बाजूस एक मोठा बुरुज आहे. तर डाव्या बाजूस कातळ आहे. दारातून आत आल्यावर दोन देवड्या दिसतात. त्यात श्रीधर स्वामींनी एका बाजूला हनुमान व दुसऱ्या बाजूला

वराह यांची स्थापना केलेल्या मूर्त्या आहेत. उजव्या बाजूला भिंतीत फार्सी भाषेतील शिलालेख दिसतो. हा दरवाजा सुस्थितीत व मजबूत आहे.

आत गेल्यानंतर पूर्वाभिमुख असणारा दुसरा दरवाजा असून त्याला श्री समर्थ महाद्वार असे नाव आहे. या दगडी महाव्दारास चार कमानी आहेत. दरवाजास रंगरंगोटी केली आहे. गडाचे दरवाजे अजूनही रोज रात्री दहानंतर बंद होतात. आणि सूर्योदयाला पुन्हा उघडले जातात. या दरवाजातून आत आल्यावर 'महाद्वार बुरुजाचा जीर्णोध्दार' या नावाने एक सविस्तर शिलालेख मराठी भाषेत कोरलेला दिसतो. महाव्दाराचा लाकडी दरवाजा अत्यंत दणकट, मजबूत व सुस्थितीत आहे. आतल्या बाजूस सज्जनगडाचा स्थलदर्शक नकाशा लावण्यात आला आहे.[१५०] संपूर्ण सज्जनगडावरील सर्व स्थळांचा हा नकाशा पर्यटकांसाठी अतिशय उपयुक्त ठरतो. त्याच्या बाजूला सज्जनगडाचा संक्षिप्त इतिहास सांगणारा फलक लावण्यात आला आहे. पुढे ५६ सेमी ४१ सेमी असा काळा घोटीव दगडातील फार्सी भाषेतील कोरलेला एक शिलालेख आहे.[१५१] या शिलालेखाचा मराठी अर्थ सांगणारा दुसरा शिलालेख जवळच दिसतो. त्यावर खालील मजकूर आहे.

१) ऐश्वर्य तुझ्या दारांतून तोंड दाखवीत आहे.

२) तू विवंचना दूर होण्याचे स्थान युक्त आहेस, परंतू पुन्हा विवंचना युक्त आहेस.

३) तुझ्यापासून सर्व विवंचना दूर होतात.

४) ईश्वरदत्त धैर्य व कर्तृत्व हे सर्व फुलांना प्रफुल्लित करीत आहे.[१५२]

किल्ल्यामध्ये आत डाव्या बाजूला घोडाळे तलाव आहे. या तळ्यात पाण्याचा पुरेसा साठा वर्षभर असतो, पण या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी केला जात नाही. या तळ्याशेजारीच अजून एक चौकोनी आकाराची विहीर असून ती सध्या वापरात नाही. पाण्यात प्रचंड शेवाळ आहे. भिंतीवर झाडे उगवलेली दिसतात. येथून आग्नेय दिशेला पाऊल वाटेने पुढे गेल्यावर एक पडझड झालेली भग्नावस्थेत असणारी मशिदीसारखी इमारत आहे. १३ जून १७०० रोजी औरंगजेबाने विजयाप्रित्यर्थ स्वत: गडावर येऊन मशिदीत नमाज पठण केल्याची नोंद आढळते.[१५३] जवळच असलेल्या त्या इमारतीच्या उजव्या बाजूचा कोपरा पूर्ण ढासळलेला आहे.[१५४]

या मशिदीजवळ प्रसिध्द श्री अंगाई देवी मंदिर आहे. श्री समर्थांना अंगापूर डोहात दोन मूर्ती सापडल्या. त्यापैकी श्री सूर्यनारायणाच्या मूर्तीची त्यांनी चाफळ येथे श्रीराममूर्ती म्हणून स्थापना केली व अंगाई देवीची सज्जनगडावर स्थापना केली.[१५५] ही देवी चतुर्भुजा महिषासुर मर्दिनीची आहे. मंदिरासमोर ध्वजस्तंभाचा बुरुज आहे. बुरुज चांगल्या अवस्थेत असल्याचे दिसून येते. अंगाई मंदिर परिसरातून पुढे जाणाऱ्या मार्गावर लोकमान्य टिळक स्मृती नावाची नव्याने बांधलेली कमान आहे. पुढे श्री समर्थ सेवा मंडळाचे कार्यालय असून तेथे पर्यटकांना राहण्याची व प्रसाद भोजनाची व्यवस्था आहे.

मुख्य वाटेने पुढे जात असताना श्री रामदास स्वामी संस्थान कमान लागते. कमानीतून आत गेल्यावर प्रशस्त चौकासारखा आवार आहे. समोरच श्री समर्थ रामदास स्वामींचा मठ व शेजघर असलेली वास्तू आहे. ही वास्तू दोन मजली आहे. शिवाजी महाराजांच्या काळात समर्थ रामदास स्वामींचे येथे वास्तव्य असे. याच मठात त्यांचे देहावसान झाले. या मठात शेजघर नावाने ओळखल्या जाणाऱ्या खोलीत रामदास स्वामींच्या वापरातील विविध वस्तू व्यवस्थितपणे मांडून ठेवलेल्या आहेत. शिवाजी महाराजांनी अर्पण केलेला पलंग, कुबडी, वेताची काठी, मच्छिंद्रनाथांनी दिलेला सोटा, तांब्याचे दोन मोठे हंडे, श्रीराम मूर्तींचा लाकडी नक्षीकाम युक्त असलेला ओटा, श्रीसमर्थांना मारुतीरायांनी हिमालयात दिलेली वल्कल वस्त्र, पिण्याच्या पाण्याचा लोटा, पिकदाणी, पानाचा डबा, अग्निकुंड, प्रताप मारुतीची पिवळी मूर्ती इ. समर्थांच्या वापरातील वस्तू या शेजघरात सुरक्षितपणे ठेवलेल्या दिसून येतात.[१५६]

मठाच्या बाजूला श्री रामदास स्वामी संस्थानचे मुख्य कार्यालय आहे. त्याच्याजवळच श्री राम मंदिर आणि श्री रामदास स्वामी समाधी मंदिर आहे. श्रीराम मंदिराचा सभामंडप भव्य असून येथे सज्जनगडाबद्दल व समर्थ शिष्यांबद्दल सविस्तर माहिती देणारे फलक लावण्यात आले आहे. मंदिरात प्रवेश करताना श्री गणेशाची मूर्ती असून त्याच्या पलीकडे मारुतीची मूर्ती आहे. गाभाऱ्यात संगमरवरी देवळीत श्रीराम, सीता, लक्ष्मण यांच्या पितळी मूर्त्या आहेत. थोडे खाली हनुमानाची मूर्ती

आहे. मस्तकी मुकुट धारण केलेल्या या मूर्ती सुहास्य वदन असलेल्या दिसून येतात. या मूर्तीसोबत समर्थांची छोटी मूर्ती श्रीहनुमान सन्मुख ठेवलेली दिसते.

श्रीराम मंदिराखाली तळघरात श्री समर्थांची समाधी आहे. या समाधीवर सुंदर मेघडंबरी असून समाधीच्या मागील बाजूस एका पितळी पेटीत श्रीपादुका आहेत. सकाळी ८ ते १० या पूजेच्या वेळी उघड्या स्मारक शिलेचे दर्शन घेता येते. इतर वेळी ही समाधी वस्त्राने झाकली जाते व त्यावर फुले, हार वाहण्यात येतात. समाधीचा छत पूर्ण दगडी असून भिंतींना मार्बलच्या फरशा बसवलेल्या दिसून येतात. श्रीराम मंदिराच्या प्रदक्षिणा वाटेवर मंदिरामागील एका कोनाड्यात अकरा मारुतींची स्थापना केलेली दिसून येते. श्रीराम मंदिराच्या समोर प्रशस्त पटांगण व अशोकवन आहे. त्याठिकाणी वृक्षांचे संगोपन उत्तम प्रकारे केल्याचे दिसून येते. त्याच्या उजव्या बाजूस समर्थ महाप्रसाद गृहाची इमारत उभी आहे. या इमारतीचे उद्‌घाटन दि. १० फेब्रुवारी, २००६ रोजी मा. ना. श्री. जयंतराव पाटील, अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. खासदार श्री. शरदराव जोशी यांनी केले.[१५७]

गडाच्या टोकावर समर्थ रामदास स्वामींनी तटाच्या रक्षणासाठी स्थापन केलेला धाब्याचा मारुती हे स्थान आहे. या मंदिराचे बांधकाम नव्यानेच पूर्ण झाले आहे. मंदिराच्या बाहेर बसण्यासाठी ओटे बांधलेले आहेत. या परिसरात सर्वत्र वृक्षारोपण करुन वृक्षांना संरक्षक जाळ्या बसवण्यात आल्या आहेत. धाब्याच्या मारुती मंदिराचा जीर्णोध्दार रावसाहेब वांगडे मास्तर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक तथा अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे (भाई) यांनी १२ मे २०१४ रोजी केला.[१५८] सज्जनगडावर सातारा जिल्हा परिषद, सातारा मार्फत गुरुत्व नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात आली आहे. सज्जनगडाच्या खाली असणाऱ्या पांगारे धरणातून पाणी उचलून गडावरील १ लाख लिटरच्या टाकीत सोडण्यात आले आहे. या पाण्याच्या टाकीतून संपूर्ण गडावर पाण्याचा पुरवठा केला जातो. त्यासाठी १४४.१३ लक्ष रुपयांची अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली होती. हे काम १५ जून २०११ रोजी पूर्ण झाले आहे.[१५९]

सज्जनगड संस्थान पाणीपुरवठा योजनेचा उद्घाटन समारंभ उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्याहस्ते रविवार दि. ३ मार्च २०१३ रोजी संपन्न झाला.[१६०] सज्जनगड भारतातील थोर देशभक्तांचे स्फूर्तीस्थान होते. लोकमान्य टिळक थोर समर्थभक्त होते. समर्थांच्या दर्शनासाठी ते नेहमी गडावर येत असत. स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. हेडगेवार, यशवंतराव चव्हाण, वासुदेव बळवंत फडके, गोपाळकृष्ण गोखले यांच्यासारख्या अनेक देशभक्तांनी सज्जनगडावरील समर्थांची समाधी अथवा समर्थांचा दासबोध यापासून प्रेरणा घेतली आहे. अशाप्रकारे सज्जनगड हे महाराष्ट्राचे स्फूर्तीकेंद्र बनले आहे.[१६१]

श्रीरामदास स्वामी संस्थानने सज्जनगडाच्या सर्वांगीण विकासासाठी अतोनात प्रयत्न करुन गडाचा नावलौकिक सर्वदूर पसरवलेला आहे. संस्थानच्या विश्वस्तांनी सातत्याने उत्तम कारभार करुन गडावर अनेक विकासाच्या योजना राबवून गडाचे महत्त्व वाढवलेले आहे. श्री समर्थ समाधी मंदिर, महाप्रसादगृह, श्रीसमर्थ मठ, भक्त निवास, जलशुद्धीकरण यंत्रणा, रेलिंगची व्यवस्था, गोशाळा निर्मिती, वैदिक पाठशाळा, श्री समर्थ महाव्दार मजबुती, सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणा उभारणी, विविध संस्कार शिबीरे, समर्थ वाङःमयाचे प्रकाशन अशा अनेक कामांवर संस्थानाने कोट्यावधी रुपये खर्च करुन सज्जनगडास वैभव प्राप्त करुन दिले आहे. संस्थानाने महाराष्ट्र शासनाकडून सज्जनगडास 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त करुन घेतलेला आहे.[१६२] पर्यटन विभागाकडून विकास कामासाठी पुरेसा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सज्जनगड हा किल्ला पर्यटकांचे आकर्षण स्थान बनलेला आहे. वर्षभर याठिकाणी पर्यटकांची वर्दळ लक्षणीय असल्याचे दिसून येते.

सज्जनगड किल्ला केंद्रीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या अखत्यारीत येत नाही. त्यामुळे हा किल्ला असंरक्षित आहे.[१६३]

महाराष्ट्रातील गड किल्ले ही महाराष्ट्राची खरी ओळख आणि संपत्ती आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त गड किल्ले असणारे राज्य आहे असे ठामपणे सांगता येते. जलदुर्ग, गिरीदुर्ग आणि भुईकोट किल्ले मिळून महाराष्ट्रातील गड किल्ल्यांची

संख्या ३५० पेक्षा अधिक आहे. प्राचीन काळापासून आपल्या अस्तित्त्वाची साक्ष देणारे किल्ले महाराष्ट्राचा अमूल्य ऐतिहासिक ठेवा आहे.

आपल्या समृध्द ऐतिहासिक वारशाचे जतन करणे आणि त्याबाबत समाजात जागृती निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. सरकारी पातळीवर बऱ्याचदा अनास्था दिसते. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक ती पावले उचलणे गरजेचे बनले आहे. आपल्या या वारशाची पुढील पिढीला ओळख करुन देण्यासाठी आज इच्छाशक्तीची गरज आहे. पर्यटकांच्या दृष्टीने किल्ल्यावरच्या सोयी सुविधांमध्ये सुधारणा करणे, ऐतिहासिक प्रसंगांना उजाळा देणे आणि इतर आणखी उपक्रम राबवून लोकप्रबोधन करण्यावर भर दिल्यास गड किल्ले संवर्धनास हातभार लागेल. किल्ल्यांची सद्यस्थिती समजून घेतल्यानंतर दुर्गसंवर्धन ही काळाची गरज कशी आहे हे यापुढील प्रकरणात सविस्तर मांडले आहे.

## संदर्भ व तळटिपा


१. लहू कचरु गायकवाड, **शिवनेरीची जीवनगाथा**, नारायणगाव, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१५, पृ. २३.

२. महाराष्ट्र शासन, वन विभाग व संयुक्त वनव्यवस्थापन समिती, कुसुर यांनी शिवनेरी किल्ल्यावर लावलेला सूचना फलक.

३. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागामार्फत १९५८ च्या २४ व्या प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियमनान्वये राष्ट्रीय महत्त्वाचे म्हणून शिवनेरी किल्ल्यास संरक्षित स्मारक असा दर्जा दिल्याचा लावण्यात आलेला फलक.

४. शिवनेरी किल्ल्याचा लावलेला स्थळ नकाशा.

५. भारतीय पुरातत्त्व विभागाचा सूचनांचा फलक.

६. संयुक्त वनव्यवस्थापन समिती, कुसुर व वनविभाग, जुन्नर यांचा शिवनेरी किल्ल्याची पूर्वीची आणि आताची स्थिती दर्शवणारा फलक.

७. क्षेत्रभेट गुरुवार दि. १९/११/२०१५.

८. कित्ता.

९. लहू कचरू गायकवाड, पूर्वोक्त पृ. २५.

१०. संदीप तापकीर, **महाराजांच्या जहागिरीतून**, **पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले**, पुणे, जून २०१२, पृ. ६.

११. क्षेत्रभेट गुरुवार दि. १९/११/२०१५.

१२. लहू गायकवाड, **शिवनेरी किल्ल्याचा इतिहास**, पुणे, फेब्रुवारी २०११, पृ. ८.

१३. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/dainik+prabhat-epaper-dailypra/-newsid-691663720?ss=gml&s =दि. १९ जून २०१७.

१४. संदीप तापकीर, पूर्वोक्त, पृ. ८.

१५. शिवाई मंदिराचे पुजारी यांचेकडून प्राप्त माहितीच्या आधारे.

१६. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/Maharashtra-epaper,

१७. क्षेत्रभेटी आधारे.

१८. क्षेत्रभेटी आधारे.

१९. शिवकुंज वास्तूमधील कोरण्यात आलेला शिलालेख.

२०. संदीप तापकीर, पूर्वोक्त पृ. १०.

२१. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचा फलक.

२२. जयवंत म. पिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर यांच्याशी बुधवार दि. १८/११/२०१५ रोजी दुपारी ४ वा. झालेल्या मुलाखतीमधून मिळालेली माहिती.

२३. डी. डी. साळुंखे, वन परिमंडळ अधिकारी, जुन्नर यांच्याशी बुधवार दि. १८/११/२०१५ रोजी सायं. ५.३० वा. झालेल्या मुलाखतीमधून मिळालेली माहिती.

२४. लहू गायकवाड, पूर्वोक्त, पृ. ११०.

२५. क्षेत्रभेट रविवार दि. १८/०२/२०१८.

२६. कित्ता.

२७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग यांचा फलक.

२८. सिंहगड इंजिनियरिंग कॉलेज, पंढरपूर यांचा फलक.

२९. लोहगड-विसापूर विकास मंच यांचा फलक.

३०. क्षेत्रभेट रविवार दि. १८/०२/२०१८.

३१. राजे शिवछत्रपती मंच या संस्थेमार्फत लावण्यात आलेला फलक.

३२. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबईव्दारा लावण्यात आलेला लोहगड किल्ल्याचा नकाशा.

३३. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा सूचना फलक.

३४. क्षेत्रभेटीच्या आधारे.

३५. महेश तेंडुलकर, **लोहगड-विसापूर-तुंग-तिकोना**, पुणे, २०१०, पृ. १४.

३६. क्षेत्रभेटीच्या आधारे.

३७. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने लावलेला फलक.

३८. लोहगड किल्ल्यास प्रत्यक्ष भेट देऊन केलेली पाहणी.

३९. पुरातत्त्व अधिक्षक कार्यालय, केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई यांचेकडून दि. १८/१२/२०१५ रोजी ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे.

४०. राजन येळीकर, कनिष्ठ संवर्धन सहाव्यक पुणे कार्यालय, केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई यांच्याशी दि. ०९/०६/२०१७ रोजी पुणे कार्यालयात झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

४१. सचिन टेकवडे, 'दुर्गसंवर्धन लोहगडाचे', **दुर्गांच्या देशातून**-दिवाळी अंक, पुणे, नोव्हेंबर २०१२, पृ. १२४-१२५.

४२. क्षेत्रभेट रविवार दि. १८/०२/२०१८.

४३. कित्ता.

४४. कित्ता.

४५. भगवान चिले, **गड कोट,** कोल्हापूर, जून २०११, पृ. ३६.

४६. विसापूर किल्ल्यास प्रत्यक्ष क्षेत्र भेट.

४७. प्रमोद बोऱ्हाडे, दुर्ग विसापूर, **दुर्गांच्या देशातून** दिवाळी अंक, पुणे, नोव्हेंबर २०१२, पृ. ६२.

४८. क्षेत्रभेटीच्या आधारे.

४९. राजन येळीकर, कनिष्ठ संवर्धन सहाव्यक पुणे कार्यालय, केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई यांचेशी दि. ०९/०६/२०१७ रोजी झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

५०. क्षेत्रभेट बुधवार दि. १९/११/२०१५ रोजी दु. ३.०० वा.

५१. कित्ता.

५२. कित्ता.

५३. कित्ता.

५४. कित्ता.

५५. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठान, चाकण यांचा फलक.

५६. महाराष्ट्र शासन, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,मुंबई दिशादर्शक फलक.

५७. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/dainikprabhatepaper, 17th July, 2017.

५८. विलास वाहणे, सहाव्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी पुणे कार्यालयात झालेल्या चर्चेद्वारे प्राप्त माहिती.

५९. कित्ता.

६०. महाराष्ट्र शासन, पर्यटन विकास कार्यक्रम २०११-१२ सूचना फलक.

६१. महाराष्ट्र शासन, पर्यटन विकास कार्यक्रम २०११-१२ अंतर्गत पर्यटकांसाठी लावण्यात आलेला सूचना फलक.

६२. क्षेत्रभेट शनिवार दि. २१/११/२०१५.

६३. पुणे दरवाजा क्रमांक एकच्या आतील बाजूचा शिलालेख.

६४. सिंहगड स्थानदर्शक नकाशा.

६५. क्षेत्रभेट शनिवार दि. २१/११/२०१५.

६६. र. द. साठे, **सिंहगडची सहल**, पुणे, पृ. ६.

६७. क्षेत्रभेट शनिवार दि. २१/११/२०१५.

६८. कित्ता.

६९. सौर पथदिव्यावर लावलेल्या फलकावरील माहिती.

७०. लोकमान्य टिळक बंगल्याच्या भिंतीवर कोरण्यात आलेल्या शिलालेखावरील माहिती.

७१. क्षेत्रभेटीच्या आधारे.

७२. कित्ता.

७३. भगवान चिले, **गडकोट,** कोल्हापूर, फेब्रुवारी २००८, पृ. ३४.

७४. क्षेत्रभेटीच्या आधारे.

७५. कित्ता.

७६. कित्ता.

७७. कित्ता.

७८. कित्ता.

७९. पुणे महानगरपालिकेमार्फत स्वराज्य निष्ठा शिल्प भूमिपूजन कार्यक्रमाचा फलक.

८०. पुणे महानगरपालिका, भवन रचना कार्यालय, जा. क्र. भवन/१७७९ दि. ०१/०८/२०१७ चे संशोधकास मिळालेल्या पत्राच्या आधारे.

८१. क्षेत्रभेटीच्या आधारे.

८२. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

८३. सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे कार्यालयाकडून दि. २०/१०/२०१६ रोजी ई-मेल व्दारे प्राप्त माहिती.

८४. सुनिल मोहिते, कनिष्ठ अभियंता, भवन रचना कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजीच्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

८५. महाराष्ट्र शासन, भोर उपवनविभाग, नसरापूर वनक्षेत्र, राजगड पर्यटन विकास यांच्यामार्फत लावण्यात आलेला फलक.

८६. क्षेत्रभेट रविवार दि. २२/११/२०१५.

८७. कित्ता.

८८. प्र. न. देशपांडे, **राजगड दर्शन**, मुंबई, १९८१, पृ. २२.

८९. क्षेत्रभेटीच्या आधारे.

९०. प्र. के. घाणेकर, **गडांचा राजा राजगड**, पुणे, फेब्रुवारी २०११, पृ. ४५

९१. http://www.loksatta.com/trek-it-news/view-on-rajgad-185326/nopagi=1, शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०१३.

९२. प्र. के. घाणेकर, पूर्वोक्त पृ. ४५.

९३. क्षेत्रभेटीच्या आधारे.

९४. सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे कार्यालयाकडून दि. २०/१०/२०१६ रोजी ईमेलद्वारे प्राप्त झालेल्या माहिती.

९५. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

९६. क्षेत्रभेटीच्या आधारे.

९७. पुरातत्त्व विभागाच्या शेडच्या बाहेर लावण्यात आलेला फलक.

९८. संदीप तापकीर, पूर्वोक्त पृ. ७८.

९९. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१००. सुहास जोशी, 'छत्रपतींच्या राजगडाला प्लॅस्टिकचा वेढा', **साप्ताहिक लोकप्रभा**, १७ जून २०१६, पृ. १८-१९.

१०१. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभागाचा फलक.

१०२. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१०३. कित्ता.

१०४. कित्ता.

१०५. कित्ता.

१०६. राजगडाच्या पदमावती माचीवर अनेक विक्रेते बाटलीबंद पाणी विकतात.

१०७. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१०८. सुहास जोशी, पूर्वोक्त, पृ. १९.

१०९. पुरंदर किल्ल्यावर भारतीय सेनेच्या आर्मी ट्रेनिंग कॅम्पच्या कार्यालयात परवानगी घ्यावी लागते व तेथील रजिस्टर मध्ये नाव नोंदवावे लागते.

११०. मुरारबाजी देशपांडे यांच्या पुतळ्याच्या चौथऱ्यावर लावण्यात आलेल्या शिलालेखावरील माहिती.

१११. क्षेत्रभेट शुक्रवार दि. २०/११/२०१५.

११२. कित्ता.

११३. संदीप तापकीर, पूर्वोक्त पृ. ११४.

११४. क्षेत्रभेटीच्या आधारे.

११५. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्याखाली असणाऱ्या शिलालेखावरील माहिती.

११६. क्षेत्रभेटीच्या आधारे.

११७. प्र. के. घाणेकर, **दुर्गांच्या देशात**, पुणे, २००१, पृ. २२.

११८. क्षेत्रभेटीच्या आधारे.

११९. क्षेत्रभेट रविवार दि. १७/०८/२०१४ रोजी व शनिवार दि. १०/०६/२०१७.

१२०. प्रतापगड उत्सव समिती, महाराष्ट्रव्दारा लावण्यात आलेला बॅनर.

१२१. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१२२. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/lokmat/epaper/pratapgad,{X.12 OyZ 2017.

१२३. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१२४. कित्ता.

१२५. विजय देव (संपा.), **दुर्गविचार**, पुणे, मार्च २००९ पृ. २०.

१२६. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१२७. सातारा जिल्हा परिषद, सातारा यांचेमार्फत लावण्यात आलेला फलक.

१२८. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या खाली चबुतऱ्यावर लावण्यात आलेल्या शिलालेखावरील मजकूर.

१२९. वनविभाग सातारा, वनपरिक्षेत्र महाबळेश्वर आणि संयुक्त वन व्यवस्थापन समिती, किल्ले प्रतापगड यांच्यामार्फत लावण्यात आलेला फलक.

१३०. सातारा जिल्हा परिषद, सातारा यांचेमार्फत लावण्यात आलेला फलक.

१३१. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१३२. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

१३३. सतीश अक्कलकोट, **प्रतापगड व मकरंदगड**, सांगली, ऑक्टोबर २०१३, पृ. ५.

१३४. क्षेत्रभेट शनिवार दि. १६/०८/२०१४.

१३५. कित्ता.

१३६. कित्ता.

१३७. कित्ता.

१३८. कित्ता.

१३९. कित्ता.

१४०. अजिंक्यतारा किल्ल्याच्या तटावर कोरण्यात आलेल्या शिलालेखावरील मजकूर.

१४१. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१४२. कित्ता.

१४३. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/lokmanthan-epaper,
दि. १७ फेब्रुवारी २०१७

१४४. दै. लोकमत, २८ फेब्रुवारी २०१७, पृ. ५

१४५. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/lokmanthan-epaper,
दि. १७ फेब्रुवारी २०१७.

१४६. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

१४७. श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड यांचेमार्फत लावण्यात आलेला फलक.

१४८. श्री समर्थ मंडळ, सज्जनगड या संस्थेचा लावण्यात आलेला फलक.

१४९. क्षेत्रभेट सोमवार दि. १८/०८/२०१४.

१५०. श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड या संस्थेमार्फत लावण्यात आलेला सज्जनगडाचा स्थलदर्शक नकाशा.

१५१. फार्सी भाषेत असणारा काळ्या दगडात कोरलेला शिलालेख.

१५२. मराठी भाषेत अर्थ असणारा शिलालेख.

१५३. प्र. के. घाणेकर, **समर्थांचा सज्जनगड**, १९८४, पृ. ७.

१५४. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१५५. सतीश अक्कलकोट, **दुर्ग**, खंड पहिला, सांगली, २००९, पृ. ४५६.

१५६. क्षेत्रभेटीच्या आधारे.

१५७. समर्थ महाप्रसाद गृहाच्या भिंतीवर बसवण्यात आलेला शिलालेख.

१५८. धाब्याच्या मारुती मंदिराच्या भिंतीवर बसवण्यात आलेला शिलालेख.

१५९. पाणी पुरवठा योजनेच्या टाकीजवळ बसवण्यात आलेला शिलालेख.

१६०. पाणी पुरवठा योजनेच्या टाकीच्या खाली बसवण्यात आलेला शिलालेख.

१६१. सुनिल चिंचोलकर, **सज्जनगडाचा इतिहास**, सज्जनगड, जि. सातारा, २०१४, पृ. २४.

१६२. कित्ता, पृ. २५.

१६३. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी झालेल्या चर्चेमधून प्राप्त माहिती.

## प्रकरण पाचवे

## दुर्ग संवर्धन : काळाची गरज

'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या एकाच वाक्यात मध्ययुगीन काळातील किल्ल्यांचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्यांनी *'आज्ञापत्रा'* मध्ये स्पष्ट केले आहे. मराठ्यांच्या लष्करी व्यवस्थेत किल्ल्यांना विलक्षण महत्त्व प्राप्त झालेले आढळून येते. किल्ल्यांचा व त्याच्या आसपासच्या भौगोलिक अनुकुलतेचा आणि वैशिष्ट्यांचा खुबीने वापर करुन घेऊन मराठ्यांना स्वराज्याची स्थापना करता आल्याचे दिसून येते. अशा किल्ल्यांनीच शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा राज्याचे मोगल आक्रमणापासून रक्षण केले. मध्ययुगीन काळात एक भूराजनैतिक गरज म्हणून किल्ले निर्माण केले गेले व त्यांच्या त्यावेळी उपयोगही झाला. पण आज अवकाशातून टेहळणी करणारे उपग्रह, क्षेपणास्त्रे, विध्वंसक बॉम्ब फेकणारी अत्याधुनिक विमाने, अण्वस्त्रे, चालक विरहित ड्रोन विमाने, रडार यंत्रणा, पाणबुड्या, जैव रासायनिक युध्द तंत्रे अशा अत्यंत प्रगत व आधुनिक अशा शस्त्रास्त्रांमुळे व तंत्रज्ञानामुळे किल्ल्यांची गरज पूर्णपणे संपली असून त्यांचे महत्त्वही संपुष्टात आले आहे. बहुतांशी किल्ले नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, तर काही किल्ले अक्षम्य दुर्लक्षामुळे कायमस्वरुपी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज हे गडकिल्ले शासनाच्या ताब्यात आहेत. त्यातील क्वचित काही किल्ले खाजगी मालकीचे आहे. शासनाच्या पुरातत्त्व विभागाकडे किल्ल्यांची व्यवस्था सुपूर्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील काही किल्ल्यांवर मानवी वस्त्यांचे अतिक्रमण झालेले दिसून येते. तर काही किल्ले धनदांडगे व्यावसायिक, भूखंड माफिया, बिल्डर यांच्या पिपासू वृत्तीला बळी पडत आहेत. एकदा का हे किल्ले नामशेष झाले तर ते पुन्हा कधीच उभारता येणार नाहीत हे त्रिवार सत्य शासनाने, समाजाने समजून घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे. सर्वसामान्य लोकांमध्ये किल्ल्यांबाबतची आत्यंतिक तळमळ, दुरावस्थेबाबत संताप, सरकारी खात्याच्या उदासीनतेविषयी चीड त्यांच्या बोलण्यातून आणि लिखाणातूनही आपणांस दिसून येते. भारताच्या ऐतिहासिक व

वैभवशाली स्मारकांविषयी अशी तळमळ माजी पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांनाही होती. हे त्यांनी ११ जानेवारी १९८४ रोजी एशियाटिक सोसायटीच्या व्दिवार्षिक समारंभामध्ये केलेल्या भाषणातून दिसून येते. त्याचा थोडक्यात गोषवारा असा, ''हम विरासत की प्रशंसा करना जानते है। विरासत प्रशंसा का विषय नहीं है। यह सूक्ष्मता से मनन और अध्ययन के योग्य है । इसे स्वाध्याय का साधन समझा जाय । इसको कैसे सुरक्षित रखा जाय और चिरस्थायी रखा जाय तथा विकसित किया जाय, अभी तक समसामायिक मानवता, प्राकृतिक या मानवकृत सौंदर्य के प्रति आमतौर पर अनभिज्ञ है, जो हमारे सामने बिखरी पडी है और इसका हम अनावरण करना चाहते है। नि:संदेह हम सभी को अपनी विरासत पर गर्व होता है। परंतु यह कसक भी होती है की वर्तमान अपने अतीत को सहेज नही पा रहा है। शासकीय स्तरपर स्मारकों को संरक्षित घोषित कर देने, निला पट लगा देने और चौकीदार रख देने से विरासत की रक्षा के मामले में हम कितने गैरजिम्मेदार साबित हो रहे है कि उनकी रक्षा के लिए अब विदेशी संस्थांओ को पहल करनी पड रही है। युनेस्को से संबध्द वर्ल्ड हेरिटेज कमेटी और इंटरनॅशनल कौन्सिल आन मोन्यूमेंटस ने कालिबंगा, चितोडगड, आगरा का किला, ताजमहल, फतहपुर सिकरी और हम्पी के स्मारकों को बचाने की संस्तुति की है। यह विचित्र योग है की दो सौ वर्ष पूर्व भी, विदेशियों ने हमारी ऐतिहासिक विरासत की रक्षा के उपाय किए थे।'' श्रीमती इंदिराजी गांधी यांचे हे भाषण आपणास आत्मचिंतन करण्यास भाग पाडत आहे. केवळ भपकेबाज घोषणा करुन आश्वासने देणाऱ्या नेतृत्त्वापेक्षा नेमकी ठोस कृती करणाऱ्या नेतृत्त्वाची गरज निर्माण झाली आहे.[१] ज्यावेगाने महाराष्ट्रातील किल्ले जमीनदोस्त होत आहेत, हे पाहिल्यावर असे वाटते की, आणखी पन्नास ते पंचाहत्तर वर्षांनी २१ व्या शतकातील शिवाजी महाराजांच्या वारसदारांना इतिहासाच्या पुस्तकातील किल्ल्यांची चित्रे पाहूनच किल्ल्यांवर हिंडल्याचे समाधान मानावे लागेल.[२]

मागील चार-पाच वर्षापासून गडकिल्ले आणि त्याचे संवर्धन ही एक चळवळ बनू पहात असल्याचे दिसून येते. अनेक उत्साही गडप्रेमी, शिवप्रेमी किल्ल्यांवर

संवर्धनाची कामे स्वत:हून करीत असल्याचे दिसते. आपल्या समृध्द ऐतिहासिक वारशाचे जतन करणे आणि त्यासाठी जनमानसात जागृती निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. परदेशांमध्ये त्यांचा इतिहास फारच चांगल्या पध्दतीने जोपासला जातो आहे. त्यापासून आपणांस धडा घेण्याची गरज आहे. महाराष्ट्राला दैदिप्यमान इतिहास लाभूनही आज ऐतिहासिक स्मारके संकटात सापडलेली दिसून येतात. त्यामुळे दुर्ग संवर्धन ही काळाची गरज बनली आहे असे म्हणता येते.

**किल्ल्यांची दुरावस्था**

मराठ्यांच्या गौरवशाली, वैभवशाली काळाचे साक्षीदार असणारे दुर्ग आज 'चिरा चिरा ढळला' अशा अवस्थेत उभे असल्याचे दिसून येते. ढासळलेले बुरुज, कोसळलेले तट, झाडा झुडपांच्या व मोठ्या वृक्षांच्या मुळ्यांनी वेढून टाकलेले दरवाजे व बुरुज, गडांवर भग्न झालेल्या इमारती, सर्वत्र झाडाझुडपांचे साम्राज्य, प्लॅस्टिक कॅरीबॅग्ज, पाण्याच्या बाटल्या, शीतपेयांच्या बाटल्या, मद्याच्या बाटल्या, गुटख्यांचे पाऊच, थर्माकॉलचे किंवा प्लॅस्टिकचे प्लेटस्, काचेचे ग्लासेस, प्लॅस्टिकचे ग्लासेस, खाद्यपदार्थांची प्लॅस्टिकची वेष्टणे अशा अनंत अडचणींना, संकटांना तोंड देत महाराष्ट्राची धारातीर्थे उभी असल्याचे विदारक चित्र दिसून येते.

बहुतांशी गडकिल्ल्यांवर जाणारे हौशी पर्यटक आपल्या पाऊलखुणा मागे ठेवून निघून जातात. किल्ल्यांच्या तटावर, भिंतीवर, इमारतींवर आपली नांवे खडू, चुना, विटांनी लिहिणे, विचित्र आकारांची चित्रे काढणे यामुळे गडांचे विद्रुपीकरण झालेले दिसून येते. अनेक किल्ल्यांवर स्वच्छता गृहाची सोय नसल्याने उघड्यावरच पर्यटक प्रातर्विधी उरकल्याचे दिसून येते.[४]

जगात सर्वत्र प्लॅस्टिकचा वापर होत आहे. पण भारतासारखी कठीण परिस्थिती ऐकिवात येत नाही. त्याचे कारण असावे सरकार व कठोर कायदे आणि त्यांचे नागरिकांकडून पालन. भारतात परिस्थिती उलटी आहे. त्याचे कारण आपली मनोवृत्ती हे आहे. आपण कोणत्याही किल्ल्यावर फिरलो तर गुटख्याची

रिकामी पाकिटे, थुंकणे, पिचकारी मारणे वगैरे गोष्टी आढळतात. त्यातून आपली गलिच्छ मनोवृत्ती दिसून येते. याकरिता प्रत्येक नागरिकांस नागरी भान (सिव्हिल सेन्स) असणे आवश्यक आहे.[५]

लोकांना ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी कसे वागावे याची काहीही माहिती नसते. प्राचीन काळचा आपला समृध्द वारसा टिकवून ठेवावा, त्या अवशेषांचा विनाश करु नये, तेथील सौंदर्यास बाधा येईल असे कृत्य करु नये हे त्यांच्या ध्यानात येत नाही.

काही ठिकाणी पुरातत्त्व विभाग कार्यरत असतो. पण खूपदा कर्मचारी कमी असलेले दिसून येतात. त्यांना फारसे काहीही अधिकार नसतात. किल्ल्यांची दुरावस्था ही काही आजकालच्या पाच दहा वर्षात झालेली नाही. तर तिची दुरावस्था ब्रिटिश काळापासूनच होण्यास सुरुवात झाली. ब्रिटिशांनी संपूर्ण भारत ताब्यात घेताना इ.स. १८१८ साली मराठी राज्य संपुष्टात आणले. ज्यांच्यावर राज्य करायचे आहे. त्यांचा इतिहास माहित पाहिजे या दृष्टीने इंग्रजांनी मराठ्यांचा इतिहास अभ्यासला. मराठ्यांनी किल्ल्यांच्या आश्रयानेच प्रचंड प्रमाणावर युध्द साहित्य व सुसज्ज सैन्य घेऊन आलेल्या औरंगजेबास २७ वर्षे यशस्वी लढा देऊन मराठी राज्य टिकवले. परंतु औरंगजेबाला मात्र हताशपणे महाराष्ट्रातच अहमदनगर येथे मृत्यू स्वीकारावा लागला. अशी परिस्थिती आपल्यावर येऊ नये या दृष्टिकोनातून ब्रिटिशांनी महाराष्ट्रातील वैभवशाली, स्फूर्तीदायी, प्रेरणादायी व ऐतिहासिक किल्ले पाडण्याची मोहिमच हाती घेतली.

सध्याच्या पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, हडसर, चावंड, जीवधन, नारायणगड व अहमदनगर जिल्ह्यातील हरिश्चंद्रगड व कुंजरगड हे महत्त्वाचे सात किल्ले पाडण्यासंबंधीची अहमदनगरचा कलेक्टर हेन्री पॉटिंजर याने जून १८१८ ते डिसेंबर १८१८ मध्ये पत्रे लिहून सूचना दिल्या होत्या. याविषयीची अप्रकाशित पत्रे भारत इतिहास संशोधन मंडळामध्ये उपलब्ध आहेत. के. जे. सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव येथील डॉ. चंद्रकांत अभंग यांनी याविषयीचा लेख अप्रकाशित कागदपत्रांच्या साहाय्याने जून २०१२ च्या *'नवभारत'* या

नियतकालिकात लिहिला आहे.[६] इंग्रजांनी जुन्नर परिसरातील किल्ले पाडण्यासाठी विष्णूसाहेब नावाच्या इंजिनिअरची व कप्तान इस्टनस साहेब यांची नेमणूक केली. त्यास हवी ती मदत पुरविण्याची जबाबदारी त्या त्या किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या गावांवर सोपविलेली होती. अशा प्रकारे इंग्रजांनी जुन्नरच्या परिसरातील किल्ले पाडून टाकले. मराठी राज्याचा मुख्य आधारच नष्ट करुन टाकला. या अशाच प्रकारचे २५ किल्ले ब्रिटिशांनी खराब केल्याची यादी सातारा महाराज फडपोशी दफ्तर, पेशवे दफ्तरात आहे.[७]

दुसऱ्या बाजीरावाने पूर्ण शरणागती स्वीकारताच इंग्रज अधिकारी जनरल स्मिथच्या हुकुमावरुन जनरल प्रिटझलर याने सिंहगडावर मोर्चे लावून किल्ला ताब्यात घेतला. किल्ल्याच्या उत्तर, पूर्व व दक्षिण या तिन्ही बाजूंनी तोफा लावून निरनिराळ्या ठिकाणी १ मार्च १८१८ पर्यंत ३६७८ गोळे टाकून सिंहगड किल्ला हस्तगत केला गेला. त्यामुळे सिंहगडावर आज उजाड माळरान दिसून येते. सिंहगडाची तटबंदी देखील तोफा लावून ठिकठिकाणी खंडित करण्यात आली.[८]

कर्नल प्रॉथर या ब्रिटिश अधिकाऱ्याने ४ मार्च १८१८ रोजी विसापूर किल्ला ताब्यात घेतला व त्यानंतर लोहगड किल्ला जिंकला. विसापूरचा किल्ला ताब्यात घेतल्यावर त्वरित कर्नल प्रॉथरने कोकण व दक्षिण असे दोन्ही दरवाजे पाडून टाकले व विसापूर किल्ल्याचे लष्करी सामर्थ्य संपुष्टात आणले. हे दोन्ही दरवाजे उध्वस्त करण्यासाठी त्याने लांब पल्ल्याच्या मारा करणाऱ्या तोफा वापरल्या व त्याव्दारेच गडावरील महत्त्वाच्या इमारती व दरवाजे उद्ध्वस्त करुन टाकले. तेव्हापासून विसापूर किल्ला उजाड झाला.[९] २५ फेब्रुवारी १८१८ रोजी लेफ्टनंट कर्नल डिकनने चाकणचा किल्ला जिंकून घेतला. त्याच्या मदतीला पुण्याहून इंग्रजांची पलटण व इतर युध्द सामग्री पोहोच झाली. १२ पाऊंडी पोलादी व पितळी तोफा माऱ्याच्या जागी ठेवून किल्ल्यावर ब्रिटिशांनी हल्ला चढवला व किल्ला उध्वस्त करुन ताब्यात घेतला.[१०] इ.स. १८१८ मध्ये इंग्रज सेनापती एल्ड्रिजने पुरंदर किल्ला जिंकून घेतला. किल्ला ताब्यात आल्यानंतर तोफांचा मारा करुन वरच्या इमारती उध्वस्त करुन टाकल्या.[११] १० फेब्रुवारी १८१८ रोजी सातारा किल्ल्यास जनरल

स्मिथ व जनरल प्रिझलर या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी वेढा दिला आणि त्यावर तोफांचा मारा सुरु केला. दिनांक ११ फेब्रुवारी १८१८ रोजी इंग्रजांचे निशाण किल्ल्यावर चढले.[१२]

ब्रिटिशांनी प्रचंड नासधूस केलेल्या किल्ल्यांकडे नंतरच्या काळात प्रचंड दुर्लक्ष झाले. किल्ल्यांवर जाणाऱ्या वाटा नष्ट झाल्या. देश इंग्रजांच्या सत्तेखाली गेल्यावर पूर्वीचे संस्थानिक आणि सरदार घराण्यांकडून तांत्रिकदृष्ट्या या गडांची व्यवस्था होत होती. पण या लोकांना आता संरक्षणाचा प्रश्न शिल्लक राहिला नव्हता. म्हणूनच पूर्वापार चालत आलेल्या रुढींप्रमाणे गडासंबंधीचा व्यवहार चालू राहिला. पण या व्यवहारातील चैतन्य लोप पावल्यामुळे किल्ल्यांची ससेहोलपट चालूच राहिली. त्यात इ.स. १८६२ मध्ये इंग्रज सरकारने हे गड-किल्ले निरुपयोगी करण्याचा एक हुकूम काढला. महाराष्ट्रातील गडांना अधिकच दुर्दैवी दिवस आले.[१३]

याच काळात स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाली. लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्यचळवळीचे एक प्रमुख प्रवर्तक होते. त्यांनी शिवजन्म उत्सवाच्या निमित्ताने राष्ट्राच्या वा देशाबद्दलची अस्मिता जागृत करण्याचा प्रारंभ केला. पारतंत्र्याच्या या काळात रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीकडे डग्लस या ब्रिटिश अधिकाऱ्याचे लक्ष गेले. लोकमान्य टिळकांनी शिवछत्रपतींच्या या समाधीकडे सर्वच देशाचे आणि प्रामुख्याने महाराष्ट्राचे लक्ष वेधले. या निमित्ताने स्वातंत्र्याच्या लढ्याला एक स्फूर्ती केंद्र मिळाले. रायगडावरील शिवजन्म उत्सव सुरु झाला.[१४]

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महाराष्ट्रातील सर्व गड किल्ले शासनाच्या ताब्यात गेले. त्यातील काही मोजके किल्ले अजूनही खाजगी मालकीचे आहेत. शासनाच्या पुरातत्त्व विभागाकडे या किल्ल्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यात केंद्रीय पुरातत्त्व विभाग आणि राज्य पुरातत्त्व विभाग असे दोन विभाग पडले आहेत. महाराष्ट्रात किमान १०,००० ऐतिहासिक अवशेष आहेत. ज्यात गड-किल्ले, कोट, समाधी, शिलालेख, मंदिरे, मूर्ती, स्तंभ, लेण्या, गुंफा इत्यादींचा समावेश होतो. याची नोंदणी करणे काळाची गरज आहे. अशा परिस्थितीत राज्य पुरातत्त्व

विभागाच्या अखत्यारीत २५८ स्मारके व केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत ११६ स्मारके अंतर्भूत होतात. या दोन्ही विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या स्मारकांची संख्या पाहता महाराष्ट्रातील संवर्धनाची स्थिती काय असावी हे वेगळे सांगण्याची गरज नाही.[१५] महाराष्ट्रातील किल्ल्यांची अवस्था पाहिली तर सरकारचे किल्ल्यांकडे किती अक्षम्य दुर्लक्ष होत आहे याची कल्पना येते.[१६]

जंजिऱ्याच्या सिद्दीला वचक बसावा म्हणून शिवाजी महाराजांनी बांधलेला पदमदुर्ग उर्फ कासा हा सागरी किल्ला आहे. परकीय राजवटीने बांधलेल्या जंजिऱ्याचं आपण रक्षण करतो पण त्याच्या समोरच असलेला पदमदुर्ग उर्फ कासा किल्ला आजही दुर्लक्षित आहे. त्याचे बुरुज, तटबंदी ढासळत आहेत. गोड्या पाण्याचे साठे खराब होत आहेत. मुंबईकरांच्या जवळच्या माहुली किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांत बिअरच्या बाटल्या सापडल्या आहेत. विशाळगड, प्रतापगड, मलंगगडावर दर्गा वगैरेचे अतिक्रमण झाले आहे. तसेच अनेक किल्ल्यांवर मंदिरांचे अतिक्रमण होत आहे. भरवगडावरील भरोबाचे प्राचीन मंदीर पाडून तेथे आता आरसीसीचे मंदिर बांधले आहे. राजगडासारख्या किल्ल्यावर एकही व्यवस्थित स्वच्छतागृह नाही. तेथे उघड्यावरच पर्यटक शौचाला गेल्याचे दिसते.[१७]

तारापूरचा किल्ला, गोपाळगड उर्फ अंजनवेलचा किल्ला, यशवंतगड, अर्नाळा, भरतगड हे किल्ले खाजगी लोकांच्या ताब्यात आहेत. या किल्ल्यातील जमिनीवर कुणी टुमदार घर, कुणी नारळ, सुपारी, आंबा, चिक्कू अशा बक्कळ पैसा मिळवून देणाऱ्या बागा लावलेल्या आहेत. काही महाभागांनी तारापूर अंजनवेल सारख्या दुर्गांना चक्क कडी कुलूपच ठोकले आहे. तर सरकारच्या कागदोपत्रांच्या गलथान कारभारामुळे अंजनवेलचा गोपाळगड बँकेस तारण प्रॉपर्टी म्हणून तर उंदेरीचा किल्ला चक्क खाजगी कंपनीस विकण्याचा घाट घातला गेला आहे.[१८]

गडचिरोली जिल्ह्यातील वैरागड किल्ल्यावर पुरातत्त्व विभागाने २०१४-१५ या वर्षात किल्ल्याच्या सौंदर्यीकरणाचे काम हाती घेतले. किल्ल्याचे खंदक

दुरुस्ती करण्यासाठी कंत्राटदाराने दगड आणून ठेवले आहेत. मात्र अजून पर्यंत या कामाला सुरुवात झाली नाही.[१९]

गडचिरोली जिल्ह्यातील कोरची पासून ४० किमी अंतरावर निहायकल गावाजवळील चार किमी अंतरावरचा टिप्पागड किल्ला सध्या कोसळण्याच्या स्थितीत आहे. या किल्ल्याच्या देखभाल दुरुस्तीकडे राज्यशासनाचे व पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. गडाची सात ते आठ किमी लांबीची सुरक्षा भिंत मोडकळीस आली आहे. या किल्ल्याची सध्या दुरावस्था झाली असून किल्ला कधीही कोसळेल अशा स्थितीत आला आहे.[२०]

भंडारा जिल्ह्यातील आंबागड किल्ल्यास पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय विभागाने 'क' श्रेणी दिली असून सध्या निधीची वानवा असल्याने किल्ल्याकडे दुर्लक्ष झाले आहे. नागरिक किल्ल्यावर गुप्तधन शोधण्याकरिता खोदकाम करुन किल्ला नामशेष करीत आहेत. तरीही शासनाने त्याची दखल घेतलेली नाही. किल्ल्याच्या तटभिंतीचे कार्य कासवगतीने सुरु आहे. मात्र आतील किल्ला पूर्णत: ढासळलेला आहे.[२१]

किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या परिसरात जिल्हा परिषदेने लावलेले सौरदिवे पुरातत्त्व खात्याने उखडून टाकले आहेत. त्यामुळे शिवपुतळा अंधारात राहात आहे. पुरातत्त्व विभागाच्या या मनमानी कारभाराविरोधात सर्व थरांतून संताप व्यक्त केला जातो आहे.[२२] रायगडावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे विश्रामगृह असून विश्रामगृहाची दुर्दशा झाली आहे. याठिकाणी असलेल्या १२ खोल्यांपैकी ५ खोल्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून उर्वरित ७ खोल्या पर्यटकांना सध्या भाड्याने दिल्या जातात. उपहारगृहाअंतर्गतची देखभालीची तीच बिकट अवस्था आहे. त्यामुळे पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे.[२३]

कोल्हापूर जिल्ह्यातील 'क' वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळालेल्या किल्ले सामानगडावर बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे भग्नावस्था निर्माण झाली आहे. तेथे अस्वच्छता व घाणीचे साम्राज्य पसरले आहे. अंतर्गत रस्ते उखडले आहे.

गडाचे प्रमुख आकर्षण असलेली हनुमान विहीर, अंधार कोठडी, साखर विहिरीवर मोठी झुडपे उगवली आहेत. बालोद्यानात जनावरे चरण्यासाठी सोडली जातात. विश्रांतीगृह वर्षानुवर्षे बंद आहे. डॉर्मेट्री हॉल, उपहारगृहाची दुरावस्था झाली आहे. गडावर प्रेमी युगुलांचा वावर दिसत आहे. या युगुलांच्या चाळ्यांमुळे गडाचे पावित्र्य धोक्यात येत आहे. सध्या गडास सार्वजनिक बांधकाम खाते, वनविभाग, पुरातत्त्व खाते यापैकी कोणी वाली नसल्याचे चित्र आहे.[२४]

रायगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या पाचाड येथील राजमाता जिजाऊंचा राजवाडा अखेरची घटका मोजत आहे. आज या ऐतिहासिक वाड्याची दुरावस्था झाली आहे. राजवाडा परिसरात गवताचे साम्राज्य पसरले आहेआणि त्या भागात गुरांचा वावर असल्याचे दिसून येत आहे. काळाच्या ओघात राजवाड्याचा बराचसा भाग नामशेष झाला आहे. राजवाड्यालगतचा १४ एकराचा परिसर पुरातत्त्व खात्याने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केला असून तसा फलकही लावला आहे. मात्र दुरुस्तीअभावी तटबंदी, इमारतीच्या पायाचे दगड निखळून पडत आहेत. स्थानिक ग्रामस्थ व रायगड जिल्हा परिषद या वास्तूच्या दुरुस्तीसाठी निधी देण्याची तयारी दाखवूनही पुरातत्त्व विभाग त्याला तयार नाही. त्यामुळे हे महत्त्वाचे ऐतिहासिक स्मारक नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.[२५]

उस्मानाबाद जिल्ह्यातील नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यास दक्षिण कोरियाहून आलेल्या पर्यटकांनी भेट दिली. परिसरात पसरलेली हिरवळ, निसर्गरम्य वातावरणामध्ये भव्य ऐतिहासिक किल्ला पाहून परदेशी पाहुणे आनंदित झाले होते. परंतु किल्ल्याच्या प्रवेशव्दारासमोरील घाणीचे साम्राज्य, प्रवेशव्दारासमोरच नागरिकांनी सोडलेले सांडपाणी, किल्ल्यात जाणाऱ्या जनावरांच्या शेणामुळे झालेला चिखल व दुर्गंधी यामुळे आम्ही निराश झालो आहोत अशी खंत या पर्यटकांनी व्यक्त केली.[२६]

ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर किल्ल्यात चक्क कॉँक्रिटचा बंगला उभारण्यात आला आहे. किल्ल्याची काही जागा सरकारने विकूनही टाकली आहे. त्यानंतर

आता हा किल्ला संरक्षित स्मारक नसल्याची माहिती पुरातत्त्व विभागाचे अधिकारी निफाडे यांनी ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दिली.[२७]

राज्यातील किल्ले संवर्धनासाठी पुरातत्त्व विभागाने वर्षभरापूर्वी किल्ले दत्तक योजना जाहीर केली. पण योजनेची प्रसिध्दीच अपुरी झाल्याने किल्लेप्रेमींचा या योजनेला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. वर्ष उलटले तरी अद्याप हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच अर्ज पुरातत्त्व विभागाकडे आले असून तेही सध्या धूळ खात पडून आहे.[२८]

रत्नागिरी जिल्ह्यातील खेडजवळचा रसाळगड किल्ला हा काही इतिहास प्रसिध्द किल्ला नाही. रसाळगडापेक्षा अनेक महत्त्वाचे किल्ले संरक्षित केले नसताना २००३ साली राज्य सरकारच्या पुरातत्त्व खात्याने चक्क हा किल्ला संरक्षित स्मारक म्हणून जाहीर केला. संरक्षित झाल्यापासूनच म्हणजे २००३-०४ सालीच रु. ४,४२,४०० रुपयांची कामे हाती घेण्यात आली. कोठाराची दुरुस्ती करण्यासाठी म्हणून ८,७४,८०० रुपयांचा निधी आला. २००८-०९ साली ४५,४०,००० रुपयांचा निधी आला. म्हणजेच सहा वर्षांच्या कालावधीत ५८ लाखांचा निधी आला असला तरी यापैकी निम्म्या रक्कमेचे काम झाल्याचे देखील गडावर आढळून येत नाही. 'रत्नागिरी गडकोट वाचवा समिती' ने २००९ साली माहिती अधिकाराचा वापर करुन पुरातत्त्व खात्यामार्फत दुर्गसंवर्धन क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार जगजाहीर केला.[२९]

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्गचा किल्ला झाडाझुडपांनी व्यापलेला आहे. किल्ल्याच्या तटबंदीवर जंगली वनस्पती वाढली आहे. किल्ल्याचे बुरुज अत्यंत कमकुवत झाले असून कधीही ढासळून जाईल अशा अवस्थेत आहेत. अत्यंत पडझड झालेल्या अवस्थेत हा किल्ला असून पुरातत्त्व खाते त्याकडे दुर्लक्ष करीत आहे.[३०] या किल्ल्याची महिनाभरापूर्वी दुरुस्त केलेली तटबंदी समुद्री उधाणाच्या पहिल्याच तडाख्यात कोसळली. यामुळे दुरुस्ती कामातील निकृष्टपणाही उघड झाला आहे. किल्ल्याच्या या दुरावस्थेबाबत अनेकवेळा शासन व पुरातत्त्व विभागाचे लक्ष वेधूनही त्यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे. त्याच्या निषेधार्थ तसेच

त्याकडे लक्ष वेधण्यासाठी भाजप आमदार प्रमोद जठार व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनी स्वत:चे मुंडण करुन निषेध नोंदवला.[३१]

पन्हाळगडावर येणारी प्रेमीयुगुले गडाचे महत्त्व, ऐतिहासिक इमारतीची उपयुक्तता याचा विचार न करता या ऐतिहासिक वास्तूंवर स्वत:ची नावे लिहून वास्तूंचे पावित्र्य नाहीसे करीत आहेत. पन्हाळ्याच्या पायथ्यापासून ते गडापर्यंत अनेक ठिकाणी लहान मोठी हॉटेल्स आहेत. तेथील अनैतिक उद्योग त्यांच्या व्यवसायाचे साधन बनले आहे.[३२]

बांधकाम विभागाने पूल बांधकामाचे बिल न दिल्याने विशाळगडाच्या खंदकावरील पुलाचे बांधकाम रखडले आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या पुलाचे बांधकाम वेळेत पूर्ण झाले नाही. सध्या उभारलेल्या बांधकामाचा ३० लाखांवर खर्च झाला आहे. पण बांधकाम विभागाने बिल न काढल्याने ठेकेदाराने या पुलाचे बांधकाम अर्धवट ठेवले आहे.[३३] विशाळगडावरील बाजीप्रभू व फुलाजी प्रभू बंधूंच्या समाध्या पुरातत्त्व विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या समाध्यांची दैनंदिन देखभाल, पूजाअर्चा, स्वच्छता होत नसल्याने ऊन पावसाचा मारा सहन करत या समाध्या उभ्या आहेत. समाधीचा एक एक दगड निखळत चालला आहे. त्यामुळे पुरातत्त्व विभागाने या वास्तूंच्या उर्जितावस्थेसाठी पावले उचलण्याची गरज आहे.[३४]

रायगड जिल्ह्यातील पालीजवळच्या सुधागड किल्ल्यावर गिर्यारोहण क्षेत्रातील नामांकित संस्थेच्या जुन्याजाणत्या ट्रेकर्सनी पार्टी करुन गोंधळ घातल्याने पर्यटकांस त्रास झाला. त्याबाबत त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.[३५]

किल्ले व शिवकालीन वास्तू नव्या रुपात पाहायला मिळतील असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केले. हॉलंड, नेदरलँडमध्ये ३५० किल्ले आहेत. त्यापैकी ७० किल्ले अतिशय सुंदर पध्दतीने नागरिकांनी जतन केले आहेत. तसा प्रयोग आपल्या देशात महाराष्ट्रात होणे आवश्यक आहे असे मत त्यांनी मांडले.[३६]

राज्यातील ढासळणाऱ्या गडकोटांकडे सरकारने वेळीच लक्ष देऊन त्यांच्या संवर्धनासाठी 'प्लॅन ऑफ ॲक्शन' करावा. रायगड, राजगड, सिंधुदुर्ग, पन्हाळा व पुरंदर यापाच किल्ल्यांना मॉडेल फोर्ट करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत असे प्रतिपादन नामदार युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी केले आहे.[३७]

सातारा जिल्हयातील कोयना अभयारण्याच्या घनदाट वनात असलेल्या वासोटा किल्ल्याचे प्रवेशद्वार भग्नावस्थेत आहे. अशा विविध समस्यांनी हा किल्ला घेरला आहे.[३८]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अतुलनीय पराक्रमाची साक्ष देणाऱ्या प्रतापगडाचे सौंदर्य वीजवाहिन्यांच्या जाळ्यात झाकोळले आहे. गडावर जाण्यासाठीचा रस्ता अरुंद आहे. रस्ता रुंदीकरणाची गरज निर्माण झाली आहे. वाहनतळाची जागा वाढविण्याची गरज निर्माण झाली आहे.[३९]

संस्कृती व पर्यटनाचे प्रतीक असलेल्या सिंधुदुर्ग किल्ल्याबाबत शासन आणि पुरातत्त्व विभाग उदासीन आहे. ढासळत चाललेले बुरुज, पडझड झालेली तटबंदी, वैराण माळरान, जीर्ण ऐतिहासिक ठेवा, मंदिरांची दुरावस्था, सोयी सुविधांचा अभाव, प्लॅस्टिक प्रदूषणाचा विळखा यामुळे सिंधुदुर्ग किल्ल्याचे बकाल चित्र पर्यटकांमार्फत जगासमोर जात आहे.[४०]

सातारा जिल्ह्यातील पांडवगडावर असलेल्या शिवकालीन वास्तूंची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे. या किल्ल्यावरील काही भाग एका व्यक्तीने विकत घेतला असून त्याने हा भाग खाजगी मालकीचा असल्याचे फलक जागोजागी लावले आहेत. शिवकालीन गडाची विक्री कशी व कोणी केली याबाबत पर्यटकांत संभ्रमावस्था असून आश्चर्य व्यक्त होत आहे.[४१]

पन्हाळगड या किल्ल्यास पौराणिक, ऐतिहासिक आणि पर्यटनाचा वारसा लाभला आहे. परंतु सध्या पडझड झालेले बुरुज, ऐतिहासिक वास्तूंकडे दुर्लक्ष, पर्यटक वाढीच्या योजनांची कमतरता, पुरेशा सोयीसुविधांचा अभाव अशी परिस्थिती असल्याचे दिसून येते. या वास्तूंची दुरुस्ती, डागडुजी केल्यास दुर्गप्रेमींची व पर्यटकांची संख्या नक्की वाढू शकते.[४२]

चंदगडला प्रति मिनीमहाबळेश्वरची ओळख निर्माण करुन देणारा ऐतिहासिक किल्ले पारगड सुविधांअभावी आजही प्राथमिक अवस्थेत आहे. शासन व पर्यटन विभागाच्या दुर्लक्षामुळे हा महत्त्वाचा किल्ला विकासापासून वंचित राहिला आहे.[४३]

शिराळ्याच्या इतिहासाचा साक्षीदार असलेला भुईकोट किल्ला नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे हा किल्ला भग्नावस्थेत आहे.[४४]

विशाळगडाची पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे दुरावस्था झाली आहे. किल्ल्याच्या तटबंदी ढासळत आहेत. अस्वच्छता, दुर्गंधी आणि अतिक्रमणाच्या विळख्यात किल्ला सापडला आहे. गडावर जाणाऱ्या लोखंडी शिडीची अत्यंत दुरावस्था झाली असून पर्यटक आपला जीव धोक्यात घालून गडावर जात आहेत. पाण्याचा तलाव नामशेष झाला असून येथील ग्रामस्थांनी किल्ल्यावर अतिक्रमण केले आहे.[४५]

पन्हाळा किल्ल्याचा जोडकिल्ला म्हणून परिचित असलेला पावनगड दुर्लक्षित राहिला आहे. गडावरील बरेचसे बुरुज, तटाचा काही भाग, जुन्या वास्तू, मंदिरे यांची खूप पडझड झाल्याचे दिसून येते. या किल्ल्यावर प्रेमीयुगुलांचा वावर मोठ्या प्रमाणावर दिसतो. किल्ल्यावर रोपवे करण्याची तयारी सुरु आहे परंतु त्याला विरोध होत आहे.[४६]

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगडाचे संवर्धन करण्यासाठी गडकऱ्यांच्या वारसदाराने एकत्र येऊन देशातील पहिले प्रतिष्ठान स्थापन केले आहे. ही संघटना गडाच्या संवर्धनासाठी प्रयत्नशील आहे. या गडाच्या विकासासाठी १३ व्या वित्त आयोगातून एक कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र दुरुस्ती मध्ये चुन्या ऐवजी सिमेंट वापरल्याने त्याला गडकऱ्यांनी विरोध केला आहे.[४७]

सातारा जिल्ह्याच्या वाई तालुक्यातील रायरेश्वर गडाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी अजून पक्का रस्ता तयार झाला नाही. माध्यमिक शिक्षणासाठी पाच तासांची पायपीट करत भोर किंवा वाई येथे जावे लागते. गडावर पर्यटकांचीही सोयीसुविधां अभावी मोठी गैरसोय होते.[४८]

घाट आणि कोकण यांच्या नैसर्गिक सीमारेषेवर उभा असलेला रांगणा किल्ला शासनाचा नाकर्तेपणा व पुरातत्त्व विभागाच्या उदासीनतेमुळे भग्नावस्थेला पोचला आहे. गडावरील अनेक वास्तूंची पडझड झाली आहे. गडावरील तोफा खाली दरीत पडल्या आहेत. गडाची तटबंदी ढासळत आहे.[४९]

मातीचा गड म्हणून प्रसिध्द असलेल्या व सातारा जिल्ह्यातील पूर्वेकडील शेवटचा गड म्हणून परिचित असेल्या भूषणगडास पर्यटनस्थळ म्हणून 'क' दर्जा मिळाला आहे. मात्र तेथील परिस्थिती अजूनही विदारक आहे. गडाच्या चार बुरुजांची पडझड झाली आहे. तसेच तेथील वनसंपदा नष्ट होत आहे.[५०]

औरंगजेबाच्या कालावधीत 'किली दि फतेह' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या वसंतगडावरील ऐतिहासिक वस्तू गायब झाल्या आहेत. शिवपूर्व काळात उभारलेल्या या किल्ल्यावर काही वर्षांपूर्वी दोन तोफा,नगारे शिल्प, शिलालेख होते. मात्र, सध्या यातील कोणतीही वस्तू गडावर नाही. बुरुजास वापरलेले अनेक घडीव व कोरीवकाम केलेले दगड गायब झाले आहेत. गडावरील मंदिरांची मोठी दुरावस्था झाली आहे.[५१]

माणदेशाचा मानबिंदू असलेल्या महिमानगड सध्या अखेरच्या घटका मोजत असून, चारही बाजूंचे तट ढासळले आहे. शिवरायांच्या या साक्षीदाराला नवसंजीवनी मिळणे अत्यंत गरजेचे आहे.[५२]

कोयनानगरच्या अतिशय दुर्गम, डोंगराळ परिसरातील भैरवगडावर, पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही सुविधा नाहीत त्यामुळे हे किल्ले नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.[५३]

ठाणे जिल्ह्यातील वसईच्या पूर्वेकडे चिमाजी आप्पांची शौर्यगाथा सांगणारा ऐतिहासिक घडामोडींचा साक्षीदार असलेल्या मांडवी किल्ल्याचा वापर चक्क शौचालयासारखा तसेच दारु पिण्यासाठी निवांत जागा म्हणून केला जात आहे. हा किल्ला मानवी अतिक्रमणाच्या विळख्यात आहे.[५४]

सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या वैविध्यपूर्ण महाराष्ट्राची गड किल्ल्यांमुळे जगात ओळख आहे. राज्यातील ४७ किल्ले केंद्रसरकारच्या पुरातत्त्व विभागाच्या

तर ४९ किल्ले राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत आहेत. इतर ४०० हून अधिक किल्ल्यांची सरकार दफ्तरी अधिकृत नोंदच झाली नाही. त्यामुळे त्यांच्या विकास रखडला आहे. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी नियुक्त दुर्गसंवर्धन समितीने ही बाब सरकारच्या निदर्शनास आणली आहे.[५५]

आज गडकिल्ल्यांना हिलस्टेशनचे स्वरुप आले आहे. पर्यटकांना एखाद्या हिलस्टेशनवर ज्या सुखसुविधा मिळतात, त्या गडकिल्ल्यावर सुध्दा मिळाल्या पाहिजेत, असा त्यांचा आग्रह असतो. आज पुण्याजवळील सिंहगडाची ओळख ही नरवीर तानाजी मालुसरे यांच्यासाठी नसून, या गडाची नवी ओळख कुरकुरीत कांदाभजी, पिठलं भाकरी, दही मिळण्याचे ठिकाण अशी झाली आहे. आता या किल्ल्यावर अनेक टपऱ्या झाल्या आहेत.[५६]

कल्याण येथे असलेल्या ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्याचा बुरुज ढासळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने यात कोणतीही जिवित हानी झाली नाही. पुरातत्त्व विभाग आणि राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे या किल्ल्याची अवकळा झाली. विस्तीर्ण खाडीला लागून असलेल्या या किल्ल्याची डागडुजी पुरातत्त्व खात्याने कधीही केली नाही.[५७]

रायगड आणि सिंधुदुर्ग या किल्ल्यांवर पिण्याच्या पाण्याची सोय आणि स्वच्छतागृहे यासारख्या अत्यंत मूलभूत सुविधा नाहीत. या दोन किल्ल्यांना दरवर्षी सरासरी पाच लाखांपेक्षा अधिक पर्यटक भेट देतात.[५८]

भारतीय पुरातत्त्व खात्याच्या मुंबई सर्कलचे अधिकारी प्रांजळपणे कबूल करतात की भारतीय पुरातत्त्व विभाग छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैभवशाली किल्ल्यांच्या दुरावस्थेला आणि सोयी सुविधांच्या वानवा असलेल्या परिस्थितीला जबाबदार आहे. मुंबई सर्कलचे पुरातत्त्व अधीक्षक डॉ. व्ही. एस. बडिगेर म्हणतात की, पूर्वी महाराष्ट्रात औरंगाबाद या ठिकाणी भारतीय पुरातत्त्व विभागाचे एकच सर्कल होते. त्यामुळे सर्वच किल्ल्यांची काळजी आम्ही घेऊ शकत नव्हतो. त्याचवेळी आमच्याकडे पुरेसा कर्मचारी वर्ग आणि आर्थिक तरतूदही नव्हती, परिणामी किल्ले दुर्लक्षित झाले. त्यामुळे २००५ साली मुंबई सर्कलची स्थापना

झाली आणि २०१५ साली नागपूर सर्कलची स्थापना झाली. परंतु आता मुंबई सर्कल मध्ये फक्त १०० कर्मचारी काम करीत आहेत आणि २५० जागा रिक्त पडून आहेत. त्यामुळे ऐतिहासिक स्मारकांची योग्य ती काळजी आम्ही घेऊ शकत नाही आहोत. कर्मचारी भरतीची प्रक्रिया सुरु आहे.[५९]

सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनाने गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. जून २०१६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फक्त रायगड किल्ले संवर्धनासाठी ५०० कोटी रुपयांच्या तरतूदीची घोषणा केली.[६०]

शासनाच्या कागदपत्रांनुसारफक्त ८२ किल्ले केंद्रीय पुरातत्त्व विभाग किंवा राज्य पुरातत्त्व विभागामार्फत संरक्षित करण्यात आले आहेत.[६१]

किल्ले संवर्धन करण्यामध्ये अनेक समस्या आवासून उभ्या आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतेही सरकार किल्ल्यांबाबत व त्याच्या संवर्धनाबाबत गांभीर्याने विचार करीत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना विविध गटांत आपण विभागून ठेवले आहे. एका गटाने एखाद्या कामाचा पाठपुरावा केला तर दुसऱ्या गटाकडून त्याला विरोध होतो. आपापसात भांडत बसल्याने किल्ले आणि त्यांचे संवर्धन हा मूळ मुद्दाच बाजूला राहतो.[६२]

किल्ले विशाळगडावर सातत्याने पर्यटकांचा राबता असतो. पण येथे येणाऱ्या पर्यटकांना पिण्यासाठी व खर्चासाठी पाण्याची उपलब्धता नसल्याने पाण्यातून पैसा मिळवणारी व्यावसायिकता दिसून येते. पाण्याचा तुटवडा असल्याने सुलभ शौचालय सुविधेचा विचार येथील प्रशासनाला शिवलेला नाही. साहजिकच भाविकांना उघड्यावर शौचास बसावे लागते. याशिवाय अस्वच्छता, दुर्गंधी, प्लॅस्टिक बाटल्यांचे ढिगारे , कोंबड्यांच्या पिसांचे कोंडावळे या गडाचे पावित्र्य संपवत आहेत.[६३]

भिवंडी तालुक्यातील गुमतारा, पिंपळास, कांबे, फिरंगकोट, खारबाव या चार किल्ल्यांची सद्यस्थिती अत्यंत भीषण असल्याचे दिसून येते. किल्ल्यावर जाण्यासाठी वाटा नाहीत. किल्ल्यावर सर्वत्र प्लॅस्टिक आणि दारुच्या बाटल्यांचा

खच पडलेला दिसतो. खारबाव हा आता किल्ला राहिला नसून तिथे सरकारी दवाखाना थाटण्यात आला आहे. थोडीफार तटबंदी आणि एकमेव बुरुज शिल्लक असून त्या बुरुजाचा उपयोग दवाखान्यातील टाकाऊ सिरींज, औषधांच्या बाटल्या, सलाईनच्या बाटल्या टाकण्यासाठी होतो.[६४]

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यावरील पुरातन शिवाई देवी मंदिराला सध्या गळती लागली आहे. मंदिराच्या छपरातून पाणी झिरपत आहे. मंदिराच्या विश्वस्तांनी मध्यंतरी छपराचे वॉटर प्रुफिंग करुन घेतले. त्यामुळे पाणी झिरपण्याचे प्रमाण ९०% कमी झाले आहे. शिवाजी महाराजांचा इतिहास सांगणारा फलकही नाही.[६५] किल्ल्यावरील हत्तीदरवाजा लगत असलेल्या भिंतीचे घडीव दगड खचले असून ते सुटत चालले आहेत. त्याला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे तेथे राडारोडा तसाच पडला आहे. अजूनही कोणतीही डागडुजी किंवा उपाययोजना केलेली दिसून येत नाही.[६६]

अजिंक्यतारा किल्ला रस्त्यावरील बागेपासून ते मंगळाई देवी मंदिरापर्यंतच्या परिसरात अज्ञातांनी आग लावल्याने आगीत डोंगरावरील वनसंपदा जळून खाक झाली.[६७] डोंगरावर अनेक नागरिक सकाळी व संध्याकाळी फिरायला येतात. या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली आहे. त्या झाडांना वणव्याचा फटका बसला आहे.[६८] किल्ल्यावर दोन तलावांची डागडुजी करण्यात आली असून दोन्ही तलावात मोठा पाणीसाठा आहे. या तलावात काही समाजकंटक दिवसा जाळीच्या व ट्यूबच्या सहाय्याने पाण्यात उतरुन मासेमारी करत आहेत व तलाव परिसरातच पार्ट्या करताना दिसतात. वनविभागाने या घटनांची दखल अजून घेतलेली नाही.[६९] किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यांच्या शौर्याचे प्रतीक असलेल्या चाकणच्या भुईकोट किल्ल्याची सुमारे एक कोटी रुपये खर्च करुन नव्याने बांधण्यात आलेली भिंत संततधार पावसाने ढासळली.[७०]

महाराष्ट्रात सरकारी अधिकारी, आमदार, खासदार, मंत्री यांच्यात सतत बदल होत असल्याने किल्ले संवर्धनाबाबत निश्चित व ठोस भूमिका राहात नाही. त्यात सातत्य आणि पाठपुरावा राहात नाही. परिणामी किल्ले संवर्धन संकल्पना

अधांतरी राहते. खासदारांनी केंद्रीय पातळीवरील मंत्री, सचिव, भारतीय पुरातत्त्व विभाग, पर्यटन व सांस्कृतिक मंत्रालय यांच्याशी ठोस नियोजन व उद्दिष्टांसह पाठपुरावा करणे अत्यंत गरजेचे आहे. राजस्थान राज्याचे किल्ल्यांबाबतचे पर्यटन धोरण तयार आहे. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी झाल्याने तेथील किल्ले सुस्थितीत दिसतात व त्या ठिकाणी पर्यटन वृध्दी झाल्याचे दिसून येते. किल्ल्यांची दुरुस्ती करताना मूळ बांधकामास त्याच्या जुन्या ढाच्याप्रमाणेच नूतनीकरण केले जाणे आवश्यक आहे. परंतु असे होताना दिसत नाही. बांधकामात सिमेंटचा वापर बेसुमार करुन बेंगरुळ पध्दतीने बांधकाम झालेले दिसते. सिमेंटचा वापर करुन झालेले बांधकाम सुमार दर्जाचे, कमी आयुष्याचे व ठिसूळ होते.

किल्ल्यांच्या पायथ्याशी व परिसरात हॉटेल्स, रेस्टॉरंट्स उभे करण्यास परवानगी दिली जाऊ नये. कारण त्यामुळेच किल्ल्यांचे ऐतिहासिक मूल्य कमी होते. किल्ल्यांवर धुडगूस, दंगा घातला जाण्याची शक्यता निर्माण होते. किल्ल्यांवर प्लॅस्टिक पिशव्या, बाटल्या नेण्यास पूर्ण बंदी घातली जाणे अतिशय गरजेचे आहे.[७१]

सध्या शासनाची आर्थिक स्थिती खूपच नाजूक असल्याने किल्ले संवर्धनासाठी निधीची कमतरता आहे. शासनाचा इतर विभागावर मोठा खर्च होत असल्याने किल्ल्यांच्या संवर्धनासाठी फारच थोडा निधी उपलब्ध होतो. किल्ले संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक बनले आहे. शास्त्रीय पध्दतीने आधुनिक तंत्रे वापरुन आपण किल्ले संवर्धन करु शकतो. त्यामध्ये जीपीएस (GPS) जीआयएस (GIS) टोटल सर्व्हे (Total Survey) मॅपिंग (Mapping) कंटूर मॅपिंग (Contour Mapping) यांचा समावेश आहे. अशा तंत्रांचा वापर करुन ब्ल्यू प्रिंट फिक्सेशन करता येते. प्रत्येक किल्ल्याचा नकाशा निर्माण करणे शक्य होते.[७२] अशा प्रकारे आपणांस महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ल्यांची आत्यंतिक दुरावस्था झाल्याचे दिसून येते.

**किल्ल्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत नैसर्गिक घटक**

किल्ल्यांची पडझड होण्यास सर्वात मोठे कारण म्हणजे पाऊस होय. संततधार पडणाऱ्या पावसामुळे पाणी किल्ल्यावरील तटबंदीमध्ये, बुरुजांमध्ये इमारतीच्या भिंतीमध्ये मुरत जाते. सतत पाणी मुरल्यामुळे इमारतीचे बांधकाम ठिसूळ होत जाते. इमारतींवर वनस्पतींचे साम्राज्य निर्माण होण्यास पाऊस कारणीभूत आहे. सतत ओल्या झालेल्या इमारतींचे बांधकाम ठिसूळ होऊन हळूहळू ढासळण्यास सुरुवात होते. तटबंदी, बुरुज, वाडे, इमारती, दरवाजे, मंदिरे यांची वाताहात होण्यास पाऊस हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. सह्याद्रीच्या पर्वतरागांमध्ये मुसळधार पडणारा पाऊस हे या ठिकाणचे किल्ले उध्वस्त होण्याचे मुख्य कारण आहे. अतिवृष्टीमुळे सिंहगडावर जाणाऱ्या रस्त्यावर दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच चाकणच्या किल्ल्याची नव्याने दुरुस्त केलेली भिंत संततधार पावसाने कोसळल्याची घटना घडली आहे.

सर्वसाधारणपणे बहुतांशी किल्ल्यांच्या तटबंदीवर, बुरुजांवर, इमारतींच्या भिंतीवर, अवशेषांवर, वनस्पती, झाडे, झुडपे, गवत उगवलेले दिसते. वड, पिंपळ व इतर अनेक डेरेदार होणाऱ्या वृक्षांची उगवण जर अशा ठिकाणी झाली तर त्या ठिकाणच्या बांधकामास तडा जाण्यास सुरुवात होते. बुरुजांच्या तटबंदींच्या, भिंतींच्या भेगांमध्ये या वृक्षांची मुळे आपला विस्तार करु लागल्याने बांधकाम ढासळण्यास सुरुवात होते. वरुन पडणाऱ्या पावसाचा त्याला फायदाच होतो. असे वृक्ष किल्ल्यांच्या बांधकामावर आपले साम्राज्य वाढवत गेल्यावर लवकरच त्या बांधकामाची पडझड सुरु होते. वेळीच जर अशा वृक्षांची साफसफाई केली नाही तर संपूर्ण बांधकामास त्याचा विळखा पडतो. इमारत बेंगरुळ दिसू लागते.

समुद्रकिनारी असणाऱ्या जलदुर्गांना दमट व उष्ण हवामान आणि समुद्राचे खारे वारे यांचा सामना करावा लागतो. अशा वाऱ्यांमुळे किल्ल्याच्या तटबंदीचे दगड झिजण्यास सुरु होते. समुद्राच्या अजस्त्र लाटा किल्ल्याच्या तटबंदीला येऊन आदळत असतात. त्याचा विपरित परिणाम तटबंदीच्या बांधकामावर होतो. भिंतीच्या दोन दगडांमध्ये असणाऱ्या चुन्याशी खारट पाण्याचा संपर्क येऊन हा

चुना निघून जाण्यास सुरुवात होते. परिणामी तटबंदी कमकुवत होण्यास सुरुवात होते. कालांतराने हळूहळू तटबंदी ढासळण्यास सुरुवात होते.

किल्ल्यांच्या सभोवताली असणाऱ्या जंगल परिसरात मोठ्या संख्येने पक्षी वास्तव्य करीत असतात. अशा पक्ष्यांच्या विष्ठेव्दारे विविध वनस्पतींच्या बियांचा प्रसार किल्ल्याची तटबंदी, बुरुज, इमारतींचे बांधकाम यावर होतो. तेथे बिया रुजल्या की त्यांची नैसर्गिक वाढ सुरु होते. असे वृक्ष इमारतीच्या बांधकामास धोका पोचवतात. किल्ल्यावर असणारे तलाव, टाक्या, तळी, अतिवृष्टीमुळे बुजली गेल्याचे दिसून येते. पावसाच्या पाण्याबरोबर मोठ्या प्रमाणात गाळ पाण्याच्या टाक्यांत जाऊन साचत राहतो. काही वर्षांनी ही पाण्याची टाकी पूर्णपणे गाळाने भरुन जातात. परिणामी तेथील पाणी साठवण क्षमता संपुष्टात येते.

अशा प्रकारे आपणांस किल्ल्याच्या दुरावस्थेस कारणीभूत असणाऱ्या विविध नैसर्गिक घटकांची सविस्तर चर्चा करता येते. कोणत्याही किल्ल्यावरील कोणतेही बांधकाम असले तरी त्या ठिकाणी नैसर्गिक आपत्तीचा उपद्रव हा होतच असतो. अनेक नैसर्गिक घटकांव्दारे किल्ल्याची पडझड होत असते. परंतु आपण वेळोवेळी लक्ष देऊन अशा नैसर्गिक घटकांवर नियंत्रण ठेवले तर निश्चितच त्या किल्ल्यांचे सौंदर्य अबाधित राखले जाते. किल्ल्यांची नियमितपणे स्वच्छता, साफसफाई, झाडेझुडपे, गवत यांचे निर्मूलन केले तरच हे किल्ले सुरक्षित राहणार आहेत. अन्यथा त्यांचे अस्तित्व धोक्यात येणार आहे.

**किल्ल्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत मानवनिर्मित घटक**

आजघडीला महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ले अतिशय दुर्लक्षित, भग्नावस्थेत उभे असल्याचे चित्र दिसून येते. आपल्या इतिहासाचा समृध्द वारसा असणाऱ्या गडकिल्ल्यांना खरी अवकळा आणली आहे ती येथे येणाऱ्या पर्यटकांनी. किल्ल्यांच्या दुरावस्थेस नैसर्गिक घटकापेक्षा मानवनिर्मित घटक अधिक कारणीभूत आहेत. किल्ल्यांचा कसलाही ऐतिहासिक वारसा माहित नसलेल्या बेफिकिर वृत्तीच्या पर्यटकांनी किल्ल्यांना प्रचंड विद्रूप करुन ठेवले आहे. अगोदरच नैसर्गिक आपत्तींना तोंड देणाऱ्या किल्ल्यांसमोर मानवी आपत्तींचे संकट

उभे ठाकले आहे. किल्ल्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत असणाऱ्या विविध मानवनिर्मित घटकांची चर्चा खालीलप्रमाणे करता येते.

१) **बांधकामास हानी पोहोचवणे :** किल्ल्यांवर येणाऱ्या तरुणांकडून किल्ल्यांना मोठ्या प्रमाणावर हानी पोचवली जाते. अतिउत्साही, अतिआत्मविश्वास असणाऱ्या तरुणांव्दारे किल्ल्याच्या इमारतीच्या भिंती, बुरुजांचे अवशेष, भग्न झालेल्या इमारतींचे अवशेष, किल्ल्यावरील छोटी छोटी मंदिरे यांना खूप मोठ्या प्रमाणात धक्का पोचवला जातो. तटबंदीची, इमारतीच्या भिंतीची दगडे खाली दरीत ढकलून देणे, बांधकामाच्या विटा मुद्दाम उचकटणे, किल्ल्यांवरील वास्तूंची तोडफोड करणे, किल्ल्याच्या तटबंदीच्या दगडांचा वापर स्वत:ची घरे बांधण्यासाठी करणे, बांधकामाच्या विटा, दगड, माती चोरुन नेणे, त्याचा वापर करणे किंवा विकणे, अशा विध्वंसक कृत्यांमुळे किल्ल्यांना वाईट दिवस आले आहेत. किल्ल्याच्या परिसरात स्थानिक लोक अतिक्रमण करुन तेथे नवीन बांधकाम करतात. बऱ्याचदा प्रशासनाची याकडे डोळेझाक होते. किल्ल्याच्या परिसरात बऱ्याचदा स्थानिक ग्रामपंचायतीकडूनच बांधकाम केले जाते. भिवंडी तालुक्यातील कांबे किल्ल्यावर तर ग्रामपंचायतीने सार्वजनिक स्वच्छतागृह बांधले आहे. अशा अनेक कारणांमुळे किल्ल्याची पडझडअधिकच होत असल्याचे दिसून येते.

२) **किल्ल्याच्या भिंतींवर मजकूर लिहिणे :** किल्ल्यांवर फिरायला आलेले काही हौशी पर्यटक किल्ल्यांच्या तटबंदीवर, इमारतीच्या भिंतींवर, मंदिराच्या भिंतींवर, बुरुजांवर आपली नावे लिहून आपल्या पाऊलखुणा मागे ठेवून जातात. बऱ्याचदा असे कृत्य प्रेमी युगुलांकडून केले जाते. आपण करत असलेल्या प्रेमाचे अशा ऐतिहासिक किल्ल्यांवर दर्शन करुन देण्यात त्यांना धन्यता वाटत असावी. किल्ल्याच्या तटांवर, भिंतीवर, इमारतींवर आपली नावे खडू, विटांनी, चुन्याने लिहिणे, चित्रविचित्र आकारांची चित्रे, आकृत्या काढणे यामुळे किल्ल्यांना विद्रूप स्वरुप प्राप्त

झालेले दिसून येते. खरे तर तरुण पिढीकडून आपल्या ऐतिहासिक वारशाचे अत्यंत जिद्दीने आणि स्वयंस्फूर्तीने संरक्षण व जतन होणे अपेक्षित आहे. परंतु ही तरुणाई त्या दृष्टिकोनातून किल्ल्याकडे पाहातच नाही. किल्ले हे त्यांच्या पिकनिकचे, सहलीचे, मौजमजा करण्याचे, हुल्लडबाजी, दंगामस्ती करण्याचे, पार्ट्या करण्याचे ठिकाण बनले असून ही अतिशय चिंतेची बाब आहे असे खेदाने म्हणावे लागते.

३) **कचरा निर्मिती करणे :** अगोदरच दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलेले किल्ले आजच्या आधुनिक काळातल्या पर्यटकांकडून प्लॅस्टिक कचरा कुंडी बनल्याचे चित्र दिसून येते. पर्यटक गडावर येताना पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांच्या पिशव्या सोबत आणतात. खरेतर हे घेऊन येण्यास काहीच हरकत नाही. परंतु याच पर्यटकांकडून त्यांनी आणलेल्या प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग्ज, प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, शीतपेयांच्या बाटल्या, थर्माकोलचे किंवा प्लॅस्टिकचे प्लेटस्, प्लॅस्टिकचे ग्लासेस, खाद्यपदार्थांची प्लॅस्टिकची वेष्टणे सर्रास किल्ल्याच्या आवारात बिनधास्तपणे फेकून दिली जातात. पर्यटकांना साधे नागरी भान (सिव्हिक सेन्स) माहित नसावेत की ही ऐतिहासिक स्थळे आपल्या कृत्यांमुळे विद्रुप होत आहेत. परंतु हा दृष्टिकोन त्यांच्यात मुळातच नसल्याने किल्ल्याचा परिसर प्लॅस्टिकमय झालेला दिसतो. बरेच पर्यटक गुटख्याची रिकामी पाकिटेही फेकून देतात. किल्ल्याच्या इमारतीवर, भिंतीवर सर्रास थुंकल्याचे, पिचकारी मारल्याचे पुरावे दिसून येतात. ही अत्यंत गलिच्छ मनोवृत्ती आहे. आपण निर्माण केलेला कचरा कुंड्यांमध्ये टाकावा हा विचारदेखील त्यांना शिवत नाही. त्यामुळे प्रत्येक किल्ल्यावर प्लॅस्टिक कचऱ्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे.

४) **किल्ल्यांचा पार्ट्या करण्यासाठी वापर करणे :** सह्याद्रीतील बहुतांशी किल्ले आज पिकनिक स्पॉट, विकेन्ड पार्टीची, दारुची पार्टी करण्याची ठिकाणे बनत चालली आहेत. अनेक किल्ल्यांवर मांसाहार व दारुच्या पार्ट्या होत

असलेल्या बातम्या प्रसिद्ध होत असतात. मद्याची पार्टी करुन हे पर्यटक मद्याच्या रिकाम्या बाटल्या, शीतपेयांच्या बाटल्या, झाडाझुडपांत, किल्ल्याच्या बुरुजांवर, प्रवेशव्दाराच्या समोर, अगदी तलावांत, तळ्यांत फेकून निघून जातात. किल्ल्यांवर चिकन पार्टी केल्यावर पिसांचा कचरा टाकलेला दिसून येतो. लोकवस्तीजवळचे किल्ले तर दारुड्यांचे, नशाबाजी करणाऱ्यांचे हक्काचे अड्डे बनले आहेत. कुठल्याच किल्ल्यांवर सुरक्षारक्षक नसल्याने बिनदिक्कतपणे, निर्लज्जपणे दारुच्या पार्ट्या करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. दारुसेवन करुन मोठमोठ्याने गाणी लावून नाचगाणे करणे हे आजच्या तरुण पिढीला भूषणावह वाटत आहे. ही अत्यंत दुर्दैवी आणि शरमेची बाब आहे.

५) **किल्ल्यांविषयी अनास्था :** आजच्या पिढीतील पर्यटकांना आपल्या वैभवशाली, स्फूर्तीदायी, ऐतिहासिक किल्ल्यांविषयी आस्था नसल्याचेच दिसून येते. किल्ले म्हणजे सहल, पिकनिक, ट्रीप, मौजमजा, दंगामस्ती करण्याची ठिकाणे असे समजून किल्ल्यांना भेटी दिल्या जातात. किल्ल्यांविषयी आस्था नसल्याने किल्ल्यांवर कसे वागावे, कसे वागू नये याची जाणीवच पर्यटकांना नसते. ही अनास्थाच किल्ल्यांच्या दुर्दशेला कारणीभूत आहे. आपल्या इतिहासाविषयी आपणच किती अनभिज्ञ आहोत हे पर्यटकांच्या वर्तणूकीतून दिसते. किल्ल्यांची व त्याठिकाणच्या ऐतिहासिक वास्तूंची हेळसांड होण्यामागचे हे महत्त्वाचे कारण आहे.

६) **इतिहासाचा विसर :** महाराष्ट्राच्या दैदिप्यमान, प्रेरणादायी, स्फूर्तीदायी इतिहासाचा विसर पडल्यानेच किल्ल्यांना आज दुरावस्था प्राप्त झाली आहे. मध्ययुगीन काळातील इतिहासाचे साक्षीदार म्हणून दुर्गांना संबोधले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच किल्ल्यांच्या आधारे हिंदवी स्वराज्य उभे केले. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असे शिवाजी महाराजांनी तयार करुन घेतलेल्या राज्यव्यवहारकोशात म्हटले आहे. त्यामुळे किल्ले हे स्वराज्याचा आधार होते. प्रत्येक किल्ल्यावर रोमांचकारी इतिहास घडला आहे. अशा

आपल्या समृध्द इतिहासाचा विसर पडल्यानेच किल्ल्यांची दुर्दशा झाली आहे.

७) **शासनाची उदासीनता :** महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाचा साक्षीदार असणाऱ्या किल्ल्यांकडे शासनाचा पाहण्याचा दृष्टिकोन उदासीन असल्याचे जाणवते. किल्ले संवर्धनाबाबत केवळ घोषणा केल्या जातात. प्रत्यक्षात मात्र कार्यवाही वेळेत केली नसल्याचे दिसून येते. काही किल्ले अजून खाजगी लोकांच्या ताब्यात आहेत. बऱ्याच किल्ल्यांवर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. अनेक किल्ल्यांच्या परिसरात हॉटेल्स उभी राहिली आहेत. कित्येक किल्ल्यांना शासनाच्या दरबारी कागदपत्रांमध्ये स्थानच नसल्याचे दिसून येते. काही मोजके किल्ले सोडले तर बहुतांशी किल्ल्यांना प्रचंड अवकळा आली आहे. ही परिस्थिती शासनाच्या उदासीन धोरणांमुळे निर्माण झाली आहे. शासनाच्या विविध खात्यांमध्ये समन्वय नसल्याने किल्ल्यांची फरफट झालेली दिसते. शासनाकडून किल्ले संवर्धनासाठी अत्यंत तुटपुंजी आर्थिक तरतूद केली जाते. त्याचे काम वेळेवर सुरु होत नाही. दुरुस्तीचे काम सिमेंट, वाळूचा वापर करुन केल्याने बांधकाम बेंगरुळ दिसते. याकडे शासनाच्या अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याचे दिसते.

८) **गैरप्रकारांची स्थाने :** किल्ला परिसर स्थानिक जनतेकडून बिनदिक्कपणे गैरप्रकार करण्यासाठी वापरला जातो. अनेक किल्ल्यांवर प्रेमी युगुले बिनधास्तपणे वावरतात. त्यांच्याकडून किल्ल्यांवर प्रणयचेष्टा झालेल्या पाहावयास मिळतात. किल्ल्याच्या आवारात पत्ते खेळणे, मद्यपान करणे, सिगारेट, बिडी ओढणे, नशाबाजी करणे, शौचाला जाणे यासारख्या निंदनीय गोष्टी घडताना दिसतात. त्यामुळे किल्ल्यांचेऐतिहासिक मूल्य व पावित्र्य संपुष्टात आलेले दिसते. अशा गैरप्रकारांमुळे व बिनधास्तपणामुळे आपल्या राज्याची, किल्ल्याची व पर्यायाने आपलीच अप्रतिष्ठा होते.

९) **मानवनिर्मित वणवे :** डोंगरी किल्ल्यांच्या परिसरात विपुल वनसंपदा असल्याचे आढळते. कित्येक वर्षांची समृध्द वनसंपदा अज्ञात

व्यक्तींच्याव्दारे वणवे लावल्याने जळून खाक होते. डोंगरावरील गवतास आगी लागण्याचे प्रकार वारंवार घडताना दिसतात. अशा वणव्यामुळे किल्ला परिसरातील वृक्षसंपदा नष्ट होते. सरपटणारे प्राणी, पक्ष्यांची घरटी आगीच्या भक्ष्यस्थानी पडतात. किल्ल्याच्या आवारात आग शिरल्यास तेथील इमारती, मंदिरे यांनाही त्याचा फटका बसतो.

१०) **सूचनांकडे दुर्लक्ष व बेफिकिरीपणा :** किल्ल्यांवर मौजमजा करण्यासाठी जाणारे पर्यटक सुरक्षेकडे अक्षम्य दुर्लक्ष करताना दिसतात. किल्ल्यांवरील उंच कड्यावर कोणतीही सावधगिरी न बाळगता जातात. यामुळे दरीत पडून, अपघाती मृत्यूच्या घटना घडत आहेत. हे अतिउत्साही पर्यटक किल्ल्यांवरील सूचनांकडे सरळसरळ दुर्लक्ष करतात व अत्यंत बेफिकिरीने विविध धोकादायक पॉईंटसवर जाऊन सेल्फी काढतात. यामध्ये काही जणांचा मृत्यूही झाला आहे. सिंहगडावर तानाजी मालुसरे कडा येथे धोकादायक ठिकाणी सेल्फी काढताना निरनिराळ्या पोज देण्याच्या नादात सुरक्षा कठडा ओलांडून बाहेर गेलेल्या एका गरोदर महिलेचा शेवाळावरुन पाय घसरला आणि ती खाली पडली. तातडीने पर्यटकांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने तिला शोधून उचलून वर आणले.[७३] अलिबाग, रत्नागिरी, गोवा येथे समुद्रात पर्यटक बुडण्याच्या घटना नित्याच्या झाल्या आहेत. समुद्रकिनारी प्रशासनाकडून धोक्याच्या सूचना लावलेल्या असतात. मात्र उत्साहाच्या भरात पर्यटक सर्व सूचनांकडे दुर्लक्ष करतात.

अशा प्रकारे आपणांस किल्ल्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत मानवनिर्मित घटकांचा आढावा घेता येतो. किल्ल्यांना आपल्या इतिहासात मानाचे स्थान आहे याचे भान ठेवून पर्यटकांनी किल्ल्यांवर गेल्यास किल्ले स्वच्छ, सुरक्षित राहणार आहेत. आजच्या पिढीची किल्ले संवर्धनात महत्त्वाची भूमिका असणार आहे. यापिढीने जर आत्मीयतेने किल्ले संवर्धन केले तरच भावी पिढ्यांना आपला समृध्द वारसा दाखवणे शक्य होणार आहे, अन्यथा हा वारसा काळाच्या पडद्याआड जाईल यात शंका नाही.

## किल्ले संवर्धन - संकल्पना

महाराष्ट्राला प्राचीन काळापासून वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण किल्ल्यांचा समृध्द वारसा लाभला आहे. महाराष्ट्रातील किल्ल्यांची संख्या आणि विविधता इतर कोणत्याही राज्यात आढळून येत नाही. या किल्ल्यांमुळेच महाराष्ट्राला एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. इतिहासातील अनेक घटनांचे साक्षीदार असणाऱ्या या किल्ल्यांची निर्मिती प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत भौगोलिक, राजकीय व लष्करी गरजेनुसार झाली. लष्करी सामर्थ्याचे एक मानाचे प्रतिक म्हणून किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व मध्ययुगात प्राप्त झाले होते. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या किल्ल्यांच्या आधारेच छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची उभारणी केली. मध्ययुगीन किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. प्रत्येक किल्ल्याचे स्वतंत्र भौगोलिक महत्त्व आहे. प्रत्येक किल्ल्याला वेगळा इतिहास आहे. मात्र आज या देदिप्यमान अशा इतिहासाचा अनेकांना विसर पडत चालला असल्याचे दिसून येते. मध्ययुगीन काळातील राजकीय, लष्करी वर्चस्व ठेवण्यामध्ये कळीची भूमिका बजावणाऱ्या गड किल्ल्यांचे महत्त्व आज केवळ इतिहासाच्या पुस्तकांमधूनच अनुभवता येत आहे. प्रत्यक्षात मात्र बहुतांशी गडकिल्ल्यांच्या नशिबी अवहेलनाच आलेली दिसून येते. आज अवकाशातून टेहळणी करणारे उपग्रह, अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, भयंकर विध्वंसक असे अणुबॉम्ब, अत्यंत प्रगत अशी लष्करी यंत्रणा यांच्यासमोर किल्ल्यांचे महत्त्व संपुष्टात आले आहे. त्यामुळे आजघडीला या किल्ल्यांचे राजकीय, लष्करी, दृष्टिकोनातून अजिबात महत्त्व उरले नाही. परिणामी हे गड किल्ले दिवसेंदिवस जीर्ण होत आहेत. त्यांची पडझड होत आहे. अनेक किल्ले अतिशय वेगाने ढासळत आहेत. किल्ल्यांवरील विविध इमारती, वास्तू यांची दिवसेंदिवस वाताहात होत असताना दिसते. विविध नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमुळे किल्ल्यांच्या अस्तित्वाला म्हणजेच आपल्या वैभवशाली इतिहासालाच धोका निर्माण झाला आहे असे म्हणावे लागते.

आपल्या समृध्द ऐतिहासिक वारशाचे जतन करणे, संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. महाराष्ट्रातील दुर्गसंपदा हा एक ऐतिहासिक अमूल्य ठेवा आहे. या ठेव्याचे जतन, संवर्धन करुन भावी पिढ्यांना हा अमूल्य वारसा सूपूर्द करणे आपले आद्य कर्तव्य बनले आहे. या समृध्द वारशाच्या संवर्धनामुळे किल्ल्याचे प्रवेशव्दार, तटबंदी, बुरुज, संरक्षक भिंती, विविध आकाराच्या तोफा, तोफा ठेवण्याच्या जागा, शत्रूला कोंडीत पकडण्यासाठी केलेली व्यूहरचना, दारुगोळा कोठारे, शस्त्रांची कोठारे, धान्यांची कोठारे, पाणी पुरवठ्याच्या सोयी सुविधा, कातळात सपाट पृष्ठभागावर खोदण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या, नगारखाना, कडेलोट बुरुज, सदर, न्यायदरबार, देवी देवतांची मंदिरे, देवळे, देवळांची रचना, किल्ल्यांवरील निवासस्थाने, तुळशीवृंदावने, बाजारपेठा, किल्ल्यांवरील शौचकुपे, गुहा, लेणी, मशिदी, वैशिष्ट्यपूर्ण माची, तळी, तलाव अशा कित्येक ठिकाणांची इत्थंभूत माहिती आपणास पुढील पिढ्यांना दाखवणे शक्य होणार आहे. या सर्व वास्तू व त्यांच्या वैशिष्ट्यांवरुन तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थिती कशी होती याचा अंदाज लावता येतो. म्हणूनच ही आगळीवेगळी दुर्गसंपदा एक अनमोल ठेवा असून तो जतन करण्याची वेळ आली आहे असे म्हणावे लागते.

किल्ल्यांचे जतन, संवर्धन करण्याची जबाबदारी शासनाच्या पुरातत्त्व खात्याकडे आहे. त्यामध्ये केंद्रीय पुरातत्त्व विभाग आणि राज्य पुरातत्त्व विभाग असे दोन स्वतंत्र विभाग आहेत. या दोन्ही विभागांव्दारे काही निवडक किल्ल्यांच्या संवर्धनाचे कार्य सुरु आहे. महाराष्ट्रात जवळपास ३५० पेक्षा अधिक किल्ले असून या सर्वच किल्ल्यांचे जतन, संवर्धन पुरातत्त्व विभागाकडून होणे केवळ अशक्य आहे. काही किल्ले वनविभागाच्या ताब्यात आहेत. काही किल्ले संरक्षित स्मारके म्हणून घोषित झालेले आहेत. काही किल्ले जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारीत येतात. अनेक किल्ले अजूनही खाजगी मालकीचे असलेले आढळून येतात. तर कित्येक किल्ले अत्यंत दुर्लक्षित, उपेक्षित अवस्थेत नामशेष होण्याच्या मार्गावर असलेले दिसून येतात.

गेल्या दहा वर्षांमध्ये आपल्या वैभवशाली इतिहासाचा साक्षीदार असणाऱ्या गडकिल्ल्यांची सद्यस्थिती आणि त्यांच्या संवर्धनाची आवश्यकता यावर फार मोठ्या प्रमाणावर जागरुकता निर्माण झालेली दिसून येते. पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत न येणाऱ्या दुर्लक्षित किल्ल्यांबाबतीत राज्याच्या अनेक जिल्ह्यातील विविध स्वयंसेवी संस्थांनी अतिशय उत्साहाने, आत्मीयतेने, तळमळीने कार्य सुरु केल्याचे दिसून येते. अशा किल्ल्यांवर दुर्गप्रेमी संस्था व व्यक्तींकडून स्वखर्चाने संवर्धनाचे कार्य सुरु आहे.

किल्ले संवर्धन ही संकल्पना पूर्ण वेगळी आहे. तो एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने विशिष्ट नियम व अटी तयार केल्या आहेत. या नियमांच्या आधारे शास्त्रीय पध्दतीने संवर्धन होणे आवश्यक आहे. कोणत्याही ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करण्यासाठी शास्त्रशुध्द पध्दतींचाच आधार घेणे आवश्यक ठरते. उत्साहाच्या, भावनेच्या भरात सांगण्यात आलेल्या गोष्टींवरुन गड संवर्धन केले तर त्या ठिकाणी संवर्धनाऐवजी नुकसान होण्याची शक्यता निर्माण होते.

आज महाराष्ट्रातील अनेक संस्था, दुर्गसंवर्धन क्षेत्रात आपले योगदान देताना दिसत आहेत. कित्येक लाख रुपयांचा आर्थिक भार स्वत: सोसून ते संवर्धनासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. गडावर सर्वत्र पडलेला प्लॅस्टिकचा कचरा, प्लॅस्टिकच्या बाटल्या, दारुच्या बाटल्या, शीतपेयांच्या बाटल्या, खाद्यपदार्थांची वेष्टणे, थर्माकोलचे प्लेटस्, काचेचे प्लॅस्टिकचे ग्लासेस, पाण्याचे खराब झालेले प्लॅस्टिकचे कॅन्स, मावा, गुटखा व पानमसाला यांच्या रिकाम्या पुड्या असा कचरा गोळा करणे, किल्ल्यांवरील जलाशय, तलाव, तळी, पाण्याची टाकी यामधील गाळ काढून साफसफाई करणे, तटबंदी, बुरुज व इमारतींच्या भिंतीवरील वाढलेली झाडे झुडपे काढून श्रमदानातून स्वच्छता करणे, किल्ल्यावरील मंदिरांची स्वच्छता व देवपूजेची सोय करणे, किल्ल्यांवरील प्रदेशात व डोंगरउतारावर वृक्षारोपण करणे, किल्ल्यांवरील समाध्या, वृंदावने यांची स्वच्छता करुन डागडुजी करणे, किल्ल्यांवरील महत्त्वाच्या वास्तूवर, पसिरात

निर्माण झालेले गवताचे साम्राज्य स्वच्छ करणे, तटबंदीच्या व बुरुजांच्या पडलेल्या भिंती पुन्हा उभ्या करणे, दरवाजे, सदर वाडे पुन्हा बांधून काढणे, किल्ल्यांवर महत्त्वाच्या स्थळांच्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावणे, गडाचा इतिहास सांगणारा फलक लावणे, किल्ल्यावर जाणाऱ्या पायवाटेची स्वच्छता करणे, पायऱ्यांचा मार्ग स्वच्छ करणे, किल्ल्यांवरील गुंफा, शिलालेख यांची स्वच्छता करणे, किल्ल्यांवर पावसाळ्यात फळबियांची टोकण करुन वृक्षसंपदा वाढवणे, गडावर ठिकठिकाणी कचरा कुंड्या ठेवणे, पर्यटकांसाठी किल्ला परिसर स्वच्छ राहण्यासाठी सूचना फलक लावणे, गडावर असणाऱ्या मंदिराच्या परिसरात वर्षातून एकदा यात्रा भरवणे, किल्ल्यांवर शोभेची फुलझाडे लावून बगीचा विकसित करणे अशा कित्येक उपक्रमांव्दारे महाराष्ट्रातील विविध मंडळे, सेवाभावी संस्था, दुर्गसंवर्धक मंडळे संवर्धनाचे कार्य मोठ्या हिरीरीने करीत असल्याचे दिसून येते. या सर्व संस्थांव्दारे लोकवर्गणीव्दारे किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम केले जात आहे. खरेतर ही अतिशय स्वागतार्ह आणि कौतुकाचीच गोष्ट आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या किल्ल्यांच्या संवर्धनामध्ये तरुणाईचा सक्रिय सहभाग घेऊन त्यांना आपल्या ऐतिहासिक वारशाच्या रक्षणासाठी जागरुक करणे, त्यांच्याकडून किल्ले संवर्धनाचे कार्य करुन घेणे ही निश्चितच विधायक स्वरुपाची आणि तरुण पिढीला आपल्या इतिहासाशी एकरुप करणारी स्तुत्य बाब आहे.

इतिहास आणि गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन हे स्वतंत्र अभ्यासाचे विषय आहेत. भारतातील अनेक विद्यापीठांमध्ये जतन, संवर्धन हा वेगळा विषय म्हणून शिकविला जातो. त्यामुळे कोणा एका व्यक्तीला अभिप्रेत असलेले विशिष्ट प्रकारचे संवर्धन कोठेही केले जात नाही. वेगवेगळ्या संस्थांचे कार्यकर्ते इतिहास व्याख्यात्यांची भाषणे ऐकून स्वत:ला हवे तसे संवर्धन  करण्याचा प्रयत्न करतात. कोणत्याही ऐतिहासिक वास्तूचे किंवा स्मारकाचे संवर्धन करण्यासाठी पुरातत्त्व खात्यामार्फत विशिष्ट नियम तयार करण्यात आले आहेत. त्या नियमानुसार संवर्धन केल्यास त्या ऐतिहासिक वास्तूला उर्जितावस्था प्राप्त होते. भारतातील बहुतांशी राज्यांत राज्यपुरातत्त्व विभागांमध्ये या नियमांनुसार संवर्धनाचे कार्य

केले जाते. परंतु आपल्याकडे अतिउत्साही आणि भावनेच्या आहारी गेलेल्या तरुणांकडून स्वत:ला हवे तसे संवर्धन केले जाते. त्यामुळे गडाचे संवर्धन होण्याऐवजी नुकसानच जास्त होते.[७४]

सध्या दुर्गसंवर्धन हा एक अत्यंत ज्वलंत व महत्त्वाचा विषय झाला आहे. महाराष्ट्रात एवढे किल्ले आहेत आणि त्यांचे संवर्धन पुरातत्त्व विभागाकडून होत नाही याबद्दल गड किल्ल्यांवर काम करणाऱ्या अनेक संस्था आक्रोश करीत आहेत. विरोधी पक्षाकडून देखील या विषयावर रान उठवले जात आहे. पण या सर्व गडकिल्ल्यांचे संवर्धन कशा पद्धतीने करावे, त्याची मूलभूत पध्दती काय आहे, संवर्धनासाठी कोणकोणत्या तांत्रिक बाबींचा अगोदर आढावा घ्यायला हवा याबाबत खूपच अनभिज्ञता दिसून येते. खरेतर कोणत्याही गडावर कसलेही संवर्धनाचे कार्य करण्यासाठी राज्य पुरातत्त्व विभागाची किंवा केंद्रीय पुरातत्त्व विभागाची रीतसर परवानगी घ्यावी लागते. याउलट संवर्धन करणारे काही हौशी गडप्रेमी स्वत:ला वाटेल त्या पध्दतीने संवर्धन करु लागले आहेत. कोणत्याही किल्ल्याचे संवर्धन करण्यापूर्वी तो किल्ला समजून घ्यावा लागतो. तेथील विविध वास्तू, त्यांची मूळ रचना, त्याचा नकाशा, रेखाटन या अत्यंत महत्त्वाच्या घटकांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेमापोटी भावनेच्या आहारी जाऊन संवर्धनाचे काम करणे अयोग्य आहे. शास्त्रशुध्द संवर्धन करायचे असेल असेल तर किल्ल्याचा स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास केला पाहिजे.

दुर्गसंवर्धन करणाऱ्या अनेक संस्था आज पुणे, मुंबई, कोल्हापूर, ठाणे, रायगड या ठिकाणी कार्यरत आहेत. त्या संस्थांचे कार्यकर्ते विविध किल्ल्यांवर जाऊन तेथे पडलेला कचरा गोळा करुन खाली घेऊन येतात. काही मोजक्या संस्था गडावरील मोडकळीस आलेल्या मंदिराचे बांधकाम स्वखर्चाने करतात. परंतु हे सर्व करत असताना नकळत त्यांच्या हातून गडावरील पुरातत्त्वीय स्थळांची नासधूस होते. या सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह अफाट असतो. पण पुरातत्त्वशास्त्र हा विषय माहित नसल्याने प्रत्येकजण आपल्याला वाटेल तसे संवर्धन करीत असतो.

पुरातत्त्व विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे ते अशा उत्साही लोकांना आवर घालू शकत नाहीत.[७५]

गड किल्ल्यांवर भ्रमंती करणाऱ्या मंडळींकडून अनेकदा किल्ल्यांवरच्या पाण्याच्या टाक्या साफ करण्याचा निर्णय घेतला जातो. यामध्ये सर्व गाळ अगदी उपसून काढला जातो व त्या ठिकाणापासून दूर नेऊन टाकला जातो. टाकी साफ झाल्यानंतर अगदी त्याच्या तळाशी असलेल्या फटीमधीलही गाळ काढण्याचा प्रयत्न केला जातो. खरेतर किल्ल्यांवरच्या टाक्यांतील वर्षानुवर्षे साठलेला गाळ हा पुरातत्त्व विभागासाठी अत्यंत मोठा पुरावा असतो. यामध्ये अनेक वेळा भांड्यांच्या व बांगड्यांचे तुकडे, काही वस्तू, मातीची भांडी, नाणी अशा प्रकारच्या वस्तू मिळण्याचा संभव असतो. यातून किल्ल्यावरचे त्याकाळातील लोक, त्यांचे लोकजीवन, ते वापरत असलेल्या वस्तू, त्यावेळचे उपलब्ध असलेले तंत्रज्ञान, किल्ल्यावरील वस्ती अशा प्रकारच्या अनेक बाबींची थेटमाहिती होण्याचा पुरावाच या टाक्यांतील गाळामध्ये दडलेला असतो. त्यामुळे अशा प्रकारचे काम हाती घेण्यापूर्वी किमान या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीस बोलावून त्याच्या मार्गदर्शनाखाली असे उत्खनन करणे आवश्यक आहे.[७६]

दुर्गसंवर्धन करणाऱ्या संस्थांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना शास्त्रशुध्द पध्दतीने संवर्धन करण्यासाठी व त्याबाबत योग्य शिक्षण देण्यासाठी एक सर्टिफिकेट कोर्स पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून तयार करता येऊ शकतो. आणि त्यानंतर ज्यांना अशा प्रकारे संवर्धन करण्याची इच्छा आहे अशा व्यक्तींना तो अभ्यास बंधनकारक करुन मगच त्यांना संवर्धनाची परवानगी देण्यात यावी. किल्ल्यांच्या संवर्धनाविषयी पुरातत्त्व विषयात काम करणाऱ्या संस्थांना शासकीय पातळीवर योग्य त्या परवानग्या मिळणे आवश्यक आहे.

दुर्गसंवर्धन करणाऱ्या संस्थांनी किल्ले संवर्धन म्हणजे काय हे व्यवस्थित समजावून घेणे अत्यावश्यक आहे. सर्वसाधारणपणे आपली अशी समजूत असते की दुर्गसंवर्धन म्हणजे गड किल्ल्यांवर जाऊन तेथे जे जे पडलेले बांधकाम आहे ते दुरुस्त करणे, तटबंदीच्या पडलेल्या भिंती पुन्हा नव्याने उभे करणे, सदर, वाडे

इत्यादी पुन्हा बांधून काढणे. पण याला दुर्गसंवर्धन असे म्हणता येत नाही. कोणत्याही ऐतिहासिक वास्तूच्या संवर्धनाची पुरातत्त्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी घालून दिलेली एक नियोजित पध्दत आहे.[७७]

कोणत्याही ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करताना अगोदर अस्तित्वात असणाऱ्या वास्तूला धक्का न लावता मूळ ऐतिहासिक मूल्य कायम ठेवून त्या वास्तूच्या मूळ बांधकामाची दुरुस्ती करणे हे मुख्य उद्दिष्ट असते. अशा वास्तूंची भविष्यात अजून पडझड होऊ नये यासाठी काळजीपूर्वक रक्षणात्मक उपाययोजना करुन त्या वास्तूचे आधुनिक काळामध्ये ऐतिहासिक व सांस्कृतिक मूल्य कायम राखले जाणे आवश्यक आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या कोणत्याही महत्त्वाच्या किल्ल्याचे संवर्धन करण्यासाठी, तीन मुख्य पायऱ्यांचा वापर करणे गरजेचे आहे. १) वास्तूंचे (अत्याधुनिक पध्दतीने) सर्वेक्षण २) वास्तूंची दुरुस्ती ३) वास्तूंचे जतन व संवर्धन. यापध्दतीने गडकोट किल्ल्यांचे संरक्षण केले गेले तर ते योग्य पद्धतीने होईल आणि खऱ्या अर्थाने त्यांचे संरक्षण व संवर्धन देखील होईल.[७८]

अ) **वास्तूंची दुरुस्ती** : किल्ल्यावरील कोणत्याही वास्तूची दुरुस्ती करण्यापूर्वी त्या वास्तूचा सर्वांगीण अभ्यास करणे आवश्यक आहे. संबंधित वास्तूचे स्थापत्यशास्त्रीय मूल्य जाणून घेत असताना त्या वास्तूचा आकार, त्याचे मूळ बांधकाम, वास्तूची पडझड कोठे आणि किती प्रमाणात झाली आहे, संबंधित वास्तूचा किती भाग संपूर्णपणे नष्ट झाला आहे अशा विविध बाबींचे काळजीपूर्वक सर्वेक्षण करुनच वास्तूंच्या दुरुस्तीला सुरुवात करणे गरजेचे आहे. किल्ल्यांवरील उध्वस्त झालेल्या, पडलेल्या वास्तूंच्या दुरुस्तीबाबत निश्चितअशी नियमावली भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याकडून बनविण्यात आली आहे. त्यातील नियमांनुसारच किल्ल्यांवरील वास्तूंची दुरुस्ती केली जाणे आवश्यक आहे. किल्ल्याचे बुरुज, तटबंदी, प्रवेशव्दारे, दरवाजे, तटबंदीवरुन जाणाऱ्या पायऱ्या, किल्ल्यांवरील विविध वास्तू, मंदिरे अशा विविध भागांची दुरुस्ती करण्याची नेमकी गरज कोठे आहे याचा अभ्यास

करुनच दुरुस्ती कार्य हाती घेतले जावे. कोणत्याही वास्तूची दुरुस्ती करताना संपूर्ण नवीनच किंवा वाढीव बांधकाम करण्यात येऊ नये. कारण त्यामुळे त्या किल्ल्याच्या ऐतिहासिक, पुरातत्त्वीय आणि स्थापत्यशास्त्रीय मूल्यांना धक्का पोहोचतो. मूळ वास्तूला आधार देण्याइतकेच बांधकाम करण्यात यावे.[७९]

ब) **वास्तूंचे जतन** : पुरातत्त्वीय नियमांनुसार किल्ल्याच्या विविध भागांच्या दुरुस्तीचे काम झाल्यावर शेवटी गडावरील वास्तूंचे जतन आणि सुशोभिकरण हा भाग येतो. कोणत्याही गड किल्ल्यांवरील महत्त्वाची आणि मोठी वास्तू म्हणजे तटबंदी. तटबंदीतून पावसाचे पाणी गडाबाहेर जाण्यासाठी ठिकठिकाणी जागा असाव्यात. त्यामुळे तटबंदीच्या पायामध्ये ओल साचत नाही. किल्ल्याच्या दरवाजांची दुरुस्ती झाल्यानंतर तेथे देखील पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल अशी सोय केली गेली पाहिजे. गडावरील धार्मिक वास्तूंची डागडुजी करीत असताना ते बांधकाम गडाच्या वातावरणाला शोभेल असे असावे. त्यामध्ये भडक रंग वापरण्यात येऊ नयेत.

गडावर शिलालेखांचे जतन करण्यासाठी प्रथम त्याचे वाचन करुन घेऊन ते प्रसिद्ध करावे. शिलालेखावरील मजकूर कायमस्वरुपी नष्ट होऊ नये यासाठी कागदाच्या लगद्याचा वापर करुन त्याचे ठसे घेण्यात यावेत. शिलालेखावर पावसाचे पाणी पडणार नाही याची व्यवस्था करण्यात यावी. शिलालेख भिंतीवर असतील तर त्याच्या बाजूने एक काचेची चौकट बसवावी व हवा खेळती राहण्यासाठी काही छिद्रे ठेवावीत.[८०]

गडावरील पाण्याच्या टाक्यातील गाळ काढत असताना पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊनच गाळ काढला जावा. कारण हा गाळ काढत असताना त्यामध्ये अनेक ऐतिहासिक व पुरातत्त्वीय अवशेष, पुरावे सापडण्याची दाट शक्यता असते. टाक्यातून काढण्यात आलेला गाळ एका ठिकाणी गोळा करुन ठेवला जावा व त्याची नोंद ठेवण्यात यावी.

गडाच्या सुशोभिकरणासाठी कोणकोणत्या वनस्पतींच्या प्रजातींची लागवड करण्यात यावी याचे सविस्तर मार्गदर्शन वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून घेण्यात यावे. आपल्याला वाटतील ती झाडे आणून गडावर लावू नयेत कारण बऱ्याच परदेशी प्रजातीच्या वृक्षांमुळे स्थानिक जैवविविधतेस धोका निर्माण होतो. नैसर्गिक अन्नसाखळीस बाधा निर्माण होते. गडाच्या स्थानिक परिसरात असणाऱ्या प्रजातींचेच वृक्षारोपण केले जावे.[८१] वृक्षारोपण झाल्यानंतर त्याचे संगोपनही तितकेच महत्वाचे आहे. पुरेशा पाण्याची सोय करण्यात यावी.

किल्ल्यावरील कोणत्याही ऐतिहासिक स्थळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशस्त मार्ग तयार करण्यात यावेत. पर्यटकांसाठी किल्ल्यांवर प्रसाधनगृहे बांधण्यात यावीत. किल्ल्याच्या सौंदर्याला बाधा येणार नाही अशा ठिकाणी शौचालये बांधली जावीत. गडावर जागोजागी गडाच्या इतिहासाची व गडावरील विविध वास्तूंची माहिती देणारे फलक लावण्यात यावेत. गडावर स्थानदर्शक व दिशादर्शक फलक लावण्यात यावेत. प्रत्येक गडावर एक मोठ्या आकाराचा स्थळदर्शक नकाशा लावण्यात यावा जेणेकरुन पर्यटकांना गडावर फिरताना विविध स्थळांची माहिती अचूकपणे समजेल.

गडकोट किल्ले यांच्याविषयी कितीही आस्था, आत्मीयता असली, त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही भावनाही चांगली असली तरी देखील त्याबरहुकुम केलेली कृतीच बऱ्याचदा या गड किल्ल्यांच्या हानीस कारणीभूत ठरते. त्यामुळे संरक्षणाच्या मूलभूत गोष्टी माहित करुन घेऊन टप्प्याटप्प्याने ही कृती केली तर ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या या गडकोटांना पुन्हा संजीवनी मिळेल.[८२]

महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या ताब्यानुसार किल्ल्यांचे वर्गीकरण पुरातत्त्व विभागाच्या ताब्यातील किल्ले, वनविभागाच्या ताब्यातील किल्ले, महसूल विभागाच्या ताब्यातील किल्ले, तटरक्षक दलाच्या ताब्यातील किल्ले अशा प्रकारे

करता येते. किल्ल्यांचे संवर्धन करत असताना पुरातत्त्व विभाग, वन विभाग, पर्यटन विभाग यांच्यात समन्वय राखला जाणे अत्यंत आवश्यक आहे.[८३]

दुर्गसंवर्धन व संरक्षण यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. यावर होणारा खर्च खरंच परवडण्यासारखा नाही. महाराष्ट्रात सुमारे ४०० पेक्षा अधिक लहान मोठे किल्ले आहेत. यात डोंगरी, सागरी व भुईकोट या तिन्ही प्रकारांचा समावेश होतो. आजघडीला फारच थोड्या किल्ल्यांवर किल्ल्याच्या प्रत्यक्ष वास्तू, खाणाखुणा अगदी व्यवस्थितपणे टिकून आहेत. अशावेळी संवर्धनाची सर्वात जास्त आवश्यकता कोणत्या किल्ल्यावर आहे, त्यासाठी कोणता निकष लावायचा हे समजून घेणे गरजेचे आहे.[८४]

कोणत्याही किल्ल्यांचे संवर्धन करत असताना पुरातत्त्व विभागाच्या मदतीने व शास्त्रशुध्द पध्दतीने संवर्धनाचे कार्य करणे आज अत्यावश्यक बनले आहे. किल्ले संवर्धन योजना राबवत असताना किल्ल्यांचे महत्त्व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचवणे हे सुध्दा महत्त्वाचे बनले आहे. किल्ले संवर्धन संकल्पना, जनतेच्या सहकार्याने राबवणे आवश्यक आहे. त्या त्या स्थानिक किल्ल्यांचा इतिहास त्या गावातील लोकांना माहित करुन दिल्यास किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांना खऱ्याखुऱ्या किल्ल्याची भ्रमंती केल्याचा आनंद मिळेल. किल्ल्यांचे जतन फक्त जागेवर न होता ते लोकांच्या मनात देखील झाले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने किल्ल्यांचे संवर्धन होईल.

### किल्ले संवर्धनाच्या विविध आधुनिक पध्दती

महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असणाऱ्या आणि प्राचीन काळापासून मराठा कालखंडाच्या उत्तरार्धापर्यंतच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत समाजात खूपच जागरुकता निर्माण झालेली दिसून येते. गेल्या चार-पाच वर्षांमध्ये किल्ले संवर्धन हा विषय महत्त्वाचा बनला असून विविध मंडळे, स्वयंसेवी संस्था त्याचप्रमाणे केंद्रीय पुरातत्त्व विभाग व राज्यपुरातत्त्व विभाग किल्ले संवर्धनासाठी प्रयत्नशील आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था स्वखर्चाने अत्यंत तळमळीने, प्रामाणिकपणे किल्ल्यांवर संवर्धनाचे कार्य करीत आहेत. ही अतिशय

स्तुत्य बाब आहे. परंतु कोणत्याही किल्ल्याचे संवर्धन करताना ते पुरातत्त्व खात्याच्या संमतीने व संवर्धनाच्या नियमांना अनुसरुन आहे का नाही याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. किल्ल्यांवरील विविध वास्तूंचे संवर्धन हा तांत्रिक विषय असल्याने शास्त्रशुद्ध पध्दतीने आणि पुरातत्त्व शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संवर्धनाचे कार्य होणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्थांच्या उत्साही गटाने स्वत:ला हवे तसे संवर्धनाचे कार्य केले तर अनेक पुरातत्त्वीय साधनांची हानी होऊ शकते किंवा काही पुरातत्त्वीय अवशेष कायमचे नष्ट होऊ शकतात याचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. आजचे विज्ञान आणि तंत्रज्ञान हे अत्यंत वेगाने प्रगती करत आहे. त्याचा प्रभावीपणे उपयोग करुन घेतल्यास विविध क्षेत्रांमध्ये ते अत्यंत उपयोगी ठरत असल्याचे दिसून येत आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील किल्ल्यांचा अभ्यास व संवर्धन करण्यासाठी वेगवेगळ्या तंत्रांचा उपयोग करता येऊ शकतो. त्यामध्ये खालील पध्दती समाविष्ट आहेत.

१) **वास्तूंचे अत्याधुनिक पद्धतीने सर्वेक्षण :** पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असणाऱ्या कोणत्याही वास्तूंचे अत्याधुनिक पध्दतीने सर्वेक्षण करणे ही संवर्धनामधील पहिली पायरी आहे. सर्वेक्षण करण्याच्या वेगवेगळ्या पध्दती आहेत. परंतु त्यामधील सहा महत्त्वाच्या पध्दतींनी किल्ल्यांचे सर्वेक्षण करता येऊ शकते.

अ) **पुरातत्त्वीय सर्वेक्षण :** कोणत्याही किल्ल्याचे संवर्धनाचे कार्य सुरु करण्यापूर्वी त्या किल्ल्याची सर्वप्रथम ऐतिहासिक माहिती गोळा केली पाहिजे. त्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला गेला पाहिजे. त्या माहितीच्या आधारे किल्ल्यावरील पुरातन वास्तू, स्थळे यांना प्रत्यक्ष भेटी देऊन काळजीपूर्वक आणि काटेकोर निरीक्षण करुन त्यांच्या नोंदी केल्या पाहिजेत. अशा स्थळांची वर्तमान सद्यस्थिती काय आहे याबाबत सविस्तर नोंदी करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत त्या वास्तू कशा आहेत, त्यांची किती पडझड झाली आहे, संवर्धन करण्यासाठी कोणकोणत्या उपायांची आवश्यकता आहे याची पूर्ण माहिती लिखित व

छायाचित्र स्वरुपात ठेवणे गरजेचे आहे. पुरातत्त्वीय सर्वेक्षण करण्यासाठी दोन पद्धती वापरल्या जातात.

१) **हवाई सर्वेक्षण :**

अ) यात विमानाला किंवा बलूनला कॅमेरे बनवून विशिष्ट जागेचे सर्वेक्षण केले जाते.

ब) रडार, तरंग लांबी, उष्माछायांकने या तंत्राने जमिनीखालील अवशेष शोधले जातात.

२) **भौमितिक सर्वेक्षण** :

अ) जमिनीखालील वस्तू बघण्याचे हे अत्यंत परिणामकारक तंत्र आहे.

ब) जमिनीखालील लोखंडाच्या वस्तू, भट्ट्या, दगडी बांधकाम, खड्डे व उंचवटे यामुळे होणाऱ्या चुंबकीय क्षेत्रातील बदलाची नोंद मॅग्नोमीटरने घेतली जाते. [८५]

**२) जी आय एस (GIS) जिओग्राफिक इन्फरमेशन सिस्टीम / भौगोलिक माहिती प्रणाली :**

कोणत्याही ऐतिहासिक स्थळाची इत्थंभूत भौगोलिक माहिती मिळवण्यासाठी, नकाशे तयार करण्यासाठी, माहिती विश्लेषण करण्यासाठी, असणारी अत्याधुनिक संगणकावर आधारित प्रणाली आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करुन आपण कोणत्याही किल्ल्याची समग्र भौगोलिक माहिती तयार करु शकतो. जीआयएस तंत्रज्ञान वापरण्यासाठी अनेक सॉफ्टवेअर्स तयार करण्यात आली आहेत. त्यांचा वापर करुन आपणास किल्ल्यांवरच्या भौगोलिक घटकांचा सविस्तर आढावा घेता येतो.[८६]

**३ ) जी. पी. एस. (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम)**

अंतराळातल्या उपग्रहांच्या सहाय्याने एखादे ठिकाणआणि तिथली वेळ शोधून काढणे, वातावरणातले बदल तपासणे यासाठी अमेरिकेने ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) प्रणाली विकसित केली होती. तिचा नंतर इतरही महत्त्वाच्या गोष्टींसाठी उपयोग होऊ लागला.[८७]

ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीमचा वापर करुन आपणास हव्या असलेल्या ठिकाणाची नेमकी माहिती मिळते. त्यात ते ठिकाण आपण उभे असलेल्या ठिकाणापासून किती दूर आहे, तिथे पोहोचण्यासाठी किती मार्ग उपलब्ध आहेत आणि तिथे पोहोचण्यासाठी किती वेळ लागू शकतो अशी माहिती जीपीएस उपकरणाच्या पटलावर एका बटणाव्दारे मिळू शकते.

जी. पी.एस. तंत्रज्ञानाचा वापर करुन आपणास जीपीएस यंत्र जिथे असेल त्या जागेवर उपग्रहांकडून मिळणाऱ्या संदेशाचा उपयोग करुन किल्ल्याच्या विशिष्ट जागेचे अक्षांश, रेखांश आणि त्या जागेची समुद्रसपाटीपासूनची उंची यांची सविस्तर माहिती प्राप्त करता येते. त्यावरुन किल्ल्याची स्थाननिश्चिती करता येते. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे संगणकावर किल्ल्याचा पक्का नकाशा बनवता येतो.[११] तांत्रिकदृष्ट्या सरस असणाऱ्या या पध्दतीमुळे अचूक माहिती मिळवणे शक्य झाले आहे.

**४) गुगल अर्थ** (Google Earth) **या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऐतिहासिक वास्तूंचा अभ्यास**

किल्ल्यांवरील ज्या वास्तू प्रत्यक्ष सर्वेक्षणामध्ये दिसून येत नाहीत त्या वास्तूंचा उपग्रहाव्दारे घेतलेल्या छायाचित्रांच्या माध्यमातून शोध घेता येतो. www.googleearth.com या संकेतस्थळावर उपग्रहाव्दारे घेतलेली छायाचित्रे मोफत उपलब्ध होऊ शकतात. उत्तमप्रतीची छायाचित्रे हवी असतील तर www.googleearth.com हे संगणकीय माध्यम विकत घेता येते. काही प्रसंगी उपग्रहाव्दारे माहिती देणाऱ्या या उपकरणाच्या साहाय्याने नवनवीन किल्ल्यांचा आणि ऐतिहासिक वास्तूंचा शोध घेतला गेला आहे. गुगल अर्थच्या नकाशात औरंगाबादच्या अंतूर किल्ल्याची माहितीघेत असताना अजंठा आणि सातमाळ डोंगर शेजारच्या एका टेकडीवरील आजवर अज्ञात असलेल्या किल्ल्याचा शोध ठाण्यातील राजन महाजन आणि नाशिकच्या हेमंत पोखरणकर या दोन गिरीमित्रांना लागला आहे.[८९]

**५) टोटल स्टेशन सर्व्हे** (Total Station Survey)

किल्ल्यांवरील सर्व वास्तूंची स्थाननिश्चिती जीपीएस व उपग्रहाव्दारे मिळालेल्या छायाचित्रातून झाल्यावर त्या वास्तूंची मोजमापे होण्यासाठी टोटल स्टेशन (Total Station Survey) या सर्वेक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक यंत्राचा वापर केला जातो. त्याव्दारे गडावरील विविध वास्तूंची अचूक मोजमापे मिळू शकतात. या यंत्राव्दारे कोणत्याही वास्तूचा कोन, अंतर, सहनिर्देशक या बाबी अतिशय अचूकपणे प्राप्त होतात. त्याचा वापर करुन किल्ल्यावरील वास्तूंचे निश्चित नकाशे बनवले जातात. आजपर्यंत महाराष्ट्रातील फक्त दहा किल्ल्यांचे टोटल स्टेशनच्या माध्यमातून सर्वेक्षण झालेले आहे. किल्ल्यांचे अशा पध्दतीने सर्वेक्षण झाले तर तेथील वास्तूंचे मूळ स्वरुप काय होते, त्यांची मोजमापे काय होती याबाबतची माहिती संकलित होऊ शकते आणि या माहितीचा उपयोग करुन किल्ल्यांचे जतन करता येते.[१०]

**६) ड्रॉईंग (आरेखन)**

आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनच्या मदतीने गडावरील दरवाजे, तोफा व बंदुकीचा मारा करण्याच्या जागा, वाड्याची जोती, मंदिरे, तलाव, विविध वास्तू यांची मोजमापे घेऊन रेखाटन करता येतात. पडझड झालेल्या तसेच नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या वास्तूंचे संवर्धन करताना या आरेखनांचा उपयोग होऊ शकतो.[११]

**परदेशातील किल्ल्यांचे संवर्धन**

जगभरामध्ये प्राचीन काळापासून किल्ल्यांचे अस्तित्व असलेले आढळून येते. स्वत:च्या संरक्षणासाठी निर्माण केलेल्या अनेक साधनांपैकी किल्ले हे एक महत्त्वाचे साधन आहे. मानवी संस्कृतीचा जसजसा विकास होत गेला तसतसा किल्ल्यांच्या बांधणीच्या तंत्राचाही विकास होत गेला. शेजारील शत्रूच्या आक्रमणापासून रक्षण करण्यासाठी किल्ले अधिकाधिक अभेद्य व भक्कम केले गेले. प्राचीन काळच्या विविध संस्कृत्यांमधील किल्ल्यांचे अवशेष आजही आढळून येतात.

प्राचीनव मध्ययुगीन कालखंडामध्ये जगभरात विविध प्रकारच्या किल्ल्यांची निर्मिती होत गेली. अशा किल्ल्यांना परदेशांत एक समृध्द सांस्कृतिक वारसा म्हणून अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विविध ऐतिहासिक वास्तू, इमारती, वाडे, स्मारके, किल्ले, गढ्या यांच्या जतनासाठी परदेशातील शासनयंत्रणा अत्यंत प्रभावीपणे काम करीत असल्याचे दिसून येते. आपला प्राचीन सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन करुन ठेवणे, आपल्या समृध्द इतिहासाचे दर्शन जगाला घडवणे, ऐतिहासिक वास्तूंच्या संरक्षणातून भूतकालीन तंत्रज्ञानाची ओळख करुन देणे, मानवाच्या एकंदर इतिहासाची ही मूर्त साधने जतन करुन आपली सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवणे अशा विविध दृष्टिकोनातून परदेशांमध्ये ऐतिहासिक स्मारकांचे जतन व संरक्षण केले जाते.

युरोप खंडातील अनेक देशांना अतिशय जुना इतिहास व संस्कृती लाभली आहे. त्या देशांमधील सांस्कृतिक वैभव जपण्यासाठी तेथील सरकारे प्रयत्नशील आहेत. इंग्लंड, फ्रान्स, इत्यादी युरोपियन देशांत व इतरही अनेक प्रगत देशांमध्ये ऐतिहासिक वास्तू, वस्तू व दस्तऐवज यांचे फार काळजीपूर्वक जतन केले जाते. लंडन, पॅरिस, लिस्बन यासारख्या शहरांमध्ये असणारी जगप्रसिद्ध वस्तुसंग्रहालये याची साक्ष देतात. छत्रपती शिवाजी महाराजांची अस्सल मूळ चित्रे लंडन व पॅरिसमधील वस्तुसंग्रहालयात जतन करुन ठेवण्यात आली आहेत. अमेरिकेसारख्या दोनशे-अडीचशे वर्षांचा इतिहास असणाऱ्या देशातील प्रमुख शहरांमध्ये वस्तुसंग्रहालय आहेच, परंतु छोट्या छोट्या गावातही त्या त्या गावचा इतिहास सांगणारे वस्तुसंग्रहालय असते. प्रत्येक गावी जसे चर्च तसे एक वस्तुसंग्रहालय आणि त्याचा त्या गावच्या नागरिकांना मोठा अभिमान असतो.[१२]

वारसा जतन करण्यासाठी युरोप सर्वात प्रसिध्द आहे. प्रत्येक देश वेगळी संस्कृती, सामाजिक संपन्नता दाखवतो व बऱ्याच ठिकाणी त्या देशांनी ती संपन्नता जपून ठेवली आहे. अलीकडच्या काळात चीन, सिंगापूरने आपला वारसा जतन करण्यात पुढाकार घेतला आहे व त्या ठिकाणांना पर्यटन केंद्र बनवून त्यातून ते भरपूर उत्पन्नही मिळवत आहेत. सिंगापूरमध्ये वारसा पदभ्रमणामध्ये ठिकठिकाणी

फलक लावण्यात आले आहेत, त्यावर प्रत्येक चौक व महत्त्वाच्या इमारतीची माहिती देण्यात आली आहे. शहरात येणारी कुणीही नवखी व्यक्ती याव्दारे कोणत्याही मार्गदर्शकाशिवाय फेरफटका मारु शकते. अशा गोष्टींमुळे शहराच्या नागिरकांमध्ये त्याविषयी आपलेपणाची भावना निर्माण होते. अशा वारशाचा ते एक भाग आहेत याची जाणीव त्यांना होते व पर्यटकांना शहराची व त्याच्या संस्कृतीची एका वेगळ्या दृष्टिकोनातून माहिती मिळते.[१३]

ईस्ट इंडिया कंपनीचा एक अधिकारी असलेल्या कप्तान विलियम जेम्स याच्या तीव्र इच्छेखातर त्याचा मृत्यूनंतर तत्कालीन प्रसिध्द वास्तूतज्ज्ञ रिचर्ड जप्प यांनी १७८४ साली लंडनमध्ये ग्रीनविच येथे सुवर्णदुर्ग या वैशिष्ट्यपूर्ण किल्ल्याची उभारणी केली. लंडन ते पॅरिस दरम्यान सर्वात उंच स्थान असलेल्या या सुवर्णदुर्गनं दुसऱ्या महायुध्दात संदेशवहनाची मोलाची भूमिका बजावली होती. १९८८ पासून हा किल्ला नागरिकांसाठी बंद होता. २००२ मध्ये स्थानिक ग्रीनविच कौन्सिलने निर्णय घेऊन हा किल्ला विकायचं ठरविले परंतु स्थानिक लोकांनी त्याला प्रचंड विरोध केला. त्यांनी आंदोलन करुन सरकारला या किल्ल्याच्या इतिहासाची जाणीव करुन दिली. मग कौन्सिलने त्यांचा निर्णय रद्द केला. त्यांनी किल्ल्याच्या डागडुजीसाठी आणि त्याला पुनर्वैभव प्राप्त करुन देण्यासाठी दोन लाख पन्नास हजार पौंड एवढी भरघोस रक्कमही हेरिटेज फंडाच्या माध्यमातून दिली.

'सुवर्णदुर्ग प्रिझर्वेशन ट्रस्ट' तर्फे सध्या या किल्ल्याची देखभाल केली जाते. एका ऐतिहासिक घटनेमुळे उभारली गेलेली लंडनमधील ही सुवर्णदुर्गची वास्तू, तिची सरकार आणि स्थानिकांकडून घेतली जाणारी काळजी आणि देखभाल या गोष्टी निश्चितच प्रेरणादायी व त्यातून बोध घेण्यासारख्या आहेत.[१४]

अमेरिका, युरोपमध्ये तेथील शासकीय यंत्रणांनी किल्ले तर जपले आहेतच परंतु गावेच्या गावे सुध्दा आहेत तशी ठेवून संवर्धनाचा एक वस्तुपाठ घालून दिला आहे. हॅरी पॉटर या चित्रपटांच्या मालिकेतील पहिल्या दोन चित्रपटांचे शूटिंग इंग्लंडमधील 'ॲनविक कॅसल' मध्ये करण्यात आले होते. या बातमीचा सर्वत्र

प्रसार झाल्याबरोबर जगभरातून पर्यटक ॲनविक कॅसलला भेट देण्यास येऊ लागले. त्या छोट्या गावात पर्यटकांसाठी सोयी करण्यात आल्या. एवढेच नव्हे तर चित्रपटांत असलेली घुबडेही पाळण्यात आली. एखाद्या स्थळाचे मार्केटिंग करण्याच्या या अनोख्या युक्तीमुळे गावाचा नूर बदलला. पर्यटनाच्या जागतिक नकाशावर ते गाव आले.[१५]

युरोप खंडातील हॉलंड, नेदरलँड मध्ये ३५० किल्ले आहेत. त्यापैकी ७० किल्ल्यांची निगा तेथील शासकीय यंत्रणांनी अत्यंत उत्तम प्रकारे राखली आहे. किल्ले संवर्धनामध्ये नागरिकांचाही अतिशय मोलाचा वाटा आहे. किल्ल्यांच्या जतनामुळे आपोआपच त्या भागाचा पर्यटन विकास होऊन नागरिकांना आर्थिक उन्नतीचे साधन उपलब्ध झाले आहे.[१६] वारसावास्तू उभारणीत ब्रिटिशांच्या नुसत्या पाऊलखुणाच उमटल्यात असे नाही, तर त्यांच्या संवर्धनासाठी ते कायम दक्ष होते. आपल्या वारसा वास्तूंचा वैभवशाली इतिहास जपताना त्याचे साक्षीदार ठरलेले ऐतिहासिक मापदंड म्हणजे वारसा वास्तू, पुतळे, स्तंभ, कमानी यांचे जतन करण्याची तळमळ मनापासून होती. इंग्लंडमधील शेक्सपीयरचे घर, कवी किटसचे घर या वारसावास्तू त्यांच्यासाठी राष्ट्रगौरव ठरल्या असून, पर्यटकांच्या स्थळदर्शनात त्यांच्या समावेश आहेच. दुसऱ्या महायुध्दात अतुलनीय पराक्रम गाजवलेली अमेरिकेची सेंटमेरी ही युध्दनौका आजही आपलं पुरातन वैभव राखून आहे.[१७]

इजिप्त हा देश त्याच्या प्राचीन संस्कृतीकरिता जगप्रसिद्ध आहे. गिझा येथील पिरॅमिड, कर्णाकचे मंदिर, राजांची दरी यासारखी जगातील प्रसिद्ध आश्चर्ये इजिप्तमध्ये आहेत. गिझाचा पिरॅमिड इ.स. पूर्व २५६० साली बांधला गेला व येथे इजिप्तच्या चौथ्या घराण्यातील राजा खुफू ह्याची कबर आहे. या पिरॅमिडस जगभरातील पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ बनले आहे. दरवर्षी हजारो पर्यटक या पिरॅमिडसना भेटी देतात. याचे मूळ इजिप्तमध्ये आपल्या देशातील सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचे उत्तम प्रकारे केलेल्या संवर्धनामध्ये आहे.

पर्यटन क्षेत्रामध्ये इतिहासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत चालली असल्याचे दिसून येते. ऐतिहासिक पर्यटन हे एक पर्यटनाचे स्वरुप आहे. ऐतिहासिक स्थळे, स्मारके, किल्ले यांच्याशी पर्यटनाचा अतिशय जवळचा संबंध आहे. युरोपातील विविध देशांना प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा वारसा लाभला आहे. त्यामुळे अनेक युरोपीय देशांमध्ये प्राचीन व मध्ययुगीन वास्तू व स्मारके मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतात. ज्या ठिकाणी या वास्तू आहेत ती ठिकाणे ऐतिहासिक पर्यटनस्थळे म्हणून प्रसिध्द झालेली दिसून येतात. म्हणूनच या देशांमधील ऐतिहासिक स्थळांचे अतिशय उत्तम प्रकारे संवर्धन व जतन केले जाते. काही देशांच्या संपूर्ण अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहेत. अशा देशात ऐतिहासिक स्थळांना अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. अशा संवर्धनाच्या उपक्रमातून इतिहास जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

''आपण आपल्या तरुण पिढीला आर्थिक सुबत्ता व संपन्न समाजाचा वारसा लाभलेला समृध्द व सुरक्षित भारत दिला तरच आपण लक्षात राहू''[१८] अशा शब्दात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या देशाच्या समृध्द वारशाचे महत्त्व विशद केले आहे. भारताला अतिशय प्राचीन इतिहास व संस्कृती लाभलेली आहे हे आपले भाग्य आहे. महाराष्ट्रातील गडकोटांनी सातवाहन कालखंडापासून ते पेशवे काळापर्यंत वेगवेगळ्या राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीत मोलाची भूमिका बजावली आहे. हा वारसा केवळ किल्ल्यांपुरताच मर्यादित नसून त्या कालखंडाच्या संपूर्ण संस्कृतीशी त्याचा घनिष्ट संबंध आहे. त्यामुळे अशा समृध्द ऐतिहासिक वारशाचे जतन करुन पुढील पिढ्यांना तो सुरक्षित ठेवणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य बनले आहे असे सांगता येते.

**किल्ले संरक्षण व संवर्धनासाठी महत्त्वाचे उपक्रम**

महाराष्ट्र राज्य भारतामध्ये ऐतिहासिक वारशाने समृध्द असणारे राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील गड-किल्ले ही महाराष्ट्राची खरी ओळख आणि संपत्ती आहे. आकडेवारी काढल्यास महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त गडकिल्ले असणारे राज्य म्हणावे लागेल. जलदुर्ग, गिरीदुर्ग आणि भुईकोट किल्ले मिळून

महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची संख्या ३५० पेक्षा अधिक आहे. वर्षानुवर्षे ऊन, वारा, पाऊस झेलत हे गडकिल्ले आजही महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार म्हणून सक्षमपणे उभे आहेत. मात्र काळाच्या ओघात अशा ऐतिहासिक गड किल्ल्यांची पडझड सुरु आहे. या गड किल्ल्यांचे संवर्धन आणि जतन करणे अत्यावश्यक बनले आहे. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी केंद्रीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग प्रयत्नशील आहेत. परंतु राज्यातील सर्वच किल्ल्यांची निगा या शासकीय यंत्रणांमार्फत राखली जात नाही. महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे मूळ स्वरुपात जतन करणे, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखणे यासाठी समाजानेही आता व्यापक प्रमाणावर सहभाग घेण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध स्वयंसेवी संस्था, मंडळे, औद्योगिक कंपन्या इ. व्दारे गड किल्ल्यांच्या संरक्षणाचे व संवर्धनाचे कार्य निश्चितपणे उत्तमप्रकारे पार पाडता येऊ शकते.

गेल्या पाच सहा वर्षांमध्ये विविध स्वयंसेवी संस्थांव्दारे महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवर संवर्धनाचे कार्य सुरु आहे. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी आपण फक्त शासकीय यंत्रणांवर अवलंबून राहणे चुकीचे आहे. त्यामुळे समाजातील सर्वच घटकांनी किल्ले संवर्धनामध्ये आपला सहभाग नोंदविला तर नक्कीच किल्ले वैभवास झळाळी प्राप्त होऊ शकते. आपल्या वैभवशाली किल्ल्यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविता येऊ शकतात. त्याची चर्चा खालीलप्रमाणे करता येते.

**१) किल्ले पर्यटन**

महाराष्ट्रातील किल्ले हे महाराष्ट्राचे वैभव आहेत. इतिहासाची साक्ष देणाऱ्या शेकडो गड किल्ल्यांना पर्यटनाच्या दृष्टिकोनातून जास्तीत जास्त वाव देता येऊ शकतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा सांगणारे शिवनेरी, रायगड, सिंहगड, प्रतापगड, तोरणा, पुरंदर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग अशा अनेक किल्ल्यांवर पर्यटनाच्या मोहिमा राबविता येऊ शकतात. महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळ किंवा खासगी संस्थांव्दारे किल्ले पर्यटन योजना यशस्वी होऊ शकते. अशा योजनांमुळे किल्ल्यांच्या परिसरातील

विकासाला नक्कीच चालना मिळू शकते. पर्यटकांना निवासाची, भोजनाची सोय करणे, गडावर जाण्यासाठी वाहनांची सोय करणे, किल्ल्याचा इतिहास सांगण्यासाठी प्रशिक्षित स्थानिक पर्यटक मार्गदर्शक नेमणे इ. घटकांमुळे स्थानिक विकासास हातभार लागू शकतो. किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांनी किल्ल्याचा इतिहास व तेथील वैशिष्ट्ये जाणून घेतल्यानंतर किल्यांप्रती त्यांची आत्मीयता वाढण्यास मदत होऊ शकते. त्याव्दारे आपल्या समृध्द वारशाच्या जतनाचा दृष्टिकोन नक्कीच वाढीस लागू शकतो.

**२) किल्ले दत्तक योजना**

महाराष्ट्रात ३५० पेक्षा अधिक किल्ले आहेत. यातील फारच थोड्या किल्ल्यांचे संवर्धन व जतन पुरातत्त्व खात्यामार्फत केले जाते. बहुतांशी किल्ले सध्या दुर्लक्षित अवस्थेत आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस त्यांची अधिकच पडझड होत असल्याचे दिसून येते. अशा दुर्लक्षित किल्ल्यांना, पुरातत्त्व विभागाची परवानगी घेऊन दत्तक घेता येऊ शकते. समाजातील काही मंडळी आपल्या मुलामुलींच्या लग्नावर कोट्यावधी रुपये खर्च करतात. तेव्हा व्यावसायिक, उद्योजक आणि राजकीय नेत्यांनी आपला ऐतिहासिक वारसा टिकवण्याचा उदात्त व भव्य दृष्टिकोन बाळगण्यास काहीच हरकत नाही. किल्ले संवर्धन ही फक्त शासनाचीच जबाबदारी नसून समाजाचीही आहे. समाजातील विविध मंडळे, स्वयंसेवी संस्था यांनी गड-किल्ले दत्तक घेऊन गडावरील दुर्लक्षित व मोडकळीस आलेल्या वास्तूंची डागडुजी व दुरुस्ती करणे, किल्ले स्वच्छता मोहिम राबविणे, श्रमदानातून किल्ल्यांच्या तटबंदीवर, बुरुजांवर वाढलेल्या वनस्पती काढून टाकणे, किल्ल्यांवरील पाण्याच्या टाक्यांमधील गाळ काढून ते स्वच्छ ठेवणे, किल्ला कचरामुक्त व प्लॅस्टिकमुक्त ठेवणे, किल्ल्याचा इतिहास सांगणारा फलक लावणे, हुशार व होतकरु मुलांना प्रशिक्षण देऊन सुटीच्या दिवशी गाईड म्हणून काम करण्याची संधी देणे, वनखात्याच्या परवानगीने सामाजिक वनीकरण योजना किल्ल्यांवर राबविणे, वृक्षारोपण केल्यानंतर ठराविक दिवसांनी

लावलेल्या रोपांची निगा राखणे, किल्ल्याचा परिसर स्वच्छ राखणे अशा विविध उपक्रमांव्दारे आपल्या परिसरातील किल्ल्यांचे संवर्धन व जतन करावे. सदर काम करत असताना पुरातत्त्व खात्याचे नियम माहित करुन घेऊनच काम केले तर शास्त्रशुध्द पध्दतीने किल्ले संवर्धन संकल्पना यशस्वी होऊ शकते.

**३) दुर्ग संग्रहालय**

महाराष्ट्राच्या पराक्रमी भूमीचा वारसा सांगणारे ३५० पेक्षा अधिक किल्ले आज महाराष्ट्राचे ठळक वैशिष्ट्य बनले आहे. अशा किल्ल्यांबाबत समग्र माहिती उपलब्ध होण्यासाठी कायमस्वरुपी संग्रहालय उभे करता येऊ शकते. महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा किल्ल्यांचे नकाशे, सर्व किल्ल्यांची छायाचित्रे, किल्ल्यांवरील महत्त्वाच्या वास्तू, स्मारके, शिलालेख, पुतळे, मूर्ती यांच्या प्रतिकृती इत्यादींचा समावेश या दुर्ग संग्रहालयात करुन जिज्ञासू व इतिहासप्रेमी व्यक्तींना किल्ल्यांबाबतची सर्वांगीण माहिती उपलब्ध करता येऊ शकते. अशा संग्रहालयात किल्ल्यांविषयी चर्चा, व्याख्याने, स्लाईड शो, व्हिडीओ शो यांचे आयोजन करुन दुर्गविषयक कुतूहल शमवता येऊ शकते.[११] अशा संग्रहालयामध्ये प्राचीन व मध्ययुगीन काळातील शस्त्रे, नाणी, विविध ऐतिहासिक वस्तू, शिलालेख, ताम्रपट, चित्रे यांचा समावेश करुन संग्रहालय दर्जेदार बनवता येऊ शकते.

**४) किल्ले संवर्धनामध्ये स्थानिक जनतेचा सहभाग घेणे**

किल्ले संवर्धन व जतनामध्ये स्थानिक जनतेचा सहभाग व सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. किल्ले संवर्धन करीत असताना स्थानिक जनतेला किल्ल्यांवरील वास्तूंची डागडुजी व जीर्णोध्दार करणे, किल्ल्यावरील तळ्यांमधील गाळ काढणे, तळ्याचे सुशोभिकरण करणे, गडावर बाग-बगीचा विकसित करणे, त्यांची दैनंदिन निगा राखणे, गडावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन त्याची काळजी घेणे, किल्ल्यांवर जाणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती

करणे, किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शक म्हणून मदत करणे, किल्ले परिसर स्वच्छ राखण्यासाठी व निगराणी करण्यासाठी सुरक्षा रक्षक म्हणून नेमणे अशा विविध बाबींमध्ये स्थानिक जनतेचा सहभाग घेऊन किल्ल्यांचे जतन करता येऊ शकते. त्याव्दारे स्थानिक जनतेला रोजगारही उपलब्ध होईल व किल्ल्यांच्या इतिहासाप्रती जागरुकता निर्माण होऊन आपला वारसा जतन करण्याचा दृष्टिकोन वाढीस लागेल.

**५) गड-किल्ले स्वच्छता अभियान मोहिम**

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' असे महाराष्ट्राचे यथार्थ वर्णन राम गणेश गडकरी यांनी केले आहे. या राज्याचा राकटपणा, कणखर आणि दणकट दगडांच्या वास्तू, किल्ल्यांच्या रुपाने आजही टिकून आहे. दुर्ग वैभव हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि वारशाचा गाभा आहे. किल्ल्याची देखभाल करणे, त्याचे जतन व संवर्धन करणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांची स्वच्छता ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाराष्ट्रातील गड किल्ले स्वच्छ राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग व गड किल्ले संवर्धन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ सप्टेंबर २०१६ ते १६ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत 'गड किल्ले स्वच्छता अभियान मोहिम' राबवली गेली. या मोहिमेत किल्ल्यांवरील कचरा, प्लॅस्टिक गोळा करुन प्लॅस्टिक मुक्त गड किल्ले ठेवण्याचा निर्धार केला गेला. तसेच पावसाच्या काळात किल्ल्यांच्या पायऱ्यांवर जमा झालेले शेवाळही काढण्यात आले. सदर स्वच्छता मोहिम राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी, रायगड, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, औरंगाबाद, नाशिक, जळगाव, धुळे, अहमदनगर इ. जिल्ह्यातील सुमारे १०० किल्ल्यांवर राबविली गेली.[१००]

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ११ फेब्रुवारी २०१७ रोजी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व किल्ल्यांवर

एकाच वेळी महास्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानात सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील पाच हजाराहून अधिक स्वयंसेवक सहभागी झाले होते.[१०१]

अशा प्रकारचे उपक्रम राज्यभरातील विविध महाविद्यालयांनी आपापल्या जिल्ह्यात राबवले तर संपूर्ण महाराष्ट्रातील किल्ले अगदी थोड्याच वर्षांच्या कालावधीत चकाचक होऊ शकतात. श्रमदानातून किल्ल्यांची स्वच्छता करणे, बुरुजांवर वाढलेली झाडे झुडपे काढून टाकणे, मुळांवर ॲसिड टाकून ते नष्ट करणे, गुटखा, माव्याच्या पुड्या गोळा करणे, दारुच्या बाटल्या गोळा करणे, किल्ल्यांवरील पाण्याची टाकी, तलाव, विहिरी यातील गाळ काढणे व तेथील पाणी स्वच्छ राहण्यासाठी मासे, कासवे सोडणे, किल्ल्यावरील शिलालेख, शिल्पे, मूर्ती, मंदिरे यांची जपणूक करणे इ. कामे विद्यार्थ्यांव्दारे करुन घेणे शक्य आहे. गड कोट स्वच्छता मोहिमांव्दारे विद्यार्थ्यांच्यात श्रमदान, सहकार, बंधुता, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक भान निर्माण होऊ शकते. आजच्या तरुण पिढीची अत्यंत महत्त्वाची ताकद व ऊर्जा किल्ले संवर्धनातून व जतनातून विधायक कार्यासाठी वापरली जाऊ शकते. त्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न आणि तीव्र इच्छाशक्तीची गरज आहे.

**६) किल्ल्यांवर साहसी शिबीरे आयोजित करणे**

महाराष्ट्रातील अनेक किल्ले घनदाट जंगलांमध्ये वसलेले आहेत. अशा किल्ल्यांवर जाणाऱ्या वाटा दुर्गम आहेत. बरेचसे किल्ले बुलंद, चढाई करण्यास अत्यंत अवघड व धोकादायक आहेत. अशा गड किल्ल्यांवर युवकांनी गिर्यारोहण, पदभ्रमण, रॉक क्लायंबिंग इ. साहसी क्रीडा प्रकारांची शिबीरे आयोजित करुन तरुणांमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन सामर्थ्य वाढवता येऊ शकते. महाराष्ट्राच्या इतिहासातील प्रेरणादायी किल्ल्यांचे महत्त्व वाढवण्यासाठी युवकांना गड किल्ल्यांकडे आकृष्ट करुन घेणे अत्यावश्यक आहे.

**७) किल्ल्यांबाबत असणारे कुतूहल शमवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. प्रिंट व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील विविध गड किल्ले यांचे दर्शन, त्यांची वैशिष्ट्ये, स्थानमाहात्म्य सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचले आहे. त्यामुळे आपल्या ऐतिहासिक वारशांना भेटी देण्यासाठी तरुणाई व सर्वच वयातील लोक किल्ल्यांकडे वळत आहेत. विविध किल्ल्यांवर ते जातातही परंतु तेथे किल्ल्याचा इतिहास, किल्ल्याचा नकाशा, किल्ल्यावरील विविध भाग, वास्तू यांची माहिती सांगणारे फलक उपलब्ध नसल्याने किल्ल्याबाबत असणारे कुतूहल शमवले जात नाही. किल्ल्यावर सर्वत्र फिरुन फक्त पायपीट होते. परिणामी किल्ल्याविषयी आवड व आत्मीयता निर्माण होत नाही. त्यामुळे पर्यटकांमध्ये किल्ल्याबाबत असणारे कुतुहल शमवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावेत. यामध्ये गड किल्ल्यांवरील बांधकामाच्या विविध पध्दती, गडावरील अवशेषांचा अभ्यास, गडाची वैशिष्ट्ये, गडावर गेल्यावर घ्यावयाची काळजी, तेथील इतिहास, गडासंदर्भातील तत्कालीन समाजजीवन, अर्थकारण, तेथील वन्यजीवन, वनस्पतीसृष्टी इ. विषयांचा अभ्यास केला गेल्यास किल्ल्याची सर्वांगीण माहिती व तत्कालीन परिस्थिती याबाबत ज्ञानाचा प्रसार करता येईल.

**८) किल्ल्यावरील जलव्यवस्थापन व जलसंधारण**

रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्रात गडावरील जलव्यवस्थापनाबाबत अत्यंत सुस्पष्ट विचार मांडले आहेत. ''गडावर अधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थळ तो अवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी अधी खडक फोडून तळी, टाकी पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे, जसे पाणीही पुरते, म्हणून तितकियावरीच निश्चिंती न मानावी. किंनिमित्य की, झुंजामध्ये भांडियाचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात, आणि पाणियाचा खर्च

विशेष लागतो. तेव्हा संकट पडते या करिता तसे जागीं जखिरीयाचे पाणी म्हणून दोन चार टाकी तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे. गडाचे पाणी बहुत जतन राखावे.''[१०२]

यावरुन सतराव्या शतकामध्ये सर्वप्रथम जलव्यवस्थापन आणि जलसंधारणाचा प्रामुख्याने विचार केला गेल्याचे दिसून येते. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' संकल्पना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात वापरली गेली. त्याचा परिणाम म्हणून गडकिल्ल्यांवरील टाक्यांमध्ये बारमाही पाणी असल्याचे दिसून येते. उदा. सिंहगडावरील देवटाके, रायगडावरील हनुमान टाके, शिवनेरी किल्ल्यावरील गंगा-जमुना टाके इ. ठिकाणी टाक्यांमध्ये वर्षभर पाणी उपलब्ध असते. आपणास अशा प्रकारे प्रत्येक किल्ल्यावर पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून जलसंधारण करता येऊ शकते. त्याव्दारे भूजलपातळी वाढून किल्ल्याच्या आसपासच्या दुष्काळग्रस्त खेड्यांना वर्षभर पाणीपुरवठा करता येऊ शकतो.

**९) जैविक विविधतेचे संरक्षण**

पश्चिम घाटातील सह्याद्रीच्या पर्वतरागांमध्ये असणाऱ्या घनदाट जंगलांमध्ये अतिशय समृद्ध अशी जैविक विविधता भारताच्या तीन संवेदनशील क्षेत्रांपैकी एक आहे. या जंगलातील वनस्पतीसृष्टी अत्यंत दुर्मिळ आणि वैविध्यपूर्ण आहे. या प्रदेशात विविध उपयोगी वृक्ष, शेकडो औषधी वनस्पती, पाणवनस्पती, विविध प्रकारचे प्राणी, सरपटणारे प्राणी, पक्षी, कीटक यांचे आगारच आहे. विकासाच्या नावाखाली गेल्या पन्नास वर्षात या नैसर्गिक अधिवासांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. कित्येक दुर्मिळ औषधी वनस्पती, विविध प्रकारच्या प्रदेशनिष्ठ वनस्पतींच्या प्रजाती, संवेदनशील पक्षी व प्राणी आज नामशेष झालेले दिसून येतात. अत्यंत समृध्द अशा प्रकारचे निसर्गवैभव प्रतापगड, तोरणा, सिंहगड, राजगड, वासोटा, मकरंदगड इ. किल्ल्यांच्या परिसरात दडलेले आहे. आजच्या आधुनिक काळच्या जागतिकीकरणाच्या प्रचंड रेट्यामध्ये जंगलांचा विनाश अत्यंत

वेगाने होत आहे. परिणामी या जंगलातील वनस्पती आणि प्राणीसृष्टी धोक्यात आली आहे. कित्येक प्रजाती कायमस्वरुपी नामशेष झाल्या आहेत. त्यामुळे आपणांस या किल्ल्यांच्या परिसरातील जैविक विविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे अत्यावश्यक बनले आहे. किल्ले संवर्धन आणि जैविक विविधतेचे संरक्षण या दोन्ही गोष्टींचा ताळमेळ घालून आपली नैसर्गिक संपदा जपणे शक्य आहे.

**१०) किल्ले परिसरात योग केंद्रांची उभारणी**

सह्याद्रीच्या पर्वतरागांवरील किल्ले परिसरातील रमणीय वातावरण आणि शांतता याचा उपयोग योग केंद्राच्या उभारणीसाठी होऊ शकतो. ध्यानधारणा, योगासने, प्राणायाम, उपासना करण्यासाठी अशा शांत जागा गरजेची असते. अशा योग केंद्रांच्या उभारणीव्दारे पर्यटकांना आपल्या आरोग्याविषयी सजगता निर्माण होईलच त्याचप्रमाणे किल्ले हे पर्यटकांचे आकर्षण बनू शकतात. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी अशा योगशिबिरांचा नक्कीच वापर करुन घेता येऊ शकतो.[१०३]

**११) मॉडेल फोर्ट बनविणे**

ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण असे दहा किल्ले निवडून इंजिनियर्स, आर्किटेक्ट, इतिहास संशोधक, दुर्ग अभ्यासक यांच्या टीम्स तयार कराव्यात. त्यांच्याकडून प्रत्येक किल्ल्याची मूळ वास्तू, वास्तूरचना, किल्ल्यांवरील विविध बांधकामे, तेथील जलसंधारण आणि जलव्यवस्थापन इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास करुन त्याची आरेखने बनवून घ्यावीत.[१०४] उत्कृष्ट आरेखन बनवणाऱ्यांना भरघोस बक्षीस द्यावीत आणि त्यावरुन मास्टर प्लॅन बनवून हे दहा दुर्ग पुन्हा जसे होते तसे बांधून काढावेत. मध्ययुगीन कालखंडात ज्याप्रमाणे किल्ले निर्मिती झाली अगदी त्याचप्रमाणे व तशाच प्रकारचे बांधकाम साहित्य वापरुन हुबेहूब तत्कालीन काळाप्रमाणे दिसणारा किल्ला बांधून काढावा. याद्वारे आपणांस प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील दुर्ग वैभवाची अनुभूती घेता येईल.

**१२) किल्ल्यांवर गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे**

हल्लीच्या अधुनिक काळात किल्ले हे पिकनिक स्पॉटस, मनोरंजनाची ठिकाणे, धूडगूस व मौजमजा करण्याची ठिकाणे, पार्ट्या करण्याची ठिकाणे बनत चालल्याचे दिसून येते. पर्यटकांच्या अशा थिल्लर, बेजबाबदार कृत्यांमुळे ऐतिहासिक पावित्र्य नष्ट होते. कित्येक हौशी पर्यटक किल्ल्यांच्या विविध भागांवर खडूने, वीटकरी रंगाने, कोळशाने आपली नावे लिहून त्या भागाला विद्रुप करतात. त्यामुळे त्या किल्ल्याचे सौंदर्यमूल्य नष्ट होते. अशा गैरप्रकार करणाऱ्या लोकांवर सुरक्षा रक्षकांव्दारे नजर ठेवून त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक बनले आहे.

**१३) पर्यटकांकडून प्रवेश फी आकारणे व त्यातून विधायक कार्ये करणे**

महाराष्ट्रातील सर्व किल्ले शासनाच्या मालकीचे आहेत. अशा किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांकडून ठराविक प्रवेश फी आकारली जावी. त्यातून उपलब्ध झालेल्या निधीचा वापर किल्ल्यांवर शौचालय निर्मिती, शुद्ध पिण्याच्या पाण्याची टाकी उभारणी, किल्ल्याच्या विविध भागांचे बोर्डस् व दिशादर्शक फलक उभारणी, किल्ल्यांची माहितीपट निर्मिती, किल्ल्यांवर ठराविक दिवशी प्रसिध्द व्यक्तीचे व्याख्यान, एका किल्ल्यावरुन परिसरातील इतर किल्ले दिसण्यासाठी अत्याधुनिक दुर्बिणीचा वापर अशा अनेक विधायक कार्यांसाठी करता येतो. त्याव्दारे पर्यटकांना किल्ल्यांवर आल्यानंतर ऐतिहासिक वातावरणाची अनुभूती घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे अशा विविध सोयी सुविधा उपलब्ध झाल्याने किल्ल्यावर पर्यटकांची वर्दळ लक्षणीयरित्या वाढू शकते.

**१४) किल्ल्यांवर बागबगिचा विकसित करणे**

बहुतांशी किल्ल्यांवर वर्षभर पाण्याची उपलब्धता असते. त्याचा वापर करुन किल्ल्याच्या परिसरात बागबगिचा विकसित करता येऊ शकतो. अशा बागबगिचांव्दारे किल्ल्यांचे सौंदर्यमूल्य निश्चितच वाढू शकते. गडावर सर्वत्र मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करुन त्यांना संरक्षक जाळी बसवता येऊ

शकते. किल्ल्यांवरील पाण्याचा सुयोग्य पध्दतीने वापर करुन ठिबक सिंचनव्दारे या वृक्षांचे जतन केल्यास किल्ल्याचा परिसर अजून आकर्षक व रमणीय होऊ शकतो. त्यासाठी स्थानिक लोकांची मदत घेता येऊ शकते. किल्ल्यांवर एखादे औषधी वनस्पतींचे उद्यान उभारता येऊ शकते. सह्याद्रीच्या पर्वतरांगामध्ये विपुल प्रमाणात औषधी वनस्पती सापडतात. त्यांचे जाणीवपूर्वक संवर्धन किल्ल्यांवर केल्यास दुहेरी फायदे मिळू शकतात.

**१५) किल्ल्यांबाबत जनतेमध्ये प्रबोधन करणे**

महाराष्ट्रातील किल्ले भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे साक्षीदार आहेत. प्रत्येक किल्ल्याची वेगवेगळी वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक किल्ल्यास स्वतंत्र वेगळा इतिहास आहे. अशा किल्ल्यांचे वेगळेपण आणि ऐतिहासिक मूल्य चिरंतन राहण्यासाठी सर्वप्रथम जनतेमध्ये जागृतीची आणि प्रबोधनाची गरज आहे. आपल्या समृध्द वारशाप्रती समाजाला सजग करण्याची खरोखरच गरज निर्माण झाली आहे. कारण आधुनिक काळातील चंगळवादी जीवनशैली आणि 'वापरा व फेकून द्या' प्रवृत्तीमुळे सामाजिक भान दिवसेंदिवस कमी होत चालल्याचे दिसून येते. त्याला किल्ले अपवाद नाहीत. बहुतांशी लोक किल्ल्यांवर पिकनिक, पर्यटन, मौजमजा, टाईमपास, सहल अशा दृष्टिकोनातून येतात. त्यांच्याकडून किल्ल्यांच्या परिसरात अनेक गैरकृत्ये घडतात. किल्ल्यावर मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होतो. किल्ल्याच्या भिंतीवर मजकूर लिहिला जातो. किल्ल्यास हानी पोचवली जाते. किल्ल्याच्या तटबंदीचे दगड खाली फेकून दिले जातात. किल्ल्यावर फोटो काढणे आणि सर्वत्र फॉरवर्ड करणे अशा दृष्टीने किल्ल्यास पाहिले जाते. आजच्या तरुण पिढीकडून बेजबाबदारपणे किल्ल्याचे ऐतिहासिक मूल्य व पावित्र्य नष्ट होत आहे. बऱ्याचदा किल्ल्यांवर शालेय विद्यार्थ्यांच्या सहली येतात. त्यांच्याकडून किल्ल्याच्या वास्तूंना हानी पोचवली जाते. अशा विध्वंसक कृत्यांमुळे आणि वृत्तींमुळे किल्ल्यांना अवकळा प्राप्त झाली आहे असे खेदाने म्हणावे लागते. आपल्या समृध्द वारशाप्रती असा विध्वंसक

दृष्टिकोन निश्चितच भूषणावह नाही. त्यामुळे किल्ल्याबाबत जनतेमध्ये प्रबोधनाची गरज आहे. हे प्रबोधन सरकारव्दारे, बिगर शासकीय संस्थांव्दारे करता येऊ शकते. त्यासाठी नियोजनबध्द प्रयत्नांची गरज आहे. परदेशातील नागरिकांमध्ये इतिहासाविषयी व ऐतिहासिक स्थळांविषयी असणारे भान आपल्या समाजामध्ये उतरवणे ही काळाची गरज बनली आहे.

**किल्ले संवर्धनामुळे होणारे फायदे :**

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन आज एक चळवळ बनू पाहात आहे. किल्ले संवर्धन व जतन या विषयावर संपूर्ण महाराष्ट्रभर अनेक परिसंवाद, कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा होत आहेत. विविध दुर्ग तज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक यांच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्याचे शास्त्रीय पध्दतीने कसे संवर्धन करावे याबाबत कमालीची जागरुकता आणि सक्रियता निर्माण झालेली दिसून येत आहे. अनेक किल्ल्यांवर शासनाव्दारे संवर्धनाचे कार्य सुरु आहे तर विविध किल्ल्यांवर बिगर शासकीय स्वयंसेवी संस्था आपले योगदान देत आहेत. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या एका वाक्यात किल्ल्यांचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्य यांनी विशद करुन तत्कालीन काळातील किल्ल्यांचे अनन्यसाधारण स्थान व महत्त्व स्पष्टकेले आहे. आज एकविसाव्या शतकात किल्ल्यांचे सामरिक महत्त्व शून्य झाले असले तरी या महाराष्ट्र भूमीचा, मराठी माणसांचा आणि त्याच्या मनाचा मानबिंदू हे दुर्गच आहेत. आपला इतिहास, भूगोल, सभ्यता, संस्कृती इत्यादी सर्वांचे प्रतिबिंब आपणास या दुर्गांमध्ये पाहता येते.

महाराष्ट्रातील किल्ले ही आधुनिक तीर्थक्षेत्रे आहेत असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. सिंहगड, पुरंदर, पन्हाळगड, विशाळगड, रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, मुरुड जंजीरा, परांडा असे कित्येक गड आपणास आपल्या चैतन्यशील इतिहासाचे दर्शन घडवतात. अशा या किल्ल्याचे संवर्धन केल्यामुळे होणारे फायदे आपणास खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) आजघडीला महाराष्ट्रातील किल्ले अवशिष्ट स्वरुपात असले तरी आजही हे किल्ले आपले प्रेरणास्त्रोत आहेत. ज्या समाजाला इतिहास नसतो त्याला भविष्यही नसते असे म्हटले जाते. आपणांस अत्यंत वैभवशाली इतिहास लाभलेला आहे आणि या इतिहासाचे मूर्तीमंत प्रतीक म्हणजे हे किल्ले होय. आपल्याला लाभलेला हा अमूल्य ऐतिहासिक ठेवा जाणून घेणे, त्याचे जतन करणे हे आपणास किल्ले संवर्धनामुळे समजते.

२) किल्ले संवर्धनामुळे किल्ल्याच्या परिसरातील इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, स्थापत्यशास्त्र, नाणकशास्त्र, सामरिकशास्त्र, जैविक विविधता इत्यादी विविध शाखांच्या अध्ययनास मदत मिळते.

३) किल्ले संवर्धनामुळे स्थानिक पर्यटन उद्योग वाढीस लागण्यास मदत होते. किल्ल्यांना भेट द्यायला येणाऱ्या पर्यटकांना निवासाची व्यवस्था, खाण्यापिण्याची व्यवस्था, फेरीवाले, फोटोग्राफी, पर्यटक मार्गदर्शक, वाहतूक व्यवस्था, दवाखाने, खरेदीसाठी मार्केटस् अशा विविध सेवा सुविधांव्दारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन स्थानिक अर्थकारणास चालना मिळते. त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होते.

४) किल्ल्यांच्या संवर्धनाव्दारे शालेय मुलांना विविध किल्ल्यांवर सहलीसाठी नेऊन आपल्या वैभवशाली समृध्द वारशाचे दर्शन घडवता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्यात इतिहासाविषयी आस्था, आत्मीयता निर्माण होते. त्यातून इतिहासाशी नाळ जोडली जाते.

५) प्रत्येक दुर्ग परिसरातील खाद्य संस्कृती, वेशभूषा संस्कृती, भाषा संस्कृती यांच्या विविधतेचा खुबीने उपयोग करुन घेऊन त्याच्या मार्केटिंगव्दारे मोठ्या प्रमाणावर आर्थिक उन्नती घडवता येऊ शकते.

६) किल्ल्यांच्या आसपासच्या खेड्यांमधील उत्पादित होणाऱ्या मालाचा चांगला उठाव करण्यासाठी ॲग्रो टुरिझमची केंद्रे शेतकरी विकसित करु शकतात. पर्यटनाच्या माध्यमातून किल्ल्यांच्या आसपासच्या ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था बळकट होऊ शकते.

७) प्रत्येक गडकिल्ल्यांच्या परिसरात वैविध्यपूर्ण औषधी वनस्पतींची उपलब्धता आहे. वनस्पतीशास्त्रज्ञांच्या एका टीमव्दारे सर्वेक्षण करुन प्रत्येक किल्ल्याच्या आसपास उपलब्ध असणाऱ्या औषधी वनस्पती शोधून काढून त्याचे एक स्वतंत्र उद्यान विकसित केले जाऊ शकते. त्यातून शेतकऱ्यांना हक्काचे रोजगाराचे साधन मिळू शकते व त्याचप्रमाणे जागतिक पातळीवरील आयुर्वेदाच्या प्रसारात ग्रामीण भागाचा मोलाचा हातभार लागू शकतो. याव्दारे शेतीला पूरक असे उद्योगधंदे खेड्यात निर्माण झाल्यामुळे ग्रामीण जनतेला खेड्यातच रोजगार उपलब्ध होऊ शकतो. पर्यायाने शहरांकडे वाढणारा ओघ कमी करता येऊ शकतो.

८) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप म्हणजेच सार्वजनिक - खाजगी - भागीदारी संकल्पनेव्दारे किल्ले संवर्धन योजना अत्यंत यशस्वीपणे राबविण्यास वाव आहे. या पी.पी.पी. संकल्पनेव्दारे किल्ल्याचे शास्त्रशुध्द पध्दतीने, निर्धारित वेळेमध्ये व दर्जेदार काम पूर्ण करता येऊ शकते. त्याचा फायदा पर्यटनवृध्दीसाठी नक्कीच होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळवण्यासारखे काम या योजनेव्दारे झाल्यास पर्यटकांची संख्या लक्षणीयदृष्ट्या वाढू शकते व भारतास परकीय चलनाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर होऊ शकते.

९) किल्ले संवर्धनाव्दारे पर्यटकांना आपल्या राज्याच्या सांस्कृतिक विविधतेचे दर्शन होते. त्यांना सामाजिक व सांस्कृतिक बाबींचे सखोल ज्ञान प्राप्त होते.

१०) किल्ले संवर्धन संकल्पनेमधून स्थापत्य कला, संगणकाचा वापर, नकाशा बनवण्याचे तंत्र, सर्वेक्षण, दस्तावेजीकरण, सर्वेक्षणाच्या विविध पद्धती, पुरातत्त्वीय सामग्रीचे विश्लेषण, किल्ल्यांचा इतिहास, नाण्यांचा अभ्यास, वनस्पतीसृष्टी व प्राणीसृष्टी यांचा सखोल अभ्यास अशा विविध उत्तमोत्तम करियरच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यातून चांगले अर्थार्जन होऊ शकते.

११) किल्ल्यांच्या संवर्धनामुळे राज्याला एक वेगळी ओळख मिळू शकते. राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाव्दारे याची मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धीकरुन, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर मार्केटिंग करुन, पर्यटकांना खेचता येऊ शकते.

१२) अभ्यासपूर्ण अशा पद्धतीने किल्ले संवर्धन केल्यास प्रादेशिक समतोल निर्माण होऊ शकतो. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या भागातही मोठ्या प्रमाणावर गिरीदुर्ग व स्थलदुर्ग आहेत. त्यांच्या संवर्धनाव्दारे प्रादेशिक असमतोल दूर करता येऊ शकतो.

१३) आपले वैभवशाली किल्ले आपल्या इतिहासाचे साक्षीदार आहेत. आपला हा सांस्कृतिक वारसा काळजीपूर्वक जतन करण्याची जबाबदारी नीट पार पाडल्यास भविष्यकालीन पिढ्यांना हा समृध्द वारसा पाहता येईल. भावी पिढ्यांसाठी हे किल्ले मार्गदर्शक ठरु शकतात. आपल्या ऐतिहासिक शक्तीस्थळांचा वारसा भविष्यकालीन पिढ्यांसाठी जतन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

१४) किल्ल्यांच्या संवर्धनामुळे वेगाने होणारा पर्यावरणाचा, जैविक विविधतेचा ऱ्हास थांबविता येऊ शकतो. शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करताना वनस्पतीजीवन, प्राणीजीवन यांच्या नैसर्गिक अधिवासाचे महत्त्व लक्षात घेऊन शाश्वत विकासाची संकल्पना प्रत्यक्षात आणता येऊ शकते.

१५) जगात सर्वत्र पुरातत्त्वीय वारसा स्थानांचे युध्दपातळीवर जतन होत आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रांचा वापर केला जातो आहे. मोठ्या प्रमाणावर त्याचे मार्केटिंग केले जात आहे. त्याचा उपयोग पर्यटन विकासात होत आहे. भारतात मात्र याबाबतीत उदासीनता आढळून येते. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत १ जुलै २०१२ रोजी भारतातील पश्चिम घाटाचा समावेश करण्यात आला आहे. या पश्चिम घाटामध्ये केरळ राज्यातील २०, कर्नाटक राज्यातील १०, तामिळनाडू मधील ५ आणि महाराष्ट्रातील कास पठार, कोयना व राधानगरी वन्यजीव अभयारण्ये,

चांदोली राष्ट्रीय उद्यान यांचा समावेश आहे. तत्पूर्वीच्या यादीत राज्यातील छत्रपती शिवाजी टर्मिनस, एलिफंटा-घाणापुरी लेणी, अजिंठा वेरूळ लेणी यांचा समावेश करण्यात आला आहे. जागतिक पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक सारे पर्यटनाचे आविष्कार एकत्र सामावलेल्या, विविध किल्ल्यांच्या माध्यमातून श्री शिवछत्रपतींचा गौरवशाली वारसा सांगणाऱ्या, हजारो वर्षांची पुरातत्त्वीय परंपरा जपणाऱ्या कोकणातील एकही ठिकाण यात नाही.[१०५] ही बाब निश्चितच गांभीर्याने विचार करायला भाग पाडणारी आहे. रायगड, राजगड, शिवनेरी यासारखे अव्दितीय किल्ले महाराष्ट्रात असूनही त्याचे जागतिक नकाशावर स्थान येण्यासाठी आपणास किती प्रयत्न करावे लागणार आहेत याचा आखाडा बांधता येतो. अत्यंत नियोजनबध्द अशा संवर्धनाच्या प्रयत्नांव्दारे आपणास आपल्या ऐतिहासिक वारशाला जागतिक पातळीवर प्रसिद्धी देता येऊ शकते.

१६) आधुनिक काळामध्ये पर्यटनाला गती मिळत आहे. त्यामुळे किल्ले संवर्धनामध्ये तीव्र इच्छाशक्ती दाखवल्यास किल्ल्यांवर पर्यटकांची वर्दळ निश्चित वाढू शकते. या स्थळांची माहिती व इतिहासविषयक ज्ञान पर्यटकांना मिळत असल्याने तेथील स्थानिक इतिहासावर प्रकाश टाकता येऊ शकतो.

**समृध्द सांस्कृतिक वारशाबाबत जनतेमध्ये जागृतीची आवश्यकता**

प्राचीन वारसा असलेली अनेक सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक स्मारके अथवा वस्तू किंवा वास्तू अवशेष संपूर्ण महाराष्ट्रात विखुरलेले आहेत. सद्यस्थितीत अनेक ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तू भग्नावस्थेत आहेत किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या स्मारकांची मोठ्या प्रमाणात नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांनी पडझड होत आहे. महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक वास्तूंबद्दल जनमानसामध्ये मोठ्या प्रमाणावर उदासीनता दिसून येते. आपल्याला प्राचीन

काळापासूनचा समृध्द ऐतिहासिक वारसा लाभला आहे, याचा अभिमान असायला हवा परंतु तो दिवसेंदिवस कमी होत चालल्याचे दिसते.

महाराष्ट्रात जवळपास ३५० पेक्षा अधिक किल्ले आढळून येतात. त्यातील फारच थोड्या किल्ल्यांचे व्यवस्थापन, देखभाल केंद्रीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग यांच्यामार्फत केले जाते. खरे तर हे सर्व किल्ले शासनाच्याच मालकीचे आहेत आणि महाराष्ट्राच्या या वैभवाची देखभाल, दुरुस्ती व संवर्धनाची जबाबदारी शासनाची आहे. परंतु शासकीय पातळीवरील दिरंगाई, उदासीनता आणि ठोस धोरणांच्या अभावामुळे गडकोटांची दुरावस्था दिवसेंदिवस वाढतच चालल्याचे दिसून येते. दुसऱ्या बाजूने विचार केल्यास मुळातच महाराष्ट्रात किल्ल्यांची संख्या प्रचंड असल्याने पुरातत्त्व विभागाला या सर्वच किल्ल्यांचे शास्त्रशुध्द पध्दतीने संरक्षण करणे अशक्य आहे असे म्हणावे लागते.

अशा वेळी महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाच्या जतनाबाबत, संवर्धनाबाबत समाजाने व्यापक प्रमाणावर पुढाकार घेणे गरजेचे आहे. आपल्या वारशाप्रती समाजाने काळजी दाखवली तरच त्याचे रक्षण होऊन ते टिकणार आहेत. अन्यथा आपणास या वारशाला कायमचे मुकावे लागेल. परंतु आजकालच्या आधुनिक जगामध्ये किल्ल्यांचा उपयोग सहली, पिकनिक, पर्यटन, मौजमजा करण्यासाठीच होत असल्याचे दिसून येते. कोणत्याही किल्ल्यावर बारकाईने पाहिल्यास पर्यटकांव्दारे धुडगूस घातलेला दिसतो त्यामुळे त्या किल्ल्याच्या ऐतिहासिक पावित्र्याला हरताळ फासला जातो. खरेतर किल्ल्यावर येऊन तेथील इतिहास, वैशिष्ट्ये, भूगोल, स्थापत्य, देवदेवता, स्थानमाहात्म्य यांचा सर्वांगीण आढावा घेतला जाणे अपेक्षित आहे. परंतु पर्यटक आपल्यामध्ये कसलेही नागरी भान किंवा सामाजिक भान नसल्याचे दाखवून देतात.

किल्ल्याच्या आसपासच्या परिसरात प्रचंड वेगाने वाढणारी हॉटेल्स, रेस्टॉरंटस् किल्ल्याच्या ऐतिहासिक मूल्याला धोका निर्माण करीत आहेत. अशा हॉटेल्समधील पर्यटक आपण एका ऐतिहासिक स्थळावर जात आहोत याचे भान विसरुन दंगा मस्ती करतात. दुर्दैवाने अशा लोकांना किल्ल्याची माहिती जाणून

घेण्यापेक्षा मौजमजा करण्यातच रस जास्त असतो. इतिहासाविषयी असलेली अनास्था हे या किल्ल्यांच्या उपेक्षेचे आणि विद्रुपीकरणाचे मुख्य कारण आहे असे सांगता येईल. एखाद्या गोष्टीविषयी आपल्याला अनास्था वाटू लागली की, आपल्याला त्या गोष्टीचा विसर पडू लागतो आणि मग त्या गोष्टीविषयी आपल्या ठिकाणी असलेली अस्मिताही लोप पावते, मग त्या गोष्टींची परक्यांनी विटंबना केली, तरीही त्याचे आपणास काहीही वाटेनासे होते. जिथे अस्मिता, राष्ट्रप्रेम लोप पावते, त्या राष्ट्राचा आणि राज्याच्या संस्कृतीचा नाश होतो. एवढे सारे परिणाम इतिहासाविषयीच्या अनास्थेमुळे होतात.[१०६]

आपल्या समृध्द ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशाबाबत जनतेने अतिशय सजग राहणे गरजेचे बनले आहे. आजच्या प्रचंड धावपळीच्या युगात वेगानेलोकसंख्या वाढणाऱ्या या काळात समाजातील सर्वच घटकांनी किल्ले संरक्षण, संवर्धन व जतन प्रकियेत सहभाग घेणे आवश्यक बनले आहे. संपूर्ण संवर्धन शासकीय यंत्रणेनेच करावे अशी अपेक्षा बाळगणे चुकीचे आहे. शासकीय यंत्रणेच्या मदतीने समाजाचा सहभाग किल्ल्यांच्या संवर्धनात भरीवपणे घेतला जाऊ शकतो.

**पुरातत्त्व खात्याची भूमिका व योगदान**

महाराष्ट्रामध्ये प्राचीन वारसा असलेली अनेक सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक स्मारके अथवा वस्तू वा वास्तू अवशेष आहेत. सद्यस्थितीत त्यातील अनेक स्मारके अथवा वास्तू नष्ट झालेल्या आहेत, भग्न पावलेल्या आहेत किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अशा स्मारकांची मोठ्या प्रमाणात नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांनी पडझड झालेली आहे. भारतामध्ये ऐतिहासिक वास्तूंबद्दल जनमानसामध्ये असलेली उदासीनता व सरकारचे दुर्लक्ष हे या पडझडीचे प्रमुख कारण आहे. हे जरी खरे असले तरी प्राचीन काळापासून धार्मिक स्वरुपाच्या वास्तूंचा जीर्णोध्दार करण्याची प्रथा अस्तित्वात आहे. काही मंदिरे व इतर धार्मिक वास्तूंची वेळोवेळी भारतात जीर्णोध्दार झाल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. परंतु हा प्रयत्न अगदी तोकड्या स्वरुपाचा होता. सद्यस्थितीत भारताच्या

कानाकोपऱ्यात विविध प्रकारचे स्तूप, विहार, लेणी, मंदिरे, मशिदी, समाध्या, किल्ले, वाडे, गढ्या व इतर तत्सम स्वरुपाच्या हजारो वास्तू भग्न अवस्थेत पाहायला मिळतात. भारतामध्ये ब्रिटिश लोकांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी प्राचीन भारतीय इतिहासावर विशेष करुन सांस्कृतिक इतिहासामध्ये विशेष आवड दाखविण्यास सुरुवात केली. शिवाय अनेक ब्रिटिश अभ्यासकांनी तो आपल्या संशोधनाचा विषय केला व त्यांनी या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व संवर्धनाचा मुद्दा मांडण्यास सुरुवात केली. कारण ब्रिटिश भारतात येण्याअगोदरच युरोपमध्ये १६ व्या शतकापासून पुरातत्त्व संशोधनाची सुरुवात झालेली होती. विविध कला आणि विद्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी पुरातत्त्व खात्याच्या अंतर्गत प्रयत्न सुरु झालेले होते.

१८ व्या शतकात भारतात पुरातत्त्वीय संशोधनास सुरुवात झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या काही अधिकाऱ्यांना भारताच्या सांस्कृतिक वारशासंदर्भात कुतूहल होते. यातूनच रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉलची स्थापना १५ जानेवारी १७८४ रोजी झाली.[१०७] भारतातील पुरातत्त्व संशोधनाची ही सुरुवात होती असे म्हणावे लागते. या सोसायटी अंतर्गत एच. एच. विल्सन, फ्रान्सिस बुकनन यांनी प्राचीन भारतीय अवशेषांवर बरेच संशोधन केले. या अवशेषांचे व स्मारकांचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने इ.स. १८६० मध्ये ब्रिटिश सरकारने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याची स्थापना केली व अलेक्झांडर कनिंगहॅम ह्यांची या खात्याचे महानिदेशक (डायरेक्टर जनरल) म्हणून नेमणूक करण्यात आली.[१०८] कनिंगहॅम यांना भारतीय पुरातत्त्व संशोधनाचे जनक असे म्हटले जाते.

केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या अधीन असलेल्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाव्दारे देशाच्या सांस्कृतिक वारशाचे पुरातत्त्वीय संशोधन आणि संरक्षण केले जाते. राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्राचीन स्मारकांचे आणि पुरातत्त्वीय स्थळांचे संरक्षण करण्यासाठी संपूर्ण देश २४ सर्कलमध्ये विभागला गेला आहे. या २४ सर्कलव्दारे जवळपास ३६३६ राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकांचे

जतन व संवर्धन केले जाते.[१०९] भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई सर्कलव्दारे एकूण ११७ स्मारकांचे व पुरातत्त्वीय स्थळांचे जतन केले जाते.[११०] महाराष्ट्रातील सुमारे ३१७ किल्ल्यांपैकी ४७ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते या विभागाच्या अखत्यारीत आहेत. संशोधकाने निवडलेले पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड, विसापूर हे तीन किल्ले भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या ताब्यात आहेत. राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून या तीन किल्ल्यांचे रक्षण करणे, त्यांचे जतन, संवर्धन करणे केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या नियंत्रणाखाली सुरु आहे.

महाराष्ट्रामध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या अधीन पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे कार्य चालते. महाराष्ट्राचा आधारस्तंभ असलेल्या कलेच्या व संस्कृतीच्या वारशांचे जतन व संवर्धन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियम १९६० (१९६१ चा अधिनियम १२ वा) मधील कलम ३० व महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष नियम १९६२ मधील नियम ४५ ते ४९ यामधील तरतुदींनुसार राज्य संरक्षित स्मारकांचे जतन, संवर्धन व रक्षण करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी वैधानिक तरतूद करण्यात आली आहे.[१११]

१९७७ साली पुराभिलेख विभाग स्वतंत्र होऊन पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाची स्थापना झाली. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या पुरातत्त्व, जतन आणि संग्रहालये अशा तीन मुख्य शाखा आहेत. पुरातत्त्व शाखेची १) नागपूर २) औरंगाबाद ३) नाशिक ४) पुणे ५) रत्नागिरी ६) नांदेड येथे प्रादेशिक कार्यालये त्याचप्रमाणे १) अमरावती २) उस्मानाबाद ३) कोल्हापूर येथे उपकार्यालये आहेत.[११२]

महाराष्ट्रातील सुमारे ३१७ किल्ल्यांपैकी ४९ किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाले आहेत. संशोधकाने निवडलेले पुणे जिल्ह्यातील राजगड व सिंहगड हे दोन किल्ले यामध्ये समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झालेल्या किल्ल्यांचे रक्षण करणे, त्यांचे जतन संवर्धन

करणे पुरातत्त्व विभागाचे आद्य कर्तव्य आहे. याच जाणीवेपोटी व किल्ले हे महाराष्ट्र राज्याचे मानबिंदू व वैभव आहेत हे लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने ३० मार्च २०१५ रोजी गडसंवर्धन समिती गठित केली आहे.[११३] या समितीचा सल्ला घेऊन गड संवर्धन योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात सन २०१५-१६ मध्ये जतन दुरुस्ती करण्यासाठी १४ किल्ल्यांची निवड करण्यात आली. रत्नागिरी विभागातील शिरगावचा किल्ला, नाशिक विभागातील खर्डा किल्ला, गाळणा किल्ला, पुणे विभागातील तोरणा किल्ला, भुदरगड किल्ला, औरंगाबाद विभागातील अंतूर किल्ला, परांडा किल्ला, धारुर किल्ला, नांदेड विभागातील औसा किल्ला, कंधार किल्ला, माहूर किल्ला व नागपूर विभागातील नगरधन किल्ला, अंबागड किल्ला, माणिकगड किल्ला असे एकूण १४ किल्ले निवडले आहेत. याकामासाठी रु. ६०.७० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून रु. ३४.४२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. सदर कामे प्रगतीपथावर असून रु. ३०.०० कोटी इतका निधी खर्ची पडला आहे.[११४]

सांस्कृतिक कार्य विभागातर्फे महाराष्ट्र वैभव राज्य-संरक्षित स्मारक संगोपन योजना राबविण्यात येते. महाराष्ट्र प्राचीन स्मारके पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० च्या १५ व्या कलमातील तरतूदीवर आधारित महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना शा. नि. क्र. मवैयो - २२०५ / प्र. क्र. १०७/ सां. का. ३, अन्वये दि. २.२.२००७ रोजी सुरु करण्यात आली. सदर योजनेमध्ये राज्य संरक्षित स्मारकांचे जतन आणि संवर्धन करु इच्छिणाऱ्या संस्था, व्यक्ती, कार्पोरेट क्षेत्र व विश्वस्त मंडळे तसेच याविषयी अभ्यास असणाऱ्या व्यक्तींना सहभागी करुन घेता येते. पालकत्व स्वीकारणाऱ्या संस्था / व्यक्ती / संघटनेला स्मारकाच्या जतन, दुरुस्ती व देखभालीचा सर्व खर्च सोसून सांस्कृतिक संवर्धनाच्या कार्याला हातभार लावता येतो. स्मारकाच्या संगोपनार्थ १० वर्षांकरिता पालकत्व स्वीकारता येईल. यासाठी शासनाशी करार करावा लागेल. स्मारकाचे जतन, दुरुस्ती व सुशोभिकरण इ. कामासाठी पुरातत्त्व

व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने सुचविल्याप्रमाणे व त्यांच्या देखरेखीखाली काम करावे लागते.[११५]

आतापर्यंत या योजनेअंतर्गत, यशवंतराव चव्हाण यांचे जन्मस्थळ, देवराष्ट्रे, ता. कडेगाव, जि. सांगली व नळदुर्ग किल्ला, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद हा ऐतिहासिक किल्ला अशा दोन ऐतिहासिक वास्तू जतन व दुरुस्तीसाठी देण्यात आल्या आहेत.[११६]

महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनामध्ये अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. या संस्था किल्ल्यांची स्वच्छता व देखभाल स्वखर्चाने करीत आहेत. त्यांच्या या कामाला योग्य दिशा मिळावी, त्यांचे प्रयत्न पुरातत्त्व विभागाच्या धोरणाशी सुसंगत व्हावेत व या प्रयत्नांना शास्त्रशुध्द स्वरुप यावे यासाठी महाराष्ट्र शासनाने गड-संवर्धन समितीमधील सदस्यांच्या सहकार्याने मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी दुर्ग संवर्धन कार्यशाळा घेतल्या. त्यामध्ये दुर्ग संवर्धन कार्यात दुर्गप्रेमांची नेमकी भूमिका काय असावी, त्यांना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या करु नयेत याबाबत प्रबोधन करण्यात आले.[११७]

'राष्ट्रीय संरक्षित स्मारके' वगळता राज्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची असलेली प्राचीन व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या स्मारकांना राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात येतात. सदर स्मारकांच्या संरक्षण, जतन, दुरुस्ती व शुभोभिकरणाचे काम ऐतिहासिक किल्ले व धार्मिक स्थळे यांची देखभाल व संरक्षण या योजनेतून केले जाते.

राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झालेल्या वास्तूंची डागडुजी व दुरुस्ती इत्यादी कामे पुरातत्त्वीय तत्वाने म्हणजे वास्तू ज्या काळातील आहे त्या काळातील बांधकाम तंत्राचा वापर करुन करण्यात येतात. वास्तूचा एखादा भाग कमजोर होत असेल तर त्याला बळकटी आणली जाते. आतापर्यंत सदर योजनेखाली राज्यातील एकूण ३७१ स्थळे राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित झाली असून सदर स्मारकांच्या संरक्षण, जतन, दुरुस्ती व सुशोभिकरणाचे काम सुरु आहे.[११८]

गड संवर्धन योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात जतन-दुरुस्ती करण्यासाठी रत्नागिरी विभागातील पूर्णगड किल्ला, बाणकोट किल्ला, उंदेरी किल्ला, यशवंतगड किल्ला, भरतगड किल्ला, पुणे विभागातील कोयरीगड, किल्ला, रांगणा किल्ला, विशाळगड किल्ला, नाशिक विभागातील अंकाई किल्ला, टकाई किल्ला, साल्हेर किल्ला, मुल्हेर किल्ला, लळींग किल्ला व औरंगाबाद विभागातील वेताळवाडी किल्ला असे एकूण १४ किल्ले निवडण्यात आले आहे. या कामासाठी रू. ६३.१२ कोटी रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे व १४ मार्च २०१८ अखेर १९.९९ कोटी इतका निधी खर्ची पडला आहे.[११९]

महाराष्ट्रातील अमूल्य ऐतिहासिक ठेवा असणाऱ्या किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासन विविध उपक्रमांव्दारे प्रयत्नशील आहे. राज्यातील किल्ल्यांचे थ्री डी मॅपिंग, जीपीएस, जीआयएस, एरिअल फोटोग्राफी, थर्मल इमेजेस यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन गड किल्ले संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महाराष्ट्राच्या गड किल्ल्यांना 'युनेस्को' तर्फे 'जागतिक वारसा स्थळ' दर्जा मिळावा यासाठी सरकारने पावले उचलली आहेत.

**समारोप**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक ठेवा असणाऱ्या किल्ल्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. इतिहासाचे साक्षीदार असणाऱ्या किल्ल्यांची विविध नैसर्गिक व मानवनिर्मित घटकांमुळे दुरावस्था होत असल्याचे दिसून येते. किल्ल्यांचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करुन किल्ल्यांवरील मूळ बांधकामे जशी होती तशाच प्रकारे त्याची दुरुस्ती करुन जतन करण्यासाठी विविध आधुनिक पध्दतींचा वापर करता येऊ शकतो. जीपीएस, जीआयएस, थ्री डी मॅपिंग, टोटल स्टेशन सर्व्हे, थर्मल इमेजेस यासारख्या अत्याधुनिक तंत्रांव्दारे किल्ल्यांचे शास्त्रीय पध्दतीने जतन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पावले उचलली आहेत. किल्ल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी समाजाचाही सहभाग घेतला जात असल्याचे दिसून येते. त्याद्वारे किल्ले संवर्धन संकल्पना यशस्वी होऊ शकते. विविध स्वयंसेवी संस्थाही संवर्धनामध्ये आपले भरीव योगदान देत आहेत.

किल्ले संवर्धनामध्ये केंद्रीय पुरातत्त्व विभाग व राज्य पुरातत्त्व विभाग यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्रीय पुरातत्त्व विभागाव्दारे राज्यातील ४७ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यात पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड, विसापूर या तीन किल्ल्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधीन असलेल्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाव्दारे राज्यातील एकूण ३१७ किल्ल्यांपैकी ४९ किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यांचे संरक्षण व जतन दुरुस्तीचे काम सुरु आहे. महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी शासनाने गड संवर्धन समिती स्थापन केली आहे. या समितीने पहिल्या टप्प्यात १४ किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी सुचविले होते. त्यानुसार संवर्धनाचे कार्य पूर्ण होत आले आहे. दुसऱ्या टप्प्यात १४ किल्ल्यांचे संवर्धन केले जाणार आहे. त्याची कार्यवाही सुरु झाली आहे. यासाठी शासनाने पुरेशा आर्थिक निधीची तरतूद केली आहे. यापुढील प्रकरणात म्हणजेच प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणात किल्ले संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाने बजावलेल्या भूमिकेची व शासकीय ध्येयधोरणांची चर्चा आपण करणार आहोत.

## संदर्भ व तळटिपा


१. चिले भगवान, **दुर्गांच्या देशा**, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, जून २०११, पृ. १३-१४.

२. कुसूर हे गाव शिवनेरी किल्याच्या पायथ्याशी आहे.

३. किल्ल्यांवर प्रत्यक्ष भेटी देऊन केलेली पाहणी.

४. कित्ता.

५. जयंतकुलकर्णी, 'प्लॅस्टिक नावाचा भस्मासूर', **साप्ताहिक लोकप्रभा**, १७ जून, २०१६, पृ. २४-२५.

६. चंद्रकांतअभंग, 'जुन्नर परिसरातील किल्ले पाडण्यासंबंधीची ईस्ट इंडिया कंपनीची अप्रकाशित कागदपत्रे', **नवभारत**, जून २०१२, पृ. २९-३५.

७. कित्ता पृ. ३४.

८. ग. ह.खरे, **सिंहगड**, पुणे, १९६०, पृ. २९.

९. **Gazetter of the Bombay Presidency**, Poona District Gazetter, Vol. XVII, Part III, P-5.

१०. संदीपतापकीर, **महाराजांच्या जहागिरीतून**, पुणे, २०१२, पृ. १५२.

११. प्रविणभोसले, **सिंहगड व पुरंदर**, सांगली, २०१०, पृ. २९.

१२. महेशतेंडुलकर, **किल्ले अजिंक्यतारा वासोटा**, पुणे, २०१०, पृ. ९६-९७.

१३. ग. ह.खरे, **दुर्ग**, मुंबई, १९८०, पृ. ५२.

१४. कित्ता.

१५. श्रीदत्तराऊत, 'ठाणे परिसरातील गडकोटांचे संवर्धन', **दुर्गांच्या देशातून**, पुणे, २०१३, पृ. १०८.

१६. http://shivray.com/gad.kille-savardhan/restoration.

१७. सुहासजोशी, 'इथे ओशाळतील शिवराय', **साप्ताहिक लोकप्रभा,** २२ फेब्रुवारी २०१३, पृ. २६-२९.

१८. भगवान चिले, **वेध जलदुर्गांचा**, कोल्हापूर, सप्टेंबर २००८, पृ. १२.

१९. http://www.lokmat.com/storypage.php?catid=311&newsid=9332331, दि. १४ नोव्हेंबर २०१५.

२०. http://www.lokmat.com/storypage.php?catid=311&Newsid = 9308526, दि. १३ नोव्हेंबर, २०१५.

२१. http://www.lokmat.com/storypage.php?catid=902&Newsid = 7224642, दि. २० एप्रिल, २०१६.

२२. **दै. लोकसत्ता,** दि. ३० जुलै, २०१५, पृ. ६.

२३. http://www.lokmat.com/storypage.php?catid=301&Newsid = 7614820, दि. २८ ऑगस्ट, २०१५.

२४. http://www.lokmat.com/storypage.php?catid=16&Newsid = 1601856, दि. २९ जुलै, २०१४.

२५. **दै. लोकसत्ता**, दि. १५ जानेवारी २०१५, पृ. १०.

२६. www.esakal.com, दि. २ ऑगस्ट, २०१०.

२७. www.maharashtratimes.com, दि. १८ जानेवारी, २०११.

२८. www.maharashtratimes.com, दि. १ जून, २०११.

२९. सुहास जोशी, 'भ्रष्टाचाराच्या किल्ल्याला माहिती अधिकाराने खिंडार', **साप्ताहिक लोकप्रभा**, १० ऑगस्ट २०१२, पृ. ६-८.

३०. www.maharashtratimes.com, दि. २८ ऑगस्ट, २०१२.

३१. **दै. पुढारी**, दि. १ जुलै, २०१३, पृ. २

३२. **दै. महाराष्ट्र टाइम्स**, दि. २८ फेब्रुवारी २०१३, पृ. ४.

३३. **दै. सकाळ**, दि. ८ जून २०१४, पृ. ५.

३४. **दै. पुढारी**, दि. २४ नोव्हेंबर २०१४, पृ. ६

३५. **दै. महाराष्ट्र टाइम्स**, १२ सप्टेंबर २०१४, पृ. ४.

३६. **http://www.tarunbharat.com/p=81290 दि**. २३ मे, २०१४.

३७. **दै. सकाळ**, दि. ७ जून २०१४, पृ. १.

३८. **दै. लोकमत**, दि. ८ डिसेंबर, २०१४, पृ.८.

३९. **दै. लोकमत**, दि. ९ डिसेंबर, २०१४, पृ.९.

४०. **दै. लोकमत**, दि. १० डिसेंबर, २०१४, पृ.१०.

४१. **दै. लोकमत**, दि. ११ डिसेंबर, २०१४, पृ. १०.

४२. **दै. लोकमत**, दि. १२ डिसेंबर, २०१४, पृ. १०.

४३. **दै. लोकमत**, दि. १३ डिसेंबर, २०१४, पृ.९.

४४. **दै. लोकमत**, दि. १४ डिसेंबर, २०१४, पृ. ४.

४५. **दै. लोकमत,** दि. १५ डिसेंबर, २०१४, पृ. १०.

४६. **दै. लोकमत**, दि. १६ डिसेंबर, २०१४, पृ. ७.

४७. **दै. लोकमत**, दि. १७ डिसेंबर, २०१४, पृ.१०.

४८. **दै. लोकमत**, दि. १८ डिसेंबर, २०१४, पृ.५.

४९. **दै. लोकमत**, दि. २१ डिसेंबर, २०१४, पृ.८.

५०. **दै. लोकमत**, दि. २२ डिसेंबर, २०१४, पृ.१०.

५१. **दै. लोकमत**, दि. २३ डिसेंबर, २०१४, पृ.१०.

५२. **दै. लोकमत,** दि. २४ डिसेंबर, २०१४, पृ. १०.

५३. http://www.lokmat.com/storypage.php?catid=17&Newsid = 7433054,

दि. ०५ ऑगस्ट २०१५.

५४. http://www.lokmat.com/storypage.php?catid=298&Newsid = 8650141, दि. १६ ऑक्टोंबर, २०१५.

५५. दै. सकाळ, दि. १८ एप्रिल, २०१६, पृ. १.

५६. भगवान चिले, 'ट्रेकिंग छंद लाखमोलाचा',**साप्ताहिक सकाळ,** १४ मे, २०१६, पृ. ८-९.

५७. http://m.dailyhunt.in/news/india/Marathi/dainikprabhat-epaper-dainikprabhat, दि. २० जून, २०१७.

५८. http://www.thequint.com/india/2016/1213017 'shocking facts about Shivajis forts', दि. ६ जून, २०१७ पृ. १.

५९. कित्ता, पृ. २.

६०. कित्ता.

६१. कित्ता, पृ. ३.

६२. कित्ता, पृ. ४, पांडुरंग बलकवडे, प्रमुख मार्गदर्शक, महाराष्ट्र राज्य गड किल्ले संवर्धन समिती, यांचे मत.

६३. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/maharashtra-epaper Maharashtra, दि. २३ मे, २०१७.

६४. http://www.lokmat.com/storypage.php?catid=299&newsid= 18777467, दि. २० मार्च, २०१७.

६५. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/maharashtra-epaper-maharashtra, दि. १७ ऑगस्ट, २०१७.

६६. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/dainik+prabhat-epaper-dailyprabha, दि. १९ जून, २०१७.

६७. **दै. लोकमत**, २८ फेब्रुवारी, २०१७, पृ. ५.

६८. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/lokmat-epaper-lokmat, दि. १७ फेब्रुवारी, २०१७.

६९. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/lokmat-epaper-lokmat, दि. १७ फेब्रुवारी, २०१७.

७०. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/dainik+prabhat-epaper-dailyprabha, दि. १७ जुलै, २०१७.

७१. भगवान चिले, सदस्य, गड किल्ले, संवर्धन समिती, यांची दि. २२/०४/२०१५ रोजी स. ११ ते १२.३० या वेळेत कोल्हापूर येथे घेतलेली मुलाखत.

७२. सचिन जोशी, सदस्य, गड किल्ले संवर्धन समिती, यांची दि. १७/०७/२०१५ रोजी दु. ३.२० ते ४.३० यावेळेत पुणे येथे घेतलेली मुलाखत.

७३. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/dainik+prabhat-epaper, दि. ५ ऑगस्ट २०१७.

७४. सचिन जोशी, 'दुर्ग संवर्धन ही श्रींची इच्छा', **दै. लोकमत**, मंथन, पुरवणी रविवार दि. १३ सप्टेंबर २०१५, पृ. ४-५.

७५. कित्ता.

७६. राहुल मुंगीकर, **'संवर्धन की पायावर कुऱ्हाड'**, **दै. लोकमत,** मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०१५.

७७. सचिन जोशी, पूर्वोक्त पृ. ४-५.

७८. कित्ता.

७९. सचिनजोशी, 'गड-किल्ले संवर्धन समज-गैरसमज', **दै. महाराष्ट्र टाइम्स**, दि. २५ ऑक्टोबर २०१५.

८०. कित्ता.

८१. प्र. के. घाणेकर, सदस्य गड किल्ले संवर्धन समिती यांची दि. ५/१२/२०१४ रोजी सायंकाळी ५ ते ६ यावेळेत पुणे येथे घेतलेली मुलाखत.

८२. सचिन जोशी, **'गड-किल्ले संवर्धन समज-गैरसमज'**, पूर्वोक्त, पृ. ४-५.

८३. पांडुरंग बलकवडे, गड किल्ले संवर्धन समितीचे प्रमुख मार्गदर्शक, यांनी रविवार दि. २३ ऑगस्ट, २०१५ रोजी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य व गड संवर्धन समिती, महाराष्ट्र राज्य - आयोजित पुणे येथे गड संवर्धन आयोजित कार्यशाळेत व्यक्त केलेले मत.

८४. राहुल मुंगीकर, 'अभेद्य बुलंद', **दै. लोकमत,** मंगळवार दि. ६ ऑक्टोबर, २०१५.

८५. अमोल विद्यासागर व इतर, **उपयोजित इतिहास**, पुणे, २०१३, पृ. ६०-६१.

८६. http://en.wikipedia.org/wiki/geographic-information-system.

८७. http://mr.wikipedia.org/wiki/ ग्लोबल पोझिशनिंग, सिस्टीम.

८८. सचिनजोशी, पूर्वोक्त, पृ. ४-५.

८९. **दै. महाराष्ट्र टाइम्स**, २७ मे २०१२, इंटरनेट आवृत्ती.

९०. सचिनजोशी, पूर्वोक्त, पृ. ४-५.

९१. कित्ता.

९२. जयसिंगराव पवार, **आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध**, डोंबिवली, २०१०, पृ. २०.

९३. संजय देशपांडे, 'आपला वारसा आपली संस्कृती', **दै. लोकसत्ता**, दि. १७ नोव्हेंबर, २०१२ पृ. १.

९४. मालोजीराव जगदाळे, 'लंडनमधला सुवर्णदुर्ग', **दै. महाराष्ट्र टाइम्स**, दि. १७ जुलै, २०१५, पृ. ३.

९५. निनाद बेडेकर, 'दुर्गवैभवाची दुर्दशा', **दै. लोकमत**, दि. ८ डिसेंबर २०१३.

९६. बाबासाहेब पुरंदरे,'किल्ले दत्तक घेऊन जतन करा', **दै. तरूण भारत**, दि. २३ मे २०१४.

९७. http://www.loksatta.com/vasturang-news/ancestral-houses-conservation -1093547, दि. १८ एप्रिल, २०१५.

९८. संजय देशपांडे, पूर्वोक्त, पृ. १.

९९. प्र. के. घाणेकर, **अथातो दुर्ग जिज्ञासा**, पुणे, २००५, पृ. १६७-१६८.

१००. http://www.sahyadrimaza.com

१०१. **दै. तरुण भारत**, दि. ११ फेब्रुवारी २०१७, पृ. १.

१०२. प्र. न. जोशी, **आज्ञापत्र** (अमात्यकृत), पुणे, १९९७, पृ. ४१.

१०३. विजय देव (संपा), **दुर्गचिंतन**, पुणे २०१४, पृ. ११५.

१०४. प्र. के.घाणेकर, पूर्वोक्त, पृ. ९९.

१०५. धीरज वटेकर,'जागतिक नकाशावर कोकण', **दै. महाराष्ट्र टाइम्स**, दि. २७ सप्टेंबर, २०१६, पृ. ११.

१०६. सागर खरपुडे, 'गडकोट आणि आपण', **दुर्गांच्या देशातून**, पुणे, २०१३, पृ. ११४

१०७. लक्ष्मणशास्त्री जोशी, (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १२**, मुंबई १९७६, पृ. ३९६.

१०८. कित्ता.

१०९. http://hi.m.wikipedia.org/wiki/ भारतीय पुरातत्त्व - सर्वेक्षण - विभाग

११०. http://asi.nic.in/asi-monu-alphalist-maharashtra-mumbai-asp

१११. http://culturalmaharashtra.gov.in/culturalwebsite.html.

११२. कित्ता

११३. तेजस गर्गे, संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांच्याशी बुधवार दि.९ मे २०१८ रोजी दु. ३.१५ वा. झालेल्या मुलाखतीमधून मिळालेली माहिती.

११४. भा. वि.कुलकर्णी, (संपा.), **गड संवर्धनाच्या मार्गावर**, मुंबई, २०१७, पृ. ४.

११५. http://cultural.maharashtra.gov.in/pdf/info-of-puraskar-and-yojna.pdf.

११६. कित्ता.

११७. भा. वि.कुलकर्णी, (संपा.), पूर्वोक्त, पृ. ११३.

११८. http://cultural.maharashtra.gov.in./pdf/info-of-puraskar-and-yojna.pdf.

११९. संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती.

## प्रकरण सहावे

# किल्ले संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासन व समाजाची भूमिका

महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे संवर्धन उपक्रम खरेतर फार वर्षांपूर्वी सुरु व्हायला हवा होता. कारण शेकडो वर्षे नैसर्गिक आणि मानवी आपत्तींना तोंड देत हे किल्ले आपला इतिहास जपत उभे आहेत. विविध किल्ल्यांवरील वास्तू कशाबशा तग धरुन उभ्या आहेत. दिवसेंदिवस या वास्तूंची पडझड होतच आहे. सुधाकरराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी गड-संवर्धन समिती नेमली होती. परंतु १९९३ साली मुंबईतील बॉम्बस्फोट प्रकरणामुळे गड संवर्धन समिती व तिचे प्रस्तावित कार्य दुर्लक्षित राहिले.[१] त्यानंतर बरीच वर्षे शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत काही मोजक्याच किल्ल्यांची डागडुजी, दुरुस्ती व संवर्धनाचे कार्य सुरु होते. बाकी इतर किल्ले दुर्लक्षित अवस्थेतच होते. महाराष्ट्रातील सुमारे ३१७ किल्ल्यांपैकी ४९ किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाले आहेत. या किल्ल्यांचे संरक्षण, जतन, संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सांस्कृतिक कार्य मंत्री मा. विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखाली गड संवर्धन समिती नेमली आहे. या समितीव्दारे शास्त्रशुध्द पध्दतीने गड किल्ल्यांचे संवर्धन करण्यावर भर दिला जाणार आहे.

प्रस्तुत प्रकरणामधून संशोधकाने किल्ले संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका यावर प्रकाश टाकला आहे. महाराष्ट्र शासनाचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व विभाग, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग किल्ल्यांचे जतन, संरक्षण, संवर्धन यासाठी कसे प्रयत्नशील आहेत याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने गठीत केलेल्या गड संवर्धन समितीची रचना व कार्यकक्षा, समितीद्वारे करण्यात येत असलेले काम याचा सविस्तर तपशिल प्रस्तुत प्रकरणात देण्यात आला आहे. ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या विविध कायदेशीर तरतूदींचा आढावा संक्षिप्तपणे घेण्यात आला आहे. किल्ले संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग, औद्योगिक कंपन्यांचा

सहभाग, प्रसार माध्यमांची भूमिका व समाजाचे उत्तरदायित्व याची सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात करण्यात आली आहे.

**पर्यटन व सांस्कृतिक खात्याकडून होणारे प्रयत्न**

महाराष्ट्र हे पर्यटकांसाठी विविध प्रकारची पर्यटन स्थळे असणारे एक महत्त्वाचे राज्य आहे. राज्याला ७२० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. पश्चिम घाट आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये थंड हवेची ठिकाणे आहेत. तसेच अर्धसदाहरित आणि पानगळ अरण्ये तसेच जलाशये आहेत. घनदाट वनसंपदा लाभलेला महाराष्ट्रातील विदर्भ अनेक वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास बनला आहे. विदर्भातील वनांना वन्यजीव अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

आज २१ व्या शतकामध्ये पर्यटन व्यवसायास प्रचंड महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. एक प्रचंड वेगाने वाढणारे क्षेत्र म्हणून या उद्योगाकडे पाहिले जाते. सर्वच देशांच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीमध्ये हा उद्योग महत्त्वाचा ठरत चालला आहे. पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अर्थार्जन, वाहतूक व दळणवळण क्षेत्राला प्रोत्साहन, विविध औद्योगिक संस्था, फलोत्पादन, शेती, हस्तकला, हॉटेल्स, मनोरंजनात्मक सुविधा, निवासाच्या सुविधा, फोटोग्राफी, पर्यटन स्थळांची माहिती देणारे गाईड्स, व्यापार उदिम इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल झालेले आहेत. त्यामुळे सर्वच देशांना परकीय चलन मिळविण्याची सुसंधी प्राप्त झाली आहे. पर्यटनामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्याने अर्थव्यवस्था बळकट होते. तसेच पर्यटन क्षेत्रामुळे प्रादेशिक विकास मोठ्या प्रमाणावर होतो. नव्या नोकऱ्या निर्माण होतात. व्यापार, उद्योगाला चालना मिळते. सांस्कृतिक देवाणघेवाण होऊन सामंजस्य वाढीस लागते. विविध सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन होते. देशातील पायाभूत सुविधांचा विकास होतो. राष्ट्रीय एकात्मता व बंधुभाव वाढीस लागतो.

अशा प्रकारचा जागतिक त्याचप्रमाणे प्रादेशिक विकास डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र शासनाने पर्यटन क्षेत्र व त्यातून लाभणाऱ्या संधी यांना महत्त्वाचे स्थान देऊन त्यातील क्षमता ओळखून पर्यटन क्षेत्र एक प्राधान्य क्षेत्र म्हणून निश्चित केले. महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने पर्यटनाला चालना देण्याचे काम शासकीय पातळीवर

१९६९ साली सुरु झाले. १९६९ मध्ये पर्यटन संचालनालयाची स्थापना करण्यात आली होती. तत्पूर्वी मंत्रालयातील प्रसिध्दी विभागात एका कक्षाव्दारे मर्यादित स्वरुपाचे कामकाज चालत होते. १९६९ मध्ये पर्यटन संचालनालयाची स्थापना झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असणारे विश्रामगृहे, बंगले इ. हस्तांतरीत करण्यात आले होते.

शासकीय स्तरावर पर्यटनाचा विकास जलद गतीने साधणे शक्य होणार नाही म्हणून स्वतंत्र 'स्वायत्त महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व २० जानेवारी १९७५ रोजी 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ' ची स्थापना कंपनी ॲक्ट १९५६ अंतर्गत करण्यात आली. स्थापना झाल्यानंतर पर्यटन संचालनालयाकडील सर्व स्थावर मालमत्ता हस्तांतरीत करण्यात आली व संचालनालयातील सर्व कर्मचाऱ्यांनाही महामंडळात समाविष्ट करुन घेण्यात आले. सुरुवातीला महामंडळाचे भाग भांडवल रु. ३ कोटी होते. आजरोजी ते २५ कोटी करण्यात आले आहे.[२] महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, औरंगाबाद व दिल्ली येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची विभागीय कार्यालये स्थापन करण्यात आली.[३] राज्यात पर्यटन व्यवसायाची नियोजित व योग्य वाढ साध्य करण्यासाठी व राज्यात उच्चतम पर्यटन साधनसंपत्ती असलेल्या क्षेत्राचा अग्रक्रमाने व जलदगतीने विकास होण्याच्या दृष्टीने उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी शासनाने राज्यातील पर्यटन व्यवसायास उद्योगाचा दर्जा दिला आहे.[४] त्यानुसार पर्यटन व्यवसायामध्ये हॉटेल्स, रिसॉर्ट्स, हेल्थफार्मस्, मोटेल, अपार्टमेंट हॉटेल्स, जलक्रिडा सुविधा प्रकल्प, कला आणि शिल्पग्राम, गोल्फ मैदान, शिबीर आणि तंबू सुविधा, मनोरंजन पार्क, लोहरज्जू मार्ग, वारसा हॉटेल, कन्व्हेन्शन सेंटर, गिरीस्थान विकास, मान्यताप्राप्त कॅराव्हॅन टुरिझम सहलीचे आयोजक, केंद्रशासनाच्या किंवा राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या वर्गीकरण समितीने वर्गीकृत करुन त्यास मान्यता दिलेले पर्यटन प्रकल्प अशा विविध पर्यटन प्रकल्पांना उद्योग म्हणून दर्जा दिला आहे.[५]

पर्यटन उद्योगास चालना मिळावी तसेच जिल्हास्तरावरील पर्यटन विकासाची कामे त्वरेने हाती घेऊन व प्रस्तावाची अंमलबजावणी प्राधान्याने व्हावी या हेतूने

स्थापन झालेल्या समितीच्या माध्यमातून पर्यटन विकासाच्या कामांची अंमलबजावणी प्राधान्याने व सातत्याने व्हावी या दृष्टिकोनातून संबंधित विभागीय आयुक्तांनी पुढील पाच वर्षांचा कालावधी लक्षात घेऊन एक प्रादेशिक पर्यटन विकास योजना जिल्हाधिकाऱ्यांच्या सहकार्याने तयार करण्याबाबतचा शासन निर्णय दि. ०९ जानेवारी २००४ रोजी झाला.[६] प्रादेशिक पर्यटन विकास योजना तयार करताना खालील बाबींवर भर देण्यात आला. ऐतिहासिक व वारसा स्थळांचे जतन, हस्तकला, लोककला, रोजगार निर्मिती, योग्य रस्ते, पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, आवश्यकतेनुसार विद्युतीकरण करणे. वैद्यकीय सुविधा, हॉटेल्स, इको टुरिझम योजना राबविणे, लोकांमध्ये पर्यटनाची आवड निर्माण करणे, जल क्रीडा पर्यटनाचा विकास साधणे. स्थानिक आदिवासी युवकांना गाईड म्हणून प्रशिक्षण देणे. विभागीय आयुक्तांनी प्रादेशिक पर्यटन विकास योजना तयार केल्यानंतर सदर योजनेला शासनाची मान्यता देण्यासाठी राज्यस्तरावर समिती गठित करण्यात आली. पर्यटन विकासाची कामे प्रभावीपणे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना रू. ५ लाख मर्यादेपर्यंत खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार देण्यात आले.[७]

शासन निर्णय, गृहविभाग क्रमांक एमटीसी २००४/७/प्र.क्र. ३०१ व ३३२/पर्यटन दि. २१/०८/२००४ अन्वये कोकण विकास पॅकेज अंतर्गत पर्यटन स्थळांचा विकास निधी वितरीत करण्यात आला. त्यानुसार रायगड किल्ल्यावरील हिरकणी-गडगवाडी रस्ता, रायगड पायऱ्यांची दुरुस्ती, रायगड पायऱ्यांना रेलिंग व पाचाड ते जिजामाता समाधी रस्ता इ. कामांसाठी ७८.४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. रत्नागिरी किल्ला परिसर विकास व रतनदुर्ग किल्ला संवर्धन व विकास यासाठी १२१.६४ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. थिबा किल्ल्याचा परिसर विकास व सुशोभिकरणासाठी ९१.२३ लाख रु. इतका निधी मंजूर करण्यात आला.[८] महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने शासन निर्णय विभाग, गृहविभाग क्र. एमटीसी/२००३/९/प्र.क्र.४८३/पर्यटन दि. ०७/०२/२००४ अन्वये शिवनेरी किल्ला व परिसर सुशोभिकरण प्रकल्प आराखड्यास मंजुरी दिली आहे. शासन निर्णय २ ऑगस्ट २००४ व १२ ऑगस्ट २००४ अन्वये वनविभागासाठी

२१३.०३ लाख रकमेचा निधी शिवनेरी विकासासाठी मंजूर केला आहे.[९] शिवनेरी किल्ला व परिसर विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाकडून आतापर्यंत खालीलप्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.[१०]

(लाखात)

| अ.क्र. | टप्पा/वर्ष | प्राप्त निधी | वितरीत निधी | खर्च | खर्चाची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्राप्त निधीशी | वितरीत निधीशी |
| १ | पहिला टप्पा सन २००३-०४ | १९७.०० | १९७.०० | १९७.०० | १०० | १०० |
| २ | दुसरा टप्पा सन २००६-०७ | २४४.९८ | २४०.९८ | २४०.९८ | १०० | १०० |
| ३ | तिसरा टप्पा सन २००७-०८ | ४००.०० | ४००.०० | ४००.०० | १०० | १०० |
| ४ | चौथा टप्पा सन २००८-०९ | २००.०० | २००.०० | २००.०० | १०० | १०० |
| ५ | पाचवा टप्पा सन २००९-१० | २१०.०० | २१०.०० | २१०.०० | १०० | १०० |
| ६ | सहावा टप्पा सन २०१०-११ | १०००.०० | १०००.०० | १०००.०० | १०० | १०० |
| ७ | सातवा टप्पा सन २०११-१२ | १९१.३६ | १९१.३६ | १०००.०० | १०० | १०० |
| ८ | आठवा टप्पा सन २०१२-१३ | ८०८.६४ | ८०८.६४ | | | |
| ९ | नववा टप्पा सन २०१३-१४ | १२००.०० | १२००.०० | १२००.०० | १०० | १०० |
| | एकूण | ४४४१.९८ | ४४३९.०६ | ४४४१.९८ | १०० | १०० |

यंत्रणानिहाय प्राप्त निधी व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :

(लाखात)

| अ.नं. | विभागाचे नांव | प्राप्त निधीचा तपशिल | | | खर्च | खर्चाची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाज पत्रकीय किंमत | पर्यटन विभागा कडून प्राप्त | यंत्रणानिहाय निधी वितरण | | प्राप्त निधीशी | वितरित निधीशी |
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३२३४.०७ | २३४२.२२ | २३४२.२२ | १८७२.३० | ७९.९३ | ७९.९३ |
| २ | वन विभाग | १४०१.९७ | १२२७.५० | १२२४.३८ | ९१३.६८ | ७४.६२ | ६५.१७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ग्रामीण पाणी पुरवठा, जि.प.पुणे | ६५.०१ | ४०.३४ | ४०.३४ | ४०.३४ | १०० | १०० |
| ४ | विद्युतीकरण | ६०.४० | ३८.७७ | ३८.७७ | ३८.७७ | १०० | १०० |
| ५ | पुरातत्त्व विभाग | १०१७.०० | ७८७.०० | ७८७.०० | २५७.०० | ३२.६५ | ३२.६५ |
| ६ | सौरउर्जा (कृषी विभाग) जि.प. पुणे. | ८.५३ | ६.१५ | ६.१५ | ६.१५ | १०० | १०० |
| | एकूण | ५७८६.९८ | ४४४१.९८ | ४४३९.०६ | ३१२८.२४ | ७०.४७ | ७२.७२ |

पुरातत्त्व विभागाकडून शिवकालीन कमानी मस्जिदीची दुरुस्ती, शिवजन्मस्थळाच्या जागेवर चबुतरा बांधणे, कडेलोट पॉईंट दुरुस्ती, हत्ती दरवाजापासून पाथवे तयार करणे इ. महत्त्वाची कामे झाली आहेत.

वनविभागाने वन संवर्धनाची कामे, किल्ल्याच्या पायथ्यापासून पठारापर्यंत दुतर्फा शोभिवंत झाडांची लागवड व बागांचे विस्तारीकरण आणि सुशोभिकरण केलेले आहे. किल्ल्यासभोवती संरक्षक भिंतीचे काम, वनसंवर्धनाची कामे इ. महत्त्वाची कामे केलेली आहेत.

महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीने शिवकालीन ८५ पध्दतीचे खांब बसविले आहेत. तसेच अपारंपरिक ऊर्जा विभाग, जिल्हा परिषद यांनी सौरदिवे बसविण्याची कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

किल्ल्याला भेट देणारे पर्यटक, झाडांना लागणारे पाणी, परिसरातील स्वच्छता गृहे, भविष्यातील लोकसंख्येचा विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी पाणीपुरवठ्याची सोय केलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पहिल्या व दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यातील शिवनेरी किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याची कामे व शिवनेरी प्रदक्षिणा मार्गांची कामे हाती घेतली होती ती पूर्ण झाली आहेत.[११]

वर्ष २०११-१२ मध्ये नवीन व अपूर्ण कामासाठी १००० लक्ष निधी प्राप्त झाला आहे.[१२] नवीन कामांसाठी वर्ष २०११-१२ साठी प्राप्त निधी पुढीलप्रमाणे.

१) सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, पुणे

| अ.क्र. | कामाचे नांव | या कार्यालयाकडून सन २०११-१२ मध्ये वितरित निधी | सद्यस्थिती | खर्च ३१/०१/२०१३ |
|---|---|---|---|---|
| १ | नारायणगाव-जुन्नर-मढ रस्ता किमी १४/०० ते १५/०० चौपदरीकरण करणे | ८५.०० | काम पूर्ण | ८५.०० |
| २ | जुन्नर हापुसबाग शिरोली येडगाव रस्ता प्रजिमा १ कि.मी. ४६/०० ते ४९/०० किमी ५०/०० ते ५१/०० व किमी ५२/०० ते ५५/०० रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | १२५.०० | काम पूर्ण | १२५.०० |
| ३ | जुन्नर (जुने बसस्थानकजवळ) स्वागत कमान बांधणे व चौक सुधारणा करणे | ४५.०० | काम पूर्ण | ४५.०० |
| ४ | शिवसृष्टीचे शिल्पासह बांधकाम करणे | ५०.०० | काम पूर्ण | ५०.०० |
| ५ | जुन्नर येथील माहिती व सुविधा केंद्र इमारतीचे उर्वरित बांधकाम करणे (प्रदर्शन गृहाचे बांधकाम करणे) ऐवजी ओझर रस्त्यावरील कारखाना फाटा ते ऐतिहासिक गिब्सन पार्ककडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा करणे. | १००.०० | काम पूर्ण | - |
| ६ | जुन्नर येथे क्रिडा संकुलाकडे जाणाऱ्या पोहोच मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरण करने किमी ०/०० ते १/५०० | ४५.०० | जागा नसल्याने दुसरे काम प्रस्तावित करणार | - |
| ७ | जुन्नर येथे ४ व्हीआयपी व ८ साधे कक्षाचे बांधकाम करणे | २००.०० | काम पूर्ण | २००.०० |
| | एकूण | ६५०.०० | - | ५०५.०० |

## २) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग (२०११-१२)

(लाखात)

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रस्तावित रक्कम | सन २०११-१२ मध्ये वितरण रक्कम | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | शिवाई मंदिर पुनर्जीवन | २५.०० | | |
| २ | पायवाटांच्या सुधारणा दरवाजा क्र. १ ते २, दरवाजा क्र. २ ते ३, हत्ती दरवाजा ते शिवाई मंदिर तसेच प्रसाधन गृहाकडे जाणारी वाट | १०४.०० | | |
| ३ | भिंतीवरील झाडे झुडपे काढणे | ३.०० | २००.०० | २००.०० |
| ४ | किल्ल्याच्या पडक्या भिंतीची दुरुस्ती | ३२.०० | | |
| ५ | इमारती दरवाजे यांचे पुनर्जीवन | १६.०० | | |
| ६ | जन्मस्थळ, राजवाडा परिसर येथे लँडस्केपिंग तसेच बागा, पायवाटा, विद्युतीकरण इ. कामे | ३०.०० | | |
| | एकूण | २१०.०० | | २००.०० |

## ३) वन विभागाकडील नवीन कामे (२०११-१२)

(लाखात)

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रस्तावित रक्कम | सन २०११-१२ मध्ये वितरित निधी | खर्च ३१/०१/२०१२ |
|---|---|---|---|---|
| १ | सी.सी.बी. तयार करणे | ११९.०० | | ११०.२५ |
| २ | पाणी साठवणूकीची कामे | २६.६९ | | १८.२५ |
| ३ | शिवनेरी किल्ले परिसरात उंच रोपांची लागवड करणे, पूर्व पावसाळी कामे व प्रथम वर्ष कामे | ६७.७६ | | ५२.११ |
| ४ | फेरो सिमेंट गॅबियन बंधारा तयार करणे. | १.५७ | | १.५७ |
| ५ | शिवनेरी किल्ल्याच्या पायवाटेचे बाजूला व १ ते ४ बागांमध्ये विविध प्रकारचे बँचेस, स्टूल, टेबल, डस्टबिन इ. बसविणे. (पर्यटकांसाठी विसावा) | २२.०० | १८०.६४ | |
| ६ | शिवनेरी किल्ल्यावरील घोडशाळेसमोर बांबू पॅगोडा तयार करणे. | २.०० | | २.०० |
| ७ | १) शिवनेरी किल्ल्यावरील वनस्पती, पक्षी, वन्यजीवन, जलसंधारण, पर्यावरण | ७.०० | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | संरक्षण, वृक्ष संरक्षण या विषयी पर्यटकांसाठी घोषवाक्य तयार करुन विविध ठिकाणी लावणे तसेच ऐतिहासिक, धार्मिक संदर्भासहित शास्त्रीय माहिती चित्रे व छायाचित्रे यांचे लॅमिनेटेड पोस्टर्स उभारणे.<br>२) शिवनेरी किल्ला व परिसराच्या ऐतिहासिक, धार्मिक स्थळांची तसेच परिसरातील पर्यावरण विषयक माहिती पुस्तिका पर्यटकांसाठी तयार करणे | | | |
| ८ | शिवनेरी किल्ल्यावरील मालमत्तेचे संरक्षण करणे तसेच पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी दोन दिवस पाळी व दोन रात्र पाळी रखवालदार नेमणे. | ३.२२ | | ०.०० |
| ९ | शिवनेरी किल्ल्याचे प्रदक्षिणा मार्गाच्या बाजूने उंच रोपांची लागवड करणे. | १८.७६ | | १५.८४ |
| | एकूण | २६८.०० | १८०.६४ | १८४.१८ |

४) वन विभागाकडील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी प्राप्त निधी (२०११-१२)

(लाखात)

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रस्तावित रक्कम | सन २०११-१२ साठी प्राप्त रक्कम | खर्च ३१/०१/२०१२ |
|---|---|---|---|---|
| १ | वन हद्दीवरील चेनलिंक फॅन्सिंगची कामे करणे | १२.७१ | १२.७१ | १२.७१ |
| २ | बांधकामांवरील देखभाल, संरक्षण व किरकोळ दुरुस्ती | ५.०० | ५.०० | ५.०० |
| ३ | नवीन विश्रामगृहाचे बांधकाम | २०.०० | २०.०० | ०.०० |
| ४ | नारायणगांव ओझर अॅप्रोच रस्ता करणे | ८.८५ | ८.८५ | ८.८५ |
| ५ | रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करणे | ८.०० | ८.०० | ८.०० |
| ६ | मजूर कल्याण निधी | ८.८० | ८.८० | ४.३४ |
| | **एकूण** | **६३.३६** | **६३.३६** | **३८.९०** |
| | **एकूण एकंदर** | **११९१.३६** | **१०००.००** | **१०००.००** |

शिवनेरी किल्ला परिसर विकास आराखडा दि. १५/०२/२०१४ पर्यंत खालीलप्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.[१३]

| अ.क्र | कार्यान्वयीन यंत्रणा | वर्ष | अंदाजपत्रकीय किंमत | मंजूर निधी | पर्यटन विभागाकडून प्राप्त निधी | या कार्यालयाकडून वितरीत निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम | २००४-०५ | २००.०० | २००.०० | १००.०० | १००.०० |
| | | २००६-०७ | ३३२.२५ | १७३.५० | १७३.५० | १७३.५० |
| | | २००७-०८ | ७३.७२ | ७३.७२ | ७३.७२ | ७३.७२ |
| | | २००८-०९ | १३९.०० | १३९.०० | १३९.०० | १३९.०० |
| | | २०१०-११ | ६५०.०० | ५५६.०० | ५५६.०० | ५५६.०० |
| | | २०११-१२ | ९४.०० | ९४.०० | ९४.०० | ९४.०० |
| | | २०१२-१३ | ८६४.१० | ५१८.६४ | ५१८.६४ | ५१८.६४ |
| | | २०१३-१४ | ९७५.०० | ४००.००<br>२३७.३६<br>५०.०० | ४००.००<br>२३७.३६<br>५०.०० | ४००.००<br>२३७.३६<br>५०.०० |
| | | एकूण | ३२३४.०७ | २४४२.२२ | २३४२.२२ | २३४२.२२ |
| २ | एम. एस.इ.बी. मंचर | २००४-०५ | २७.५४ | २७.५४ | १३.७७ | १३.७७ |
| | | २००६-०७ | ३२.८६ | २५.०० | २५.०० | २५.०० |
| | | एकूण | ६०.४० | ५२.५४ | ३८.७७ | ३८.७७ |
| ३ | कृषी विकास अधिकारी | २००६-०७ | ३.८८ | १.५० | १.५० | १.५० |
| | | २००७-०८ | ४.६५ | ४.६५ | ४.६५ | ४.६५ |
| | | एकूण | ८.५३ | ६.१५ | ६.१५ | ६.१५ |
| ४ | उपवनसंरक्षक जुन्नर टिप- अपूर्ण कामासाठी रू. ६३.३६ प्राप्त परंतु अंदाजपत्रके रू. ६०.२४ | २००४-०५ | २१३.०३ | २१३.०३ | १०६.५३ | १०६.५३ |
| | | २००६-०७ | २३७.६५ | २००.०० | २००.०० | २००.०० |
| | | २००७-०८ | १०५.९७ | १०५.९७ | १०५.९७ | १०५.९७ |
| | | २००८-०९ | १३९.०० | १३९.०० | ७१.०० | ७१.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्षची प्राप्त झाल्याने वर्ष २०१०-११ मधील निधीतून रु. ३.१२ लक्ष | २०१०-११ | २६८.०० | २४४.०० ९०.०० | २४४.०० ९०.०० | २४०.८८ ९०.०० |
| | | २०११-१२ | ८७.३६ | ८७.३६ | ८७.३६ | ८७.३६ |
| | | २०१२-१३ | २५०.०० | २००.०० ५०.०० | २००.०० ५०.०० | २००.०० ५०.०० |
| | | | ७२.६४ | ७२.६४ | ७२.६४ | ७२.६४ |
| | | एकूण | १४०१.९७ | १४०१.९७ | १२२७.५० | १२२४.३८ |
| ५ | ग्रामीण पा.पु. जि. प., पुणे | २००४-०५ | ४९.३५ | ४९.३५ | २४.६८ | २४.६८ |
| | | २००७-०८ | १५.६६ | १५.६६ | १५.६६ | १५.६६ |
| | | एकूण | ६५.०१ | ६५.०१ | ४०.३४ | ४०.३४ |
| ६ | पुरातत्त्व विभाग | २००३-०४ | १९७.०० | १९७.०० | १९७.०० | १९७.०० |
| | | २०१०-११ | २१०.०० | २००.०० | २००.०० | २००.०० |
| | | २०११-१२ | १०.०० | १०.०० | १०.०० | १०.०० |
| | | २०१२-१३ | ४००.०० | ९०.०० | ९०.०० | ९०.०० |
| | | | २००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |
| | | एकूण | १०१७.०० | ७८७.०० | ७८७.०० | ७८७.०० |

शिवनेरी किल्ला व परिसर सुशोभिकरण कार्यक्रम अंतर्गत सन २००४-०५ ते २०१३-१४ अखेर प्राप्त अनुदान व झालेल्या खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे.[१४]

(रुपये लाखात)

| अ.क्र. | वर्ष | मंजूर अनुदान | प्राप्त अनुदान | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २००४-०५ | २१३.०३ | २१३.०३ | २१३.०३ |
| २ | २००६-०७ | २००.०० | २००.०० | २००.०० |
| ३ | २००७-०८ | १०५.९७ | १०५.९७ | १०५.८५ |
| ४ | २००८-०९ | ७१.०० | ७१.०० | ७०.७८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | २००९-१० | १३७.४१ | १३४.५६ | ७८.०५ |
| ६ | २०१०-११ | २६८.०० | १८०.६४ | २२२.७२ |
| ७ | २०११-१२ | -- | ८७.३६ | -- |
| ८ | २०१२-१३ | ३००.०० | ३००.०० | ११४.५० |
| ९ | २०१३-१४ | ३१०.०० | २००.०० | ३५.११ |

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास कामांना व आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या दि. २१/०८/२००४ च्या शासन निर्णयानुसार, सातारा जिल्ह्यातील प्रतापगड या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी २५.०० लाख रु. मंजूर करण्यात आले.[१५]

सिंहगड येथे सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाने ४७०.११ लाखाची योजना मंजूर केली असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून विकास कामे सुरु करण्यात आली आहेत. सन २००६-०७ मध्ये शिवडी किल्ला, मुंबई, अकलूज येथील पुरातन किल्ला इ. ठिकाणी दुरुस्ती विषयक महत्त्वाची पर्यटन विकास कामे सुरु करण्यात आली. सन २००७-०८ मध्ये किल्ले भुदरगडचे काम हाती घेण्यात आले. सन २००८-०९ मध्ये शिवनेरी किल्ला परिसर विकास, मुरुड जंजिरा, सोनगिर, नळदुर्ग किल्ला व मच्छिंद्रगड किल्ल्याचा विकास इ. महत्त्वाची पर्यटन विकास कामे सुरु करण्यात आली. सन २००९-१० मध्ये पन्हाळा येथील रिसॉर्ट नूतनीकरण व रायगड किल्ला येथील टुरिस्ट रिसॉर्टसचे नूतनीकरण ही कामे सुरु करण्यात आली.[१६]

पर्यटन व सांस्कृतिक कार्य हे विषय एकमेकांस पूरक आहेत. पर्यटनाव्दारे सांस्कृतिक देवाणघेवाण होऊन सांस्कृतिक व कला क्षेत्रांचा विकास साधत असतो. या दृष्टीने पर्यटन व कला/ संस्कृती हे विषय एकमेकांच्या जिव्हाळ्याचे व एकमेकांस पूरक असून पर्यटन उद्योगास चालना देणारे व कला/संस्कृतीव्दारे पर्यटनाचा विकास साधणारे आहेत. त्यामुळे सांस्कृतिक कार्य व पर्यटन या विषयाचे स्वतंत्र अस्तित्व असल्याने मंत्रालयीन स्तरावर दोन्ही विभागांना पूरक अशा धोरणात्मक बाबींवर

निर्णय घेणे सोयीचे व्हावे यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्यासाठी मंत्रालयीन स्तरावर एक स्वतंत्र प्रशासकीय विभाग असणे अत्यंत गरजेचे होते. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्र. शाकानि-१००६/प्र.क्र. २३/२००६/१८ (र.व.का.), दि. ३१ मे २००६ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य हा स्वतंत्र प्रशासकीय विभाग स्थापन करण्यात आला आहे.[१७]

शासन निर्णय टीडीएस/२००६/प्र.क्र. २४/पर्यटन / मंत्रालय, मुंबई दि. ३०/०८/२००६ अन्वये २ कोटी रु. शिवनेरी विकासासाठी देण्यात आले आहेत. त्यानुसार शिवनेरी किल्ल्याचे सुशोभिकरण चालू आहे.[१८]

सन २००८-०९ प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत पुरंदर किल्ला व परिसर विकासासाठी एकूण ५.०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.[१९]

शासन परिपत्रक क्र. टीडीएस २०११/६/प्र.क्र. ४२१/ पर्यटन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. २३ जून २०११ अन्वये किल्ले सर्किटचे प्रकल्प कार्यान्वित व्हावे यासाठी तातडीने प्रथम पथदर्शी प्रकल्प शासनाला सादर करणेसाठी उपसचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, उपसचिव, (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, संचालक, पुरातत्त्व संचालनालय, कक्ष अधिकारी (सांस्कृतिक कार्य), व कक्ष अधिकारी, (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग या अधिकाऱ्यांचा कार्यगट गठीत करण्यात आला आहे. या कार्यगटाने दि. ३१/०७/२०११ च्या आत बैठका घेऊन किल्ले सर्किट पथदर्शी प्रकल्प पर्यटन विभागास सादर करावयाचा आहे.[२०]

सन २०११-१२ मध्ये प्रादेशिक पर्यटन विभागांतर्गत पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ला व परिसराच्या सुशोभिकरणाच्या १९१.३६ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी खर्च करण्यास मंजुरी देण्यात आली.[२१]

महाराष्ट्रातील १५८ किल्ल्यांचा विकास व संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग आणि महाराष्ट्र

वनविभाग यांच्यामध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला. त्यानुसार राजमाची, लोहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, राजगड, हरिश्चंद्रगड या ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन केले जाणार आहे. वनखात्यामार्फत सिंहगड आणि शिवनेरी या किल्ल्यांची दुरुस्ती व जतन करण्यात आले आहे अशी माहिती महाराष्ट्र वनविकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक अशोक खडसे यांनी दिली.

किल्ल्याभोवतीचा परिसर वनविभागाच्या अखत्यारीत येतो आणि किल्ल्यावरील पर्यटन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अखत्यारीत येते अशा परिस्थितीत हा सामंजस्य करार झाल्याने तीनही विभागाच्या सहयोगाने संवर्धनाचे कार्य केले जाईल अशी माहिती उपवनसंरक्षक राजेंद्र कदम यांनी दिली.[२२]

महाराष्ट्रातील पर्यटनक्षेत्राचा गतिमान विकास करण्यासाठी पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून गेल्या चार वर्षात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. पर्यटन क्षेत्राचा चौफेर विकास व्हावा म्हणून पर्यटन धोरण, २००६ आखण्यात आले. किल्ले मालिकेअंतर्गत शिवनेरी, राजगड, तोरणा, सिंहगड, लोहगड, राजमाची या किल्ल्यांचा पहिला पथदर्शी प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. या कामांमध्ये पर्यटकांना पायाभूत सुविधा देण्यात येणार आहेत.[२३]

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसांचे जतन करणे व राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन, देखभाल, सुशोभिकरण इत्यादी कामांसाठी सार्वजनिक सहभाग मिळवणे, संस्था / व्यक्ती यांना या स्मारकांचे पालकत्व घेणेकरिता प्रोत्साहित करणे, खाजगी क्षेत्रातील कौशल्याचा, ज्ञानाचा आणि अनुभवाचा जतन व दुरुस्ती कार्याकरिता उपयोग करुन घेणे या हेतूने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत ''महाराष्ट्र वैभव - राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना'' शासन निर्णय क्रमांक मवैयो-२००५/प्र.क्र.१०७/सां.का.३, दि. ०२/०२/२००७ पासून सुरु करण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या भूतकाळाच्या वैभवाचे प्रतीक असलेल्या स्मारकांचे जतन व संवर्धन करुन पुढील पिढीला आपल्या गौरवशाली संस्कृती आणि परंपरा यांची ओळख करुन देणेबरोबरच सार्वजनिक सहभाग मिळवणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. एखादे स्मारक या योजनेअंतर्गत

घेतल्यानंतर त्याची देखभाल/दुरुस्ती/सुशोभिकरण हे संबंधित संस्थेने करावयाचे असून त्या स्मारकाच्या संगोपनार्थ ५ वर्षांकरिता त्यांचे पालकत्व घेता येईल अशी योजना दि. ०२/०२/२००७ मधील २ (क) च्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली होती. शासन शुध्दीपत्र क्र. मवैयो २००७ / प्र.क्र. १०७ / सां. का. ३, मंत्रालय, मुंबई दि. २०/०७/२०१४ अन्वये स्मारकाच्या संगोपनार्थ १० वर्षांकरिता त्याचे पालकत्व घेता येईल अशी सुधारणा करण्यात आली. एखादे स्मारक या योजनेअंतर्गत घेतल्यानंतर त्याची देखभाल/दुरुस्ती/सुशोभिकरण हे संबंधित संस्थेने करावयाचे असून त्या संस्थेस येणारा खर्च ५ वर्षांच्या कालावधीत भरुन निघणार नसल्यामुळे आणि या योजनेस सर्वसामान्य व्यक्ती/संस्था यांचेकडून पुरेसा प्रतिसाद मिळावा या हेतूने कराराचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.[२४]

किल्ले जतन मालिका योजनेतील लोहगड, राजमाची व शिवनेरी या राष्ट्रीय संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीकरिता भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांना निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. वारसा जतन योजनेअंतर्गत राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीकरिता गेल्या चार वर्षात रु. १०० कोटी इतका निधी राज्यास मंजूर करण्यात आला आहे.[२] पर्यटन वाढीच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून भविष्यात पर्यटन विषयक प्रदर्शने भरविणे व पर्यटन विषयाला प्रोत्साहन देणे हे शासनाचे धोरण आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरेगाव येथील आऊट बाऊंड ट्रॅव्हल मार्ट आणि ट्रॅव्हल ॲन्ड टुरिझम फेअर यांच्या संयुक्त विद्यमाने का करावयाचे आहे.[२६]

केंद्रशासनाच्या पुरातत्त्व विभाग व राज्य शासनाच्या संयुक्त समन्वयाने महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांची पुनर्बांधणी, डागडुजी, ऐतिहासिक इमारतींची दुरुस्ती व विकास करण्याचे नियोजन सुरु आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १९ फेब्रुवारी २०१५ रोजी शिवनेरी गडावर आयोजित शिवजयंती कार्यक्रमात दिली.[२७]

राज्यातील गड व किल्ले यांचे जतन व संवर्धन करण्याकरिता मार्गदर्शन करण्यासाठी मा. मंत्री सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली गड संवर्धन समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली. सदर समितीवर मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असतील, श्री. निनाद बेडेकर व श्री. पांडुरंग बलकवडे हे प्रमुख मार्गदर्शक असतील व इतर १० सदस्य असतील. राज्यातील सर्व गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी सर्वंकष आराखडा करण्याचे कार्य या समितीव्दारे करण्यात येणार आहे.[२८]

औरंगाबाद जिल्ह्यातील पर्यटन संस्था, अस्तित्वात असलेली वारसा स्थळे, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू, स्मारके इत्यादी विचारात घेऊन औरंगाबाद जिल्हा 'पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित करण्यात आला आहे.[२९]

अमेरिकेतील अधिकाधिक पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अमेरिकेत प्रथमच पर्यटनाचे 'माहिती व नोंदणी कार्यालय' सुरु केले आहे. एमटीडीसी व्दारे अमेरिकेत सुरु करण्यात आलेल्या या कार्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधी म्हणून ऐश्वर्या कोकाटे यांची नेमणूक करण्यात आली आहे. याव्दारे एमटीडीसीने दरवर्षी किमान १ लाख अमेरिकन पर्यटकांना सोयीसुविधा देण्याबरोबरच महाराष्ट्रातील ऐतिहासिक वारसास्थळे, पर्यटन स्थळे या विषयी उपयुक्त माहिती पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.[३०]

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी व जनताभिमुख पर्यटन विकासासाठी एक सर्वंकष नियोजन आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. २०१५ साली एकात्मिक विकास आणि संवर्धन करण्यासाठी दहा किल्ल्यांची निवड करण्यात आली आहे. काही निवडक किल्ल्यांवर ध्वनी व प्रकाश कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. २०१५ साली रायगड किल्ल्यावर 'रायगड महोत्सव' राबविला जाणार आहे.[३१]

सन २०१५-१६ मध्ये प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत शिवनेरी किल्ला परिसर विकासाच्या विविध कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रु. ५.०० कोटी रु. इतका निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना उपलब्ध करुन देण्यास शासन मंजुरी देण्यात आली

आहे.[३२] गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्यसरकार कटिबद्ध असून, आगामी काळात यासाठी व्यापक पावले उचलली जाणार आहेत, राज्यातील ५ किल्ल्यांच्या संवर्धनासाठी १२ कोटी रुपयांचा विशेष आराखडा तयार करण्यात आला आहे, या संदर्भात राष्ट्रीय पुरातत्त्व विभागाशी बोलणी सुरु असून लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २१ जानेवारी २०१६ रोजी किल्ले रायगडावर आयोजित रायगड महोत्सवाच्या उद्‌घाटन सोहळ्यात दिली. त्यावेळी मा. विनोदजी तावडे यांनी किल्ले रायगडाला जागतिक पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले.[३३]

पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने नवीन पर्यटन धोरण २०१६ मध्ये २८५ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. या सोबतच रायगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग व इतर किल्ल्यांवर माहिती व मार्गदर्शन केंद्रे, अल्पोपहार केंद्रे, प्रसाधन गृहे इ. सुविधा पुरविल्या जाणार आहेत.[३४]

मागील काही दशकात पर्यटन क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती होऊन रोजगार निर्मितीत ७.७% एवढा मोठा वाटा उचलला आहे. रोजगार निर्मितीत हे क्षेत्र जगात दुसऱ्या क्रमांकावर येईल एवढी त्यात क्षमता आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राज्यामध्ये पर्यटन संचालनालय मुंबई येथे निर्माण करण्यात आले आहे. त्यांची यंत्रणा कार्यरत करण्यासाठी ९२.१४ लक्ष रुपयांना मंजुरी दिली.[३५]

पर्यटन खाते/महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, काही उच्च प्राथम्य असलेले प्रकल्प पीपीपी/जेव्ही (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप/जॉईंट व्हेंचर) तत्वावर सुरु करण्याबाबत उत्सुक आहे. त्यामध्ये विद्यमान किल्ले मालिकांसह जलदुर्ग मालिका पर्यटनस्थळांचा विकास याचा समावेश आहे. याशिवाय त्यामध्ये इतर दहा प्रकल्प समाविष्ट आहेत.[३६] भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभाग अंतर्गत सर्व ऐतिहासिक स्मारके, मुंबईतल्या वारसा इमारती इत्यादी राज्यातल्या वास्तू वारसा पर्यटन सर्किटचा भाग असणार आहेत.[३७]

संकल्पना आधारित पर्यटनामध्ये किल्ले/किल्ल्यांची मालिका याचा समावेश करण्यात आला आहे. किल्ले आणि किल्ल्यांच्या मालिकेच्या सभोवती स्वतंत्र पर्यटन उपक्रम तयार करण्यासाठी पर्यटन विभाग पर्यटन व्यावसायिकांना आमंत्रित करणार आहे. महाराष्ट्रातील वैभवशाली किल्ल्यांच्या इतिहासाशी संबंधित विशेष शैक्षणिक कार्यक्रम, ऐतिहासिक स्मारकस्थळांचा वैभवशाली भूतकाळ दाखवणारे लाईट शो, ॲनिमेशन शो तयार करणे, निवडक किल्ल्यांवर लाईट शो, सांस्कृतिक कार्यक्रम, किल्ल्यांच्या काही विशिष्ट भागांचे वारसा तत्वावरील हॉटेलांमध्ये रुपांतर, किल्ल्यांचे खास स्वरुपाची विवाहस्थळे म्हणून प्रचालन, किल्ल्यांच्या परिसरामध्ये बलून सफारी, सी प्लेन्सची त्याच्या आयोजकांमार्फत किल्ले मालिका परिसरात सफर, माहिती सेवा केंद्रे, करमणूक केंद्रे, स्वच्छतागृहे इत्यादी सार्वजनिक सुविधांची निर्मिती केली जाईल.[३८]

पर्यटन विभाग/महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ येत्या तीन वर्षांमध्ये राज्यभरातील सर्व महत्त्वाच्या पर्यटन स्थळांपाशी आणि मार्गांवर माहिती फलक लावेल. हे काम पीपीपी पद्धतीव्दारे केले जाईल.[३९]

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण संरक्षित महत्त्वाच्या स्मारकापर्यंतच्या दळणवळणामध्ये सुधारणा करणे, अशा पर्यटन स्थळांभोवती स्वच्छतेची खात्री करणे तसेच कॅन्टीनला सुविधा, स्मरणिकांची दुकाने आणि स्वच्छ स्वच्छतागृहे ठेवणे याला प्राधान्य दिले जाईल. तसेच मार्गदर्शक सेवा आणि निश्चित केलेल्या ठिकाणी आराम देणारे उपक्रम सुरु करण्यासाठी सुविधा पुरवेल.[४०]

भारत आणि जपानमध्ये पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून परस्पर सहकार्य करण्यासंदर्भात दि. १९ मे, २०१६ रोजी सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे बैठक झाली. जपानधील वाकायामा प्रशासकीय विभागाच्या शिष्टमंडळासोबत पर्यटन, फलोत्पादन क्षेत्रात सहकार्य करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. जपान आणि महाराष्ट्र यांच्यातील मैत्रीचे संबंध अधिक दृढ होत आहेत. जपानशी झालेले पर्यटनासंर्दभातील करार यापुढेही चालू ठेवण्यात येतील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पर्यटन विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील आठ कंपन्या

जपानमधील पर्यटन स्थळांची पाहणी करणार आहेत. टोकियोमध्ये जपानी पर्यटन केंद्राला जोडूनच एक भारतीय पर्यटन कक्ष सुरु आहे. अशा प्रकारचे एक पर्यटन कार्यालय औरंगाबाद येथे सुरु करण्यात येणार आहे.[४१]

महाराष्ट्रातील गड किल्ले आणि ऐतिहासिक वास्तूंची पाहणी करण्यासाठी जागतिक वारसास्थळ समिती, केंद्रसरकार, सांस्कृतिक मंत्रालय सल्लागार व भारत सरकार स्मारक प्राधिकरणच्या टीमने महाराष्ट्र दौऱ्यामध्ये किल्ले शिवनेरीला २७ मे २०१६ रोजी भेट दिली. त्यावेळी छत्रपती शिवरायांचे गड किल्ले प्रेरणास्थान असून या गडकिल्ल्यांची महती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यासाठी व किल्ले शिवनेरीसह राज्यातील किल्ले व जलदुर्ग यांचा जागतिक वारशामध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन युनेस्को वर्ल्ड हेरिटेज कमिटीच्या सदस्या डॉ. शिखा जैन यांनी केले.[४२] त्यासाठी लोकसहभाग घेण्यात येईल.[४३]

दि. १९ सप्टेंबर २०१६ रोजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांची राज्य पर्यटन ब्रँड ॲम्बेसिडर नियुक्ती केल्याची घोषणा केली.[४४] महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे नूतनीकरण व सौंदर्यीकरण करणे आवश्यक आहे. याकामी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून त्यास केंद्रीय पुरातत्त्व विभागाची परवानगी मिळणे आवश्यक असल्याची मागणी अर्थमंत्री श्री. मुनगंटीवार यांची श्री. महेश शर्मा यांच्याकडे केली. राज्यशासनाच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी केंद्राकडून आवश्यक ती मदत दिली जाईल असे आश्वासन श्री. शर्मा यांनी दिले.[४५]

महाराष्ट्रातील गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी गड किल्ले संवर्धन समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने रत्नागिरी मधील घेरापालगड (ता. खेड), महिपतगड (ता. संगमेश्वर) व बाणकोट (ता. मंडणगड) या किल्ल्यांना संरक्षित स्मारक म्हणून मान्यता देण्यात आली आहे.[४६]

रायगड किल्ल्यासह राज्यातील गड किल्ले व प्रसिद्ध गुहांच्या संवर्धन व सौंदर्यीकरण कार्याला येणाऱ्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी २७ फेब्रुवारी २०१७ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री डॉ. महेश शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथील परिवहन भवन येथे बैठक झाली.[४७]

या बैठकीत राज्यातील गड किल्ल्यांचे संवर्धन व सौंदर्यीकरण करण्यासाठी पंधरा दिवसांच्या आत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन डॉ. शर्मा यांनी दिले.[४८]

जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांना स्थान मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न सुरु केले आहेत. त्यासाठी रायगड राजगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, पद्मदुर्ग या सहा किल्ल्यांची प्राथमिक स्तरावर पुरातत्त्व विभागाकडून निवड करण्यात आली. या किल्ल्यांना जागतिक वारसास्थळ हा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम देखील सुरु झाले आहे.[४९]

रायगड किल्ला जतन, संवर्धन व पर्यटन विकास आराखडा, म्हैसमाळ, वेरुळ खुलताबाद, सुलीभंजन विकास आराखडा, लोणार (बुलडाणा) पर्यटन विकास आराखडा, माहूर देवस्थान (नांदेड) पर्यटन विकास आराखडा या राज्यातील चार पर्यटन विकास आराखड्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. रायगड किल्ला जतन, संवर्धन व पर्यटन विकास आराखडा ६०७ कोटी रुपयांचा असून पर्यटकांना / नागरिकांना किल्ल्याचा इतिहास जिवंत करुन दाखवण्यासाठी शिवसृष्टीसारख्या सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. गडावर विविध ठिकाणी आधुनिक पध्दतीची स्वच्छतागृहे बांधणे, घनकचरा व्यवस्थापन, रायगड किल्ल्यावरील सर्व वस्तूंचे डॉक्युमेंटेशन हद्दीचे सीमांकन अशा विविध कामांचा समावेश या आराखड्यात करण्यात आला आहे.[५०]

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला व इतर ऐतिहासिक किल्ले, लेण्या, प्रसिद्ध मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, अष्टविनायकांपैकी लेण्याद्री व ओझर ही दोन मंदिरे, नाणेघाट परिसर, जागतिक महादुर्बीण, आर्वी येथील दळणवळण उपग्रह त्याचप्रमाणे ऐतिहासिक नैसर्गिक व पारंपारिक वारसा लाभलेला जुन्नर तालुका विशेष पर्यटन तालुका म्हणून घोषित करण्यात आला आहे.[५१]

महाराष्ट्रातील संरक्षित किल्ल्यांचे शासकीय नोंदीनुसार दस्तावेजीकरण करण्यासाठी अत्याधुनिक अशा जीआयएस (GIS) तंत्रज्ञानाव्दारे थ्रीडी मॅपिंग (3D Mapping) करण्यात येणार आहे.[५२] छत्रपती शिवाजी महाराज यांची राजधानी रायगड

येथे रोपवेचा प्रयोग कमालीचा यशस्वी झाल्यानंतर आता सिंहगड किल्ल्यावर रोप वे सुविधा दिली जाणार आहे.

मुंबईत १८ ते २० फेब्रुवारी २०१८ दरम्यान पार पडलेल्या 'मॅग्नेटीक महाराष्ट्र' या गुंतवणूक परिषदेत रोपवेची संकल्पना मांडली गेली. खाजगी गुंतवणूकीतून हे काम केले जाणार असून रोपवे साठी ४१ कोटी रु. खर्च करावे लागणार आहेत. या रोपवे साठी ऑस्ट्रेलियन तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. गडाची जागा सध्या वन विभागाकडे आहे. रोपवेचा प्रस्ताव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) कडे सादर केला गेला असून त्याला लवकरच मान्यता दिली जाईल असे पीएमआरडीएचे किरण गित्ते यांनी सांगितले.[५३] औरंगाबाद येथील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी स्वतंत्रपणे औरंगाबाद पर्यटन आराखडा तयार करण्यात येत असून त्यासाठी ४४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सिंदखेड राजा या जिजाऊंच्या जन्मस्थानासाठी २५ कोटींची तरतूद करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.[५४]

सन २०१७-१८ मध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत अहमदनगर भुईकोट किल्ला येथील विविध विकास कामांसाठी रु. ४९३.४० लक्ष रक्कम जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यास शासन मंजुरी देण्यात आली.[५५]

**राज्य पुरातत्त्व खात्याकडून होणारे प्रयत्न**

महाराष्ट्रामध्ये सांस्कृतिक कार्य या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय कार्यरत आहे. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियम १९६० (१९६१ चा अधिनियम १२ वा) मधील कलम ३० व महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष नियम १९६२ मधील नियम ४५ ते ४९ यामधील तरतूदींनुसार राज्य संरक्षित स्मारकांचे जतन, संवर्धन व रक्षण करणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी वैधानिक तरतूद करण्यात आली आहे.[५६] शिवनेरी किल्ला भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या ताब्यात आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाने शिवनेरी किल्ल्यास संरक्षित वास्तू म्हणून घोषित केले आहे. शासकीय यंत्रणांमार्फत

शिवनेरी किल्ला व परिसर विकास करण्यात येत आहे. लोहगड व विसापूर किल्ल्याचे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून संवर्धनाचे कार्य सुरु आहे.

चाकण (संग्रामदुर्ग) किल्ला असंरक्षित किल्ला असल्याने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग व राज्य पुरातत्त्व विभाग यांच्याकडून किल्ल्याच्या संवर्धनासाठी प्रयत्न होत नाहीत. तरीही संग्रामदुर्ग या असंरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्ती करण्यासाठी तेराव्या वित्त आयोगाव्दारे मिळालेल्या निधीतून राज्य पुरातत्त्व विभागाने किल्ल्याच्या तटबंदीच्या दुरुस्ती कामासाठी एक कोटी रुपयांची तरतूद करुन दुरुस्ती काम केले आहे.[५७] चाकण किल्ला अत्यंत दुर्लक्षित अवस्थेत असून किल्ल्यात सर्वत्र भग्नावशेष दिसून येतात. हा किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित होण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे.[५८]

सिंहगड किल्ल्यावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे महानगरपालिका, राज्य पुरातत्त्व विभाग आणि वन विभाग या चार यंत्रणांमार्फत जतन, संवर्धन, दुरुस्ती व सुशोभिकरण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

राज्य पुरातत्त्व विभागामार्फत किल्ल्यावरील पाण्याच्या टाक्यांमधील गाळ काढून टाक्या स्वच्छ करणे, गडावरील विविध दरवाजांची डागडुजी व दुरुस्ती, पुणे दरवाजापासून भिंतीची दुरुस्ती इत्यादी कामे करण्यात आली आहेत. किल्ल्यावरील दारु कोठार, टेहळणी बुरुज या भागांची उत्खननाव्दारे दुरुस्ती करण्यात आली आहे. किल्ल्याच्या विविध भागांच्या पडझड झालेल्या ठिकाणी दरजा भरणे अशी जतन व दुरुस्तीची विविध कामे करण्यात आली आहेत.[५९] राज्य पुरातत्त्व विभागाने सन २०१६-१७ मध्ये सिंहगड किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीसाठी ५०.०० लाख रुपयांची तरतूद केली होती. ऑक्टोबर २०१६ अखेर जतन व दुरुस्तीच्या विविध कामांवर १२,३३,६१८ रु. खर्च करण्यात आले आहेत. सन २०१६-१७ मधील उर्वरित खर्च ३७,६६,३८२ रु. जतन व दुरुस्तीच्या विविध कामांवर करण्यात आला आहे. किल्ल्याच्या इतर अनेक महत्त्वाच्या जतन व दुरुस्ती कामांसाठी पुढील पाच महिन्यांसाठी अपेक्षित खर्च एक कोटी रुपये इतका आहे.[६०]

सिंहगड किल्ला पुणे महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर आहे. तरीही महानगरपालिकेने राज्य पुरातत्त्व विभाग आणि वन विभाग यांचेकडून सिंहगडावर सुशोभिकरण व विकास कामे करण्यासाठी विशेष परवानग्या घेऊन कामे सुरु केली आहेत. त्यासाठी जवळपास चार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेने प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८९ नुसार महानगरपालिकेच्या मुख्य सभेची मान्यता घेऊन सिंहगडावर संवर्धनाचे कार्य सुरु केले आहे.[६१]

पुणे महानगरपालिकेतर्फे सिंहगडावर नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ ठिकाणी स्वराज्य शिल्प उभारणे व नरवीर तानाजी मालुसरे समाधी विकसित करणे ही कामे निविदा मागवून सुरु करण्यात आली आहेत.

या प्रकल्पासाठी कामाचे आर्किटेक्ट सल्लागार यांनी रक्कम रु. ३.९९ कोटी रकमेचे पूर्वगणपत्रक केले असून आतापर्यंत जागेवर सुमारे ७०% सिव्हिल वर्क व सुमारे ७०% म्युरल्स व मेघडंबरीचे काम झाले आहे. सिव्हिल कामासाठी आतापर्यंत एकूण रक्कम रु. १,५४,४०,०००/- खर्च झाला असून म्युरल्सचे कामासाठी एकूण रक्कम रु. २६,३०,०००/- खर्च झाला आहे.[६२]

राजगड किल्ला राज्य पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात असून गडावर संवर्धनाचे काम सरु आहे. तेराव्या वित्त आयोगाद्वारे मिळालेल्या निधीतून पुरातत्त्व विभागाकडून राजगडावरील सदरेचे काम करण्यात येत आहे. साधारण सहा सात फूट उंच अशा दगडी चौथऱ्यावर सदरेची वास्तू उभी आहे. सदरेच्या वास्तूला सागवानी लाकडाची भक्कम चौकट बसवण्यात आली आहे. सदरेच्या वास्तूला उभे स्तंभ म्हणून चौकोनी लाकडाचा वापर करण्यात आला आहे. आतमध्ये छताचे काम अपूर्ण राहिले आहे. राज्य पुरातत्त्व विभागाने सन २०१६-१७ मध्ये ६२,१४,६००/- रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे.[६३] सदरचे स्तंभाचे व छताचे लाकडी काम पूर्ण करणे, याठिकाणी लोकांना राहण्यासाठी जागा निर्माण करणे, सदरेच्या पुढच्या भागात आधार भिंत उभी करणे, पाली दरवाजाच्या भिंतीची दुरुस्ती करणे, चोर

दरवाजाकडून येणाऱ्या मार्गाचे बांधकाम जुन्या पध्दतीने करणे अशी विविध कामे राज्य पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येणार आहेत.[६४]

राज्य पुरातत्त्व विभागाकडून राजगडावरील पाण्याची टाकी स्वच्छ करण्यात आली आहेत. सुवेळा माचीकडे जाणाऱ्या दरवाजा वरील लाकडी बांधकाम ढासळले होते, त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. किल्ल्याच्या तटबंदीची ज्या ठिकाणी पडझड झाली आहे, तिथे जतन व दुरुस्तीचे काम सुरु आहे. सुवेळा माचीजवळ उत्खनन करुन जीर्ण झालेले बांधकाम दुरुस्ती करुन पूर्ववत करण्यात आले आहे. भिंतीवर जागोजागी ज्या ठिकाणी दगडी बांधकामात फट पडली आहे तेथे दरजा भरण्यात आला आहे.[६५] राजगडावरील विविध स्थळांच्या ठिकाणी स्थानदर्शक फलक लावण्यात आले आहेत.

पुरंदर किल्ला सध्या भारतीय सेनेच्या ताब्यात आहे. भारतीय सेनेकडून गड संवर्धनाचे कोणतेही प्रयत्न होत नाहीत. हा किल्ला भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग व राज्य पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग या दोघांच्याही अखत्यारीत येत नाही. त्यामुळे हा किल्ला असंरक्षित आहे. गडाचा वापर केवळ सेना दलाच्या तळ विकासासाठी करण्यात येत आहे. गडावर सर्वत्र आर्मी ट्रेनिंग कॅम्पद्वारे विविध बांधकामे सुरु आहेत. शासन निर्णय क्रमांक टिडीसी २००९/१/प्र.क्र. २७/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ फेब्रुवारी, २००९ अन्वये प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत पुरंदर किल्ला व परिसर विकासासाठी डिसेंबर २००८ च्या अधिवेशनात स्वतंत्ररित्या पुरवणी मागणीव्दारे रुपये ५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित झालेला आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी पुरंदर किल्ल्याच्या ठिकाणी खालील कामांचे अंदाजपत्रक तयार केले आहे. या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना खालील कामे करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.[६६]

| अ.क्र. | कामाचे नाव | कार्यान्वयीन यंत्रणा | अंदाजित खर्च | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|---|
| | अ) रस्ते | | | |
| १ | रा.मा. ६३ ते नारायण पेठ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३८.०८ | ३८.०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | नारायण पेठ ते पुरंदर पेठ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १९९.४७ | १९९.४७ |
| ३ | पुरंदर गेट ते संभाजी हॉल | सार्वजनिक बांधकाम विभाग | ५८.५२ | ५८.५२ |
| | ब) फुटपाथ | | | |
| ४ | संभाजी हॉल ते किल्ला प्रवेशव्दार | सार्वजनिक बांधकाम विभाग | ६३.३७ | ६३.३७ |
| ५ | किल्ला प्रवेशव्दार ते केदारेश्वर मंदिर | सार्वजनिक बांधकाम विभाग | ९२.५६ | ९२.५६ |
| ६ | पुरंदर किल्ला परिसरातील फुटपाथ रस्ते व सौर दिवे | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण व पारेषण कंपनी | ३८.०० | ३८.०० |
| ७ | स्टोन चेक डॅमचे बांधकाम करणे | वनविभाग | १०.०० | १०.०० |
| | | एकूण | ५००.०० | ५००.०० |

सातारा जिल्ह्यातील प्रतापगड किल्ला असंरक्षित आहे.[६७] हा किल्ला खाजगी मालकीचा असून किल्ल्याचे संपूर्ण व्यवस्थापन छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट वंशज असलेल्या साताराचे छत्रपती खासदार उदयनराजे भोसले यांचेमार्फत पाहिली जाते.

२००७ मध्ये प्रतापगडावरील टेहळणी बुरुज व महादरवाजा माचीचा जीर्णोध्दार करण्यासाठी 'मायभवानी' सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कामास सुरुवात करण्यात आली. कौस्तुभ बुटाला यांच्या अध्यक्षतेखाली प्रतापगड जीर्णोध्दार समिती या बिगर शासकीय समितीची स्थापना करण्यात आली. एप्रिल २०११ मध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन समितीची बैठक झाली. या बैठकीत प्रतापगडासह पाच किल्ल्यांच्या जीर्णोध्दाराच्या कामास मंजुरी देण्यात आली. प्रतापगडाकरिता तेरा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. शासकीय कामकाज पध्दतीने कामांच्या ठरवलेल्या टप्प्यांनुसार कंत्राटी पध्दतीच्या माध्यमातून हा निधी सातारा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वितरीत केला जातो. जीर्णोध्दाराच्या कामाचे टप्पेही निश्चित करण्यात आले असून त्यानुसारच हा निधी खर्च करण्यात येत आहे. टेहळणी बुरुज आणि महादरवाजा माचीचे काम पूर्ण झाले

आहे. यशवंत बुरुजाचे काम लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.[६८] गडावरील भवानी मातेच्या मंदिराचे सुशोभिकरण करण्यात आले आहे.[६९]

अजिंक्यतारा किल्ला असंरक्षित असून भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, व राज्य पुरातत्त्व विभाग यांचेकडून किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीचे कोणतेही काम किल्ल्यावर केले जात नाही.[७०] राजमाता जिजाऊ जयंती व शाहू राज्याभिषेकाचा ३०९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सकाळ माध्यम समूहाने किल्ला संवर्धनाचे कार्य लोकसहभागातून हाती घेतले. श्रमदानातून सुमारे तीन हजार वृक्षांचे रोपण व संवर्धन कार्य करण्यात आले आहे. दक्षिण दरवाजा व पायऱ्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. अजिंक्यतारा विकास मोहिमेअंतर्गत किल्ल्यावरील तळ्यांचा विकास करण्यात येत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी राज्य पर्यटन विकास महामंडळाकडून त्यासाठी सव्वातीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन घेतला. त्यातील ४५ लाखांचा निधी उपलब्ध होऊन एका तळ्याचे काम सुरु झाले आहे.[७१]

सज्जनगड किल्ला असंरक्षित आहे.[७२] सज्जनगडाचे सर्व व्यवस्थापन, श्री रामदास स्वामी संस्थानच्या वतीने करण्यात येते. संस्थानाने महाराष्ट्र शासनाकडून सज्जनगडास 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त करुन घेतला आहे.[७३] महाराष्ट्र शासनाकडून 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त करुन घेण्यात आला आहे. त्यानुसार गडावरील विविध विकासकामांसाठी पहिला हप्ता ६० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पुढील विकास कामांसाठी लवकरच १ कोटी ३० लाख रुपये अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. युवक युवतींसाठी प्रतिवर्षी किर्तन प्रशिक्षण शिबीर व लहान मुलांसाठी संस्कार शिबीरांचे आयोजन करण्यात येते.[७४]

सज्जनगडावर छत्रपती संभाजी महाराजांनी बांधलेल्या समर्थ रामदास स्वामी यांची समाधी व श्रीराम मंदिरावरील जीर्ण शिखराचा श्री रामदास स्वामी संस्थानच्या वतीने जीर्णोध्दार करण्यात येत आहे. यामध्ये ३३३ वर्षापूर्वी बांधलेल्या शिखरावरील ४६ मूर्तींना ३० लाख रुपये खर्च करुन नवे रुपडे देण्यात येणार आहे. या जीर्णोध्दाराची माहिती संस्थानचे अध्यक्ष बाळासाहेब स्वामी यांनी दिली.[७५]

महाराष्ट्रातील राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झालेल्या किल्ल्यांचे रक्षण, जतन, संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गड संवर्धन समिती गठित केली आहे. या समितीचे अध्यक्ष श्री. विनोद तावडे मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) तर कै. श्री. निनाद बेडेकर हे प्रमुख मार्गदर्शक होते. त्यांच्या निधनानंतर श्री. पांडुरंग बलकवडे हे प्रमुख मार्गदर्शक असून इतर सदस्य खालील प्रमाणे आहेत.

श्री. ऋषिकेश यादव, श्री. राजेंद्र टिपरे, श्री. चंद्रशेखर शेळके, श्री. प्रमोद पाटील, श्री. भगवान चिले, श्री. वि. रा. पाटील, श्री. प्र. के. घाणेकर, श्री. सचिन जोशी, श्री. प्रफुल्ल माटेगावकर, श्री. संकेत कुलकर्णी, श्री. अमर आडके, श्री. अवधूत पै, श्रीमती मृदूला माने, श्री.चंद्रकांत अभंग, श्री. श्रमिक गोजमगुंडे, श्री. प्रविण भोसले तर सदस्य सचिव म्हणून संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय हे आहेत.

या समितीचा सल्ला घेऊन गडसंवर्धन योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात सन २०१५-१६ मध्ये जतन दुरुस्ती करण्यासाठी १४ किल्ल्यांची निवड करण्यात आली. या कामासाठी शिरगाव, खर्डा, गाळणा, तोरणा, भुदरगड, अंतूर, परांडा, धारुर, औसा, कंधार, माहूर, नगरधन, अंबागड, माणिकगड अशा एकूण चौदा किल्ल्यांची निवड करण्यात आली आहे. या किल्ल्यांवरील जतन-दुरुस्ती कामासाठी रु. ६०.७० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून रु. ३४.४२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. सदर जतन संवर्धनाची कामे प्रगतीपथावर असून रु. ३०.०० कोटी इतका निधी खर्ची पडला आहे.[७६] गडसंवर्धनाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये पुढील कामे हाती घेतली.[७७]

| अ.क्र. | विभागाचे नांव | जिल्ह्याचे नांव | किल्ल्याचे नांव | प्रशासकीय मान्यता दि. | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | रत्नागिरी | पूर्णगड | ०१/०८/२०१७ | ४९१०५७३५/- |
| | | रत्नागिरी | बाणकोट | ०१/०३/२०१७ | १९३२१७६०/- |
| | | रायगड | उंदेरी | २६/०२/२०१८ | ४४०६८५१२/- |
| | | रत्नागिरी | यशवंतगड | ०१/०३/२०१७ | ४८२८८४९७/- |
| | | सिंधुदुर्ग | भरतगड | ०१/०३/२०१७ | ४९९९१८००/- |
| २ | पुणे | पुणे | कोयरीगड | ०१/०३/२०१७ | ४८८६३१३९/- |
| | | कोल्हापूर | रांगणा | ०१/०३/२०१७ | ४९९३९४८१/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कोल्हापूर | विशाळगड | ०१/०३/२०१७ | ४९५४६१३१/- |
| ३ | नाशिक | नाशिक | अंकाई | ०१/०३/२०१७ | ४९७७६७५६/- |
| | | नाशिक | टकाई | ०२/०३/२०१७ | ४६७५३७९७/- |
| | | नाशिक | साल्हेर | १३/११/२०१७ | ४६१२४५६३/- |
| | | नाशिक | मुल्हेर | १३/११/२०१७ | ४९८९४८०६/- |
| | | धुळे | लळींग | २१/११/२०१७ | ३८७२२५५७/- |
| ४ | औरंगाबाद | औरंगाबाद | वेताळवाडी | ०१/०३/२०१७ | ४०८९३२९८/- |
| | | | | **एकूण** | **६३१२९०८३२/-** |

वरील १४ किल्ल्यांपैकी पूर्णगड, बाणकोट, यशवंतगड, भरतगड, कोयरीगड, रांगणा किल्ला, विशाळगड, अंकाई किल्ला, टकाई किल्ला व वेताळवाडी किल्ला या १० किल्ल्यांच्या कामांना शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रशासकीय मान्यता दिलेल्या १० किल्ल्यांपैकी कोयरीगड, रांगणा किल्ला, विशाळगड आणि वेताळवाडी किल्ला या ५ किल्ल्यांची कामे सुरु करण्यात आली आहेत. १४/०३/२०१८ अखेर यावर एकूण रु. १९९९९९६५/- इतका खर्च झाला आहे.[७८]

महाराष्ट्र शासनाने गडसंवर्धन समितीच्या सहकार्याने मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी दुर्ग संवर्धन कार्यशाळा घेतल्या. या कार्यशाळांमध्ये दुर्ग संवर्धन कार्यात दुर्गप्रेमींची नेमकी भूमिका काय असावी, त्यांनी कोणत्या गोष्टी करु नयेत व कोणत्या गोष्टी कराव्यात याबाबत प्रबोधन करण्यात आले.[७९] तसेच दि. १७ सप्टेंबर २०१६ ते १६ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत गड किल्ले स्वच्छता अभियान मोहिम राबविली गेली.[८०]

**केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून होणारे प्रयत्न**

भारत सरकारच्या केंद्रीय, सांस्कृतिक मंत्रालयाच्या अधीन असलेल्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाव्दारे देशाच्या सांस्कृतिक वारशाचे पुरातत्त्वीय संशोधन आणि संरक्षण केले जाते. राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्राचीन स्मारकांचे आणि पुरातत्त्वीय स्थळांचे संरक्षण करण्यासाठी संपूर्ण देश २४ सर्कलमध्ये विभागला गेला आहे. या २४ सर्कलव्दारे जवळपास ३६३६ राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकांचे जतन व संवर्धन केले जाते.[८१] भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई सर्कलव्दारे एकूण ११७ स्मारकांचे व पुरातत्त्वीय स्थळांचे जतन केले जाते.[८२] महाराष्ट्रातील सुमारे ३१७

किल्ल्यांपैकी ४७ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारकअसून हे या विभागाच्या अखत्यारीत आहेत. संशोधकाने निवडलेले पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, लोहगड, विसापूर हे तीन किल्ले भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या ताब्यात आहेत.

**१) शिवनेरी**

शिवनेरी किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असल्याने संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेसाठी आकर्षण ठरला आहे. शिवनेरी किल्ले संवर्धन आणि विकासाला २००३ मध्ये सुरुवात झाली. सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, पुणे, वनविभाग जुन्नर, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, जुन्नर, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. मंचर, सौर उर्जा (कृषि विभाग), जिल्हा परिषद, पुणे अशा एकूण ६ यंत्रणांमार्फत शिवनेरी किल्ला व परिसर विकास कार्यक्रमास सुरुवात झाली. सरकारच्या या विविध विभागांच्या समन्वयातून राबविलेला हा प्रकल्प किल्ले संवर्धनासाठी मार्गदर्शक ठरत आहे.

सन २००४ साली महाराष्ट्र राज्य सरकारने शिवनेरी किल्ल्याचे संवर्धन आणि परिसर विकास करण्यासाठी सिव्हिल डिपॉझिट स्किम अन्वये रु. १.९७ कोटी रुपयाचा निधी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कलला वितरीत केला. या निधीचा वापर करुन पुरातत्त्व खात्याने २००४ ते २००९ या काळात किल्ले संवर्धनाचे काम केले. पुरातत्त्व खात्याच्या या कामाची राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांकडून पर्यटकांकडून, स्थानिक जनतेकडून, प्रसारमाध्यमांकडून आणि लोकप्रतिनिधींकडून प्रशंसा झाली. राज्य सरकारने हे संवर्धनाचे कार्य पाहून शिवनेरी किल्ल्यास मूळ स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी वास्तूंची डागडुजी, जीर्णोध्दार, जतन करण्याचे ठरविले.[८३]

महाराष्ट्र शासनाने पुन्हा शिवनेरी किल्ल्याच्या संवर्धन व जतनासाठी ५.९० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन शासनाने हा निधी मंजूर केला आहे. जिल्हाधिकारी, पुणे आणि जिल्हा नियोजन

समितीचे सदस्य सचिव यांनी ५.९० कोटी रु. निधी महासंचालक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, नवी दिल्ली यांना हस्तांतरीत केला आहे.[८४]

महाराष्ट्र शासनाकडून ५.९० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यानंतर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने शिवनेरी किल्ल्याचे संवर्धन, जीर्णोध्दार व सौंदर्यीकरण करण्याचे नियोजन केले. संवर्धनाच्या प्रस्तावित कामास तज्ज्ञांच्या समितीने १७/०९/२०११ रोजी मान्यता दिली. तज्ज्ञांच्या शिफारशींनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करुन महासंचालकांच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आले. पुरातत्त्व संचालनालयाने कामाच्या खालील दोन अंदाजपत्रकांना मंजुरी दिली.

१) किल्ल्याच्या तटबंदीची भिंत, दरवाजे, महादरवाजा क्र. १ पासून हत्ती दरवाजापर्यंतचा पायरी मार्ग यांच्या संवर्धन आणि पुनर्उभारणीसाठी १९४७५०००/- रुपयांचा विनियोग करण्यात यावा.

२) शिवाई देवी मंदिर, अंबरखाना, किल्ल्याच्या तटबंदीची भिंत आणि हत्ती दरवाजापासून शिवाई देवी मंदिर पर्यंतचा पायरी मार्ग, किल्ल्यावरील लेणी, लाकडी दरवाजे, पडझड झालेल्या दरवाजांची बांधणी इ. संवर्धनाची आणि जीर्णोध्दाराची कामे करण्यासाठी ४१७५००००/- रुपयांचा विनियोग करण्यात यावा.[८५] नूतनीकरण करताना पायऱ्या या दगडात तयार केल्या आहेत. [८६]

अंदाजपत्रक क्रमांक २ नुसार खालील कामे करण्यात आली आहेत.

१) संवर्धनासाठी आवश्यक असणाऱ्या बांधकाम साहित्याची खरेदी करण्यासाठी रु. ७५०००००/- रकमेच्या निविदा मागविण्यात आल्या.

२) घोडशाळा असलेल्या ठिकाणचा दगडी चौथरा सुरक्षित करणे व अर्धवट बांधलेली दगडी भिंत काढण्याचे काम पूर्ण झाले.[८७]

भारतीय पुरातत्त्व खात्यामार्फत शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ, राजवाडा परिसर येथे लॅन्डस्केपिंग करण्यात आले आहे. कमानी मशिद, बुरुज, तटबंदी, कडेलोट यांचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

गडावरील पाण्याचे स्त्रोत जिवंत करण्यासाठी सुमारे ५६ टाक्यांमधील गाळ काढण्यात आला आहे.[८८]

शिवनेरी किल्ल्यावरील स्वच्छतागृहांच्या वार्षिक देखभालीसाठी सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ साली ३० नोव्हेंबर २०१५ पर्यंत एकूण ८३१५६/- रु खर्ची पडले आहे.[८९]

सन २०१७-१८ साली उपयोगी वस्तूंची खरेदी करण्यासाठी आणि स्वच्छतागृहांच्या दैनंदिन देखभालीसाठी ५००००/- रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[९०] शिवनेरी किल्ल्यावर पहारा ठेवणे आणि दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्मचारी नेमणे, किल्ल्याच्या विविध भागांमध्ये व वास्तूंवर उगवलेली झाडे झुडपे काढणे, दैनंदिन लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करणे, वीज बिले भरणे आणि किरकोळ दुरुस्ती कामे करणे इ. कामांसाठी सन २०१७-१८ साली ६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[९१]

शिवनेरी संवर्धन आणि विकास प्रकल्प अंतर्गत प्रमुख वास्तूंच्या संवर्धन आणि पुनर्उभारणीसाठी विविध टप्प्यांमधील कामांवर आतापर्यंत ६ कोटींचा खर्च झाला आहे. भविष्यातील कामांसाठी आणखी चार कोटींची गरज आहे. भविष्यात अंबरखाना इमारत संवर्धित करून या ठिकाणी संग्रहालय आणि राजवाड्याच्या विविध भिंती विशिष्ट उंचीपर्यंत बांधण्याचे नियोजन आहे.[९२]

शिवनेरी विकास प्रकल्पासाठी सन २००४ पासून सन २०१६-१७ अखेर ५५ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला. यातील ५४ कोटी १२ लाख रु. प्राप्त झाले असून त्यातील ५३ कोटी ६२ लाख रु. विविध संवर्धनाच्या कामांवर खर्च झाले आहेत.[९३]

शिवनेरीचे रुप पालटत असताना मूळ ऐतिहासिक गाभ्यास कोठेही धक्का न पोहोचू देता किल्ल्याचे संवर्धन उत्तम प्रकारे करण्यात येत आहे. अशा प्रकारे केंद्र व राज्य सरकार यांच्या आर्थिक मदतीमुळे शिवनेरीचे मूळ ऐतिहासिक रुप जपण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**२) लोहगड**

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई सर्कल अंतर्गत असणाऱ्या लोहगड किल्ल्याचे संवर्धन पुणे सबसर्कल कार्यालयामार्फत केले जात आहे. लोहगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी सन २०१२-१३ साली ६६०४० रु. २०१३-१४ साली ४३९८४५ रु., २०१४-१५ साली ३१४७६४ रु. व २०१५-१६ साली ३० नोव्हेंबर २०१५ पर्यंत २१३८९४ रु. खर्च करण्यात आले आहेत.[१४]

लोहगड किल्ल्यावर पहारा ठेवणे आणि दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्मचारी नेमणे, किल्ल्याच्या विविध भागांमध्ये व वास्तूंवर उगवलेली झाडे झुडपे काढणे, दैनंदिन लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करणे इ. कामांसाठी सन २०१७-१८ साली २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[१५]

संपूर्ण लोहगड किल्ल्यावर प्रारंभापासून महादरवाजा पर्यंत दगडी पायऱ्यांचा मार्ग उत्कृष्ट पध्दतीने बांधून काढण्यात आला आहे. किल्ल्याची तटबंदी, बुरुज ज्या ठिकाणी ढासळले होते ते पुन्हा बांधून काढण्यात आले आहेत. किल्ल्यावर जात असताना भारतीय पुरातत्त्व विभागाने लोहगडाचा स्थानदर्शक नकाशा लावला आहे. किल्ल्यावर असणाऱ्या शिवमंदिराचा जीर्णोध्दार तळेगाव दाभाडे येथील राजे शिवछत्रपती मंच या संस्थेमार्फत करण्यात आला आहे. या संस्थेने लोहगड किल्ला दत्तक घेऊन पुरातत्त्व खात्याच्या परवानगीने संवर्धनाचे कार्य सुरु ठेवले आहे. किल्ल्यावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी व किल्ल्याचे विद्रुपीकरण होऊ नये यासाठी जागोजागी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. किल्ल्याच्या संवर्धनासाठी आजपर्यंत साधारण १.५ कोटी रुपयांच्या आसपास खर्च करण्यात आला आहे. किल्ल्याच्या संवर्धनासाठी अजून वाव असून त्यासाठी भरघोस निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.[१६]

**३) विसापूर**

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग मुंबई सर्कल अंतर्गत पुणे सबसर्कल कार्यालयामार्फत विसापूर किल्ल्याचे संवर्धन केले जात आहे. विसापूर किल्ल्याच्या संवर्धनाच्या विविध कामांसाठी सन २०१२-१३ साली १५५३९७ रु., सन २०१३-१४

साली १७३३७० रु., २०१४-१५ साली १९४३७२ रु. व २०१५-१६ साली ३० नोव्हेंबर २०१५ अखेर ९३३५५ रु खर्च करण्यात आले आहेत.[९७]

विसापूर किल्ल्यावर पहारा ठेवणे आणि दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्यासाठी कर्मचारी नेमणे, किल्ल्याच्या विविध भागांमध्ये व वास्तूंवर उगवलेली झाडे झुडपे काढणे, दैनंदिन लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करणे इ. कामांसाठी सन २०१७-१८ साली २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[९८]

विसापूर किल्ल्यावरील शिवमंदिराचा जीर्णोध्दार करणे आणि शिवमंदिरासमोर दोन रेषांनी युक्त दगडी फरसबंदी बसविणे या कामासाठी ५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[९९] किल्ल्यावर जाण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पायऱ्यांचा मार्ग तयार करणे, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि पायऱ्यांच्या कडांचे रक्षण करण्यासाठी लहान भिंत बांधणे इ. कामे करण्यासाठी २०१७-१८ साली २ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.[१००]

पुरातत्त्व विभागाने किल्ल्यावरील अतिशय मोडकळीस आलेल्या शिवमंदिराचा जीर्णोध्दार व परिसराचे सुशोभिकरण यासाठी आतापर्यंत २३ लाख रु. खर्च केले आहेत. किल्ल्यावर संवर्धनाची विविध कामे करण्याची आवश्यकता असून सरकारकडून पुरेसा निधी उपलब्ध होण्याची गरज आहे.[१०१]

**वनविभागकडून होणारे प्रयत्न**

भारतीय संस्कृतीमध्ये वैदिक काळापासून वृक्ष संवर्धनास अनन्यसाधारण महत्त्व दिले गेल्याचे आढळून येते. पृथ्वीवरील सर्व सजीव, पर्यावरण, वातावरण या सर्वांच्या दृष्टीने जंगलाचे संवर्धन करण्यावर भर दिला गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील वनसंपदा जैविक विविधतेने अत्यंत समृध्द आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३ लाख ७ हजार ६९० चौ.किमी. आहे. आणि त्यापैकी ६१ हजार ९३९ चौ. किमी. क्षेत्र वनांखाली आहे. १९८८ च्या राष्ट्रीय वननितीनुसार एकूण भूभागाच्या ३३% एवढे क्षेत्र वन आच्छादनाखाली असणे आवश्यक आहे. मात्र महाराष्ट्रातील वन आच्छादनाचे प्रमाण सुमारे १६ ते १७ टक्के इतके आहे. राष्ट्रीय वननिती नुसारचे

उद्दिष्ट गाठण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज बनली आहे.[१०२]

महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक गड किल्ले यांचा समृध्द वारसा लाभला आहे. राज्यातील बहुतांशी किल्ले वन क्षेत्रांमध्ये आहेत किंवा या किल्ल्यांपर्यंत पोहोचण्याकरिता जाणारे मार्ग वनभागातून आहेत. दिवसेंदिवस पर्यटन क्षेत्राचा विस्तार वेगाने होत आहे. त्यामुळे किल्ल्यांना भेटी देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे. अशा पर्यटकांव्दारे मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती होते. वन क्षेत्रांमध्ये अनेक हॉटेल्स, रेस्टॉरंटस् भूछत्रांप्रमाणे उगवत आहेत. त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर आणि स्थानिक जैवविविधतेवर होत आहे. त्यावर मात करण्यासाठी आणि ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९९२ पासून संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम हाती घेतला आहे. स्थानिक जनतेला वन व्यवस्थापनामध्ये सहभागी करुन घेऊन संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सन २०११ पासून वनक्षेत्रांतील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाने स्थानिक समितीला अधिकार दिले आहेत. किल्ल्यांचे जतन करण्यासाठी पर्यटकांकडून उपद्रव प्रतिबंधात्मक प्रवेश शुल्क व चित्रिकरण शुल्क आकारण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना अधिकार देण्यात आले आहेत.[१०३] किल्ल्यांच्या स्थानिक परिसरातील पर्यटक मार्गदर्शकांना उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्यासाठी वनविभागाकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे. अशा प्रकारचा उपक्रम गाविलगड आणि नरनाळा येथे राबविला गेला आहे.[१०४]

वन क्षेत्रामध्ये असणाऱ्या ऐतिहासिक किल्ल्यांवर पर्यटन वृध्दी होण्यासाठी किल्ल्यांच्या पायथ्याशी असणाऱ्या १५ हजार गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. अशा गावांमधील जनतेचा सहभाग घेऊन किल्ले संवर्धनाचे कार्य सुरु आहे. भिमाशंकर जवळील भोरगिरी किल्ल्यावर गावकऱ्यांची मदत घेऊन किल्ले संवर्धनाचे कार्य सुरु करण्यात आले आहे. वनव्यवस्थापन समित्यांना मदत करण्यासाठी बिगर शासकीय संस्थांनी पुढे येणे

आवश्यक आहे. अशा संस्थांच्या मदतीने व्यापक प्रमाणावर किल्ले संवर्धनाचे कार्य पार पडता येऊ शकते. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकते.[१०५]

**१) शिवनेरी**

महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार यांनी शिवनेरी किल्ला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केला आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाने शिवनेरी किल्ल्यास 'संरक्षित वास्तू' म्हणून जाहीर केले आहे. शिवनेरीचा पर्यटन विकास आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व विभागाने जुन्नर वनविभागास शिवनेरीवर विकास कामे करण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिले.[१०६] वनविभागाकडे शिवनेरीचे ९७.५० टक्के क्षेत्र वनविभागाच्या आणि फक्त २.५० टक्के क्षेत्र भारतीय पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात आहे.[१०७]

शिवनेरी किल्ला व परिसर विकास सुशोभिकरण कार्यक्रमासाठी वनविभागाने २ कोटी रु. खर्च करुन शिवनेरीस आकर्षक स्वरुप प्राप्त करुन दिले आहे. शिवनेरी परिसर विकास कामांतर्गत जुन्नर वनविभागाकडून खालील कामे करण्यात आली आहेत.

**अ) बांधकाम**

शिवनेरी किल्ल्याच्या सभोवताली एकूण ६.८ किलोमीटर लांबीची संरक्षण भिंत, वन विश्रामगृह, १२५ आसन क्षमता असलेले प्रेक्षागृह, वन कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्याचे काम प्रस्तावित आहे.

**ब) जलसंधारणाची कामे**

सिमेंट नाला बांध, ३ माती नालाबांध,१२ गॅबियन स्ट्रक्चर, २६३ अनगड दगडी बांध, जलशोषक चर इत्यादी सुविधा तयार केल्या.

**क) मृद संधारण व वृक्षारोपणाची कामे**

गॅबियन जाळीचा वापर करुन दगडी सलग, समतल बांध, सी.सी.बी. वरील रोपांस ठिबक सिंचनाद्वारे पाणीपुरवठा, वृक्ष लागवड, ४५ हेक्टर क्षेत्रावर उंच रोपांची लागवड इत्यादी कामे झाली आहेत.

**ड) बागा व सुशोभिकरणाची कामे**

२८ हजार चौ. फूट लॉनचे पुनर्जीवन, किल्ल्यावर चार बागांचे संगोपन, पर्यटकांना त्याठिकाणी बसण्यासाठी बैठक व्यवस्था या सुविधा केल्या आहेत.

इ) संरक्षण वनकर्मचारी किल्ल्याचे दिवस रात्र आगीपासून संरक्षण करतात. प्रभावी संरक्षणामुळे किल्ल्यावरील जैव विविधतेत भर पडली आहे.[१०८]

**इतर झालेली कामे**

शिवनेरी किल्ल्यावर ३ इलेक्ट्रिक पंपांच्या सहाय्याने पाणी किल्ल्यावर नेले जाते. भारनियमनावेळी तीनही पंपाव्दारे सततचा पाणी उपसा होत नाही. त्यामुळे किल्ल्यावर अपुऱ्या पाण्याचा पुरवठा होतो यावर उपाय म्हणून वडज धरणावरील विहिरीवर सौर पंप बसविण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याचा साठा करण्यासाठी ६० हजार लिटरची टाकी बांधण्यात आली आहे. किल्ल्यावर शिवाई मंदिराजवळ २० हजार लिटरची टाकी बांधण्यात आली आहे. चौथऱ्यांवर १० किल्ल्यांच्या फायबरमधील प्रतिकृती करणे. दत्तमंदिराजवळ ६० हजार लिटरची पाण्याची टाकी उभारली. पर्यटकांसाठी चार दुर्बिणींची सोय, लहान मुलांना खेळण्यासाठी व मनोरंजनासाठी विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. [१०९] गार्डन विकसित करण्याचे काम, किल्ल्यावर संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत १४ दुकाने सुरु करण्यात आली, घोडशाळेसमोर बांबू पॅगोडा तयार करणे, वनस्पती, पक्षी, वन्यजीव, जलसंधारण, पर्यावरण रक्षण, वृक्ष संरक्षण या विषयी पर्यटकांसाठी घोषवाक्ये प्रदर्शित करुन लावण्यात आली आहेत, वन विभागाने किल्ल्याच्या पायथ्यापासून पठारापर्यंत दुतर्फा शोभिवंत झाडांची लागवड व बागांचे विस्तारीकरण आणि सुशोभिकरण केले आहे.[११०]

**२) सिंहगड**

वनविभागाने सिंहगड किल्ला संरक्षित क्षेत्र म्हणून जाहीर केला आहे. सिंहगड किल्ल्यावर वन संरक्षण समिती, घेरा सिंहगड, वनविभाग पुणे यांच्यामार्फत किल्ल्याचे ऐतिहासिक पावित्र्य रहावे, सौंदर्य टिकून रहावे, धूम्रपान, मद्यपान,

मांसाहार करु नये यासंदर्भात पर्यटकांसाठी सूचना फलक लावण्यात आले आहेत. पर्यटकांनी गडावरील पाण्याची टाकी व अन्य पाणस्थळातील पाणी दूषित करु नये यासाठी पर्यटकांना सूचना फलक लावण्यात आले आहेत.

सिंहगड किल्ल्यावर वनविभागाने एक विश्रामगृह बांधले आहे. विश्रामगृहाच्या परिसरात वृक्षारोपण व सुशोभिकरण केले आहे. किल्ल्याच्या परिसरात काही ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. किल्ल्यावर अनेक पाण्याची टाकी असून त्यातील पाणी या वृक्षांना दिल्याने झाडे उंच वाढलेली दिसून येतात.

वनविभागामार्फत किल्ल्यावर कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, प्लॅस्टिकचा वापर, धुम्रपान, मद्यपान, भिंतीवर, वृक्षांवर नावे लिहिणे अशी गैरकृत्ये होऊ नयेत यासाठी गंभीर सूचनांचे फलक पर्यटकांसाठी जागोजागी लावण्यात आले आहेत.[१११]

वनविभागामार्फत किल्ल्यावर जाण्यासाठी रस्ते तयार करण्यात आले आहेत. सिंहगडावरील वाहनतळ वनविभागामार्फत विकसित करण्यात आला आहे.[११२]

**३) प्रतापगड**

किल्ले प्रतापगडावरील विकसित करण्यात आलेल्या बागांचे सुशोभिकरण व परिसरातील साफसफाईचे कामकाज संयुक्त वनव्यवस्थापन समिती मार्फत केले जाते. जागोजागी कचरा कुंड्यांची सोय करण्यात आली आहे.[११३]

संयुक्त वनव्यवस्थापन समितीकडून प्रवेश शुल्क आकारण्यात येते. त्या शुल्काचा विनियोग प्लॅस्टिक निर्मूलन करणे, वृक्षारोपण, गड सुशोभिकरण करणे, सौर दिवे बसविणे, वृक्षारोपण केल्यानंतर झाडांचे रक्षण करणे, गॅस वाटप करणे, रस्त्याच्या कडेला मुरुम टाकणे, मोठ्या झाडांवर पट्टे ओढणे, पर्यटकांना बसण्यासाठी विसावा सिमेंट बेंच बसविणे, पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय करणे, जंगलांचे व किल्ल्यांचे वणव्यापासून रक्षण करणे, जंगल परिसरात बंधारे बांधणे, तारेचे कंपाऊंड उभे करणे, विविध माहिती फलक लावणे इ. विविध कामांसाठी करण्यात येतो. ही कामे शासन निर्णय क्रमांक एफडीएम २०११/प्र.क्र. १००/फ-पर्यटन, मंत्रालय, मुंबई दि. ०५/१०/२०११ नुसार करण्यात येत आहेत.[११४]

शासकीय सूचनांचे पालन न करणाऱ्यांना दंड रु. २००/- ते ५०००/- पर्यंत व योग्य ती कारवाई करण्याचा इशारा देण्यासंदर्भातला फलक लावण्यात आला आहे. किल्ल्यावरील विविध स्थळांचे सविस्तर दर्शन घडविण्यासाठी पर्यटक मार्गदर्शकांची सोय वनविभागाने केली आहे.[११५]

**४) अजिंक्यतारा**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, सातारा तर्फे सर्व्हे नं. ५०/अ-१ गटामध्ये स्मृति उद्यान साकारले आहे. या उद्यानाचे क्षेत्र २० हेक्टर इतके आहे.[११६] संपूर्ण उद्यानात विविध जातींच्या वृक्षांची लागवड केलेली दिसून येते.

**महाराष्ट्र राज्य गड संवर्धन समिती - रचना व कार्यकक्षा**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनाची नवीन पिढीला ओळख करुन देण्यासाठी तसेच राज्यातील गड व किल्ले यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्या अध्यक्षतेखाली गड संवर्धन समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार विचारांती शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१४/प्र.क्र. १५६/सां.का. ३, मंत्रालय, मुंबई दि. ३० मार्च २०१५ अन्वये, गड संवर्धन समिती स्थापन करण्यात आली आहे.[११७] शासनाने स्थापन केलेल्या गड संवर्धन समितीची रचना खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | अध्यक्ष |
| २ | श्री. निनाद बेडेकर | प्रमुख मार्गदर्शक |
| ३ | श्री. पांडुरंग बलकवडे | प्रमुख मार्गदर्शक |
| ४ | श्री. ऋषीकेश यादव | सदस्य |
| ५ | श्री. रार्जेद्र टिपरे | सदस्य |
| ६ | श्री. रार्जेद्र शेळके | सदस्य |
| ७ | श्री. प्रमोद पाटील | सदस्य |
| ८ | श्री. भगवान चिले | सदस्य |
| ९ | श्री. वि. रा. पाटील | सदस्य |
| १० | श्री. प्र. के. घाणेकर | सदस्य |
| ११ | श्री. सचिन जोशी | सदस्य |
| १२ | श्री. प्रफुल्ल माटेगावकर | सदस्य |
| १३ | श्री. संकेत कुलकर्णी | सदस्य |

**गड संवर्धन समितीची कार्यकक्षा-**

१) राज्यातील असंरक्षित गड, किल्ल्यांची जिल्हानिहाय माहिती तयार करणे.

२) राज्यातील सर्व गड-किल्ल्यांचा संवर्धन विषयक आराखडा तयार करणे.

३) राज्यातील सर्व गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी कोणकोणत्या विविध उपक्रमांचे आयोजन करुन जनजागृती करता येईल याबाबतचा सर्वंकष आराखडा तयार करणे.

४) गड किल्ल्यांचे संवर्धनासाठी स्थानिक व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी व युवक संघटना, महिला बचत गट यांना अधिकाधिक कशा प्रकारे सहभागी करुन घेता येईल याचाही आराखडा तयार करणे.

५) स्थानिक व्यक्ती व संस्था यांच्यामार्फत गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी दत्तक योजना तयार करणे व त्यानुसार गडकिल्ल्यांच्या ठिकाणी स्थानिक स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, शाळा, महाविद्यालये यांच्यामार्फत नियमित स्वरुपात स्वच्छता मोहीम कशाप्रकारे राबविता येईल याचा आराखडा तयार करणे.

६) गड किल्ल्यांच्या क्षेत्रात असणारे खाजगी उद्योजक, कला शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत त्या त्या गडकिल्ल्यांचे नकाशे तसेच इतर माहितीदर्शक फलक दर्शनी भागात लावता येतील याबाबतचा आराखडा तयार करणे.

७) गड किल्ल्यांची माहिती देण्यासाठी स्थानिक युवक-युवती यांची मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षण शिबीरे सुरु करणे.

८) वर नमूद केलेल्या कार्यकक्षा या उदाहरणादाखल देण्यात आल्या आहेत. त्या निर्देशाव्दारे या समितीचे अध्यक्ष यांनी निर्देशित केलेल्या सर्व गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी उपयोगी सूचना व योजना तयार करणे.

९) मा. अध्यक्षांनी सूचित केल्याप्रमाणे व निर्देशित केल्याप्रमाणे अहवाल तयार करुन शासनास सादर करावा.[११८]

**विविध कायदेशीर तरतूदी**

प्राचीन वारसा असलेली अनेक ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तू किंवा वास्तूंचे अवशेष संपूर्ण भारतामध्ये विखुरलेले आढळून येतात. भारतामध्ये ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी प्राचीन भारतीय इतिहासावर विशेष करुन सांस्कृतिक इतिहासामध्ये रस घेऊन संशोधनात्मक दृष्टीने ऐतिहासिक स्मारकांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. भारतातील समृध्द सांस्कृतिक वारशांच्या कुतूहलातून १५ जानेवारी १७८४ रोजी रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉलची स्थापना झाली. त्यानंतर भारतातील अवशेषांचे व स्मारकांचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने इ. स. १८६० मध्ये ब्रिटिश सरकारने 'भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण' खात्याची स्थापना केली. अलेक्झांडर कनिंगहॅम यांची या खात्याचे महानिदेशक म्हणून नेमणूक झाली.[११९]

भारतातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या स्थळांच्या सुरक्षिततेसाठी ब्रिटिश सरकारने विविध कायदे लागू केले. कारण अशा ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय स्थळांच्या ठिकाणी बेकायदेशीरपणे उत्खनन करुन तेथील शिल्पाकृती, कलाकृती व महत्त्वाच्या वस्तूंची चोरी केली जात होती. प्राचीन अवशेषांची नासधूस केली जात होती. त्यामुळे भारताच्या समृद्ध वारशाला धोका निर्माण होत होता. अशा ऐतिहासिक वास्तू व स्मारकांचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने खालील कायदे अंमलात आणले गेले. त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येतो.

१) १९ वा बंगाल रेग्युलेशन अधिनियम १८१० (Bengal Regulation XIX of 1810) भारतातील सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी लागू करण्यात आलेला हा पहिला कायदा होता. या कायद्यान्वये भारतातील कोणत्याही सार्वजनिक इमारतीची अथवा ऐतिहासिक अवशेषांची हानी वा गैरवापर करण्यास बंदी घालण्यात आली.

२) ७ वा मद्रास रेग्युलेशन अधिनियम १८१७ (Madras Regulation VII of 1817) या कायद्यानुसार कोणत्याही सार्वजनिक वास्तूंना धोका निर्माण झाल्यास अगर त्याचा गैरवापर झाल्यास हस्तक्षेप करण्याचा अधिकार सरकारला मिळाला.

३) **१८६३ चा कायदा** (The Act XX of 1863)

या पूर्वीच्या दोन कायद्यान्वये खाजगी मालकी असलेल्या ऐतिहासिक वास्तूंच्या संरक्षणाबाबत कोणतीही तरतूद नव्हती. त्यामुळे या कायद्यानुसार कोणत्याही ऐतिहासिक वास्तूला वा स्मारकाला धक्का पोहोचवणे यावर बंदी घालण्यात आली व ऐतिहासिक आणि प्राचीनत्व असलेल्या वास्तूंचे स्थापत्यशास्त्रीय मूल्य जतन करण्यासाठी सरकारला विशेष अधिकार मिळाले.

४) **गुप्तधन अधिनियम १८७८** (The Indian Treasure Trove Act 1878)

या कायद्यानुसार अपघाताने सापडलेल्या परंतु पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक मूल्य असणाऱ्या खजिना वा संपत्तीचे संरक्षण आणि जतन करण्याचा अधिकार सरकारला मिळाला. तसेच कोणत्याही ठिकाणी उत्खनन करावयाचे असल्यास त्याला पुरातत्त्व खात्याची मंजुरी घेण्याची अट घालण्यात आली. या कायद्यान्वये गुप्तधन व उत्खनित अवशेषांवर सरकारची मालकी असेल अशी तरतूद करण्यात आली.

५) **प्राचीन स्मारके संरक्षण अधिनियम १९०४** (The Ancient Monument Preservation Act. 1904)

या कायद्यांतर्गत वैयक्तिक अथवा खाजगी मालकी असलेल्या ऐतिहासिक स्मारकांचे प्रभावीपणे संरक्षण करण्याचे अधिकार सरकाला मिळाले.

६) **दुर्मिळ वस्तू व पुरावशेष निर्यात नियंत्रण कायदा १९४७** (The Antiquities Export Control Act 1947)

या कायद्यान्वये महासंचालकांना प्राचीन दुर्मिळ पुरावशेष यांच्या निर्यातीवर नियंत्रण ठेवण्याचा परवाना देण्यात आला. कोणत्याही ऐतिहासिक, दुर्मिळ मौल्यवान वस्तूच्या तस्करीला व आंतरराष्ट्रीय व्यापाराला आळा घालण्यासाठी या कायद्याची निर्मिती करण्यात आली.

७) **प्राचीन ऐतिहासिक स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष (राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे घोषित) अधिनियम १९५१** (The Ancient and Historical Monuments

and Archeological Sites and Remains (Declaration of National Imortance) Act 1951)

या कायद्यान्वये प्राचीन ऐतिहासिक स्मारके अथवा वास्तूंना राष्ट्रीय संरक्षित व राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे म्हणून घोषित करण्यात आले. त्याचबरोबर १९०४ चा सर्व प्राचीन व ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे संरक्षण कायदा पुर्नरचित करण्यात आला. त्यानुसार स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरविण्यात आले. या कायद्यानुसार ४५० स्मारके व पुरातत्त्वीय स्थळांचा नव्याने समावेश करण्यात आला.

८) **प्राचीन स्मारके व पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियम १९५८** (The Ancient Monuments and Archeological Sites and Remains Act 1958)

हा कायदा २८ ऑगस्ट १९५८ रोजी अंमलात आला. या कायद्यानुसार राष्ट्रीय महत्त्वाच्या प्राचीन, ऐतिहासिक स्मारकांचे व पुरातत्त्वीय स्थळांचे जतन करण्याच्या उद्देशाने, पुरातत्त्वीय उत्खननावेळी सापडणाऱ्या शिल्पांचे व कोरीव काम असलेल्या वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी नियमावली बनविण्यात आली.

९) **प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष अधिनियम १९५९** (The Ancient and Archeological Sites and Remains Act 1959)

या कायद्यान्वये प्राचीन ऐतिहासिक स्मारकांचे संरक्षण व संवर्धन करण्याची विशेष तरतूद करण्यात आली. हा कायदा १५ ऑक्टोबर १९५९ पासून अस्तित्वात आला. या कायद्यानुसार प्राचीन ऐतिहासिक स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे व अवशेष (राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे घोषित) अधिनियम १९५१ रद्द करण्यात आला.

१०) **ऐतिहासिक दुर्मिळ वस्तू, पुरावशेष व कलाकृती संपत्ती अधिनियम १९७२** (The Antiquities and Art Treasures Act 1972)

हा कायदा ९ सप्टेंबर, १९७२ रोजी अंमलात आला. या कायद्यान्वये स्थावर सांस्कृतिक मालमत्तेच्या आणि दुर्मिळ वस्तू व कलाकृतीच्या संवर्धनासाठी प्रभावी नियंत्रण ठेवण्याची तरतूद करण्यात आली. या कायद्यानुसार

मौल्यवान, दुर्मिळ, ऐतिहासिक वस्तू व कलाकृती संबंधित निर्यातीवर, व्यापारावर, तस्करीवर, आर्थिक गैरव्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यात आले.

११) **ऐतिहासिक दुर्मिळ वस्तू, पुरावशेष व कलाकृती संपत्ती अधिनियम १९७३** (The Antiquities and Art Treasure Rules 1973)

हा कायदा ऐतिहासिक दुर्मिळ वस्तू, पुरावशेष व कलाकृती संपत्ती अधिनियम १९७२ याला संलग्नित आहे. हा कायदा ५ एप्रिल १९७६ पासून अंमलात आला आहे. या कायद्यान्वये पुरावशेष निर्यात नियंत्रण कायदा १९४७ रद्द करण्यात आला आहे.[१२०]

## किल्ले संवर्धनामध्ये समाजाची भूमिका

महाराष्ट्राच्या समृध्द ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी समाजाने पुढे येणे अत्यंत आवश्यक बनले आहे. आपल्या सांस्कृतिक ठेव्याचे संरक्षण करावयाचे झाल्यास समाजाला स्वयंप्रेरणेने पुढाकार घेतला पाहिजे. आधुनिक काळच्या तंत्रस्नेही तरुण पिढीने आपल्या भूतकाळाच्या समृध्द वारशाच्या जतनासाठी सक्रिय होणे गरजेचे बनले आहे. महाराष्ट्रातल्या तरुण पिढीचा किल्ल्यांच्या जतन व संवर्धनामध्ये हातभार लागल्यास आपली ऐतिहासिक वारसा स्थळे, स्मारके सुरक्षित राहणार आहेत. त्यासाठी समाजामध्ये सार्वत्रिक पातळीवर जनजागृती आणि प्रबोधन होणे अत्यंत आवश्यक बनले आहे.

## सांस्कृतिक वारशाचे महत्त्व

कोणत्याही देशाची संस्कृती हा त्या देशाचा कणा मानला जातो. ही संस्कृती निर्माण होण्यास काही दशके किंवा शतके लागली नाहीत, तर हजारो वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रक्रियांव्दारे विविध परंपरामधून ही संस्कृती निर्माण झाली आहे.

सांस्कृतिक वारशाचे महत्त्व टिकविण्यासाठी जगातील सर्वच देश प्रयत्नशील आहेत. युनेस्को सारख्या जागतिक संघटनेनेसुध्दा जगभरातील विविध देशातल्या वारसा स्थळांचे संरक्षण करण्यासाठी व्यापक मोहिमा आखल्या आहेत. जगभरातल्या अशा वास्तूंचा शोध घेऊन त्यांची नोंद जागतिक वारसा वर्गात केली आहे. आपल्या देशातील प्राचीन स्मारके, इमारती या देशाचा मौल्यवान खजिना

आहे. हा सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीपर्यंत त्याच्या ऐतिहासिक नोंदीसह टिकविणे, तो जतन करणे, त्याचा प्रसार करणे हे देशातल्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्यच आहे. हा सांस्कृतिक वारसा आपल्या परंपरा, श्रध्दा, आपले धर्म यांच्याशी आपण जोडले जाऊन आपणास स्वत:ची ओळख मिळवून देतो. आपल्या संस्कृतीच्या पाऊलखुणा आपल्याला निश्चित मार्ग दाखवितात.[१२१]

आपला सांस्कृतिक वारसा आपल्याला समाजाचा एक भाग असल्याची जाणीव निर्माण करुन देतो. आपल्या समाजामध्ये प्राचीन काळापासून दडलेले वैभव आणि त्याचे महत्त्व याची जाणीव आपणास झाल्याने आपण प्रगल्भ बनतो. आपणामध्ये एकात्मता निर्माण होण्यास सुरुवात होते. आपण भूतकाळाशी जोडले जातो. यातून आपणास आपला इतिहास समजतो. इतिहासातील राज्यांच्या शौर्यगाथा आपल्याला समजतात, त्यातून आपणास प्रेरणा मिळते. सांस्कृतिक वारशामुळे आपणामध्ये अस्मिता निर्माण होते. आपल्या प्रांतामध्ये एखाद्या महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळाचे स्वतंत्र अस्तित्व असणे आणि त्यातून एकोप्याची भावना निर्माण होणे याव्दारे आपली अस्मिता निर्माण होते.

सांस्कृतिक वारसा हा सामाजिक सामंजस्य, सामाजिक ऐक्य, सामाजिक परिवर्तन व आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा एक स्त्रोत आहे. कारण सांस्कृतिक वारसा पर्यटनातून विविध देशांचे, धर्मांचे, जातींचे, विविध भाषा बोलणारे, भिन्न संस्कृतीचे, विविध जीवन पध्दती व आर्थिक स्थिती असणारे लोक एकत्र येतात त्यामुळे त्यांच्या आचार विचारांची देवाणघेवाण होते. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक समस्यांची चर्चा केली जाते. यातूनच सामाजिक ऐक्य प्रस्थापित होते.

सांस्कृतिक वारसा आणि पर्यटन यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. सांस्कृतिक वारसा स्थळे असलेल्या ठिकाणी पर्यटनामध्ये मोठी वाढ झालेली दिसून येते. आज जगातील बहुतेक देश ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा विकास करीत आहेत. पर्यटन क्षेत्रामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीला सुरुवात होते. मोठ्या प्रमाणात परकीय चलन उपलब्ध होते. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.

**किल्ल्यांबाबत समाजाचा दृष्टिकोण**

भारतातील इतर कोणत्याही राज्याला न लाभलेले दुर्गवैभव महाराष्ट्राला लाभले आहे. मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाच्या पाऊलखुणा जपणारे किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि सांस्कृतिक वारशाचा गाभा आहे. भुईकोट, गिरीदुर्ग आणि जलदुर्ग अशा तीनही प्रकारांबाबतीत महाराष्ट्रातले किल्ले अजोड कलाकृतीचा नमुना म्हणून आपणास पहावयास मिळतात. परंतु आजची गड किल्ल्यांची होणारी दुरावस्था, पर्यटक व प्रशासनाचा बेजबाबदारपणा, समाजाची आत्यंतिक उदासीनता व किल्ल्यांवरील अस्वच्छता हे पाहून आपण आपल्या इतिहासाप्रती आणि इतिहासाच्या साधनांप्रती किती निष्काळजी आहोत याची खात्री पटते.

गड किल्ले हा पर्यटकांच्या आकर्षणाचा विषय आहे. अनेक पर्यटक किल्ल्यांच्या सहलींना प्राधान्य देतात. आजच्या आधुनिक काळात उत्तम रस्ते, वाहतूकीच्या सोयी यामुळे किल्ल्यांवर प्रचंड मोठ्या प्रमाणात सहली काढण्याची टूम निघाली असल्याचे दिसून येते. आपल्या पराक्रमी इतिहासाचे साक्षीदार असणाऱ्या किल्ल्यांना पिकनिक स्पॉटस् म्हणून पसंती दिली जात आहे. इतिहासाची साक्ष देणारे हे किल्ले आता गिर्यारोहण आणि पिकनिक वा पर्यटन यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत चालली आहेत. हौशी पर्यटक व ट्रेकर्स तसेच व्यावसायिक ट्रेकिंग ग्रुप्स मोठ्या संख्येने किल्ल्यांना भेटी देतात. वीकएन्ड मजेत जावा, एक दोन दिवसांची छान पिकनिक व्हावी हा उद्देश नजरेसमोर ठेवून येणारे हजारो पर्यटक आपणास किल्ल्यांवर पाहावयास मिळतात. मौजमजा करणे, टाइमपास करणे, दंगामस्ती करणे, हुल्लडबाजी करणे या पलीकडेही किल्ल्यांचे भौगोलिक ऐतिहासिक महत्त्व आहे हे त्यांना कळत नाही. त्याचप्रमाणे कोणी ते समजावून सांगेल अशी सोयही किल्ल्यांवर नसते. दुर्गप्रेमींसाठी आणि गिर्यारोहकांसाठी आजही सोयींचा अभाव दिसून येतो. परिणामी पाहायला मिळते ती किल्ल्यांची दुर्दशा.

महाराष्ट्रातील किल्ल्यांची अवस्था पाहिल्यावर काय दिसते? किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांनी वापरलेल्या प्लॅस्टिकने किल्ल्यांचे नैसर्गिक आरोग्य बिघडवून टाकले आहे. सर्रास बहुतांशी किल्ल्यांचा परिसर प्लॅस्टिकमय झालेला आहे.

खाद्यपदार्थ, पाणी, कोल्ड्रींक्स व तत्सम बाबींमुळे किल्ल्यांचे ऐतिहासिक स्वरुपच नाहीसे होत चालल्याचे दिसून येते. आजच्या काळातला सर्वात परवलीचा शब्द 'वापरा आणि फेकून द्या' किल्ल्यांना घातक ठरतो आहे. त्यामुळे आजच्या पिढीतील लोकांना आपल्या इतिहासाप्रती आस्था नसल्याचेच प्रतीत होते. ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची स्थळे आता अनेकांसाठी केवळ एक पिकनिक पॉईन्ट यासाठीच वाटत आहेत. अर्थात किल्ल्यावर येणारा प्रत्येक पर्यटकाचा असाच दृष्टिकोन असतो असे नाही.

भारत वगळता जगात कोणत्याही देशामध्ये अशा प्रकारची ऐतिहासिक स्थळांची हेळसांड केली जात नाही. आजच्या तरुण पिढीकडून अशा कृत्यांमुळे किल्ल्यांचे ऐतिहासिक मूल्य व पावित्र्य नष्ट होत आहे. मुळातच महाराष्ट्राचे अस्तित्व टिकविण्यात मोलाची साथ दिलेल्या या ऐतिहासिक वास्तूंची दुर्दशा होत आहे. त्यात अशा बेजबाबदार, असंवेदनशील, बेफिकीर प्रवृत्तींमुळे किल्ल्यांना अजूनच अवकळा प्राप्त होत असल्याचे दिसून येते. आपला इतिहास आपण अभिमानाने मिरवितो. शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन, छत्रपती संभाजी महाराज जन्मदिन अशा प्रसंगी मराठ्यांच्या शौर्याचे आपण गुणगान करतो, पण प्रत्यक्षात या ऐतिहासिक ठेव्याबाबत बेपर्वाईने असंवेदनशीलपणे वागून आपला दुटप्पीपणा दाखवून देतो. आपले इतिहासाविषयी असणारे प्रेम बेगडी आहे हेच त्यातून दिसून येते.

त्यामुळे समाजाने किल्ल्यांबाबतचा दृष्टिकोण बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. जोपर्यंत किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन हे आपण आपले स्वत:चे कर्तव्य किंवा जबाबदारी मानत नाही तोपर्यंत त्यात बदल घडवून आणणे शक्य नाही. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण प्रत्येकाने स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. हा समृध्द ऐतिहासिक वारसा आपल्या पुढच्या पिढीला चांगल्या अवस्थेत ठेवून सोपवायची मोठी जबाबदारी समाजावर आहे. समाजातल्या प्रत्येक घटकाने आपली नैतिक जबाबदारी समजून यात पुढाकार घ्यायला हवा.

**किल्ले संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग**

दुर्गसंपदेच्या संवर्धनामध्ये जेवढी शासनाची भूमिका महत्त्वाची आहे तेवढीच समाजाचीही भूमिका महत्त्वाची आहे. किल्ले जतन दुरुस्तीचे कार्य शासनाच्या पुरातत्त्व खात्यामार्फत पार पाडले जाईल परंतु खरी गरज आहे ती तेथून पुढे किल्ल्यांचे संवर्धन करण्याची. किल्ले संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग असणे ही काळाची गरज बनली आहे. किल्ल्यांच्या संवर्धनामध्ये, जीर्णोध्दारामध्ये समाजाचा सक्रिय सहभाग नोंदविला गेल्यास या वास्तूंचे आयुर्मान वाढून पुढील अनेक पिढ्यांना हा आपला अमूल्य सांस्कृतिक ठेवा पुन्हा पूर्वीच्या रुपात पाहावयास मिळेल. किल्ले संवर्धन चळवळीमध्ये इतिहासप्रेमी, निसर्गप्रेमी, विद्यार्थी, गृहिणी, ज्येष्ठ नागरिक, सर्वसामान्य माणूस यांचा समावेश करुन घेतल्यास दुर्ग संवर्धन मोहिमेला व्यापक स्वरुप प्राप्त होऊ शकते आणि किल्ल्यांचे सौंदर्य पुन्हा बहरु शकते.

**विविध उपक्रम**

किल्ल्यांच्या संवर्धनासाठी समाजाचा सहभाग घेऊन विविध उपक्रम राबवून आपल्या ऐतिहासिक स्मारकांना उर्जितावस्था प्राप्त करुन देता येऊ शकते. त्याची चर्चा खालीलप्रमाणे करता येते.

१) शासनाच्या पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात आलेल्या संवर्धन कार्यानंतर किल्ल्याची देखभाल समाजातील विविध मंडळे, गणेशोत्सव मंडळे, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट यांच्यामार्फत करता येऊ शकते.

२) किल्ल्यांच्या परिसरात स्थानिक जनतेने किंवा भ्रमंतीस गेलेल्या पर्यटकांव्दारे मोठ्या प्रमाणात स्थानिक प्रजातींचे वृक्षारोपण करता येऊ शकते. शासनाच्या वनविभागामार्फत मोठ्या प्रमाणावर रोपांची निर्मिती केली जाते. अशी रोपे स्वस्त दरामध्ये उपलब्धही होतात. असे वृक्षारोपणाचे उपक्रम सर्वच किल्ल्यांच्या परिसरात करुन त्याची नियमितपणे देखभाल केल्यास काही वर्षातच किल्ल्याचा परिसर हिरवागार होऊ शकतो.

३) आपल्या दैनंदिन वापरातल्या अनेक प्लॅस्टिकच्या किंवा पत्र्याच्या मोठ्या कंटेनर्सचा वापर करुन किल्ल्यांवर जागोजागी कचराकुंड्या बसवता येऊ शकतात.

४) किल्ल्यावर पाण्याची टाकी व त्यामध्ये बारमाही पाणी उपलब्ध असल्यास परिसरामध्ये बागबगिचा विकसित करता येऊ शकतो. या बागबगिचांचे व्यवस्थापन विविध स्वयंसेवी संस्थांव्दारे नियमितपणे केले गेल्यास किल्ल्यावर पर्यटकांना निश्चितच आल्हाददायक वाटेल.

५) ज्या किल्ल्यांवर जाणाऱ्या वाटा अतिशय दुर्गम आहेत किंवा किल्ल्यांवर जाण्यासाठी पायवाटाही नाहीत अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणावर श्रमदान करुन किल्ल्यांवर जाणाऱ्या पायवाटा निर्माण केल्या जाऊ शकतात. किल्ल्यांवर अनेकदा पाण्याची टाकी अस्वच्छ, गाळाने भरलेली असतात. अशा टाक्यांमधील गाळ पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली काढल्यास किल्ल्यावर कायमची पाण्याची सोय होऊ शकते.

६) वर्षभरामध्ये अनेक महत्त्वाचे ऐतिहासिक दिन साजरे केले जातात. त्यातील काही निवडक दिन किल्ल्यांवर साजरे करता येऊ शकतात. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. अशा महत्त्वाच्या दिनी एखाद्या नामवंत वक्त्याचे व्याख्यान गडावर ठेवून किल्ल्याच्या ऐतिहासिक मूल्यामध्ये भर टाकता येऊ शकते.

७) प्रत्येक किल्ल्यावर कायमस्वरुपी सुरक्षा रक्षक तैनात करता येईल. त्यातून किल्ल्यावर होणारे गैरप्रकार, हुल्लडबाजी थांबवता येईल. किल्ल्यांचे सौंदर्य अबाधित राहिल आणि स्थानिक जनतेमध्ये रोजगार निर्मितीही होईल.

८) किल्ल्याच्या प्रेरणादायी परिसरात गेल्यानंतर तेथील कोणत्याही वास्तूला व वस्तूला कसल्याही प्रकारचा धोका, नुकसान न पोहोचवता आनंदाने, उत्साहाने गड भ्रमंती करण्यासंदर्भात विविध सूचना फलक लावण्यात येऊ शकतात.

९) किल्ल्यांच्या नुकसानीस व विद्रुपीकरणास जबाबदार ठरल्यास लागू करण्यात आलेल्या कायद्याचे व त्यातील शिक्षेचे स्मरण करुन देणारे फलक लावण्यात येऊ शकतात.

१०) विविध गावांतील मंडळे, समूह, गट यांनी विविध किल्ल्यांवर रविवारी किंवा विशिष्ट दिवशी सफाई मोहिम, स्वच्छता मोहिम, जीर्णोध्दार मोहिम राबवून किल्ल्याच्या संवर्धनास हातभार लावू शकतात.

११) स्थानिक लोकप्रतिनिधींकडे किल्ले संवर्धनाबाबत सविस्तर अहवाल व योजना तयार करुन मांडाव्यात व त्या त्यांच्यामार्फत पूर्ण करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा.

१२) प्रत्येक किल्ल्यावर त्या त्या किल्ल्याचा इतिहास सांगणारे फलक लावण्यात येऊ शकतात. अशा फलकांव्दारे आपण पर्यटकांना महाराष्ट्राच्या गौरवास्पद इतिहासाची जाणीव करुन देऊन त्या स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवू शकतो.

**गणेशोत्सव मंडळांचा सहभाग घेऊन किल्ले संवर्धन**

महाराष्ट्रामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. दरवर्षी गणेशोत्सवात कोटयावधी रुपयांची उलाढाल होत आहे. अशा सर्वच मंडळांनी गोळा होणाऱ्या वर्गणीतील केवळ २५% भाग किल्ले संवर्धनासाठी खर्च केला तर अल्पावधीतच सर्वच किल्ल्यांचे रुपडे पालटू शकते, किल्ल्यांचा कायापालट होऊ शकतो. या मंडळांनी जाणीवपूर्वक आपल्या इतिहासाचे साक्षीदार असणाऱ्या किल्ल्यांच्या संवर्धनाकडे, जीर्णोध्दाराकडे लक्ष दिल्यास निश्चितच एक भरीव सामाजिक कार्य पार पाडता येऊ शकते व हा आदर्श संपूर्ण भारतभर घालून दिला जाऊ शकतो. गणेशोत्सव मंडळांचा सहभाग घेऊन खालील विविध उपक्रम राबविता येऊ शकतात.

१) गणेशोत्सव मंडळांची एक शिखर संघटना स्थापन करुन त्या संघटनेव्दारे शासनाची परवानगी घेऊन किल्ल्यांवर साहसी क्रीडा केंद्रे उभारता येऊ शकतात. पॅराग्लायडींग, रॉकक्लायंबिंग, गिर्यारोहण, गिरीभ्रमण अशा विविध

साहसी क्रिडा प्रकारांना चालना दिल्यास आपोआपच किल्ल्यांवर पर्यटकांचा ओघ वाढेल, स्थानिक जनतेला रोजगाराचे साधन उपलब्ध होईल. ग्रामीण अर्थव्यवस्थेला उर्जितावस्था प्राप्त होईल. त्याचप्रमाणे किल्ल्यांचे आपोआप मार्केटिंग होईल.

२) गणेशोत्सव मंडळांनी वनस्पतीशास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली किल्ल्यांच्या परिसरात किंवा पायथ्याशी असणाऱ्या गावांमध्ये औषधी वनस्पतींची लागवड करुन तेथील शेतकऱ्यांना हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळवून देऊ शकतात. घनदाट जंगले असणाऱ्या किल्ल्यांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात मधुमक्षिका पालन केंद्रे उभी करता येऊ शकतात. त्याव्दारे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. अशा केंद्रातून निर्माण झालेल्या मधाला खूप मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यातून आर्थिक उन्नती मोठ्या प्रमाणावर होऊ शकते.

३) गणेशोत्सव मंडळांच्या परस्पर सहकार्यांतून किल्ल्यांवर मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाचे प्रकल्प राबविता येऊ शकतात. दरवर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन (Rain Water Harvesting) करुन आसपासच्या ग्रामीण भागाला भेडसावणारा पाण्याचा प्रश्न निकाली निघू शकतो. शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध होऊन त्यांना अधिक जोमाने शेती उत्पादन घेणे शक्य होईल.

**स्वयंसेवी संस्थांचा सहभाग**

महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संवर्धनासाठी विविध स्वयंसेवी संस्था सातत्याने शासकीय यंत्रणेशी संपर्क ठेवून किल्ल्यांना उर्जितावस्था मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने दुर्गसंवर्धक महासंघ, शिवाजी ट्रेल, पुणे, सह्याद्री प्रतिष्ठान, पिंपरी चिंचवड, श्री शिवदुर्गसंवर्धन संस्था, पुणे, दुर्गवीर प्रतिष्ठान, यंग ट्रेकर्स, सह्याद्री मित्र, अखिल भारतीय शिवराज्याभिषेक समिती, मायभवानी सामाजिक संस्था, गडवाट... प्रवास सह्याद्री संस्था, निसर्ग फ्रेंडशिप असोसिएशन, कोकण, शिवदुर्ग प्रतिष्ठान, दुर्गरक्षक प्रतिष्ठान, रायरेश्वर प्रतिष्ठान, भोर, किल्ले वसई मोहिम, निसर्ग वेध परिवार संस्था, कोल्हापूर, कोहिनूर ट्रेकर्स व शिवदुर्ग मित्र,

लोणावळा, चावंड संवर्धन समिती, लोहगड विसापूर विकास मंच, गड किल्ले सेवा समिती, दुर्गसखा प्रतिष्ठान, डोंबिवली, ट्रेकक्षितिज, डोंबिवली, दुर्ग फौंडेशन, राजे शिवराय प्रतिष्ठान, पुणे, संग्रामदुर्ग संवर्धन समिती, चाकण, कोकण कडा मित्रमंडळ, सटाणा, शिवशंभू दुर्गसंवर्धक संघ, नाशिक, शिवकार्य गडकोट मोहिम, शिव सह्याद्री दुर्ग संवर्धन संस्था, पुणे इ. विविध स्वयंसेवी संस्था किल्ले संरक्षण, किल्ले संवर्धन व जतनासाठी व्यापक प्रयत्न करीत आहेत.[१२२]

महाराष्ट्रातील अशा विविध स्वयंसेवी संस्थांव्दारे किल्ल्यांच्या वास्तूंवर उगवलेली झाडे, झुडपे काढणे, किल्ल्याच्या वाटा मोकळ्या करणे, किल्ल्यांशी संबंधित इतिहास पुस्तक रुपाने प्रसिद्ध करणे, किल्ल्यावर साठलेला मलबा काढणे, मातीच्या मलब्याखाली गाडली गेलेली वास्तू मोकळी करणे, तट बुरुजांची स्वच्छता करणे, पाण्याची टाकी गाळ काढून स्वच्छ करणे, गडावर वृक्षारोपण करणे, मंदिरांचा जीर्णोध्दार करणे, मंदिरासमोरील जुनी दीपमाळ दुरुस्त करणे, गडावरील वास्तूंना फलक लावणे, आवश्यक तेथे जुन्या बांधकामाला धक्का न लावता तटाचे बांधकाम करणे, पायथ्याच्या गावासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, किल्ल्यावर धोकादायक ठिकाणी सुरक्षेसाठी रेलिंग बसविणे, विविध साहसी खेळांचे आयोजन करणे, गडाचा इतिहास सांगणारा फलक लावणे, गडावरुन खाली पडलेल्या तोफा पुन्हा गडावर बसविणे, गडावरील वीरगळ स्वच्छ करणे, किल्ले स्वच्छता मोहिम राबविणे, किल्ल्यावरील प्लॅस्टिक पिशव्या, बाटल्या, ग्लासेस, सिगारेटची पाकीटे, कचरा गोळा करणे, गडाचे प्रवेशव्दार झाडाझुडपांतून मोकळे करणे,किल्ल्यांच्या पायऱ्यांवर जमा झालेले शेवाळ काढणे, किल्ल्यावर दारु बंदी व प्लॅस्टिक बंदी योजना राबविणे, किल्ल्यांवर दीपोत्सव साजरा करणे, किल्ल्यांवर व्याख्याने आयोजित करणे, किल्ल्यावरील तलावांची स्वच्छता करणे, भुयारांवर साचलेले मलब्याचे थर काढणे, किल्ल्याचे चोर मार्ग शोधून काढणे, किल्ल्यांवरील साठवणूकीची खोली, निवासस्थाने, प्रवेशव्दाराच्या पायऱ्या यांचे संवर्धन करणे इ. संवर्धनाची भरीव कामे करून किल्ल्याचा इतिहास, किल्ल्याचे मूळ स्वरुप जपण्याचे प्रयत्न करीत आहेत. अशा संस्थांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. संवर्धन कार्य करणाऱ्या संस्थांचे

कार्य संकलित व्हावे यासाठी २०१४ साली '*दुर्ग संवर्धनाची पहाट*' ही स्मरणिका काढण्यात आली. दुर्ग संवर्धन चळवळीला दुर्ग साहित्य संमेलनांमुळे प्रोत्साहन मिळत आहे. या साहित्य संमेलनांमुळे दुर्ग अभ्यास व दुर्ग संवर्धन क्षेत्रातील अनेक लोक एकत्र येत आहेत. त्यातून दुर्ग संवर्धनाबाबत व्यापक चर्चा होत आहेत. व्यक्तींना, संस्थांना मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.[१२३]

स्वयंसेवी संस्थांच्या संवर्धनाच्या कार्याची शासनाने दखल घेतली आहे. विविध किल्ल्यांवर संवर्धनाची कामे शासनाव्दारे सुरु करण्यात आली आहेत. शासनाने किल्ले संवर्धनासाठी तज्ज्ञ व्यक्तींची गड संवर्धन समिती स्थापन केली आहे. या समितीच्या मार्गदर्शनातून किल्ले संवर्धनाची कार्ये मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहेत. त्यासाठी मोठ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्थांव्दारे गड संवर्धनाचे भरीव कार्य सुरुच आहे. त्याशिवाय इतर अनेक पूरक उपक्रमांव्दारे किल्ल्यांचे संवर्धन व जनतेमध्ये किल्ल्यांचे आकर्षण आणि लोकप्रियता वाढवता येऊ शकते. त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येऊ शकतो.

१) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील इंजिनिअर्सच्या मदतीने महाराष्ट्रातील किल्ल्यांची सर्वसमावेशक व परिपूर्ण माहिती असणारी वेबसाईट बनविली जाऊ शकते. अशा वेबसाईटवरुन किल्ल्यांचा समग्र इतिहास, किल्ल्याची वैशिष्ट्ये, तेथे जाण्याचे मार्ग, तेथील सोयीसुविधा, निवासाची, भोजनाची व्यवस्था, किल्ल्याच्या संवर्धनासाठी होणारे शासकीय प्रयत्न तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न इ. बाबत सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली तर निश्चितच महाराष्ट्रातील किल्ले पर्यटन लक्षणीयरित्या वाढू शकते.

२) आय.टी. क्षेत्रातील तंत्रज्ञांच्या मदतीने किल्ल्यांवर लघुचित्रपट तयार करता येऊ शकतात. त्यातून किल्ल्यांची सद्यस्थिती, किल्ले संवर्धन कार्य, किल्ल्यांवरील आकर्षक स्थळे यांचे दर्शन घडविता येऊ शकते.

३) किल्ले संवर्धन क्षेत्रातील शिखर संस्थेने एखाद्या विद्यापीठाशी किंवा शैक्षणिक संस्थेशी सामंजस्य करार करुन पर्यटक मार्गदर्शक (Tourist Guide)

होण्यासाठीचे विविध कोर्सेस सुरु करावेत. जेणेकरुन इतिहासाची आवड असणाऱ्या तरुण तरुणींना पर्यटक मार्गदर्शक म्हणून उत्साहाने काम करता येईल. त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध होईल. त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल आणि त्याचप्रमाणे किल्ल्यांवर आलेल्या पर्यटकांना त्या त्या किल्ल्याचा इतिहास समजण्यास मदत होऊन किल्ल्याचे दर्शन व्यवस्थित घेता येईल.

४) किल्ले संवर्धन क्षेत्रातील शिखर संस्थेद्वारे काही निवडक किल्ल्यांवर वैज्ञानिक संस्थांच्या मदतीने आकाश निरीक्षण केंद्रे उभारता येऊ शकतात. अशा केंद्राद्वारे पर्यटकांना अत्याधुनिक दुर्बिणीतून आकाश निरीक्षण करता येऊ शकते. त्यातून त्या किल्ल्याची प्रसिध्दी होऊन पर्यटकांचा ओघ निश्चितपणे वाढू शकतो.

५) वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र विषयाच्या तज्ज्ञांव्दारे डोंगरी किल्ल्यांच्या परिसरात जैव विविधता अभ्यासकेंद्रे उभी करता येऊ शकतात. त्यावर मोठ्या प्रमाणात संशोधन करता येऊ शकते.

६) सह्याद्रीच्या पर्वतरांगांवर शासनाने किल्ले संवर्धन संस्थांच्या सहकार्याने सौर उर्जा निर्मिती प्रकल्प, पवन उर्जा निर्मिती प्रकल्प सुरु केल्यास नूतनीक्षम व अपारंपारिक उर्जेचा अक्षय स्त्रोत उपलब्ध होऊ शकतो.

७) सह्याद्रीच्या घनदाट जंगलांमध्ये अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण अशा पक्षी व सर्पांच्या विविध प्रजाती आढळून येतात. अशा पक्षांचा अभ्यास करण्यासाठी पक्षी निरीक्षण केंद्रे किल्ल्यांच्या परिसरात उभारता येऊ शकतात. तसेच किल्ल्याच्या परिसरात एखादे सर्पोद्यान उभारता येऊ शकते.

८) स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या भागातील आमदार, खासदार व मंत्री यांच्याशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवल्यास किल्ले संवर्धनासाठी व इतर अनेक उपक्रमांसाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. किल्ले संवर्धनाचे प्रकल्प या लोकप्रतिनिधींमार्फत शासनाकडे गेल्यास आणि त्याचा सातत्याने पाठपुरावा झाल्यास एक दर्जेदार पद्धतीचे किल्ले संवर्धनाचे कार्य पार पडू शकते. (उदा.

शिवनेरी), स्वयंसेवी संस्थांमार्फत जनतेमध्ये किल्ल्यांबाबत जनजागृती आणि संवेदनशीलता वाढविण्यासाठी किल्ल्यांच्या छायाचित्रांची स्पर्धा आयोजित केली जाऊ शकते.

९) महाराष्ट्रातील किल्ल्यांची निगा राखण्यासाठी विद्यार्थ्यांच्यात दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी दिवाळीच्या सुट्टीत किल्ले बनविण्याच्या स्पर्धा घेतल्या जाव्यात. त्यातून आजच्या मुलांना गड किल्ल्यांचे महत्त्व समजेल.

**शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रबोधन व त्याव्दारे संवर्धन**

आपल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आत्मीयता तसेच ऐतिहासिक वास्तूंविषयी आस्था निर्माण करणे अत्यावश्यक आहे. आपल्या देशाचे हे वैभव टिकविण्याची आस या विद्यार्थ्यांच्यात निर्माण झाल्याशिवाय महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा चिरकाल टिकू शकणार नाही.

इतिहासाविषयी, विविध ऐतिहासिक स्मारकांविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी विविध उपक्रम राबविले जाऊ शकतात. त्याव्दारे त्यांचे प्रबोधन होऊ शकते आणि त्यातूनच गड किल्ल्यांच्या संवर्धनाची बीजे रोवली जाऊ शकतात. अशा विविध उपक्रमांची चर्चा खालीलप्रमाणे -

१) किल्ल्यांविषयी शालेय व महाविद्यालयीन पातळीवर निबंधलेखन स्पर्धा, किल्ल्यांचे व्यवस्थापन, प्रशासन, किल्ल्यांचे महत्त्व, किल्ल्यांचे प्रकार, किल्ल्यांचा इतिहास इत्यादी विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा, तसेच किल्ल्यांचा इतिहास समजण्यासाठी तज्ज्ञ मंडळींची व्याख्यानमाला आयोजित करता येऊ शकते.

२) शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली किल्ल्यांवर न्याव्यात. किल्ल्यांचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना मार्गदर्शकाद्वारे घडवावे. किल्ल्याच्या विविध भागांना भेटी देऊन तेथील वैशिष्ट्ये जाणून घेतल्यास विद्यार्थी आपल्या वारशाविषयी सजग बनतील.

३) इतिहास हा विषय सध्या फक्त कला महाविद्यालयातच शिकविला जातो. बाकीच्या कोणत्याही शाखांना हा विषय लागू नाही. खरे तर सर्वच शाखांना

हा विषय लागू व्हायला हवा. कारण इतिहास विषयाचे अध्ययन करणे, आपला इतिहास जाणून घेणे, आपल्या इतिहासाविषयी जाणिव जागृती निर्माण करणे, आपला इतिहास जपणे, त्यासाठी अनेक उपक्रम राबविणे हे काही फक्त कला शाखेच्या विद्यार्थ्यांनीच करावे असे नाही. इंजिनिअरींग, फार्मसी, लॉ, बायोटेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, ॲग्रिकल्चर अशा अनेक शाखांना हा विषय आंतरविद्याशाखीय विषय म्हणून लागू करता येऊ शकतो. परदेशांमध्ये अनेक विद्यापीठांत अशी सोय करण्यात आली आहे.

**औद्योगिक कंपन्यांच्या सहकार्यातून किल्ले संवर्धन**

महाराष्ट्राला गड किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. आजही महाराष्ट्रात शेकडो किल्ले पराक्रमी इतिहासाची साक्ष देत आणि प्रेरणादायी व्यक्तींचे स्मरण देत उभे आहेत. या ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन करण्यासाठी विविध शासकीय पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहेत. या वास्तू जपण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व विभाग विविध योजनांव्दारे प्रयत्नशील आहे. गड किल्ल्यांचे शास्त्रशुध्द पध्दतीने जतन व संवर्धन व्हावे यासाठी शासनाने गड किल्ले संवर्धन समिती स्थापन केली आहे. समितीच्या मार्गदर्शनानुसार पहिल्या टप्प्यात १४ किल्ल्यांची निवड करुन त्याचे जतन दुरुस्तीचे काम यशस्वीपणे पार पडले आहे. दुसऱ्या टप्प्यातील १४ किल्ल्यांच्या जतन दुरुस्तीच्या कामास काही किल्ल्यांवर सुरुवात झाली आहे.

भारतामध्ये १९९० नंतर व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाची सुरुवात होऊन त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. भांडवली नफ्यावर आधारित समाजसेवेचा एक प्रकार म्हणजे कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (सी.एस.आर.). कंपनी कायदा २०१३ च्या विभाग १३५ आणि अनुसूची क्र. ७ मधील बदलांनुसार ज्या कंपन्यांची वार्षिक उलाढाल १ हजार कोटी रु. अथवा अधिक आहे, किंवा नफा ५ कोटी रु. अथवा अधिक आहे किंवा कंपनीची एकूण किंमत (नेट वर्थ) ५०० कोटी रु. अथवा अधिक आहे अशा सर्व कंपन्यांनी तीन वर्षांच्या एकूण सरासरी नफ्याच्या २ टक्के रक्कम भारतातील समाजकार्यासाठी वापरणे बंधनकारक आहे. या कंपन्या

समाजकार्यासाठी कोणतेही क्षेत्र निवडू शकतात. सामाजिक कार्यासाठी सर्व कंपन्यांनी ठरवून दिलेल्या अटींप्रमाणे नफ्याचा वाटा समाजकार्यावर खर्च केला तर अशा कामांसाठी २०१५ या वर्षात जवळपास १५ हजार कोटींची रक्कम उपलब्ध होऊ शकते असा अंदाज आहे.[१२४]

अशा कंपन्यांमार्फत महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे संवर्धन करणे सहज शक्य आहे. महाराष्ट्रामध्ये टाटा मोटर्स, एल अ‍ॅन्ड टी, इन्फोसिस, टीसीएस, विप्रो, सिंटेल, भारत फोर्ज, अशोक लेलँड, फोक्सवॅगन यासारख्या व इतर अनेक बलाढ्य औद्योगिक कंपन्या आहेत. अशा कंपन्यामार्फत महाराष्ट्रातील वारसास्थळे, स्मारके यांना उर्जितावस्था प्राप्त होऊ शकते.

दि. ८ जानेवारी, २०१६ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने मुंबई येथील राजभवनामध्ये 'महा-सीएसआर २०१६' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. राज्यातील, खाजगी, सार्वजनिक कंपन्या आणि वित्तीय संस्था यांचा व्यावसायिक सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून (सीएसआर) सक्रीय पाठिंबा आणि सहभाग मिळविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.[१२५]

राज्यातील सीएसआर प्रकल्पांसाठी मुख्यमंत्री कार्यालयात विशेष कार्य अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल. हा अधिकारी शासन आणि उद्योग जगत यांच्यामधील दुवा म्हणून काम करील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सामाजिक दायित्वनिधी कार्यक्रमांतर्गत उद्योग जगतांकडून जे प्रस्ताव शासनाकडे सादर होतील त्यावर तातडीने निर्णय घेतले जातील. त्यासाठी उद्योग जगताला अपेक्षित असलेले सर्व सहकार्य राज्य शासनाकडून दिले जाईल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.[१२६]

महाराष्ट्राच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाशी उद्योग जगताने सहकार्य योजना आखून राज्यातील वारसा स्थळे, स्मारके दत्तक घेऊन त्यांचे जतन केल्यास महाराष्ट्र राज्य सांस्कृतिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठरु शकते. सीएसआर प्रकल्प

खाजगी, सार्वजनिक क्षेत्रास उपलब्ध करुन देण्यास शासनाने मंत्रालयात सामाजिक दायित्व कक्ष स्थापन केला आहे.[१२७]

महाराष्ट्र पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागामार्फत ''महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना'' शासन निर्णय क्रमांक मवैयो-२००५/प्र.क्र. -१०७/सां.का.३ दि. ०२/०२/२००७ अन्वये सुरु करण्यात आली आहे.[१२८] या योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीमधून संगोपनार्थ किंवा पालकत्व स्वीकारण्याकरिता स्मारकाची निवड करता येईल व या स्मारकाच्या संगोपनार्थ १० वर्षांकरिता त्याचे पालकत्व घेता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.[१२९]

आतापर्यंत महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेअंतर्गत कै. यशवंतराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे (ता. कडेगाव, जि. सांगली) येथील जन्मघर हे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्याकडे संगोपनार्थ सुपूर्द करण्यात आले आहे.[१३०] नळदुर्ग किल्ला, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद हा ऐतिहासिक किल्ला सोलापूर येथील युनिटी मल्टिकॉन कंपनीला १० वर्षांच्या करारावर देण्यात आला आहे.[१३१] कंपनीने नळदुर्ग किल्ल्यात पर्यटकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करण्याबरोबरच प्रेक्षणीय स्थळांची दुरुस्ती करण्याचे काम हाती घेतले आहे. किल्ल्यात व किल्ल्यालगत असणाऱ्या बोरी नदीतील गाळ काढण्याबरोबरच नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याचे काम सुरु केले आहे.[१३२] त्याचप्रमाणे बीओटीच्या माध्यमातून किल्ल्यामध्ये अत्याधुनिक उद्यान, बाळ गोपाळांसाठी खेळणी, रोज गार्डन तसेच लेजर शोच्या माध्यमातून किल्ल्याचा इतिहास मांडण्याबरोबरच पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.[१३३]

**किल्ले दत्तक योजना**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी किल्ले दत्तक योजना राबविली जाऊ शकते. त्याचप्रमाणे समाजातील प्राध्यापक, नामवंत डॉक्टर्स, अभियंते, आयटी क्षेत्रातील अभियंते, वकील, स्थानिक उद्योजक, स्थानिक आमदार, खासदार यांच्याव्दारेही किल्ले दत्तक घेतले जाऊन त्याचे संवर्धन

होऊ शकते. ही एक प्रकारची सामाजिक जबाबदारी म्हणून त्याकडे पाहिले जाऊ शकते.

आज महाराष्ट्रातील बहुतांशी प्रत्येक जिल्ह्यामध्ये अनेक साखर कारखाने उभे राहिले आहेत. या साखर कारखान्यांनी एक एक किल्ला जरी दत्तक घेऊन त्यावर शास्त्रशुध्द पध्दतीने संवर्धनाचे कार्य केले तर अल्पावधीतच महाराष्ट्रातील सर्वच किल्ल्यांना झळाळी प्राप्त होऊ शकते. त्यासाठी तीव्र इच्छाशक्तीची गरज आहे.

केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयातर्फे एप्रिल २०१८ मध्ये 'दत्तक घ्या वारसा' नावाची योजना जाहीर करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाने सांस्कृतिक मंत्रालय आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खाते यांच्या सहयोगाने भारतातील ९३ महत्त्वाची वारसास्थळे दत्तक देण्याची योजना जाहीर केली आहे.[१३४]

भारतातील महत्त्वाची नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसास्थळे विशिष्ट निकषांच्या आधारे हिरव्या, निळ्या आणि केशरी अशा तीन रंगांमध्ये वर्गीकृत करण्यात आली आहेत. भारत सरकारने विकसित केलेल्या अधिकृत वेबसाईटवरील माहितीनुसार सध्या या योजनेअंतर्गत भारतातील ५८ वारसा स्थळांना तीन टप्प्यांमध्ये दत्तक दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये १४ स्थळांची निवड करण्यात आली आहे, दुसऱ्या टप्प्यामध्ये २२ वारसा स्थळांना निवडण्यात आले आहे तर तिसऱ्या टप्प्यामध्ये २० वारसा स्थळांची निवड करण्यात आली आहे.[१३५] भविष्यात ही वारसा स्थळांची संख्या वाढवली जाणार असल्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. या ५८ वारसास्थळांमध्ये महाराष्ट्रातील अजंठा लेणी, एलिफंटा लेणी, ससून डॉक्स आणि वेरूळ अशा चार  वारसास्थळांचा समावेश करण्यात आला आहे.[१३६]

आतापर्यंत 'दत्तक घ्या वारसा'-अपनी धरोहर-अपनी पहचान या योजनेअंतर्गत लडाख, जम्मू आणि काश्मीरमधील 'माऊंट स्टोक कांगडी ट्रेक रुट', उत्तराखंड मधील 'गंगोत्री मंदिर आणि गोमुख प्रवास मार्ग' या दोन वारसा स्थळांना ॲडव्हेंचर टूर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया (ATOAI) या संस्थेने तर दिल्लीतील 'लाल किल्ला' व आंध्रप्रदेश राज्यातील 'गंडिकोटा किल्ला' या दोन वारसा स्थळांना दालमिया भारत लिमिटेड या कंपनीने दत्तक घेतले आहे.[१३७] दिल्लीतील लाल किल्ला

दालमिया भारत लिमिटेड कंपनीने ५ वर्षांसाठी २५ कोटी रुपयांमध्ये संवर्धनासाठी दत्तक घेऊन २३ मे, २०१८ पासून किल्ल्याच्या संवर्धनाच्या कामाला सुरुवात केली आहे.[१३८] केंद्र सरकारने एखादे वारसास्थळ दत्तक घेऊन नेमके काय करायचे, कोणते विकासाचे प्रकल्प राबवायचे, पर्यटन वृध्दी कशी करायची याविषयी स्पष्ट निर्देश दिले आहेत. सर्वेक्षण करुन उपलब्ध असलेल्या सोयी सुविधा आणि नव्याने निर्माण कराव्या लागणाऱ्या सोयीसुविधा, पर्यटकांचा ओघ कसा वाढवायचा या विषयीचा सविस्तर आराखडा, वारसा स्थळाच्या जतन आणि संवर्धनासाठी उपयुक्त ठरतील अशा उपाययोजना शासनाला सादर करणे अपेक्षित आहे. सादर केल्या गेलेल्या योजनांमधील वैशिष्टये आणि नाविन्य पाहून एक योजना शासन निवडेल आणि त्या स्मारक मित्राला ते स्थळ दत्तक देण्यात येईल. त्यापुढील काळात स्मारक मित्राने करावयाच्या सर्व गोष्टी त्याला पर्यटन मंत्रालय आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याच्या संमतीनेच कराव्या लागणार आहेत, कारण संबंधित समित्यांवर त्या खात्यामधील शासकीय अधिकारी आणि तज्ज्ञांची नियुक्ती केंद्र शासनाने केली आहे.[१३९] या योजनेनुसार सदर वारसास्थळ, तेथील पर्यटन विषयक नियोजन, जतन अथवा संवर्धनाकरिता केले जाणारे प्रयत्न हे एका प्रकारे पुरातत्त्व खात्याच्या अखत्यारीत राहणार असल्याने ही वारसास्थळे त्या त्या उद्योगसमूहांच्या ताब्यात जातील अथवा खाजगी मालकीची होतील अशी भिती बाळगणे अनाठायी ठरेल. या योजनेत मुळातच व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्वाच्या (कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सी.एस.आर.) जाणीवेतून भाग घेणे अपेक्षित असल्याने तेथून स्मारक मित्राने नफा कमविणे अपेक्षित नाही.[१४०] वारसा स्थळाच्या जतन आणि संवर्धनाचे सर्व नियम पाळून पर्यटनपूरक सुविधा निर्माण करण्याचे मोठे आव्हान असणार आहे. त्यामुळे सदर योजनेचे यश वारसा दत्तक घेण्याच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन किती स्मारक मित्र पुढे येतात, व त्या वारसा स्थळांचे जतन आणि संवर्धन कसे करतात यावर अवलंबून असेल.[१४१]

**प्रसारमाध्यमांची भूमिका**

आजच्या जगात प्रसारमाध्यमे ही मानवी जीवनातील अविभाज्य घटक बनली आहेत. एकविसावे शतक हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. या तंत्रज्ञानाच्या युगात प्रसारमाध्यमांना मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.[१४२] प्रसारमाध्यमे अशा प्रकारच्या चळवळींची पार्श्वभूमी, त्याची उद्दिष्ट्ये, स्वरुप, यश, अपयश इत्यादी बाबींची सखोल कारणमीमांसा करीत असतात. प्रसार माध्यमांचा हेतू अत्यंत स्पष्ट व पारदर्शी आहे. माहिती देवाणघेवाण, अद्ययावत ज्ञानप्रसार, शिकणे आणि शिकविणे व मनोरंजन करणे इत्यादी प्रसार माध्यमांचे मुख्य उद्देश होय.[१४३] प्रसारमाध्यमांचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. ते खालीलप्रमाणे - मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक (विजाणूशास्त्रीय माध्यमे), नव माध्यमे इत्यादी. [१४४]

आजच्या आधुनिक काळातल्या सर्वच मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व नव माध्यमे या प्रसार माध्यमांमुळे तसेच फेसबुक, व्हॉटसअप, ऑर्कुट, ट्विटर, टेलिग्राम, हाईक, लिंक्डइन, फ्लॉक, इन्स्टाग्राम अशा सोशल मिडीयामुळे गड किल्ल्यांचा इतिहास, गड किल्ल्यांची सद्यस्थिती, किल्ल्यांच्या संवर्धनाची आवश्यकता, समाजाचा किल्ल्यांप्रती असणारा दृष्टिकोन, किल्ल्यांच्या संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था, त्यांचे संवर्धनाचे विविध उपक्रम, शासनाच्या पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येणारे संवर्धनाचे कार्य, आजच्या तरुण पिढीची किल्ले संवर्धनातील भूमिका अशा सर्वांगीण दृष्टिकोनातून समाजामध्ये जाणीवजागृती करण्याचे कार्य होत आहे.

**किल्ले संवर्धनाबाबत आपले उत्तरदायित्व**

इंग्रजांना महाराष्ट्रात प्रखर प्रतिकार झाल्यानेच येथील ऐतिहासिक स्थळांची मोडतोड करुन किल्ल्यांवरील वास्तू नष्ट करण्याचे धोरण त्यांनी आखले. त्यामुळेच महाराष्ट्रातील बहुतांशी किल्ले ढासळल्याचे दिसून येतात. परिणामी महाराष्ट्राचा ऐतिहासिक बहुमोल ठेवा नष्ट झाला आहे. आजही येथे उरलेल्या अवशेषांची दुरावस्था झाली आहे. किल्ले आपल्या वैभवशाली भूतकाळाची देणगी आहे. त्याचे

ऐतिहासिक महत्त्व आणि मूल्य कायम राहणार आहे. आपला हा राष्ट्रीय वारसा असून तो कोणत्याही परिस्थितीत जपलाच पाहिजे, अशी आस्था समाजातील प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण व्हायला हवी. आपल्या स्मारकांशी, इतिहासाशी भावनिक दृष्ट्या जोडले जाणे अत्यावश्यक आहे. हा सांस्कृतिक वारसा सरकारचा नसून किंवा शासकीय अधिकाऱ्यांचा नसून तो संपूर्ण समाजाचा, या देशातील प्रत्येक नागरिकाचा असल्याची भावना वाढीस लागणे अतिशय गरजेचे आहे. अशा प्रकारचे नाते तयार झाले तरच आपल्या ऐतिहासिक वारशाचे जतन व संगोपन होणार आहे.

**समारोप**

महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे संवर्धन व जतन करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक विभाग, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग अशा विविध शासकीय यंत्रणांमार्फत प्रयत्न सुरु आहेत. किल्ले संवर्धनामध्ये समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. समाजाने आपला समृध्द सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यासाठी विविध उपक्रमांव्दारे किल्ले संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग नोंदविला जाऊ शकतो. किल्ल्यांवर पर्यटकांनी गैरप्रकार, विद्रुपीकरण केल्यास आपल्या ऐतिहासिक वारशाचे पावित्र्य नष्ट होते. त्यामुळे पर्यटकांनी अशा ठिकाणी तारतम्याने वागण्याची गरज आहे.

किल्ले संवर्धनाचा सांस्कृतिक वारसा टिकविणे ही जबाबदारी केवळ महाराष्ट्र व केंद्रसरकारची आहे असे म्हणून चालणार नाही. त्यासाठी समाज म्हणून आपणही सामाजिक संवेदना जपून आपला ऐतिहासिक ठेवा कसा जपून ठेवला पाहिजे. याविषयीची चर्चा आपण प्रबंधामध्ये केली आहे. यापुढील प्रकरणात प्रबंधाच्या मांडणीतील निष्कर्ष मांडले आहेत.

## संदर्भ व तळटिपा

१. गो. बं. देगलूरकर, (डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती) यांनी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य व गड संवर्धन समिती,

महाराष्ट्र राज्य व्दारा २३ ऑगस्ट २०१५ रोजी आयोजित, पुणे येथील गड संवर्धन एक दिवसीय कार्यशाळेत मांडलेले विचार.

२. विश्वास धोंडे, 'महाराष्ट्राची मुशाफिरी', **साप्ताहिक लोकप्रभा**, २१ जानेवारी २०११, पृ. १.

३. अनिल कठारे व इतर, **पुरातत्त्व विद्या-वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन**, औरंगाबाद, २०१०, पृ. १५५.

४. महाराष्ट्र शासन, गृहविभाग (पर्यटन), शासन निर्णय क्रमांक एमटीसी-०३९९/प्र.क्र. २०१/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ०७ एप्रिल १९९९.

५. कित्ता.

६. महाराष्ट्र शासन, गृहविभाग, शासन निर्णय क्रमांक एमटीसी-२००३/१२/प्र.क्र. ६०४/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ९ जानेवारी २००४.

७. कित्ता.

८. महाराष्ट्र शासन, गृहविभाग (पर्यटन), शासन निर्णय क्रमांक एमटीसी-२००४/७/प्र.क्र. ३०१ व ३३२/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ ऑगस्ट २००४.

९. लहू गायकवाड, **शिवनेरीची जीवनगाथा**, नारायणगाव, जानेवारी २०१५, पृ. १०८.

१०. सार्वजनिक बांधकाम विभाग, जुन्नर कार्यालयाकडून दि. १९/११/२०१५ रोजी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे.

११. कित्ता.

१२. कित्ता.

१३. कित्ता.

१४. कित्ता.

१५. महाराष्ट्र शासन, गृहविभाग (पर्यटन), शासन निर्णय क्रमांक एमटीसी-२००२/७/प्र.क्र. २९९/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ ऑगस्ट २००४.

१६. विश्वास धोंडे, पूर्वोक्त, पृ. ९-१०.

१७. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक आस्था. २००५/प्र.क्र. १४५/सां. का. १, मंत्रालय, मुंबई, दि. १६ जून २००६.

१८. लहू गायकवाड, पूर्वोक्त, पृ. १०८.

१९. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक टीडीसी २००९/१/प्र.क्र. २७/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ फेब्रुवारी २००९.

२०. शासन परिपत्रक क्रमांक टीडीएस २०११/६/प्र.क्र. ४२१/पर्यटन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. २३ जून २०११.

२१. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक टीडीएस २०१२/३/प्र.क्र. १६३/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. १२ एप्रिल २०१२.

२२. http://www.hospitalitybizindia.com/detailnews.aspx?aid=15015&sid=1, दि. ३० ऑक्टोबर २०१२.

२३. अजय जाधव, **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, नोव्हेंबर २०१३, पृ. २३.

२४. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन शुध्दीपत्र क्रमांक : मवैयो २००७/प्र.क्र. १०७/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. २० जुलै २०१४.

२५. देवतळे संजय, **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, ऑगस्ट २०१४, पृ. ५७-५८.

२६. **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, मार्च २०१५, पृ. ३०.

२७. कित्ता, पृ. ३२.

२८. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०१४/प्र.क्र. १५६/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. ३० मार्च २०१५.

२९. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २०१४/१/प्र.क्र. ६०/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. १७ एप्रिल २०१५.

३०. दै. लोकसत्ता, दि. २१ ऑगस्ट २०१५.

३१. http://www.maharashtra.gov.in/PDF/Budget_2015_English_Part_Mah-Gov.pdf, P.14.

३२. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: विकाक- २०१५/१२/प्र.क्र. ६७१/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २२ डिसेंबर २०१५.

३३. **दै. लोकसत्ता**, दि. २२ जानेवारी २०१६.

३४. http://www.maharashtra.gov.in/PDF/Budget_2016_English_Part_Mah-Gov.pdf, P.20.

३५. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २०१४/२/प्र.क्र. ९६/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. १२ एप्रिल २०१६.

३६. महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६, महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीएस- २०१५/११/प्र.क्र. १०२१/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ४ मे २०१६.

३७. कित्ता.

३८. कित्ता.

३९. कित्ता.

४०. कित्ता.

४१. http://www.maharashtra.gov.in/site/upload/CM%20News/English/2016, दि. १९ मे २०१६.

४२. **दै. लोकमत**, दि. २८ मे २०१६.

४३. www.pudhari.com/news/pune/48799.html, दि. २९ मे २०१६.

४४. **दै. तरुण भारत**, दि. २१ सप्टेंबर, २०१६, पृ. ४.

४५. http://www.mahanews.gov.in./Home/Mahanews Home.aspx, दि. २७ सप्टेंबर २०१६.

४६. विनोद तावडे, **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, ऑक्टोबर २०१६, पृ. १९.

४७. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/hindusthan samachar + marathi-epaper-hsmara, दि. २८ फेब्रुवारी २०१७.

४८. कित्ता.

४९. सचिन जोशी, 'दुर्ग भ्रमंती', **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, जानेवारी २०१७, पृ. ३८.

५०. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/webduniya+marathi-epaper-marweb/, दि. १६ मार्च २०१७.

५१. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २०१७/३/प्र.क्र. २९८/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ मार्च २०१८.

५२. http://www.maharashtra.gov.in/PDF/Budget_2018_English_Part_I Mah-Gov. pdf, P.31-32.

५३. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/majha+paper-epaper-majhapa

/rajanchya+sinhagadavar+ropve+honar-newsid-83047249?ss=gml&s=, दि. ०६ मार्च २०१८.

५४. http://m.dailyhunt.in/news/india/marathi/dainik+prabhat-epaper-newsid-84050563, दि. २१ मार्च २०१८.

५५. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: बैठक २०१८/३/प्र.क्र. १९१/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ३१ मार्च २०१८.

५६. http://culturalmaharashtra.gov.in/Culturalwebsite.html

५७. चाकण किल्ला- पुरातत्त्व विभाग फलक.

५८. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी दु. ३.४० वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

५९. कित्ता.

६०. सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे कार्यालयाकडून दि. २०/१०/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या ईमेलच्या आधारे.

६१. सुनिल मोहिते, कनिष्ठ अभियंता, भवन रचना कार्यालय, पुणे, महानगरपालिका, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी संध्याकाळी ६ वाजता झालेली चर्चा.

६२. पुणे महानगरपालिका, भवन रचना कार्यालय, जा. क्र. भवन, १७७९, दि. ०१/०८/२०१७ चे संशोधकास मिळालेल्या पत्राच्या आधारे.

६३. सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे कार्यालयाकडून दि. २०/१०/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या ईमेलच्या आधारे.

६४. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी दु. ४.०० वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

६५. कित्ता.

६६. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २००९/१/प्र.क्र. २७/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ फेब्रुवारी २००९.

६७. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी दु. ४.०० वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

६८. आनंद खर्डे, 'जीर्णोध्दार प्रतापगडाचा', **दै. लोकमत**, दि. १३ डिसेंबर २०१५, पृ. ४.

६९. **दै. सकाळ**, दि. १८ एप्रिल २०१५, पृ. २.

७०. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी दु. ४.१५ वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

७१. **दै. सकाळ**, दि. ६ जून २०१४, पृ. ८, दै. सकाळ, दि. १८ एप्रिल २०१५, पृ. २.

७२. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे यांच्याशी दि. १६/११/२०१५ रोजी दु. ४.१५ वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

७३. सुनिल चिंचोलकर, **सज्जनगडाचा इतिहास**, २०१४, पृ. २५.

७४. कित्ता, पृ. २५.

७५. **दै. सकाळ**, दि. १० सप्टेंबर २०१५, पृ. ११.

७६. भा. वि. कुलकर्णी (संपा.), **गडसंवर्धनाच्या मार्गावर**, मुंबई, २०१७, पृ. ४.

७७. संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये, संचालनालय, मुंबई कार्यालयाकडून दि. ९/५/२०१८ रोजी प्राप्त झालेली माहिती आधारे.

७८. कुलकर्णी भा. वि., (संपा.) पूर्वोक्त, पृ. ११२-११३.

७९. कित्ता.

८०. http://www.sahyadrimaza.com

८१. http://hi.m.wikipedia.org/wiki/भारतीय-पुरातत्त्व-सर्वेक्षण-विभाग

८२. http://asi.nic.in/asi_monu_alphalist_maharashtra_mumbai_asp.

८३. संरक्षक सहाय्यक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, जुन्नर सब सर्कल कार्यालय, जुन्नर यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे.

८४. कित्ता.

८५. कित्ता.

८६. कित्ता.

८७. कित्ता.

८८. **दै. सकाळ**, दि. १८ एप्रिल २०१५, पृ. २.

८९. पुरातत्त्व अधिक्षक कार्यालय, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई यांचेकडून दि. १८ डिसेंबर २०१५ रोजी ई-मेलव्दारे प्राप्त झालेली माहिती आधारे.

९०. http://asiconservationportal.nic.in/public-dashboard/view-rcp/9157

९१. http://asiconservationportal.nic.in/public-dashboard/view-rcp/9159

९२. बी. बी. जंगले, संरक्षक सहाय्यक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, जुन्नर मंडल, **दै. सकाळ**, दि. १९ फेब्रुवारी २०१७, पृ. २.

९३. **दै. सकाळ**, दि. १९ फेब्रुवारी २०१७, पृ. २.

९४. पुरातत्त्व अधिक्षक कार्यालय, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई यांचेकडून दि. १८/१२/२०१५ रोजी ई-मेलच्या आधारे.

९५. http://asiconservationportal.nic.in/public-dashboard/view-rcp/9184

९६. राजन येळीकर, कनिष्ठ संवर्धक सहाय्यक, (Junior Conservation Assistant), पुणे सबसर्कल कार्यालय, केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई यांच्याशी दि. ०९/०६/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

९७. पुरातत्त्व अधिक्षक कार्यालय, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई यांचेकडून दि. १८/१२/२०१५ रोजी ई-मेलच्या आधारे.

९८. http://asiconservationportal.nic.in/public-dashboard/view-rcp/9185

९९. http://asiconservationportal.nic.in/public-dashboard/view-rcp/9167

१००. http://asiconservationportal.nic.in/public-dashboard/view-rcp/9175

१०१. राजन येळीकर, कनिष्ठ संवर्धक सहाय्यक, (Junior Conservation Assistant), पुणे सबसर्कल कार्यालय, केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई यांच्याशी दि. ०९/०६/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. पुणे कार्यालयात झालेली चर्चा.

१०२. पृथ्वीराज चव्हाण, 'वारसा जपुया', **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, २०१३, पृ. ६.

१०३. सुनिल लिमये, मुख्य वनसंरक्षक, पुणे, 'दुर्ग संवर्धन कार्यात वनविभागाचा सहभाग व सहकार्य', पुरातत्त्व विभाग कार्यशाळा दि. २३ ऑगस्ट २०१५.

१०४. कित्ता.

१०५. कित्ता.

१०६. लहू गायकवाड, पूर्वोक्त, पृ. १०७.

१०७. कित्ता, पृ. २३.

१०८. वनविभाग कार्यालय, जुन्नर यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे.

१०९. जयवंत म. पिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर यांचेकडून दि. १९/११/२०१५ रोजी प्राप्त झालेली माहिती.

११०. डी. डी. साळुंखे, वनपरिमंडळ अधिकारी, जुन्नर, यांचेकडून दि. १९/११/२०१५ रोजी प्राप्त झालेली माहिती.

१११. शनिवार दि. २१/११/२०१५ रोजी सिंहगड किल्ल्यास प्रत्यक्ष भेट देऊन केलेली पाहणी.

११२. विलास वाहणे, सहाय्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग यांचेकडून दि. १६/११/२०१५ रोजी प्राप्त झालेली माहिती.

११३. शनिवार दि. १०/०६/२०१७ रोजी प्रतापगड किल्ल्यास प्रत्यक्ष भेट देऊन केलेली पाहणी.

११४. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: एफडीएम २०११/प्र.क्र. १००/फ/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ५ ऑक्टोबर २०११ अन्वये करण्यात येणाऱ्या कामांचा लावण्यात आलेला फलक.

११५. वनविभाग सातारा, वन परिक्षेत्र महाबळेश्वर आणि संयुक्त वनव्यवस्थापन समिती, किल्ले प्रतापगड यांच्यामार्फत लावण्यात आलेला फलक.

११६. अजिंक्यतारा किल्ल्याच्या परिसरात सामाजिक वनीकरण विभाग, सातारा यांचे मार्फत लावण्यात आलेला फलक.

११७. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण - २०१४/प्र.क्र. १५६/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. ३० मार्च २०१५.

११८. कित्ता.

११९. लक्ष्मणशास्त्री जोशी, (संपा.), **मराठी विश्वकोश खंड १२**, मुंबई, १९७६, पृ. ३९६.

१२०. www.asi.nic.in/asi_legislations.asp.

१२१. योगिनी बाबर, www.prahar.in / सांस्कृतिक-वारसा-आणि-शाश्वत पर्यटन/ दि.१५/०४/२०१७.

१२२. मंगेश निरवणे, 'एकांड्या शिलेदारांची लढाई', **दै. लोकमत**, दि. ६ ऑक्टोबर २०१५.

१२३. कित्ता.

१२४. http://economictimes.indiatimes.com/news/company/corporate-trends/csr, दि.१५/०२/२०१५.

१२५. सुरेखा मुळे, ‘उद्योजकांचे सामाजिक दायित्व’, **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, मुंबई, फेब्रुवारी २०१६, पृ. २२.

१२६. कित्ता, पृ. २३.

१२७. कित्ता.

१२८. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: मवैयो - २००५/प्र.क्र. १०७/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. ०२/०२/२००७.

१२९. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन शुध्दीपत्र क्रमांक: मवैयो/२००७/प्र.क्र. १०७/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. २० जुलै २०१४.

१३०. **लोकराज्य**, महाराष्ट्र शासन, मुंबई, ऑगस्ट २०१४, पृ. ५८.

१३१. http://cultural.maharashtra.gov.in/pdf/info_of_puraskar_and_yojna.pdf, **दै. लोकसत्ता**, दि. ८ ऑक्टोबर २०१५.

१३२. **दै. लोकसत्ता**, दि. ८ ऑक्टोबर २०१५.

१३३. **दै. लोकमत**, दि. १४ ऑक्टोबर २०१५.

१३४. www.adoptaheritaje.in.

१३५. www.adoptaheritaje.in/pdf/list_of_adopted_sites_2017.pdf

१३६. कित्ता.

१३७. www.adoptaheritaje.in/monu.html

१३८. http://www.majhapaper.com/2018/04/28/red-fort-adopted-by-delhi-company/, दि. २८ एप्रिल २०१८.

१३९. अंबरीष खरे, ‘दत्तक घेता का वारसा’, दि. २८ एप्रिल २०१८.

http://maharashtratimes.indiatimes.com/editorial/samwad/adoptive-inheritance/ articleshow /64040604.cms,

१४०. कित्ता.

१४१. कित्ता.

१४२. सुलोचना पाटील, **उपयोजित इतिहास**, जळगाव, प्रथम आवृत्ती, २०१६, पृ. ६२.

१४३. अमोल विद्यासागर व इतर, **उपयोजित इतिहास**, पुणे, २०१३, पृ. ७.

१४४. सुलोचना पाटील, पूर्वोक्त, पृ. ६२-६३.

## प्रकरण सातवे

# उपसंहार

'महाराष्ट्रातील निवडक किल्ले सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी इ.स. १६०० ते २०१० असा कालखंड निवडला आहे. पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांच्या इतिहासाचा, सद्यस्थिती व उपाययोजनांचा आतापर्यंत जो मागोवा घेतला, त्याच्या फलश्रुतींचा विचार करणे प्रस्तुत प्रकरणामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणामध्ये प्रबंधाचा सारांश सांगून निष्कर्ष मांडलेले आहेत. या प्रकरणामध्ये एकूण तीन भाग केले आहेत. पहिल्या भागामध्ये प्रबंधाचा गोषवारा दिला आहे. दुसऱ्या भागामध्ये उद्दिष्ट्ये, गृहितके व त्यांची पडताळणी दिली असून तिसऱ्या भागामध्ये निष्कर्ष व शिफारशी यांची मांडणी केली आहे.

प्रबंधाचे पहिले प्रकरण 'प्रास्ताविक' स्वरुपाचे आहे. या प्रकरणात अभ्यास-विषयाची ओळख करुन देऊन प्रबंधाची रुपरेषा मांडलेली आहे. तसेच संशोधन-साधनांचा संक्षिप्त परिचय करून दिलेला आहे. प्रकरणाच्या पूर्वार्धात किल्ल्यांच्या इतिहासाची ओळख करुन दिलेली आहे. विषयाची निवड, विषयाची स्थलकालमर्यादा, वापरण्यात आलेल्या ऐतिहासिक संशोधन पद्धतींची माहिती दिली आहे. आतापर्यंतच्या किल्ल्यांविषयीच्या संशोधन प्रबंधाच्या परिशीलनाचा या उपघटकात आढावा घेतला असून प्रस्तुत संशोधकास त्यापेक्षा वेगळी कशी मांडणी करावयाची आहे; या विषयीचे सविस्तर विवेचनही दिले आहे. एकंदरीतच प्रबंधाचे पहिले प्रकरण हे प्रबंधाच्या मांडणीचा संक्षिप्त परिचय करुन देणारे आहे.

प्रबंधाचे दुसरे प्रकरण 'पुणे जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास' या शीर्षकाचे आहे. किल्ल्यांचा इतिहास प्राचीन काळापासून उपलब्ध होत असला तरी प्रबंधाच्या विस्तार भयास्तव संशोधनासाठी कालखंड इ. स. १६०० ते २०१० असा निवडला आहे. मध्ययुगासंदर्भात किल्ल्यांच्या इतिहासाचा पहिला टप्पा शिवकालीन तसेच मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये किल्ल्यांच्या सहाय्याने मराठयांनी आपल्या स्वराज्याचा औरंगजेबाच्या आक्रमणापासून कसा बचाव केला येथपर्यंत म्हणजेच

इ.स. १७०७ पर्यंतचा आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये पेशवेकालामध्ये किल्ल्यांचे स्थान व महत्त्व कसे होते. त्यावेळी किल्ल्यांनी व परिसरातील गावांनी कशी भूमिका घेतली याविषयीचा टप्पा आहे. पेशवाई नष्ट झाल्यावर ब्रिटिशांनी किल्ले ताब्यात घेतले. मात्र लगेगच त्यांनी किल्ले पाडण्यास प्रारंभ केला कारण मराठ्यांनी स्वराज्य टिकविले ते किल्ल्यांच्या आश्रयानेच. याची जाणिव इंग्रज अधिकाऱ्यांना झाली होती. किल्ले पाडण्याच्या या प्रक्रियेचा अभ्यास अप्रकाशित कागदपत्रांच्या साह्याने आढावा घेतला आहे.

प्रस्तृत प्रकरणामध्ये पुणे जिल्ह्यातील निवडलेल्या सात किल्ल्यांच्या इतिहासाचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. शिवनेरी किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान. या प्रकरणामध्ये प्रथमतः शिवनेरी किल्ल्याची साधार माहिती दिली आहे. साधारणतः इ.स. १२०० या वर्षापासूनचा शिवनेरीच्या इतिहासाचा कालपट सविस्तर व साधार मांडला आहे. शिवनेरी जसा शिवाजी महाराजांचे जन्मस्थान आहे तसाच तो बौद्ध लेणींसाठी प्रसिद्ध आहे.

शिवनेरी किल्ल्यामध्ये ६५ बौद्धलेणी, पाणपोढ्या, स्तूप आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात शिवनेरी किल्ल्याचा वेगाने विकास करण्यात आला. किल्ला कसा जपावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवनेरी. 'मॉडेल फोर्ट' म्हणून शिवनेरीचा 'शिवनेरी विकास प्रकल्प' म्हणून घोषित झाला आहे.

मावळ तालुक्यातील अभेद्य असा 'लोहगड' नावाप्रमाणेच कणखर आहे. या किल्ल्यामधील बौद्ध लेणी हीनयान पंथीय आहेत. पुरंदरच्या तहामध्ये लोहगड मोगलांच्या ताब्यात द्यावा लागला. मात्र शिवाजी महाराज आग्र्याहून परत आल्यावर त्यांनी पूर्वी तहात गमावलेले सर्व किल्ले परत जिंकून घेण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून लोहगड जिंकून घेतला.

'विसापूर'किल्ल्यामध्ये भाजे लेणी आहेत. ही लेणी सातवाहनकालीन असून लेणींमध्ये तत्कालीन शिलालेख आहेत. मात्र 'विसापूर' किल्ला म्हणून वापर पेशवेकाळात सुरु झाला. ही मुंबई दार्शनिकेमध्ये असलेली चूक प्रस्तृत

संशोधनामुळे सुधारण्यास वाव मिळाला आहे. कारण १६६५ मध्ये विसापूर किल्ल्याची माहिती औरंगजेबाचा चरित्रग्रंथ *'आलमगिरनामा'* मध्ये आली आहे.

चाकणचा 'संग्रामदुर्ग' हा बहमनी राजवटीमध्ये बांधलेला भुईकोट किल्ला आहे. *'शिवकालीन-पत्र-सार-संग्रह'* या पंधराखंडी ग्रंथामध्ये विविध ठिकाणी संग्रामदुर्गच्या इतिहासाचा उल्लेख आला आहे. शायिस्ताखानाच्या स्वारीच्या वेळी मोजक्या सैनिकांसह मराठी सरदार फिरंगोजी नरसाळा यांनी शायिस्ताखानाविरुद्ध दिलेला लढा मराठ्यांच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. शिवकाळात दैदिप्यमान इतिहासाची परंपरा असणारा संग्रामदुर्ग आता जवळजवळ अखेरची घटका मोजत आहे. संग्रामदुर्गच्या जीर्णोद्धारासाठी 'फिरंगोजी नरसाळा प्रतिष्ठान संग्रामदुर्ग' (चाकण) या संस्थेची स्थापना झाली आहे.

पुणे शहराच्या पश्चिमेस असलेल्या 'कोंढाणा' उर्फ 'सिंहगड' हा किल्ला पुणे शहराच्या इतिहासाचा मानबिंदू आहे. शायिस्ताखानावर छापा घातला त्यावेळी त्याचे भौगोलिक महत्त्व अधोरेखित झाले. पेशवेकालीन ते महत्त्व तसेच अबादित होते. निजामाच्या स्वारीचे वेळी तसेच यशवंतराव होळकराच्या स्वारीचे वेळी पुणे दरबाराचा सर्व खजिना सिंहगडावरच हलविल्याची नोंद आहे. तेथील लोकमान्य टिळकांचे वास्तव्य, पर्यटन केंद्र म्हणून सिंहगडाचे महत्त्व आजही आपणास सिंहगडाचा इतिहास प्रेरित करणारा आहे.

सिंहगडाप्रमाणेच पुण्याच्या पूर्वेकडील पुरंदरने आजही आपले 'स्थानमहात्म्य' टिकवून ठेवले आहे. मिर्झा राजे जयसिंगास औरंगजेबाने सुचविले होते की, आपण आपल्या स्वारीचा तळ औरंगाबाद परिसरात ठेवावा मात्र जयसिंगाने आपला तळ सासवडजवळ पुरंदरला ठेवला. यावरुन या किल्ल्याचे महत्त्व समजते. मुरारबाजी देशपांडे यांनी दिलेरखानाविरुद्ध दिलेला लढा, त्यामध्ये त्यांचे झालेले बलिदान या घटना सर्वत्र अभ्यासता येतात. मात्र प्रस्तुत संशोधकाने अप्रकाशित मोडी कागदपत्रांच्या साह्याने पुरंदरचा संक्षिप्त मात्र साधार इतिहास लिहिला आहे.

पुणे शहराच्या दक्षिणेकडील व विद्यमान भोर तालुक्यातील 'राजगड' हा किल्ला शिवकाळात मराठी राज्याची राजधानी होता. राजगडावरुन नंतर राजधानी 'रायगड' येथे नेण्यात आली. राजगडाचे महत्त्व आजही ट्रेकिंग व पर्यटनदृष्ट्या एकमेवाद्वितीय आहे. महाराष्ट्र शासनातर्फे शिवनेरी किल्ल्याचे ज्या प्रकारे जतन करण्यात येऊन तो उत्तमरित्या मूळ पदावर म्हणजेच मूळ ऐतिहासिक रुपामध्ये साकारला आहे असेच सर्वच किल्ल्यांच्या बाबतीत व्हावयास हवे.

प्रबंधाचे तिसरे प्रकरण 'सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास' या शीर्षकाचे आहे. या प्रकरणात प्रथम सातारा येथील 'अजिंक्यतारा' या किल्ल्याचा संक्षिप्त मात्र साधार इतिहास दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नातू म्हणजेच संभाजीपुत्र शाहू यांची सातारा ही राजधानी. अजिंक्यतारा किल्ल्याचा यादव राजवंशापासूनच्या इतिहासाचा भव्य कालपट मात्र विस्तारभयास्तव संक्षिप्तपणे व सबळ पुराव्यांनिशी मांडला आहे. पेशवेकाळानंतर साताराच्या प्रतापसिंहांची राजवट या किल्ल्यावर होती. दिनांक १० फेब्रुवारी १८१८ रोजी इंग्रजांनी हा किल्ला जिंकून घेतला. विद्यमान परिस्थितीत शिवाजी महाराजांचे वंशज श्री. उदयनराजे भोसले यांनी अजिंक्यतारा किल्ल्यास गतवैभव प्राप्त करून देण्याचे अर्थपूर्ण काम केले आहे.

दिनांक १० नोव्हेंबर १६५९ रोजी शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध ज्या किल्ल्यावर केला त्याचे नाव 'प्रतापगड' होय. इ.स. १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी जावळीचा परिसर चंद्रराव मोऱ्यांकडून जिंकून घेतला. त्याचवर्षी भोरप्या नावाच्या डोंगरावर प्रतापगडाचे बांधकाम मोरोपंत पिंगळेच्या देखरेखीखाली सुरु केले. मोगल अथवा आदिलशाहीचा प्रतिकार करण्यासाठी जंगलांनी व्यापलेला दुर्ग असणे आवश्यक आहे ही दूरदृष्टी महाराजांनी ठेवली. त्याचा प्रत्यय पुढील तीन वर्षामध्ये म्हणजेच १६५९ मध्ये अफझलखानाच्या स्वारीच्या वेळी आला. यावरुन आपणास प्रतापगडाचे भूराजनैतिक महत्त्व लक्षात येते. पेशवे राजवटीतही प्रतापगडाचे अनन्यसाधारण महत्त्व टिकून होते. आजही किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे किल्ल्याचा महादरवाजा सूर्यास्तानंतर बंद करुन तो

सूर्योदयापूर्वीच उघडतात. हा किल्ला वनविभागाच्या अखत्यारित असून पर्यटकांसाठी किमान सुविधा याठिकाणी केल्या आहेत.

सातारा शहराजवळचा नैसर्गिक व अध्यात्मिक वातावरण लाभलेला किल्ला म्हणजे श्री रामदास स्वामींचा सज्जनगड. गिरीदुर्ग प्रकारातील हा किल्ला 'परळीचा किल्ला' या नावानेही ओळखला जातो. समर्थ रामदासांच्या वास्तव्यामुळे या किल्ल्यास परळीऐवजी 'सज्जनगड' असे नामाभिधान प्राप्त झाले. इ.स. १३५८ पासूनचा सज्जनगडाचा इतिहास उपलब्ध झाला आहे. शिवपुत्र संभाजी यांचे वास्तव्य बऱ्याचदा याठिकाणी असल्याची नोंद आहे. इ.स. १८५७ मध्ये रंगो बापूजी यांनी इंग्रजांविरुद्ध उठाव करण्याच्या कामी सज्जनगडाचा आश्रय घेऊन दक्षिणेतील सर्व सूत्रे हाताळली होती. कामी सज्जनगडाचा कारभार केंद्रीय पुरातत्त्व व राज्य पुरातत्त्व विभागाकडे नाही. रामदास स्वामी संस्थानातर्फे किल्ल्याची देखभाल केली जाते. अशा प्रकारे प्रतापगड, अजिंक्यतारा व सज्जनगड या तीन किल्ल्यांच्या इतिहासाचा कालपट साधार मांडला आहे.

प्रबंधाचे चौथे प्रकरण 'पुणे व सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांची सद्यस्थिती' असे आहे. सद्यस्थितीमध्ये किल्ले हे पर्यटनाचे तथा ऐतिहासिक पर्यटनाचे केंद्र बनले आहे. मात्र पर्यटनाची ठिकाणे कशी जपावीत याविषयीचा किंवा ऐतिहासिक वास्तूंचा वारसा कसा जपावा याविषयीचा दुरगामी दृष्टिकोण दुर्दैवाने आपणाकडे नाही. प्रत्येक ऐतिहासिक वास्तू महत्त्वाची असून ती आपण जपली पाहिजे. कारण त्या त्या वास्तूने त्या त्या काळातील परिस्थितीचे त्या त्या काळातील प्रतिनिधित्व केलेले असते ही बाब आपण विसरतो. ही जपणूक करण्याची जबाबदारी शासकीय आहे असे म्हणून आपण आपली जबाबदारी टाळतो. खरे तर असे होऊ नये. केवळ पुरातत्व विभागास सर्वच किल्ल्यांची निगा राखणे अशक्य आहे याची जाण समाजास हवी.

साधारणपणे पुणे जिल्ह्यातील २९ किल्ल्यांपैकी फक्त १० किल्ल्यांची सद्यस्थिती चांगली आहे. उदा. जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ला शिवाजी महाराजांचे जन्मस्थान. शासकीय पातळीवरील सर्व विभाग (सार्वजनिक बांधकाम,

वनविभाग, जिल्हा परिषदेचा नियोजन विभाग, विघ्नहर सहकारी साखर कारखाना, जुन्नर नगर परिषद, जुन्नर तालुक्यातील इतिहास-अभ्यासक, ट्रेकिंग क्लब, लायन्स, रोटरी क्लब, सह्याद्री गिरीभ्रमण संस्था, श्री शिवाजी ट्रेल संघटना) शासकीय व निमशासकीय, स्वयंसेवी संस्था एकत्र येऊन 'शिवनेरी विकास प्रकल्प' एवढा उत्तम पद्धतीने राबविला की, जुन्नर तालुका 'पर्यटन तालुका' म्हणून घोषित झाला आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्रातील सर्वच किल्ल्यांबाबत योजना-विकास प्रकल्प राबविता येईल. त्या अर्थाने शिवनेरी 'मॉडेल फोर्ट', ठरणार आहे. या प्रकरणामध्ये पुणे व सातारा दोन्ही जिल्ह्यातील किल्ल्यांच्या स्थलदर्शनाचा व उपाययोजना केलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली आहे. ही माहिती गोळा करत असताना एक बाब लक्षात आली ती म्हणजे निवड केलेल्या किल्ल्यांपैकी एकमेव भुईकोट किल्ला आता जतनाअभावी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. चाकणच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीला आधुनिक समाजाने हरताळच फासून किल्ल्याचे महत्त्व आणि मूल्यच नष्ट केले आहे.

शिवनेरी किल्ल्याप्रमाणेच 'सिंहगड' किल्ल्याचे जतन उत्तम पद्धतीने चालू आहे. याकामी पुणे महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी महानगरपालिका जवळपास चार कोटी रुपये खर्च करणार आहे. वास्तविक सिंहगड किल्ला पुणे महानगरपालिकेच्या सीमेत व कार्यकक्षेत येत नाही. तरीही महानगरपालिकेने प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८९ अन्वये महानगरपालिकेच्या मुख्य सभेची मान्यता घेऊन सिंहगडाच्या संवर्धनाच्या कामास प्रारंभ केला आहे.

प्रतापगड, राजगड व पुरंदर किल्ल्याची अवस्था चांगली ठेवण्याचा प्रयत्न त्या त्या प्रशासकीय यंत्रणांनी केलेला दिसतो. मात्र गरज आहे ती समाजाने 'इतिहास-साक्षर' होण्याची. सातारा जिल्हा परिषदेने सज्जनगडावर शासकीय अनुदानामधून काही सोयीसुविधा केल्या आहेत. सज्जनगडाची ओळख जशी

ऐतिहासिक तशीच ती अध्यात्मिक देखील आहे. महाराष्ट्र शासनाचे 'ब' वर्ग प्रमाणपत्र या गडास प्राप्त झाले आहे.

प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये 'दुर्ग संवर्धनः काळाची गरज' या शीर्षकांतर्गत संवर्धनविषयक मांडणी केली आहे. किल्ल्यांवर झालेले मानवी वस्त्यांचे अतिक्रमण, व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक, यांचे जागा मिळविण्यासाठी प्रयत्न त्यामधून नामशेष होणारे किल्ले यामुळे किल्ल्यांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आपणास ही परिस्थिती बदलण्यासाठी मनातील दुरावस्था घालविणे आवश्यक आहे. याविषयी खरे तर तळमळ कशी असावी याचे उत्तम उदाहरण म्हणजे माजी पंतप्रधान मा. इंदिराजी गांधी. दिनांक ११ जानेवारी १९८४ रोजी एशियाटिक सोसायटीच्या द्विवार्षिक सभेमध्ये भाषण करताना त्या म्हणाल्या,''हम विरासत की प्रशंसा करना जानते है। विरासत प्रशंसा का विषय नहीं है। यह सूक्ष्मता से मनन और अध्ययन के योग्य है । इसे स्वाध्याय का साधन समझा जाय । इसको कैसे सुरक्षित रखा जाय और चिरस्थायी रखा जाय तथा विकसित किया जाय, अभी तक समसामायिक मानवता, प्राकृतिक या मानवकृत सौंदर्य के प्रति आमतौर पर अनभिज्ञ है, जो हमारे सामने बिखरी पडी है और इसका हम अनावरण करना चाहते है। नि:संदेह हम सभी को अपनी विरासत पर गर्व होता है। परंतु यह कसक भी होती है की वर्तमान अपने अतीत को सहेज नही पा रहा है। शासकीय स्तर पर स्मारकों को संरक्षित घोषित कर देने, निला पट लगा देने और चौकीदार रख देने से विरासत की रक्षा के मामले में हम कितने गैरजिम्मेदार साबित हो रहे है कि उनकी रक्षा के लिए अब विदेशी संस्थांओ को पहल करनी पड रही है। युनेस्को से संबध्द वर्ल्ड हेरिटेज कमेटी और इंटरनॅशनल कौन्सिल आन मोन्यूमेंटस ने कालिबंगा, चितोडगड, आगरा का किला, ताजमहल, फतहपुर सिकरी और हम्पी के स्मारकों को बचाने की संस्तुति की है। यह विचित्र योग है की दो सौ वर्ष पूर्व भी, विदेशियों ने हमारी ऐतिहासिक विरासत की रक्षा के उपाय किए थे।''

महाराष्ट्र शासनाने ‘किल्ला दत्तक योजना’ जाहीर केली आहे. मात्र बोटावर मोजता येतील एवढेच किल्ले जपले जात आहेत ही बाब खरी होय. किल्ल्यांना आता पर्यटन स्थळ म्हणून अथवा आठवड्यातून एकदा रविवारी सुटीचे ठिकाण असे संबोधतात. उदा. सिंहगडाची ओळख नव्या पिढीस कशी आहे ते पहा- ‘सिंहगडाची ओळख ही नरवीर तान्हाजी मालुसरे यांनी मोगलांकडून जिंकलेला किल्ला अशी असून या गडाची नवी ओळख आता कुरकुरीत कांदाभजी, पिठलं-भाकरी आणि दही मिळण्याचे ठिकाण अशी झाली आहे.

किल्ल्यांच्या दुरावस्थेसाठी शासकीय ध्येयधोरणे व त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने न होणे ही बाब कारणीभूत आहे. तसेच आपण सामान्य लोकदेखील तितकेच जबाबदार आहोत. पुरातत्त्व विभागास अपुरा कर्मचारी वर्ग ही समस्या भेडसावते आहे. केवळ निधी मंजूर करुन चालत नाही तर समाजाने गट तटांचा विचार न करता आपला सांस्कृतिक ठेवा जपला पाहिजे हा संवर्धनाचा विचार करणे आवश्यक आहे.

किल्ले पाहण्यास जाताना आपण प्लॅस्टिकचा वापर करु नये. किल्ल्याच्या निर्मितीकारांनी आपली नावे कोरली नाहीत मात्र पाहणाऱ्या हौशी पर्यटकांनी, प्रेमी युगुलांनी तटांवर आपली नावे कोरली यापेक्षा दुर्दैवाची बाब कोणती? हा दृष्टिकोण बदलून निकोप दृष्टिकोण वाढीस लागला पाहिजे. कचरा टाकणे, तरुणांनी किल्ल्यावर बेधुंद पार्ट्या करणे, किल्ल्याविषयीच्या इतिहासाची अनास्था व विसर तसेच शासकीय नियमांचे पालन न करणे या सर्व बाबी टाळल्या तर किल्ले मूळ स्वरुपात टिकण्यास मदत होईल.

किल्ले टिकविण्यासाठी आता ऐतिहासिक वास्तूंचे अत्याधुनिक पद्धतीने सर्व्हेक्षण करण्यात येते. हवाई, भौमितिक व जी. आय. एस्., जी. पी. एस्., गुगल अर्थ, टोटल स्टेशन सर्व्हे, आणि आरेखन करणे इत्यादी नवीन पद्धतींचा वापर करुन आपणास किल्ले टिकविण्यास मदत होईल. या तंत्रज्ञानाची जोड आपल्या प्रयत्नांना दिली पाहिजे.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'गड संवर्धन समिती' स्थापन केली आहे. या समितीने पहिल्या टप्प्यामध्ये चौदा किल्ल्यांची संवर्धनासाठी निवड केली आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अन्य चौदा किल्ल्यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने किल्ले संवर्धनासाठी राखीव निधी ठेवला आहे.

प्रबंधाच्या सहाव्या प्रकरणामध्ये 'महाराष्ट्र शासन व समाजाची भूमिका' किल्ले संवर्धनासाठी किती व कशी महत्त्वाची आहे याविषयीची सविस्तर मांडणी केली आहे. शासकीय पातळीवरील विविध विभाग पर्यटन व सांस्कृतिक विभाग, केंद्रीय व राज्य पुरातत्त्व विभाग, वनविभाग तसेच महाराष्ट्र राज्य किल्ले संवर्धन समितीचे कार्य इत्यादींनी केलेल्या कार्याचा चिकित्सक आढावा या प्रकरणात सविस्तर मांडला आहे. सार्वजनिक बांधकाम व वनविभागाचे कार्य अर्थपूर्ण आहे.

शासनाने किल्ले संवर्धन करताना प्रामुख्याने रोजगार निर्मितीस प्राधान्य, पर्यटकांना सुविधा उपलब्ध करुन देणे, स्थानिक तरुणांना रोजगार, मार्गदर्शक म्हणून देणे, संयुक्त वनव्यवस्थापन समिती स्थापन करुन किल्ले, घेरा परिसराचा विकास करणे, ज्याठिकाणी जलाशये उपलब्ध आहेत तेथे जलपर्यटनास चालना देणे तसेच शेती-शिवार फेरी पर्यटन म्हणजेच कृषी पर्यटनास चालना देण्यासाठीचा विचार केला आहे.

पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने नवीन पर्यटन धोरण २०१६ घोषित केले आहे. त्यामध्ये पर्यटन स्थळांवर पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी २८५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. या सोबतच रायगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग व इतर किल्ल्यांवर माहिती व मार्गदर्शन केंद्रे, अल्पोपहार केंद्रे, प्रसाधनगृहे इत्यादी सुविधा पुरविल्या जाणार आहेत.

गेल्या काही दशकात पर्यटन क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती झाली आहे. या क्षेत्राने रोजगार निर्मितीत ७.७% एवढा मोठा वाटा उचलला आहे. रोजगार निर्मितीत हे क्षेत्र जगात दुसऱ्या क्रमांकावर येईल एवढी त्यात क्षमता आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन धोरणाची परिणामकारक आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी पर्यटन व

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राज्यामध्ये पर्यटन संचालनालय निर्माण करण्यात आले आहे. त्यानुसार पर्यटन संचालनालयाचे मुख्यालय मुंबई येथे असून त्याचे प्रमुख संचालक (पर्यटन) आहेत आणि त्यांच्या अंतर्गत पाच प्रादेशिक कार्यालये नागपूर, औरंगाबाद, अमरावती, सिंधुदुर्ग व पुणे येथे आहेत. त्यांचे कार्यालय प्रमुख उपसंचालक (पर्यटन) हे आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या गड संवर्धन समितीने किल्ले संवर्धनासाठी काही प्राथमिक स्वरुपाचे मात्र भरीव काम केले आहे. तसेच समाजाचीही मोठी जबाबदारी आहे.सांस्कृतिक वारसा हा सामाजिक सामंजस्य, सामाजिक ऐक्य, सामाजिक परिवर्तन व आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा एक स्त्रोत आहे. कारण सांस्कृतिक वारसा पर्यटनातून विविध देशांचे, धर्मांचे, जातींचे, विविध भाषा बोलणारे, भिन्न संस्कृतीचे, विविध जीवन पध्दती व आर्थिक स्थिती असणारे लोक एकत्र येतात त्यामुळे त्यांच्या आचार विचारांची देवाणघेवाण होते. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक समस्यांची चर्चा केली जाते. यातूनच सामाजिक ऐक्य प्रस्थापित होते. समाजाने किल्ल्यांबाबतचा दृष्टिकोन बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. जोपर्यंत किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन हे आपण आपले स्वत:चे कर्तव्य किंवा जबाबदारी मानत नाही तोपर्यंत त्यात बदल घडवून आणणे शक्य नाही. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण प्रत्येकाने स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. हा समृध्द ऐतिहासिक वारसा आपल्या पुढच्या पिढीला चांगल्या अवस्थेत ठेवून सोपवायची मोठी जबाबदारी समाजावर आहे. समाजातल्या प्रत्येक घटकाने आपली नैतिक जबाबदारी समजून यात पुढाकार घ्यायला हवा. गड किल्ल्यांचे जतन, संवर्धन हे खरे पाहिले तर खूपच खर्चिक व वेळखाऊ असे काम आहे. परंतु किल्ल्यावर गेल्यावर कचरा निर्मिती न करणे, किल्ल्याच्या तटबंदीवर, बुरुजांवर, भिंतींवर नावे न कोरणे, एखाद्या ग्रुपसोबत साफसफाई मोहिमेत सहभागी होणे, किल्ल्यावर वृक्षारोपण करणे, किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व अभ्यासून इतरांना ते पटवून देणे, किल्ल्यावरील पाण्याचे साठे प्रदूषित न करणे, शाळकरी मुलांना त्याचे महत्त्व पटवून देणे, ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या चित्रफिती, पुस्तके याव्दारे

प्रबोधन करणे अशा सहज शक्य होणाऱ्या गोष्टी आपण वैयक्तिक पातळीवर निश्चितच करु शकतो. किल्ल्यांबाबतची समाजाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडू शकतो.तसेच किल्ले दत्तक योजना प्रभावीपणे लागू करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी किल्ले दत्तक योजना राबविली जाऊ शकते. राज्यातील किल्ले संवर्धन क्षेत्रातील विविध स्वयंसेवी संस्था, विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या बिगर शासकीय संस्था, खाजगी उद्योग समूह, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, विविध वित्तीय संस्था, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, शासकीय संशोधन संस्था, खाजगी संशोधन केंद्रे, भारतीय चित्रपट सृष्टीतील सिने अभिनेते, अभिनेत्री, नामवंत खेळाडू इ. घटकांनी किल्ला दत्तक घेऊन त्याचे संगोपन, जतन, संवर्धन व दुरुस्ती केल्यास महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जतन होऊ शकते. त्याचप्रमाणे समाजातील प्राध्यापक, नामवंत डॉक्टर्स, अभियंते, आयटी क्षेत्रातील अभियंते, वकील, स्थानिक उद्योजक, स्थानिक आमदार, खासदार यांच्याव्दारेही किल्ले दत्तक घेतले जाऊन त्याचे संवर्धन होऊ शकते. ही एक प्रकारची सामाजिक जबाबदारी म्हणून त्याकडे पाहिले जाऊ शकते.

आज महाराष्ट्रातील बहुतांशी प्रत्येक जिल्ह्यामध्ये अनेक साखर कारखाने उभे राहिले आहेत. या साखर कारखान्यांनी एक एक किल्ला जरी दत्तक घेऊन त्यावर शास्त्रशुध्द पध्दतीने संवर्धनाचे कार्य केले तर अल्पावधीतच महाराष्ट्रातील सर्वच किल्ल्यांना झळाळी प्राप्त होऊ शकते. त्यासाठी तीव्र इच्छाशक्तीची गरज आहे. सारांश, किल्ले संवर्धनासंदर्भात समाज व शासन यांची भूमिका कशी उत्तरदायी आहे याविषयीची सविस्तर मांडणी या प्रकरणात केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) पश्चिम महाराष्ट्रातील पुणे जिल्हयातील १) शिवनेरी २) लोहगड ३) विसापूर ४) चाकण ५) सिंहगड ६) राजगड ७) पुरंदर व सातारा जिल्ह्यातील १) प्रतापगड २) अजिंक्यतारा ३) सज्जनगड अशा एकूण १० किल्ल्यांचा इतिहास व त्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) किल्ल्यांच्या दुरावस्थेला कारणीभूत ठरणाऱ्या नैसर्गिक, मानवनिर्मित घटकांचा अभ्यास करणे.

३) मराठ्यांच्या दैदिप्यमान कामगिरीमध्ये किल्ल्यांची भूमिका अभ्यासणे.

४) पुरातत्त्व खाते, सांस्कृतिक खाते, पर्यटन खाते व वन खाते यांच्या किल्ल्यांबाबतच्या संयुक्त धोरणांचा अभ्यास करणे व समृध्द ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाबाबत समाजाची भूमिका अभ्यासणे.

५) किल्ल्यांच्या दुरावस्थेबाबत आणि संवर्धनात्मक उपायांबाबत प्रसार माध्यमांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

६) किल्ले संवर्धन, जतन व संरक्षणामध्ये विविध स्वयंसेवी संस्था, विविध मंडळे, बिगर शासकीय संस्था, वैयक्तिक प्रयत्न इत्यादींचा सहभाग व त्यांची भूमिका अभ्यासणे.

७) वैभवशाली किल्ल्यांचा वर्तमान पिढीसाठी व भविष्यकालीन पिढ्यांसाठी असणारा प्रेरक व शाश्वत असा ऐतिहासिक वारसा सर्वांगीण दृष्टिकोनातून अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

१) महाराष्ट्रामध्ये किल्ल्यांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची विविधता वैशिष्ट्यपूर्ण आहे.

२) महाराष्ट्रातील काही किल्ले भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या अखत्यारित आहेत, काही किल्ले राज्य पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित आहेत, तर उर्वरित बहुतांशी किल्ले असंरक्षित आहेत. या किल्ल्यांकडे महाराष्ट्र शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. ऊन, वारा, पाऊस, वनस्पती इत्यादी नैसर्गिक घटकांमुळे किल्ल्यांची पडझड मोठ्या प्रमाणात होत आहे.

३) किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांकडून किल्ल्यांच्या बांधकामाला, मूळ सौंदर्याला मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचत आहे. किल्ल्यांच्या बांधकामाचे विद्रुपीकरण केले जात आहे.

४) समाजाकडून किल्ले जतन, संरक्षण व संवर्धन हा विषय अत्यंत उदासीनतेने पाहिला जातो आहे. समाजाला आपल्या वैभवशाली परंपरांचा व इतिहासाचा विसर पडत चालला आहे.

५) सांस्कृतिक ठेवा वाचवण्यासाठी वर्तमानकालीन पिढीसाठी व भविष्यकालीन पिढीसाठी या ऐतिहासिक किल्ल्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे.महाराष्ट्रातील विविध स्वयंसेवी संस्था, गिरीभ्रमण मंडळे, बिगर शासकीय संस्था यांचेकडून आपल्या गौरवशाली वारशांच्या संवर्धनासाठी, संरक्षणासाठी, जनतेच्या प्रबोधनासाठी व्यापक प्रयत्न सुरु आहेत.

६) जनतेची, लोकप्रतिनिधींची, शासकीय, प्रशासकीय यंत्रणेची इच्छा व पारदर्शक कार्यतत्परता आणि समाजाचे परिश्रम व इतिहासाप्रती निष्ठा याव्दारे आपले दुर्गवैभव जगासमोर येणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

'महाराष्ट्रातील निवडक किल्ले, सद्यस्थिती, त्यांच्या संवर्धनामध्ये महाराष्ट्र शासनाची व समाजाची भूमिका,' हा विषय अभ्यासताना काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. त्या पुढीलप्रमाणे-

१. प्रस्तृत संशोधनासाठी निवड केलेल्या दहा महत्त्वपूर्ण किल्ल्यांच्या इतिहास अभ्यासासाठी विपुल व वैविध्यपूर्ण साधने उपलब्ध आहेत. प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या इतिहासाची सलग परंपरा या किल्ल्यांना लाभली आहे. हे सर्व किल्ले ज्या ठिकाणी आहेत त्या गावांच्या इतिहासावर त्या किल्ल्यांनी आपला ठसा उमटविला आहे.

२. प्राचीन बौद्ध लेण्यांपासून शिवनेरी या शिवजन्मस्थानाच्या आधुनिक पर्यटन स्थळात झालेल्या रुपांतरापर्यंतचा प्रवास सर्वच किल्ल्यांसाठी पथदर्शी किल्ले विकास प्रकल्प ठरला आहे.

३. किल्ल्यांच्या अभ्यासासाठी मध्ययुगीन मोडी कागदपत्रे, अभिलेखागारातील अस्सल कागदपत्रे, डॉ. चंद्रकांत अभंग यांच्या खाजगी संग्रहातील मोडी कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. ही कागदपत्रे पुरंदर, सिंहगड, शिवनेरी या किल्ल्यांसंदर्भात उपलब्ध झाली आहेत. आतापर्यंत अनेक किल्ल्यांचा इतिहास लिहिला गेला आहे. मात्र शिवनेरीच्या इतिहासासंदर्भात उपलब्ध असणारी साधनांची विपुलता आहे.

४. प्रस्तुत संशोधनासाठी निवड करण्यात आलेल्या किल्ल्यांपैकी राजगड, शिवनेरी व सिंहगड हे तीन किल्ले व्यापारी पेठा म्हणून प्रसिद्ध होते. तसेच शिवनेरी, विसापूर, लोहगड हे तीन किल्ले प्राचीन कालखंडात बौद्ध धर्माचे केंद्र होते. आता मात्र या किल्ल्यांपैकी फक्त शिवनेरी किल्ल्याचा विकास वेगाने झाला आहे.

५. शिवनेरी विकास प्रकल्पांतर्गत जुन्नर तालुक्यातील शिवनेरी घेरा परिघातील २५ गावांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. हा किल्ला इतरांसाठी मॉडेल फोर्ट ठरला. परिणामी 'जुन्नर तालुका पर्यटन तालुका' म्हणून घोषित झाला आहे.

६. महाराष्ट्रातील किल्ल्यांची व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी पुरातत्व खात्याकडे सोपविली आहे. सर्वच किल्ल्यांसाठी पुरातत्व विभागाने काम करावे आणि आपण सर्व जबाबदारी शासनावर सोपवून चालणार नाही. पर्यायाने स्वयंसेवी संस्था, किल्ल्यांवर प्रेम करणाऱ्या संघटना यांनी दुर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

७. किल्ला पाहण्यास येणाऱ्या पर्यटकांनी किल्ल्यांच्या बांधकामास, मूळ सौंदर्याला बाधा येणार नाही, आपल्या कृतीने ऐतिहासिक वास्तूंना बाधा

पोहोचेल अशी कृती केली जाणार नाही याची जाणिव सदैव ठेवणे आवश्यक आहे.

८. संशोधनासाठी निवडलेल्या किल्ल्यांपैकी फक्त 'शिवनेरी किल्ल्याचा इतिहास' लिहिला आहे. मात्र अजूनही सिंहगड, सज्जनगड, राजगड, पुरंदर, लोहगड या किल्ल्यांचा इतिहास साधार लिहिलेला नाही. त्याची नव्याने मात्र संक्षिप्त स्वरुपात प्रस्तृत प्रबंधाच्या रुपाने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

९. विविध किल्ल्यांचा वैभवशाली व स्फूर्तीदायक इतिहास वर्तमान व भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायक व शाश्वत आहे. त्यासाठी आपण हा ऐतिहासिक वारसा टिकविला पाहिजे.

१०. मध्ययुगीन विशेषतः मराठा कालखंडामध्ये केवळ शिवनेरी, सिंहगड याच किल्ल्यांना महत्त्व नव्हते तर पुरंदर, लोहगड, प्रतापगड , सज्जनगड यांनाही भू-राजनैतिक व अध्यात्मिक महत्त्व होते. तसेच ते आजही टिकून आहे.

**शिफारशी**

१. केंद्रीय व राज्य पुरातत्त्व विभागाने महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे प्रभावी संवर्धन करण्याकरिता पुरेशा आर्थिक निधीची तरतूद व प्रशिक्षित मनुष्यबळाची भरती करावी.

२. पुरातत्त्व विभाग, पर्यटन व सांस्कृतिक विभाग, वनविभाग, जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय व सुसंवाद राखला जावा.

३. शास्त्रशुद्ध पद्धतीने दुर्गसंवर्धन करण्यासाठी व त्याचे योग्य प्रशिक्षण देण्यासाठी पुरातत्त्व विभागाद्वारे सर्टिफिकेट कोर्स राबविण्यात यावा.

४. दुर्गसंवर्धन क्षेत्रातील संस्थांनी पुरातत्त्व विभागाचे मार्गदर्शन व सहकार्य घेऊन किल्ल्यांवर शास्त्रशुद्ध पद्धतीने संवर्धन कार्य करावे.

५. शासकीय यंत्रणेकडून किल्ल्याचे संवर्धन कार्य पूर्ण झाल्यानंतर जतन कार्यामध्ये समाजाने सक्रिय सहभाग घ्यावा.

६. किल्ल्यांवर येणाऱ्या पर्यटकांनी आपल्या ऐतिहासिक वारशाचे पावित्र्य राखणे अत्यंत आवश्यक आहे. किल्ल्याचे व परिसराचे सौंदर्य नष्ट होऊ नये यासाठी तारतम्याने वागणे अत्यावश्यक आहे.

७. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून किल्ल्यांवरील पर्यटन वाढण्यासाठी तेथील वैशिष्ट्यांची प्रसिद्धी करण्यात यावी. किल्ल्यावर जाण्यासाठी पक्के रस्ते बांधण्यात यावेत. किल्ल्यांवर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे यांची सोय करण्यात यावी तसेच बागबगिचा, संग्रहालये यांची निर्मिती करण्यात यावी.

८. किल्ले संवर्धनामध्ये समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी पुरातत्त्व विभागाकडून विविध कार्यशाळा, व्याख्याने, प्रशिक्षण शिबिरे यांचे आयोजन करण्यात यावे.

९. किल्ल्यांच्या परिसरात वनविभागाने मोठ्या प्रमाणावर स्थानिक वनस्पतींच्या प्रजातींची लागवड करुन पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न करावेत.

१०. औद्योगिक कंपन्यांनी व्यावसायिक सामाजिक उत्तरदायित्त्वातून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक किल्ल्यांना उर्जितावस्था मिळवून देण्यासाठी व त्यांचे शाश्वत संवर्धन करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

११. पुरातत्त्व विभागाने किल्ले संवर्धनामध्ये थ्रीडी मॅपिंग, जी. आय. एस., जी. पी. एस., टोटल स्टेशन सर्व्हे, गुगल अर्थ अशा अत्याधुनिक तंत्राचा वापर करावा.

१२. पुरातत्त्व विभागाकडून किल्ल्यांचे संवर्धन कार्य होत असताना परदेशांमधील किल्ल्यांचे संवर्धन कशा पद्धतीने केले जाते याचा तुलनात्मक अभ्यास करण्यात यावा.

१३. आपल्या देशातील ऐतिहासिक स्थळे, स्मारके, किल्ले यांचे प्रभावीपणे मार्केटिंग करण्यात यावे, जेणेकरुन पर्यटकांचा ओघ वाढण्यास सुरुवात होईल.

१४. समाजातील विविध संस्था, शाळा, महाविद्यालये, मंडळे, औद्योगिक कंपन्या, लोकप्रतिनिधी यांच्याकडून दुर्लक्षित किल्ले दत्तक घेऊन त्यांचे सवंर्धन होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रोत्साहनपर प्रभावी योजना राबवाव्यात.

१५. गड किल्ले स्वच्छता मोहिम दरवर्षी राबविण्यात यावी. व त्यामध्ये महाविद्यालये, विद्यापीठे, औद्योगिक कंपन्या, विविध स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग घेण्यात यावा.

प्रस्तुत प्रबंधाद्वारे निवड केलेल्या दहा किल्ल्यांचा संक्षिप्त मात्र साधार इतिहास, अप्रकाशित कागदपत्रांच्या साह्याने मांडला आहे. ऐतिहासिक वास्तूंचे महत्त्व लक्षात घेऊन आपण त्या चांगल्या पद्धतीने जपल्या पाहिजेत. त्यासाठी केवळ सरकारनेच पुढाकार घ्यावा असे नव्हे तर सरकासमवेत आपणही दुर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने इतिहास जपण्यास मदत होईल.

# निवडक संदर्भ-साहित्य-सूची

## मूळ साधने

**(अ) अप्रकाशित मोडी कागदपत्रे :**

**१. शासकीय अभिलेखागार, (पेशवे दफ्तर), पुणे येथील साधने :**

१. *चिटणीसी दफ्तर :* रुमाल नंबर ३, ४, ६, ८, ९, १९.

२. *संशोधनासाठी निवडलेले कागद* (सं.नि.का.) दप्तर क्रमांक २, ३, ४, ५, ६, ८, ११, १२, १४, १५, १७, १८, १९, २०, २६, २९, ३४, ४९, ५५.

३. राजस्थान राज्य अभिलेखागार, बिकानेर यांच्याकडून प्राप्त झालेली कागदपत्रे.

४. इनाम कमिशनचे कागद (ही सर्व सिंहगड किल्ल्यांची कागदपत्रे आहेत.)

५. पुरातत्त्व अधिक्षक कार्यालय, केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेली कागदपत्रे.

६. संरक्षक सहाव्यक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, जुन्नर सब सर्कल कार्यालय, जुन्नर यांचेकडून प्राप्त प्राप्त झालेली  कागदपत्रे.

७. संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून प्राप्त झालेली  कागदपत्रे.

८. सहाव्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे कार्यालयाकडून ईमेलव्दारे प्राप्त झालेली  कागदपत्रे.

९. पुणे महानगरपालिका, भवन रचना कार्यालयाकडून प्राप्त झालेली कागदपत्रे.

१०. सार्वजनिक बांधकाम विभाग, जुन्नर कार्यालयाकडून प्राप्त झालेली कागदपत्रे.

११. वनविभाग कार्यालय, जुन्नर यांचेकडून प्राप्त प्राप्त झालेली माहिती.

**२. खाजगी संग्रह :**

१. अभंग चंद्रकांत यांच्या खाजगी संग्रहातील कागदपत्रे.

**(आ) प्रकाशित मराठी साधने :**

१. पगडी सेतुमाधवराव (संपा.), *मोगल दरबाराची बातमीपत्रे*, खंड १ ते ३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८३.

२. सरदेसाई गो. स., *मराठी रियासत, खंड १ ते ८*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, १९९८.

३. सरदेसाई गो. स. (संपा.), *पेशवे दफ्तर खंड १ ते ४५*, द डेक्कन व्हर्न्याकुलर प्रेस, गर्व्हमेंट ऑफ बॉम्बे, १९११.

४. कुलकर्णी भा. वि. (संपा.), गडसंवर्धनाच्या मार्गावर, संचालक, पुरातत्त्व वस्तु-संग्रहालये संचालनालय, मुंबई, २०१७.

५. महाराष्ट्र पर्यटन धोरण २००६.

६. महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६.

**(इ) शासन निर्णय**

१. महाराष्ट्र शासन, गृहविभाग (पर्यटन), शासन निर्णय क्रमांक एमटीसी-२००२/७/प्र.क्र. २९९/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ ऑगस्ट २००४.

२. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक आस्था. २००५/प्र.क्र. १४५/सां. का. १, मंत्रालय, मुंबई, दि. १६ जून २००६.

३. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : मवैयो -२००५/प्र.क्र. १०७/ सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. ०२ फेब्रुवारी २००७.

४. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २००९/१/प्र.क्र.२७/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ फेब्रुवारी २००९.

५. शासन परिपत्रक क्रमांक टीडीएस २०११/६/प्र.क्र. ४२१/पर्यटन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. २३ जून २०११.

६. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक टीडीएस २०१२/३/प्र.क्र. १६३/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. १२ एप्रिल २०१२.

७. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन शुध्दीपत्र क्रमांक : मवैयो २००७/प्र.क्र. १०७/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. २० जुलै २०१४.

८. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०१४/प्र.क्र. १५६/सां. का. ३, मंत्रालय, मुंबई, दि. ३० मार्च २०१५.

९. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: विकाक- २०१५/१२/प्र.क्र. ६७१/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २२ डिसेंबर २०१५.

१०. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २०१४/२/प्र.क्र. ९६/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. १२ एप्रिल २०१६.

११. महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६, महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीएस- २०१५/११/प्र.क्र. १०२१/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. ४ मे २०१६.

१२. महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीडीसी- २०१७/३/प्र.क्र. २९८/पर्यटन, मंत्रालय, मुंबई, दि. २१ मार्च २०१८.

## (ई) प्रकाशित इंग्रजी साधने :

1. Joshi Bapu Purushotam, *Selections from the Satara Raja and the Peshwas Diaries I to VII,* Poona Deccan Vernacular Translation Society with the Permission of the Government of Bombay, 1911.
2. *English Records on Shivaji*, (1659-1682), Shiva Charitra Karyalaya, Poona. 1931.
3. Gazetteers of the Bombay Presidency
   i) *Bombay Gazetteer*, vol. XVII, Part III, Poona, 1883.
   ii) *Pune Gazetteer*, 1883.

4 National Policy for conservation of the Ancient Monuments, Archeological sites and Remains, Archeological Survey of India, February 2014.

## दुय्यम साधने

## (अ) ग्रंथ (मराठी) :

१. अक्कलकोट सतीश, दुर्ग, खंड पहिला, सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली, ऑगस्ट २००५.

२. आपटे द. वि., *शहाजी व निजामशाही, शिवचरित्र निबंधावली*, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२९.

३. आपटे द. वि., केळकर न. चि., (संपा.), *शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड* १, प्रका. श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

४. आवळसकर शांताराम विष्णू, *रायगडाची जीवनगाथा*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, चौथी आवृत्ती, २००५.

५. कुलकर्णी अ. रा., *शिवकालीन महाराष्ट्र*, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३.

६. कुलकर्णी अ. रा. (संपा.), *रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र*, मानसन्मान प्रकाशन, पुणे, २००४.

७. कुलकर्णी अ. रा., *कंपनी सरकार, (ईस्ट इंडिया कंपनी)*, राजहंस प्रकाशन, पुणे, २०००.

८. कुलकर्णी अ. रा., खरे ग.ह., (संपा.), *मराठ्यांचा इतिहास खंड पहिला*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६.

९. कुलकर्णी अ. रा., *जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ : मराठ्यांचा इतिहासकार व प्रशासक*, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७१.

१०. कुलकर्णी अ. रा., *जेधे शकावली*, डायमंड प्रकाशन, पुणे, २००७.

११. कुळकर्णी श्रीधर रंगनाथ, *शिवकालीन राजनीती आणि रणनीती*, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९४.

१२. कुंटे भ. ग., *बहमनी साम्राज्याचा इतिहास*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६६.

१३. कुंटे भ. ग., *अहमदनगरची निजामशाही*, मुरली प्रकाशन, मुंबई, १९६२.

१४. केतकर कुमार, *कथा स्वातंत्र्याची*, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे, १९८५.

१५. कोठेकर शांता, *इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

१६. खरे ग. ह., (संपा.), *ऐतिहासिक फार्सी साहित्य (औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार) खंड ६*, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९७३.

१७. खरे ग. ह., कुलकर्णी अ. रा., (संपा.), *मराठ्यांचा इतिहास, खंड ३*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६.

१८. खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र्यं., (संपा.), *ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ३*, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे १९७३.

१९. खरे ग. ह., *स्वराज्यातील तीन दुर्ग*, छत्रपती शिवाजी संशोधन केंद्र पुणे, प्रकाशन भारत इतिहास संशोधन मंडळ, १९६७.

२०. खरे ग. ह., *सिंहगड*, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९६९.

२१. खरे ग. ह., *दुर्ग*, सह्याद्री विहार मंडळ, दादर, मुंबई, १९८०.

२२. खोबरेकर वि. गो., *महाराष्ट्राचा इतिहास*, मराठा कालखंड, भाग २, (१७०७-१८१८) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.

२३. गायकवाड खं. आ., (संपा.), *करवीर सरदारांच्या कैफियती*, प्रका. गायकवाड, कोल्हापूर, १९७१.

२४. गायकवाड लहू कचरू, *शिवनेरीची जीवनगाथा*, सनय प्रकाशन, नारायणगाव, पुणे, जानेवारी २०१५.

२५. घाटे निरंजन, *आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च २०१४.

२६. चिटणीस कृ. ना., *मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, खंड १*, प्रका. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८५.

२७. चिंचोलकर सुनिल, *सज्जनगडचा इतिहास*, श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड, सातारा, २०१४.

२८. जाधव सुरेश, *जुन्नर-शिवनेरी परिसर*, महाराष्ट्र पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९.

२९. जोशी प्र. न., *आज्ञापत्र (अमात्यकृत)*, व्हीनस प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, जुलै १९९७.

३०. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), *मराठी विश्वकोश खंड - २, ३, १२, १४, १५, १६, १८, १९*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.

३१. जोशी शं. ना., (संपा.), *शिवकालीन पत्रसार संग्रह भाग-१*, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, २००९.

३२. जोशी शं. ना., (संपा.), *शिवकालीन पत्रसार संग्रह खंड-२*, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, २००९.

३३. जोगळेकर स. आ., *सह्याद्री*, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९३.

३४. तापकीर संदीप, *महाराजांच्या जहागिरीतून पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले*, गरुडझेप प्रकाशन, पुणे, २०१२.

३५. दिवेकर सदाशिव (संपा.), *कवींन्द्र परमानन्दकृत शिवभारत* (संस्कृत मूळ व मराठी भाषांतर), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९९८.

३६. देव प्रभाकर, *इतिहास : एक शास्त्र*, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२.

३७. देव शां. भा., *महाराष्ट्राचा इतिहास*, प्रागैतिहासिक महाराष्ट्र, खंड १, भाग १, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

३८. देशपांडे प्र. न., *राजगड दर्शन*, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८१.

३९. देशपांडे सुधाकर, *प्राचीन भारतीय राजनीती*, वरदा प्रकाशन, पुणे, १९७८.

४०. नंदुरबारकर पां. रा., दांडेकर ल. का. (संपा.), *श्रीशिवदिग्विजय (श्री शिवाजी महाराजांची बखर)*, बडोदे, १८७५.

४१. पठारे उत्तम व इतर, *जुन्नर तालुका : स्थानिक इतिहास लेखन*, सनय प्रकाशन, मार्च २०१४.

४२. पवार जयसिंगराव, *आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध*, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २०१०.

४३. पाटील पद्मश्री बाळासाहेब, *रणरागिणी ताराराणी चरित्र ग्रंथ*, सत्यवादी प्रकाशन, कोल्हापूर, मार्च १९८१.

४४. बेंद्रे वा. सी., *मालोजीराजे आणि शहाजी महाराज*, पार्श्व पब्लिकेशन्स, कोल्हापूर, २०१३.

४५. बोराडे प्रमोद, *मावळची राजधानी दुर्ग विसापूर*, शिवशाही प्रकाशन, पुणे, २०१३.

४६. भावे वा. कृ., *पेशवेकालीन महाराष्ट्र*, वरदा प्रकाशन, पुणे, १९५६.

४७. भिडे गणेश रंगो, (संपा.), *अभिनव मराठी ज्ञानकोश*, भाग तिसरा, ज्ञानकोश मंडळ, कोल्हापूर, फेब्रुवारी १९६७.

४८. मिराशी वा. वि., *शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, खंड* १, डॉ. मु. चां. देवपुजारी प्रकाशन, नागपूर, १९७४.

४९. मेहेंदळे ग. भा., *श्री राजा शिवछत्रपती, खंड* १, भाग १, डायमंड प्रकाशन, पुणे, १९९६.

५०. राजवाडे वि. का., (संपा.), *मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड* २, (संपादन व पुनर्मुद्रण प्र. न. देशपांडे), धुळे, १९१८.

५१. वाकणकर ल. श्री. व इतर (संपा.), *महाराष्ट्र इतिहास आणि संस्कृती पर्यालोचन*, भारतीय इतिहास संकलन समिती, महाराष्ट्र, १९९५.

५२. शहा मुं. बा., (संपा.), *इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड* ११, राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, १९९८.

५३. सरदेसाई गो. स., *मराठी रियासत खंड* १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९९९.

५४. सेन एस. एन., *मराठ्यांची लष्करी व्यवस्था*, (अनु. डॉ. सदाशिव शिवदे), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०११.

५५. हिवरगावकर ब. आ., (प्रस्तावना-दुर्गा भागवत), *कौटिलीय अर्थशास्त्र*, (मराठी भाषांतर - ह. अ. भावे) वरदा प्रकाशन प्रा. लि., पुणे, सहावे पुनर्मुद्रण, ऑगस्ट २०१२.

५६. हेरवाडकर र. वि., (संपा.), *मल्हार रामराव चिटणीस विरचित श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र*, व्हीनस प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती, २०००.

## (आ) ग्रंथ (इंग्रजी)

1. Chile Bhagwan, *Famous Forts in Maharashtra*, Shivsparsh Prakashan, Kolhapur, 2011.
2. Kamalapur, J.N., *The Deccan Fort*, Popular Book Depot, Bombay, 1961.
3. Kelkar (Ed.), N., *Pictorical Shivaji, Vol-I*, Pune, 1936.
4. Grewal J.S., (ed.), *Studies in Local and Regional History*, Guru Nanak University, Amriutsar, 1974.
5. Gupta Pratul Chadra, *Bajirao and the East India Company, 1796-1818*, Commonwelth Publishers, New Delhi,1958.
6. Kulkarni A.R., *The Maraths*, History of medieval Deccan, Vol. II.
7. Indian Archaeology 1969 – 70 A Review.
8. Indian Archaeology 1984 – 85 A Review.
9. R. C. Tripathi, *Indian Archeology 1984-85 A Review*, Delhi, 1987, P.134.
10. Sen S. N., *Military System of Marathas*, Calcutta, 1925.

## (इ) साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक

१. साप्ताहिक लोकप्रभा, १० ऑगस्ट २०१२.

२. साप्ताहिक लोकप्रभा, २२ फेब्रुवारी २०१३.

३. साप्ताहिक सकाळ, १४ मे, २०१६.

४. साप्ताहिक लोकप्रभा, १७ जून २०१६.

५. लोकराज्य, एप्रिल २०१३.

६. लोकराज्य, नोव्हेंबर २०१३.

७. लोकराज्य, ऑगस्ट २०१४.

८. लोकराज्य, मार्च २०१५.

९. लोकराज्य, फेब्रुवारी २०१६.

१०. लोकराज्य, ऑक्टोबर २०१६.

११. लोकराज्य, जानेवारी २०१७.

१२. माध्यम अंक-१, सप्टेंबर १९९५.

१३. दुर्गांच्या देशातून दिवाळी अंक, गरुड झेप प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर २०१२.

१४. दुर्गांच्या देशातून - दिवाळी अंक, गरुडझेप प्रकाशन, पुणे, २०१३.

१५. दुर्गांच्या देशातून - दिवाळी अंक, गरुडझेप प्रकाशन, पुणे, २०१४.

**(ई) वर्तमानपत्रे**

१. दै. सकाळ, दि. ८ जून २०१४

२. दै. महाराष्ट्र टाइम्स, १२ सप्टेंबर २०१४

३. दै. पुढारी, दि. २४ नोव्हेंबर २०१४

४. दै. लोकसत्ता, दि. २२ जानेवारी २०१६

५. दै. तरुण भारत, दि. ११ फेब्रुवारी २०१७

६. दै. लोकमत, २८ फेब्रुवारी २०१७

**(उ) संशोधन पत्रिका**

१. नवभारत, जून २०१२.

२. भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३.

**(ऊ) वेबसाईट**

१. www.asi.nic.in

२. http://asi.nic.in/asi-monu-alphalist-maharashtra-mumbai-asp

३. http://asiconservationportal.nic.in

४. www.adoptaheritaje.in.

५. http://www.maharashtra.gov.in

६. http://www.mahanews.gov.in

७. http://culturalmaharashtra.gov.in/culturalwebsite.html.

८. http://www.maharashtratourism.gov.in

९. http://www.loksatta.com

१०. http://www.lokmat.com

११. http://www.esakal.com

१२. www.pudhari.com

१३. http://shivray.com/gad.kille-savardhan/restoration.

१४. www.maharashtratimes.com

१५. http://www.tarunbharat.com

१६. http://www.thequint.com

१७. http://en.wikipedia.org/wiki/geographic-information-system

१८. http://www.sahyadrimaza.com

१९. http://www.hospitalitybizindia.com

२०. http://economictimes.indiatimes.com

२१. http://www.majhapaper.com

२२. http://www.marathimati.net

**(ए) शोध प्रबंध अप्रकाशित**

१. स्वामी शिला कमलाकर,*मध्ययुगीन कालखंडातील किल्ले परंडा आणि परिसर*, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २००९.

२. गोर्डे विलास सोमा, *चाकण (ता. खेड) गावचा स्थानिक इतिहास (प्राचीन ते आधुनिक)*, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,जुलै २०११.

३. तापकीर श्रीकांत नारायण, *महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन*, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,जुलै २०१२.

४. तांबे प्रिया लक्ष्मण, *पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास*, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,सप्टेंबर २०१४.

५. Deshpande P. N., *Maratha Forts (A Study Of Forts With Reference To The Royal Period Of Maratha History)*, अप्रकाशित पीएच्.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे,१९७१.

६. कोरडे शाकुराव, 'ओतूरचा इतिहास (प्राचीन ते अर्वाचीन)', अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, जून, २०१८.


७. गायकवाड लहू, 'जुन्नरचा इतिहास (प्राचीन ते अर्वाचीन)', अप्रकाशित पीएच्.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, ऑक्टोबर, २०१२.

८. कांबळे विकास चंद्रकांत, *सातारा जिल्ह्यातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युध्दातील ऐतिहासिक महत्त्व (१६८९-१७०७)*, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ,जुलै २००८.

९. पाटील पी. आर., *शिवकालीन पुणे जिल्ह्यातील किल्ले*, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९२.

## परिशिष्ट क्रमांक : १

१. पुणे जिल्हयाचा नकाशा




२. सातारा जिल्हयाचा नकाशा




# परिशिष्ट क्रमांक : २

## १. किल्ले पाडण्यासंदर्भातील कागदपत्रे



इंग्रजांनी पेशवाई संपुष्टात आणल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांवर हळुवार ताबा मिळविला. ज्या किल्ल्यांच्या आधाराने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी केली होती त्याच किल्ल्यांच्या आश्रयाने मराठ्यांनी आपले राज्य टिकविले. इंग्रजांनी पेशवाई संपुष्टात आणून प्रथमदर्शनी हे सर्व किल्ले पाडण्याची मोहिम हाती घेतली. जुन्नर परिसरातील सर्व किल्ले पाडून टाकावेत अशी आज्ञा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशानसाने माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यास दिली याविषयीचा हा विस्तृत पत्रव्यवहार -


प. न. केळकर
खाजगी संग्रह

प. न. केळकर
खाजगी संग्रह

श्री

'कपतान हनरि पार्टनर साहेब बहादर कलकटर आमदानगर. ईजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार तालुके सीवनेर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलकटर कीले आमदानगर सलाम आंकी मेहेरबा वाईट साहेब याजकडे तालुके सीवनेर येथील कोले बीतपसील.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कीले शीवनेर | १ | कीले हरिश्चंद्र |
| १ | कीले हडसर | १ | कीले कुंजरगड |
| १ | कीले चावंड | १ | कीले जीवधन |

येकूण सहा कील्याचे बंदोबस्ताचे काम मेहेरबा अलिशान बडे साहेब याचे चगदी अन्वये बाईटसाहेब करतील तुम्ही दखलगिरी न कर्णे तूम्ही कारकुन ठेवीले

असतील ते उठवून माघार आणावे बाईटसाहेब यास रुपये ११७३।।।८४ आकरासे पावणे चवऱ्यात्तर रुपये चवऱ्यांशी रसीद घेऊन कबज घ्यावे ज्यादा काय लीहीणे २।। तारीख १४ माहे जून १८१८.'

श्री

'कपतान हनरि पाटंजर साहेब बाहादूर कलकटर आमदानगर. इजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार तालुके सीवनेर प्र।।। जुन्नर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलकटर कीले आमदानगर सलाम आंकी तूम्ही पत्र पाठविले ते पावले पत्री मजकूर की तालुके सीवनेर वगैरे साहा कीले हुकुमाप्रा।। बोईट साहेब याचे स्वाधीन केले. बंडाकडील पन्नास स्वार व काही पायदळ येऊन भील व रामोसी मीलोन कसबे बापूर येथे घासदाणा घेतला. आणि दोन प्रहर रात्रीस निघोन गेले त्याचा ठीकाण नाही या प्राा च कसबे कोतूळ येथीलही पत्र आहे. तेच ब जीनस पाो आहे म्हणोन लीहीले त्यास तालुके सीवनेर वगैरे साहा कीले वोईटसाहेब याचे स्वाधीन केले ते ठीकच केले. कील्याचे बंदोबस्तास पुणे पाो दोनसे लोक आहेत. त्याचा इतका हजेरी वगैरे बंदोबस्त साहेब राखतील. तुम्ही त्या लोकांची दखलगीरी न करावी महाल समंधे तुम्हापासी सीबंदी आहे त्याचा बंदोबस्त तुम्ही राखून तुमचे नजीक मौजे ब्राह्मणवाडे येथे घाटात बंडवाले यांना काही भील व रामोसी वगैरे जमा करून डोंगरात आहेत म्हणोन बातमी आहे, याजकरिता तुम्ही बहुत हुशारीने राहून महालचा बंदोबस्त राखावा व हुशारीने राहणे पुण्याहुन जाहीरनामे आले त्याज प्राो (प्रमाणे) दोन तुम्हाकडे पाठविले आहेत हे सर्वास जाहीर

करावा. गाव ब गाव नका द्याव्या या प्राो (प्रमाणे) सर्वास ल्याहावे कीले हायचे छावणीचा बंदोबस्त सालाबाद सीरस्ते प्राो तुम्ही बोईट साहेब याची भेट घेऊन लोकास बरसातीत कील्यावर राखावयाची सोय यथास्थित साहेबाचे हुकुमाप्राो करून घ्यावी छपरबंदीस मरामतीस खर्च होईल त्याची यादी लेहून जलद मुाा पाठवावी ज्यादा काय लीहीणे २।।

तारीख २२ माहे जून सन १८१८ हे किताबत. सही इंग्रजी हेन्री पॉटिंजर कलेक्टर जून २२, १८१८

'कपतान हनरि पार्टभीजर साहेब बहादर कलकटर आमदानगर.

ईजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार ताा सीवनेर व प्रांतजुन्नर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब कलकटर कीले आमदानगर सलामआंकी तुमचे प्रांतात किले पाडावयास कपतान इस्टनस साहेब बहादूर आले आहेत त्यास दूध वगैरे जो हम जिनस लागेल तो खुष खरेदी मोलास देत जाणे कमत्ती न करणे ताकीद स जाणीजे तेरीख १८ माहे दशंबर सन १८१८ इसवी.

सही - इंग्रजी हेनरी पॉटिंजर'

श्री

'कपतान हनरि पाटंजर साहेब बाहादूर कलकटर आमदानगर. हसबुल हुकूम कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलक्टर कीले आमदानगर, ताा मोकदमान देहाय प्रांत जुनर व माहालनिहाय सुभे आमदानगर मालूम बहादरी वीला पांत मजकुरी कीले पाडावयास कपतान इस्टनस साहेब बाहदूर आले आहेत. त्यास दूध वगैरे जो हमजीनस लागेल तो खुष खरेदी मोलास देत जाणे कमती न करणे ताकीद सख्त जाणीजे २ ।। तेरीख १८ माहे दशंबर सन १८१८ इसवी.

इंग्रजीत सही हेनरी पॉटिंजर'

श्री

'कपतान हेनरि पाटंजर साहेब बहादर कलकटर आमदानगर. इजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार ताा सीवनेर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब

बहादूर कलकटर कीले आमदानगर सलामआंकी तुम्ही अर्जदास्ती पाठविल्या त्या पावल्या त्याचे बी पतसील

कलमे

१ बहुट्याचा वेळू पाठविला तो पावला १ ते दी १२ दीशंबरची अर्जीत लीहीले की पूणीयातून मेहेरबान इंजेनर वीष्णूजी साहेब कीले नारीयणगडास आले आहेत. कीले पाडावयाकरिता आले तूर्त कीले मजकूर लिहून विनंती शेवेसी पाठवितो. कीले नारायणगड पाडीतात तेथे दफेदार व कारकून व जवान मिलोन सत्तावीस आहेत. त्यास नगरास पाो कीवा बडतर्फ करावे. येवीसीची आज्ञा जाहाली पाहिजे. कीले मजकूरावर दारु व तोफा लाहान व जेंजेला व बंदुका वगैरे सरंजाम जकीरा आणून जुनरास ठेवावा किंवा कसे करावे येवीसीची आज्ञा जाहाली पाहिजे म्हणोन लिाा. त्याजवरुन तुम्ही जकीरा वगैरे कील्यातील कीले सीवनेरीस ठेवावा. तोही कीला पाडावा आसे जाहाल्यास जुनरास आणोन ठेवावे. सीबंदीचे लोक कील्यातील साहेबांनी कीला पाडल्यानंतर देतील ते हुजूर पाा जाणे. २ सदरहू दोन कलमे लिहिल्याप्रमाणे अमलात आणून हुशार सरकार हुकूमाप्रमाणे राहाणे जाणीजे. तारीख १५ माहे दीशंबर सन १८१८ इ. सर्व.

इंग्रजीत सही - हेनरी पॉटिंजर कलेकटर.


डिसेंबर १५, १८१८.

र ।। ते दी. १८

बार माहे दिशंबर सन १८१८.'

इंग्रजांनी शिवनेरी किल्ला ताब्यात घेण्याच्या वेळी शिवनेरीच्या कारभाराची माहिती असलेला परशराम खंडेराव राहतेकर उर्फ अन्याबा यास सातारला बोलावून घेतले. जेम्स कॅनिंगहॅम ग्रँट डफ व परशराम खंडेराव यांची याविषयीची चर्चा झाली होती. या चर्चेचा तपशील समाविष्ट असलेले पत्र.

## २. राजस्थान राज्य अभिलेखागार, बिकानेर मार्फत प्रकाशित फार्सी कागदपत्रे



नवीन नं. 108 / पूर्व नं. 99

(मूल फ़ारसी गद्य का देवनागरी में रूपान्तरण)

(मुहर कुर्सीनामा व तुग़रा अंकित)

उम्द–ए–दौलतख़्वाहाने कारदां, ज़ुब्द–ए–मुतहव्विराने फ़िदवीयत निशान, नुकाव–ए–दिलावराने इरादत अन्देश, कुदव–ए–ख़ैरअन्देशाने अक़ीदतकेश, शाइस्त–ए–मराहिमे बेकराने पादशाही, सज़ावारे इनायाते बे पायाने शाहनशाही, ख़ुलास–ए–राजहाए इख़लास शिआर, यकरंग, मुतीउल इसलाम मीरज़ा राजा जयसिंह! बतवज्जोहाते पादशाही मुफ़तख़र व मुबाही बूदह बिदानद अर्ज़दाश्ते कह दरींविला बाकिलीदहाए क़िलअह कूपन्ज व नेह क़िलअह दीग़र शिवाजी हुसूली कह साबिक़न अज़ जुमलह बीसत व सेह क़िलअह सेवा बतसर्रुफ़ औलिया–ए–दौलते क़ाहिरह दरआमदह व उर्ज़ादाश्ते....... मोहम्मद व हाजी बदीउज़्ज़मान बबारगाहे जाहोजलाल इरसाल दाश्तह बूद अज़ नज़रे अशरफ़े आला गुज़श्त। मारूज़ दाश्तह कह ....... ख़िलाफ़त व जहांबानी दर बाब मुक़र्रर गरदानीदन अहशामे दरख़ोर गुन्जाइश बर क़िलअह

नवीन नं. 108 / पूर्व नं. 99

औरंगज़ेब आलमगीर का फ़रमान मीरज़ा राजा जयसिंह के नाम

मुहर कुर्सीनामा :– अबुल मुज़फ़्फ़र मुहम्मद मुहिय्युद्दीन आलमगीर बादशहा ग़ाज़ी इब्ने शाहजहाँ बादशाह इब्ने जहांगीर बादशाह इब्ने अकबर बादशाह इब्ने हुमायूं बादशाह इब्ने बाबर बादशाह इब्ने उमर शेख़ शाह इब्ने सुल्तान अबु सईद शाह इब्ने सुल्तान मुहम्मद शाह इब्ने मीरां शाह इब्ने अमीर तैमूर साहिब क़िरआन।

तुग़रा – फ़रमान अबुल मुज़फ़्फ़र मुहम्मद मुहिय्युद्दीन औरंगज़ेब आलमगीर बादशाह ग़ाज़ी।

अनुभवी शुभेच्छुओं में श्रेष्ठ, स्वामीभक्त शूरवीरों में उत्तम, आस्थावान बहादुरों में विश्वसनीय, आस्थाधारी शुभेच्छुओं में अग्रणी, बादशाह की असीम अनुकम्पाओं के योग्य, शाहनशाह की असीमित मेहरबानियों के लाइक़, निष्कपट, निश्छल राजाओं में सर्वोत्तम, इसलाम के प्रति आस्थावान मीरज़ा राजा जयसिंह।

बादशाह की कृपाओं से गौरवान्वित व सम्मानजनक होकर अवगत हों कि वर्तमान में आपने जो अर्ज़दाश्त, कूपन्ज (गढ) व नौ अन्य गढ़ों की चाबियों सहित, शिवाजी के उन 23 गढ़ों के अतिरिक्त जो पूर्व में शाही दरबार के सरदारों के अधिकार में आ चुके हैं, बादशाही दरबार में प्रेषित की थी वह (नाम पढ़ने में नहीं आता) हाजी बदीउज़्ज़मा की अर्ज़दाश्त सहित हमारे दृष्टिगोचर हुई। हमारी सेवा में अर्ज़ किया गया कि बादशाह सलामत ने उपरोक्त गढ़ों में से किसी गढ़ पर योग्य व्यक्तियों की नियुक्ति की गुन्जाइश (आवश्यकता)

معروض واقفان عتبه سپهر مرتبه گشته بود که در پاس آداب این دولت ابدبنیاد ازو تهاون بوقوع آمد

بجهی منصب معاتب شده بود از انرو که بر نوشته آن اسوه خیراندیشان عبودیت کیش اعتماد تمام است حسب

الالتماس آن زبده مخلصان فدویت نشان کمی مزبور را بحال فرمودیم معروض پس کرده اند

که در باب محمد صادق و محمد ابراهیم و برهمنان کاره و غیره که در بیجاپور اند چه حکم میشود آنها را پیش از

شدن خویش بجانب بیجاپور طلب نماید یا همانجا بگذارد در عوض آنها وکلای عادل خان را با وجود نگاه دارد حضور بکنند

حکم گیتی مطاع شرف نفاذ می یابد که هرگاه آن عمده مخلصان از جانب عالم مطلب شود محمد صادق حاجب را

با دستاویزهای خویشتن پیش خود طلبید الا امر کاره که همیشه در آنجا می باشد و پیش از رسیدن جمعه مذکوره ملازم

به بیجاپور رخصت نماید حقیقت عهد و پیمانی که آن خلاصه دودمان با سیوا میان آورده و قسمهای مغلظه

نشده مسموع شد که سیوا یاد کرده و وا گذاشتن دوازده قلعه خرد و کلان و محالی که یک لک هون حاصل است

## देवनागरी लिपि में रूपान्तरण

मारूज़े वाक़िफ़ाने अतबह सिपहर मरतबह गश्तहबूद कह दर पासे आदाबे ई दौलते अबद बुनयाद अज़ू तहावुन बवुक़ूअ आमदह बकमीए मनसब मुआतव शुदह बूद। अज़ां रू कह बर नविश्तए आं उसव–ए–ख़ैरअन्देशाने उबूदियत केश एतिमादे तमाम अस्त हस्बुलइल्तिमास आं ज़ुब्द–ए–मुख़लिसाने फ़िदवीयत निशान कमीए मज़बूर रा बहाल फ़रमूदेम। मारूज़े अक़दस गरदानीदह कह दर बाबे मुहम्मद सादिक़ व मुहम्मद इब्राहीम व ब्रह्मनान हरकारह वग़ैरह कह दर बीजापूर अन्द चेह हुक्म मीशवद आं हा रा पेश अज़ रवानह शुदने ख़ेश बजानिबे बीजापूर तलब नुमायद या हुमां जा बगुज़ारद व एवजे आं हा वुकला–ए–आदिल ख़ां रा बा ख़ुद निगाह दारद या रूख़सत कुनद। हुक्मे गेती मताअ् शरफ़ निफ़ाज़ मी याबद कह हर गाह आं उम्दए मुख़लिसाने मिज़ाजदान आज़िगे सिम्ते मतलब शवद मुहम्मद सादिक़ हाजिब रा बा फ़रिस्तादहाए ख़ेशतन पेशे ख़ुद ब तलबद इल्ला हर कार–ए–के हमेशा दर आं जा मी बाशद व पेश अज़ रसीदने जमाअह मज़कूरह मुल्ला ख़ुर्रम रा ब बीजापूर रुख़सत न दहद। हक़ीकते अहदो पैमाने कह आं ख़ुलास–ए–हवाख़्वाहान बा सेवा बमियान आवुर्दह व क़समहाए मुग़ल्लज़ व मुशाद्ददह हनूद कह सेवा याद करदह व वा गुज़ाश्तने दवाज़दह क़िलअह ख़ुर्द व कलां व महाले कह यक लक हून हासिल आनस्त

## हिन्दी में अनुवाद

इस गरिमामयी दरबार के व्यक्तियों ने बतलाया कि उक्त व्यक्ति से शाही दरबार के आदाब बजा लाने में कोताही हुई है अतः इसके मनसब में कमी करके दंडित किया गया। किन्तु आपके सन्देश पर सम्पूर्ण विश्वास है इसलिए आपकी अर्ज़ी पर उक्त कमी को बहाल कर दिया है।

हमारी अर्ज़ में पहुंचाया गया है कि मुहम्मद सादिक़ व मुहम्मद इब्राहीम व सन्देशवाहक ब्राह्मणों आदि जो कि बीजापूर में है, के बारे में क्या आदेश है?क्या मेरे (राजा) बीजापुर प्रस्थान करने से पूर्व उनको बुला लिया जावे, या वहीं रहने दिया जावे और उनके स्थान पर आदिलख़ां के वकीलों को अपने पास रखूं या विदा कर दूं?

इस विषय में हमारे (बादशाही) आदेश यह हैं कि जब आप अपने उद्देश्य (प्राप्ति) की ओर प्रस्थान का निश्चय करें तो अपने व्यक्तियों को भेजकर मुहम्मद सादिक़ द्वारपाल को अपने पास बुला लें और सन्देशवाहक (ब्राह्मण) वहीं रहें और उपरोक्त व्यक्तियों के पहुंचने से पूर्व मुल्ला ख़ुर्रम को बीजापुर के लिए रवाना न करें।

आपके और शिवाजी के मध्य जो कौल–वचन हुए हैं और हिन्दुओं द्वारा खाई हुई दृढ़ और अडिग सौगन्दें, जिनको शिवाजी ने स्मरण किया है, और छोटे–बड़े बारह गढ़ों तथा उन स्थानों जिनकी आय एक लाख हूण (सोने का सिक्का) हैं,

# परिशिष्ट क्रमांक : ३

## १. महाराष्ट्र राज्य गड किल्ले संवर्धन समिती बाबत शासन निर्णय

सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे
याचे कार्यालय
आवक क्रमांक 484
दिनांक 30/5/2018
वर्गीकरण तंत्र

राज्यातील गड व किल्ले यांचे जतन व संवर्धन करणेसाठी गड संवर्धन समितीस मुदतवाढ देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१४ / प्र.क्र.१५६ /सां.का.३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार ) भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ मे,२०१८

**संदर्भ** : १. समक्रमांकाचा दि.३०.०३.२०१५ चा शासन निर्णय.
२.समक्रमांकाचा दि.१३.०६.२०१८ चा शासन निर्णय.

**शासन निर्णय** :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायी जीवनाची नवीन पिढीला ओळख करून देण्यासाठी तसेच राज्यातील गड व किल्ले यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता मार्गदर्शन करण्यासाठी मा.मंत्री ( सांस्कृतिक कार्य ) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये गड संवर्धन समिती गठीत करण्यात आली होती. तसेच संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये सदर समितीची पुर्नरचना करून त्यास दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर समितीची मुदत पुर्ण झाली असल्याने सदर समितीला ३१.०३.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विचारांती या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे समितीची पुर्नरचना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य | अध्यक्ष |
| २ | श्री. पांडुरंग बलकवडे | प्रमुख मार्गदर्शक |
| ३ | श्री. ऋषिकेश यादव | सदस्य |
| ४ | श्री. राजेंद्र टिपरे | सदस्य |
| ५ | श्री. चंद्रशेखर शेळके | सदस्य |
| ६ | श्री. प्रमोद पाटील | सदस्य |
| ७ | श्री. भगवान चिले | सदस्य |
| ८ | श्री. वि. रा. पाटील | सदस्य |
| ९ | श्री. प्र.के. घाणेकर | सदस्य |
| १० | श्री. सचिन जोशी | सदस्य |
| ११ | श्री. प्रफुल माटेगावकर | सदस्य |
| १२ | श्री. संकेत कुलकर्णी | सदस्य |
| १३ | श्री. अमर आडके | सदस्य |
| १४ | श्री. अवधूत पै | सदस्य |
| १५ | श्रीमती मृदुला माने | सदस्य |
| १६ | श्री. चंद्रकांत अभंग | सदस्य |
| १७ | श्री.श्रमिक गोजमगुंडे | सदस्य |
| १८ | श्री.प्रविण भोसले | सदस्य |
| १९ | श्री.गिरीश टकले | सदस्य |
| २० | श्री.आनंद देशपांडे | सदस्य |
| २१ | श्री.राजेश शांताराम देसाई | सदस्य |
| २२ | संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा व इतर अनुषंगिक बाबीं खालीलप्रमाणे :-**

१. गड संवर्धन समितीवरील प्रमुख मार्गदर्शक व सदस्यांची नियुक्ती दि.२१.०५.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीकरिता राहील. या कालावधीत समितीने आपला अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे.
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०३.०३.२०१० अनुसार समितीवर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्यांना रु.८९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या दराने प्रवास भत्ता व

दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल, मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: बैठक-२०१२/प्र.क्र.१/सेवा-५, दि.२१.०५.२०१२ मधील तरतुदीनुसार उपरोक्त प्रमुख मार्गदर्शक व सदस्यांना बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

४. समितीचे सर्व सदस्य हे अध्यक्षांच्या पूर्व मान्यतेने व त्यांच्या निर्देशाप्रमाणे गडकिल्ल्यांचा प्रवास करतील.

**या समितींची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल :**

१. राज्यातील असंरक्षित गड, किल्ल्यांची जिल्हानिहाय माहिती तयार करणे,

२. राज्यातील सर्व गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी कोणकोणत्या विविध उपक्रमांचे आयोजन करुन जनजागृती करता येईल याबाबतचा सर्वंकष आराखडा तयार करणे.

३. गडकिल्ल्यांचे संवर्धानासाठी स्थानिक व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी व युवक संघटना, महिला बचत गट यांना अधिकाधिक कशाप्रकारे सहभागी करुन घेता यईल याचाही आराखडा तयार करणे.

४. पुरातत्व विभागाच्या दुरूस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक बनविण्यापूर्वी किल्ल्यावर केल्या जाणाऱ्या कामाची सुची व आराखडा समितीस ई-मेलद्वारे कळविण्यात येईल. समिती सदस्यांकडून प्राप्त झालेल्या सुचना गृहीत धरून धरूनच किल्ल्यावर केल्या जाणाऱ्या जतन कार्याचे अंदाजपत्रक बनवण्यात येईल.

५. जतन कार्य सुरू असताना समिती सदस्य किल्ल्यांना भेट देऊ शकतील, आणि यासाठी विभागाचे अधिकारी तसेच संबंधित कंत्राटदार समितीस आवश्यक सहकार्य देतील.

६. पुरातत्व व संग्रहालये विभागाच्या दत्तक स्मारक योजनेअंतर्गत ब संवर्गाप्रमाणे स्मारकाची स्वच्छता व पहारा या बाबींसाठी गडसंवर्धन संस्था आपले योगदान देऊ शकतील या योजनेअंतर्गत झालेल्या नोंदणीकृत संस्थांचे पालकत्वासाठी आलेले अर्ज तक्ता स्वरूपात समिती अभिप्रायार्थ प्रत्येक सदस्यास पाठविण्यात येतील.

७. पुरातत्व विभागाने हाती घेतलेले किल्ले सोडून इतर किल्ल्यांची माहितीपुस्तिका व माहितीपत्रक तयार करण्यासाठी समितीचे सदस्य योगदान देऊ शकतील.

या संदर्भात सर्व अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता यासाठी संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यांत येत आहे. यासाठी होणारा खर्च " मागणी क्र. झेड्डी -२ पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, २२०५ कला व संस्कृति (०१) (०२) पुरातत्वशास्त्र संचालनालय (राज्य)(अनिवार्य), (२२०५ १३३८) १३ कार्यालयीन खर्च " या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यांत यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्र.म.महाजन )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे स्वीय सहायक
मा. मंत्री (सां.का.) यांचे स्वीय सहायक
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (१ व २ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
अ.मु.स. , नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
अ.मु.स. , वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक
उप सचिव/सहसचिव (पर्यटन)/ (सां.का.)/ आस्था, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई
संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई.
अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय मुंबई / नागपूर/ औरंगाबाद.
सहायक संचालक पुरातत्व विभाग पुणे / रत्नागिरी /औरंगाबाद / नांदेड/ नाशिक/नागपूर.
निवड नस्ती, का- सां.का.३.

# परिशिष्ट क्रमांक : ४

१. किल्ल्यांची छायाचित्रे

## * शिवनेरी *



महादरवाजा (मुख्य दरवाजा)




बालशिवाजी-वीरमाता जिजाबाई यांचे शिल्प

## * लोहगड *



गणेश दरवाजा



लोहगडावरील सर्पाकार द्वाररचना

# * विसापूर *



चुन्याचा घाणा




हनुमान टाके

# * चाकण *



संग्रामदुर्ग किल्ल्याच्या मध्यातून गेलेला रस्ता



पुरातत्व खात्याने डागडुजी केलेली तटबंदीची भिंत

## ❊ सिंहगड ❊



पुणे दरवाजा क्र. ३



नरवीर तानाजी मालुसरे पुतळा व मेघडंबरी

## ❊ राजगड ❊



सदर इमारतीचे चालू असलेले बांधकाम



सुवेळा माची

## * पुरंदर *




वीर मुरारबाजी देशपांडे पूर्णाकृती पुतळा



जीर्णावस्थेत असलेले पुरंदरेश्वर मंदिर

## * अजिंक्यतारा *



किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार



राजवाड्याचे भग्नावशेष

## ✻ प्रतापगड ✻




श्री भवानी माता मंदिर



छ.शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा

## ✻ सज्जनगड ✻



श्री छत्रपती शिवाजी महाद्वार



श्री समर्थ रामदास स्वामींचा मठ व शेजघर

# परिशिष्ट क्रमांक : ४

१. प्रश्नावली नमुना

१. हा किल्ला कोणत्या शासकीय यंत्रणेच्या अखत्यारित येतो?

२. आजपर्यंत या किल्ल्याच्या संवर्धनासाठी, जतनासाठी आपल्या विभागाकडून कोणते प्रयत्न झाले आहेत? त्यासाठी किती खर्च झाला आहे?

३. महाराष्ट्र शासनाद्वारे दरवर्षी किल्ल्यांच्या संवर्धनासाठी किती रकमेची तरतूद करण्यात येते?

४. आपल्या विभागाकडे किती मनुष्यबळ आहे व किती किल्ले आपल्या नियंत्रणाखाली आहेत?

५. किल्ल्यांची डागडुजी, संवर्धन, जतन करत असताना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो?

६. किल्ले संवर्धन कार्यामध्ये समाजाचा सहभाग घेतला जातो का?

७. पर्यटकांद्वारे किल्ल्यांना हानी पोहोचवली जाते, विद्रुपीकरण केले जाते त्यासाठी कोणत्या कायदेशीर तरतुदी आहेत?

८. काही किल्ल्यांवर विविध स्वयंसेवी संस्थांकडून संवर्धन कार्य सुरु आहे. त्यासाठी त्या संस्थेने आपल्या कार्यालयाची परवानगी घेतली होती का?

९. किल्ल्यांवर दगड, वाळू, सिमेंट, खडी यांची वाहतूक कशी केली जाते?

१०. किल्ल्यांच्या संवर्धन कार्यामध्ये समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी कोणकोणत्या योजना राबविण्यात येत आहेत?

११. गड किल्ले संवर्धन समिती स्थापन झाल्यानंतर कोणती संवर्धनाची कामे चालू झाली आहेत?

१२. गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी किती रकमेची तरतूद करण्यात आली आहे?

१३. महाराष्ट्रातील कोणत्या किल्ल्यांची निवड गडसंवर्धन समितीने केली आहे?

## २. मुलाखत यादी

| अ. क्र. | मुलाखत देणाऱ्याचे नाव | पद | मुलाखत दिनांक | मुलाखत स्थळ व वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ.तेजस गर्गे | संचालक, पुरातत्त्व व वस्तु संग्रहालये संचा. महाराष्ट्र राज्य | ०९/०५/२०१८ | पुरातत्त्व वस्तुसंग्रहालये संचालनालय कार्यालय, मुंबई, दु. ३.१५ वा. |
| २. | डॉ.सचिन जोशी | सदस्य,गड संवर्धन समिती महाराष्ट्र राज्य | ०८/०५/२०१८ व १७/०७/२०१५ | डेक्कन कॉलेज अॅन्ड पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च सेंटर, येरवडा, पुणे. दु. ३.२० वा. स. १०.०० वा. |
| ३. | श्री.राजन येळीकर | कनिष्ठ संवर्धन सहायक, भारतीय पुरातत्त्व विभाग, पुणे सबसर्कल कार्यालय, पुणे | ०९/०६/२०१७ व ०६/१२/२०१४ | भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, पुणे सबसर्कल कार्यालय , पुणे. स. १०.३० वा. दु. १.३० वा. |
| ४. | डॉ.लहू गायकवाड | सहायक प्राध्यापक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव. ता. जुन्नर, जि. पुणे | १८/११/२०१६ | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, स. ११.०० वा. |
| ५. | श्री.डी.डी.साळुंखे | वनपरिमंडळ अधिकारी, जुन्नर वन विभाग, जुन्नर | १९/११/२०१५ | जुन्नर वनविभाग कार्यालय, जुन्नर, सायं. ५.३० वा. |
| ६. | श्री.जयवंत पिसाळ | वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर वनविभाग, जुन्नर | १९/११/२०१५ | जुन्नर वनविभाग कार्यालय, जुन्नर, दु. ४.०० वा. |
| ७. | श्री.रामकृष्ण पुजारी | पुजारी, शिवाई देवी मंदिर, शिवनेरी किल्ला | १९/११/२०१५ | शिवाई देवी मंदिर, शिवनेरी किल्ला, स. १०.०० वा. |
| ८. | श्री.विलास वाहणे | सहाव्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग, पुणे | १७/११/२०१५ | सहाव्यक संचालक, राज्य पुरातत्त्व विभाग कार्यालय, पुणे. दु. ३.४० वा. |
| ९. | श्री.सुनिल मोहिते | कनिष्ठ अभियंता, भवन रचना कार्यालय, महानगरपालिका, पुणे | १७/११/२०१५ | भवन रचना कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे, सायं. ६.०० वा. |
| १०. | श्री.एम.एस. चौहान | पुरातत्त्व अधिक्षक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग, मुंबई सर्कल, मुंबई | १६/११/२०१५ | पुरातत्त्व अधिक्षक कार्यालय, मुंबई, दु. २.२० वा. |
| ११. | श्री.भगवान चिले | सदस्य, गड किल्ले संवर्धन समिती, महाराष्ट्र राज्य | २२/०४/२०१५ | केटरिंग ऑफिस, कोल्हापूर, स ११.०० वा. |
| १२. | श्री.गणेश खोडके | अभिरक्षक, कोल्हापूर, पुराभिलेखागार, कोल्हापूर | १७/०४/२०१५ | कोल्हापूर पुराभिलेखागार कार्यालय, कोल्हापूर, स. ११.१५ वा. |
| १३. | श्री.संदीप तापकीर | किल्ले संशोधक | ०६/१२/२०१४ | दै. लोकमत कार्यालय, पुणे, दु.३.३० वा. |
| १४. | प्रा.प्र.के. घाणेकर | निवृत्त प्राध्यापक व किल्ले संशोधक | ०५/१२/२०१४ | प्रा. घाणेकर यांचे निवासस्थान, पुणे, सायं. ५.०० वा. |

३. किल्ल्यांना क्षेत्रभेट

| अ. क्र. | किल्ला | दिनांक |
|---|---|---|
| १. | शिवनेरी | १९/११/२०१५ |
| २. | लोहगड | १८/०२/२०१८ |
| ३. | विसापूर | १८/०२/२०१८ |
| ४. | चाकण | १९/११/२०१५ |
| ५. | सिंहगड | २१/११/२०१५ |
| ६. | राजगड | २२/११/२०१५ |
| ७. | पुरंदर | २०/११/२०१५ |
| ८. | प्रतापगड | १७/०८/२०१४, १०/०६/२०१७ |
| ९. | अजिंक्यतारा | १६/०८/२०१४ |
| १०. | सज्जनगड | १८/०८/२०१४ |